भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
राष्ट्रीय पुस्तकालय, कलकत्ता ।
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

वर्ग संख्या
Class No. Mar 891.461

पुस्तक संख्या
Book No. So 143

रा० पु०/ N. L. 38. 3 Vols

MGIPC--S4—9 LNL/66—13-12-66—1,50,000.

योगिराज सोहिरोबानाथकृत

पारमार्थिक पद्यसंग्रह

भाग १ ला.

भक्तिपर, उपदेशपर, आणि हिंदुस्थानी पदें.

वीतराग भयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥
भ० गी० अ० ४

[जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । तुकाराम]

स्वरूपापासूनि नव्हे च्युत । यालागीं नामे आंबे अच्युत ॥
सोहिरोबा आंबे धन्य संत । अवतार प्रत्यक्ष गहिनीचा ॥ ७७ ॥
राजारामप्रासादीकृत भक्तमंजरीमाला अ० ९४

हा भाग.
भगवंत बाळकृष्ण पै रायकर
ह्या
एका नामधारी मानवदेहानें
अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन जुनाट
हस्तलिखीत प्रतीच्या वगैरे आधारें तयार केला
तो
मुंबईत " इंदुप्रकाश स्टिमप्रेसमध्यें " छापून प्रसिद्ध केला.

सन १९०७.

किंमत ३॥ रुपये

9798
22.1.64

कैलासवासी

डाक्तर भाऊ दाजी, जी. जी. एम्. सी.

ह्यांच्या

अनेक पूज्य गुणांचें अभिनंदन करण्याकरितां

हा भाग त्यांस प्रकाशकांनीं

अत्यादरपूर्वक अर्पण

केला असे.

प्रस्तावना.

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्यतु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥
यो मांपश्यति सर्वत्र सर्वंच मयि पश्यति ।
तस्या हं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥

भ० द्गी० अ० ८ व अ० ६

योगिराज सोहिरोबानाथ.

शिरोभागीं निर्दिष्ट केलेल्या योगीपुरुषानें केलेलीं पारमार्थिक काव्यें "योगिराज सोहिरोबानाथ" याच नांवाच्या त्रैमासिक पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न आम्हीं करीत आहों. आजपर्यंत या पुस्तकांतून "सिद्धांत संहिता पूर्वार्ध व उत्तरार्ध, हा ग्रंथ; "पद्यसंग्रह भाग २ आणि स्फूट काव्यें" याप्रमाणें प्रसिद्ध झालींच आहेत. आज पद्यसंग्रह भाग १ ला यांत "भक्तिपर, उपदेशपर, आणि हिंदुस्थानी पदें" याप्रमाणें देऊन हा भाग पुरा करून, महाराष्ट्रीय बंधुजनांस सप्रेम सादर करीत आहों. पहिल्यानें या भागांत "भक्तिपर आणि उपदेशपर पदें" एवढींच देण्याचा हेतु होता, पण मागाहून कांहीं कारणामुळें हिंदुस्थानी पदेंही याच भागांत देण्याचा योग आला आहे; तरि मुमुक्षूंनीं यांतील पद्यांची योग्यता नेहमीं लक्षांत ठेऊन यांचा उपयोग करून घ्यावा. [अनुभवनिष्ठ ज्याचीं पदे । श्रवणपठणें भेटे मुकुंद । प्राप्त होय निजात्मपद । धरितां छंद श्रीगुरुपदीं ॥ १९२ ॥ राजाराम प्रासादिकृत भक्तमंजरी माला अ० ९४] अज्ञ जनांस ताळयावर आणण्याकरितां या सत्पुरुषानें किती सणसणीत व हृदयद्रावक उपदेश केलेला आहे हें जाणण्याचें काम यांतील पद्यांचें लक्षपूर्वक मनन करणाऱ्या वाचकावरच सोंपवितों. कचित् ठिकाणीं हस्तलिखित पोथ्यांत निरनिराळया तऱ्हेचे पाठभेद आढळले आणि अर्थदृष्ट्या पाहिलें तरी त्यांतून कोठें कोठें अर्थ गौरवही दिसून येतें. त्यांत मूळ ग्रंथकाराचा पाठ कोणता खरा हें ठर-

विणें जरी शक्य नाहीं, तथापि आमच्या दृष्टीनें चांगला प्रगल्भ पाठ वाटला तो पाठ मूळ पद्यांत कायम ठेऊन इतर पाठांतराची योजना यांत आलाहिती केली आहे. त्याचा फायदा वाचकांस बरेच अंशानें होईल अशी आशा आहे. कोठें कोठें मुळांत शब्द पडावयाचे ते पडले नाहींत व कित्येक ठिकाणीं सबंधच्या सबंध चरणच पडावयाचे राहिले आहेत आणि कित्येक ठिकाणीं तर भलतेच शब्द पडून चुका राहून गेलेल्या आहेत. तरी वाचकांनीं शुद्धिपत्राकडे विशेष लक्ष पुरवावें.

या भागांतील पद्यांचा विषय अध्यात्म किंवा ब्रह्मज्ञानाचा असल्यामुळें तो फारच गहन आहे. शिवाय सोहिरोबानाथांनी त्यांत आपला सर्व अनुभव सांगितला आहे. ह्मणून नुसता तो आल्हादकारक आहे इतकेंच केवळ नाहीं, तर तो अंतीं अत्यंत फलदायकही आहे ही गोष्ट सानुभव असून त्याविषयीं यत्किंचित सुद्धां संशय घेण्यास जागा नाहीं. सत्यज्ञानी व भावीक हे सदैव तरतच गेले, आणि पाखांडवादी हे सदैव बुडतच आले असें अनेक रितीच्या अनुभवानें सिद्ध झालें आहे. सदैव सुख असावें व दुःख कधींच नसावें, असें सारे जीव इच्छितात, परंतु असें स्थान कोणचें हें मात्र त्यांना कळत नाहीं; तें ह्या स्वानुभव परिप्लुत पद्य द्वारानें थोडें बहुत कळून येईल अशी आशा आहे.

या भागांतील बहुतेक पद्यें ह्या पुस्तकाच्या प्रकाशकानेंच " सोहिरोबा आंबियेकृत पदसंग्रह " या नावांचें पुस्तक मुंबई येथें निर्णयसागर छापखान्यांत शके १८०६ या वर्षी छापून प्रसिद्ध केलें, त्यांत आलेलीं होतीं, परंतु या भागांत काहीं पदें नूतन आहेत. हल्लीं ज्या अन्य हस्तलिखीत पोथ्यांच्या आधारानें हा भाग पुरा केला आहे, त्या पोथ्या कोणाकडून मिळाल्या हें खालीं दिलेल्या नोंदीवरून कळेल.

१ रा० रा० दत्तात्रय यशवंत राजाध्यक्ष (उसापकर) वा० वेगुर्लें यांनीं, सत्पुरुष पूर्णदास ऊर्फ बाबा उसापकर यांच्या समाधी-गृहांतील, हस्तलिखीत ग्रंथसंग्रहामधून काढून दिलेल्या बह्यांत स्वतंत्र सोहिरोबानाथांच्या सुमारें सातशें पद्यांचा संग्रह आहे.

२ रा० रा० शंकरराव भिकाजी रांगणेकर वा० मुंबई यांनीं दिलेल्या हस्तलिखीत पोथ्या.

३ हरिभक्तिपरायण रा. विठ्ठल अनंत मसुरेकर वा. मसुरें यांचेकडून मिळालेलीं कित्येक पदें.

याबद्दल या गृहस्थांचें व ज्यांनीं ज्यांनीं या कामीं द्रव्यद्वारें व अन्य तऱ्हेनें मदत केली, त्यांचे आभार मानून, व ज्याचे कृपेनें येथवर हें कृत्य सुरळीत चाललें, त्या दयाघन कारुणिक परमेश्वराचें चिंतन करून हा लेख पुरा करितों.

प्रकाशक.

विषयानुक्रम.

सोहिरोबानाथकृत

पारमार्थिक पद्यसंग्रह.

भाग १ ला.

१ भक्तिपर आणि उपदेशपर पदें.

पद १ लें.

पतीतपावन दीनदयाघन करुणाकर देवा । श्रवण मनन निदिध्यासें निरंतर घडो तुझी सेवा ॥ धृ० ॥ परम प्रकाश तेजोमय हें गुप्त तुझें स्वरुप । परतुंनि दृष्टि पाहणें पाहतां निर्गुण हें अरुप । परमार्थ परिपूर्ण साधनीं* भरलें हें अमुप । परात्पर तूं अंतरसाक्षी हृदयभुवनदीप ॥ पतीत पा० ॥ १ ॥ तीन्ही संधी साधुनि घेणें सुख हें एकांतीं । तिन्ही गुण हे निरसुनि शून्यीं उगवलि हे ज्योति । तीक्ष्ण† ज्ञानें पुरतें पाहतां

---

* (अन्य पाठ) साधनें. † तीक्ष्ण दृष्टी पहाणें पहातां.

---

१ या पदांत प्रारंभींच्या 'पतीतपावन' या सहा अक्षरांवर प्रत्येक अक्षरीं एक चरण, याप्रमाणें अनुक्रमें सहा कडवीं साधली आहेत. तसेंच प्रत्येक चरणांचें पहिलें व शेवटचें हीं दोन्ही अक्षरें एकच साधली आहेत.

२ इंद्रियांवाटे विषयाकडे जाणारी दृष्टि बाह्य विषयांपासून परतवून ती उलटून आंत हृदयकमलांतील परमात्मज्योतीकडे लावणें. "श्री ज्ञानदेव ह्मणतात 'आतां आत्मप्रभा नित्य नवी । तेचि करूनि ठाणदिवी । जो इंद्रियांतें चोरूनी जेवी । तयासीच फावे ॥ अ. ६ ओ. २३ ॥

३ तीन्ही काळचा संधि आणि जागृति, स्वप्न सुषुप्ति व तुरीया या चारीं अवस्थांचे तीन संधि त्यांत जागृत राहून तुर्यावस्थतच एकांत ह्म. अद्वैतस्थिती [illegible] निर्गुणात्मक विश्वाचा लय होतो ह्मणून शून्याचा अनुभव येतो.

कुळ नाहीं याती । तितुकी प्रतीति बाणलिया मग दिवस नाहीं राती ॥ पतीत पा० ॥ २ ॥ तलगत तलगत सकळहि जिव हे चित्सिंधू आंत । तरंग जैसे उमटत भासत नासत हे बहुत । तरणोपाय सांगति साधू मत हें सिद्धांत । तरले येणें मार्गें बहुत देही देहातीत ॥ पतीत पावन पा० ॥ ॥ ३ ॥ पान्हा पिउनी प्रेमकळेचा हरिलें संकल्पा । पाहतां पार* परेनें भवभय दोरीच्या सापा । पारंगत हें करुनि सकळही अहं§ सोहं कापा । पारख करितां तटस्थ जाहल्या नेत्रांच्या मलेपा ॥ पतीत पावन० ॥ ४ ॥ बरिली शान्ति आंगीं जाहला पूर्ण अनुभव । वरदबळें सद्गुरुप्रसादें अक्षय वैभव । वमिलें† सकळहि मायिक आतां नाहीं भय भव । वदली वाणी मौनपणीं हे रूप नाहिं नाव ॥ पतीत० ॥ ५ ॥ नम्र होउनि वृत्ति लागली अलक्ष हें लग्न । नटत नटत हे लोक$ सकळही होउनियां भग्न । नख नलगे तेथ देहबुद्धिचें विकासलें मन । नमुनि सोहिरा म्हणतो‡ अवघा अलख निरंजन ॥ पतीत पा० ॥ ६ ॥

पद २ रें.

सीतारा[३]म स्मर रे प्राण्या, भजन अहर्निशिं कर; जीव हा उद्धार रे ॥ धृ० ॥ शीघ्राचि उठिला पितृआज्ञेनें झाला वनवासी । सिद्ध करुनियां¶

* (अन्य पाठ) "परपरेनें; परापरेनें." § आयुष्य हे कापा. † वमिले (वरिलें) मायिक कवणाचाही नाहीं भय भव. $ हे कळा अंतरीं होउनियां मग्न. ‡ म्हणेचि. ¶ केलिहे.

१ भ्रमण करणें, गटंगळ्या खाणें. हा शब्द सावंतवाडी प्रांतीं फार वापरण्यांत येतो.

२ पापण्या.

३ पहिल्या पदाप्रमाणें. या पदांतही " सीताराम " या अक्षरांवर चार कडव्यें रचलीं आहेत.

वानरसेना उतरला* सुवेळेसी । शिर उडविलें दशाननाचें प्रताप लंकेसी । शिळा तारिली नगरी जो कां न्हे वैकुंठासी ॥ सीताराम० ॥ १ ॥ तारक सकळां स्वामि आह्मां राम दाता । तारिले पाषाण समुद्रीं हे ज्याची सत्ता । तारापतिशीं चकोर जेवीं लावितसे चित्ता । तावत ज्याचें चिंतन करणें अखंड हनुमंता ॥ सीताराम० ॥ २ ॥ राख ज्याचें लक्ष निरंतर निरसीं संसारा । रानीं नलगे टाकुनि जाणें अवघ्या घरदारा । राहें स्थिर तूं परतुनि पाहें चराचरीं सारा ॥ सीताराम० ॥ ४ ॥ मनमोहन हा गहन वसतो हृदयीं आराम । मग्नचि होउनि असणें तेथें स्वइच्छ निष्काम । मज्जन करणें ज्ञानगंगेचें निर्मळ निर्लोम । महानंद परमात्म सोहिरा ह्मणे हरे श्रम ॥ सीताराम० ॥ ४ ॥

पद ३ रें.

नारायण चतुरक्षरी जपतां प्रकटे स्वस्वरुप । सज्जनिं भजनीं विजनीं जनिं-

* (अन्यपाठ) उतरे.

१ पहिल्या पदाप्रमाणें यांतही ' नारायण ' ह्या चार अक्षरांवर चार कडवीं साधलीं आहेत. इशावास्योपनिपद्मध्यें सांगितलें आहे कीं,

अन्यदेवाहुः संभवादन्यदाहुरसंभवात् ।

इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १३ ॥

अर्थः—कार्य ब्रह्माच्या (उपासने) पासून वेगळेंच (फल) (अणिमादि सिद्धिरूप मिळतें असें) ह्मणतात. अव्याकृताच्या (उपासने) पासून वेगळं [फल (प्रकृतिलय) हें मिळतें असें] ह्मणतात. ज्यांनीं आह्माला तें अव्याकृतोपासनांचें फल विवरण करून सांगितलें, त्या धीर पुरुषांचें असं वचन आमच्या ऐकण्यांत आहे.

नारायणे तुरीयाख्ये भगवच्छब्दशब्दिते ।

मनोमय्यादधद्योगी मद्धर्मवशितामियात् ॥

अर्थः—ज्याला तुरीय ह्मणतात [जें विराट् हिरण्यगर्भ आणि कारण ह्या तीनही उपाधींनीं रहित आहे] व भगवान् ह्या शब्दानें ज्याचें वर्णन केलें जातें असें जें माझें नारायणरूप त्याचे ठिकाणीं चित्त लावणारा व माझे धर्म पाळणारा योगी वशिता [विषय भोगांत असतांही आसक्त न होणें] ही सिद्धि पावतो. " उद्धवगीताकृत, इशावास्य भाष्य. "

या रूपातीत रूप ॥ ध्रु० ॥ नाना छंदें नाना लीला खेळतसे जना । नाम ज्याचें घेतां सकळहि पुरवी कामना । नाना शास्त्रें न लगति कांहीं आणिक साधना ॥ नारायण० ॥ १ ॥ रासक्रीडा खेळत असतो यमुनेच्या तीरा । राधिकासमवेत सर्गे अनेक सुदरा । राजा रंक समान ज्यासीं स्वरुपीं निर्धारा ॥ नारायण० ॥ २ ॥ यशवंत जाणुनि ज्याचा यम धरी भय । एकचि निश्चय भावी त्यातें सुख अप्रमेय । येणें जाणें नाहीं पुनरपि निर्गुण निर्भय ॥ नारायण० ॥ ३ ॥ णकार स्मरतां नित्य होय निजनादश्रवण । जेथ गेल्या नुरेचि मग हे माझे मीपण । ह्मणे सोहिरा मग हें चुकतें भवदु:ख भ्रमण ॥ नारायण० ॥ ४ ॥

पद ४ थें.

केशव अच्युत परमानदा स्मर त्या गोविंदा । सर्व त्यागुनि अंतरिं स्मर तूं याचि लाग छंदा ॥ ध्रु० ॥ केशि मारिला प्रताप केला दैत्य सकळ जिंके । केवढि ज्याची महिमा वर्णन वेद करूं न शके । केले जेवढे खेळ तयानें क्षणभगुर असके । केवळ ब्रह्म हें जाणुनि बैस विमानाचिये* बसके ॥ केशव० ॥ १ ॥ शरणागत वत्सल हा स्वामी सर्वांचा ईश । षड्गुणैश्वर्य ज्यापाशीं तें पावसि तू यश । षंण्णष्ट हे काम क्रोध की पावतील¶ नाश । शशी सूर्य ज्या तेजे झांकति अनादि अविनाश ॥ केशव० ॥ २ ॥ वर्जित

---

* विमनाचिये. ¶ पावति हे.

---

१ महादेव किंवा बिंदुचे ध्यान.

२ पहिल्या पदाप्रमाणें या पदात 'केशव' त्या तीन अक्षरांवर तीन कडवीं साधल्या आहेत [केशव=उत्तम ज्याचे अर्स्ती केश । किंवा हरिहर विधि ज्या वश । अथवा केशि दैत्याचा नाश । कर्ता ह्मणुनी नाम 'केशव' ॥ २३ ॥ 'विष्णुसहस्रनामार्थमंजरी']

३ षट्+नष्ट=सहा दुष्ट.

४ ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमस: परमुच्यते ।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्यधिष्ठितम ॥ १७ ॥
[भ. गी. अ० १३]

दृश्य पदार्थहि ऐसा देतो अनुभव । वरचिल मत हें नचले जेथ आहे स्वयमेव । वश भक्तीला होय निपट हा वेडा कीं देव । वरद सोयिरा वदे कि ऐसा एकचि जीव शिव ॥ केशव० ॥ ३ ॥

पद ५ वें.

गोपिनाथ गोवर्धनधरणा करिं याचि स्मरणा । अनन्य गतिनें शरणागत हो चुकवि भवभ्रमणा ॥ ध्रु० ॥ गोधनें चारी वेषधारी छंद मना लागो । गोकुळिं कान्हा नाना लीला करोनि निस्पृह गो । गोळा भक्षित नवनीताचा चोरि लग न लागो* । गोडी लावित गोप स्त्रियांला विलसत रस रंगो ॥ गोपिनाथ० ॥ १ ॥ पिष्ट पाडितो दानव मर्दुनि पाळितो

* चोरी लग नलगो.

भावार्थः—चंद्रसूर्यादि ज्योतींनाही प्रकाश देणारें तेंच त्याला 'तमसः परं' ह्मणजे अंधकारापासून दूर असें नांव आहे जाणावयाचें साधन तेंच, जाणावयाची वस्तु तेंच, आणि ज्ञानरूप साधनानें प्राप्त होणारें तेच, आणि तेंच सर्वांच्या हृदयामध्यें अधिष्ठान करून राहिलें आहे.

१ केशवस्वामी एका अभंगांत ह्मणतात. माझा देव भोळा पाहीं । विधि निषेध नेणें कांहीं ॥ २ ॥ देव सेवुनि भोगी भावा । गोड तव तव वाटे देवा ॥ ३ ॥ भोळा झाला भोळियांत । केशवस्वामी चतुरनाथ ॥ ४ ॥ [मुंडकोपनिषद, खंड १ मं. ७ यांत सांगितलें आहे कीं, जसा कोळी आपल्या पोटांतून कोळीष्टक बाहेर काढतो, व पुनः तें पोटांत आवरून घेतो, जशी वनस्पति पृथ्वीतलावर निर्माण होते, जसे पुरुषाच्या मस्तकावर केश व अंगावर लव ही उत्पन्न होतात, तद्वत् अक्षर ब्रह्मापासून विश्वाची उत्पत्ति होते.

२ या पदांतही "गोपीनाथ' ह्या चार अक्षरांवर चार चरण साधले आहेत. सोहिरोबांनीं सिद्धांतसंहिता ग्रंथाच्या उत्तरार्धांत ह्मटले आहे.

> कृष्णो विदेहधर्मस्तु भक्तानां मुक्तिदः खलु ।
> वासनारूपगोपिस्तु भुक्त्वाऽलिप्तः समश्च वै ॥ ४ ॥
> निष्कामः क्रीडया सक्तः सवत्सधेनुरक्षकः ।
> पयःपाने रतो नित्यं गोरक्षकप्रियः खलु ॥ ५ ॥

अनुतापी । पिडा निवारित संसाराची काम क्रोध शापी । पिशाच्च उन्मत्त बाळ वृत्तिनें पाहति कुप बापी । पिकलें सुख हें समाधिचें जो[1] कधिंना उत्थापी ॥ गोपिनाथ० ॥ २ ॥ नामरूपातीत चिंतुनि लावुनियां ध्याना । नारि नव्हे ही पुरुष नव्हे जो तर्काला येइना । नारायण अवतार वसंत हा यदुवंश रत्ना । नाहीं आहे ह्मणतां नये वेदस्तुति रिघेना ॥ गोपिनाथ० ॥ ३ ॥ थरारित हें पातक ज्याचा स्मरतांचि पंथ । थकित चकित हे साधक सिद्ध कथिती *ही ग्रंथ ॥ थैराथरानें त्रिभुवन भरलें जिव हे अनाथ । थयथैय सोडुनि ह्मणे सोहिरा पावत परमार्थ ॥ गोपिनाथ० ॥ ४ ॥

पद ६ वें.

वंदियला भगवंन्त[3] । तो म्यां वंदियला भगवन्त ॥ ध्रु० ॥ भवसिंधु

---

* हो.

---

१ धाकानें.

२ चंचलपणा.

३ या भगवन्त (भगवान्) शब्दाची व्याख्या " श्वेताश्वतर " उपनिषदामध्यें येणेंप्रमाणें केलेली आहे—

सर्वाननशिरोग्रीवः सर्वभूतगुहाशयः ।
सर्वव्यापी स भगवान् तस्मात् सर्वगतः शिवः ॥ ११ ॥

भावार्थः—तो भगवान्—सर्वांचा तोंडें, मस्तकें व माना यांत आहे. सर्व प्राण्याच्या बुद्धींत (गुहांमध्यें म्ह० हृदयामध्ये) वास करणारा, सर्व व्यापून टाकणारा असा तो कृपावंत, म्हणून तो सर्व ठिकाणीं शिरलेला आणि कल्याण करणारा. तो सर्वव्यापी आहे, यास्तव तो सर्वगत शिव होय. येथें भगवान् व शिव हीं नांवें तशींच ठेवावा कीं पहिल्याचा अर्थ पवित्र, व दुसऱ्याचा अर्थ सुखी असा करावा याविषयां संशय आहे, टीकाकार भगवान् या शब्दाचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणें करितात.

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥

अर्थः—समग्र ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान व वैराग्य ह्या सहांना भग अशी संज्ञा आहे. हीं सहा ज्याच्या ठिकाणीं असतात त्याला भगवान् (भगवन्त) म्हणावयाचें.

तारक निजसुखकारक। सकळां आदी अंत ॥ तो म्यां० ॥ १ ॥ सज्जन रंजन अखिल निरंजन । भक्तजना कृपावंत ॥ तो म्यां० ॥ २ ॥ वेद झाले मुके, शेष न स्तवूं शके। ज्याचें रूप अनंत ॥ सो म्यां० ॥ ३ ॥

---

१ श्रीमद्भगवद्गी० अ० ६ श्लो २० २१

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥
सुखमात्यंतिकं यत्तत्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्वतः ॥ २१ ॥

ज्या अवस्थेमध्यें चित्ताचा वेग योगाभ्यासामुळें थांबून विषयांपासून मागें वळतो; जेथें शुद्ध चित्तानें आत्म्यालाच पाहून, आत्म्याच्याच ठाया मनुष्य संतुष्ट असतो, ज्या सुखाला अंत नाहीं, जें केवळ बुद्धीनेंच जाणावयाचें, इंद्रियांनीं जाणावयाचें नव्हे, तें ज्या अवस्थेमध्यें प्राप्त होतें, आणि ज्या अवस्थेंत असतां मनुष्य आत्मस्वरूपापासून चलन पावत नाहीं याच सुखाला येथें 'निजसुख' असें म्हटलें आहे.

२ अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च ॥ २० ॥
[श्रीमद्भगव०]

भावार्थः—हे गुडाकेशा, मी सर्व भूतांच्या अंतरीं असणारा आत्मा आहें. मीच सर्व भूतांचा आदि, मध्य आणि अंतही आहें.

पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् ।
उताऽमृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥ १५ ॥
'श्वेताश्वतर' उप. अ० ३ मं०

भाषांतरः—(जें) हें सगळें (जन्मलेलें), जें जन्मून गत झालेलें, जें पुढें जन्मावयाचें, जें अन्नानें वाढतें, त्याचा आणि अमर सृष्टीचा राजा पुरुषच.

३ मायारहित एकांत स्थान [मायाविरहित स्वप्रकाश परमात्मा].

४ सदर उपनिषद, अ० ३ मं. १४

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।
स भूमिं विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठद्दशांगुलम् ॥

नव्हे नरनारी, गैबी[२] सूत्रधारी* । हालवि जो जिवैजंत ॥ तो म्यां० ॥ ४ ॥

* [गर्भि सूत्रधारी]

भाषांतर:—ज्या पुरुषाला सहस्र शिरें आहेत, सहस्र पाद आहेत, तो भूमीला सर्व बाजूंनीं व्यापून दहा अंगुळें शेष राहिला. हा मंत्र ऋग्वेदांत (१०, ९०, १) आढळतो. शंकराचार्य ह्या दहा अंगुलांचा अर्थ "अनंत" असा करितात; किंवा ते म्हणतात कीं, नाभीपासून दहा अंगुळांच्या अंतरावर असलेलें हृदय यानें सूचित होतें.

१ ॥ नैव स्त्री न पुमानेष न चैवायं नपुंसकः
॥ यद्यच्छरीरमादत्ते, तेन तेन स रक्ष्यते ॥
"श्वेताश्वतर" उपनिषद अ० ५ मं० १०

भाषांतर:—तो स्त्री नव्हे, तो पुरुष नव्हे, किंवा तो नपुंसक नव्हे, जो जो देह धारण करितो त्यांशीं त्याचा संयोग घडतो.

२ सोहिरोबांनीं आपले 'परमेश्वरस्वरूप गुरुगोरखनाथ' यांनाच कोठें कोठें 'गैबनाथ' असें म्हटलें आहे—पक्षी हा पुरुष आपल्या गर्भामध्यें [सत् ब्रह्मामध्यें] व्याकृत [संभूति] म्हणजे कार्यब्रह्म=सूत्रात्मा हिरण्यगर्भाची उत्पत्ति करिता झाला. वि+आ+अक्रियत तत्—जें नाम रूपांनीं विशेष स्पष्ट केलें जातें तें कार्यरूप ब्रह्म, हिरण्यगर्भ सूत्रात्मा.

संभवनं च संभूतिर्लिंगं सप्तदशात्मकम् ।
मायाबीजस्य कार्यं तत्सूत्रात्मानं प्रचक्षते ॥
[ब्रह्मानंदकृत इशावास्य.]

सप्तदशकलात्मक लिंगदेह, हा मायेचें कार्य होय, ह्याला सूत्रात्मा म्हणतात.

३ ॥ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥
॥ भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥
[भ. गी. अ. १८ ॥]

भावार्थ:—अर्जुना, परम समर्थ जो आहे तो सर्व प्राण्यांच्या हृदयप्रदेशीं वसत आहे, आणि आपल्या अद्भुत करणीच्या साधनानें सर्व प्राण्यांना यंत्रामध्यें घालून नाचवीत आहे.

म्हणे सोहिरा अनुभेवें पाहणें । चित्सुखवनवसंत ॥ तो म्यां० ॥ ५ ॥

---

१ वरील [नव्हे नरनारी] शब्दावरची टीप पहा. सोहिरोबा ह्मणतात हें स्वरूप अनुभवानें जाणा.

निर्गुणे ब्रह्मणि मयि धारयन्विशदं मनः ।
परमानंदमाप्नोति यत्र कामोऽवसीयते ॥ १ ॥

भावार्थः—जो कोणी आपलें मन निर्मळ करून निर्गुण ब्रह्मरूप माझे ठिकाणीं लावतो, तो परमानंद पावतो. हा परमानंद प्राप्त झाला असतां सकल इच्छा समाप्त होतात. [हीच प्राकाम्य नांवाची सिद्धि होय.] उवटार्यकृत इशावास्यभाष्य.

२ चित्+सुख+वन+वसंत [येथें सोहिरोबांनीं असें दर्शविलें आहेसें दिसतें कीं] [चित्सुख, कैवल्यसुख] हेंच कोणि एक वन, त्याचें पोषण करून त्या वनास शोभा देणारा व प्रफुल्लित करणारा [परमानंदरूप] वसंतऋतु सत्स्वरूप भगवान् होय. ऋतूंमध्यें वसंत हा पहिला ऋतु, तसेंच त्याचा आरंभ पहिला मास जो चैत्र त्यापासून सुरू होतो. ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरांच्या प्रारंभींच म्हणतात; कीं:—प्रथम वयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रकटे जैसी आगळी । अंगना आंगीं ॥ ४२ ॥ नातरि उद्यानीं माधवी घडे । तेथ वन शोभेची खाणी उघडे । आदिला पासोनि अपाडें । जिया परी ॥ ४३ ॥ ज्याप्रमाणें वसंत ऋतुमध्यें 'अखिल वनस्पतिविश्व, प्रफुल्लित होऊन जणुं काय, त्या आपल्या जविन दात्या आनंदजनक माधवीचें प्रदर्शनच करीत आहे असें दर्शवितें; त्याप्रमाणेंच स्थावरजंगत्माक अखिल सृष्टिवनाचा नियंता [वसंत] ज्याच्या अखंडरसैक्य ब्रह्मानंदामध्यें हें जग विलसत आहे. पंचदशीमध्यें म्हटलें आहे कीं.

स्वतःपूर्णः परात्माऽत्र ब्रह्मशब्देन वर्णितः ।
अस्मीत्यैक्यपरामर्शस्तेन ब्रह्म भवाम्यहम् ॥ ४ ॥

[चित्रदीपः]

भावार्थः—एका वस्त्रालाच जसे धौतादि चार भाव प्राप्त होतात, त्याप्रमाणेंच ह्या नित्य सिद्ध व स्वयंप्रकाश आत्म्याला चार भाव प्राप्त होतात. माया व मायेचें कार्य या उभयतांनींही रहित असें जें शुद्ध परमात्मस्वरूप त्याला चित् असें ज्ञानी ह्मणतात. पण तें चैतन्य मायेच्या संगतीनें कलुषित झालें असतां त्याला अंतर्यामी ही संज्ञा प्राप्त होते. अंतर्यामी ह्मणजे सर्वांच्या आंत राहून त्याचें नियमन करणारा ईश्वर होय. त्याच चैतन्याचा अपंचीकृत ह्मणजे सूक्ष्मभूतकार्याच्या समूहरूप सूक्ष्मशरिराशीं संयोग झाला असतां तें सूत्रात्मा होतें व पंचीकृत भूतकार्यसमूह-

पद ७ वें.

हे पूर्ण कळा भगवंत, कृपा करोनि देइल जेव्हां ॥ ध्रु० ॥ मन तंव शून्यचि झालें आहे । मिथ्या प्रपंच नेत्रीं पाहे । सोहं ध्यास निरंतर वाहे । सुख दुःख न शिवे तेव्हां ॥ हे पूर्ण कळा० ॥ १ ॥ अंतर आकळेना उपाधीन । केवळ इंद्रियें होति स्वाधीन । स्मरणें धावणें सहज समाधीन । पावणें ये घडिये तेव्हां ॥ हे पूर्ण कळा० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा

रूप स्थूल शरीरोपाधिमुळें तें विराट् होतें. जें जें सुख ह्मणून होतें तें सर्व सच्चिदानंद ब्रह्माचें प्रतिबिंब आहे. सत्ता, चैतन्य, आणि सुख हे तीन ब्रह्माचे स्वभाव आहेत दगड माती इत्यादि पदार्थांत ब्रह्माचा सत्तास्वभाव मात्र व्यक्त होतो; घोर आणि मूढ वृत्तींत सत्ता आणि चैतन्य हे दोन व्यक्त होतात. याप्रमाणें हें मिश्र ब्रह्माचें लक्षण; अमिश्र ब्रह्म ह्मणजे शुद्ध ब्रह्म तें ज्ञान आणि योग यांहीं करून समजलें जातें, ह्मणूनच; सोहिरोबांनीं पूर्वी, अनुभवीं [योगानुभव] पहाणें असें ह्मटलेलें आहे.

१ भगवंत शब्दाची व्याख्या वर येऊन गेलेलीच आहे. म्हणून या पुढें 'भगवंत किंवा भगवान्' या शब्दानें गृहित असलेलीं सर्व पदें, अनुक्रमानें लिहिलीं आहेत. वरच्या पदांत भगवत् ध्यान सांगून, अनुभवानें [समाधीच्या योगानें] तें स्वरूप ओळखून घ्यावें असें सांगितलें. आतां या पदांत सुचवितात कीं-- 'दृढ उपासनेच्या योगानें प्रत्यक्ष भगवत्कृपा संपादन होऊन, साक्षात्कार होईल तेव्हांच 'मन शून्यवत् होणें, प्रपंच मिथ्या आहे असा अनुभव येणें, निरंतर सोहंस्वरूपीं ध्यान राहणें, आणि सुखदुःखाचा मुळींच संपर्क नसणें इत्यादि' ह्या पदांत सांगितलेल्या एकूणएक गोष्टी घडून येतील—' या पदाच्या प्रारंभीं [हे पूर्ण कळा] हा शब्द आहे त्याचा अर्थ पातञ्जल योगशास्त्राच्या अभिप्रायांमध्यें असा केलेला आहे कीं 'योगशास्त्रोक्त चक्रादिकांमध्यें पांचवें 'कंठदेशांत' 'अ पासू अः' या सोळा वर्णांनीं अंकित अशा सोळा पांकळ्यानें युक्त, चंद्रवर्ण समान असें विशुद्ध चक्र आहे; याची देवता रुद्र आहे. उपासनेच्यायोगानें या चक्रांतील चंद्रकळा पूर्ण षोडशकलांनी विकास पाऊन अमृतमय [तेजोमय] पुरुषाचा योग्यास साक्षात्कार होतो.

देहीं असतो । वरि वरि संसारीसा दिसतो । व्यापक निरालंबि असतो । बसतो न कळे केव्हां ॥ हे पूर्ण० ॥ ३ ॥

---

२ हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
योऽसावादित्ये पुरुषः सोऽसावहमस्मि ॥
ॐ खंब्रह्म

अर्थः—आतां आदित्याचें उपासन सांगतातः—यद्यपि हिरण्मयरूप पात्रानें म्हणजे—"पिबन्त्यस्मिन् अवस्थितान् रसान् रश्मय इति पात्रम्" ज्यामध्यें असलेले रस किरण पितात तें पात्र म्हणजे मंडल त्या मंडलानें—सत्याचें म्हणजे अविनाशी पुरुषाचें मुख म्हणजे शरीर आच्छादिलें आहे, तथापि योग्यांना आदित्यमंडला मध्यें ज्या पुरुषाची उपलब्धि होते, तो हा मी आहें. आणखी अशी उपासना करावीः—ॐ खं ब्रह्म, म्हणजे आकाशरूप ब्रह्माचें ध्यान करावें. [उवटार्यकृत इशावास्य भाष्य.] अशा रीतीनें ज्याला अधिकार प्राप्त झाला आहे त्या शिष्याला, परमात्म्याचें स्वरूप निरूपण करून त्याचा साक्षात्कार मिळविणें हें मोक्षाचें साधन आहे. तो साक्षात्कार नुसत्या श्रवणादिकांनीं होत नाहीं. तसाच मोक्षसुद्धां केवळ साक्षात्कारानें मिळत नाहीं, तर भगवत् कृपेनेंच प्राप्त होतो. कारण श्रुति तरी असेंच सांगते कीं.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम् ॥

हा आत्मा पुष्कळशा वेदशास्त्राध्ययनानें, मेधेनें म्हणजे ग्रंथधारणशक्तीनें तसाच बहुत श्रवण केलें तरी मिळत नाहीं, तर ज्याच्यावर हा कृपा करितो त्यालाच ह्याची प्राप्ति होते; त्याला हा आत्मा आपलें स्वरूप उघड करून दाखविती. (ह्या विषयीं—मुंडकोपनिषद—मुंडक ३ मंत्र २।३ याचें भाषांतर—(२) एका वृक्षावर [भवसागरांत अगदीं निमग्न झालेला व स्वतांच्या दुर्बलत्वास्तव चिंतातुर असलेला असा] पुरुष [म्हणजे जीव] बसून शोक करितो. परंतु दुसरा जो ईश्वर तो समाधानयुक्त आहे असें तो [जीव] पाहतो आणि त्याचा महिमा जाणतो, तेव्हां तो शोकमुक्त होतो. ३ पाहणारा [विद्वान साधक] जेव्हां स्वयंप्रकाश, जगत्कर्ता व जगदीश असा हा पुरुष ब्रह्मापासून उद्भवलेला आहे असें समजतो, तेव्हां तो विद्वान् पुण्य व पाप यांचें निरसन करून निर्लेप होत्साता परम साम्य पावतो.) [संसारबंधमूलक क्लेशांपासून मुक्त—अद्वैत; विश्व आणि ब्रह्म

पद ८ वें. राग काफी.

तुजविण रे भगवान् । कोठेंचि मन हें न जडो ॥ ध्रु० ॥ मिथ्या ऐसें दिसोनि सकळिक । विषय सुख नावडो ॥ प्रारब्धास्तव जें जें समयीं । घडेल तें सुखि घडो ॥ तुजविण रे० ॥ १ ॥ योगलक्षण निज धैर्य बळें । जड जीव मोहांत न सांपडो ॥ आयुष्य सरल्यावर मग केंव्हां । देह पडेल तेथें पडो ॥ तुजविण रे० ॥ २ ॥ वैराग्यज्ञानें प्रचंड होऊनि । अखंडित वाक्य कडकडो ॥ प्रेपंचरहाटीं वर्तत असतां । कोणिकडे न

यांचा अभेद; अर्थात् ब्रह्मसाक्षात्कार] ह्मणून ज्यानें श्रवणमननादिकांचें अनुष्ठान केलें असेल त्यानें साक्षात्काराकरितां व ज्याला साक्षात्कार प्राप्त झाला असेल त्यानें मोक्षासाठीं भगवंताची प्रार्थना करावी ती अशी—

तेजोमयेनापिहितं स्वरूपं सत्यस्य बिम्बेन सदा परं तु ॥
भानावसौ यः पुरुषोऽस्ति सोऽहं ज्ञेयं विभु ब्रह्म सदोंस्वरूपम् ॥ १ ॥

[रामचंद्रपंडितकृत इशावास्यविवृत्ति]

भावार्थः—तेजोमय सूर्यबिंबानें सत्याचें स्वरूप सर्वकाल आच्छादिलें आहे. तथापि आदित्याच्या ठिकाणीं जो प्रसिद्ध पुरुष आहे तो मी आहें. ॐकाररूपी व्यापक ब्रह्माचें नित्य चिंतन करावें.

१ येथें प्रपंच ह्मणजे ' स्त्री, गृह, धन, सुत, दारादि विषयांनीं युक्त असलेला ध्यावयाचा नाहीं. पंचभूतात्मक पंचीकृत स्थूल, अपंचीकृत सूक्ष्म, व कारण अशा देहांनीं युक्त असलेला अविद्योपाधि प्रपंच [जीवसृष्ट] हा होय. अशा प्रपंच-रहाटीमध्यें देह, वैराग्य आणि ज्ञान यांहीं करून वर्तत असतां तो अडला जाऊं नये; हा भाव. वैराग्य झालें आहे पण कर्म सोडून देण्याचें सामर्थ्य नाहीं, अशा अंतरालावस्थेंतील जो पुरुष कर्म व आत्मज्ञान ह्या दोहोंस जाणतो, ह्मणजे कर्म हें साधन व ज्ञान हें साध्य असें उभयांचें ज्ञान संपादितो, तो कर्मज्ञानाच्या योगें आत्मज्ञानाला प्रतिबंधक जें स्वाभाविक कर्म व ज्ञान त्या दुःखकारणास आत्मज्ञानोत्पत्तीच्या योगें उल्लंघून आत्मज्ञानानें ' अहं ब्रह्मास्मि ' अशा साक्षात्कारद्वारा ब्रह्मत्व-भाव पावतो ह्मणजे ब्रह्मरूप होतो. [शंकरानंदकृत ईशावास्यदीपिका.]

अडो ॥ तुजविण० ॥३॥ म्हणे सोहिरा विपरीत बुद्धि । कुसंग हा विघडो ॥ निमिष साधुनी *कैवेल्य ब्रह्मींचें । मोक्षद्वार उघडो ॥ तुज० ॥ ४ ॥

---

* ' केवळ ब्रह्मींचें '

---

१ निमिष शब्दाचा लौकिक अर्थ–नेत्रांचें उघडणें आणि मिटणें यांमधील काल ' निमिष ' शब्दानें दर्शविला जातो. परंतु येथें सोहिरोबांचा हेतु असा असावा कीं ' पातञ्जल याग सूत्र–विभूतिपादः ३ '

क्षणतत्क्रमयोः संयमाद्विवेकजं ज्ञानम् ॥ ५२ ॥

सूत्रार्थः—क्षण व त्यांचा पूर्वापरक्रम यांच्या ठिकाणीं संयम केला असता योग्याला विवेकज्ञान प्राप्त होतें [मुळांतील भाष्य विवरण पहा.] जसा मृत्तिकादि द्रव्यांचा शेवटचा सूक्ष्म भाग परमाणु, त्याप्रमाणेंच कालाचा अगदीं शेवटचा सूक्ष्म भाग क्षण होय. आतां क्षण जर घेतला तर तो वस्तुकोटीमध्यें आहे; कारण तो क्रमाचा आश्रय करून असतो. आणि क्षण ह्मणजे क्रमाचा अविरलपणारूप आहे. ह्मणून कालतत्त्व योगी त्याप्रत काल असें ह्मणतात. दोन क्षण कधींही बरोबर असत नाहींत. पूर्व क्षणापासून उत्तर क्षणापर्यंत जो निरंतरपणा त्याला क्रम ह्मणतात [यालाच निमिष किंवा निमिषोन्मेष अशी संज्ञा आहे.] एकेक क्षणानें संपूर्ण लोक परिणामास पावतात. कारण सर्व पदार्थ एकेक क्षणोपारूढ झालेले आहेत. त्या क्षण व क्षणाच्या क्रमाच्या ठिकाणीं संयम केल्यानें क्षण व त्याच्या क्रमाचा साक्षात्कार होतो. त्यानंतर विवेकज ह्मणजे विवेकख्याति नांवाचें ज्ञान प्रकट होतें.

२ कैवल्य ब्रह्म ह्मणजे परब्रह्म, योगशास्त्रोक्त ब्रह्मरंध्रचक्र, मूर्धोत्याचें द्वार ह्मणजे ज्याला योगशास्त्रांत ' ब्रह्मद्वारचक्रम् ' असें ह्मटलेलें आहे तें होय. याचें स्थान ललाटोर्ध्व भाग हें 'श्रीहंस' स्थान आहे. सिद्धांत संहिता उतरार्ध पान १९ येथें जोडलेलीं चक्रें पहा. 'केवळ ब्रह्म'–हेंही उक्त आहे. याविषयीं–आद्य कवि मुकुंदराज हे विवेकसिंधु पु. प्र. ३ येथें ह्मणतात.–' जेणें मायेतें व्यापिलें । तें सगुण ब्रह्म बोलिलें । येर जें अशेष उरलें । तें केवळ ब्रह्म ॥ ४९ ॥ ह्मणजे जें मायेनें मिश्र त्याला शबलब्रह्म ह्मटलें जातें, व जें मायेविरहित तें शुद्धब्रह्म ह्मणून ह्मटलें जातें. हें ब्रह्म नादात्मक आहे असें मुकुंदराज वरील ग्रंथांतच पु. प्र. ६ येथें ह्मणतात—' जेथें वर्णाचा नाहीं उच्चार । ध्वनिमात्राचा व्यवहार । ह्मणूनि अर्ध मात्रा ऐसा निर्धार । जाणिजेस तूंचि ॥ १०२ ॥ स्वरूपीं निर्गुण । नादात्मक तो [ओवी ९५]

पद ९ वें.

*भगवन्ता तुझेंचि निरंतर, स्मरण ध्यान लागो ॥ ध्रु० ॥ अनन्य भावें तुजला ध्यावें । रूपिं रिझावें । तद्रुप व्हावें । सदैव कीर्तन नर्तन करुनी । परमानंदीं निमग्न होणें । हेंचि तुज प्रती मागों ॥ भगवंता ॥ १ ॥ पोटा साठीं कारितां सेवा । समूळ याचा वीटचि यावा । देहबुद्धिचा[1] उबग यावा । भाषण ¶दूषण नलगे हेवा । विषयसूख विषाचा मेवा । त्रिविधे[2] तापें अनुतापुनि । मन केवळचि वितरागो ॥ भगवन्ता० ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा पंचभुतांची[3] फिरते काया । यांत चालक त्रिगूण माया । छाया

* अन्यपाठ=निरंतर स्मरण तुझेंची भगवंताध्यान लागो. ¶ भूषण.

१ मी देह आहें अशा प्रकारची बुद्धि [भ्रम.]

२ आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक हे त्रिविध ताप होत. ' मस्तक दुखणें, ज्वर येणें इत्यादि व्याधींपासून होणाऱ्या दैहिक तापांना आध्यात्मिक ह्मणतात.' ' अनावृष्टि, वावटळ, वीज, अतिवृष्टि, भूकंप, ज्वालामुखी, टोळधाड इत्यादि देवताप्रयुक्त ते आधिदैविक ताप होत.' व ' कांटा लागणें, तरवारीनें हात कापणें, इत्यादि भूत [सृष्टपदार्थ] प्रयुक्त ते आधिभौतिक ताप होत. ' रामदास दासबोध ग्रंथांत ह्मणतात कीं, जो ससारसागरामध्यें ह्या त्रिविध तापांनीं पोळून शुद्ध झाला, तोच परमार्थ साधण्याला योग्य होतो. विद्याप्राप्तीला तीन प्रकारचे उपसर्ग येण्याचा संभव असतो. हे तीन प्रकार ह्मणजे आध्यात्मिक, आधिभौतिक, व आधिदैविक होत.

३ पंचभूतात्मक-पंचीकृत स्थूल देह [अन्नमयकोश] मानवदेह.

४ कठोपनिषद् अ० १ व० तिसरी म० १ याचें भाषांतर १. परमात्मा=परब्रह्म आणि जीवात्मा=अपरब्रह्म ते दोघे स्वकर्मानुसार प्राप्त झालेल्या लोकीं [ह्मणजे अर्थात् स्थितींत] फलाचा उपभोग घेत होत्साते हृदयरूप गुहेमध्यें अत्युच्च स्थानीं (हृदयाकाशाच्या ठायीं) प्रवेश करितात. ब्रह्मवेत्ते त्यांस छाया आणि प्रकाश ह्मणतात. त्याचप्रमाणें जे पंचाग्निसाधन करणारे गृहस्थाश्रमी त्रिनाचिकेत यज्ञ करितात तेही असेंच ह्मणतात. ह्या दोघां टीकाकारांच्या मतें पहिला प्रकाशरूप होय. आणि दुसरा छायारूप होय.

सब हा प्रपंच वायां । अजरामर तूंचि एक राया । तरणोपाया । प्रत्यक्ष ऐसा अनुभवें जागो ॥ भगवन्ता० ॥ ३ ॥

पद १० वें.

भगवन्त ऐशापरिचा ध्यानीं आणा ॥ ध्रु० ॥ व्यापक तो परि दृष्टिस न दिसे । देखत भूल अजाणा ॥ सर्व भूतीं हा अगोचर । संत समागमीं जाणा ॥ भगवन्त० ॥ १ ॥ गृहस्थ नोहे कीं संन्यासी । न धरी कैंचाचि बाणा ॥ शून्य होऊनि शून्य नव्हे जो । चालक पंचहि प्राणा ॥

---

१ दुःखदौर्मनस्याङ्गमेजयत्वश्वासप्रश्वासाविक्षेपसहभुवः ॥

योग० १।१।३१ ॥

आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक दुःखें; ज्यांच्या प्रतिकारार्थ प्राण्यांची खटपट आहे, त्या सर्वांचा दुःखांत अंतर्भाव होतो (वरील २ ची टीप पहा) २ इच्छेप्रमाणें न झाल्यामुळें चित्ताचा क्षोभ होतो, त्याला दौर्मनस्य असें ह्मणतात. ३ शरिराच्या कंपाला अङ्गमेजयत्व=अशक्तपणा असें ह्मणतात. ४ बाह्यवायु किंवा जो प्राणवायु आंत घेतला जातो त्याला श्वास; व ५ आंतील वायु जो बाहेर सोडला जातो त्यास प्रश्वास असें ह्मणतात. हे पांच प्रकार चंचल चित्तालाच होतात; ज्याच्या चित्ताची स्थिरता होऊन समाधि सिद्ध झाला आहे, त्याला हे विकार होत नाहींत. आणि साक्षात्कार होऊन अनुभवाच्या योगानें अज्ञानाचा नाश होतो व शुद्ध ज्ञान वाढूं लागतें. ज्ञान वाढतां वाढतां शेवटीं मोक्षाची प्राप्ति होते.

योगाङ्गानुष्ठानादशुद्धिक्षये ज्ञानदीप्तिराविवेकख्यातेः ॥ २३ ॥

योग० १।२।२८ ॥

२ शून्यवादी ह्मणतात कीं, सृष्टीपूर्वी शून्य होते. जी वस्तु सत्ता शून्य असेल तिजकडून पांचही प्राणांचें चालकत्व कसें संभवेल याविषयीं पंचदशीकारांनीं ह्मटलें आहे.—

शून्यमासीदिति ब्रूषे सद्योगं वा सदात्मताम् ।
शून्यस्य न तु तद्युक्तमक्षयं व्याहतत्त्वतः ॥ ३२ ॥
न युक्तस्तमसा सूर्यो नापि चासौ तमोमयः ।
सच्छून्ययोर्विरोधित्वाच्छून्यमासीत्कथं वद ॥ ३३ ॥

भगवन्त० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा हृदयनिवासी । त्रैलोक्याचा राणा ॥ भक्त जनासी संकटीं शीघ्रचि । पावत जो निर्वाणा ॥ भगवन्त० ॥ ३ ॥

पद ११ वें.

भगवानजी हा करिल तें सुखि करूं । अनंतकोटीब्रह्मांडनायक सदैव हाचि स्मरूं ॥ ध्रु० ॥ अंतरसाक्षि असोनि न दिसे । अनादि हा ईश्वरू ॥ स्थावरजंगम व्यापुनि उरला । अपार विश्वंभरू ॥ भगवानजी० ॥ १ ॥ आचार धरूनि साचार भावें । विचारणा विवरूं ॥ दुरित निवारी हाची निश्चय । मनीं दृढ धरूं ॥ भग० ॥ २ ॥ कोठें तरि वावरूं परि हें । शेवट आवरूं ॥ कर्म भोग आणि ज्ञान योग हा । समतुल्यचि सावरूं ॥ भग० ॥ ३ ॥ ब्रह्मार्पण हें करुनि सकळही । अहं-

---

भावार्थः—या शून्यवाद्यांस असें विचारतों कीं, सृष्टीपूर्वी शून्य होतें असें जें तूं ह्मणतोस, तें शून्य सद्रूप होतें काय? कीं सत्तेनें युक्त आहे? या दोनी गोष्टी शून्यास संभवत नाहींत. 'सूर्य तमानें युक्तही नाहीं आणि तमाचा केलेलाही नाहीं. प्रकाशतमाप्रमाणें सत्ता आणि शून्य हीं एकमेकांचीं विरोधी आहेत. तेव्हां शून्य होतें, असें कसें ह्मणतां येईल. तात्पर्यार्थ हा कीं, शून्य ह्मणजे कांहीं नाहीं अशी स्थिति. या स्थितीची कधींही कोणास कल्पना करितां येत नाहीं. बरें यदा कदाचित् अशी कल्पना करितां आली, असें गृहीत धरलें तरी पुढें मोठी अडचण येते ती ही कीं, कांहीं नाहीं अशा स्थितीपासून 'सर्व आहे' असा पदार्थ किंवा वस्तु उत्पन्न होणार नाही. कारण सूर्य आणि काळोख हीं जशीं एकमेकांचीं अत्यंत विरोधी आहेत, ह्मणून अंधारापासून सूर्याची उत्पत्ति होणें हें असंभवनीय आहे, त्याचप्रमाणें अनेक स्थावरजंगमपदार्थरूपी विश्व, कांहीं नाहीं अशा अभावापासून उत्पन्न होणें असंभवनीय आहे. अर्थात् शून्यापासून जग उत्पन्न होत नाहीं. याकरितां जगाच्या उत्पत्तीस कारण शून्य नसून सत्य व नित्य असा परमात्माच कारण आहे. प्रलय कालीं हें सर्व नामरूपात्मक विश्व त्या परमात्म्याचे ठिकाणीं गुप्त होतें आणि सर्व आकाराचा लोप झाल्यामुळें त्या विश्वाचें 'विश्व' असें ज्ञान होत नाहीं. विश्वरूप नाहींसें होतें ह्मणून त्यास शून्य स्थिति ह्मणतात व त्या स्थितींत केवळ निर्गुण ब्रह्म असतें ह्मणून त्या ब्रह्मास शून्य ह्मणतात. कारण त्या ब्रह्माचें इंद्रियांनीं मनानें किंवा बुद्धीनें ग्रहण करितां येत नाहीं. हाच याचा भावार्थ.

क्षांति परिहरूं ॥ अलक्ष्यें भुवनीं लावुनि लय हें । आनंदें काळ हरूं ॥ भग० ॥ ४ ॥ प्रपंचरचना देखुनि+कधींच । नयन न बावरूं ॥ म्हणे सोहिरा*कैवल्य जिव हा । जिताचि असतां मरूं ॥ भगवान० ॥ ५ ॥

पद १२ वें.

अखंड भगवद्भजन करी, तोचि येथें धन्य ॥ ध्रु० ॥ गगन व्यापक

+ अन्यपाठ=कधिंची. * केवळ.

---

१ पंचदशीकार ह्मणतात:—

मायाविद्ये विहायैवमुपाधी परजीवयो: ।
अखण्डसच्चिदानन्दं परं ब्रह्मैव लक्ष्यते ॥ ४८ ॥

भावार्थ:—परमात्म्याची उपाधि माया व जीवाची अविद्या असे जे दोन विरुद्धांश ते वर्ज्य करून बाकीचें दोहोंचे ठिकाणीं असणारें तें केवळ अखंड सच्चिदानंद ब्रह्म हाच मात्र (तत्त्वमसि) या महावाक्याचा विषय होतो (तत्वविवेक श्लोक ४८ ॥) सोहिरोबाचा उद्देश असा दिसतो कीं ' जेथें विकल्पाचा स्पर्शही नाहीं, व त्याच्या अभावाचाही स्पर्श नाहीं, अशी जी आत्मवस्तु तिचे ठायीं कल्पितत्त्व, लक्ष्यत्व, संबध, द्रव्य इत्यादि कल्पित आहे. वास्तविक ती वस्तु अलक्ष्यच आहे.'

२ ' येथें असें दर्शवितात कीं—योगिजनांला, कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग व अष्टांगयोग या सर्वांच्या योगेंकरून विषयांच्या ठिकाणीं वैराग्य उत्पन्न होऊन अंत:करण शुद्ध होतें, त्या योगानें तो भक्त प्रकाशरूप आणि केवळ प्रकृति आवरणानें झांकला गेल्यामुळें प्रकाशरहित भासतो अशा स्वरूपभूत आत्म्याशीं ऐक्य होऊन मीच परमानंदरूपी आहें असें अवलोकन करितो. (श्रीमद्भाग. तृ. स्कं. अ० ३२ श्लो० २६)

ज्ञानमात्रं परंब्रह्म परमात्मेश्वर: पुमान् ।
दृश्यादिभि: पृथग्भावैर्भगवानेक ईर्यते ॥
एतावानेव योगेन समग्रेणेह योगिन: ।
युज्यतेऽभिमतो ह्यर्थो यदसंगस्तु कृत्स्नश: ॥ २७ ॥

भावार्थ:—कपिल महामुनि देवहूति मातेस ह्मणतात. हे माते—' ज्ञानस्वरूपी, एकच पदार्थ (ह्मणजे परमात्मा) निरनिराळ्या शास्त्रांमध्यें निरनिराळ्या शब्दांनीं

जैसें । जयाचें मनचि झालें तैसें । जयानें पाहिलें एकचि ऐसें । सर्व घटीं चैतन्यें ॥ अखंड ॥ १ ॥ +जयाला वेद म्हणति नेती । तें काय मिळेल वाचल्या पोथी । येथ न *चाले आपुली मति । ऐसें समजुनियां चित्तीं । उगेंचि घेतलें मौन्यें ॥ अखंड० ॥ २ ॥ स्वप्नीं जें जें दिसे

+ अन्यपाठ=ज्याला. * चले.

वर्णन केला जातो. त्याला उपनिषदांमध्यें 'परब्रह्म' योगशास्त्रामध्यें 'परब्रह्म ईश्वर' सांख्यशास्त्रामध्यें 'पुरुष' आणि भक्तिशास्त्रामध्यें 'भगवान्' अशा प्रकारें वर्णिला जातो.

१ पंचदशीकार चित्रदीपामध्यें ह्मणतात.—

जगच्चित्रं स्वचैतन्ये पटे चित्रमिवार्पितम ।
मायया तदुपेक्ष्यैव चैतन्यं परिशेष्यताम् ॥ २८९ ॥

भावार्थः—चैतन्यावर हे सर्व विचित्र व अनंत पदार्थ भासत आहेत, तरी ते चैतन्याहून भिन्न नसून चैतन्यरूपच आहेत. चित्रांला जसे रंग, तसे विचित्र भासाला कारण अनादि माया आहे. यास्तव विवेकी पुरुष चित्राकडे दृष्टी न देतां जसे त्याच्या आधारभूत पटाकडे दृष्टि ठेवतात, त्याप्रमाणे मुज्ञानें या साकाराकडे लक्ष न देतां निराकार, नित्य, निर्गुण व निःसीम चैतन्याकडे दृष्टि ठेवावी.

२ वर सांगितल्याप्रमाणें त्याचा अनुभव घेणारा अन्य कोणी नसतो, परंतु जो सर्वांचा अनुभव घेतो, त्याला कधीं बाधही होत नाहीं. तस्मात् असा जो बाधशून्य व स्वयंप्रकाश तोच आत्मा होय. हा इंद्रियें व मन यांनाही विषय होत नाहीं असें श्रुतींत सांगितलें आहे. अर्थात् जो इंद्रियांस अगम्य त्याचें वाचेनें तरी काय स्वरूप सांगावें? आत्मा स्वतःच अनुभवरूप असल्यामुळें त्याला अनुभाव्यता नाहीं ह्मणजे त्याचा अनुभव दुसऱ्या कशानेंही घेतां येत नाहीं.

३ अत एव श्रुतिर्बाध्यं बाधित्वा शेषयत्यदः ।
स एष नेति नेत्यात्मेप्यतद्व्यावृत्तिरूपतः ॥ ३२ ॥

रहस्यः—'नेति नेति' या श्रुतीचा अर्थ असा आहे कीं, जे जे पदार्थ मन बुद्ध्यादिकांस गोचर ह्मणून आहेत, ते ते जड असें समजून तें वगळून बाकी राहिलेलें साक्षिचैतन्य, जें निराकरण करण्यास अशक्य त्याबद्दलच श्रुतीनें 'नेति नेति' असें ह्मटलें. तेंच ब्रह्म होय. जेवढें ह्मणून प्रत्यक्ष भासतें तें सर्व टाकतां येतें. पण जें इंद्रियगम्य नसतें, त्याचा त्याग करितां येत नाहीं. जो बाधरहित तोच चैतन्यस्वरूप आत्मा होय.

तें तें जागृतिला नासे । तैसें ×जगद्रूप आभासे । बाणलें प्रतीतीस ऐसें । नित्य निरंजन शून्य ॥ अखंड० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा ब्रह्मरसायन प्याला । *त्याला जन हें निंदो वंदो देहाला । आपण सोडुनियां मोहाला । झाला भगवंतासी मान्य ॥ अखंड० ॥ ४ ॥

पद १३ वें.

संकट भगवान् निवारी ॥ ध्रु० ॥ घडि घडि पल हरिस्मरण करितां । भवसागर हा तारी ॥ समर्थस्वामी उदार दाता । भक्तजनां कैवारी ॥ संकट ॥ १ ॥ गगनाहुनि जो सूक्ष्म ब्रह्म हा । अनादि नट विहारी ॥ लीलाविग्रही अनंतरूपि जो । पुरुष नव्हे हे नारी ॥ संकट० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा उदरभरण पोषण । चिंता पडों नेदि हे भारी । पुनरपि न घाली गर्भवासीं । जांवासि या ससारीं ॥ संकट० ॥ ३ ॥

पद १४ वें.

भगवानजी निदान । जो नर भजन पूजन न करित । रितीविण वर्ततसे नादान ॥ ध्रु० ॥ हित विहित कांहीं कपींच न कळे ॥ बद्ध

× जगदारूप. * प्याला.

---

१ श्रीमद्भागवत तृतीयस्कंद अ० ३२ श्लो० २२।२३

तस्मात्त्वं सर्वभावेन भजस्व परमेष्ठिनम् ।
तद्गुणाश्रयया भक्त्या भजनीयं पदांबुजम् ॥ २२ ॥
वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ।
जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यद्ब्रह्मदर्शनम् ॥ २३ ॥

भावार्थः—कपिल ह्मणतात, हे माते, तूं त्या परमेश्वराचे, त्याच्या गुणाचा आश्रय करून राहणाऱ्या भक्तीनें निरंतर अनन्यभावें सेवन कर. कारण, वासुदेव भगवताचे ठायीं भक्तियोग केला असतां, तो ब्रह्मसाक्षात्कार करून देणारे ज्ञान आणि संसाराचे ठायीं वैराग्य शीघ्र उत्पन्न करितो.

२ आदिकारण, (किंवा शेवट.)

३ अनाचारी (दुष्ट.)

विषय बाधोंन । समाधान कधीं न होय ज्याला । विचेंविला वादान ॥ भगवान० ॥ १ ॥ अकटे विकट हे निकट बोलत । बळकट जो सादोंन ॥ संकोच होतसे ज्ञानउदयीं । जेवीं, जंबुक भर चांदोंन ॥ भगवान० ॥ २ ॥ निरहंकृतिनें ईश्वारें न करी । चित्त वित्त जीवित हें दान ॥ वणवण हिंडत दिवस भरीही । स्वार्थे सार्धे नान ॥ भगवान० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा जन्म वरि असे । *जीवत्व आबादाँन । मन हा भुजंग खुलेना डुलेना । अनाहत नादान ॥ भगवानजी० ॥ ४ ॥

पद १५ वें.

भगवान् भवार्णव तारी । अनन्यगति शरणागतवत्सल भक्तजनां कैवारी ॥ ध्रु० ॥ पुण्यश्लोक जे धर्मपरायण जो +संस्थापनकारी । दुष्ट दानवं

---

* अन्यपाठ=जीवित्व. + संस्थापन जो करी.

---

१ विषयबाधेच्या योगानें; वाडि प्रांतांत ' ने ' च्या ऐवजीं ' न ' जसें बाधान वादान (बाधानें वादविवादानें पाखांड वाद करण्यानें) असा प्रयोग करितात.

२ हैराण केला (श्रमी केला.)

३ अद्वातद्वा (भलभलतें) बोलणें.

४ मोठ्यानें ओरडून दुसऱ्यास बोलावणें यास कोकणांत ' साद मारणें ' ह्मणतात. मोठ्यानें ओरडण्यांत पटाईत.

५ चांद ह्मणजे चन्द्र. पौर्णिमेचा पूर्ण चंद्रोदय झाला ह्मणजे कोल्हा साशंकपणें फिरतो. (ज्ञानेश्वरींत अ. १६ येथें ह्याच दृष्टांत घेतलेला आहे [चंद्र देखोनि जळे पोटीं कोल्हा जैसा]

६ आपलपोटेपणा स्वहित साधनपर असणें.

७ अविच्छिन्न.

८ मन ह्याच भुजंग तो स्वरूपीं वळेना. तुकोबानीं ह्मटलें आहे—' अही उलट्या मार्गें आला शून्यद्वारीं रिझावला.

९ योगसमाधिमध्यें अनाहत ह्मणजे नगारे वगैरे प्रमाणें उत्पन्न होणारे ध्वनि ऐकूं येतात. तें अंतर्गत् स्वयंप्रकाश असें चैतन्य आहे. (पातंञ्जल योगशास्त्राचा अभिप्राय विभूतिपाद पहा.

मारी। तो हा युगायुगीं अवतारी ॥ भगवान्० ॥ १ ॥ काया माया *नसेचि आया निर्गुण पाया ज्याचा। सर्व खेळ हा त्याचा विश्व हें विचित्र चित्र चितारी। भगवान्० ॥ २ ॥ परम प्रीति आभारीं संभूतसंभव हा संभारीं। ब्रम्हांड उभारी ब्रह्माहरिहर सुरनरउरगां भारी ॥ भगवान्० ॥ ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा पतीतपावन पूर्ण दयाघन गुप्त गहन आकारी। सज्जनजनमनमोहन हा जगजीवन दीनोद्धारी ॥ भगवान्० ॥

पद १६ वें.

भगवन्त निजभक्तजनांचा कैवारी। भवसिंधु तारी। पारावत कीं हें चंचळ मनपण मारी। ×नौके जन ऊतारी ॥ ध्रु० ॥ निरंजनीं निकट हें लक्ष लाहें। परतुनि पाहें। सकळहि व्यापक साक्षि तोचि आहे। निर्विकार राहे ॥ भगवन्त० ॥ १ ॥ जो कां परमानंदाला मिळवी। मीं कोण कळवी। प्रथमचि प्रीति देहबुद्धिला पळवी। अभिमान गळवी ॥ भगवन्त० ॥ २ ॥ बाळ उन्मत्त पिशाचवृत्ति। पिंडीं+आवृत्ति। ज्ञाना वांचुनि न कळे स्वरूपस्थिति। देतो विदेहमुक्ति ॥ भगवन्त० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे इच्छिलें फळ देता। हा दुर्लभ दाता। त्रिभुवनपति हा एकचि हा अवघा पहातां। सुख वाटे गातां। भगवन्त० ॥ ४ ॥

पद १७ वें.

भगवान्‌जी तुजविणें क्षण भरी ‡आन चिंतींना मीं। जनीं जनार्दन समान देखें प्रत्यक्ष हा नयनां मीं ॥ ध्रु० ॥ नासुनि पंच भूत सेना मीं। कवणचि वागवणें भय ना मीं। पळ एक पडों नेदीं चैना मीं। मग हे भोगणें ना दैना मीं ॥ भगवान्० ॥ १ ॥ विषयबुद्धि धरीं ना मीं। जगीं या कोणाचाचि अरी ना मी। सप्रेमभरित हरिनामीं। पुनतीं जन्म पडे तें करींना मीं ॥ भगवान्० ॥ २ ॥ विपरीत करीं वमना मीं।

---

* अन्यपाठ=नयेचि. † दीन. × निकें वजन ऊतारी. + आवर्ती. ‡ आनचि ना मी.

दृढतर निग्रह करीं कीं मना मीं। आकाशीं करीं गमना मीं। न पडें कर्मदोषदमेना मीं ॥ भगवान्० ॥ ३ ॥ शरण या भवभजना मीं। मुनिजनरंजना मीं। म्हणे सोहिरा निरंजना मीं। ऐसें करीं तूं स्वामी ॥ भगवान्० ॥ ४ ॥

पद १८ वें.

भगवन्तभजनाविण हें +व्यर्थ जिणे रे ॥ ध्रु० ॥ नाम एकाचें न घेती फुकाचें। ते नरकाचे पाहुणे रे ॥ भगवन्त० ॥ १ ॥ निर्माण *कर्ता विसरुनि पुरता। संसारचि करिता हे। तयाचें नशीब उणें रे ॥ भगवन्त० ॥ २ ॥ एक आत्मकळा नकळा। प्रपंच सगळा। शिकोनी जसें पोट भरी हें सुंणें रे ॥ भगवन्त० ॥३॥ म्हणे सोहिरा विवेक करावा। त्वरित वरावा हृदयिं धरावा। पाण्याला पाणी रे ॥ भगवन्त० ॥ ४ ॥

पद १९ वें.

लय हें भगवन्तीं जरि लाय। मग हा प्रपंच केला तरि काय ॥ ध्रु० ॥ जैसी अभ्रींची हे छाया। कीं हे जाण नटाची जाया। अथवा †मृग-जळवत् हे माया। तैसी वाटत ज्याला काया। §अवघेंचि मिथ्या दिसलें हाय ॥ मग हा० ॥ २ ॥ देहबुद्धि येतां भ्राति। हृदयीं न धरे होते वांती। स्वस्थ बैसुनियां एकांतीं। कवण मी आहें आधीं अंतीं।

+ अन्यपाठ=काय. * करिता. † केवळ मृगजळमाया. § अवघेंच दिसतें हें मिथ्या होय.

---

१ कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि।
योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वात्मशुद्धये ॥ ११ ॥
[भ. गी. अ.५ सु. चं. टी.]

योगी जे आहेत ते, चित्ताच्या शुद्धीस्तव आसक्ति सोडून, शरिरानें, मनानें, बुद्धीनें आणि केवळ इंद्रियांनी देखील कर्में करितात.

२ कुत्रा.

३ लाहे=लागेल.

ऐसें अखंड पाहत जाय ॥ मग हा० ॥ २ ॥ जैसें जाण सतीचे भोग। तैसें वरवर दिसतें सोंग । अंतरि जीवशिवाला योग । बासुनि गेलासे +भवरोग । मोह हा मनचाची मनीं ·खाय ॥ मग हा० ॥ ३ ॥ नयनीं नयेचि दृश्याभास । समूळ तुटला आशापाश । समग्र विकासलें आकाश । चंद्रसूर्याबीण प्रकाश । चित्त हें महाशून्यीं स्थिर होय ॥ मग हा० ॥ ४ ॥ ¶झाला प्रसन्न हा गुरुराय । चुकवी $जो भवरणघाय । §त्याचे कधीं न सोडीं पाय । *त्याला तनुमनधन हें वार्ये । जो कां नित्य निरंजनीं धाय ॥ मग हा० ॥ ५ ॥ सोहिरा म्हणे †सर्व समाय । विपरित गेले सर्व अपाय । हाता आला तरणोपाय । पिंडब्रह्मांडीं न माय । जन्म मृत्यु जरा अपाय । याचा कळला तरणोपाय । आंगीं आहे पुरती कमाय ॥ मग हा० ॥ ६ ॥

+ अन्यपाठ=होंचि. ¶ हा $ ज्याला चुकले. § जोका. * निरतर. † कीं वर्म.

---

१ न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥
[भ. गी. अ. १५ श्लो० ६ सु. चं. टी.]

ज्याला प्रकाशित करण्याला सूर्य किंवा चंद्र किंवा अग्नि यांची आवश्यकता नाहीं, आणि जेथे गेलेले लोक पुनः मागें येत नाहींत, तें माझें परंधाम म्हणजे उत्कृष्ट पद होय.

२ उन्मनिअवस्थेंत [मूल प्रकृतीमध्यें]

अधःशून्यमनोभूतमूर्ध्वशून्यं च मारुतः ।
मध्यशून्ये च जीवात्मा चतुर्थं ब्रह्मनिश्चयः ॥ १ ॥

अधःशून्य म्हणजे अकारू । मध्यशून्य म्हणिजे उकारू । उर्ध्वशून्य म्हणिजे मकारू । ॐकार तेंचि चैतन्य ॥ १ ॥ अधःशून्य म्हणिजे मन चंचल । उर्ध्व शून्य तें पवनु शबल । मध्यशून्य जीव चौथें केवळ । परब्रह्म जाणिजे तें ॥ २ ॥ तें निर्गुण निराकार । निष्प्रपंच निराधार । निःसंग निर्विकार । पूर्णघन तें ओळखें ॥ ३ ॥ आणिक एक तार्किकांचें मत । ॐकारावरुतें शून्य बोलत । परि तें जाणावें जीवद्भूत । प्रमाणयुक्त नव्हे ॥ ४ ॥ [ज्ञानेश्वर, पंचीकरण]

३ वाये—अर्पण करितो.

पद २० वें.

तो भगवन्ताचा दास । ज्याचें मनची नित्य उदास ॥ ध्रु० ॥ टाकुनियां खेदास । न मुळे मांस आणि मेदास । निरसुनियां भेदास । अक्षय पावे ब्रह्मपदास ॥ तो भगवन्ताचा० ॥ १ ॥ जेवीं भुंजग हा नादास । किंवा चकोर हा चांदास । चिंतनिं देव पावे सादास । अखंड भोगी सच्चिदानंदास ॥ तो भगवन्ताचा० ॥ २ ॥ शास्त्रें नलगेचि शोधास । किंवा प्रवर्तेना वादास । जेवीं भ्रमर आमोदास । सेवी सुमनमकरंदास ॥ तो भगवन्ताचा० ॥ ३ ॥ कोठें न पावेचि बंधास । जो कां देखे मूळकंदास । लागे भजनाच्या छंदास । नित्य आठवी गोविंदास ॥ तो भगवन्ताचा० ॥ ४ ॥ न करी विषयांची आस । सोहिरा म्हणे हे बरदास (?) योग्य जो सद्गुरुच्या वरदास । न चुके आपुलिया बिरुदास ॥ तो भगवन्ताचा० ॥ ५ ॥

पद २१ वें.

भगवन्त दाता । स्वामी तो आठवा ॥ ध्रु० ॥ परमानंद प्रकाशवंत । ज्याला नाहीं आदी अंत । जो कां ध्याती अखंड संत । धरूनि जाती निर्गुण पंथ ॥ +अंतरीक्ष हें लावुनियां लय दक्ष होउनी मोक्ष सुखाला सहज समाधीं राहाता ॥ स्वामि तो० ॥ १ ॥ जेथुनि झाली

+ अन्यपाठ=अंतरसाक्ष.

---

१ या प्रकारचा भगवन्ताचा दास खरोखर मिळणें फार दुर्लभ आहे, तुकोबासारखे जे खरे भगवद्भक्त त्यांचा अधिकार काय सांगावा? तुकोबांनीं म्हटलें आहे. घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिति सांडवीन ॥ १ ॥ ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरि ऋणी देव ऐसा ॥ २ ॥ तीर्थभ्रामकांसी आणीन आळस ; कडू स्वर्गवास करिन भोग ॥ ३ ॥ सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ४ ॥ भक्तिभाग्य प्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा तो अर्थ निजठेवा ॥ ५ ॥ धन्य म्हणवीन इहलोकीं लोकां । भाग्य आम्हीं तुका देखियेला ॥ ६ ॥

सकळ सृष्टि । याचा कर्ता न दिसे दृष्टि । म्हणउनि होतें मन हें कष्टी । ऐकुनि अवघ्या ग्रंथीं गोष्टी ।। स्थावर जंगम नाना लीला विचित्र वर्णी शोभत धरणी तापत तरणी अगम्य करणी चरित्र हें पाहतां ।। स्वामी तो० ।। २ ।। म्हणे सोहिरा अंगीं जडला । आधींच आहे *नाहीं घडला । प्राणी हा संदेहीं पडला । उपाधींत सांपडला । त्याचे दृष्टीं ईश्वर दडला । ऐसा वेदांतीं निवडीला ।। तो हा व्यापक आत्मा अंतरसाक्षि परिपूर्ण सनातन गोड दिसे गातां ।। भगवन्त० ।। ३ ।।

पद २२ वें.

भगवन्ता दर्शन देईं रे ।। ध्रु० ।। मी कोण मज येऊं दे कळोनी । तेथ मन हें वळोनी । जाउं दे अभिमान गळोनी ।। निशिदिनीं निर्गुण वनीं लय हें लावीं रे ।। भगवन्ता० ।। १ ।। काना ऐकवी । नयना दाखवी । त्वचेला कळवी । रसने चाखवी । परिमळ लेववी । शेवटीं कोण हा कोठें तूं नाहीं रें ।। भगवन्ता० ।। २ ।। म्हणे सोहिरा संसार । दिसोनि विषयसुख असार । मृगजळवत् निःसार ।। किमपि मजला रुचों देउं नको कांहीं रे ।। भगवन्ता० ।। ३ ।।

पद २३ वें.

भज परमप्रीति भगवन्ताला ।। ध्रु० ।। नित्य ध्यानीं निरंतर गगनीं

---

* नव्हे.

---

१ उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् ।
विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ।। १० ।।
[भ. गी. अ. १५]

टीका:—तो एका देहांतून दुसऱ्या देहीं जात असतां किंवा एकाच देहीं स्थिर असतां, किंवा इंद्रियांनीं युक्त होऊन विषयांचें सेवन करीत असता त्याला मूढजन पाहत नाहींत, ज्यांना ज्ञाननेत्र आहेत ते मात्र पाहतात. या पदांत ' भगवन्त दाता ' असें ह्मणण्याचें कारण ' परमार्थ लाभ ' करून घेण्याजोगें मनबुद्ध्यादिकांनीं युक्त असे नरदेह देणारा हें होय.

लय हें अन्वयलीला । विलोकीं तूं अचळ अरूप अनंताला ॥ भज० ॥ १ ॥ सदानंद मुळकंद विबंधन चिद्घन । सुख चिरकाळ त्वरित घे अनुभववन एकांताला ॥ भज० ॥ २ ॥ स्वैगत विगत द्विभेद रहित जो समयाधीन । सुदर्शन सर्वा अक्षय रूप जयवंत त्याला ॥ भज० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा दत्त दिगंबर गुरु विश्वंभर अनुगृह्रि तरे । संविद्बोध निजनिरंजन मनरंजन सत् संताला ॥ भज० ॥ ४ ॥

पद २४ वें.

भज भवानी भगवती हे । आनंदी वरदायिनी ॥ धु० ॥ चिद्घनवाटिका, ज्ञानदीपिका, परमामृतकूपिका, कल्पलता हे, भक्तवत्सला, मनोहरा सुंदरा, प्रिया श्री नगर नायका, जगत्रयजननी, विष्णुमाया विलासिनी, हे विश्वमोहिनी, चित्कला जे सैत्रावी संजीवनी ॥ भज०

---

१ स्वगत, सजातीय आणि विजातीय असे तीन भेद आहेत. यास उदाहरणार्थ एक वृक्ष घेऊं:--' वृक्षाचीं पानें व पुष्पें यांपासून होणारा जो तो स्वगत भेद होय. दोन निरनिराळ्या वृक्षांमधील जो भेद तो सजातीय समजावा. आणि दगड माती व वृक्ष यांमधील जो भेद तो विजातीय समजावा. (एकम्, एव, अद्वितीय) या तीन पदांनीं ब्रह्माच्या ठायीं येऊं पहाणाऱ्या भेदत्रयाचे निरसन केलें आहे. (येथें भगवन्तस्वरूपाचे वर्णन असल्यामुळे ' दोनच ' भेदरहीत असें ह्मटलें. ब्रह्म आणि भगवत् स्वरूप यांमध्यें सजातीय भेद प्रतिबद्धक होत नाहीं.

२ या पदांतील सर्व विशेषणें ' भगवत् शक्ति ' तूर्या (हिला योगशास्त्रांत ' ज्ञानकला ' ' अमृतकळा ' सत्रावी अशीं अनेक नावें आहेत) हिच्या संबंधानें आहेत, हीच अखिल जगाची जननदात्री माता होय. असें ह्मटलें आहे.

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

[भ. गी. अ. १४]

हे भारता, महत् ब्रह्म हें माझें गर्भ ठेवण्याचें स्थान ह्मणजे माझी प्रकृति होय. तिजमध्यें मी गर्भ ठेवतों, आणि त्यापासून सर्व भूतांची उत्पत्ति होते. सोहिरोबांनीं सिद्धांतसंहिता ग्रंथांत ह्मटलें आहे.

॥ १ ॥ दिव्यांबरधारी, दिव्यलेपना, दिव्याभरणी, दिव्यकुसुमें दिव्यान्नेंप्रिय, दिव्यप्रिया हे, आत्मस्वरूपिणी, सर्वसिद्धिने, साध्य

सर्वदृष्टि तु वै तुर्या चावस्थात्रयसाक्षिणी ।
नित्यं निरंजनासक्ता समाधानं च गच्छति ॥ ३५ ॥

[अ. ७]

तूर्या साक्षी अवस्था त्रयां । द्रष्टत्व अविद्या माया । आणि या गुणत्रयां । नाशिजे पैं ॥ २७० ॥ जागृतीं वाटलें दीर्घ स्वप्न । स्वप्नीं हीं उरलें तेंचि भान । सुषुप्ति ओळखिली अज्ञान । देहाभिमानें ॥ २७१ ॥ दोन्ही अवस्था संभ्रमीं । अज्ञानें ह्मणें हेंचि कीं मी । ज्ञानें ह्मणें कीं नोहें मी । परि कोण मी हें नकळे पैं ॥ २७२ ॥ तेंचि सुषुप्तीचें रूप । जेथ नुपजे ज्ञानस्वरूप । अज्ञान तमाची झांप । पडे जेथें ॥ २७३ ॥ तेथ तूर्या दशा प्रकाशे । तें ज्ञान दृष्टि कैसें दिसे । तेंचि आतां पैं परियसें । स्वानुभवें ॥ २७४ ॥ निवृत्तिनाथ ' परमप्रकाश ' ग्रंथांत ह्मणतात:—अगा दृष्टीचें अग्र । तेंचि मेरु शिखर । तेथें सत्रावी सुंदर । उभी असे ॥ ३७ ॥ तियेचें घ्यावें दर्शन । तीप्रती करावें अनुष्ठान । तियेपासून ब्रह्मा विष्णु रुद्र जाण । जाहले देखा ॥ ३८ । तीपासून चारी वाचा । रुद्र नातू तियेचा । ब्रह्मा नातू रुद्राचा । आइकें शिष्या ॥ ३९ ॥ विष्णू ब्रम्ह्याचा पिता । ईश्वर विष्णूचा आजा सर्वथा । ईश्वर पुत्र तत्वता । मूळमायेचा ॥ ४० ॥ ते मूळमाया सत्रावी परवस्तूची कन्या । ते परवस्तु शुद्धचैतन्या । तेथें राते तो धन्या । परमात्मा ॥ ४१ ॥ ऐसी विवेचना देहाची । परी संगती घडे सद्गुरूची । सोय दाखवी चमत्काराची । तोचि सद्गुरू ॥ ४२ ॥ तुकोबांचें याविषयीं एक उत्कृष्ट पद आहे तें असें [पार्वतीवर । म्यां नमिला शिवशंकर ॥ धृ० ॥ शंभू कैलास शिखरीं । पार्वती आदिमाया सुंदरी । बैसोनी शंकराचे सेजारीं । विनवि जोडूनी कर ॥ ॥ म्यां० १ ॥ गिरिजा पुसे शंकरासी । तरि मी काय होय तुह्मासी । शंकर ह्मणे माता होसी । मी तुझा कुमर ॥ म्यां० ॥ २ ॥ ऐकुनि बोलली गिरिजा । मी तरि तुमची आत्मजा । तुह्मी पिता शंभु राजा । माझें माहेर ॥ म्यां० ॥ ३ ॥ बोलिला नंदी ते अवसरीं । ऐका ह्मणे त्रिपुरारी । गिरिजा शंकराची अंतुरी । तुह्मी भ्रतार ॥ म्यां० ॥ ४ ॥ बोलिले मग स्वामि कार्तिक । नंदी तुह्मासि काय ठाऊक ? । गिरिजा भाची बहिणीची लेक । नातें साचार ॥ म्यां० ॥ ५ ॥ बोले वीरभद्र आपण । तुह्मी लबाड चौघेजण । गिरिजा शंकराची वहीण । नातें साचार ॥ म्यां० ॥ ॥ ६ ॥ ब्रह्मा विष्णु त्रीनयन । हे काय होती तिचे जण । तुका ह्मणे द्यावें निवडून । तुह्मीं चतुर ॥ म्यां० ॥ ७ ॥]

साधिनी, कामधेनु हे, आदिकुमारी, जगदोद्धारी, जन्म निवारी, मरणा मारी, भवजल तारी, पार उतरी, हे सर्वाची स्वामिणी ॥ भज० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा लक्षभेदिनी, भग्नानका हे, भयनाशिनी, भगमालिनी, लीलालालना, कळा नाटका, चिच्चंद्रिका, चित्कल्हारा, चित्तचाळका, चिदेकरूपा, चित्कैवल्या, भुवनेश्वरी हे, रामा[१] लंपट, कामातुर हे, दृश्यवर्जिता, दुरितनिवारिणी, मंदाकिनि हे, मोक्षदायिनी, परमयोगिनी, अनादि सौभागिनि हे ॥ भज० ॥ ३ ॥

पद २९ वें.

आशीर्वचन +वरदान भगवान् हर देत सुख सुरस सागर परम-

+ अन्यपाठ=वरदास ?

---

१ येथें रामा ह्मणजे स्त्री असा लौकिकार्थ आहे परंतु तत्वार्थ सोहिरोबांच्या ह्मणण्याप्रमाणें:—

दशरथस्तु जीवात्माऽऽत्मा रामश्च कीर्तितः ।

[सिद्धान्तसं.]

ही ' सद्बुद्धिस्त्वेव सीतास्यात् ' सद्बुद्धि सीता असल्यामुळें (आत्मा) जो राम त्याविषयींच फक्त कामातुर आहे, असा आहे. मुकुंदराजांनीं विवेकसिंधूमध्यें ह्मटलें आहेः—कृपादृष्टी सरसी । समाधी प्रवर्तली रामासी । उन्मेष घेउनी मानसीं । ब्रह्मानंद तो ॥ ३ ॥ अठरा दिवस पर्यंता । झाली उन्मनी अवस्था । मनाचिया वृत्ति समस्ता । खुटलिया पैं ॥ ४ ॥ मग समाधी विसर्जिली । तूर्यावस्था प्रवर्तली । जियेचेनि सकळ सृष्टि झाली । शिवात्मक हे ॥ ५ ॥ श्री रंगनाथ एका पदांत ह्मणतातः—जगन्माता तुझी कांता । रामा! जनकनंदिनी सीता पतिव्रता ॥ धृ० ॥ आदि महामाया चिच्छक्ति । जिच्या चरणीं रुळती चारि मुक्ति । दशकंधरें ते नेली । हे तो मायिक बोला । हरिहरां वंद्य निंद्य कैसी ते चित्सत्ता ॥ १ ॥

२ या पदांत असें दर्शविलें आहे कीं ' भगवान् हर ' ज्याच्यावर कृपा करतो त्याला आशीर्वचन आणि वरदान देऊन परमसुखी करितो. शंकराचार्य विवेकचूडामणिमध्यें ह्मणतातः—

दुर्लभं त्रयमेवैतद्देवानुग्रहहेतुकम् ।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ॥ १ ॥

भावार्थः—मनुष्यदेह, मोक्षाची इच्छा, व सत्पुरुषांचा आश्रय ह्या तीन गोष्टी दुर्लभ होत. असे दुर्लभ पदार्थ ईश्वराच्या प्रसादानें मिळतात.

निदान ॥ ध्रु० ॥ जेथ स्थान मानापमान नाहीं समान सकळांभूतीं करं दान मन कान वर आन स्मरत नसत वसत वनवासीं गिरि कपट निकट अति भार जप तप पुण्य परायण श्री नारायण ध्यान ॥ १ ॥ जेथ संत महंत अनंतरूप वसत गाती गुण रातदीन सांगात वेद तच्चरित त्वरित कल्याण मोक्षप्रद देती अवधान ॥ २ ॥ म्हणे सोहिरा अतीत ईश्वर पतीत पावन सनकादिक मुनिजन संभावन ब्रह्मा विष्णु महेश उत्पन्न गगन पवन जळ मही हुताशन स्थावर जंगम संनिधानीं हें चळत अचळ हा परमानंद परात्पर पावत परम हें आत्म ज्ञान ॥ ३ ॥

पद २६ वें.

भेटला भगवान् मला हो ॥ ध्रु० ॥ भेटीसाठीं आटाआटी जपतपकोटी जन्मोजन्मीं करित करित जिव बहुतचि हा श्रमला हो ॥ भेटला भगवान्० ॥ १ ॥ पंचभूतांच्या विस्ताराला सविस्तराला जाणुनि नित्यानित्य साक्षिभूत हा अंतरींचि गमला हो ॥ भेटला० ॥ २ ॥ जे जे समयीं जें जें घडतें भोगणें पडतें देहालाया संस्कार हा तयानेंचि नेमिला हो ॥ भेटला भगवान्० ॥ ३ ॥ नित्यानित्यविवेक करूनी वैराग्यदशेनें पुनर्ति न सेवीं विषयरसां वमला हो ॥ भेटला भगवान्० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा अंतर बाहेर व्यापुनि उरला रूपरेखविण परब्रह्म तेथ हा जीव रमला हो ॥ भेटला भगवान्० ॥ ५ ॥

---

१ मन आणि कान दान कर ह्मणजे त्या ईश्वराचें श्रवणमनन कर. ह्या कामीं मन आणि कान याचें दान कर.

२ यथैव बिंबं मृदयोपलिप्तं तेजोमयं भ्राजते तत् सुधातम् ॥
तद् वाऽऽत्मतत्त्वं प्रसमीक्ष्य देही एकः कृतार्थो भवते वीतशोकः ॥ १४ ॥

भावार्थः—ज्याप्रमाणें सुवर्णादिकाच्या बिंबाला (आदर्शाला) माती लागली असतां तें साफ केल्यावर पुनः चकचकीत होतें, त्याचप्रमाणें आत्मतत्वाचें दर्शन घेऊन (कोणी) एक मनुष्य कर्तव्य केलेला (आणि) शोक गेलेला असा होतो. याची साक्ष हल्लींच्या काळीं प्रत्यक्ष पाहिजे असेल तर सोहिरोबानाथांची आहे. मनुष्य कोटीची योग्यता काय आहे हेंही या उदाहरणावरून स्पष्ट होत आहे.

पद २७ वें.

भगवान् तुम्हाला प्रसन्न असो कीं ॥ ध्रु० ॥ अनंतकोटीब्रह्मांड-नायक । आत्माराम हा +सुखदायक ॥ कायिक वाचिक मन अभ्यासें सर्वभूतिं हा तोचि दिसो कीं ॥ भगवान्० ॥ १ ॥ अज्ञान समग्र हें विलया जावो । झालें कर्म हें ब्रह्मीं समावो । देहबुद्धिअभिमान गमावो ॥ किमपी हे भ्रांति नसो कीं ॥ भगवान्० ॥ २ ॥ परतुंनि दृष्टी लय हें लागो । प्रपंचाचें बरें न मागो । निरालंबीं सदैव जागो ॥ निश्चय तेथें ×वसो कीं । भगवान्० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा चित्तीं डसों कीं । संता पाशीं होंचि पुसों कीं । *योग्य योग्य हें मानुनि-हृदयीं भूतदया हे वसो कीं ॥ भगवान्० ॥ ४ ॥

पद २८ वें.

मनीं चिंती तो भगवान् । प्राणी मोठा भाग्यवान् ॥ धृ० ॥ थोर आणि लहान, ज्याला सर्वही समान । न धरी कोणाची गुमान, कांहीं नलगे आद-रमान ॥ मनीं० ॥ १ ॥ पुढें जाणुनि निदान, आधींच देह करी दान । हरिगुणानुवादान, नित्य करी पवित्र कान ॥ मनीं० ॥ २ ॥ चाले वेदनि-

+ अन्यपाठ=स्वसुख. × वसो. * योग्यायोग्य हें नमनुनि.

१ तुकोबानीं ह्मटले आहे. [भूतीं भगवद्भाव । मात्रांसहीत जीव । अद्वैत तो ठाव । निरंजन एकला ॥ १ ॥ ऐसा गर्जती पुराणे । वेदवाणी सकळ जन । संत गर्जतील तेणें । अनुभवें निर्भर ॥ २ ॥ माझें तुझें हा विकार । निरसतां एक-कार । नलगे कांही फार । विचारचि करणे ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुजे । हें तो नाहींच सहजें । संकल्पाच्या काजें । आपेंआप वाढलें ॥ ४ ॥]

२ पहिल्या पदांत या शब्दावर टीप आहे.

३ भीड.

४ हेतु.

५ परमेश्वरास सर्व देहासकट संसार अर्पण करितो.

६ गुणानुवादानें.

रीपान, अवरोधी प्राणापान ॥ मनीं० ॥ ३ ॥ जन्ममृत्यूचियां भयान, त्याचें जतन करी ध्यान । सोहिरा ह्मणे झालें त्याला, पूर्ण ब्रह्मज्ञान ॥ मनीं० ॥ ४ ॥

पद २९ वें.

भगवंताला स्मराल, तरि हा भवसागर तुह्मीं तराल हो ॥ ध्रु० ॥ पापांमध्यें न रहाल, शुद्ध हें पुण्यचि करा तराल । आणि योगी व्हाल, तरि मोहफणीचें विष उतराल हो ॥ भग० ॥ १ ॥ आत्मा ना विसराल, विषयतृष्णा ना पसराल । भ्रमांतूनी कसराल, आदिपुरुषाला अनुसराला हो ॥ भग० ॥ २ ॥ विचार हा विवराल, निरंतर भजनीं वावराल । निजशांतीला वराल, चंचळ मानस हें आवराल हो ॥ भग० ॥ ३ ॥ योगाभ्यासें झराल, अक्षय प्रेमातें पाझराल । निरंजनवनीं ठराल, तेव्हां नित्यानंदें भराल हो ॥ भग० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे कर्म हराल, केंवी जन्मुनि पुढतीं मराल । चित्त चैतन्यीं सुधराल, तेव्हां उभय कुळें उद्धराल हो ॥ भग०५

पद ३० वें.

भगवान विष्णु स्मर अनंत व्यापक तो ॥ ध्रु० ॥ युगायुगीं जो धर्म स्थापी, पापी सकळही दानव कापी, प्रतिपाळी अनुतापी, अंतरीं काम क्रोध हे चापी, जगें नग तरंग असे ज्या आपीं, तो हा अच्युत मधुसूदन

---

१ निरूपण, वेदांत चर्चा.

२ भयानें.

३ अविद्येनें 'मी जीव' असा झालेला तोच सर्प. त्याचे विष ह्मणजे स्वरूपाचें अज्ञान.

४ वाढवाल.

५ मागें सराल. भ्रमांतून मोकळे व्हाल.

६ परमेश्वर, महागुरु.

७ ब्रह्मज्ञानापासून उत्पन्न होणारें समाधान.

८ देह झिजवाल.

९ विषयजन्य दुःखाचा अनुभव घेऊन वैराग्य उत्पन्न झालेला मुमुक्षु.

१० भगवान विष्णु हेंच सर्व विश्वाचें अधिष्ठानरूपी उदक असून याग, जग पर्वत वगैरे हे केवळ त्या उदकावर तरंगाप्रमाणें भासतात.

मनमोहन हृषीकेशी, हा हृदयनिवाशी, अशासि टाकुनि कशासि जिव हा [१] काणिकची बघतो ॥ १ ॥ अनन्य भावें, नाम ध्यावें, श्रवण करावें, हृदयीं धरावें, मनीं भरावें, तद्रूप व्हावें, पूर्वार्जित प्रारब्ध स्वभावें, देह हें पावे, ईश्वर देता, अनेक दाता, असें असुनियां पोटासाठीं, आटाओटी, करूनि शरीर हें कशासी [२] हासेकिता ॥ २ ॥ गुरूदास्य हें कांहीं असावें, लटिकें मायिक दृश्य दिसावें अविनाश तें काय पुसावें, ध्यान करित एकांतीं बसावें पाखंड तंड वितंड वाद कशाशी हा शिकतो ॥ ३ ॥ भक्तजनांचा धांवा, करितो कृष्णस्वरूपीं पांवा, वाजवी गोप वधूंप्रती नांवा, नांवा उच्चारित रति रंग, लाल श्रीरंग, विराजित यदुवंशींचा [३] वैतंस हा हरी, शंखसुदर्शनधारी, मोक्ष देऊं सकतो ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा भारतसमयीं, सारथ्य करी तो भारतमथनीं नवनीत गीताअमृतवचनीं; उपत्रीती उपदेश करुनियां, उद्धरी पलें कीं हा पार्थ; प्रताप अर्थचि परमार्थ, दावी करी आपणा सम[४]तुक तो ॥ ५ ॥

पद ३१ वें.

भगवान्जीचें ध्यान धरोनी सदा सुखी रहा । अविनाश सुख भोगीं आनंद हा महा ॥ धृ० ॥ देहासगें त्रिविध ताप मोठा कीरे बहा । ज्ञानबळें कांहीं हालों नको तूं जरा हा ॥ १ ॥ बहुत योनी क्रमुनी आला नरदेहा । हा जीवन्मुक्त व्हावें याचा ध्यास मनीं [५] वाहा ॥ २ ॥ विषयबोध राजयोग अभ्यास करा हा । नामरूप जाणतो हा कोठूनि कोण पाहा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे नित्यानित्य स्वानुभव गा हा । प्रकट गुप्त नोहे आत्मारामाचि उमगा हा ॥ ४ ॥

---

१ धडपड.

२ हिसके देतो. भास देतो.

३ हा शब्द ' अवतंस ' असला पाहिजे.

४ अलंकार.

५ ध्यानांत ठेव, समज.

६ वास्तविक जें सर्व दिसतें आणि भासतें तो केवळ परमात्मा असून केवळ अज्ञानानें जन्म हा मृत होतो व आत्मा दिसत नाहीं.

पुढें चालू.

पद २३ वें

भावें भगवान हरि तो । वेळोवेळां तोचि स्मरतों ॥ धृ० ॥ जळस्थळव्यापक असोनि न दिसे । असेचि सभरांभरितो ॥ प्रल्हादास्तव प्रकटे स्तंभीं । गर्जना करि नरहरि तो ॥ भावें० ॥ १ ॥ सदैव ज्याचें कीर्तन करितां । हृदयीं आनंद भरितो ॥ अनन्यगतिनें शरण आलिया । सुखदुःख हें परिहरितो ॥ भावें० ॥ २ ॥ निर्गुणसागर अचळआपण । हारविहार करितो ॥ नामरूपीं ण नाना रंग । उठवितसे जगलहरि तो ॥ भावें० ॥ ३ ॥ दैत्यमर्दनासाठि उमटला । देव हाचि गौळ्यां घरिं तो ॥ ह्मणे सोहिरा पूर्णब्रह्म । बहु अवतार धरी तो ॥ भावें० ॥ ४ ॥

पद ३३ वें.

भगवन्ता तुझी गोडी लाव रे । परमानंद परात्पर पूर्ण । स्वरूप तुझें की दाव रे ॥ धृ० ॥ जेणेंकरोनि हे निघोनि जातिल । रज तम दुष्ट स्वभाव रे । चिद्घन सहज अनंतरूपीं या । उपजो हा सद्भाव रे ॥ भग०

१ ह्या पदांचें रहस्य असें आहे कीं, हिरण्यकशिपूचा नाश करण्यासाठीं स्तंभामधून प्रकट झालेला भगवान् (नारसिंहावतार) हरि या अवताराचें सयुक्तिक कारण यांत दर्शविलें आहे हा हिरण्यकशिपु ह्मणजे महदहंकार होय. योगी सूक्ष्मभूतें व महाभूतें यांचें उल्लंघन करून गेल्यावर तेथून अहंकार तत्त्वाला जातो. तो अहंकार सात्विक, राजस आणि तामस असा तीन प्रकारचा आहे. त्यांतील तामस अहंकारामध्यें पंचभूतें व इंद्रियें यांचा लय होतो, राजस अहंकारामध्यें दहा इंद्रियें मिळून जातात, व सात्विक अहंकारामध्यें मनाचा व देवतांचा लय होतो. इतकें झाल्यावर योगी तसाच पुढें त्या गतीनें अहंकारासह महत्तत्त्वाला जातो; व तेथून प्रकृतिरूप आवरणांत जातो: तेथें सर्व गुणांचा लय ह्मणजे अनभाव होतो. त्या प्रकृतिरूपानें योग्यास मरणेशेवटीं आनंदस्वरूपी ईश्वराची प्राप्ती होते. हिरण्यकशिपूनें प्रल्हादास ह्मटलें कीं, तूं वेळोवेळ ज्याचें स्मरण करितोस, तो ईश्वर कधींही अनुभवास येत नाहीं, तो कोठें कोणाला दिसत नाहीं, तेव्हां तो आहे तरी कशावरून ? त्यावर प्रल्हादानें दिलेल्या उत्तराचें रहस्य हा या पदाचा विषय आहे.

२ सबाह्याभ्यंतरीं=आंतबाहेर.

॥ १ ॥ दृश्यभास हा मिथ्या यांतिल । कशास धरणें हांवें ॥ जन वन कोठें कांहिंच नाहीं । दिसे हे तितुकी माव रे ॥ भग० ॥ २ ॥ संन्यास ह्मणणें हा यांतचि होतो । चित्त हें शून्यीं स्थिरावे रे ॥ बाह्यात्कारें कशासि घालणें १ । शुभ्र वसनाला काव रे ॥ भग० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा आत्मस्मरण हें । मोठा कीं मोक्षउपाव रे ॥ सदैव कीर्तन करणें हें । भवसिंधु तराया नाव रे ॥ भग० ॥ ४ ॥

पद ३४ वें (राग शंकराभरण.)

भगवानजी कसा व्यापक पाहत असा ॥ ध्रु० ॥ सद्गुरुसेवा करुनि निर्वृत्तिपथ कवण तो पुसा । ज्ञानकळा ते पावुनि अंतरिं, या संसारीं असुनियां नसा ॥ भग० ॥ १ ॥ मूढजनांचा सहवास हा, कधिं नको करुं कीं फारसा । नित्यानित्यविवेकें उजळुनि, अनुभव हा आरसा ॥ भग०

---

१ हांवरेपणा, आसक्ति.

२ चित्ताची उत्तम प्रकारची शुद्धि हाच खरा संन्यास (कर्मांच्या न्यास) होय. योगारूढ व्हावयाला हें साधन असे भगवंतांनीं गीतेत ह्मटलें आहे, त्या हेतूस उद्देशूनच हे उद्गार आहेत. " काशी क्षेत्रामध्ये एक तरुण, सन्याशाचा उत्तम वेष घेऊन घांटावर बसला असतां अंतर्ज्ञानी कबीरानी त्याला पाहिले, आणि त्याचें हृद्गत ओळखून मोठ्यानें ह्मटले की " ऊपर तो खूब बनी है, अंदरकी बात राम जाने." तात्पर्य या प्रकारचा संन्यास काय उपयोगी ? गीतेत ह्मटलें आहे. [अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः । स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १॥ सु० च० अ० ६] श्री भगवान् ह्मणाले । कर्माच्या फळाची आसक्ति सोडून, करावयाला योग्य असें कर्म जो करितो, तोच खरा संन्यासी आणि तोच खरा योगी । ज्यानें अग्निहोत्र टाकिलें, आणि ज्यानें लौकिककर्मांचा त्याग केला, तो नव्हे. ॥ १॥

३ जुन्या वहीत कोठें कोठें पदांचे राग दिलेले आहेत. ते जसेच्या तसे येथें दिले आहेत. हे मूळचे सोहिरोबांनीं दिलेले कीं मागाहून कोणी बसविले आहेत, हें समजण्यास तूर्त साधन नाहीं.

४ विषयपराङ्मुखवृत्ति. [निवृत्तिः परमा तृप्तिरानन्दोऽनुपमः स्वतः ॥ विवेकचूडामणि, आचार्य.]

॥ २ ॥ ज्ञानकमलदार्ली अलिवत् चित्त, सद्बोध आमोदीं ठसा । त्याचे उपाया लागुनि, सेवा सतत अद्वय ब्रह्मरसा ॥ भग० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा ज्या रीतीनें दर्शन देईल, प्रसन्न होईल जसा । त्याचे प्रकारें स्थिर करोनी, मन सदैव स्वस्थ बसा ॥ भग० ॥ ४ ॥

पद ३५ वें.

भगवानजीला पाहतां प्राण्या । तुज सुखदुःख कांहीं नसे रे ॥ ध्रु० ॥ अदृश्य कळा हे व्यापक सकळा । नेति नेति ह्मणतसे वेद नकळा । नेणसि याला जीवा तूं विकळा । शरीर चाळवी जीवनकळा । हा दूर कधीं नाहीं जवळि असे रे ॥ भग० ॥ १ ॥ अनन्यभावें, भजन स्वभावें । नाम ध्यावें, अंतरीं ध्यावें, लय लावावें । नित्य निरंजनीं क्षणभरि जरि चित्त बसे रे ॥ भग० ॥ २ ॥ पृथ्वी पाहता, उदकीं वाहता । तेजीं दाहता गगनीं साहता । सन्निधानीं मनपवन चळण करी । स्थिरचरीं हरि सर्वत्र वसे रे ॥ भग० ॥ ३ ॥ जन्मा नाहीं यावें जावें । देवचि अवघा ह्मणुनि भजावें । संगावीण संतोषी व्हावें । निस्त्रैगुण्य परब्रह्मरसीं रे ॥ भग० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा अतीत ईश्वर । पतीतपावन, दीनबंधु हा जगदुद्धारण । सज्जनजनमनमोहनकारण । चिद्गगनीं नवआनंदघन वर्षे रे ॥ भग० ॥ ५ ॥

पद ३६ वें.

भगवन्ताचे गुण गा रे । श्रवण मनन निदिध्यासाविण क्षण एक नको राहूं उगा रे ॥ ध्रु० ॥ सायास सांपडली हे नरतनु । दुर्लभ काळ हा नको

---

१ पदसंग्रह भाग १ पान १८ टीप ३ री पहा.

२ प्रकृति ही तीन गुणात्मक आहे व प्रकृतीच्या पलीकडे परमात्मा आहे, तो निर्गुण आहे. वेद हे त्रिगुणात्मक उपाधींतील ह्मणजे सगुणब्रह्माचें वर्णन करितात. या करितांच श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलें कीं " त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ॥ हे अर्जुना, वेद त्रिगुणात्मक विषयांचें वर्णन करितो, परंतु तूं त्रिगुणरहित हो " भ० गी० अ० २ श्लो० ४५.

चालवूं वाटगा रे ॥ भग०॥ १ ॥ बलवान मी धनवान मी । कीं विद्वान टाकुनि गर्व फुगा रे ॥ भग० ॥ २ ॥ जन्मा आला कवण गेला । कवण मनाला चाळणवाला । आधीं याला उमगा रे, ॥ भग० ॥ ॥ ३ ॥ जैसे जळ गा रे, कनक नगा रे[1] । तैसा व्यापक एक अनेक जगा रे ॥ भग० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे वृत्ति विरागती[2] । तूर्या[3] रांगती । जेथ अनाहत[4] वाजति नित्य नगारे ॥ भग० ॥ ५ ॥

पद १७ वें.

भगवद्भजनीं हें मन लाव ॥ ध्रु० ॥ ममता मोहें जीव हा विकळे । शरीर जाइल केव्हां नकळे ॥ आपणासंगें न येती सकळें । ऐसें समजुनि त्वरित घे लाव[5] ॥ भग० ॥ १ ॥ सर्व घटीं हा आत्माराम । तेंचि आपुलें निजधाम ॥ केवळ तूं निष्काम होई । टाकुनि द्वेष दुभाव[6] ॥ भग० ॥ २ ॥ व्यापूनि चराचर । जंगम स्थावर ॥ स्वरूप अनावर । त्यावर करणें तलाव

---

१ अलंकारास.

२ वैराग्यानें युक्त होते.

३ चौथी अवस्था ज्ञानशक्ति ती (रांगती) ह्मणजे ह्म० शरीर गृहांत व्यवसाय करिते.

४ अनाहत नांवाचा ध्वनि, हे अनेक प्रकारचे, दुंदुभी, नगारे, मुरली घन इत्यादि सुस्वर नानाप्रकारचे नाद योग्यास समाधीच्या वेळीं ऐकूं येतात.

५ सिद्धि मिळविण्याचा प्रयत्न (कोणचेंही काम जलदीनें आटपून टाकावयाचें असलें ह्मणजे त्यास लाव असें ह्मणण्याचा कोंकणांत प्रघात आहे)

६ द्वैतदृष्टि, आपपरभाव.

७ शरिरांत असणारा जीव हंस तो (तलाव ह्मणजे मानससरोवर) अमृत सरोवराच्या काठीं क्रीडा करी असें कर. हें तात्पर्य.

॥ भग० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा कीरें बोल । बोले ते सकळ पोले । कांहीं अंतरीं असोंदे ओलीव ॥ भग० ॥ ४ ॥

पद ३८ वें.

हरि भगवान भजन करीं मना ॥ ध्रु० ॥ नश्वर देह हें जाणुनि सकळिक । विषयसुख मा वना । सांडीं तेथील धांवना । त्वरित लावीं आत्मस्वरुपीं भावना ॥ हरि० ॥ १ ॥ शब्दज्ञानेंचि करोनि साधुचा । वृंथा वालसी आव ना ? ॥ नाशुनि उगीच काव, नाँ । गुसांई अंतरि विषय कामना ॥ हरि० ॥ २ ॥ ज्ञानसंभवीं इंद्रियवृत्तिसी । भिऊं नको त्रिविध या जना ॥ चित्सुखवनीं विहार करोनी । करीं निवासस्थान निरंजना ॥

१ कीर ह्मणजे पोपट (राघू) त्याचे बोल जसे अंतर्ज्ञानाविना व्यर्थ होत. (शब्दें ब्रह्म कोण झाले । अन्न ह्मणतां कोण धाले । शिकविलें तैसें बोले । शुकपक्षी जैसा ॥ श्रीरंगनाथ.

२ फोल, व्यर्थ.

३ प्रेमाचा किंवा भक्तिरसाचा ओलावा.

४ नाशिवत नाश पावणारें.

५ स्वर्गादिकांमधील विषयांचें सुखसुद्धा नाशिवंत आहे. या प्रकारचें जें सुख ते (मा) ह्मणजे लक्ष्मी (माया) तिचें वन=अरण्य अर्थात् त्या अरण्यामध्यें हें विषयसुख हें मृगजल होय, यासाठीं तें पिण्याच्या आशेनें, उगीच धांवण्याचें सोडून दे. हा भाव [जियें मायेनें खेळाया घरकुलें केलें । तिया नांव अमरपुरी ठेविलें । इंद्रादिक बाहुलीं । नाचती जेथ ॥ १ ॥ ज्ञानेश्वर]

६ शब्दज्ञानें ह्मणजे वाक्पांडित्य करून साधुत्वाचा मिथ्या डौल मिरवितोस (आव ह्म० डौल+ना=नाहीं काय ?]

७ अंतःकरणांत विषयवासना जागृत असून वर वस्त्रांस काव (भगवा रंग) घालून गोसावी बनतोस ना=नाहीं काय ?

८ ज्ञान संपादन करण्याच्या कामीं सावध रहा. इंद्रियवृत्ति किंवा जन हें त्रिविध आहे त्याच्या बोलण्याची मुळींच पर्वा करूं नकोस.

॥ हरि० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा आयुष्य सरतें । कां ? ही किमपि फार्मे ना ? ॥ योगयाग गुरुदास्य भक्ति । या नवविध घे लावें ना ॥ हरि० ॥४॥

पद ३९ वें.

प्राण्या तूं भगवान हरी रे ॥ ध्रु० ॥ वैकुंठपती मुनि जपति अंतरीं । निरंतरीं हे ॥ विपत्ति नाशित श्रीपति । परम तापासि जन उद्धरिरे ॥ प्राण्या० ॥ १ ॥ दातार हा अवतार धरी । उतार करी भवसागरिं रे ॥ दैत्यमर्दन करी जनार्दन । गिरिगोवर्धनधारीरे ॥ प्राण्या० ॥ २ ॥ गरुडगामिनी मदनकामिनी । गोपी यामिनी वरीरे ॥ परम प्रीति अति रति करी । त्रैलोक्य ज्याचे उदरींरे ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे जंव देह हें असे तोंवारि । सार्थक कांही तरि करीं रे ॥ कमलनयन पहा तरि । चैन पडों क्षणभरि रे प्राण्या० ॥ ४ ॥

पद ४० वें.

लय हें लावीं भगवंतीं । हाचि तरणोपाय अंतीं ॥ ध्रु० ॥ ध्यान धारणा मुद्रा आसना परतुंनि पाहूं लाग । मार्ग जनांचा सोडुनी स्वइच्छें बैस एकांतीं ॥ लय० ॥ १ ॥ पवनमनासह एकवटुनी ब्रह्मरंध्रीं तूं जाई । नामरूप ज्या नाहीं त्या ठायीं सुख भोगिलें संतीं ॥ लय० २ ॥ ह्मणे सो-

---

१ शुद्धि, स्मरण.

२ नवविध भक्तींचा. (लाव=छंद, निदिध्यास.)

३ अनात्मबुद्धिशैथिल्यं फलं ध्यानाद्दिने दिने । पश्यन्नपि न चेद्ध्यायेत्कोऽन्योऽस्मात्पशुर्वद ॥ ५६ ॥ सार्थ पंचदशी, ध्यानापासून देहादिकांविषयींचा अभिमान दिवसेंदिवस क्षीण होतो. असें प्रत्यक्ष अनुभवास येत असून जो ध्यानाची उपेक्षा करितो त्याहून दुसरा पशू कोणता ? सांग बर !

४ खेचरी आदि करून पांच मुद्रा.

५ प्रत्याहार. पदसंग्रह भाग १ ला. पद १ पहिलें २ री टीप पहा.

हिरा आदिनाथ गुरु गुप्त निरंजन पायीं । हरिहर ब्रह्मा जेथुनि झाले । चित्सुखवनवसंतीं ॥ लय० ॥ ३ ॥

पद ४१ वें.

भगवन्ताचें नवल मोठें पाहीं । आपण असोनी कशाचमध्यें नाहीं । पंचभूतांशें कर्मे घडती देहीं । झाला मेला दिसे प्रपंचाचे ठायीं ॥ ध्रु० ॥ एक गातो कीं एक एका खातो । चिंता वाहतो कीं निश्चित एक राहतो । एक येतो कीं एक वाटे जातो । दोरावरि कीं सर्प भासला तो ॥ भग० ॥ १ ॥ बहु प्राणी कीं विसरले देवा । विरळा कोणी कीं अनन्य करिती सेवा ॥ एक सेविती केवळ विषयमेवा । दोन्ही न कळतीं त्या ब्रह्म स्वयंमेवा ॥ भग० ॥ २ ॥ अवघा संसार अभ्रींची सावुली । नामरूपें हीं विचित्राचि बाहुलीं ॥ यांना पिता नाहीं कीं माउली ॥ चाल आकाशीं परत पाउलीं ॥ भग० ॥ ३ ॥ दृष्टी न दिसे तें सदैव आहे । प्रत्यक्ष दिसे तें मिथ्या नासे तेथ ॥ याचा गेला समूळ ज्याचा हेत । सोहिरा ह्मणे येथ कारण आपला हेतें ॥ भग० ॥ ४ ॥

पद ४२ वें.

याचिसाठीं भगवंताला शरण प्राण्या यावें हो ॥ ध्रु० ॥ प्राप्त व्हावें ब्रह्मज्ञान । नित्य सुखसमाधान । लागावें कीं तेंचि ध्यान । आत्मानुसं-

---

१ आदिपुरुष निर्विकार शिव. [परमात्मा सर्वेश्वरू । जो सर्वज्ञ परात्परू । तोचि एक आदि गुरू । सकळां जीवांसी ॥ १ ॥ तयाचेनि प्रसादें । सनकादिक योगी वृंदें । तरले लीलाविनोदें । भवसागर ॥ २ ॥ ज्ञानविग्रही ईश्वरू । तोचि ब्रह्मविदूगुरू । तेथें करितां अन्यथा विचारू । असे महा दोष ॥ ३ ॥ विवेक सिंधु, मुकुंदराज]

२ अनेक जीव अनेक प्रकारचे व्यापार करितात व देहाभिमानामुळें सुखदुःखाची कल्पना करितात. परंतु हा सर्व भगवंताचा खेळ आहे. जीवभाव हा केवळ मायेमुळें उत्पन्न झालेला आहे. हा भ्रम भगवंताच्या स्वरूपाचें ज्ञान झाल्यानें दूर होतो, असा भावार्थ.

धान । चिंताशोकरहित । चित्त स्वस्थ असों द्यावें रे ॥ याचि० ॥ १
नभीं जातां न म्यावें । दृश्याभासासी न यावें । अंतरिक्ष रहावें । नवल हें पहावें । वर्तोनी कीं याचि देहीं । विदेही हें व्हावें हो ॥ याचि० ॥ २ ॥ धरावा कीं हाचि ध्यास । करावा हा योगाभ्यास । जिंकोनियां शून्यास । अंतरीं हा संन्यास । पूर्णबोध परमामृत सिद्धचि हें प्यावें हो ॥ याचि० ॥ ३ ॥ समबुद्धि जनवन । दिसावा कीं जनार्दन । होउनियां उन्मन । वर्षी हा आनंदघन । प्रपंचीं गुंतलें मन । निरंजनीं न्यावें हो ॥ याचि० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे याचि भावें । चैतन्य हें व्हावें ठावें । अनुभवाला यावें । जन्ममृत्या सुटोनि जावें । नरदेहीं सार्थक एवढें करोनियां घ्यावें हो ॥ याचि० ॥ ५ ॥

पद ४३ वें.

कृपाळू हा भगवंत निज भक्तजनांचा कैवारी ॥ ध्रु० ॥ जो कां भक्ति-बीजाचें क्षेत्र । प्राणी पुण्यश्लोक पवित्र । त्याला प्रसन्न हा चिन्मात्र । विश्वचित्राचा चितारी ॥ कृपाळू० ॥ १ ॥ ज्याची सत्ता नवही द्वारीं । हालवि मनपवनाची दोरी । ना तो पुरुष ना तो नारी । ऐसा गैबी सूत्र-

---

१ ब्रह्म रंध्रांत (पक्षी) हंसरूपानें महदाकाशांत प्रवेश करण्याविषयीं भिऊं नये.

२ मनाचा लय होऊन योग्यास प्राप्त होणारी जी पांचवी अवस्था (उन्मनी) अथवा भूमा स्थिति.

३ करण्याचें (भक्ति बीज उगवण्याचें) मुख्य साधन जे नरदेह, हेंच क्षेत्र [इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ॥ १ ॥ श्री भगवान् ह्मणाले । अरे कुंति-पुत्रा, या शरिराला क्षेत्र ह्मणजे शेत असें नांव आहे । भगवद्गीता, सु० चं० टी० अ० १३]

४ चिद्रूप निर्विकार चैतन्य आत्मा (सर्व शक्तिमान ईश्वर).

५ नवद्वारें=दोन कानांचीं दोन द्वारें, दोन नाकपुड्या, एक मुख, एक गुद, एक उपस्थ, डोळे दोन. एकूण नऊ.

६ मन आणि पवन ह्मणजे प्राणवायु.

७ गैबी (गुरु गोरखनाथ, गैबनाथ,) सूत्रात्मा.

धारी ॥ कृपाळू० ॥ २ ॥ जो जवळची परि दुरी । पाहतां जीवाचिया भीतरी । संकट समयीं स्वरुपें धरी । नाना नटनाटक अवतारी ॥ कृपाळू० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे देशवे द्वारीं । अनाहतें नौबतकी मतवारी । केवळ धरोनियां इतबारीं । राहिलों ज्याचिये दरबारीं ॥ कृपाळू० ॥ ४ ॥

पद ४४ वें.

सांपडला आजी देव भला मला । आनंद जाहला पूर्ण ॥ ध्रु० ॥ व्यक्ति ना वर्ण, तटस्थ कर्ण, वाहिलें अंतःकरण ॥ सांपडला० ॥ १ ॥ चहूं वाचा गूजें, स्वरूप सहज, अनादी बीजें ॥ सांपडला० ॥ २ ॥ जाहला हर्ष, त्वचेवीण स्पर्श, इंद्रियां नाहीं दर्श ॥ सांपडला० ॥ ३ ॥ मीपणा तुटी, पडली मिठी, आजि विरक्ति वाटली मोठी ॥ सांपडला० ॥ ४ ॥ न लाविता अग्न, देहें हें भग्न, सोहिरा ह्मणे झालों मग्न ॥ सांपडला० ॥ ५ ॥

---

१ ब्रह्मरंध्र (तालुस्थान).

२ अनाहत नामक ध्वनी ज्या ठिकाणी होतो तेथील अधिकारी.

३ इमानेंइतबारें विश्वासानें.

४ ब्रह्मानंदः–

५ ज्याला, व्यक्तिवाचक राम, कृष्ण, विठ्ठल, असें नांव नाहीं व वर्ण ह्मणजे (क, ख, ग घ, इत्यादि) अथवा (रंग) हीं नाहींत अर्थात् ॐ काररूप अक्षर ब्रह्म.

६ चार वाचा (परा, पश्यांति, मध्यमा वैखरी–)

७ गुह्य (एकांत).

८ पूर्वोक्त, ॐ हे (निजबीज).

९ दर्शन इंद्रियांच्या दृष्टिस पडत नाहीं.

१० अग्नि लावल्या वांचून देह भग्न केलें याचा अर्थ देह ह्मणजे असद्रूप द्वैत बुद्धि तिचा अंत अर्थात् " मी ब्रह्म आहे " असा पूर्ण अनुभव बिंबल्यामुळें " मी देह " ही बुद्धि नष्ट प्रायच झाली. भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें आहे कीं, हे या अद्वैत बुद्धीला ब्राह्मी स्थिति असें ह्मणतात. या स्थितींत अंतकाळीं ब्रह्म प्राप्ति होतें. अंतकाळ ह्मणजे सद्रूप अद्वैत ब्रह्म आणि असद्रूप द्वैत ह्या दोन्हीचे भ्रमें करून जें ऐक्य ज्ञान त्याचा जो अंतकाळ तो ह्मणजे द्वैत व अद्वैत या दोहोंमधील भेद बुद्धि होय.

पद ४५ वें.

मजवरि तूं कृपा करीं । हरि देवराया रे ॥ ध्रु० ॥ प्रपंच जडला कधींच न सुटे । यावरि सहसा मन हें न विटे ॥ मिथ्या पडली भ्रांति न तुटे । दुर्घट हा भवसिंधु तराया रे ॥ मज० ॥ १ ॥ जीव हा गुंतला पोट भराया । चित्त हें नलगे भक्ति कराया ॥ स्वल्प दीन उरले मराया । आयुष्य गेलें आलें सराया रे ॥ मज० ॥ २ ॥ जैसा माशीस प्रियकर गूळ। तैसें लागे स्त्रियेचें खूळ ॥ अंगीं मदनाचा हुळहुळ । हेंचि कारण तुज विसराया रे ॥ मज० ॥ ३ ॥ योगाभ्यासें त्रिकूटगडा या । पुरता मजला शिकवीं चढाया ॥ विक्षेपें न करीं फिरुनि पडाया । उपाधींतूनि उतराया रे ॥ मज० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा मार्गे वराया । हाचि निश्चय हृदयीं धराया ॥ परम प्रसाद देईं नरां या । सदैव तुजला स्मराया रे ॥ । मज० ॥ ५ ॥

पद ४६ वें, राग बिहाग.

ऐशी करिं बा दया । परतुनि मन हें न धरी या देहाची माया ॥ ध्रु० ॥ मी भेजला पाहुनी । स्थीर तेथें राहुनी । निरंजनीं विसावुनी । कल्पना हे जाय जळूनी ॥ आपेंआप लया ॥ ऐशी० ॥ १ ॥ पाहू जातां जंव आदीं ।

---

१ ॐकार गड ह्मणजे पर्वत. यालाच त्रिकूटगिरी, महामेरू अशा संज्ञा आहेत. यालाच कूटस्थ असेंही ह्मणतात.

२ अविद्येनें वेष्टिलेल्या कूटस्थावर, स्थूल आणि सूक्ष्म या दोन देहांनीं युक्त असा चिदाभास शिंपीवरील रुप्याप्रमाणें भ्रमानें दिसतो यालाच विक्षेप किंवा विक्षेपाध्यास असें ह्मणतात.

३ नारायणाचा परमप्रसाद व्हावयाला नराचीच योग्यता आली पाहिजे.

४ योगाभ्यासक्रमानें प्राप्त होणारी अंतर्मुख दृष्टि (दिव्य दृष्टि) ज्या दृष्टीनें " मी ब्रह्म आहें (अहंब्रह्मास्मि) " या महावाक्याचा बोध होतो.

५ अज्ञानादिकांचा ज्याला लेप नाहीं त्याला निरंजन ह्मणतात (माया रहित एकांत, परब्रह्म).

अंतीं लागला समाधी ॥ गेलियाची नाहीं शुद्धि ॥ जयाच्या ठाया ॥ ॥ ऐशी० ॥ २ ॥ कवणा ठाया कवण गेलें। कवणा कोण भेटलें। अवचटें चिं काय जाहलें ॥ उमजेना जया ॥ ऐशी० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निरामया। झालिच नाहीं हे काया । मिठी पडोनि तन्मया ॥ मीनला चिन्मया ॥ ऐशी० ॥ ४ ॥

पद ४७ वें.

मग्न हें होऊं दे मन त्या देवाचे स्मरणीं हो ॥ ध्रु० ॥ देहे बाहुलें देही दिसे सूत्रधारि न दिसे हो। नसेंचि ह्मणों तरि सर्व प्रकाश हा। ज्याची उमगेना अगम्य करणी हो ॥ मग्न० ॥ १ ॥ शेष स्वरूप हें वेष जयाचा। कांहीं नसे लेश जयाचा हो। ज्याणें वाहविली मस्तकीं धरणी हो ॥ मग्न० ॥ २ ॥ मर्यादेनें हा सागर नुलंघी। गिरिवर वर्षत व्योमीं हो। आज्ञेनें जलधर अंतरीक्ष चालत तरणीं हो ॥ मग्न० ॥ ३ ॥ अर्चन वंदन आत्मनिवेदन। योगाभ्यास कांहीं, गुरु हो। सेवा साधन आराधन शुद्ध

१ या चरणांत समाधींतील स्थितीच्या अनुभवज्ञानाचें दिग्दर्शन केलें आहे. [उजव्या नेत्रांत जो पुरुष आहे, त्याला परोक्षरूपानें इंद्र असें ह्मणतात. व डाव्या नेत्रामध्यें पुरुषरूपानें आहे ती त्याची पत्नी विराट (इंन्द्राणी) होय; त्यांचें एकत्र जमण्याचें स्थान ह्मटलें ह्मणजे हृदयांतील आकाश होय. त्यांचा संचार करण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे हृदयापासून वर गेलेली नाडी (सुषुम्ना) होय. "बृहदारण्यकोपनिषद अ० ४ ब्रा० २ पहा. "उमजेना जया" असें ह्मणण्याचें कारणः— समाधीच्या नित्य अनुभवानें, विदेहस्थिति पूर्ण बाणल्यानें तो पुरुष अव्यय, असंग, उपाधिविरहित असा (देहभावरहित) असतो.

२ मनुष्य देह हेंच एक बाहुलें क्षेत्र, आणि त्या शरिराला जाणणारा अर्थात् माझें ह्मणणारा जो क्षेत्रज्ञ तोच देही, हे पदार्थ दिसतात, पण सूत्रधारी ह्मणजे ज्ञानस्वरूप अंतर्यामी परमेश्वर दिसत नाहीं.

३ आकाशांत.

४ सूर्य.

५ अर्चनवंदनादि नवविधा भक्ति.

आचरणी हो ॥ मग्न० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे मुक्ति तूं पावसी । जेथ जासी तेथ पूज्यमान होसी । न पडसी जन्म मरणीं हो ॥ मग्न० ॥ ५ ॥

पद ४८ वें.

लय लागलें आत्मारामीं । जाहला आनंद अंतर्यामीं ॥ ध्रु० ॥ बेद्ध मारिला अहंकार हरामी । कर्म केलें कीं परिहारा मी । युक्त केलें कीं हैवि रामीं । श्वासोच्छ्वास प्यालों वारा मी ॥ लय० ॥ १ ॥ देहीं असोनी असें कीं न्यारा मी । कधीं न साहेंचि विकारा मी । कांहीं न घेंचि कल्पना घेरा मी । नाना योनींचा न फिरें फेरा मी ॥ लय० ॥ २ ॥ वासना हे न ठेवीं उदारा मी । लुब्ध होईना घरदारा मी । मनीं लक्षिला मोक्ष उदारा मी । शरण आलों दीनोद्धारा मी ॥ लय० ॥ ३ ॥ कधीं न लिंपे संसारकेरा मी । यमधर्मोच्या नाटोपें वैरा मी । गोष्टी सांगेन तीनतेरा मी । भगवानाचा होइन प्यारा मी ॥ लय० ॥ ४ ॥ विपरीत रीति इंद्रियग्रामीं । यांचा नायकेंच कांधें आग्रह मी । कधीं न जाय निंदानगरा मी । दशवे द्वारींच्या राहिलों अग्रा मी ॥ लय० ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे या यंत्रा मी । देखियला कीं भ्रामयंत्रा मी । विसरेना विवेकमंत्रा मी ॥ लय० ॥ ६ ॥

---

१ अन्य पाठ (बाघ मारिला असा आहे.)

---

१ बद्ध करणारा जो हरामी अहंकार,

२ हवि ह्मणजे यज्ञ. रामीं (आत्म्याच्या ठायीं).

३ न्यारा वेगळा.

४ कामक्रोधादि मनोविकार,

५ विश्वरूपी यंत्रास चालविणाऱ्या परमेश्वरास. अर्जुनास भगवंतांनीं हेंच सांगितलें आहे. "भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया" मायेच्या योगानें यंत्रारूढ भूतांना फिरविणारा) —भ. गी. १८।६१.

पद ४९ वें.

झालों समाधान आज जेथ मी ॥ ध्रु० ॥ विश्व चाळवितो हा । व्यापक गुप्त पहा ॥ झालों० ॥ १ ॥ सकळ मायेचें व्याप्त । यांत जो ॥ झालों० ॥ २ ॥ नाहीं मन जन । अलॅख निरंजन ॥ झालों० ॥ ३ ॥ नाहीं रूपरेख । गगनासारिखा देख ॥ झालों० ॥ ४ ॥ गगनें[1] ह्मणों तया । जाणीव जाय लया ॥ झालों० ॥ ५ ॥ अवधूत हा नंगा । ज्याची सत्ता जगा ॥ झालों० ॥ ६ ॥ किती झांकूं डोळे । प्रत्यक्ष देह चळे ॥ झालों० ॥ ७ ॥ देह पावेल नाश । सोहिरा ह्मणे अविनाश ॥ ८ ॥

पद ५० वें.

मोहिलें आजी मनचि तेणें हो ॥ ध्रु० ॥ कळोनि नकळतें । मीपण गळतें । विश्व चळतें हें ज्याणें हो ॥ मोहिलें ॥ १ ॥ नाहीं रूपरेख । गुप्त व्यापक देख । ऐसा कवण म्या नेणें हो ॥ मोहिलें ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे देह । गमलें निःसंदेह । जेसें वाटेचें पेणें[2] हो ॥ मोहिलें ॥ ३ ॥

पद ५१ वें.

दयाघनाचें रूप कीं हें । रूपावीण अरूप कीं हें ॥ ध्रु० ॥ भोजनांवीण[3] पोट भरतें । नादांवीण[4] कान निवती ॥ दया० ॥ १ ॥

---

१ श्रुतींचा तात्त्विक अर्थ समजण्यापूर्वी जें सद्रूप ब्रह्म भ्रांतीनें गगनादिकांच्या रूपानें भासतें, तेंच श्रुत्यर्थविचार झाल्यानंतर त्याचा गगनादिभाव जाऊन पूर्ववत् ब्रह्मच भासूं लागतें असें, 'जाणीव जाय लया' ह्मणण्याचा उद्देश.

२ प्रवासादिकांत वाटेंत केलेला मुक्काम, टप्पा.

३ व्रीह्यादिक अन्नाचें जें मनुष्यादिकांचें भोजन त्यावांचून ह्मणजे अर्थात् आत्म्यासाठीं निर्मिलेलीं अन्नें, मन, वाणी व प्राण, यांच्या भक्षणानें (योगशास्त्रोक्त रितीनें कुंडलिनी चालन केल्यानें) पोट भरतें.

४ वैश्वानर नांवाचा जो नादयुक्त प्राण प्राण्याच्या देहांत आहे त्याच्यावांचून [तें अक्षर ब्रह्म श्रोत्रयुक्त नव्हे, ते प्राणयुक्त नव्हे, तें कांहीं खात नाहीं, आणि कोणी त्याला खात नाहीं. ह्या अक्षराला जाणून हा लोक सोडून जातो तो ब्राह्मण होय.] बृहदारण्यकोपनिषद् अ० ३ ब्रा० ८ वें पहा.]

वाचो निमोनि निघती गोष्टि । रूपीवीण संतुष्ट दृष्टि ॥ दया० ॥ २ ॥
सत्ता देखोनि व्यापक गुप्त । अखंड आनंदीं मन हें तृप्त ॥ दया० ॥ ३ ॥
चैतन्यें प्याला पिऊं जाय । रसनेचा हा रसचि होय ॥ दया० ॥ ४ ॥
सोहिरा ह्मणे घटमठ पाहीं । आकाश त्यांत असोनि नाहीं ॥ दया० ५ ॥

पद ५२ वें.

म्यां केला धणी हो त्याला ॥ ध्रु० ॥ सहस्रदलकमळीं, अम्मल परमामृत पी त्याला । करोनियां न करी, शबलें विश्व भरोनि रित्याला ॥ म्या० ॥ १ ॥ ब्रह्मा विष्णु महेश ईश्वर, चहूंजणाच्या पित्याला । दुसरें नाहीं जयालागीं, भक्तकाज जपत्याला ॥ म्या० ॥ २ ॥ भासत दृश्य हें नासत जाय, अजरामर जो निर्गुणवनीं वसे त्याला ॥ म्या० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा तंतु पटीं तद्वत, सर्वघटीं जो प्रकट असोनी लपे त्याला ॥ म्या० ॥ ४ ॥

पद ५३ वें.

वासना हे विषयांची बुडविल आह्मां । यास्तव तुझें स्मरण करावें सदैव परब्रह्मा ॥ ध्रु० ॥ पदार्थ अवघे अनुकूळ झाल्या, गर्वा चढविल आह्मा । काळें करोनि प्रतिकुळ झाल्या, फुकट रडविल आह्मा ॥ वासना० ॥ १ ॥ कोठील कोण मी पाहूं जातां, मध्येंचि अडविल आह्मा । जन्ममरण या दुर्धट गभवासीं, अखंड पाडिल आह्मा ॥ वासना० ॥ २ ॥ मृगजलवत्

---

१ वैखरी वाचेचा लय होऊन सूक्ष्मवेदरूप अंतर्गत निघणारे साहजिक शब्द (सोहं; हंसः तत्सोहं इत्यादि ब्रह्मरंध्र चक्रांत होणारे शब्द).

२ प्रवणस्वरूपास पाहून (अर्थात् तें निराकार स्वरूप.)

३ ब्रह्मानंदात.

४ चैतन्य प्याला ह्मणजे आकृतिविशेष माया शुद्धसत्त्व.

५ योगशास्त्रोक्त सहस्रदल चक्र (मस्तकांतील तालुस्थानीं असणारें ब्रह्मरंध्र).

६ मायाविरचित जें संपूर्ण दृश्य विश्व त्यास शबल असें ह्मणतात.

७ ब्रह्मा (विश्व) हे तिघे आणि चाथा ईश्वर हे मायेमध्येंच प्रतिबिंबित झाले. यांचा पिता प्रणवस्वरूप निर्विकार शिव (परब्रह्म).

संसार यांतील, सुखदुःख घडविल आह्मा। घडिघडि तजवीज करितां चिंतेखालींच, सडविल आह्मा ॥ वासना० ॥ ३ ॥ दृष्टी पडल्या दृश्यभास हा, मोहचि जडविल आह्मां। देहीं असोंनी सर्व प्रकाशक, आत्मा दडविल आह्मां ॥ वासना० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा त्रिविधें तापीं, अखंड कढविल आह्मा। मोक्षपदाचा मार्ग निरोधुनि, आंताचि तुडविल आह्मां ॥ वासना० ॥ ५ ॥

पद ५४ वें.

लागलें प्रेम हो तयाचें। निर्गुण निरंजन निरामयाचें। विश्व हें लाघव ज्याचिये सत्तेचें। ध्रु० ॥ दिसे हा तितुका मायेचाचि खेळ। न दिसे तेंचि स्वरूप निर्मळ। आनंद सत्ता प्रकाश प्रबळ। केवळ जग बुद्‌बुदाचें जळ। लागलें० ॥ १ ॥ सुखाच्या आंगीं हारपल्या गोष्टी। पाहूं जातां पुंजाळली दृष्टि। मेघावीण होतसे हे वृष्टि। ज्याचिये पोटीं मावळली सृष्टि। लागलें० ॥ २ ॥ आकारा आलें दिसतें तें हें सामान्य। बोला आधीं आलें कीं हें मौन। अधोर्ध्व मावळलें शून्य। सर्वत्र एक व्यापक चैतन्य ॥ लागलें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे झालों म्या आराम। आंगाचि झालें जगदभ्र व्योम। इच्छेवीण झालों पूर्णकाम। अक्षय दयार्णव आत्माराम ॥ लागलें ॥ ४ ॥

पद[३] ५५ वें.

तूं हर हर शंभु सदाशिवा ॥ ध्रु० ॥ सर्व सोडुनी गर्व मोडुनि, तोडुनि टांकीं तूं भवा। जटाजूट पशुपति तव पुजनीं, परम प्रीति हे जडो जीवा ॥ तूं हर० ॥ १ ॥ सकळही सृष्टिकल्याणकर्ता, आनंदरूप तूं देवा। रुद्रा

---

१ ९ व्या पानावरील टीप २ पहा. (पान १४).

२ पद १९ वें पान २३ टीप २ पहा.

३ यापदापासून पुढें "शिवा" वरचींच पदें अनुक्रमानें दिलीं आहेत.

तूं वीरभद्रा प्रकटुनि हृदयीं, लावीं ज्ञानाचा दिवा ॥ तूं हर० ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा नवद्वारें, तुह्मीं परमामृत हें पिवा । शर्वा तूं बिनपर्वी करुनि दे आनंद नित्य नवा नवा ॥ तूं हर० ॥ ३ ॥

पद ५६ वें.

शिव शंभु शंकर स्वामी । निजभावें पूजावा तुह्मीं ॥ ध्रु० ॥ विभूति-लेपन अवघे शरिरीं । व्याघ्रांबर गजचर्म धरी । वामांगीं ते गिरिजा नारी । कबरीभार जटाधारी ॥ शिव० ॥ १ ॥ पंचमूख त्रिलोचन भोळा । कंठीं धरिलें हळाहळा । वरी रुळती रुंडमाळा । आज्ञा समर्थ कळिकाळा ॥ शिव० ॥ २ ॥ आरुढोनि वृषभवाहनीं । ज्याला प्रियकर शंखध्वनि । डमरू त्रिशूळ पिनाकपाणी । स्मशानवासी निर्वाणी ॥ शिव० ॥ ३ ॥ विराजित भूषणीं अजगर । शशिशेखर गंगाधर । ज्याची पूजा करिती अमर । ऐसा अवधूत दिगंबर ॥ शिव० ॥ ४ ॥ रिद्धिसिद्धि ज्याच्या दासी । स्मरतां सकळ पातक नाशी । सोहिरा ह्मणे निज भक्तांसी । उदार कैलासवासी ॥ शिव० ॥ ५ ॥

पद ५७ वें.

हरा रे दर्शन तूं देई मज गिरिजावरा रे ॥ ध्रु० ॥ त्रिलोचना भव-मोचना आकुंचन करीं मन उन्मन चिद्घन अणुरेणु व्यापक अमरा ॥ हरा० ॥ १ ॥ कपर्दीश ईश स्मशानवासी भस्मधारण त्रिशूलडमरूपिनाकपाणी व्याघ्रांबरधर शिवशंकरा ॥ हरा० ॥ २ ॥ वृषभवाहना भुजंगभूषणा पंचानन नीलग्रीव शंभो शशिशेखर गंगाधर दिगंबरा ॥ हरारे० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा कल्पवृक्ष चिंतामणि सिद्धि आज्ञांकित तुज सकळिक साधन पूर्णकाम अभिवृद्धि अभयकरा रे ॥ हरारे० ॥ ४ ॥

पद ५८ वें.

हृदयीं हा शुंभू ध्यातां आनंद वाटला ॥ ध्रु० ॥ कैलासभुवनिंचा राणा । वेदशास्त्रीं प्रसिद्ध जाणा । ज्याचा अवधुति बाणा । पात्रोनी निर्वाणा भवसिंधु आटला ॥ हृदयीं० ॥ १ ॥ प्रसन्न झाला व्योमकेश । इच्छिलें पावलों यश । उरला ना भ्रांतीचा लेश । वेशधारी लीलाविग्रही अंतरीं दाटला ॥ हृदयीं० ॥ २ ॥ शांतीशीं हें लाउनि लग्न । मन हें होउनि गेलें मग्न । वैराग्य पेटला अग्न । संलग्न सकळा नोहे कवणाचा हा वाटला ॥ हृदयीं० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे समाधी लागे । निद्रेमाजी असणें जागें । कल्पना हे न लागे मागें । केंव्हां नेणों काय इंद्रियग्राम राहाटला ॥ हृदयीं० ॥ ४ ॥

पद ५९ वें. (कटावाच्या चालीवर.)

शिवसांब चरणीं मन लावीं स्मरणाला ॥ ध्रु० ॥ या नैसर्गा इंद्रियवर्गाच्या उपसर्गा नासुनि स्वर्गा न्हे अपवर्गा देतो भर्गा । विनवीं तूं दुर्गारमणाला ॥ शिव० ॥ १ ॥ देवकामिनी गगनगामिनी सौदामिनि सौंदर्य—सुरत सुगंधें तरुवर गीत नृत्य गंधर्व सुस्वरें संगीत गायन छंद बंध प्रबंध वादन नारद तुंबर तांडवलीला हावभाव कडविकड दाविती अमर वानिती सदानंद कैलासभुवनीं काळक्रमगाला ॥ शिव० ॥ २ ॥ शुभ्र सुमन सुगंधलेपन शुभ्र अक्षता कोमल त्रिदल बिल्वपत्र त्रिनेत्र त्रिगुणी त्रियायुधी कीं त्रिजन्माचें पाप संहरे धूप दीप नैवेद्य निरंजन प्रदक्षिणा प्रीतीं प्रणाम करितो न पडे भ्रमणाला ॥ शिव० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा रुंडमाला कंठीं हारी जटाजूटमुकुट मदनारी नारीनरसंसारीं लीला सारीवत् जय हारी नाना चित्रविचित्रविहारी दशमद्वारीं स्वारी पवनारूढ अस्वारी[1] अष्टौपारीं बारीधर करभारी हे सरदारी वहमा मारी परोपकारी भज तूं न पडसी जन्ममरणाला ॥ शिव० ॥ ४ ॥

---

[1] स्वारी.

पद ६० वें.

या रे शिवशंभूचें भजन कराया । भवसिंधु तराया ॥ ध्रु० ॥ होईल सार्थक या जन्माचें, आजन्माचें । येणें मोचन या कर्माचें, स्वधर्माचें । मूळ बीज हें निजवर्माचें । विवेक सुमति सुनिश्चय चित्तिं धराया ॥ या रे० ॥ १ ॥ माया मृगजलवत् कां जाण । यांत भ्रमतो तो मूर्ख तूं जाण अजाण । याला भोगुनि त्यागी तो साधु सुजाण । शुद्धभावें स्मर रे गौरिहरा या ॥ ॥ या रे० ॥ २ ॥ ईशानेश हा स्मशानवासी । सकळ भूतावळी आहे त्या पाशीं । राज्य सोडुनियां निघाला तापसी । राम जपतो कीं त्रिविधताप हराया ॥ यारे० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हा विश्वाभ्र अंबर । ज्याला गाती हे नारद तुंबर । दशदिशांचें पांघुरला अंबर । जटाधारि हा अवधूत दिगंबरा या । शिवशंभूचें भजन कराया ॥ या रे० ॥ ४ ॥

पद ६१ वें.

स्मर पार्वतिच्या वराला रे ॥ ध्रु० ॥ श्रवण मनन निदिध्यास नयनीं जनीं वनिं पाहुनि विसरीं तूं आपपराला रे ॥ स्मर० ॥ १ ॥ जटामुकुट नीलकंठ त्रिलोचन पंचानन मुनिजनमनमोहन वृषभारूढ हराला रे ॥ स्मर० ॥ २ ॥ खपरु डमरुधर पिनाकपाणी दक्षयज्ञमथन मदनारी देतो परम अभयप्रद वरदकराला रे ॥ स्मर० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा अर्चन वंदन आत्मनिवेदन नवविध भजन सकळहि संपात्ति चालुनि येति घराला रे ॥ स्मर० ॥ ४ ॥

पद ६२ वें.

शिव हर शंकर मदनारी । देह हें अर्पण तुज केलें ॥ ध्रु० ॥ तव भजन पूजन ध्यानीं मन हें । तन्मय होऊन ठेलें ॥ शिव० ॥ १ ॥ चित्त हें गिरिवरवधुवल्लभा । स्वरूप पहाया भुकेलें ॥ शिव० ॥ २ ॥ जय विश्वेश्वर भगवान् स्मरतां । विषयस्मरण गेलें ॥ शिव० ॥ ३ ॥ जीवन्मुक्त करुनि

भक्तांसी । त्वां कैलास भुवनीं नेलें ॥ शिव० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे तरि होऊं सके । बहुत जन्मि पुण्य केलें ॥ शिव० ॥ ५ ॥

पद ६३ वें.

जय जय शंभु सदाशिव शंकर पशुपति गिरिजावरा रे ॥ ध्रु० ॥ नमन करुनि सद्भावें तुज मन अर्पण विश्वंभरा रे ॥ अनाथनाथ नमो दीनबंधु वांच्छित दे ईश्वरा रे ॥ जय० ॥ १ ॥ त्रिभुवनपति तूं सकलही संपत्ति लंकापतीसि देसी वरा रे ॥ मुनिजनमोहन मानसहंसा ये मम हृत्सरोवरा रे ॥ जय० ॥ २ ॥ प्रसन्नता तव स्वप्रभ उदीत (?) उदय विवेकदिनकरा रे ॥ प्रकाश पडतां आकाश भरि मति । विकास इंदूवेरा[1] रे ॥ जय० ॥३॥ ह्मणे सोहिरा भक्तिज्ञान- । वैराग्य सहपरिवारा रे ॥ पराप्रेम प्रमदासुख सैंवर । ब्रह्मरंध्रगिरिवरा रे ॥ जय० ॥ ४ ॥

पद ६४ वें. (राग भैरव)

शिव स्मर हर हर गिरिजावर ध्यानीं । भजनपूजनीं कल्याणकर्ता दाता हा वरदानी ॥ ध्रु० ॥ विभूतिविराजित पिशाचसहचर वास स्मशानीं । पंचवदन त्रिलोचन भूषितनागकुंडलें कानीं ॥ शिव० ॥ १ ॥ गजचर्मवसन व्याघ्रांबरधर वरआसनीं । कैलासभुवनींचा नृपवर कीं तपोनाथ हा योगज्ञानी ॥ शिव० ॥ २ ॥ द्वापारयुगीं कीं किरातरूपें महाकाननस्थानीं । पार्थाप्रति हा झुंजत घेउनि तर्कस आणि कमानी ॥ शिव० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा सकळ सृष्टीचा प्रळय करीत निदानी । भक्तकाजकल्पद्रुम शंभु स्वात्मसुख दरम्यानी (?) ॥ शिव० ॥ ४ ॥

पद ६५ वें.

दिगंबरा जोगी जटाधरा शिवशंकरा तुजला नमो ॥ ध्रु० ॥ पंचमुख सुखशान्तस्वरूप तूं मदनदहन वनवास । गौरवर्ण वपु सुगंधहर जय जय जगन्निवास ॥ दिगंबरा० ॥ १ ॥ सुरवर गाती ध्याती तुजप्रति आनंद

---

१ अ. पा. इंदीवरा.

बारा मास । सत्यलोक वैकुंठभुवनांवरि स्थान तुझें कैलास ॥ दिगंबरा० ॥ २ ॥ देह हें साजवी मनचि माजवी काळ वाजवी तास । प्रपंच करितां श्रमाचि शेवट कांहिंच नलगे हातास ॥ दिगंबरा ॥ ३ ॥ बंधन सोडवीं वंदन करितो सद्भावें सोहिरा दास । शमदमीं कोंडी इंद्रियें सोडीं तोडीं हा मायापाश ॥ दिगंबरा० ॥ ४ ॥

पद ६६ वें.

सार्थक जन्माचें कर । भावें स्मर हरिहर । रमापति गिरिजावर । जनीं जनार्दन हा विश्वंभर ॥ ध्रु० ॥ आत्माराम पाहीं सखा । ज्याला नाहीं रूपरेखा । अनेका घटीं या एका । सर्वभूतीं ईश्वर । सार्थक० ॥ १ ॥ शान्तिसुख नित्य वर । निजबोध निरंतर । निर्वाळुनी हें अंतर । अनाहत नित्य वाजे वाजंतर ॥ सार्थक० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे हा अमर । अर्ध-

---

१ या पदांत हरि आणि हर यांचें ऐक्य दर्शविलें आहे. पंतांनीं केकावलींत ह्मटलें आहे. [तुह्मां हरिहरांत ज्या दिसतसे दिसो वास्तव । प्रबुद्ध ह्मणती नसे तिळही भेद मी यास्तव । ह्मणें मनिं यथार्थ जें स्वमत वर्णिती शैव तें । न वैष्णव दुराग्रही परम मुख्य हीं दैवतें ॥ ७१ ॥] हरिहरांच्या अभिन्नत्वाबद्दल पुढील उतारे पहा—अनादिनिधने देवे हरिशंकरसंज्ञिते । संसारसागरे मग्ना भेदं कुर्वंति पापिनः [बृहन्नारदीय] ' उभयोरेका प्रकृतिः प्रत्ययभेदाच्च भिन्नवद्भाति । कलयति कश्चिन्मूढो हरिहरभेदं विनाशास्त्रम् ॥ १ ॥ तुकोबा ह्मणतात [हरिहरांभेद । नाहीं करूं नये वाद ॥ १ ॥ एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेचे ठायीं ॥ २ ॥ भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ॥ ३ ॥ उजवें वामभाग । तुका ह्मणे एकचि अंग ॥४॥] [जान्हवी मूर्ध्नि पादे वा कालः कंठे वपुष्यथ । कामारिं कामतातं वा कंचिद्देवं भजाम्यहं ॥ ज्याच्या मस्तकावर किंवा पायांपाशीं गंगा आहे, ज्याचा कंठ किंवा सर्व शरीर काळें आहे, जो कामशत्रु किंवा कामपिता आहे, अशा देवाला (शंकराला किंवा विष्णूला मी भजतों)—सुभाषित.]

नारीनटेश्वर । भक्तिभावाला तत्पर । पूर्णब्रह्म ध्याई हा परात्पर ॥ सार्थक० ॥ ३ ॥

पद ६७ वें. राग कानडा.

वंदीं तूं शिवशंकरा गिरिजावरा करुणाकरा । अंत नलगे अनंतरूप हें संत स्मरती जगदीश्वरा ॥ ध्रु० ॥ त्रिशूलडमरूधरा गजचर्मासह व्याघ्रांबरा ॥ वंदीं ॥ १ ॥ पंचवदनवपु विभूतिलेपन शिरीं भूषित शशिधरा । जटाजूट करि भुजंगभूषण त्रिभुवनपति हरिहरा ॥ वंदी० ॥ २ ॥ भवमोचना हे त्रिलोचना भज भक्तकाजतत्परा । प्राणियां तूं उगाणा करिसी कुतमतत्परां ॥ वंदीं० ॥ ३ ॥ सार हा संसार हा परापार पाव तूं नरा । अज्ञान नासुनि ज्ञान प्रकाशुनि ध्यान लावीं विश्वंभरा ॥ वंदीं० ॥ ४ ॥ पिंडींचा कीं ब्रह्मांडींचा तो हा द्विधा अहं परिहरा । सोहिरा ह्मणे तो हिरा जो कां अनुसरला मनोहरा ॥ वंदीं० ॥ ५ ॥

---

१ वास्तविक ज्या स्वरूपाचा अंत लागत नाहीं तें स्वरूप अनंत होय. हें स्वरूप अर्जुनानें विश्वरूपदर्शनप्रसंगीं पाहिलें तेव्हां ह्मटलें–["अनादिमध्यांतमनंतवीर्य–मनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् । पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं, स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् ॥ १९ ॥ तुला आदि नाहीं, मध्य नाहीं, अंत नाहीं, तूं अनंत हस्त, चंद्रसूर्य हे तुझे नेत्र, तुझ्या मुखामध्यें अग्नि भडकत आहे, ह्या सर्व विश्वाला तूं आपल्या तेजानें तापवीत आहेस, असा तूं मला दिसतोस. ॥ भ० द्वी० सु० च० टी० अ० ११]

२ दुष्ट तमामध्यें (अज्ञानांधकारामध्यें) जे उद्युक्त झाले, त्यांच्या पापाचा स्वानुभव ज्ञानानें उगाणा ह्म० झाडा करितोस असा भाव.

३ धनादि विषयांचा उपभोग घेऊं लागलें असतां तृप्ति न होतां त्यांच्या अभावीं दुःख आहे असें जाणून तीं नकोत अशी समजूत झाल्यानें जें समाधान होतें. ती "क्षयाची तुष्टि" तिला 'परापार' असें नांव आहे.

पद ६८ वें.

तो हा पंढेरिचा राणो । व्यापक अणुरेणुप्रमाण जाणा ॥ ध्रु० ॥ दृष्टीं दिसतो सुजाणा । ज्यानें न्हेलें मीतूंपणा ॥ २ ॥ तो हा त्रिभुवनचाळक । स्वामी विश्वाचा पाळक ॥ तो हा० ॥ ३ ॥ अनाथदीनबंधु । जो कां सुखरूप कृपासिंधु ॥ तो हा० ॥ ४ ॥ ज्याची अनाहत नौबद वाजे । राजो गैबीचा विराजे ॥ तो हा० ॥ ५ ॥ भेदुनियां नादबिंद । योगियां लावितो समाधे । ॥ तो हा० ॥ ६ ॥ जो निर्गुण निरामय । भक्तां करितो आनंदमय ॥ तो हा ॥ ७ ॥ ज्ञानगंगाचंद्रभागा । आहे तटाकीं उभा ॥ तो हा० ॥ ८ ॥

---

१ पंढरी ह्मणजे अकरा द्वारांचें नगर (शरीर) होय. मस्तकांतील सात द्वारें, एक बेंबी, दोन त्याच्या खालचीं, आणि एक मस्तकाच्या अगदा वरल्या भागाचें, जेथून आत्मा ब्रह्मस्थानीं प्राण नेल्यावर निघून जातो अशी एकंदर अकरा होत. कठोपनिषद् अ० २ व० ५ म० १ यांत ह्मटलें आहे [हें अकरा द्वारांचें नगर (शरीर) अजाचें ज्याला जन्म नाहीं अशा ब्रह्माचें आहे.] अन्य ठिकाणीं देह नवद्वारयुक्त असें ह्मटलें आहे श्वेताश्वेतरोपनिषद अ० ३ मं १८ भगवद्गीता अ० ५ श्लो० ५ व १३ पहा.

२ राणा—देह (पंढरी) नगरावर अम्मल चालविणारा प्रभु.

३ तो आत्मा सूक्ष्माहूनही सूक्ष्म आहे. 'श्वेताश्वतरोपनिषद् अ० मंत्र २० यांत ह्मटलें आहे [अणोरणीयान् महतो महीयान् । आत्मागुहायां निहितोऽस्य जंतोः] सूक्ष्माहून सूक्ष्म आणि मोठ्याहून ज्यास्त मोठा असा हा आत्मा प्राण्याच्या हृदयरूप गुहेमध्यें गुप्त असतो.

४ हृदयस्थानाच्या अनाहतचक्रामध्यें होणारे नाद हीच ज्याची नोबत (वाद्य-गजर, भेरी) आहे.

५ दुसरें नाभिस्थानाच्या मणिपुर चक्रांतील देवता महाविष्णु (पक्षीं गैबी=सोहिरोबांचे गुरु गोरखनाथ) ह्मणजे प्रत्यगात्मा आणि राजा ह्या शब्दानें परमात्मा या उभयतांचे ऐक्य दर्शविलें आहे.

६ समाधि

८ ज्ञानगंगा ह्मणजे पूर्वोक्त मणिपुरचक्रांतील देवता श्रीविष्णु व शक्ति "ज्ञानशक्ति" होय. "चंद्रभागाः—पंढरपुराजवळच्या भीमा नदीला चंद्रभागा असें

निश्चयें पुंडरीक जेथें । देखोनी जवळीच आहे तेंथे ॥ तो हा० ॥ ९ ॥

ह्मणतात. तिला तसें ह्मणण्याचें कारण असें आहे कीं:—इंद्रानें अहल्येशीं कपट-वेश धारण करून जारकर्म केलें. त्या कामीं चंद्रानें इंद्रास साहाय्य केलें ह्मणून गौतमानें क्रोधानें 'तुला कुष्ट होईल' असा चंद्राला शाप दिला—तेव्हां चंद्र गौत-माला शरण आला. नंतर मुनीनें 'भीमरथींत (भीमा नदींत) स्नान कर ह्मणजे तुझें कोड जाईल' असा उश्शाप दिला. चंद्रानें त्याप्रमाणें केलें तेव्हां तो पूर्वी-सारखा झाला. चंद्राच्या भागाप्रमाणें (कोरीप्रमाणें) जेथें भीमरथीचा प्रवाह वक्र जाहलेला आहे, तेथें तिला चंद्रभागा असें अन्वर्थक नांव पडलें—अशी कथा पुरा-णांतरीं आहे.

१ पुंडरीक हा बलरामाचा अवतार असें समजतात. हा एक देशस्थ ब्राह्मण होता. याच्या बापाचें नांव जानुदेव आणि मातेचें नांव सत्यवती. हा आपल्या पत्नीसह विषयसुख भोगून मातापितरांस छळीत असे. तीं काशियात्रेस जावयास निघालीं, तेव्हां हाही स्वपत्नीसह त्यांचेबरोबर निघाला. काशीस आल्यावर हीं सर्व मनुष्यें कुक्कुट स्वामी नामक महातापसाच्या आश्रमासमीप उतरलीं होतीं. तेथें रात्रौ पुंडरिकास गंगा, यमुना, सरस्वति या तीर्थदेवतांचा साक्षात्कार झाला. कुकुट स्वामी हे साक्षात् मातृपितृनिवारत श्रावणाचे अवतार होत. याची गोष्ट त्या देव-तांनीं पुंडरिकास सांगून त्याचे डोळे उघडिले व त्याला शुद्धीवर आणलें. तेव्हां त्याला लागलाच पश्चाताप होऊन उपरति झाली आणि तो मातापितरांच्या आज्ञेंत राहून त्याच्या एकनिष्ठ सेवेंत सुख मानून राहूं लागला; नंतर तो काशीहून परत आला, आणि भीमातटीं गरसळें नामक गावीं कायवाचामनेंकरून त्यांची सेवा करीत राहिला. पुढे याला नारदाचें दर्शन झालें. 'भगवान् श्रीकृष्ण येतील तोंपर्यंत तूं असाच राहून त्या देवाचे नांव "श्री विठ्ठल" असें सुप्रसिद्ध कर याप्रमाणें त्याला सांगून नारद निघून गेले. पुढें रुक्मिणी रुसून आली होती, तिची समजूत करण्यासाठीं श्रीकृष्णदेव तेथें आले. तिची समजूत घालून तिच्यासह दिंडीरवनांत पुंडरिकाची झोंपडी होती तेथें देव येऊन उभे राहिले—पुंडरिकानें केलेली मातापित-रांची सेवा पाहून देवांनीं प्रसन्न होऊन त्याला जीवन्मुक्त केलें; व जे कोणी चंद्र-भागेंत स्नान करून श्रीविठ्ठलनामाचा जप करून देवदर्शन घेतील ते संसारपाश-मुक्त होतील, असा वर ही दिला. प्रत्येक दिवशीं पुंडरिकास भेटण्यासाठीं सर्व तीर्थें येतात अशी भक्तजनांची समजूत आहे. पुंडरिकाचें सविस्तर चरित्र 'भक्तिलीला-मृत' नामक ग्रंथांत दिलेलें आहे.

२ जेथें निश्चय हाच पुंडरीक तेथें जवळच रुक्मिणीरमण आहे. याचा भावार्थ एवढाच कीं ही सर्व ध्यानाच्या एकाग्रतेची सिद्धि दर्शविली आहे. पातंजल-

निराकार निर्विकार । जेथुनि उमटला ॐकार । तो हा० ॥ १० ॥ जो आरंभ रंभस्तंभ । सोहिरा ह्मणे निरालंब ॥ तो हा० ॥ ११ ॥

पद ६९ वें.

विठ्ठल रुक्मिणीरमण । चुकवीं अनेक भ्रमण ॥ ध्रु० ॥ जीवा नुरवी जीवपण । समूळ न्हेतो मीतूंपण ॥ विठ्ठल० ॥ १ ॥ त्याचे लक्षुनि चरण । अनन्य यावें कीं शरण ॥ विठ्ठल० ॥ २ ॥ त्याचें घेतांचि दर्शन । करितों मन हें समाधान ॥ विठ्ठल० ॥ ३ ॥ कूर्मदृष्टी निरीक्षण । करितो भक्तांचें

योगसूत्र पाद ३ यांत ह्मटलें आहे [तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्] याचा अर्थ असा कीं " नाभीचक्र, हृदयपुंडरीक, नासिकाग्र, इत्यादि स्थळीं चित्तवृत्तीची जी एकाग्रता होते त्या स्थितीला ध्यान असें ह्मणावयाचें–ध्यानापासून ज्या शक्ति प्राप्त होतात त्यांचें वर्णन गोरखनाथांच्या ग्रंथांत फार केलेलें आहे. ह्मणून जेथें ध्यानाची एकाग्रता झाली तेथें अणुरेणुप्रमाण पंढरिचा राणा उभा आहे.

१ प्रणव (ॐकार) विराट पुरुषाच्या हृदयाकाशापासून झाला असें भागवत तृतीय स्कंध अ० १२ यांत सांगितलें आहे. [आन्वीक्षिकी त्रयी वार्ता दंडनीति स्तथैवच । एवं व्याहृतयश्चासन्प्रणवो ह्यस्य दन्हतः ॥ ४४ ॥ आन्वीक्षिकी (मोक्षप्राप्ति करून देणारी विद्या) त्रयी (स्वर्गादि फल देणारी कर्म विद्या) वार्ता (निर्वाहाचें साधन शेतकी व्यापार वगैरे), आणि दंडनीति (द्रव्याची प्राप्ती करून देणारी राजनीति) ह्या चार वार्ता व भूः, भुवः, स्वः आणि भूर्भुवःस्वः ह्या चार ज्या व्याहृति, ब्रह्मदेवाच्या पूर्वादि मुखापासून अनुक्रमें उत्पन्न झाल्या आणि प्रणव त्याच्या हृदयाकाशापासून झाला.

२ विठ्ठल शब्दाचा अर्थ. पद्यसंग्रह भाग २ येथें प्रारंभींच केला आहे.

३ तो आत्मा द्रष्टा केवळ ज्ञानस्वरूप आहे. कूर्म ह्मणजे कांसव जसा सर्व इंद्रियें आंतले आंत ओढून घेऊन बाह्य निरीक्षण करितो तद्वत् याचें पाहणें आहे [द्रष्टा दृशिमात्रः शुद्धोऽपि प्रत्ययानुपश्यः ॥ २० ॥ [पातंजल योग सू० साधनपादः १] द्रष्टा आत्मा हा केवळ ज्ञानस्वरूप आहे, ह्मणजे अग्नीचें ज्ञान ऊष्ण स्पर्शानें जरि कदाचित् न झालें तथापि चक्षुरिंद्रियानें त्याचें ग्रहण होतें; तसें आत्म्याचें ग्रहण इतर साधनानें होत नाहीं; तर तो केवळ ज्ञानानेंच ग्राह्य आहे. ह्मणून त्याचें ज्ञान हेंच स्वरूप आहे.] दुसरें [कूर्मनाड्यांस्थैर्यम् ॥ ३१ ॥ पात० यो० विभूतिपादः ३

रक्षण ॥ विठ्ठल० ॥ ४ ॥ जो कां योग्यांचा एकांत । तोहा लक्ष्मीचा कांत

सू० ३१ जिभेच्या खालच्या भागीं जी एक शीर आहे तिच्या खालीं गळ्यांत एक कूप ह्मणजे खळगा आहे त्याला कंठकूप ह्मणतात. त्याच्या खालच्या बाजूला हृदयाच्या ठिकाणीं एक कांसवाच्या आकाराची नाडी आहे, तेथें संयम केल्यानें ह्मणजे संयमानें चित्त तिच्यामध्यें प्रवेश करील तर त्याला व शरिराला स्थीरता प्राप्त होईल.] " प्रतिभाद्वासर्वम् ॥ [पा. यो० सू० ३३] " कांहीं कारणावांचून केवळ मनापासून जें ज्ञान उत्पन्न होणारें व ज्यांत कांहीं असंगतपणा नसतो, त्यास प्रतिभा ह्मणतात, त्या ठिकाणीं चित्ताचा संयम केला असतां जशी सूर्योदय होण्यापूर्वीं प्रथम सूर्याची प्रभा प्रकट होते, व त्या योगानें 'आतां सूर्योदय होणार असा पूर्ण निश्चय होतो; तसें विवेकख्याति आतां पुढें निश्चयानें होणार अशाचें सूचक असें सर्व पदार्थांविषयींचें ज्ञान उत्पन्न होतें. त्याला प्रतिभेनें ह्मणजे केवळ अंतःस्फुरणानें झालेलें ह्मणन प्रातिभज्ञान ह्मणतात. तें ज्ञान झालें असतां मग दुसऱ्या चित्तसंयमाची गरज न लागतां केवळ त्या प्रतिभा ज्ञानानेंच योगी सर्व जाणतो " याच उद्देशान भगवंतांनीं गीता अ० २ यांत ह्मटलें आहे [यदा संहरते चायं कूर्मोंगानीव सर्वशः। इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५८॥ जसा कांसव आपले सर्व अवयव सहज आंत ओढून घेतो, तशीं ज्यानें आपलीं सर्व इंद्रियें विषयांपासून आवरून धरलीं, त्याची बुद्धि स्थिर झाली ॥ "सु० च० टी०"] "कूर्मदृष्टीची प्रभा अमृतमय असल्यामुळें गर्भाशयांत अपत्यें (बाळकें) तृप्त असतात " असें अमलानंद योगी यांनीं शतश्लोकीमध्यें ह्मटलें आहे. दुसरें असेंहीं मानलें आहे कीं:—कांसवीला आंचळ वगैरे नसतात, ती आपल्या पिलांचे पोषण प्रीतिपुरःसर केवळ प्रेक्षणानें करिते, त्या विषयीं एका कवीनें ह्मटलें आहे;—कांसवाची पिली। कूर्म दृष्टीनें सांभाळी., त्या प्रमाणें ॐकार (चैतन्यबिंदु) पक्षीं (कूर्म) ब्रह्मरंध्रामधून अमृतमय चंद्रप्रभा स्फुरवितो, त्यामुळें योग्यांचें रक्षण होतें असें अमलानंद योगी ह्मणतात. [कुर्मीची दृष्टि भा अमृतमय ह्मणुनी तृप्त होती अपत्यें । सर्वींशीं तेविं बिंदु विकसुनि रविभा स्वादु दीजे सुधा ते ॥ विश्वाचें बीज सर्वात्मक ह्मणवुनि उत्कृष्ट ॐकार बिंदू। ऊर्ध्वीं चंद्रप्रभा अमृतमय प्रसवे तेविं हा चित्सुखेंदू ॥ २० ॥ अब्धित्वें बिंदु द्रवुनि सुखदुःखा विकसितो। तदूर्ध्वीं सप्रेमात्मक पसरवी भक्तिरस तो ॥ अनाद्यंता ते तैं ध्वनिमय प्रभा जो स्फुरवितो। महाबिंदु ऐसा अनुभविती निर्लक्ष्यमय तो ॥२१॥]

१ पातंजल योगशास्त्राचा अभिप्राय या पुस्तकांत कूर्मनाडीसंयमाचें फल सांगितलें आहे त्याबद्दल वर (सूत्र ३१) सांगितलें आहेच. त्या पुढें सूत्र ३२ मध्यें

॥ विठ्ठल० ॥ ५ ॥ जगबुद्बुदाचें जळ । सोहिरा ह्मणे हा गोपाळ ॥ विठ्ठल० ॥ ६ ॥

पद ७० वें. (कटाव)

भ्रम विस्मय गेला । देवें उद्धार हा केला ॥ ध्रु० ॥ अजरामर हें स्वरूप दावी । अनन्यभावें भक्ती लावी । महिमा तेच वदनीं गावी । कितुकी वचनीं ते सांगावी । जन्मोजन्मीं हे मागावी । परतुनि दृष्टीनें उमगावी ॥ सज्जनजनमनरंजन । करि भवभंजन निरंजन निर्गुण जो गंध न करि हरि व्यंजन ॥ नयनीं अंजन भरि जीव तन्मय होउनि ठेला ॥ भ्रम०॥१॥ निरालंबीं राहणें ज्याला । मिळुनियां अजाला । कीं त्या भुवनत्रय राजाला । करितो अनाहात बाजाला । विसरे तुझ्या माझ्याला ॥ ऐसा लाल होउनि कलिल काल कौतूहल तुंदिल लरित वलित विश्वंभरभजनीं गलित चलित अभिमान होउनि चिन्मयभुवनीं न्हेला ॥ भ्रम० ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा शरीरचर्म । आहे तोंवरि घडतें कर्म । पूर्वार्जित हे धर्माधर्म । अंतरसाक्ष हें जाणुनि वर्म । तेणें हरिले सकळ श्रम । ऐके देखे स्पर्शे चाखे । परिमळ ये तो घेतो नाकें ॥ वाचे बोले हात हाले पायीं चाले मैथुनकाले

सांगितलें आहे कीं: मूर्धज्योतिषिसिद्धदर्शनम् ॥ ३२ ॥ मस्तकांत ब्रह्मरंध्र नावाचें एक छिद्र आहे, तें सुषुम्ना नाडीच्या योगानें व हृदयांतील चित्तरूप मण्याच्या प्रकाशानें फारच तेजस्वी आहे. त्याच्याठिकाणीं चित्त एकाग्र केलें असतां योग्याला जगांतील सिद्ध पुरुष गुप्त असलेले दिसूं लागतात, ह्मणजे त्यांचें दर्शन होतें व परमात्म्याचा साक्षात्कार होतो.

१ जग हा एक पाण्याचा बुडबुडा. असे अनंतकोटि बुडबुडे ज्यामध्यें उद्भवतात, नाश पावतात असें चैतन्यजल.

२ गो ह्मणजे इंद्रियें त्यांचें पालन करणारा, संरक्षण करणारा.

विसर्जताले ॥ जागृति निद्रा स्वप्न सुषुप्ति वर्तुनि ऐसा गुणातीत तो महाशून्य चैतन्यचि झाला । जिताचि असतां मेलो ॥ भ्रम० ॥ ३ ॥

पद ७१ वें (रागे गौडसारंग.)

कृपा कशानें करील तो हरी ॥ ध्रु० ॥ कर्ता हर्ता ईश्वरभर्ता । क्रियमाणें हें आयुष्य सर्ता । पर्ता नाहीं इंद्रियचर्ता ॥ विपरित अर्था मुलुनि जीव हा उगेंचि गर्व हें धरी ॥ कृपा० ॥ १ ॥ परद्वार हें पातक आहे । वेदपुराणीं ऐकत जाये । नरक नयनिं हा प्रत्यक्ष पाहे । बिभत्स अवघें सुखेंचि साहे ॥ अतिलुब्ध जो कामिनीवरी ॥ कृपा० ॥ २ ॥ प्रतिपाळ करी कीं मदाचा । मार्ग न कळे ब्रह्मपदाचा । करी आट विवेकनदाचा । प्राणी जाणला हा न कदांचा । जो असत्यवादी सदाचा ॥ ज्याची वाचाचि नाहीं हें खरी ॥ कृपा० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा हा वर्तों । नेणें आत्मस्वरुपीं परतों । कीं कोणं संग मी धरितों । आणि काय मी हें करितों । नित्य कोणाला मी स्मरतों ॥ हें नकळोनि तृष्णा उठवी नानापरी ॥ कृपा० ॥ ४ ॥

पद ७२ वें.

ऐसा ज़न्म नको हा मला । देवा शरण येतों मी तुला ॥ ध्रु० ॥ देह हें जाण जीवाला मोट । बांधुनि केलासे कडेलोट । तेथ श्रमतों भरतां पोट । दुःखें *भोगिलिं कोटिनकोट ॥ ऐसा० ॥ १ ॥ जन्मांतरिंचें पुण्यपाप । प्राप्त ज़ाहले त्रिविध ताप । आयुष्याचें भरतें माप । डोळां पडलि मोहाचि झांप ॥ ऐसा० ॥ २ ॥ आपण पडला असतां बंदी । आणिक लोकांलाही

---

* अन्यपाठ=भोगी.

---

१ "मला ब्रह्म समजलें आणि न समजलें" असें जें ब्रह्माचें ज्ञान आणि अज्ञान या दोहोंचाही त्याग करून जो केवळ अद्वैत चैतन्यमात्र होऊन जातो, त्याला जीवद्वैताच्या अत्यंत त्यागानें जीवन्मुक्तीची पराकाष्ठा (शेवटची स्थिति) प्राप्त होते. याचेंच नांव जिवंत असतांना मरणें. ही स्थिति ज्याला प्राप्त होते, तो वास्तविक ब्रह्मच होय. ब्रह्मवेत्ता नव्हे. असें योगवासिष्ठांत वसिष्ठांनीं रामास सांगितलें आहे.

निंदी । दुष्ट दुरात्मा हा *द्वंद्वधी । करोनि होत समंधी ॥ ऐसा० ॥ ३ ॥ ज्याला सुचेनाची† सुटका । धरितो अभिमान हा लटका । अडला देह बुद्धिच्या अटका । ईश्वर स्मरेना एक घटका ॥ ऐसा० ॥ ४ ॥ न रुचे संतांची सोबत । पाठीं धांवेना लोंबत । नाहीं योगाला झोंबत । नायके अनाहत नौबत ॥ ऐसा० ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे यांतुनि सोडीं । आवरीं ‡मानसाच्या ओढी । दहाही इंद्रियांतें§ कोंडीं । लावीं आत्मस्वरूपीं गोडी ॥ ऐसा० ॥ ६ ॥

पद ७३ वें. (राग काफी.)

जगजीवनजी दीनोद्धार ॥ ध्रु० ॥ आत्मानात्मविवेकसुमातिसुख दावीं हें सारासार । लटिकें देह हें गेह करुनि जीव भोगितसे दुःख फार ॥ ॥ जगती० ॥ १ ॥ मुक्त करुनियां गुप्त स्वरूपीं दे दर्शन उक्त प्रकार । हे विश्वंभर करुणाकर लवकर भवसिंधु करिं पार ॥ जग० ॥ २ ॥ योगयुक्ति दे शून्यमंडळीं मन हें जाऊं एकवार । भक्तकाजकल्पद्रुम सद्गुरु दाता परम उदार ॥ जग० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा काम क्रोध ‖मारुनि मदमत्सर दानवां ¶उतरणें भार । युगायुगीं तूं धरिसी नानारूप लीलावतार ॥ जगजी० ॥ ४ ॥

पद ७४ वें.

वेषधारी युगायुगीं हर । लीलाभरित हरि । भवसागर हा तारी ॥ ध्रु० ॥ चरित करित अरि दमुनि कामना आराम हृदय हें करी ॥ वेष० ॥ १ ॥ ज्ञानमृगहि निमाला, सोहिरा ह्मणे तें सुख लाधलें मला ॥ वेष० ॥ २ ॥

अन्यपाठ=* द्वंद्वी. † ही. ‡ मनाच्या ओढी. § इंद्रियें. ‖ मारु. ¶ करणें.

पद ७५ वें.

भजन तुझें आवडो+ । मजला विषयसुख नावडो[1] ॥ ध्रु० ॥ अविनाश आत्मारामा । भक्तकाजकल्पद्रुमा ॥ १ ॥ गैब चराचरा । अगम अगोचरा ॥ २ ॥ सज्जनरंजना । अलख निरंजना ॥ ३ ॥ असोनि लक्षा। प्रत्यक्ष अलक्ष्या ॥ ४ ॥ मौन महाशून्या । अखंड चैतन्या ॥ ५ ॥ पाहतां अरूपा । आनंदसत्तारूपा ॥ ६ ॥ टाकुनियां सगुणा । गुणातीत निर्गुणा ॥ ७ ॥ वृत्ति लागो एका । नगरनायका ॥ ८ ॥ सकळमूळबिंबा । विकास निरालंबा ॥ ९ ॥ जगदभ्रअंबरा । दिव्य दिगंबरा ॥ १० ॥ कानावीण ऐकत्या । डोळ्यांवीण देखत्या ॥ ११ ॥ अज्ञान नेणत्या । अंतर जाणत्या ॥ १२ ॥ मागत्याचें मागणें । तुझें हेंचि देणें ॥ १३ ॥ सोहिरा ह्मणे "मी" मोड । दे अवीट आणि गोड ॥ १४ ॥

पद ७६ वें.

तुजविण आणिक नाहीं रे! मज । कळोनि आलें हें आजि सहज ॥ ध्रु० ॥ अनेक रूपीं एका । नगरनायका ॥ १ ॥ अलख निरंजना ।

+ या दोन ठिकाणीं " वो " हें सांपडतें. पूर्वी प्रसिद्ध केलेल्या पदसंग्रहांत या पदांत बऱ्याच चुका आहेत. त्यांस अन्य पाठ असें ह्मणणें योग्य दिसत नाहीं ह्मणून ते येथें दिले नाहींत.

---

१ पहिल्या चरणांत देवापाशीं मागणें मागितलें कीं हे देवा, तुझें भजन आवडो आणि विषयसुख नावडो. व शेवटच्या चरणांत ह्मणतात, मागत्यानें हेंच मागावें आणि देवा, त्वां तें द्यावें; नाहींपेक्षां कितेक तुजपाशीं मुक्ति, धन, संपदादि तुच्छ वस्तु मागतात, तें मागणें त्यांना योग्य नव्हे, व तें देणेंही तुला योग्य नव्हे. कारण एकाद्या अर्भक बालकानें अपकार करणारा भलताच पदार्थ पित्यापाशीं मागितला तरि तो त्याला देणें योग्य होणार नाहीं. ह्मणून सोहिरोबा ह्मणतात " मीपण मोड, आणि कधींच ज्याचा वीट येऊं नये असें तुझें प्रेमभजन दे. तुकोबा असेंच ह्मणतात:—[हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥

दत्त चिद्घना ॥ २ ॥ जगदखिलपालना । हे लीलालालना ॥ ३ ॥ भक्तजनतत्परा । प्रेमपरात्परा ॥ ४ ॥ जयजया विशुद्धा । देव अनादिसिद्धा ॥ ५ ॥ सदयहृद्गता । हृदयनिवासिता ॥ ६ ॥ दिसे तें पावेल अस्तु । तूं अविनाश वस्तु ॥ ७ ॥ जगनगनगरा । हे करुणासागरा ॥ ८ ॥ सुख नाहीं हो कोठें । संसारीं दुःख मोठें ॥ ९ ॥ किती वोखुं हे कूड । प्रत्यक्ष लांकूड ॥ १० ॥ देह हें जांयाचें । अंतीं हें जायाचें ॥ ११ ॥ जळो परतें हें पोट । आणि जळो तें चिरगूट ॥ १२ ॥ मासा करी चळबळ । पारि केधवां नेणों पडेल जाळ ॥ १३ ॥ संसारिया सुख तैसें । केव्हां नेणों न्हेसिल कैसें ॥ १४ ॥ विषयसुखीं अनावडी । लागो तुझी पुरती गोडी ॥ १५ ॥ सोहिरा ह्मणे मागतसों । बोलिसारिखें आंगीं असो ॥ १६ ॥

पद ७७ वें.

भेट देइं रे जगज्जीवना । आजि सज्जनरंजना ॥ विराजराजयोगी । जोगी अलख निरंजना ॥ ध्रु० ॥ सहजनिजनिर्भरू । देवा भक्तां कल्पतरू ॥ १ ॥ निजधाम अंबरा । देवा दत्त दिगंबरा ॥ २ ॥ कनकनानानगनगरा । देवा जगतरंगसागरा ॥ ३ ॥ कायादर्पणप्रतिबिंबा । अतीत निरालंबा ॥ ४ ॥ आनंदवधुवल्लभा । देवा आरंभरंभस्तंभा ॥ ५ ॥ अद्वयकुमुदिनीचंद्रा । क्षमाशांतिसमुद्रा ॥ ६ ॥ विपदबोधविद्गता(?) । देवा सकळभूतहृद्गता

---

१ वाखाणणी करूं, प्रौढी मिरवूं.

२ उसनवट किंवा थोड्या दिवसाकरितांमागून आणलेलें.

३ तुकोबा ह्मणतात:—[बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥ १ ॥ अंगें झाडीन आंगण । त्याचें दास्यत्व करीन ॥ २ ॥ त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडुनि कर ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोचि देव । त्याचे चरणीं माझा भाव ॥ ४ ॥

॥ ७ ॥ विवेकवैराग्य सागरा ॥ देवा सुहृद्वनवसुंधरा* ॥ ८ ॥ चिन्मात्र उदासीना । तन्मात्रविनाशना ॥ ९ ॥ सारथी मनोरथीं माझ्या । हो तूं आत्मारामराजा ॥१० ॥ गैब† चराचरीं । देवा अगम अगोचरा ॥ ११ ॥ काया ना माया । तुझी निर्गुणनिरामया ॥ १२ ॥ सोहिरा ह्मणे प्रतीति जैसा । अवकाश आकाशा तैसा ॥ १३ ॥

पद ७८ वें.

कैसा विसरूं‡ मी तयासी । तो आहे मजपाशीं ॥ ध्रु० ॥ जरि निर्जिवां देऊं मी+ देवपण । तरि इंद्रियें चाळवितो कवणें ॥ १ ॥ देहचि प्रमाण मानिलें । तरि उत्पन्न कोठुनि झालें ॥ २ ॥ निद्रेंत देहा नाहीं स्मरण । यातें जागवी तो कवण ॥ ३ ॥ एकमेक दिसे अनेक । लाघवी नगरनायक ॥ ४ ॥ नाशवंत चराचर । तो अविनाश अगोचर ॥ ५ ॥ विषद बोध

अ. पा. * सुंदरा. † गैबी. ‡ विसरों म्यां. + म्यां.

---

१ जो निरंतर माझ्याबरोबर जडलेलाच आहे, त्या देवाला मी विसरूं कसा ? दगडाचे केलेले देव, तसेंच अश्वत्थ, रुईचें झाड, वेळू वगैरे कुलदैवतें असलेलीं जगांत आढळतात. यां निर्जिवांना जर देव मानलें तर मनुष्यांनीं ज्या इंद्रियांच्या साह्यानें दगडादिकांचे देव बनविले, त्या इंद्रियांचा चालन कर्ता कोण ? देहच प्रमाण आहे, असें जर मानलें तर तें देह उत्पन्न झालें कोठून ? वीर्याचाच स्वभाव असें जर ह्मणावें तर तें कसें समजलें ? अन्वयव्यतिरेकाच्या योगानें समजलें; जेथें वीर्य आहे तेथें देहादिक आहेत; आणि जेथें वीर्य नाहीं तेथें ते नाहींत असें ह्मणावें, तर तसाही नियम अनुभवास येत नाहीं. कारण वीर्य हें पुष्कळदा निष्फळ होतें. निद्रेंत देहाचें स्मरण मुळींच नसतें, तर त्या देहास जागें कोण करतो ? " सारांश, रामदास म्हणतात तसें [देहीं देव प्रत्यक्ष जाण असतां कोणी न जाणे तया । त्याला सांडुनि हिंडती त्रिभुवनीं पाषाण पूजावया ॥]

२ एकमू–एक=एकीएक असा हा देवं अनेक दिसतो असा भाव. [" एकमेवाद्वितीयम् " या अनुरोधानें हा शब्द वापरलेला आहे.] याच अर्थाचें केशवस्वामींचें पद आहे. [देव जडला जाइना अंगा । आतां काय करूं सांगा ॥ धृ० वैद्य जेसी पंचाक्षरी । कांहीं केल्या नव्हे दुरी ॥ १ ॥ देव काढाया शहाणे आले ।

हा विद्वद(?) । सकळभूतह्रद्गत॥ ६ ॥ लागली हे तयाची भक्ति । सृष्टि उत्पन्न जेथुनी होती ॥ ७ ॥ सोहिरा ह्मणे नाहीं दुरी । व्यापक सत्ताधारी ॥

पद ७९ वें.

तुजविण न गमे न गमे मज हे घडि रे ॥धु०॥ निष्कामाची निजधामाची आरामाची भवसागरीं कामाची या हरिनामाची सांगडि[1] रे ॥ तुज० ॥ १ ॥ मायिक संसार असार हा जाणुनि जे कां भजती तुज ते पावती परेपरथडि[2] रे ॥ तुज० ॥ २ ॥ महानंदसमुद्र पौर्णिमेचा पूर्णचंद्र जो कां भवनत्रयनरेंद्र तो तूं संताचा संवगडि रे ॥ तुज० ॥ अज्ञानबेडी सर्वेचि तोडी पांचंपांचाठायीं[3] विघडी मनाला आपणापाशीं ओढी मोक्षपदाचा दरवाजा[4] उघडी रे ॥ तुज० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा निकट निरंजनीं रंजुनियां परिपूर्ण सदोदित ब्रह्मरूप निज नित्य निवासी टांकुनि सकळिक प्रापंचिक परवडि रे ॥ तुज० ॥ ५ ॥

पद ८० वें.

तुजविण वो कैंचा लाभ जनीं या लोकांला ॥ धु० ॥ माझें माझें ह्मणुनी लटक्या मृगजळाला भुलुनि । केवळ देखतांचि जाणोनी । उगे पडले

तेंहि मनसारिखे झाले ॥ २ ॥ आणिक देवं येती जाती । हा देव जन्माचा सांगाती ॥ ३ ॥ इतर देवां एक ठाणें । यासि अणुरेणु राहाणें ॥ ४ ॥ केशव ह्मणे सर्तांपुर्ता । काय नेणों पूर्वींच होता ॥ ५ ॥

१ दोन लहान नावा एकत्र बांधून केलेला जोड. या प्रकारच्या सांगडी कोंकणांत भयंकर नद्यांवरून पार होण्यासाठीं घातलेल्या असतात. ही सांगड बुडण्याची भीति नसते.

२ परावाचा किंवा पराप्रकृति यांच्या पलीकडे. [परेखालीं झोंबती त्रिगुण । आणि परेपर सदैव निर्गुण । आहे ऐसी खुण । पावोनियां पाविजे ॥ ६१ ॥ ऐसिया परे पर । असे आत्मस्वरूप निरंतर । ह्मणोनि तेथील सार । जाणती साधु ॥ ६२ ॥ " अद्वयानंद " सोहिरोबानाथ.]

३ पांच विषय (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) पांच भूतांचे ठायीं.

४ योगशास्त्रोक्त ' ललाटोर्ध्व भागांतील ' ब्रह्मद्वार चक्र पहा (चक्र १३)

शोकाला ॥ तुज० ॥ १ ॥ अविद्या लागली पाठीं । चालती ते आडवाटीं। केवळ विषयांसाठीं । मरती मारोनि एकमेकांला ॥ तुज० ॥ २ ॥ अर्थावीण तो जपतां । अंतरिंचा कीरं[1] रिता । शिकविली तो बोले गीता- । वाक्यश्लोकांला ॥ तुज० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हेतुला । नासोनियां आंतुला । वोळखिला नाहीं कीं तुला । अनेकीं ऐकाला ॥ तुज० ॥ ४ ॥

पद ८१ वें.

मजवरि तूं दया करीं रे ॥ ध्रु. ॥ रूपरेखविना तूं एक पालक चालक सकळ चराचरीं रे ॥ मज. ॥ १ ॥ अखंड अनंत अपार अरूपा तूं दे अलभ्य हा लाभ आह्माला अभ्यंतरिं रे ॥ मज० ॥ २ ॥ चित्सुखसिंधु आनंदकंदु परमामृतबिंदु मनैंइंदु[3] न्हेई अजरामरपदपरात्परीं रे ॥ मज० ॥ ३॥ सोहिरा ह्मणे स्वरूप दावीं लय हें लावीं निर्गुण निरंजन निरामय चिदंबरीं रे ॥ मज० ॥ ४ ॥

पद ८२ वें.

मना ईश्वरभजनीं तूं रत रे ॥ ध्रु० ॥ मृगजलवत् तूं जाण असार । प्रपंचींहुनी परत रे ॥ मना० ॥ १ ॥ त्वरित तूं घेई हें परमपीयूष । आयुष्य गेलें सरत रे ॥ मना० ॥ २ ॥ अलक्ष्यलक्षा आणुनि अंतरीं । विलोकन करिं तूं सुरत रे ॥ मना० ॥ ३ ॥ ह्मणें सोहिरा पाहतें[4] पाहणें । स्थिरावतां मुळिं जैसें लवण जळीं विरत रे ॥ मना० ॥ ४ ॥

---

१ कीर ह्मणजे पोपट. पोपट जसा शिकविलेलीं गीतादि वाक्यें पटापट बोलतो पण अंतःकरणांतून रिताच असतो [शब्दें ब्रह्म कोण झाले । अन्न ह्मणतां कोण धालें । शिकविलें तैसें बोले। शुकपक्षी जसा ॥ ४ ॥—श्रीरंगनाथ]

२ अनेक पदार्थ निरनिराळे ज्या तुझ्या एकट्याच्या सत्तेमुळें प्रकाशित होतात त्या तुला.

३ चैतन्य हा चित्सूर्य आणि मन हाच चंद्रमा.

४ दृष्टीचा (चक्षूंचा) जो वास्तविक द्रष्टा (पाहणारा) तो (ज्ञानसूर्य) नेत्रांच्या आंतून पाहणारा होय. तुकोबांचा अभंग [तुझें वर्म ठावें । माझ्या पडिलें भावें

पद ८३ वें.

श्रीराम जयराम जयजयराम ॥ ध्रु० ॥ ऐसें निशिदिनीं नाम गातां । प्रेम स्वयेंचि येईल हाता । निजपदीं पावावें आराम ॥ श्रीराम० ॥ विषयांपासुनि सुटेल । केवळ संसारासी विटेल । मन हें होईल निष्काम ॥ श्री ॥ १ ॥ रूप कांसवाचे परी । धरुनि राहेन अंतरीं ॥ २ ॥ नेदीं होऊं तुटी । मेळवीन द्रष्टादृष्टीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । चिंतन ते तुझी सेवा ॥ ४ ॥

१ "श्रीरामजयरामजयजयराम" ह्या त्रयोदशाक्षरी मंत्रामध्यें अनेक गुत अर्थ आहेत. "पहिल्यानें श्री=लक्ष्मी (प्रधानप्रकृति, ज्ञानशक्ति, पराशक्ति, सत्त्वावी अशीं जिला अनेक नांवें आहेत ती.) आणि राम ह्मणे आत्मा (पुरुष, ईश्वर हृदयस्थ सोऽहं आत्मा अशा अनेक संज्ञांनीं हा आत्मा दर्शविला जातो)" "दुसरें जय हा शब्द अठरा संख्येचा वाचक आहे. या अठरा संख्येंत योगशास्त्रोक्त कंठस्थानच्या विशुद्ध (सोळा पाकळ्यांचें चक्र) चक्रामधील सोळा कळ्यांनीयुक्त "जीवात्मा" [भावग्राह्यमनीडाख्यं । भावाऽभाव करं शिवम् ॥ कलासर्गकरं देवं । ये विदुस्, ते जहुस्तनुम् ॥ १४ ॥ श्वेताश्वतरोपनिषद् अ० ५] शंकराचार्यांच्या मतें कला ह्मणजे आथर्वणिकांनीं सांगितलेल्या प्राणापासून नामापर्यंत सोळा कळा होत. (प्र. उ. प्र. ६, मं. ४) विज्ञानात्मा या शब्दाचे दुसरे दोन अर्थ सुचवितात ते असेः—कला ह्मणजे ईश्वराची अंगभूत शक्ति, किंवा कला ह्मणजे वेद इतर विद्या. आतां शंकराचार्यांच्या मतें सोळा कळा हाटल्या ह्मणजे येणेंप्रमाणें होतः—प्राण, श्रद्धा, ख (आकाश,) वायु, ज्योति, आप (पाणी,) पृथ्वी, इंद्रियें, मन, अन्न, वीर्य, तप, मंत्र, कर्म, काल आणि नाम. सारांश, ह्याप्रमाणें या अपरब्रह्माच्या सोळा कळा व पूर्वोक्त परा (श्री) आणि परेश (राम) मिळून "जयराम" ह्या शब्दांनीं अठरा प्रकारें विभागलेला एक राम (परेश, आत्मा) असें दर्शविलें जातें. पुढें जय+जय=अठरा+अठरा=छत्तीस. या छत्तीस तत्त्वांनीं युक्त जें क्षेत्र (देह) त्याचें ऐक्य दर्शविलें जातें, आणि राम देहाचें ज्ञान ज्यास आहे, असा गीतेंत सांगितलेला क्षेत्रज्ञ (आत्मा, राम) यांचा बोध दर्शविला जातो. एका कवीनें तर या मंत्राविषयीं सोपपत्तिक गौरव केला आहे तो असा कीं, रामराजमंत्रावांचून अन्य मंत्र काय कामाचे ? कारण नमःशिवाय मंत्र जर 'म' कार रहित झाला तर तो विपरित होईल तसेंच अन्य मंत्र घेऊन त्यांत राम मंत्रच सोपा व कोणत्याही जडबुद्धीच्या मनुष्यानें उलटसुलट उच्चार केला (राम याच्या उलट मरामराम).असें ह्मणत गेला तरी रामरामच होतें असें सिद्ध केलें आहे.

राम० ॥ २ ॥ देहींची चाळककळा गमेल । सर्वरूपीं समरंगीं रमेल । चित्सुख परात्पर निजधाम ॥ श्रीराम० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे शिव स्मरतो । वाल्मिक पतीत पावन होतो । ऐसें सकळां तारक नाम ॥ श्रीराम० ॥ ४ ॥

पद ८४ वें.

तो हरि गोवर्धनधारी आधारी ॥ ध्रु० ॥ गोपवधुमुख मधुरपान करि, सुरस तान बनवारी । रासरंगरसदंग अनंगनटीं, नटत है कुंज बिहारी ॥ तो हरि० ॥ १ ॥ दानवमर्दन जनगुणवर्धन, रूप साकारी । सज्जनजनमनरंजन, वंद्य तो नंदसुत पुतनारी ॥ तो हरि० ॥ २ ॥ बाललालन यौवनलीला, व्यास मुखें उच्चारी ॥ सद्भावें भागवतश्रवण, करि तया दीनजनां उद्धारी ॥ तो हरि० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा रूपरेखविण अनंतरूप हें, निर्गुण निराधारी । वैकुंठभुवनींचा रमापती हा, पूर्णसुख अवतारी ॥ तो हरि० ॥ ४ ॥

पद ८५ वें.

तो हरि स्मर गोकुळीं काना ॥ ध्रु० ॥ मधुसूदनमुखकमलआमोदीं मधुकरवत् प्रीति गोपवधु त्या रतिसुखलालनअमृत पाना ॥ तो हरि० ॥ ॥ १ ॥ फणिवरमर्दन धरि गोवर्धन हरि गुणवर्धन करित जनार्दन प्रताप नाना ॥ तो हरि० ॥ २ ॥ द्वैत नाशुनी ज्ञान प्रकाशुनि पारपर उपदेशुनि उद्धव उद्धरिला सद्भक्त निदाना ॥ तो हरि० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा नाम जे जपती विपत्ति नासुनि संपत्ति पावती मोक्ष परम श्रीपति वरादना ॥ तो हरि० ॥ ४ ॥

पद ८६ वें.

तरि होय परम संतोष मनाला ॥ ध्रु० ॥ हृदयभुवनीं असे आत्माराम । मनचि होइल जरि निष्काम । येथलेंयेथाचे असे आराम । दूर कोठें जावें नलगे वनाला ॥ तरि० ॥ १ ॥ मन हा मयूर कीं आनंदें नाचे

नाना कलरव करणें वाचे । अंतरिं स्मरतां स्वरूप साचें । अनाहत गर्जत गुप्त घनाला ॥ तरि० ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा भगवान अगोचर । व्यापुनि उरला सकळ चराचर। लावुनि मुद्रा पाहतां खेचर। उपरमसी गगनाला ॥ तरि० ॥ ३ ॥

पद ८७ वें.

वैकुंठपती तो रमारमण स्मर । सुरनरकिन्नर वंदिती जगदुद्धार उदार ॥ ध्रु० ॥ हार हा कीं विहार सकळही मार भार विकार । साकारही अनुकार जाण तूं विपरित बुद्धि विदार ॥ १ ॥ सार हा, संसार तूं देख असार सांडी किसार । तुषार भव हा भुसार निवडुनि सत्कण हा चिदाधार ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा निवार हें येणें जन्ममरण अनिवार । ईश्वरपदारविंदीं पुनीत अलिवत मन हें सुधार ॥ ३ ॥

पद ८८ वें.

गोविंद वंद्य तो नंदसुत आनंदकंद आराम ॥ ध्रु० ॥ मंद अनिळ सुगंध शीतळ निश्चळ चंद्रीं व्योम । सुंदर मेघश्याम मनोहर कुंजर गोपि सकाम ॥ गोविंद० ॥ १ ॥ वसंत अवघें पसंत वन करि शांत मदनोद्दाम । अति रति करितां बल्लवयुवती पावती मोक्ष निजधाम ॥ गोविंद० ॥ २ ॥ राहाटति तपिये दाटिति पवना आटिति इंद्रियग्राम । ह्मणे सोहिरा सर्वघटीं हरि देखति आत्माराम ॥ गोविंद० ॥ ३ ॥

पद ८९ वें.

सार्थक माझें हें करिं तूं ॥ ध्रु० ॥ अच्युत केशव परमानंदा । गोविंदा ये मुकुंदा । कायासुमनांतिल मकरंदा । जगद्व्यापका श्रीहरि तूं ॥ सार्थक० ॥ १ ॥ ज्ञानसुख या अमला पाजुनि । मजला पूर्ण समाधी लावुनि । अद्वयकमला विकास करुनी । मोहांतुनि उद्धरिं तूं ॥ सार्थक० ॥ २ ॥

---

१ हें पद ध्रुपदाच्या चालीवर आहे.

लय हें लागो हेंचि मागों । चित्तचि हें वीतरागो । नित्यनिरंजन जागो । मनिंचा जाउं नये क्षणभरि तूं ॥ सार्थक० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा पापपुण्य हीं दोनीं । घडती कर्मबीजापासोनी । तें बीजचि कीं नासोनी । मजवरी कृपा करिं लवकरि तूं ॥ सार्थक० ॥ ४ ॥

पद ९० वें.

त्याणें भवसिंधु तारला । व्यापक अनंत जो विस्तारला ॥ ध्रु० ॥ ज्याणें निर्मियले पिंड उदंड । निपट नाहीं तेथ कपट मात्र हे । पृथ्वीपट चितारला ० त्याणें० ॥ १ ॥ जप तप ध्यानीं कीं । पूर्वपुण्यें हा निःस्पृह हृदयीं वीतराग अवतरला ॥ त्याणें० ॥ २ ॥ अध्यासा या अभ्यासामध्यें । मंत्र तंत्र जंत्र जो प्राणी । चाखपाखं उतारला ॥ त्याणें० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा अंतरसाक्षि भगवंताला । भक्तचि ऐसा निश्चयरूपें । करारासी उतरला ॥ त्याणें० ॥४॥

पद ९१ वें.

शरण ये तूं रमापती । पाव मोक्षसुखसंपत्ति । शेषशयन हरि कमलनयन स्मर यमदूत हे कांपती ॥ ध्रु० ॥ शामसुंदर वैजयंती गळां चारी भुज विराजति । किरीट कुंडलें मुकुट मेखळा क्षुद्रघंटिका वाजती ॥ शरण० ॥ १ ॥ श्रीवत्स कौस्तुभ गोपीचंदननामें सूक्ष्म साजती । श्रीललित नीलतनुवरि पीतवसनीं विज्जु लाजती ॥ शरण० ॥ २ ॥ माळ मंजरी गदापद्म धरी शंखचक्र चहुं हातीं । दीनोद्धार उदार कृपानिधि मुनिजन ज्याला ध्याती ॥ शरण० ॥ ३ ॥ मत्स्यरूप धरी प्रवेशे सागरीं

---

१ वैराग्ययुक्त होणें.

२ पृथ्वी हाच एक चित्रपट तो मनुष्य, पशु, पक्षि, पर्वत, वृक्ष, नद्या वगैरेंच्या चित्रांनीं चित्रित केला केला.

३ जीवाचें नसून भासणें आणि कूटस्थ (निर्विकार आत्म्याचें) असून न दिसणें यास अध्यास ह्मणतात.

४ लखलखीत, चोख, शुद्ध. ५ नामाटिळे. ६ विजा.

शंख मारि महामति । वेद उद्धरी धर्मसिद्ध करी प्रथम अवतार रीति ॥ शरण ॥ ४ ॥ कूर्मरूप धरी पृथ्विपृष्ठिवरि दानव प्रबळ बलोद्धति । हिरण्याक्षिया दमुनि सोडविली वराहरूपें हे क्षिति ॥ शरण० ॥ ५ ॥ भक्तराज प्रल्हाद वैष्णव स्मरणा नाहिं विस्मृति । तया पितयाकारण नरहरि प्रकट स्तंभाप्रति ॥ शरण० ॥ ६ ॥ आत्मनिवेदन बळी प्रतिग्रह वामन द्विजरूप यथास्थिति । पाताळभुवनिंचें राज्य देउनी द्वार रक्षितो परमप्रीति ॥ शरण० ॥ ७ ॥ क्षत्रिय मारिले वचन पाळिलें जननि रेणुका सती । परशुरामें शितीं लावुनी शर हा फिरविला अपांपति ॥ शरण० ॥ ॥ ८ ॥ लंकापतिप्रति युद्धप्रसंगीं वानर ज्याचे जुत्पति (?) । दाशरथी राम रंगधीर वीर रामचंद्र सीतापति ॥ शरण० ॥ ९ ॥ नंदसुत अद्भुत पराक्रमी प्रवर्तला अति नति । गोकुळीं काना नाना लीला गोपवधूंशीं करि रति । शरण० ॥ १० ॥ बौद्ध कल्की युग कलीचें प्रस्तुत अदृश्य गति । ह्मणे सोहिरा भक्त रक्षितो प्रकटुनि युगायुगाप्रति ॥ शरण० ॥ ११ ॥

पद ९२ वें.

स्मर कानया कृष्णा ॥ ध्रु० ॥ सज्जनरंजन हा भवभंजन व्यक्तिवितृष्णा । आनंद नादबिंद्वाविरहित विशिष्ट उत्पत्तिष्णा ॥ स्मर० ॥ १ ॥ रविरूप हे सत्ता ज्याची कडाडीत उष्णा । शशिमाजी भूतरसात्मकीं हें जीवनरूपें पूष्णा ॥२॥ वाढविसी बहु कशासि मृगजळीं आशा आणि तृष्णा । तनुमनधन अपहारचि केलेंसी उदरा आणि शिस्ना ॥ स्मर० ॥ ३ ॥ कर्में योनीबंधन घडतें न सुटे भोग उसणा । जन्मा येउनि सुखदुःखा मग कशासि हो रुसणा[1] ॥ स्मर० ॥ ४ ॥ भक्तिला भाळतो देव मग हृदयीं करीं घृष्णा ॥ ह्मणे सोहिरा एतद्विषयीं करणेंचि प्रश्ना ॥ स्मर० ॥ ५ ॥

पद ९३ वें.

गिरिवरधर गोविंदा, त्या नंदनंदना वंदा ॥ ध्रु० ॥ तपें तपति जे मुनिजन जपती, त्यांचि विपत्ति नाशित श्रीपति, तो हा कुंजवनाप्रति,

१ राग, रुसावा.

यौवनयुवतिजातिप्रति, प्रतिदिनिं हा अति विलसत रतिछंदा ॥ गिरिवर० ॥ १ ॥ सज्जनजनमनरंजन, हा भवभंजन, निरंजन निर्गुण, जो गर्जन करि हरि, व्यंजन नयनीं अंजन भरी त्या भुवनत्रयमुळकंदा ॥ गिरिवर० ॥ २ ॥ अंतवंत जीवजत नेणसी, खंत उपजुनि दंत विचकिसी, तंतें नाहीं तुज अनंतभजनीं, संतसमागम न रुचे तुजला न सुचे, कांहीं विस्मतिनें मतिमंदा ॥ गिरिवर० ॥ ३ ॥ खगासनावरि अघनाशन, जो ग्रासन करितो प्राशन सकळिक, काळकलित हा, दुरित त्वरित हरि स्मर, नित्य अनित्य सर्वेही सोडुनि धंदा ॥ गिरिवर० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा यदुवंशादिनमणि, कीं मर्दुनि फणि, दैत्यदेवगणिं, कीं दुर्धर रणीं, विजय सुरगणीं, नमियला धणी, जगाचा वेषधारि जो शेषशयन हा सदैव दे आनंदा ॥ गिरिवर० ॥ ५ ॥

पद ९४ वें.

ये देवा भवसिंधु तारणारा ॥ ध्रु० ॥ आवृत्त ही निवृत्त मोहावर्त तूं कीं या मनिं । कैवर्तकः केशवा तूं जन्ममरण वारणारा ॥ ये देवा० ॥ १ ॥ देह ना विदेह हें संदेह गेह नाशुनि । ग्रासुनि हे सहोही अनुजदनुज मारणारा ॥ ये देवा० ॥ २ ॥ गोपिका त्या ओपिती, जीवत्व कीं निरोपिती, वृत्तांत तुज श्रीपति, तूं नंदसुत तुजप्रति वंदुनियां आनंदती. त्या गोपपति गोकुळीं तूं अवतरणारा ॥ ये देवा० ॥ ३ ॥ कलत्रपुत्र वित्त हें चरित्र, कीं समानसूत्र, कीं खेळ हा विचित्र, बहु दाविसि कीं विश्वचित्र, हें चितार-

---

१ इच्छा, उत्सुकता.

२ जन्ममरणांचे फेरे (आवृत्ति).

३ निवृत्ति ह्मणजे निरसन करणारा.

४ मोह हाच आवर्त ह्मणजे भोंवरा.

५ सहा रिपु (कामक्रोधादिक) जसें एकमेकाचे सहोदर बंधुच असे जुडीनें असणारे दनुज ह्मणजे असुर.

णारा ॥ ये देवा० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे बसला ना उभा तूं हे प्रभा तुझी नभावरि स्वभावना दुभाव हे निभावुनि अभाव, लावीं शुद्धभाव, स्मरणिं दुरित हरणारा ॥ ये देवा० ॥ ५ ॥

पद ९५ वें.

कांहो क्षणभरि हरि गाना? ॥ ध्रु० ॥ अशाश्वतावरि विटोनि शाश्वत मोक्ष कांहो मागाना । श्रवणमनननिदिध्यासें ईश्वरछंदीं या लागाना ॥ कांहो० ॥ १ ॥ गुणानुवादीं सत्संवादीं तृप्त कराना कां काना । गोकुळिं गोविंद अवतरला गिरिवरधारी यदुपति हा काना ॥ कांहो० ॥ २ ॥ आदिपुरुष हा विसरोनि तुम्हीं दैवत स्मरूं नका आना । सुर नर उरग हें स्थिरचर ज्याणें निर्मियलें नाना ॥ कांहो० ॥ ३ ॥ भक्तसंकटीं धांवत बैसुनि वैनतेयवाहना । तो हृदयस्थ हा अंतरीं पहावा चिंता हे वहाना ॥ कांहो० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा सारासार विचार करुनियां भवभ्रम कां त्यजाना । कोठिल कोण मी जन्मा आलों अंतीं काय या मुळावरि जाना ॥ कांहो० ॥ ५ ॥

पद ९६ वें.

ये हरि ये हरि! अंतरनिष्ठ जरि मी तरि ॥ ध्रु० ॥ हिरोनि संपत्ति कौरव नृपति योजित विपत्ति देखुनि भूपति चिंत्तिं विळपति नयन लिंपिती पांडव पति हे नुलंघिति शपथेप्रति मनींचि तपती कर्ण शकुनि दुःशासन कुमति कृत्रिमें जपति जाण तूं श्रीपति पाव मला लौकरी ॥ ये हरि० ॥१॥ मोरमुकुटपीतांबरधारी गोकळवृंदावनविहारी गोपपति गोवर्धनधारी मुरलि मनोहर धेनू चारी विस्मित नारी कंसकाळ तो तूं पुतनारी महाविष्णू तूं पूर्णब्रह्म अवतारी ॥ ये हरि० ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा चिदानंदघन चिद्भुवना तूं चित्तचाळका सकळपाळका या आकांता कमळाकांता पाव अनंता भगवंता तूं अनाथनाथा गुणरूपलावण्यपद्मिणी पतिव्रता तें द्रौपदी संकटीं स्मरी ॥ हे हरि ॥ ३ ॥

पद ९७ वें.

लागो रे ध्यान तुझें परब्रह्म ॥ ध्रु० ॥ व्यक्ति ना वर्ण आनंदपूर्ण । तेथ हें अंतःकरण ॥ लागो रे० ॥ १ ॥ आत्म आवडिये निर्गुण चाडिये । अवीट गोडिये मन ॥ लागो रे० ॥ २ ॥ घेऊं जातां शुद्धि विराली हे बुद्धि । निरंतर समाधी ॥ लागो रे० ॥ ३ ॥ सर्व सदोदित दिवस ना रात । अचिंत्यचिंतनीं चित्त ॥ लागो रे० ॥ ४ ॥ नाम न पवन गगन लगन सर्वा निराळा ; ब्रह्मांड गोळा तेथचि कीं हा डोळा ॥ लागो रे० ॥ ॥ ५ ॥ सृष्टीचें बीज सत्ता सहज हें उन्मनि निज । सोहिरा ह्मणे निजधामा अनामा अखंड आत्मारामा ॥ लागो रे ॥ ६ ॥

पद ९८ वें.

हरिविणें आणिक नाहीं सखा मज ॥ ध्रु० ॥ सारासार हें दावुनि अंतर । सांगतसे मज जिवींचें निजगुज ॥ हरि० ॥ १ ॥ समज समजवुनी निजसुख लाधोनी । निवटिलें ज्यांहीं सगुणरूपीं निज ॥ हरि० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे जहीं नीज घ्यावया । दिधलि ज्यांही मज सहजसमाधि सेज ॥ हरि० ॥ ३ ॥

पद ९९ वें.

तुजविण आणिक नाहीं काम ॥ ध्र० ॥ कार्यी कारण निरसुनिया जहीं । पाविजे । निजस्वरूपीं आराम ॥ तुजविण० ॥ १ ॥ काजें काज हें जाणुनियां निकें । सर्वही देखतां आत्माराम ॥ तुजविण० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग नगरूप हारोनी । निवटिजे एक सकळीं हेम ॥ तुजविण० ॥ ३ ॥

पद १०० वें.

शामसुंदर घननीळा ॥ ध्रु० ॥ तुझा तूंचि एकचि साचा । तुजवीण नाहीं वेगळा ॥ शाम० ॥१॥ थोरथोरां देवसुरवरां । नाकळेचि तुझी लीळा

॥ शाम० ॥ २ ॥ आत्मानुभवें प्रेमस्वभावें । योगियांसी जिव्हाळा ॥ शाम० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे निजदेहीं सुखामृत । पूर्ण तूंचि कीं चित्कळा ॥ शाम० ॥ ४ ॥

पद १०१ वें.

रामभजन मनरंजन ॥ ध्रु० ॥ भीषण नाशक निजप्रकाशक । सर्व करी भवभंजन ॥ राम० ॥ १ ॥ ध्यानीं जो निपुण आपेंचि आपण । होउनि ते जनविजन ॥ राम० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निशिदिनीं । प्रेमें गाती ते निज सज्जन ॥ राम० ॥ ३ ॥

पद १०२ रें.

रामधणी माझा अलगट देखेन मी कधीं हो ॥ ध्रु० ॥ माया अहंकार सर्वहि निरसुनि शेर्वपदीं सममानिं तदीं हो ॥ रामधणी० ॥ १ ॥ सर्व सुदीन हरि दुःख निवारीं । पार करी भवनीर नदी हो ॥ रामधणी० ॥ ॥ २ ॥ निज ज्योति कळा दावीं घननीळा । सोहिरा शरण तव निजपदीं हो ॥ रामधणी० ॥ ३ ॥

पद १०३ रें.

रामा काय ? तुज विसरूं रे ॥ ध्रु० ॥ पाहतां नयनीं जन तद्रूप अवघें। दिधलासी पूर्ण अभेद वरूं रे ॥ रामा० ॥ १ ॥ समसाम्य समावुनि निज रूप दावुनीं । ठेविसी निज निलयासि स्थिरूं रे ॥ रामा० ॥ २ ॥ बोलवे ना बोलें ऐसें तुवां केलें । सोहिरा ह्मणे देहींच तरूं रे ॥ रामा० ॥ ३ ॥

पद १०४ थें.

निज जिवींचा जिवलग राम बोल ॥ ध्रु० ॥ तनुमन ध्यान करोनि निमग्न । घे अनुभव सखोल ॥ निज० ॥ १ ॥ जीव शिव दोन्ही वेगळे नाहीं । ऐसें ज्ञान गमेल ॥ निज० ॥ २ ॥ प्रेमानंदीं धरोनि विविधीं । चित्त स्वरूपीं जडेल ॥ निज० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मग निवृत्ति पावोनि । प्रवृत्ति दिसे नवल ॥ निज० ॥ ४ ॥

पद १०५ वें.

श्रीरामे वदनीं वद बा ! रे प्रियकर भक्ता ॥ ध्रु० ॥ दोन्ही करकमळ सज्जित, टाळी पिटीं कीं रे निभ्रांता । घोष करीं नाम गर्जत, आणीं निज नयनीं अव्यक्तव्यक्ता ॥ श्रीराम० ॥ १ ॥ लक्ष निजस्वरूपीं लाहें, त्यांत परब्रह्म आहे । दुजें निज दृष्टि न पाहें मार्ग लक्षी ती निजमुक्ता ॥ श्रीराम०

---

१ या पदांत असें दर्शविलें आहे कीं, "हे भक्ता, जर तूं परमप्रिय ईश्वरभक्त होऊं इच्छितोस तर "श्रीराम श्रीराम" असें मुखानें ह्मणत जा, टाळ्या पीट, नामघोष कर. हे भ्रांतिरहित भक्ता ! जो अव्यक्त, त्याला निजनयनीं आण. (अंतर्मुखदृष्टीनें ह्मणजे ज्ञानदृष्टीनें पहा.) आणि मग स्वस्वरूपाचे ठायीं लक्ष ठेवलेंस ह्मणजे त्यांतच परब्रह्म आहे; त्याच्याविना दुसरें कांहीं पाहूं नकोस. असें झाल्यावर मग जी (निज) स्वस्वरूप (मुक्ता) मुक्ती ती तुझ्या आगमनाची (मार्गाची) वाट पहात राहील. सर्वांचें रहस्य एवढेंच कीं, जसा मारुती हा श्रीरामाचा प्रियकरभक्त आहे, तद्वत् भक्ति केली असतां तूंही प्रिय होशील. श्रीमद्भागवत स्कंध० ५ अ० १९ यांत सांगितलें आहे कीं, [श्रीशुक उवाच । किंपुरुषे वर्षे भगवंतमादिपुरुषं लक्ष्मणाग्रजं सीताऽभिरामं रामं तच्चरणसन्निकर्षाभिरतः परमभागवतो हनुमान्सह किंपुरुषैरविरतं भक्तिरुपास्ते ॥ १ ॥ आर्ष्टिषेणेन सह गंधर्वैरनुगीयमानां परमकल्याणीं भर्तृभगवत्कथां समुपशृणोति स्वयं चेदं गायति ॥ २ ॥ ॐ नमो भगवते उत्तमश्लोकाय नम आर्यलक्षणशीलव्रताय नम उपशिक्षितात्मन उपासितलोकाय नमः साधुवादनिकषणाय नमो ब्रह्मण्यदेवाय महापुरुषाय महाराजाय नम इति ॥ ३ ॥ यत्तद्विशुद्धानुभवमात्रमेकं स्वतेजसा ध्वस्तगुणव्यवस्थम् । प्रत्यक् प्रशांतं सुधियोपलंभनं ह्यनामरूपं निरहं प्रपद्ये ॥ ४ ॥ अर्थः—शुकाचार्य ह्मणाले, राजा किंपुरुष वर्षामध्यें त्या वर्षांतील जनांसहवर्तमान मारुती, भगवानआदिपुरुष श्रीरामचंद्राची अखंड भक्तियोगानें उपासना करीत असतो. रामचंद्र हा लक्ष्मणाचा वडील भाऊ, व सीतेच्या मनाला रमविणारा होय. (सीता व लक्ष्मण रामाबरोबर नित्य असतात.) मारुतीला रामचरणांच्या सहवासानें परमानंद वाटत असतो, तो महान् भगवद्भक्त आहे. १ आर्ष्टिषेणासह गंधर्व भगवंताचे परममंगलक रक गुण नित्य गातात. मारुती आपल्या धन्याच्या त्या कथा ऐकतो व स्वतः पुढें सांगितलेल्या अर्थाचा मंत्र जपतो, २ ' भगवान् पुण्यकीर्तिराजाधिराजाला (रामचंद्राला) नमस्कार असो. त्यांचीं लक्षणें, स्वभाव व नियम अति उत्तम असत. तो आपलें मन स्वाधीन ठेवून लोकरीतीच्या अनुरोधानें वागत असे, उत्तम गुणांची परमर्यादा

॥ २ ॥ माया प्रवृत्तीचा भास, व्यर्थ सर्वेचि होत शोष । जातो वयाचा नाश, सोहिरा प्रार्थितसे निजस्वरूप उक्ता ॥ श्रीराम० ॥ ३ ॥

पद १०६ वें.

हरिं हो अभिमान दयाब्धिघना ॥ ध्रु० ॥ देई अखंड तुजविण आन नसे कांहीं । जैसें गंगाजळ समता आणि मना ॥ हरिं० ॥ १ ॥ नित्य अनुरक्त करीं मन उन्मन । निरसीं विकारिक छंद नाना ॥ हरिं० ॥ २ ॥ तनुमनरंजन दे सुखसज्जन । संगत सोहिरा समसदना ॥ हरिं० ॥ ३ ॥

पद १०७ वें.

करुणा करीं कां रे स्वामि ॥ ध्रु० ॥ चिदानंदचिंतन सन्मनरंजन । दे सुख सज्जन तव नामीं ॥ करुणा० ॥ १ ॥ पूर्ण दया करीं ताप समूळ हरीं । दे सुख अंतरीं निरिच्छ परधामीं ॥ करुणा० ॥ २ ॥ करिं अवलोकन भवविच्छेदन । सोहिरा शरण तवपदपद्मीं ॥ करुणा० ॥ ३ ॥

कायती ती (त्याच्या आंगीं सर्व उत्तम गुण भरलेले आहेत) तो श्रेष्ठपुरुष ब्राह्मणाचा कैवारी व ज्ञानदाता आहे. केवळ शुद्ध अनुभव हें ईश्वराचें रूप होय. त्याच्या ठिकाणीं द्वैत नाहीं. त्याच्या तीन गुणांनीं उत्पन्न केलेल्या जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति ह्या अवस्था आपल्या प्रभावाच्या योगें नाहींशा केल्या आहेत ह्मणून तो नेहमीं पूर्ण शांत असतो. त्याचें स्वरूप सर्वांच्या अंतरीं राहणारें अर्थात् दृश्य पदार्थांहून भिन्न आहे. महाबुद्धिमान् पुरुषांना त्याचा अनुभव मिळतो. त्याला नामरूप व अहंकार नाहींत. अशा ईश्वराला मी शरण आहें. ४]

१. मायाप्रवृत्तीचा भास नाश पावणारा आहे. परंतु " तो भगवान् वासुदेव धीर पुरुषांचा आत्मा व अत्यंत प्रिय हितकर्ता " तीन काळांतही अबाधित राहणारा आहे. लौकिकव्यवहारांत ' काल व्यर्थ गेला ' पण काल अनंत आहे तो जात येत नाहीं. (जातो वयाचा नाश) आम्ही नाहींसे होतों ह्मणजे आमच्या आयुष्याचा नाश होतो.

२ याकरितां स्वस्वरूप उघड करून पहाणारा जो भक्त त्याची सोहिरोबा हस्त जोडून प्रार्थना करितात. हल्लींच्या काळीं श्रीरामदासांचें उदाहरण प्रत्यक्ष आहेच.

पद १०८ वें.

पूर्ण हरि भव तारी निजजन ॥ ध्रु० ॥ आपण प्रकटुनि भक्तजनांमुखीं । प्रेम घेतो निजनाम तनुमन ॥ पूर्ण० ॥ १ ॥ निजज्योतितत्त्वीं आपण सत्त्वता । करी भक्तभवबंधमोचन ॥ पूर्ण० ॥ २ ॥ जाणुनियां मनीं सोहिरा अनुदिनीं । भावें करी तुझें ध्यानभजन ॥ पूर्ण० ॥ ३ ॥

पद १०९ वें.

हरि तूं एक पाहतां निष्टंक ॥ ध्रु० ॥ वेदशास्त्रें वाचाळपणें । मिथ्या भेदी ते वादीक ॥ हरि० ॥ १ ॥ चहूं वाचातीत सौख्य ज्याचें । काय सांगों तें अमूक ॥ हरि० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निर्गुणीं भावोनी । सगुणींचा जो नायक ॥ हरि० ॥ ३ ॥

पद ११० वें.

शार्ङ्गपाणि आणी आणि हो ॥ ध्रु० ॥ विरहपणें मज नाहीं निजीं नीज । विषयसूख नयनीं नाणी ॥ शार्ङ्गपाणी० ॥ १ ॥ मथुरेसी जाउनी सर्वेचि वेउनी । येईं सये वो साजणी ॥ शार्ङ्गपाणी० ॥ २ ॥ गोरस घेउनी नित्य सेवितो । सोहिरा वंदी हो निजदानीं(?) ॥ शार्ङ्गपाणी० ॥ ३ ॥

पद १११ वें.

बोल रे नाम गोविंदाचें ॥ ध्रु० ॥ तनुमनधन तें जाणुनि अंतरीं । घोष करीं कां निशिदिनीं वाचे ॥ बोल रे० ॥ १ ॥ नामस्मरणीं भवभय हरणीं । त्रिजयप्रद निजसुखाचें ॥ बोल रे० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे नाहीं मीतूंपण । हरेल भान हें विषयसुखाचें ॥ बोल रे० ॥ ३ ॥

पद ११२ वें. (राग धनाश्री)

येईं बा हरि सांवळिया ॥ ध्रु० ॥ अहर्निशीं गोधनें चारिसी न दिससी गोवळिया । सहस्र गोपींत तूं खेळसी आनंदें घालिसी गोंधळिया ॥ येईं०

॥ १ ॥ कंदब्राचे तळीं मुरली वाजतां ऐकुनि येती मज कळवळिंया[1] । सर्व रूपीं तूंचि एक देखोनि सोहिरा ह्मणे गातों लैळिया[2] ॥ येई ॥ २ ॥

पद ११३ वें.

हर हर भोळा । जीवीं जीवाचा जिव्हाळा ॥ ध्रु० ॥ जीवपणाला जाणोनीं, जीवपणें आपणि यातें नेणोनी; जो निराळा ॥ हर० ॥ १ ॥ एवं च योगसमाधी, बुद्धिवंता टाकली बुद्धि, ते चित्कळा ॥ हर० ॥ २ ॥ कर्ता करविता हे दोन्ही, नाहीं एकपणा लागोनीं, जैसें तरुचें फळ जात्रळा ॥ हर० ॥ ३ ॥ सोहिरा बोले अनेक जल्पा, ज्याचें स्वरूप आहे अजपा, जाणे विरळा ॥ हर० ॥ ४ ॥

पद ११४ वें.

अरे ! कां रे दया न करिसी जगज्जीवना ॥ धृ० ॥ विकल्प उपजविसी, सर्व नश्वर या जीवासी; निश्चय एकचि होइना ॥ अरे० ॥ १ ॥ वृत्ति हे डळमळी, माझी प्रवृत्ति कळवळी, येती विकार नाना ॥ अरे० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निजतत्त्वचि किर, (निजतत्व चित् किर) येर हें मृगनीर; ऐसें दावीं निरंजना ॥ अरे० ॥ ३ ॥

पद ११५ वें.

मन माझें हरिनामीं रंगलें ॥ ध्रु० ॥ ज्यांहीं करोनियां, निघालों निजालया । तेथेंचि तें रमलें ॥ मन० ॥ १ ॥ अनाहतगजर नाद निरंतर । ऐकुनियां भुललें ॥ मन० ॥२॥ जेथ पाहूं गेलें, परतोनि न आलें । सोहिरा म्हणे मोहुन पडलें ॥ मन० ॥ ३ ॥

पद ११६ वें.

मुकुंदा आनंदकंदा ॥ ध्रु० ॥ तुजलागीं ध्यातां । हृदयीं दिससी सर्वदा ॥ मुकुंदा० ॥ १ ॥ निजस्वरूप देखतां भवबंध तुटता । नलगे जन हे

---

१ प्रेमानें अंतःकरण कळवळून येतें.

२ लळा ह्मणजे नाद (तोच छंद) त्यानें युक्त होत्साता, लुब्ध होय.

आपदा ॥ मुकुंदा० ॥ २ ॥ सनकसनंदना योगिया दुर्लभा । ते सुख निज पदा ॥ मुकुंदा० ॥ ३ ॥

पद ११७ वें.

आणी आणी सये यदुराज ॥ ध्रु० ॥ स्वरुपानुसंधानीं, श्रोत्रत्व वेधुनी तेंचि निजकानीं कुंडलें विराज ॥ आणी० ॥ १ ॥ जगदाभास हा अभिन्नपणीं, देखति नयनसरोज ॥ आणी० ॥ २ ॥ एकवर्ण हे शामतनु दिसे, ॥ पुरुषार्थ चतुर्भुज ॥ आणी० ॥ ३ ॥ अंतरदृष्टि हे त्रिकुटावरी, भाळीं तिलक देख रज ॥ आणी० ॥ ४ ॥ कदंबावरुनि हरि गोधनें चारी, मुखीं अनाहत वेणु वाजे ॥ आणी० ॥ ५ ॥ मूर्ति मोहनी आणुनियां मनीं, सोहिरा योजी निजकाज ॥ आणि० ॥ ६ ॥

पद ११८ वें राग मारू.

श्रीहरिच्या निज लाग छंदा ॥ ध्रु० ॥ उत्तमातिल पद हें जाण सुखाधिक जें सांडुनि सकाम धंदा ॥ श्रीहरि० ॥ १ ॥ दृश्यविषय त्यागीं, बरवें आत्मत्व भोगीं; सावध स्वरूपीं हो मंदा ॥ श्रीहरि० ॥ २ ॥ निजतेजीं साकारीं, पहिलें सोहंबीज ॐकारीं; निर्मुळ उत्पत्ति करकंदा ॥ श्रीहरि० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा निजरंगीं पैं रमतां, केवळ स्वपद ये हाता; सर्वे देखसी गोविंदा ॥ श्री हरि० ॥ ४ ॥

पद ११९ वें.

करिं करुणा जगदाभरणा प्रेम निरंत ॥ ध्रु० ॥ एक बहुपणें साम्यसमावत । गणीं असोनी गुणातीत ॥ करिं० ॥ १ ॥ वंदित मानसें भलतशा मिषें । देखें स्वरूप रूपातीत ॥ करिं० ॥ २ ॥ करणी करुनियां जाइल वायां । जाणोनियां मग नेणत ॥ करिं० ॥ ३ ॥ मागीलपुढील कांहींच नाहीं । सोहिरा देहींच देहातीत ॥ करिं० ॥ ४ ॥

पद १२० राग. कल्याण.

हे महाराज दीनदयाळ निधी ॥ ध्रु० ॥ आपें आपण देखिलि या निज । असती तूं सहज समाधि ॥ हे महाराज० ॥ १ ॥ पूर्णपणें तुज नलगे हें कांहींच । सुखदुःख भव आधि ॥ हे महाराज० ॥ २ ॥ एकें-एक हा भावुनियां जहीं । न राहे सोहिरा विविधीं ॥ हे महाराज० ॥ ३ ॥

पद १२१ वें.

हरि माझा सखा जिवलग जो निदान ॥ ध्रु० ॥ आपणावीण कांहींच-नाहीं । देतअसे निजध्यान ॥ हरि० ॥ १ ॥ [१]दोन्ही वेळे सभासिंच हें देखें । जयाचें निर्गुण अभिधान ॥ हरि० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे निज-स्वरूपीं । ज्यांहीं लावियलें अवधान ॥ हरि० ॥ ३ ॥

पद १२२ वें.

या हरिनें माझें हरिलें मन ॥ ध्रु० ॥ अवचाचि आपण बुझावुनि हे खुण । पावतां जहीं झालें अमन ॥ या हरिनें० ॥ १ ॥ स्वरूप सोडुनी दुजे भावनीं । करूं नये मग दूरि गमन ॥ या हरिनें० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मग इंद्रियवृत्तिशीं । तें सुख सेवुनि झालें शमन ॥ या हरिनें० ॥ ३ ॥

पद १२३ वें.

निज नयनीं हरि आणी वो, सये ॥ ध्रु० ॥ आत्माराम हा भावी-आराम । त्या विण नीज नये ॥ निज० ॥ १ ॥ आपें आपण पुरुषपण । देखोनि सुंदराप्रिये ॥ निज० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मग प्रेमसुखामृत । सेवुनि सहज निलय ॥ निज० ॥ ३ ॥

पद १२४ वें.

असें ! वाचे बरें बोल । राम रंगीं डोल ॥ ध्रु० ॥ जीवरूप हा शिव-पदीं पावाया । अनुभव एक सखोल ॥ असें० ॥ १ ॥ देहभावासी या-

---

१ जागृति आणि स्वप्नामध्यें.

विवशी येउनी । चित्त स्वरूपीं वेधेल ॥ असें० ॥ २ ॥ मायाजाळ हें मिथ्या भावेंनी । चैतन्य एक निवटेल ॥ असें० ॥ ३ ॥ सकळ मनोगम हारोनी आराम । निलय तें सोहिरा समजेल ॥ असें० ॥ ४ ॥

पद १२५ वें.

जयजय महादेवी । तुज गाईन अनुभवीं ॥ ध्रु० ॥ अंतर दृष्टि नादसी, सवें निजसुखें बससी । नससी अविद्या ग्रामीं ॥ जय० ॥ १ ॥ उभय पदींची स्वामिणी, सवें देखिजे निर्गुणीं । एकीएक तूं बरवी ॥ जय० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मग गुण गावया, या करीसी उपाया, चारीवाचा चेववी ॥ जय० ॥ ३ ॥

पद १२६ वें.

गंगे निजजननि भागीरथी ॥ ध्रु० ॥ चहूंवाचे वाचाळ, धुवोनियां निर्मळ । न्हेई शांतिचिया पंथीं ॥ गंगे० ॥ १ ॥ शमदम शांतितूष्णी; तटाकांचे स्वामिणी । तुजविणें योगाचि हा नाथी ॥ गंगे० ॥ २ ॥ कलिमलनाशिनी विमलाक्षलक्षिणी । सोहिरा म्हणे जीवन हें मंथीं ॥ गंगे० ॥ ३ ॥

पद १२७ वें.

मुरारी नांदे निरंतरीं ॥ ध्रु० ॥ ऐसेंचि भावुनि, नित्य समाधानीं । पाहे पां अंतरीं ॥ मुरारी० ॥ १ ॥ ज्याचिये स्मरणीं, ज्ञान उगाणी । भवभ्रम दूर करीं ॥ मुरारी० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग अनुभवीं पाहतां । जन्म मरण वारी ॥ मुरारी० ॥ ३ ॥

पद १२८ वें.

या हो या । वरगिरिवरधारी रंग बहार ॥ ध्रु० ॥ मोहन मूरतसांवळी सांवळसूरत । मोरमुकुट आभार ॥ या हो० ॥ १ ॥ नेसी पितांबर,

निजमुखीं सुस्वर । मुरलीध्वनि हे नभभर ॥ या हो० २ ॥ सोहिरा ह्मणे तुझे कृपेकरुनी । न धरेचि हा भवभार ॥ या हो० ॥ ३ ॥

पद १२९ वें.

हरि हरि ह्मणतां रे अपार सुख तें ॥ ध्रु० ॥ स्मरणीं निमग्न स्वरुपीं संलग्न । सगुणींच निर्गुण सुख तें ॥ हरि० ॥ १ ॥ अंतरिक्ष जपणें अलक्ष । सर्वे निवारी दुःखार्तें ॥ हरि० ॥ २ ॥ मनोविलास हा होय निराश । विषय सुख मग दुःखचि तें ॥ हरि० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निजानंदीं । पावोनी सेवीं पीयुष तें ॥ हरि० ॥ ४ ॥

पद १३० वें.

चार चारती धेनुरे । गोपाळ बाजवी वेणु ॥ ध्रु० ॥ उषःकाळींचे समयीं, गिरिधर प्रेमाळयाच्या ठायीं । नूपुरें वाजती रुणझुणु ॥ चार० ॥ १ ॥ शुक बोलत होते शब्द, ऐकोनि झाले स्तब्ध । नादीं लुब्धला हरिणु ॥ चार० ॥ २ ॥ तर्कस लाउनियां, पाराधियें ओढिली कां नाडी । ऐकोनि विसरला तो बाणु ॥ चार० ॥ ३ ॥ गुण ऐकोनि दुर्लभ, सोहिरा ह्मणे होतो लाभ । ऐशा कैसा ध्यानीं नाणूं ॥ चार० ॥ ४ ॥

पद १३१ वें.

आतां चिंता ते कायसी । निजसुख घरीं आपैसी ॥ ध्रु० ॥ सदैव निज-उल्हासीं । राहोनि हरिं हे माया त्रिवशी ॥ आतां० ॥ १ ॥ कांहीं कल्पूं नका मानशीं । स्वेच्छा विचरतो हृषिकेशी ॥ आतां० ॥ २ ॥ भक्तांचिया-काजा । धांवणें लागे अधोक्षजा ॥ आतां० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे करणें धरणें । अवघें देवा हातीं होणें ॥ आतां० ॥ ४ ॥

---

१ तिरकमटा.

पद १३२ वें.

नित्य स्मरण तुझें, ' हरिरूप दुजें ' ॥ ध्रु० ॥ हें बहुनाम, पाववी निजधाम । परमामृतसुख सेवूं जें ॥ नित्य० ॥ १ ॥ आपेंचिआपण, जेथिल हे खुण । जाणोनियां माझें मीच बुझें ॥ नित्य० ॥ १ ॥ संकल्प विकल्प हे, हारोनियां जहीं । सांगत निज जीविंचीं गुजें ॥ नित्य० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मग, तेंही विसरुनी । निजसुखीं निजलाचि निजें ॥ नित्य० ॥४॥

पद १३३ वें.

दावीं वदन हरि हरिं हा मदन ॥ ध्रु० ॥ या विषयीं मज देई विवेसी । येउनि पावे तें निज-सुखसदन ॥ दावीं० ॥ १ ॥ सकळही इंद्रियें न्हेई निजालयीं । सर्वेचि आटुनि करिं कां कदन ॥ दावीं० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे परात्पररूपीं । जीवपण हारोनि करिं कां तर्पन ॥ दावीं० ॥ ३ ॥

पद १३४ वें. (राग कानडा)

तुझा तूंचि राखें जी हें निजब्रीद ॥ ध्रु० ॥ निष्काम निर्द्वंद्व निःसंग निर्मळ । जितेंद्रिय तूं ब्रह्मविद् ॥ तुझा० ॥ १ ॥ तुजला देखतां आपेंचि तत्त्वता । आनंदती नयनारविंद ॥ तुझा० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निशिदिनीं भावितां । हृदयींच तूं गोविंद ॥ तुझा० ॥ ३ ॥

पद १३५ वें.

हे घनःश्यामा करि कां आरामा ॥ ध्रु० ॥ आनंदेंआनंद होय स्वतः-सिद्धचिदंतर्यामा ॥ हे घनःश्यामा० ॥ १ ॥ हें सुखसार जाण निरंतर । सर्वें हा भवभास विरामा ॥ हे घनःश्यामा ॥ २ ॥ एकीएक हा सर्वसमूहा । तेथ देखे कोण परीमा ॥ हे घनःश्यामा० ॥ सोहिरा ह्मणे जहीं आहे अनु-पम । तेथ देऊं कोण उपमा ॥ हे घनःश्यामा० ॥ ४ ॥

---

१ तिटकारा, त्रास

२ सूर्य (ज्ञानसूर्यकर.)

३ पराशक्ति आणि मा ह्मणजे लक्ष्मी.

पद १३६ वें. (राग धनाश्री)

तुझी अघटित करणी ॥ बोलणी हींच उणीं ॥ ध्रु० ॥ आपेंआपण दृश्य प्रकाशक । देखों दिलाजे तरणी ॥ तुझी० ॥ १ ॥ अविनाश तूं नाशवंत हें । देह जननमरणीं ॥ तुझी० ॥ २ ॥ आत्मानुभवीं माया अवयव । हरिसी संसरणी ॥ तुझी० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे जहीं एकीं अनेक । भावोनि लागें चरणीं ॥ तुझी० ॥ ४ ॥

पद १३७ वें.

हारि निजनिर्धारीं भावा तुम्हीं निरंतारिं हो ॥ ध्रु० ॥ स्मरण सुखें संतोष, निजउल्हासें । आपण प्रकटे पां अंतरीं हो ॥ हारि० ॥ १ ॥ अवलोकितां सृष्टि, सर्वे निजात्मतेचे दृष्टि । दिसे आपण चराचरीं हो ॥ हारि० ॥ २ ॥ भावें जारि भावाल, सर्वे निजसुख पावाल । श्रम नाहीं या संसारीं हो ॥ हारि० ॥ ३ ॥ साभासाला हरिला, भासीं अवभास दाविला । सोहिरा ह्मणे निराकारीं हो ॥ हारि० ॥ ४ ॥

पद १३८ वें. (राग पूर्वी)

माई वो सखि दीनदयाळी ॥ ध्रु० ॥ भावें भावितां करणी, अगम्य तुझी स्वरूप नवाळी हो ॥ माई० ॥ १ ॥ ऊर्ध्व मुळींहुनि शाखा आदि, करोनि तरूचि जिव्हाळि हो ॥ माई० ॥ २ ॥ साम्य समरशीं चिद्विलाशीं, अससी निजीं निर्मळीं हो ॥ माई० ॥ ३ ॥ आर्तरुपें तुज जाणुनी सहज । सोहिरा शरण तव चरणकमळिं हो ॥ माई० ॥ ४ ॥

पद १३९ वें. (राग पूर्वी)

करणी तुझी अलगट ॥ ध्रु० ॥ आपुलिया पदीं प्रेम देउनी । हरिसी भव संकट ॥ करणी० ॥ १ ॥ स्वरूप संबधीं देसि समाधी । निजसुखामृत घोंट ॥ करणी० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे जहींचि विकृति । झाली मनासी तहीं भेट ॥ करणी० ॥ ३ ॥

पद १४० वें. (राग धनाश्री)

हे घनशाम गाऊं निज नामसुधा ॥ ध्रु० ॥ निजसुख एकचि, मानुनि साचीच; हरूं हा भास विविधा ॥ हे घनशाम० ॥ १ ॥ नित्य ध्यान हें गोड निदान; नाहीं मग हा भव बाधा ॥ हे घनशाम० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे निज दिठी लागोनी, देखें स्वरूप अगाधा ॥ हे घनशाम० ॥ ३ ॥

पद १४१ वें.

कांरे सत्व पाहसी हृषिकेशी । प्रकट न करितां अंतरीं आपैसी । पाडिसी मिथ्या अविचार माया विवशी ॥ अझुनि करुणा तूजला नये रे कैशी ॥ कांरे० ॥ १ ॥ मज या देहीं देउनी जीवपण । विषय विलासीं लावुनियां भ्रमण । माझें मज न दावुनी निज उगाण । ऐसें तुझें हें काय ? बरवेपण ॥ कांरे० ॥ २ ॥ जगप्रसिद्ध तूं कीं दीनदयाळ । तुजला ऊपजे निजभक्तांची कळवळ । त्यां कारणें परमामृत कल्लोळ । सेवविसी तूं अंतरींच घननीळ ॥ कांरे० ॥ ३ ॥ सत्वर, नवजाई मी या विकल्पाच्या काजा । ऐसें करि कां जगज्जीवन अधोक्षजा । कारणकार्यीं प्रकटोनियां सहजा । हेंचि भावोनी अभाव निजीं निजा ॥ कांरे० ॥ ४ ॥ सोहिरा तूजला शरण येतो भावें । भावातीत ते परब्रह्मचि आघवें । बोलों जातां तें शब्दासी न ठावें । पूर्णज्ञान आपणापेंचि द्यावें ॥ कांरे० ॥ ५ ॥

पद १४२ वें.

निराकार निर्द्वंद्वा निर्गुण परब्रह्मा । तुझेनि योगें परमसुख ॥ ध्रु० ॥ तुझिया स्वरुपाची न कळे मजला मति । वाचा कृष्णकृष्ण ह्मणवुनि गाती । निरंजना पावों तुज श्रीपति । तुझी देईं मजला निजभक्तिरे ॥ निराकार० ॥ १ ॥ तुझा तूंचि बोलविसी वाचे करवीं । अनुभवाचीं बोलणीं ऐशीं बरवीं । मन कमळ प्रकाशीं आत्मा-रवी । तुझिया ज्ञानयोगें हा मिरवी रे ॥ निराकार० ॥ २ ॥ निराकारा तुझा तूंचि सहज महाराजा । सर्व स्वरूपीं

असती तूं वि-रजो । तूंचि जीवन नलिनी कायाकंजा । तुझिया नामाचा त्रिभुवनीं गर्जा रे ॥ निराकार० ॥ ३ ॥ सोहिरा तुझ्या नामेंचि रुतलों ।

---

१ रजोगुण विरहित (रजोगुण प्राधान्य जीं कर्मेंद्रियें त्यांव्यतिरिक्त)

२ रुतला असें ह्मणण्याचा गुह्यार्थ असा आहे कीं "प्रजापति आत्मा हा अश्व रूप आहे" असें बृहदारण्यकांत सांगितलें आहे. प्रत्येक योग्यानें योगाची पूर्ण सिद्धि मिळविण्याकरितां या अश्वरूप आत्म्याचा योगशास्त्रीय पद्धतीनें देहांतले देहांत (हयमेध) केला पाहिजे. त्यासाठीं पहिल्यानें तो अश्व अष्ट दिशांस फिरवून निर्वैर (निष्कामवृत्ति) करून कूटस्थ ह्मणजे निर्विकार आत्म्याच्या ठायीं रुतून ह्मणजे गुंतून राहील असें झालें पाहिजे. कारण तो परम उच्छृंखल आहे. तो ठाण-बंध (बधनावांचून) रुतून राहिला पाहिजे (ह्मणजे ठाणबंध तुरग ब्रह्मचर्य उपयोगीं नाहीं हें रहस्य) तुकोबांनीं एका पदांत ह्मटलें आहे कीं:—[घोडा रोवूनि लाविला खुंट] तसेंच, 'वास्तविक उंटावर नगारा बांधतात, पण तुकोबांनीं ह्मटलें आहे [नगाऱ्यावर चढविलें उंट] या पदाचा भावार्थही हाच आहे. तें पद समयोचित व परमार्थानें भरलेलें असून प्रस्तुत पदाच्या रहस्याशीं जुळतें आहे ह्मणून येथें दिलेलें आहे. तुकोबांनीं वर जो "खुंट" ह्मटला तो (स्थाणु) कूटस्थ हे लक्षांत ठेवलें पाहिजे. [तमाशा संतांघरीं । निर्गुण पूरीं ॥ ध्रु० ॥ गांवावर एक बाभुळ । खालीं सेंडा वरतें मुळ । खालीं कळस वर देऊळ । गत आहे न्यारी ॥ तमाशा० ॥ १ ॥ फुला आधिं गुंफिला तुरा । याचा अर्थ करीं चातुरा । कोण पुरा असेल चतुर । खोविल शिरीं ॥ तमाशा० ॥ २ ॥ घोडा रोवुनि बांधिला खुंट । नगाऱ्या वर चढविलें उंट । कोण पुतळा असेल बळिवंत । अर्थ विचारी ॥ तमशा० ॥ ३ ॥ दिवा वारा घालितसे सेव । ह्याचा घ्या हो तुह्मीं अनुभव । तुका वैकुंठींचा राव । गत आहे न्यारी ॥ तमाशा० ॥ ४ ॥] या विषयाच्या संबंधानें "श्रीरंगनाथ स्वामि निगडीकर" यांचें प्रत्यक्ष उदाहरण असें आहे कीं:—'श्रीरंगनाथ बदरिकाश्रमा-मध्यें अल्पवयांतच निघून गेले होते व तेथें तप आचरित असतां त्यांस व्यासोनारा-यण यांनीं दर्शन देऊन सांगितलें कीं; त्वां घरीं जावें कारण मातापितरें घरीं तुझी वाट पहात आहेत. यासाठीं आतां येथें राहूं नकोस. जातांना वाटेंत, टेरी येथील पहाडी राजाची भेट घे, ह्मणजे तो तुला एक घोडा व सरंजाम देईल तो स्वीकृत कर. आणि त्या घोड्याचीं पाउलें, ज्याठिकाणीं खडकावर रुतून घोडा अडून राहील तेथेंच त्वां आश्रम करावा. इतःपर इकडे येण्याचें कारण नाहीं. त्या ठिकाणींच तुला भगवत्साक्षात्कार होऊन संतभेटी होतील.' त्याप्रमाणें निर्गुणपूर (निगडी) येथें त्याचा घोडा ओढ्यांत खडकावर एकाएकीं पावलें रुतून अडला; त्यामुळें व्यासांनीं दिलेली

प्रेमयुक्त तेथेंचि गुंतला । परमामृत सेवुनियां शांत झाला । ज्याचे दृष्टीं भव हा विक्रंतला रे ॥ निराकार० ॥ ४ ॥

खुण जाणून त्यांनीं तेथेंच कायमचा मुक्काम केला; त्या घोड्याचें नांव मनोहर असें ठेवलें होतें, तेंही ठीकच होतें. त्याचें वर्णन, विठ्ठलपंत अण्णा दप्तरदार यांनीं मुश्लोकलाघव ग्रंथांत येणेंप्रमाणें केलें आहेः—शूरकुलालंकारं विबुधात्याहृतपदांबुजद्वितयम् । निगडीकृतसंस्थानं कविनाथं रंगनाथमवलंबे ॥ १ ॥ यस्य मनोहरनामा हरिः सहायो नरोऽस्य नीलांगः । अरिवर्ग विजित-वतो द्रुततरसद्गतिदः कोनु विवदेत ॥ २॥ ह्याप्रमाणें ह्या बाह्यत्वें प्रत्यक्ष वस्तु देऊन व्यासांनीं स्वामीस ही खूण दिली होती हें चतुर तज्ज्ञ वाचकांच्या लक्षांत येईलच. रंगनाथांचा योगाभ्यास अद्यापि पूर्ण व्हावयाचा होता. आणि त्यांस परंपरागत ज्ञान प्राप्त व्हावयाचें होतें. परंतु तें प्राप्त होण्यापूर्वीं यांची तयारी असणें जरुर होतें. म्हणून व्यासांनीं ही खूण म्हणजे ज्या ठिकाणीं (मनोभूमीवर) पूर्वोक्त अश्वरूप आत्मा प्रजापति, रुतून राहील तेथेंच तूं राहा अशी गुप्त खूण दिली होती. त्याप्रमाणें खूण पटल्याबरोबर, रंगनाथ हे अर्थात् (निर्गुणपुर) निगडी येथें गीतेंत सांगितल्याप्रमाणें “ निस्त्रैगुण्य ” होऊन कायमची वस्ती करून राहिले. व पुढें इतकी पूर्तता झाली तेव्हां त्यांस “श्रीक्षेत्र पंढरपूर येथें कीर्तनप्रसंगीं मातापितरांची गांठ पडली (पंढरपूर येथेंच मातापितरांची गांठ पडली हा सर्व संबंध मनन करण्यासारखा आहे.) पुढें ईश (दत्त) त्यांजपासून शिष्य ‘ सदानंद ’ त्यांपासन रामानंद त्यापासून अमलानंद, त्यापासून पूर्णानंद व त्यापासून “ रंगनाथांचे वडील निजानंद या परंपरेनें आलेला निजानंद रंगनाथांस प्राप्त झाला (निजानंद हा योग्यांवांचून इतरांस प्राप्त होत नाहीं) असो. पुढें स्वामीचा हा घोडा रुतून किती ठाणबंध झाला होता व त्यांचें नैष्ठिक ब्रह्मचर्य किती अवर्णनीय होतें हें पुढील गोष्टीवरून ध्यानांत येईलः—“ स्वामीपाशीं चद्दम्मा व भागम्मा अशा दोन रंगारी जातींतील तरुण मुली नेहमीं स्वामीच्या सेवेंत राहत असत. “ त्याही स्वामिप्रसादानें निर्विषय होत्सात्या नित्य समाधिस्थ राहून आत्मानंदांत निमग्न असत. ” परंतु लौकिकदोषदृष्ट्या हा व्यवहार विपरीत दिसे, हें उघड आहे. एका प्रसंगीं प्रत्यक्ष शिवछत्रपतींच्या मनांत हा विपर्यास उत्पन्न झाला, हें स्वामींनीं अंतर्ज्ञानानें जाणलें व त्यांस एकांतांत बोलावून नेलें आणि एक मोठें घंघाळ आणून त्यांत ‘ योगबलानें ’ वीर्यस्खलन केलें, त्यानें सारें घंघाळ भरून गेलें; नंतर एका काडीनें त्यांतला एक थेंब घेऊन शिवाजीच्या तळहातावर ठेवला, त्याबरोबर लागलाच तेथें फोड उठला. तेव्हां स्वामी म्हणाले बाबा पहा ! अरे ! हें ब्रह्मरेत आहे, हा प्रत्यक्ष अग्नीच होय. ह्या रेतास

पद १४३ वें.

नाम तुझें मी घेतां निशिदिनीं, विसरें हें भवदुःख ॥ ध्रु० ॥ रामकृष्ण विठ्ठल वदतां वाटे, सहजींचाचि हरीख ॥ नाम० ॥ १ ॥ पराप्रेमप्रमेय

(बिंदूस) आम्हीं जिंकून स्वाधीन करून ठेवलें आहे. पण आम्ही उर्ध्वरेते आहों हें अज्ञजनास कळत नाहीं. आतांच चमत्कार पहा असें ह्मणून पुनः तें सर्व रेत शिस्नद्वारानेंच आकर्षण करून आपल्या शरिरांत ओढून घेतलें, तेव्हां शिवाजीची खात्री झाली. सारांश. याचेंच नांव खरें ब्रह्मचर्य, याचेंच नांव खरा संन्यास, याचेंच नांव अश्वमेध (यज्ञ) व या सर्व गुप्त कृतीचा जो कळस, त्याचेंच नांव योग, हें होय. आणि ह्याच (सोहिरा तुझ्या नामेंचि रुतला असें ह्मणण्याचा) सोहिरोबांचा उद्देश होय. त्या सर्व गोष्टी अनुभवाच्या आहेत पण याच्या समर्थनास बृहदारण्यकोपनिषद् अध्याय पहिला व विशेषेंकरून त्यांतील (ब्रा० १--२--३) पहा. त्यांतून या ह्मणण्याच्या आधाराकरितां पुढें लिहिलेले वेंचे घेतले आहेत. मंत्र ७ चें मराठी भाषांतरः—“त्याला (प्रजापतीला) इच्छा झाली कीं, हें माझें शरीर यज्ञ करण्यास योग्य (मेध्य) व्हावें (ह्मणजे अर्थात् शुद्ध व्हावें.) अशाकरितां कीं, शरिराच्या योगानें मी शरीरी व्हावें त्याप्रमाणें इच्छा झाल्यावर तो अश्व झाला. कारण तें शरीर अश्ववत् झालें ह्मणजे फुगलें, आणि मेध्य झालें ह्मणजे यज्ञ करण्यास योग्य झालें; आणि ह्याच कारणास्तव घोड्याच्या यज्ञाला अश्वमेध अशी सज्ञा आहे. जो त्याला ह्याप्रमाणें जाणतो तो अश्वमेध जाणतो. मग त्या अश्वाला मोकळा सोडून तो आपणच अश्व आहों असें समजला. एक संवत्सर लोटल्यावर त्यानें त्याला स्वतःलाच अर्पिलें. आणि दुसरे पशु देवतांला दिले. ह्मणून प्रजापतीच्या ह्या शुद्ध अश्वाला याज्ञिकांनीं सर्व देवतांस अर्पण केलें. जो हा प्रकाशतो (सूर्य) तो अश्वमेध होय. (अर्थात् अश्वमेध करणारे सूर्यलोकीं जातात असा भाव) संवत्सर हा त्याचा देह होय. हा अग्नी अर्क होय. हे तीन लोक त्या अर्काचे (अर्क=अश्वमेधाच्या वेळीं पेटविलेल्या अग्नीचें नांव.) निरनिराळे अवयव होत. हे दोघे (अग्नि आणि आदित्य) ह्याप्रमाणें अर्क आणि अश्वमेध होत. हे पुनः एक देवतारूप होत. ही देवता अर्थात् मृत्यु होय. हें जाणतो तो दुसरा मृत्यु जिंकतो. मृत्यु त्याला गाठूं शकत नाहीं. मृत्यु त्याचा आत्मा होतो. तो त्या देवतांपैकीं एक होतो.]

१ राम, कृष्ण आणि विठ्ठल या क्रमानेंच झालेल्या अवतारविशिष्टदेवांविषयीं सोहिरोबांनीं वारंवार उल्लेख केलेला आहे. तुकोबांचेंही या तीन देवांविषयीं प्रेमातिशयत्व दिसून येतें. स्वर्गारोहणप्रसंगीं याच नामाचा गजर करीत तुकोबा गेले. राम कृष्ण विठ्ठल बोला। तुका जातो वैकुंठाला ॥ असें स्वर्गारोहणप्रसंगींच्या प्रत्येक अभंगाचे शेवटीं ह्मटलें आहे.

होवैरियेंत भोगीं शांती सूख ॥ नाम० ॥ २ ॥ निरंजनिं निजल्या हें मन उन्मन, असतां नाहींच देख ॥ नाम० ॥ ३ ॥ अधोभास हा सोडुनि आपण, करवी तें ऊर्ध्वमूख ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे हें अनादि भेटे, मजमाजीच पियुख ॥ नाम० ॥ ५ ॥

पद १४४ वें.

हरिनाम सुधारस हा । नित्य सेउनियां ध्यावें ॥ ध्रु० ॥ आपेंचि आपण घेउनि हे खुण । मोक्ष सुख साधावें ॥ हरि० ॥ १ ॥ अलक्ष लक्षुनी सहज समाधी हे । चित्तस्वरुपीं वेधावें ॥ हरि० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे सकळांसि गणी तें । मीपण हें शोधावे ॥ हरि० ॥ ३ ॥

पद १४५ वें.

अपरिमीत अविनाश अनामा ॥ ध्रु० ॥ निराकारनिर्विकार निरालंबनिजसुखधामा ॥ अपरिमीत० ॥ १ ॥ निरामय निर्गुण निरंतर निगम अगम्य आत्मारामा ॥ अपरिमीत० ॥ २ ॥ निरूपाधि निःसंग निर्मळ निर्भर नित्यानंद निरुपमा ॥ अपरिमीत० ॥ ३ ॥ अनादि अखंड अद्वैत अभेद अनवरत अमृतघन आरामा ॥ अपरिमीत० ॥ ४ ॥ देवा भक्तकल्पद्रुमा हृदयआरामा मुनिजन मन विश्रामा ॥ अपरिमीत० ॥ ५ ॥ जगदभ्रव्योमा पराप्रमदा प्रेमा सोहिरा ह्मणे अगमा ॥ अपरिमीत० ॥ ६ ॥

पद १४६ वें.

छंद लागला हो अखंड श्रीनाथजीचा ॥ ध्रु० ॥ सहज हारिख जेथ नाहीं रूप रेख । तो हा देख गोरखनाथजीचा ॥ छंद० ॥ १ ॥ मन मोहन गहन सज्जन रंजन । अलॅख निरंजनजीचा ॥ छंद० ॥ २ ॥ निःसंग

---

२ खोलींत (कोंकणांत खोलीस होवरी ह्मणण्याचा प्रघात आहे.)

१ या पदांत सोहरोबांनीं आपले "परमात्मस्वरूप गुरू गोरखनाथ" यांच्या विषयीं प्रेमोद्गार प्रदर्शित केले आहेत.

निष्काम कल्पद्रुम हा आराम । सहज आत्माराम नाथजीचा ॥ छंद० ॥३॥ सोहिरा ह्मणे भोगी ना त्यागी अनाहत शिंगी । विराजे राजयोगी जोगीनाथ-जीचा ॥ छंद० ॥ ४ ॥

पद १४७ वें.

लागो रे आवडी तुझीच अखंड आत्मारामा ॥ ध्रु० ॥ आजी मजमाजी भक्त काज कल्पद्रुमा ॥ लागो रे० ॥ १ ॥ जीवींचें हें गुज सोहं बीज निजधामा ॥ लागो रे० ॥ २ ॥ कल्पना हे टळो मी पण गळो मिळो निरंतर आत्मारामा ॥ लागो रे० ॥ ३ ॥ निराकार निराधार निःसंग नि-ष्कामा ॥ लागो रे० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे आकार सांडुनियां तदाकार सदा सुख आम्हा ॥ लागो रे० ॥ ५ ॥

पद १४८ वें.

देशिल जरि तरि हें देणें ॥ ध्रु० ॥ मी पण मावळे दिठी पुंजाळे कल्पना गळे जग जळे हें तेणें ॥ देशिल० ॥ १ ॥ विषयां वेगळें सुख, 'नाहीं रूप रेख', सहज समाधान होय जेणें ॥ देशिल० ॥ २ ॥ जळीं मिळालें लवण जळचि झालें तेवीं मनासि नाहीं येणें ॥ देशिल० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे जया काया नाहीं माया पवन गगनीं लयासि न्हेणें ॥ देशिल० ॥ ४ ॥

पद १४९ वें.

तुजविण रे दाता तारी कोण मज आतां ॥ ध्रु० ॥ या त्रिविधपणें मज वेढुनि केला बहुसाळ वेडा । येथ न चाले मम सत्ता ॥ तुजविण० ॥ १ ॥ विदेहता नाठवूनि झाली देहत्व सिद्धता । अज्ञानें आकळुनी पृष्ठीं लागली ममता ॥ तुजविण० ॥ २ ॥ विकल्प उदधींत पडोनी बुडतों समूळ मी पाहीं । काढी कोण तरि वरुता ॥ तुजविण० ॥ ३ ॥ जाणोनियां मानशीं वरी तूं अकल्पित देसी । वंदी सोहिरा देहातीता ॥ तुजविण० ॥ ४ ॥

पद १५० वें.

तुझिया स्वरूपीं हें मन सुखावलें हो ॥ ध्रु० ॥ आकारातीत निरंतरा तूं निर्गुण निराकारा ॥ तुझिया० ॥ १ ॥ परात्पर प्रेमातीता अकल्प-कल्पद्रूमा ॥ तुझिया० ॥ २ ॥ सदसतसत्ता देवा तूं प्रबुद्ध वन वसतां ॥ तुझिया० ॥३॥ सोहिरा म्हणे दीनबंधु परमामृत सिंधु ॥ तुझिया० ॥४॥

पद १५१ वें.

रंगलें लौकीकलाज सांडुनी या हरि रंगीं ॥ ध्रु० ॥ नगवत् जग मग मानुनि शुद्ध सुरंगीं ॥ रंगलें० ॥ १ ॥ सोडुनी संग निःसंगझालें चैतन्यसिंधुतरंगीं ॥ रंगलें० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मज अवचित देणें येणें जग चळे जेणें एकचि हा तंतु दुरंगीं ॥ रंगलें० ॥ ३ ॥

पद १५२ वें.

आलों संसारीं आम्ही करावया सेवा ॥ ध्रु० ॥ भावातीत निखिल निरंजन निर्विकार या निर्गुण देवा ॥ आलों० ॥ १ ॥ सर्वही सोडुनी प्रपंच, हा घेउनी बैसलों निज धन ठेवा ॥ आलों० ॥ २ ॥ श्रवण मनन निदिध्यास तुजशीं ध्यातों निशिदिनीं दयार्णवा ॥ आलों० ॥ ३ ॥ नको हे जन नलगे भोजन खाउनि बैसलों हाचि मेवा ॥ आलों० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे तुज अनादिसिद्धा गोसाविया महानुभावा ॥ आलों० ॥ ५ ॥

---

१ खाऊन बैसलों हाचि मेवा या ह्मणण्याचा उदेश असा आहेः—“ बृहदारण्यकोपनिषदामध्यें असें सांगितलें आहे कीं, ज्ञानेंद्रियांच्या ठायीं जे सत ऋषी आहेत त्यांचें ज्याला ज्ञान होतें, ह्मणजे जो तें जाणतो तो सर्वभक्षक होतो. आणि सर्व त्याचें भक्ष्य होतें. बृहदारण्यक अ० २ ब्रा० २ मं ३–४ यांत येणेंप्रमाणें ह्मटलें आहे [३ एक पानपात्र आहे. त्याचें तोंड खालीं आहे आणि त्याचें बूड वर आहे. त्यामध्यें यश नानारूपानीं ठेवलें आहे. त्याच्या प्रांतभागीं सप्तऋषी बसले असून आठवी जिव्हा ब्रह्माशीं संवाद करिते. ज्याचें खालीं तोंड आहे व वर बूड आहे, असें जें हें पानपात्र तें शिर होय. कारण त्याचें तोंड खालीं असतें आणि बुड-

पद १५३ वें.

देव ह्मणोनि हाक मारोनि सरली। मग उरली चैतन्य प्रभा ॥ ध्रु० ॥ देव ह्मणोनि पाहूं जातों। शेवटीं होय तोचि तो ॥ १ ॥ पाहणेंची दडली तुटी। तंव जीव नामाची जाहली बोभाटी ॥ २ ॥ सोहिरा ह्मणें हेंचि समज। मग सुखेंचि नीज आपुल्या ठायीं ॥ ३ ॥

पद १५४ वें.

काय तरि उणें निजस्मरणें ॥ ध्रु० ॥ याही सुखाहुनि थोर। आनी नाहीं दुजें तुळणें ॥ काय० ॥ १ ॥ सौख्य परात्पर भावोनि तत्पर। ध्यावें ह साहाणें ॥ काय० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे दृढ पैंगा। निज हृदयीं धरणें ॥ काय० ॥ ४ ॥

पद १५५ वें.

नाम हरीचें जपतां गोड ॥ ध्रु० ॥ प्रेमोल्हासें ज्योति प्रकाशे। पुरतें निज सुख कोड ॥ नाम० ॥ १ ॥ नित्य निजरंगीं ज्ञान अनंगीं। नलगे इंद्रिय चाड ॥ नाम० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मग निजसंजीवनीं। न धरे संशय आड ॥ नाम० ॥ ३ ॥

(मस्तक) वर असतें. जें नामरूप यश त्यांत ठेवलें आहे असें ह्मटलें आहे, तें अर्थात् त्या शिराच्या ठायीं जे प्राण तद्रूप होय. त्याच्या प्रांतभागीं जे सप्तऋषी बसले आहेत असें ह्मटलें आहे ते अर्थात् प्राण (इंद्रियें) होत. आणि आठवी जिव्हा ब्रह्माशीं संवाद करिते असें जें ह्मटलें आहे तें स्पष्टच आहे. कारण आठवी जिव्हा ती ब्रह्माशीं (हें शब्द ब्रह्म होय) संवाद करिते. ४ हे दोन (कान) गौतम व भारद्वाज ऋषी होत. उजवा कान गौतम व डावा कान भारद्वाज. हे दोन (नेत्र) विश्वामित्र व जमदग्नि ऋषी होत; उजवा विश्वामित्र आणि डावा जमदग्नि. हे दोन (नाकपुड्या) वशिष्ठ व कश्यप ऋषी होत; उजवी वसिष्ठ व डावी कश्यप. जिव्हा ही अत्री होय. कारण जिव्हेच्या योगानें अन्न भक्षिलें जातें. अत्री ह्मणजे अन्न खाणारी. हें जो जाणतो तो सर्व भक्षक होतो, आणि सर्व त्याचें भक्ष होतें.] विशेष विस्तार मुळांत पहा.

पद १५६ वें.

तुज कोणतरि गाय हरि ॥ ध्रु० ॥ सद्रूपभास हा अम्मल शोषणी । देती झुलतझुलरी ॥ तुज० ॥ १ ॥ चिद्रूपसागरीं आपुलिया भरीं । आपेंचि येति लहरी ॥ तुज० ॥ २ ॥ आनंदात्मय ब्रह्मांडींहुनि । बोलवी निज वैखरी ॥ तुज० ॥ ३ ॥ स्वरूपीं सामावुनि ज्योति प्रकाशुनि । सहज सोहिरा देह धारी ॥ तुज० ॥ ४ ॥

पद १५७ वें.

कांहीं मोक्षाची तरतुज करणारे! हो काळ हरणारे! सार्थक करणारे- मनबुद्धि आवरणारे! हो ॥ १ ॥ कर्म हें कसुटें सहसा नसुटे यावत् फिरणारे । जावत् देह तावत् पोट भरणारे! हो ॥ २ ॥ निजसुख उगम पावुनि सुगम आगमनिगम मौनावति! रे । तें पद पावा तुह्मीं भवनदी पार उतरणारे! हो ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे अहंकृति न ह्मणा रे । नाथ दत्त संकेत सतत सुखीं जीव रूप उद्धरणारे! हो ॥ ४ ॥

पद १५८ वें.

उन्मनि हे लागली ॥ ध्रु० ॥ चित्त वृत्ति हे विरागली । ना आठव मागली । तन्मयेशीं जागली ॥ चिन्मय सुखीं निजतांना उमगली ॥ उन्म० कल्पना उल्लंघिली । कवणें नेणों भोगिली । हे रूपाविण चांगली ॥ १ ॥ सोहिरा ह्मणे न सांगोनियां सांगिली ॥ उन्मनि० ॥ २ ॥

पद १५९ वें

मज परम सुखी केलें तेणें हो ॥ ध्रु० ॥ सार्थकचि केलें नरदेहाचें । निरसनचि केलें संदेहाचें । दिव्यदर्शन झालें विदेहाचें । सर्व विश्वचि चळतें जेणें हो ॥ मज० ॥ १ ॥ अवघें दुमदुमिलें आकाश । दिनरजनी विरहीत प्रकाश । झाला निरंजनींच विकास । आतां पुन्हा जन्माला नाहीं येणें हो

॥ मज० २ ॥ हें साधन साध्यचि वाटे देहपण । दिधलें अविनाश देणें हो । सोहिरा ह्मणे 'मी' त्याचें स्वरूप नेणें हो ॥ मज० ॥ ३ ॥

पद १६० वें.

राम¹रूप झाले प्राणी ॥ ध्रु० ॥ अंतरीं दीप³क उजळला । मी कोण कळला । अभिमान गळला । मिळोनि गेले निर्वाणीं ॥ रामरूप० ॥ १ ॥

---

१ (तूं मी,) (तें, हें,) (आपण, दुसरा) हीं युग्में परस्पर विरुद्धार्थी आहेत यांत संशय नाहीं. अन्यतेचा प्रतियोगी जो "स्वयं" शब्द तो कूटस्थवाची असें समजावें. त्या कूटस्थ आत्म्यावर तूं या शब्दाचा प्रतियोगी जो 'मी' शब्द तो कल्पिलेला आहे. मीपणाचा प्रत्यय आल्यावांचून बाहेरचें जग आह्माला कदापि समजणार नाहीं. ह्मणून अहंवृत्तीस क्षणोक्षणीं जन्म आणि नाश आहेत, त्याअर्थी विज्ञान हें क्षणिक आहे व तें स्वयंप्रकाश आहे. या विज्ञानमय कोशालाच सुख-दुःखादि संसार आहे. ह्मणून याला आत्मा ह्मणतां येत नाहीं. बरें, त्यावांचून पाहूं गेल्यास दुसरें कोणी दिसत नाहीं. ह्मणून येथें सोहिरोबांनीं "मी हें त्याचें स्वरूप ह्मणजे अहंवृत्ति ती जाणत नाहीं, असें ह्मटलें आहे. अर्थात् अहंवृति नाहीं तर इदंवृत्तीही नाहीं. वास्तविक विदेह कूटस्थाला कोणाचेंही स्वरूप नाहीं, पण त्याचें स्वरूप ह्मणजे माया (अविद्या) तिचें स्वरूप अहंवृत्ति 'मी' पण हें त्या अविद्येची निवृत्ति झाली असतां तिचें कार्य (बाह्यजग) तेंही नाहींसें होतें. या मायेचें स्वरूप पंचदशीकारांनीं चित्रदीपामध्यें येणेंप्रमाणें लिहिलें आहेः—ब्रह्मावांचून मायेची प्रतीति नाहीं; ह्मणून हिला वतंत्र ह्मणतां येत नाहीं. असंगाची अन्यथाकृति ह्मणजे कूटस्थ जो आत्मा त्याला तिनें जगाचें रूप आणलें; आणि चिदाभासरूपानें जीव आणि ईश यांना तिनेंच निर्माण केलें. एवढें करूनही तिचा कूटस्थास लवमात्र संपर्क नाहीं. मायेचा स्वभावच दुर्घट रचनेचा आहे. मग तिच्या कृतिमध्यें नवल तें काय?

२ जे प्राणी रामरूप होऊन गेले त्यांची स्थिति या पदांत दाखविली आहे.

३ प्रणव (ॐकार) दीप (ज्ञानदीप).

निरंजनाला, आणि मनाला। जशी भेट होउनी लवणाला। रिघालें पाणी ॥ रामरूप० ॥ २ ॥ मिळोनि आकाश, आणि सुप्रकाश। श्वासोच्छ्वास राहिला प्राणीं ॥ रामरूप० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा आपण तरणें जग उद्धरणें निवती भगवद्वाणी ॥ रामरूप० ॥ ४ ॥

---

१ परब्रह्माला.

२ मिठाला पाणी मिळाल्यावर जसें एकरूप होऊन जातें तद्वत.

३ सूर्याचा प्रकाश.

४ सोऽहं सोऽहं याप्रमाणें होणारा श्वासोच्छ्वास प्राणवायूच्या ठायीं राहिला ('अऽहं' अपान वायु) चा लय होऊन, 'ब्रह्मरंध्रामध्यें प्राणाची उर्ध्वगति झाली ह्मणजे' सोऽहं सोऽहं असा प्राणवायूचा श्वास चालतो.

५ भगवंताच्या मुखांतून निघणारी वेदवाणी.

२ उपदेशपर पदें.

पद १ लें.

त्या देवाचें तूं दर्शन घे । संसार मोहांतुनि त्वरित निघे ॥ ध्रु० ॥ आदि मध्यना अंत जयाला । नेति नेति ह्मणती वेद तयाला । ज्यापासुनि हा ॐकारहि जाहला । ब्रह्मा विष्णु हर हे तिघे । त्या देवाचें तूं० ॥ १ ॥ अगम्य* अगोचर सत्ता ज्याची । सहज लीला हे त्याची । जारज स्वेदज अंडज उद्भिज । ज्या पासुनि हें सहज निघे । त्या देवाचें० ॥ २ ॥ दृश्य सकलही निवडुनि पाहतां§ । निरालंबि राहतां । प्राणापान† उर्ध्वहि वाहतां

अन्य पाठ *[आगम गोचर] §[सकल दृश्य हें झांकुनि जातां] †[ह्मणे सोहिरा जो रूपाविण असे । अनुभव घेतां आंगि प्रकाशे ॥ नित्यानित्य-विचारें पाहतां । आंत बाहेर अवघा दिसे ॥ त्या देवाचें तूं ॥ ४ ॥

---

१ श्वेताश्वेतरोपनिषदामध्यें येणेंप्रमाणें ह्मटलें आहे. तो एक देव सर्व भूतांच्या ठायीं गूढ आहे. तो सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा आहे. तो सर्व कर्मे पाहणारा आहे. तो सर्व भूतांच्याठायीं वास करणारा आहे. तो साक्षी, ज्ञाता, अव्यय आणि निर्गुण आहे.] २ गुप्त. ३ स्थूल दृष्टीस न दिसणारी. ४ शक्ति, माया. ५ या चरणांचा संबंध पुढील चरणांतील उद्देशाश जुळून आहे; ह्मणजे " जारज, स्वेदज, अंडज, आणि उद्भिज " अशी सृष्टी उद्भवणें ही ज्या देवाची सहज लीला होय. ६ जारज ह्मणजे जरायुज मनुष्यपश्वादिक प्राणी. ' जरायु ' नांवाच्या चर्मानें मनुष्य पश्वा-दिकांचे गर्भ वेष्टित असतात, ह्मणून त्यांस ' जरायुज ' ह्मणतात. जरायु ह्मणजे व्यावहारिक महाराष्ट्र भाषेंत ' वावटळ, वार ' ह्मणतात; तेव्हां ज्या प्राण्यास उपजते वेळीं वारेचें वेष्टन असतें ते प्राणी जरायुज. ' स्वेदज ह्मणजे घामानें आणि उबेनें उत्पन्न झालेले मत्कुणादि ' ' अंडज अंड्यांपासून झालेले पक्षि, सर्प इत्यादि. ' आणि ' उद्भिज ह्मणजे भूमिभेद करून अंकुरादि रूपानें वर येणारे, वृक्ष, तृण इत्यादि. याविषयीं विशेष माहिती मनुस्मृतींत आहे. ७ प्रत्यक्ष दिसणारें नामरू-पात्मक जग. ८ अन्याश्रयरहित. स्वयमेव स्थिर असून, सर्वांस आश्रयभूत असें सच्चिदानंदब्रह्म " (परब्रह्म) तें. ९ प्राण अपान हे दोन प्राणवायु प्राणायामाच्या योगानें, समान करून उर्ध्व ह्मणजे ब्रह्मांडांत (योगशास्त्रोक्त सहस्रदलचक्रांत ' ब्रह्मरंध्रांत) नेलें असतां.

औन्मुनीं मन हें रिघे । त्या देवाचें० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा शून्याकार[2] । रूप नाहीं आकार । परब्रह्मचि निर्विकार । अंतीर[3] बाहेर अवघें । त्या देवाचें० ॥ ४ ॥ *

पद २ रें.

विसरुं नको तो देव । जो हरि साक्षिभूतें[4] स्वयमेव ॥ ध्रु० ॥ तारुण्य-काळीं पुण्यदशेचा, होऊं पाहातो चेवें[5] । रंगरूपाला भुलूं नको तूं, पाहत स्त्रियांचे टेवं[6] † ॥ विसरुं० ॥ १ ॥ अंतकाल हा न पावे तोंवरि, भवसागर हा पेवं[7] । वैराग्य विवेकें, ‡संगाविरहित[8]; सदैवें सुख हें सेवं[10] ॥

" अन्य पाठ " * [प्राणायामें] याचा राग काफी आहे. † [पाहत स्त्रियांची ठेव.] ‡ [वैराग्य विवेकें, याचे स्वरूपीं; अखंड दृष्टि ठेव].

---

१ अन्नमयापासून आनंदमयापर्यंत पांचही कोशांचा साक्षि (आनंदमय ईश) त्याच्या ठायीं, मन आपोआप प्रविष्ट होतें असा भाव. हें स्वप्रकाश सुखच ब्रह्म आहे, अशाविषयीं " ब्रह्म विज्ञानमानंदम् " ह्मणजे ज्ञानरूप आनंदच ब्रह्म आहे असें वाजसनेय शाखेंत ह्मटलें आहे. २ शून्याकार या शब्दाविषयीं पूर्वी पृष्ठ १६ येथें व्याख्या आहे ती पहा. ३ देहाच्या आंत आणि बाहेर. देहाच्या आंत=अंतःकरणवृत्तींत अहंकार असतो त्यांत, आणि बाहेर विषय असतात त्यांत. ४ भूत+साक्षि=सकल भूतांचा साक्षि. भूतें ह्मणजे ' विज्ञानमय ' जे कोश हींच भूतें. ५ विचका, नाश (चेव हा शब्द वाडी प्रांतांत विशेष प्रचारांत आहे. " त्यांत बुवा कांहीं चेव राहिला नाहीं " (अर्थ राहिला नाहीं) असें ह्मणतात. ६ वस्त्रालंकारादिकांच्या योगानें स्त्रियांचें नटणें, नेत्रकटाक्षादि हाव-भाव. याबद्दल ' टेव ' हा शब्द वाडी प्रांतांत प्रचारांत आहे. ठेव असा अन्य पाठ आहे त्याचाही भावार्थ हाच कीं स्त्रियांच्या आंगाची ठेवण, नेत्र-कटाक्ष, कटिपीनपयोधरादि हावभाव, इत्यादि साहाजिक ठेवण, शब्दादि पांच विषयांपैकीं अनुक्रमें एकेक विषयावर आसक्त झाल्यामुळें हरिण, हत्ती, पतंग, मत्स्य आणि भुंगा हे नाश पावतात. ते पांचही विषय एका स्त्रीच्या ठायीं आहेत. ७ पोहणें याच्या ऐवजीं ' पेव ' असा अपभ्रष्ट शब्द वाडीप्रांतांत चालतो. पेव किंवा पेय ह्मणजे पोहून जा असेंही ह्मणतात. ८ पूर्वोक्त विषयसंगाविरहित असें सुख (पूर्वीच्या पदांत सांगितलेलें ' स्वप्रकाश सुख ') ९ शांतिसुख. १० सेवन कर [" भोगा पररमणी " हें पद पहा.]

विसरुं० ॥ २ ॥ पराधिनता पावेल तेव्हां, विस्मय पडेल भेवें । स्वइच्छ असणें, यास्तव घरघर; भिक्षा मागूनि जेव ॥ विसरुं ॥ ३ ॥ ह्मणें सोहिरा, त्या वांचुनि हें; शरीर केवळ शवें । स्वयप्रकाश सत्ता ज्याची; * चालवि हे अवयव ॥ विसरुं० ॥

पद ३ रें.

हरिभजनाविण काळ घालवूं नको रे ॥ ध्रु० ॥ संतसंगतिनें उमज । चिद्रूपासि † पुरतें समज ॥ अनुभवाविण, उगिच, मान हालवूं नको रे ॥

अन्य पाठ * [स्व प्रकाशक सत्तायोगें, चालवि जो अवयव आणि सर्व प्रकाशक त्याचे सत्ते चालंति हे अवयव] या पदाचा राग काफी आहे. † [ध्यानिं आणुनि पुरता समज] [चिद्रूपासि बरें समज । ध्यानिं आणुनि पुरता उमज].

---

१ भीति. [संतांनीं ह्मटलें आहे कीं " मरणापरतेंच अन्यभय नाहीं "] भय याच्या ऐवजीं वाडीप्रांतांत ' बांदें विलाती ' कडे [वाडीसंस्थानांपैकीं बांदें नांवच्या पेठ्याचे भागास विलात असा शब्द आहे.] " भेव " असाच शब्द कुणबी माळी लोकांत वापरतात. २ त्या देवाच्या हरिच्या सत्तेवांचून हें शरीर केवळ शव (प्रेत) होय. याविषयीं तुकोबांचा याचसारखा सुंदर अभंग आहे तो असा [लटिका तो प्रपंच एक हरि साच । हरिविणें आहाच सर्व इंद्रियें ॥ १ ॥ लटिकें तें मौन भ्रमाचें तें स्वप्न । हरिविण ध्यान नश्वर अवघें ॥ २ ॥ लटिकिया वित्पत्ति हरिविण करिती । हरि नाहीं चित्तीं तो शव जाणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरि हें धरिसी निर्धारीं तरि ॥ तूं झडकरी जासी वैकुंठा ॥ ४ ॥] ३ निर्विकार आत्मा. (कूटस्थ) स्वतःसिद्ध मूळचा जो शुद्धात्मा तो चिद्रूपी होय. ४ तें चिद्रूप संतसंगतानें उमजून घे आणि संत जो ज्ञानोपदेश करितील तो " ध्यानाच्या योगानें [योगाच्या अष्टांगांपैकीं सप्तमांग जें ध्यान त्याच्या योगानें] त्याचा पुरता अनुभव घे नाहींपेक्षां संताचा उपदेश वरवर ऐकून घेऊन " होय समजलें, होय समजलें " ह्मणून मान हालवूं नको असा भाव.

हरि० ॥ १ ॥ दोरिच्या सापा भिडानि भवा । भेटि नाहीं †जीवशिवा ॥ अंतरिंचा ज्ञानदिवा, मालवूं नको रे ॥ हरि० ॥ २ ॥ विवेकाचि ठरेल ओलें । * ऐसे बोलावे कीं बोल । आपुल्या मतें उगाच चिखलें कालवूं नको रे ॥ हरि० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे † ज्ञानज्योति । तेथें कैंचि दिवसँ राति । तयाविणें नेत्रपाँतिं, हालवूं नको रे ॥ हरि० ॥ ४ ॥

अन्य पाठ. † जिवाशिवा. * [ऐसें मुखेंवाक्य बोल] † [सोहिरा ह्मणे पूर्ण ज्योति । तेथें नाहीं दिवस राती].

१ रज्जुसर्पन्यायानें भासणारा भव (जन्ममरणरूप संसार) हा वास्तविक नसून केवळ शुष्क रज्जुवत् आहे, पण अज्ञानभ्रमानें तो खरोखरी साप आहे, अशी भीति होऊन ती दृढतर होत गेल्याच्या योगानें जीव आणि शिव यांची भेट (ऐक्य) होत नाहीं. ह्मणजे पुनः पुनः जन्ममरणरूप संसार प्राप्त होतो हा भाव. २ शिव ह्मणजे भ्रमाला अधिष्ठानभूत असंग चैतन्यरूपी जो (पूर्वोक्त) कूटस्थ आत्मा तो, आणि जीव ह्मणजे तोच कूटस्थ अन्योन्याध्यासामुळें बिंबप्रतिबिंबन्यायानें जेव्हां बुद्धीच्याठायीं प्रतिबिंबित होतो, तेव्हा त्याला जिव असें ह्मणतात. ३ हृदयाचे ठिकाणीं निरंतर ज्ञानस्वरूपेंकरून असणारा जो कूटस्थ तो. ह्याला दिवा असें ह्मणण्याचें कारण " अहंकार, बुद्धि, इंद्रियें, या सर्वांस हा प्रकाशविणारा होय. दिवा जसा आपल्याच ठिकाणीं राहून सर्वत्र प्रकाश देतो, त्याप्रमाणेंच हा (ॐकार) अंतर्बाह्य प्रकाशविणारा आहे. (विशेष माहिती, पंचदशी, नाटकदीपामध्यें पहा.) ४ ओलावा—असें ह्मणण्याचा हेतु हाच कीं चित्त हें आपाचें (जलतत्वाचें) अंगभूत होय. आणि मातृकाबीज ' उ ' (विष्णु जो नित्य विवेकी असा एकच असून जें कांहीं नित्य व विवेकी आहे किंवा आहेसें भासतें, तें सर्व त्याच्यापासून उद्भवलें आहे.) याप्रमाणें आहे. चित्तशुद्धि झाल्यानें हा आत्मा प्राप्त होतो. ५ चिखल ह्मणजे नरक. मैथुनापासून उद्भवलेला देह हा नरकामध्यें (मातेच्या नरकतुल्य उदरामध्यें) संवर्धन पावणारा आहे; असा हा घाणांनें भरलेला असल्याकारणानें विवेकी जनांनीं तो आत्म्याशीं एकरूप आहे, असें मानून त्याचा अभिमान धरूं नये. ह्मणजे पुनःपुनः अशा प्रकारच्या नरकांत पडूं नये हा भाव. ६ ज्ञानस्वरूप स्वयंज्योति परमात्मा. ७ अर्थात् कालदर्शक संवत्सर प्रजापतीच्याठायीं असणारा जो दिवस आणि रात्र असा भेद तो ह्या " नित्यज्ञानस्वरूप स्वयंज्योति पुरुषाचेठायीं मुळींच असूं शकणार नाहीं. असा भाव. ८ नेत्रांच्या पात्यास पातें भिळण्यास लागणारा जो काळ (निमेष) तेवढासुद्धां व्यर्थ घालवूं नको असा भाव. याबद्दल पूर्वी ' पृष्ठ १३ येथें टीप आहे, ती पहा.

पद ४ थें

हरिस्मरणविस्मरण, तरि तुझें काय जिणें रे असून ॥ ध्रु० ॥ स्वार्थाचि साधिसी, सार्थक नेणसी । कोणासि पहा तरि पुसून । पुढें नाहीं गति मलिन झालि मति । साधुची संगति नसून हरि०॥ १ ॥ रतिविलासीं लंपट होसी । मानस गेलें डसून । लवकर सरें कीं पडासिल नरकीं । फुकट मरशील कुसून । हरि ॥ २ ॥ आळसि कामा उगा रिकामा । थट्टाचि करिसी बसून । कुकर्मांच्या कांहिं वर्मांच्या । गोष्टि सांगसी कसून ॥ हरि० ॥ ३ ॥ शरीर फिरवी तुजला मिरवी देव असे रे रुसून । जवळि असून तुझे हृदयिं वसून । भगवंन्त नये रे दिसून ॥ हरि० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा गुरुनाथ हा । माझ्या हृदयीं घुसून । जनासि उद्धरावया कारणें । वचन सांगतो ठसून ॥ हरि० ॥ ५ ॥

पद ५ वें

तो काय प्राणी ! विसरला हरिला[1] जन्मापासून ॥ ध्रु० ॥ ‡करित संसार धंदा, आठविना गोविंदा । नित्य करी द्वेष निंदा, सांपडला भवबंधा । चिंतेनें चूर केला ग्रासून ॥ तो काय० ॥ १ ॥ मुलला जो शब्दनादीं, संतोषला शास्त्रवादीं । कीर्तिसाठीं विद्या साध्री, त्याला अभिमान बाधी नानाछंदीं । बुद्धि गेली नासून ॥ तो काय० ॥ २ ॥ देहाला मी ऐसें मानी, निरंतर आपणा वानी । पडला संशयाचे रानीं, विचार हा न घे कांनीं । डुल्लतसे मोहमदिरा प्राशून ॥ तो काय० ॥ ३ ॥ अवकाश

अन्य पाठ. * गैबिनाथ. मोठ्या आतुरतेनें दुसऱ्यास दुःख होईल अशा इच्छेनें “ कसविणें ” म्ह० त्रास देणें या अर्थी हा शब्द सावंतवाडीप्रांतीं प्रचारांत आहे. ‡ करितां.

---

१ मूढ जनांचीं दुःखें जो हरण करितां, तो ‘ हरि ’ [हरि या शब्दाची वामन पंडितांनीं केलेली व्याख्या:—हरि जडदुःख ह्मणून कीं ‘ हरि ’ तो ’ जटायुस्तुति ३६] ‘ हरि या शब्दाचे अन्य अर्थः—‘ हरिश्चंद्रार्कवाताश्व शुकभेकयमाहिषु । कपौ सिंहे हरेऽजेंऽशौ शक्रे लोकांतरे पुमान् ॥ ’ इति मेदिनी.

जाहल्या वेळे । भलताचि खेळ खेळे । जो गर्वमदें सदां घोळे, अन्यथा सुखांत लोळे । सांगूं जातां बोले, डोळे त्रासून ॥ तो काय० ॥ ४ ॥ लटकें खरें करी बासून, संसारीं जो घेतो घांसून । नकल करी मारी हांसून, त्रिविधतापें घेतो लासून । दुःख शोकें दांत वासून ॥ तो काय० ॥ ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे व्यर्थ जन्म, निष्फळ त्याचें क्रिया कर्म । पांघुरला शरीर चर्म, जो कां नेणें मुळिंचे वर्म । कोण्या कामाचा हा? काय असून ॥ तो काय० ॥ ६ ॥

पद ६ वें.

तुह्मी अचलपदीं राहोन, । सदोदित अद्वयसुख कां ध्याना? ॥ ध्रु० ॥ * प्रथमचि वाटत गोड विषयसुख, । शेवट विषवत् माना । श्रवण मनन अध्यात्मनिरूपण, । क्षणभरि चित्त कां द्या ना ॥ तुह्मी० ॥ १ ॥ मायामोहें भ्रमतां रमतां, । चेष्टा करितां नाना । ध्यानीं भजनीं मनची नसतां, । व्यर्थचि करितां तनाना, तुह्मी० ॥ २ ॥ जागृतिस्वप्न सुषुप्तींत साक्षी, । कवण तो आणुनि ध्याना । † कमलदळिं जसें अलिवत् मन हें, । आत्मस्वरूपीं कां न्या ना ॥ तुह्मी० ॥ ३ ॥ निर्मळ निश्चळ जाणुनियां तंव, । स्वरूप जया अनुमाना । ह्मणे सोहिरा ब्रह्मभुवेंनिंचें, । परमामृत कां प्या ना ॥ तुह्मी० ॥ ४ ॥

पद ७ वें.

श्रम परमेश्वर-भजनीं काळ ॥ ध्रु० ॥ विषयविलासीं भुकाळ असती, । मूर्खपणेंचि हा काळ । हरिनामाचा सुकाळ न करिसी, । दंडिल यम

अन्यपाठ. * [प्रथमहि वाटत गोड विषय हा, शेवटीं विषवत् माना] † [अभिप्राय गुरुगम्य हें दुर्लभ नेणुनि आत्मज्ञाना] [याचा राग काफी आहे]

---

१ खोटेंच कांहीतरी प्रतिपादन करून खरेंच करून दाखविणें (बाता ठोकणें) याला वाडीप्रांतांत " बासून " असा शब्द वापरतात. [या पदाचा राग ? घन्याश्री आहे.] २ भ्रमरवत् ३ योगशास्त्रोक्त ब्रह्मरंध्रांतील.

हा सकाळ ॥ क्रम० ॥ १ ॥ इतर कल्पना गाळ, । भावें संतचरण चों-गाळ । होउनियां प्रेमाळ; । अंतरीं हेचि धरि तूं जपमाळ ॥ क्रम० ॥ २ ॥ ज्ञानाग्नीची ज्वाळ, । वरी हा घालिं मनोगत राळ । उडत अंबरीं मराळ, । तेवीं लय लावीं अंतराळ ॥ क्रम० ॥ ३ ॥ आत्माराम नृपाळ; । तुजवरी होईल पूर्ण कृपाळ । मग पिटणें नलगे कपाळ, । सद्गुरुउपदेश-वचन पाळ ॥ क्रम० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा देख ढिसाळ, । तो महानंदि-सिंधु रसाळ । उगेंचि शिणवुनि काय शिसाळें, । हे इतर देव नदि न्हाळ क्रम० ॥

पद ८ वें.

तो धन्य प्राणी । हरिगुण अतिरस वर्णित वाणी ॥ ध्रु० ॥ नरदेहीं सावध जाहला, । विवेक हा हृदयीं आला । नित्य निजबोधें धाला, । ब्रह्मानंदें निवाला ॥ आत्महित पुरतें ध्यानिं आणी ॥ तो धन्य० ॥ १ ॥ नामरूप मिथ्या भास, । म्हणुनियां धरिना आस । वैराग्यें हा उपजे त्रास, । करी निंजनीं वास ॥ संकल्प विकल्प चित्तिं न आणी ॥ तो धन्य० ॥ २ ॥ अविनाशीं घेतो गोडी, । नाशवंत संग सोडी । कल्पना हे समूळ मोडी, । मनाच्या अनेक ओढी ॥ पुनरपि न पडे ताणाताणीं ॥ तो धन्य० ॥ ३ ॥ भ्रमभेद ज्याचा गेला, । निश्चय हा ज्याणें केला । तन्मय होउनि ठेला, । जिताचि असतां कीं मेला ॥ अंतीं गति पावला निर्वाणीं ॥ तो धन्य०॥४॥ सोहिरा म्हणे सारांश, । शोधियला शुद्धांश ।

---

१ बाह्य विषयांचे स्पर्श दूर टाकून दोन्ही भोंवयांच्या मध्यभागीं दृष्टी लावून, प्राण व अपान हे दोन्ही नाकाच्या आंत सारखे चालू ठेवणें. या अर्थी अंतराळ हा शब्द वापरलेला आहे. डोकें अर्धशिसी [अर्धशिसीनें डोकें दुखतें त्यास शिंसाल असें बाडी प्रांतीं ह्मणतात]. २ परमोदार, मोठा, दयेचासागर. ३ भवनदी ज्याप्रत मिळाली आहे असा तो सागर. ४ डोकें, अर्धशिसी (अर्धशिशीनें डोकें दुखतें त्यास शिंसाळ असें वाडी प्रांतीं ह्मणतात. ५ नाले, ओहळ. ६ शृंगारकरुणादि नवरसां-हूनही अधिक असा जो प्रेमरस अथवा निरतिशयभक्तिरस तो. ७ जन्ममरणरूप ओढाताणीत. ८ जीवन्मुक्त झाला.

ज्याणें उद्धरिला वंश, । जैसा कीं तो राजहंस ॥ निवडितो दूध आणि पाणी ॥ तो धन्य० ॥ ९ ॥

पद ९ वें.

स्मर हर त्रिभुवनपती, । तूं प्राण्या पावसि परम गती ॥ ध्रु० ॥ सद्बुद्धिनारी[२] पतिव्रतेला, । प्रियकर जो कां पती[३] । निःसंग अनंग बहुरंग दावी, । जगतरंग अपांपती ॥ स्मरहर० ॥ १ ॥ जयालागिं हें जपतप साधन, । साधक जन विलापेती । ध्यानामृत पित तद्रुप जाहले, । संसारीं न लपती ॥ स्मर० ॥ अंतर्गत हा नकळे आत्मा, । जीव विस्मृत मूढ मति । चिदानंद चित्स्वरूपीं सावध, । करिं बा दृढतर मती ॥ स्मर० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा लावेंव* घेई, तूं भजनकळा धांवती ईश्वरीं लय हें लावीं जोंवरि, । आयुष्याची आवर्ती[६] ॥ स्मर० ॥ ४ ॥

पद १० वें.

आतां तरि सोडिं रे हा संग । जीनिं वनिं हो निःसंग ॥ ध्रु० ॥ विषयसंयोगें धरिसी सोंग । दुःखेंचि होसी दंग । अभ्र सावुली जेविं बाहुली । बेगडिचा हा रंग ॥ आतां० ॥ १ ॥ परनारीशीं[७] करुनि उपरती‡ । आवरिं हा कीं अनंग । ब्रह्मरसाचे भावाविण¶ । रज, तमें

अन्यपाठ. * [आयुष्याची आहुती] † [लाव घेई तूं]. ‡ ["परनारीशी करुनी परती" "परनारीशीं करुं नये रति"] ¶ [भावनेविण]

१ सायुज्यमुक्ति. २ शुद्धसत्त्वबुद्धि हीच कोणीएक नारी [स्त्री] ३ चैतन्य आत्मा हाच पति. स्वतः निःसंग राहून केवळ इच्छामात्रेंकरून अनंग=कामादिक बहुरंग हेच कोणी जलतरंग ते अपांपती=जो सागर त्याच्यासाठीं (त्याच्या विहारार्थ) उत्पन्न करितें हा भाव. ४ ज्याच्या प्राप्तीसाठीं साधकजन, योगादि शास्त्रें छंद प्रबंधादिकें करून आलाप करतात=(ओरडून सांगतात, आक्रोश करितात.) ५ त्वरित गति किंवा लांव ह्मणजे अतिशय हावरेपणा (हांवरेपणा करणें या अर्थी लांव हा शब्द वाडीप्रांतीं चालतो.) ६ आयुष्य संपविणाऱ्या काळाची मेघा. किंवा आहुति ह्मणजे कालाग्निमध्यें दग्ध होणारी आयुष्य हीच आहुति. ७ परा प्रकृतिशीं.

होय जीव बंगै ॥ आतां० ॥ २ ॥ योगाभ्यासें करुनी साधीं । बैठक पवैन तुरंग । धांवे जेथ कीं तेथ धरावा, हा मन चपल कुरंग ॥ आतां० ॥ ॥ ३ ॥ नसोनि दिसतें केवळ जग हें । मृगजळिंचे किं तरंग । चिद्वानु हा कारण आत्मा । पंहा* तूं कीं अंतरंग ॥ आतां० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा निर्गुण ध्यानीं नये तरि, । स्मरिं सांवाळि मूर्ति सुरंग । वैकुंठपति हा व्यापक विष्णु । अवघाचि कीं श्रीरंग ॥ आतां० ॥ ५ ॥

पद ११ वें.

मी कोण कोठुनि आलों । या शरिरीं हें स्मरण धरारे ॥ ध्रु० ॥ कवण कर्म म्यां केलें । नरदेह कशानें प्राप्त जाहलें । सुख दुःख हें कळुनि आलें । कोणा हाचि विचार करारे ॥ मी० ॥ १ ॥ स्थूल सूक्ष्म पंच भुतांचें । मिथ्या अवर्वे परि दिसतें सार्चे । ठाँवैव सकळिक संसाराचें । सत्वर यांतुनि कैंडे सरारे ॥ मी० ॥ २ ॥ ज्ञानाचा अभ्यास करा । निजवस्तूतें ध्यानिं धरा । ध्यानें सर्वहि त्याग करा । मग निर्गुण नित्यानंदें पूर्ण भरारे ॥ मी० ॥ ३ ॥ निरसुनियां कामक्रोध । करूनि इंद्रियां दृढ निरोधें । जेणें होईल ब्रह्मबोध ॥ । हा अंतरिं ध्या शोध बरारे ॥ मी० ॥ ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे यांतिल‡ ध्यावें । दृश्यातीत मन हें व्हावें । फिरूनि अपुल्या मुळाँसि यावें । येणेंचि हा भवसिंधु तरारे ॥ मी० कोण? ॥ ५ ॥

पद १२ वें.

केवळ विस्मृति हा प्राणी । ईश्वरीं लय लाविना ॥ ध्रु० ॥ वितंड पाखंड स्थाणी । आचरण महापापी । निंदाद्वेषें सदां दापी । भरेना कीं

अन्यपाठ. * [हेतुच कीं अंतरंग] [राग काफी.] ‡ ['आंतील ध्यावें' 'हेंचि ध्यावें']

---

१ भस्म, राख. २ प्राणवायु हाच घोडा (प्राण आणि अपान या दोन वायूंचा निरोध.) ३ कौशल्य [विज्ञानमयादि कोशांचें चालकत्व, गारूड.] ४ बाजूला. तीरास. ५ दमाच्या योगानें इंद्रियांच्या गति कुंठित करणे ६ जीवाचें मूळ ह्मणजे पुराण-पुरुष परमात्मा [भ० द्री० अ० १५ श्लो० १ पहा.

अनुतापीं । अद्यापीही विषयीं वीट येइना ॥ केवळ० ॥ १ ॥ आत्मशुद्धि नाहीं ज्याला । उद्योगाखालींच गेला। संसार* असत्य हाचि केला । † निर्वात होउनि न ठेला । अद्यापीहि समजुनि उमजुनि । दुष्टबुद्धि जाइना ॥ केवळ० ॥ ॥ २ ॥ बहुत जन्म फिरला मागां । अद्यापी जो नव्हे जागा । ज्याला पुढें नरकीं जागा । त्याला तुह्मी कितीहि सांगा । ‡ नायकेच तो येतो रागा । वृत्ति कांहीं साहिना ॥ केवळ० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे संतांचे । भेटिला जो कधीं न वेंचे । श्रवण मनन कीर्तन न रुचे । § मत्सर द्वेष बहुत सुचे । विश्वव्यापक हृदयस्थाचे । नित्य गुण गाइना ॥ केवळ० ॥४॥

पद १३ वें.

अजुनि तरि उमगा । नव्हे हें सौख्य पहा शिमगा[3] ॥ ध्रु० ॥ ज्या सौख्यातें आदिं अंती । स्थितींतहि होती क्लेश जगा । उडिये वरि उडि मारित मृगजल, । प्याया कष्ट मृगा[4] ॥ अजुनि० ॥ १ ॥ दुःखी

अन्यपाठ. * [संसार हा सत्य केला] † निवांत होऊनि ठेला] ‡ [ऐकुनियां येतो रागा] § [निंदा द्वेष बहुत सुचे]

१ समयींत तेल वगैरे घालून ती तयार केली, पण जर तींत ज्योतिवाहक वात नाहीं व अन्यत्र ज्योतीनें ती प्रज्वलीत केली नाहीं, तर दीप पेटून प्रकाश पडणें शक्य नाहीं, तद्वत् सुकृततंतूरूप वातीविरहीत असलेला जो, दीप त्यास आत्मज्योतीचा संयोग घडला नाहीं [आणि त्यामुळें 'सरला सुकृताचा तंतू । आयुष्य तैल झालें अंतु । मालिये हस्तींचा व्यजनवातु । भीमरूपें उदेला ॥ मुक्तेश्वर] हाच निर्वात ह्मणण्याचा भाव. २ जात नाहीं [हा शब्द गोवें प्रांतीं चालतो.] ३ या पदांत असें दर्शविलें आहे कीं, ह्या नामरूपात्मक दुष्ट मृत्युलोकांतील विषयादिकांचें सुख हें वास्तविक नसून तें आह्मां हिंदु लोकांच्या शिमग्याप्रमाणें वायफळ आहे. प्रारंभीं गर्भवासाचे कष्ट, अंतीं अंतकालाच्या भयंकर वेदना मध्य स्थितींत त्रिविध तापाचें भयंकर दुःख असतांही ज्याप्रमाणें हा शिमग्यांतील उत्सव ह्मणजे वास्तविक दुःखरूपच असून तें सुखच आहे असें समजून अज्ञानी जन त्याचें अवलंबन करितात. त्याचप्रमाणें संसारांत सुख मानतात. ४ जसा मृगपशु उड्या वर उड्या मारून मृगजल पिण्याच्या आशेनें धांवत जातो; परंतु पाणी न मिळाल्यामुळें

भोगी दुःखी त्यागी । दुःखी सोंगी ढोंगी रे । दुःखी *यांचित । दुःखी लुंचित; दुःखियां चित्तें सरळ बबा ॥ अज्ञुनि० ॥ २ ॥ खोटें मन हें खोटि कल्पना । खोटे विषय कुरंगा । अनुभव मोठा । समूळचि खोटा । रंक स्वप्निंच्या †या भागा ॥ अज्ञुनि० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा जें कल्पावें । तेंचि पावे सुख रंगीं । निर्विकल्प जें सत्य सौख्य तूं । दुःख इतर ते करिं भंगा ॥ अज्ञुनि० ॥ ४ ॥

पद १४ वें.

ब्रह्मचि तूं ध्यानीं आणरे । प्राण्या ॥ ध्रु० ॥ सर्वांसि पाळक, । मनाला चाळक, आंतुलीच कळा जाणरे ॥ प्राण्या० ॥ १ ॥ मोहाचें गेहँ, जीवसहित देह, । कोठुनि झालें निर्माण रे ॥ प्राण्या० ॥ २ ॥

अन्यपाठ. * ['वांच्छित दुःखी लांछित'] † [स्वप्निंचीया भागा]

निराशेनें दुःखी होतो. तद्वत् सत्यसुख [तृषाहर सत्यजल] नसून तें दुःखच [मृगजल] आहे हें न जाणतां मृगपशुप्रमाणें जीवाश्रित नरपशु परम कष्ट पावतो हा भाव.

१ भोग भोगणारांस तसेंच भोग वर्ज्य करणारास त्या विषयांच्या विरहामुळें दुःख होतें, तद्वत् या विश्वशिमग्यांत प्रवृत्त झालेला सोंगी [सोंगाड्या] ढोंगी [ढोंगें करणारा] असा जो जीव तो या प्रकारें दुःखांत कष्ट पावतो हा भाव. २ याचा संबंध पुढील चरणांशीं आहे. वास्तविक हें दुख असून मनोमय संकल्पानें तें सुखच आहे असें गृहीत धरून मृगजलन्यायानें याचे-नादिदुःख स्वीकृत करितो. ३ जसें एकाद्या नाटकांतील पात्र बाह्यात्कारीं दुःख दर्शवितें पण त्याचें चित्त सरळ [दुःखरहित] असतें. त्याचप्रमाणें ह्या विश्वप्रपंचरूप शिमग्यांत जें चित्त परमात्म्याचे ठिकाणीं आसक्त असतें तें सरळ=(स्थिर) ह्मांत असतें हा भाव. ४ ह्मणून ह्मणतात अरे हे जीवकुरंगा ! हें मन खोटें, तज्जनित कल्पना खोटी, आणि विषयही खोटे आहेत रे बाबा !! जसा एकादा रंक स्वप्नांत राज्यसुख अनुभवितो, तरी तो अनुभव खोटा, तद्वत् हे जीवा, ह्या विश्वप्रपंचरूप जो शिमग्याचा हा अनुभव समूळ खोटा आहे. ५ सारांश, संसारांतील सुख हें केवळ कल्पनाजन्य आहे. जशी कल्पना करावी त्याप्रमाणें सुख रंगांत येतें ह्मणजे सुखाचा प्रादुर्भाव होतो. परंतु तें काल्पनिक ह्मणून मिथ्या. ६ हृदयांतर्गत पुरुष ७ जीवासह असणारें जें स्थूलदेह तें मोहाचेंच केवळ गेह (गृह) वास्तव्य स्थान, मोह ह्मणजे अज्ञान त्या अज्ञानाचें घर. " देह तो मींच आहे, मोठा लाभ काय तो वि षयसंसार. अशी कल्पना हा मोहाचें घर

नित्य तें पहातां, । तेथेंचि राहतां, । कल्पनेची मोडे त्राण रे ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ आदि मध्य ना, । अंत जयाला, । विश्रांतिचें हें ठाण रे ॥ प्राण्या० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे जाण, । होणें जाणें नाहीं तयाविण, । निश्चय हाचि प्रमाण रे ॥ प्राण्या० ॥ ५ ॥

पद १९ वें.

प्राण्या[1] कोठुनी आलासी कोण तूं गा? ॥ ध्रु० ॥ भुललासी देहसोंगा । गुंतलासी विषयभोगा । कुपथ्यचि होय भवरोगा । मृगजळाचिया ओघा प्राण्या०॥ १ ॥ भार वाहिलासी* वाउगा । श्रमलासि करितां निगा[3] । पंचभूतांचा हा बिघों[4] । अम्मल[5] झालिया† हें तिघां[6] ॥ प्राण्या० ॥ २ ॥ कर्म आलें तुझिया विभागा । कुरवंडि[7] हे काया काळ कागा । सुख दुःख हें मागोमागा । §विश्रांतीसी कोणती जागा? ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ जागृतींत कोण जागा? । स्वप्नावस्थेंत कोण सांगा? । लावुनियां देहा थांगा[8] । सुषुप्तींत कोण तो गा? ॥ प्राण्या० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे सांग

अन्यपाठ. [* वाहसी वाउगा] † [जातें हे तिघां] § [विश्रांतिसी होय कोण जागा].

---

१ बळ मोडणें, नांगी मोडणें, इतवीर्य करणें. २ एक वेळ सोहिरोबा स्वस्थ बसले असतां, तेथें एक मनुष्य येऊन बराच वेळ उभा होता. आपल्या घरीं कोणी मनुष्य आला असतां, काय हो ? तुह्मी कोण ? कां आलेत ? ह्मणून विचारण्याचा प्रघात आहे. साधारण मनुष्याचें विचारणें लौकिक व्यवहारासंबंधानें असतें, परंतु सोहिरोबांचा ह्या व्यवहाराकडे कांहीं संबंध नव्हता; ह्मणून परमार्थदृष्ट्या या पदांत त्याला प्रश्न केलेले आहेत. ३ जतन. हा शब्द वाडीप्रांतीं फार प्रचारांत आहे.] ४ पंचभूतांपासून बनलेलें शरीर, क्षेत्र, शेत. ५ जोर झाल्यानें, क्षोभ झाल्यानें. ६ मनाच्या सत्त्व, रज, तम, ह्या तीन गुणांना. ७ वोंवाळणी. ८ सुषुप्तीमध्यें [लावुनियां देहा थांगा] स्थूल व सूक्ष्म या दोन्ही देहांचें भान मुळींच नसतें; तरी त्या देहांची व्यवस्था तशा रितीनें लावून ' सुषुप्तीच्या ठायीं जो अनुभव घेतो; अगा ! तो कोण आहे ?

बा गा¹! । बोलेनासी कां उगा? । कांहीं नको येऊं रागा । *नकळे तरि लया लागा ॥ प्राण्या० ॥ ९ ॥

पद १६ वें.

सद्गुरुसी हटका । आतां करा आपली सुटका । दृश्यभास नाश पावे । स्थीर नोहे घटका ॥ ध्रु० ॥ †लिंगदेह यमदूतां सांपडेल अटका । आत्मज्ञानें उमजुनियां आधिंच तुह्मी सटका ॥ सद्गुरुसी० ॥ १ ॥ करितो लीळा टिळे माळा । प्राणि नीटनेटका । केव्हां नेणों पाठिवरी । काळ मारिल मुठका ॥ सद्गुरुसी० ॥ २ ॥ भजनावांचुनि वेळ कधीं । घालवुं नका लटका । मनीं राम मुखीं नाम । करीं मार चुटका ॥ सद्गुरुसी० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे राहुं नका । घट जसा फुटका । निरंजनीं पूर्णबोध प्रेम पिवा घुटका ॥ सद्गुरुसी० ॥ ४ ॥

अन्यपाठ. * [न कळे तरि लागें लागा]. † [लिंगदेहा ये मृदुता, सांपडाल अटका] . राग झिंजोटी. "अर्जुना तूं जाण रे, होसिल सुजाण रे" या चालीवर.

---

१ यावर तो कांहीं उत्तर देईना तेव्हां ह्मणतात हे बाबा ! [उद्धट मनुष्या] तूं कां बोलत नाहींस? माझ्या प्रश्नाचीं उत्तरें सांग? यावरून पूर्वी बा गा असें ह्मटलें तेव्हां हें उद्धटपणाचें बोलणें झालें असें वाटून पुनः हात जोडून सोहिरोबा त्याला ह्मणतात, अरे बाबा ? तुला हें विचारिलें ह्मणून कांहीं रागाला येऊं नकोस; तुला ह्या प्रश्नाचें रहस्य ठाऊक आहे तर ठीक आहे; आणि जर न कळे (ठाऊक नाहीं) तर त्या लया=लययोगाच्या [लययोग समजून घेण्याच्या] मार्गास लाग. लययोग ह्मणजे=आपलें अंत:करण वायूसारखें चंचल असल्यामुळें, त्याला एकाठिकाणीं थांबवून धरणें मोठें कठीण आहे; ह्मणून तें प्रथम कलांसहीत (साकार व सगूण) वस्तूच्याठायीं स्थिर करावें ह्मणजे मग तें निर्गुण व निराकार अशा वस्तूच्या ठिकाणीं स्थिर होतें. प्रथम मूलाधाराचे ठिकाणीं जो दिव्याच्या ज्योतीप्रमाणें जीव आहे, त्यास प्रणवानें विधिपूर्वक ओढून दहाव्या द्वारांत (मस्तकांत) जाऊन पोंहचलेला व आनंदस्वरूप असा प्रणवाचा जप करावा. जसा ॐकार विधिपूर्वक उच्चारण केला असतां, मस्तकांत जाऊन पोंहोंचतो, तसा योगी ॐकाररूप बनून परमात्म्याच्याठिकाणीं निरंतर स्थिर राहातो. योगी याप्रमाणें नित्य करीत असतां ज्या वेळेस हंस, बिंदु, शिखा व ज्योति यांस अंतर्दृष्टीनें पाहतों; तेव्हां त्याला लय (लययोग) प्राप्त होतो. २ निसटा, पळा.

पद १७ वें.*

पावेनासी घुर्का[१] ? कसा रे तूं मूर्खा । जीवाचा हा कोण धणी आण वेगीं तर्का ॥ ध्रु० ॥ नानापरी संसारिंचा । बसतो तुला चर्का । लाज सोडुनि काज करिसी । फुकट पडसी नर्का ॥ पावेनासि० ॥ १ ॥ रसनेविण कसा घ्यावा, ब्रह्मरसभुर्का । कसा द्यावा मनावरी, गगनाचा हा बुर्खा ॥ पावेनासि० ॥ २ ॥ पाखांड लंड बंड द्वेषी । स्पर्श होतां सर्का । ब्रह्मबीज हाचि द्वीज सहज । देखुनियां गुर्का ॥ पावेनासि० ॥ ३ ॥ आला वेळ तूर्त घ्यावा । साधुनियां ठुर्का[३] (?) । बिनलज्जा बोध गांजा गैब मार झुर्का ॥ पावेनासि० ॥ ४ ॥ वातपित्त देहांतीं । कफाचा हा बर्का[४] । सोहिरा ह्मणे जे रितिनें । मोक्षकाज उर्का ॥ पावेनासि० ॥ ५ ॥

पद १८ वें.

तसा तूं भजरे आपुल्या मुळांला ॥ ध्रु० ॥ न दावितां गोडी, । गुंतुनियां चाडी । शोधूनि काढि जासि मुंगी गुळाला ॥ तसा तूं० ॥ १ ॥ कोठें तें वन, कोठें जीवन । घांवत$ कोरी भ्रमर जैसा कमळाला ॥ तसा तूं० ॥ २ ॥ चंदन अंग, उमजुनि चांग । जडला तो नाग जसा कीं परिमळाला ॥ तसा तूं० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा, । देव भक्त एकचि होती । ज्योतीला ज्योति मिळोनि जाय, जसें लवण जळाला ॥ तसा तूं० ॥ ४ ॥

---

* [या पदाचा राग व चाल वरील पदाप्रमाणें]. $ ‘ घांवुनि कीं तो ’ धावन करि जसा ’].

---

१ ब्रह्मरसाचा घोंट २ प्रणव (ॐकार) असा प्रणवस्वरूप झालेला ब्रह्म पाहून त्यावर गुरगुरून जातां. ३ ढल्ला. ४ कफाचे गोळे. त्यांस सावंतवाडी प्रांतीं “ डरकल ” किंवा “बर्का” असें ह्मणतात. ५ परमपुरुष हेंच मूळ.

पद १९ वें.

हकनक आयुष्य जाय, । प्राण्या तूं उगाच बससी काय? ॥ ध्रु० ॥ मनासी मानेल तें तूं करिसी । देवासि जें कां नसाय ॥ * विचार बोलुनि करिसी तूं अवघा । हा कृत्रिम व्यवसाय ॥ हकनक० ॥ १ ॥ अति प्रीतिनें देहा पाळिसी । भिक्षुक देति दुवायें[1] । अनुतापाविण नरकीं पडसी । मग हा न चले उपाय ॥ हकनक० ॥ २ ॥ स्वदारा हो परदारा हो । मुळणें हाचि अपाय । भोग भोगितां रोग उठती । † रक्त पित्त कफादिक वायं[2] ॥ हकनक० ॥ ३ ॥ § अनादी हा सत्य ईश्वर । ह्मणौनि सोहिरा गाय ॥ $ मलाहि दिसतो तुलाही सांगतों । पुढील तरणोपाय ॥ हकनक० ॥ ४ ॥

पद २० वें.

प्राण्या सदां सुखी त्वां असावें ॥ ध्रु० ॥ अवचट[3] हें[4] निर्माण होतें । याचि प्रकारें विलया जातें । सखेद होउनि उगीच असतें । तेंथें कोणावरि बा रुसावें ॥ प्राण्या० ॥१॥ चिंता वाहतो कोण पहातो । अचल अमर येथें कोण राहातो । त्रैलोक्यपोटीं कोण साहतो । स्वरूप तुला तें दिसावें ॥ प्राण्या० ॥ २ ॥ प्रपंच ही मायेची माव । सुखदु:खाचे बसती घाव । एकवेळ निरंजनीं[5] । पहा तत्त्व हें पंच[6]विसावें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे स्वस्थ असावें । मन हें संशयभूत नसावें । परब्रह्म हें हृदयीं ठसावें । मग आनंदें स्वस्थ असावें ॥ प्राण्या० ॥ ४ ॥

अन्यपाठ. *[विचार बोलुनि अवघा करिसी] † [तुज रक्त पित्त कफ वात] § [अनादि ईश्वर सूक्ष्म अमृत हें] $ [मलाहि दिसतो तुह्मां सांगतों]

---

१ यांचा करणारे जे याचक जन त्यांच्याकडून 'तुमचें कल्याण हावो' असे आशीर्वाद (दुवा) घेतोस हा भाव. २ वायु, वातरोग (वातरोगास वाय असे ह्मणण्याचा प्रघात वाडीप्रांता कुणबी लोकांत फार आहे.) ३ सहजगत्या. ४ स्थूलदेह, किंवा विश्व. ५ माया रहित एकांतस्थानीं. ६ परब्रह्म.

पद २१ वें.

तरि होय काय येउनियां जन्मासी । विषयीं जडला गुळावरि जैसी माशी । परिणामाच्या नलगे हो कामासी । ओळखेना भूतहृद्गत या रामासी ॥ तरि हो० ॥ १ ॥ चंचळ चित्त हें परब्रह्मीं लाहेना । सहज समाधि स्थीर हें राहेना, । व्यापक चैतन्य सर्वत्र आहे ना; । मी हा कवण ऐसें जारि पाहेना ॥ तरिहो० ॥ २ ॥ चित्सूर्य हा उदेला उमगेना, । अद्वैया-ब्जिनी जरि कां अनुरागेना, । सद्गुरु कानीं बीज हें सांगेना, । निर्गुण निरंजनीं छेद हा लागेना ॥ तरिहो० ॥ ३ ॥ मनासहित इंद्रियें न निरोधी, । निमग्न राहेना जंव या ब्रह्मबोधीं, । भृंगवत् नलगे या आमोदीं, । मोक्षाची वाट कवण ते न शोधी ॥ तरिहो०॥४॥ सोहिरा म्हणे अविनाश-सुख कैंचें त्याला, ।' गंगा टांकुनि मृगजळीं जो न्हाला, । अमृत म्हणुनि जो कां कांजी प्याला, । आपुले छायेसी आपण भ्याला ॥ तरि हो० ॥५॥

पद २२ वें.

जग हें तरंगरंगसंग ॥ ध्रुव० ॥ क्षणेक भास, विषयविलास, अवघा त्रास, अंतीं पावे नाश ॥ १ ॥ उना योगें, उखँरासंगें, देखोनी गंगे, ठकलीं जैसीं मृगें ॥ २ ॥ गळां शेळीचे स्तन, कीं हें आरशांतील धन, जैसा जळावरिल फेण, जैसें निद्रिस्थाचें स्वप्न ॥ ३ ॥ शरीर असे जंव, सकळ भासे तंव, विकारविंचूंचें हें पेंव, लटिके चिंतेचा हा गांव ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे कीं नेमी, जड हें शरीर नोहे मी, अंजीं राहतों निजधामी, यांचा समुद्र तो कीं मी ॥ ५ ॥

---

१ आहे किंवा नाहीं याचा अनुभव पहात नाहीं. २ हृदयाकाशांत चित्सूर्याचा उदय झालेला जर कळला नाहीं (म्हणजे जीव जर धृतराष्ट्र बनला तर) ३ परा-शक्ति हीच कमलिनी. ४ प्रीतिपात्र होत नाहीं. ५ ज्याच्या कानांत सद्गुरू कधीं बीज (सोहंबीज) सांगत नाहीं. ६ माळावर माध्यान्यकाळीं पडणाऱ्या प्रखर उन्हाच्या संगतीनें. ७ मृगजळाचा भाव ही प्रत्यक्ष गंगाच आहे, असें समजून. ८ नियमन करणारा. ९ किंवा नियमन करण्याची वस्तु जें जड देह तेंही नव्हे हा भाव. १० जन्मरहीत अशा परमात्म्याच्या ठायीं. ११ पूर्वोक्त जड आणि चेतन असे जे दोन विभाग त्यांचा समुद्र तो मी. [आपण परमेश्वररूप सागर असून जड चेतनादि भाव हे त्याचे तरंग होत असा भाव].

पद २३ वें.

संसार प्राण्या थोडारे थोडारे । जैसा पाण्याचा बुडबुडा वेगीं सोडारे[1] सोडारे ॥ ध्रु० ॥ त्रिकुटीं मन हें आढा, ब्रम्हरंध्र फोडा । विषयगोडीव-रिली माशी तेवीं मोहपाश तोडारे तोडारे॥ संसार० ॥ १ ॥ इंद्रियें हीं कोंडा, वरि नियमांचा[2] हा धोंडा, ठेवुनि अभिमान दवडा । दूर करोनियां आधीं विकला मानेंचा मोडारे मोडारे ॥ संसार० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे गाढा[3], नार्डा[4] पंचभूतांचा हा झाडा, यांतुनी हें चित्त काढा, अविनाश गुरुपद जोडारे जोडारे ॥ संसार० ॥ ३ ॥

पद २४ वें.

अशाचि खालीं गेला * प्राण्या जन्म तुझा व्यर्थ । कवण मी हा को-ठिल तुजला न कळे परमार्थ ॥ ध्रु० ॥ अरूप आत्मा ब्रह्मस्वरुपीं नलमे लक्षांश । अनेक शास्त्राभ्यासें तुजला प्रियकर वाच्यांशें । जितुकी विद्या तितुका वृत्तिचा[6] आढळतसे अंश । परतुनि दृष्टि न पाहे नाथसंकेतीं[7] चि-दंश ॥ अशाचि० ॥ १ ॥ ॥ ऋद्धि सिद्धि गारूड पहातां लाभ काय तुज-ला । प्रमाण मानुनि देह केवळ भुलसी धातूला[8] । अंतरीं ज्ञानप्रवेश न होय नाशाचि हा तुला । अमूक ऐसा न कळे तुजला चालक आंतुला ॥ अशाचि० ॥ २ ॥ गगनवनाचे ठायीं न होय मन हें विश्राम । संकट वाटे मोठें सोडितां इंद्रियग्राम । तीर्थ व्रतें दानधर्म हीं तितुकीं सकाम । निरालंब हें निर्गुण येणें न मिळे निजधाम ॥ अशाचि० ॥ ३ ॥ म्हणे

अन्यपाठः—* [आशा चिखलीं गेला प्राण्या०].

---

१ गूळ. २ नियम हें योगाचें द्वितीयांग होय. ३ बळकट, दुर्धर. ४ नाड-णारा, विपत्तींत पाडणारा किंवा कसरतीच्या वेळीं भोरपी लोक वगैरे रोंवतात तो. ५ † शब्दाचे अथवा वाक्याचे दोन प्रकारचे अर्थ असतात. १ वाच्यार्थ २ लक्ष्यार्थ. ६ अंतःकरणाच्या वृत्तींचा. ७ नाथ परंपरेची [संकेत=परंपरेची खूण] खूण जाणून ' चिद्रूप आत्मा हा ' परमात्म्याचाच अंश आहे, असें जाणत नाहीं हा भाव. ८ सोनें चांदी इत्यादि धातूंला. ९ महदाकाश हेंच कोणिएक निर्गुण वन.

१ † शाब्दिक अर्थ हा वाच्यार्थ आणि गर्भितार्थ रहस्यार्थ तो लक्ष्यार्थ.

सोहिरा कणासि टांकुनि उपणीसी कोंडा । आत्मज्ञानीं अनावडि जसी अवरुची तोंडा । मायानदिचा हा तुजवरि आलासे लोंडा । वाहत वाहत जासिल तेथें प्राप्त नव्हे धोंडा ॥ अशाचि० ॥ ४ ॥

पद २५ वें.†

तुम्हीं वंदा । सकळहि साधुवृंदा, न करावी हे निंदा, सोडुनि सकळहि धंदा । संगति सत्‌गति पावे जीव हा अक्षय परमानंदा ॥ तुम्हि वंदा० ॥ ॥ १ ॥ ते संत । वृत्ति ज्यांची संत, विषयांची घस्त[1], ती जे कां न करिती पसंत । जेथें जाती तेथें चित्सुखज्ञानवनींचे वसंत ॥ ते संत० ॥ २ ॥ ते गाती स्वरुपाचा सांगाती, देह हें जाणती माती, मिथ्या हे कुळयाति अजरामर स्वरुपीं तद्रुप झाले हारपली दिनराती[2] ॥ ते गाती० ॥ ३ ॥ तें मन । झालें कीं उन्मन, होउनी इंद्रियां दमन, नाहीं पुनरपी आगमन । खेचरी[3] मुद्रा लावुनि ज्याहीं निर्गुणि केलें गमन ॥ ते मन० ॥ ४ ॥ त्या संतांला । शरण यावें त्यांला, नको मानूं भलत्याला, द्वेषी वितंड मत्यांला, अपरसुखीं[4] झुरत्यांला । म्हणे सोहिरा भाषण करणें पाहुनियां पुरत्याला ॥ त्या संताला० ॥ ५ ॥

पद २६ वें.

हरिस्मरणसुख हें जरि घे । तरि मोह मनीं न रिघे ॥ ध्रु० ॥ श्रवण मनन निदिध्यासेंकरुनि, रज तम हा डाग निघे । मिथ्या मानलें सकल दृश्य हें, पुनरपि नयनीं नघे ॥ हरि० ॥ १ ॥ येणें पुण्येंकरुनि वर्तनीं, किमपि न राहती अघें । भक्तिज्ञानवैराग्यदशा हे, नित्य हृदयीं वळघे[5] ॥ हरि० ॥ २ ॥ ध्यान धरोनी निरंजनवनीं, दृढाभ्यास लावुनि घे । तरि

---

† याची चाल [रंगनाथांचें ' तो योगी । विषयीं विरागी ' ह्या पदाप्रमाणें] आहे.

---

१ विषयांचें मनांमध्यें चिंतन फिरणें, घस्त=येरझारा, पाहारा. जे संत आहेत ते तें विषयांचें चिंतन पसंत करीत नाहींत हा भाव. २ कालात्मशक्तीमुळें होणारा दिवस व रात्र हा भेद, कालाच्या पलीकडे असणारें जें परमप्रकाशक नित्य स्वरूप त्या प्रत पोंचलेल्या योग्यास असूं शकणार नाहीं. ३ पांच मुद्रांतील एक मुद्रा (नासाग्र दृष्टि). ४ जड प्रकृति अपरा तत्संबंधी सुखांत. ५ प्रविष्ट होते.

तें पद पावेल जेथ हे । ब्रम्हा हरिहर निघे ॥ हरि० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा आत्मरसाची, प्राणि नित्य चव घे । अंतर बाहेर तेंचि कीं व्यापक, ब्रम्हचि हें अवघें ॥ हरि० ॥ ४ ॥

पद २७ वें.

प्राण्या तुझा परिणामीं कठिण प्रकार ॥ ध्रु० ॥ न करिसी भजन, न करिसी पूजन । नाहीं तुला, आत्मज्ञानाचाही *अधिकार ॥ प्राण्या० ॥ ॥ १ ॥ तुला संत भेटेल कोठचा †, जरि लाभ ‡ झाला भेटिचा । $ शिकविल्या बोला देसी, वेंठिचा[1] हुंकार[2] ॥ प्राण्या० ॥ २ ॥ तुला याद[3] नाहीं आदली, कल्पना हे तुज बाधली । नाहीं योगारण्यीं साधली, मन-मृगाची ¶ शिकार ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ आपणामाजी थोर, परि तूं देवा-पाशीं चोर । अवघा पदरीं बांधुनि घोर, करिसी लटकी लकार[4] ॥ प्राण्या० ॥ ॥ ४ ॥ ज्याचें तुजपाशीं काज, तुजला म्हणती ते महाराज । म्हणसी तितुलें होय होय; जी जी करुनि § करिति जयजयकार ॥ प्राण्या० ॥ ५ ॥ अधःपाता धाडिल, [5]शेखीं पेंचा पाडिल । दोहींकडे नाडिल, स्थूल बुद्धिचा अहंकार ॥ प्राण्या० ॥ ६ ॥ सोहिरा म्हणे झांकळ[6]सी । जन्ममरणा आकळसी । जोंवरि अंतरदृष्टि नोळखसी ब्रम्ह निराकार ॥ प्राण्या० ॥ ६ ॥

पद २८ वें.

मुखीं सत्य बोलणें सत्य बोलणें । निजानंदें डोलणें ॥ ध्रु० ॥ दहावें[7] द्वार उघडलें, मन ब्रम्हीं जडलें । त्याचें इष्टा[8]निष्ट पडलें, लोकांनीं काय

[या पदाचा राग बिहाग आहे.] अन्यपाठः— * [ब्रह्मज्ञानाचाहि अधिकार]. † [कैंचा] ‡ [परि लाभ नाहीं भेटिचा] $ [बोलविल्या बोला देसी] ¶ [नाहीं योगरणीं साधली मनशिजाचि शिकार] § [म्हणती].

---

१ बळजबरीचा. २ संमति. होय म्हणणें. ३ पूर्वजन्माचें स्मरण [स्मरण या शब्दार्थी याद असा शब्द वाडीप्रांतीं चालतो]. ४ बतावणी, प्रौढी. ५ शेवटीं. ६ बडबड करितोस. ७ ब्रह्मरंध्र—तालुस्थान. ८ अशाचें इतर लोकाशीं जें इष्टानिष्ट=चांगलें वाईट कांहीं कर्तव्य असतें तें अद्वैत स्थिति बाणल्यानें. पडलें

करणें ॥ मुखीं० ॥ १ ॥ धर्म कीं अधर्म घडो, सुख दुःख गळां पडो । कांहीं असलें तरि, अनुभवबळें तोलणें ॥ मुखीं० ॥ २ ॥ आपण तत्वींचा जो देखणा । हृदयांतील मीपणा, परतें खोलणे ॥ मुखीं० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे आपुलें हित, पहावें हें विहित । ज्याला न कळे आपुली रीत, त्यासि काय बोलणें ॥ मुखीं० ॥ ४ ॥

कटिबंध (पद्य २९ वें.)

प्राण्या देवदेव भजरे । नित्यानित्य विचार करुनि मग सहज समाधीं निजरे ॥ ध्रु० ॥ संसार माझा, मीच राजा, म्हणोनि माजा, येउनि भाजा छंदे, लज्जा सांडुनि, काजा अर्थी, पांजापांजी करुनि, भल्यासि गांजागांजी करिसी; दूत दंडिती, यम झडती, गळां कि पडति, कढई कढती, आंत उकडति, प्राणी रडती, आपदा घडती । हें घडिघडि सांगतों तुजरे । प्राण्या देवदेव भजरे० ॥ १ ॥ अभ्रींची छाया, तैसी काया, लटकी माया, कीं नटजाया, हे नर काया, जाते वायां, लाग उपाया, सद्गुरुराया, भवाब्धिला या, सांग तराया, म्हणोनि पायां, वंदन करोनि, बंधन तोडीं, कुसंग सोडीं, सुसंग जोडीं, अखंड गोडी ॥ लावुनि उमज तूं जीविंचें हें निजगुजरे ॥ प्राण्या देव दे० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा नादबिंद्वातीत मुकुंदा, मूलकंदा, ज्ञानारविंदांतील आमोदा, अमित अमंदा, या गोविंदा, परमानंदा, दृष्टि व्यष्टि न गमे जोकां सृष्टिचालक, पालक सकळ व्यापक, त्रिभुवनींचा नायक, अमृतबिंदु, पूर्ण इंदु, कृपासिंधु । परब्रह्म अनादि तें निजबीज रे । प्राण्या देवदेव भज० ॥ ३ ॥

म्हणजे नाश पावलें. अर्थात लोकांनीं (ब्रह्मादि लोकांनीं) तारि त्याच्याशीं काय करावयाचें आहे. किंवा लोकांनीं हवी तशी निंदा केली तरि त्यांकडे त्याला काय कर्तव्य आहे. करीनात बापडे !

१ बरें किंवा वाईट याचा निश्चय करणें. २ शुद्ध चैतन्य परमात्म्याचे ठायीं "अहंब्रह्मास्मि" अशी जी स्फूर्ति झाली (तेंच आपण तत्त्व,) निजतत्व बिचें नांव मूळ प्रकृति, महामाया. त्या स्फूर्तिरूप दर्पणांत पाहणारा परमात्मा. ३ उघडून पाहणें. ४ ध्वनियुक्त प्रणव व बिंदु चैतन्य यांच्या पलीकडचा भगवान मुकुंद वासुदेव.

कटिबंध पद ३० वें.

जा मिळावया स्वामीला । निजधामीं निर्विकल्पाला ॥ ध्रु० ॥ स्वहितीं चुकसी, भजनीं लखसी, उगाच चकसी, विषयां ठकसी, मनिंचा आकसी, विवाद शिकसी, विद्या विकसी, निद्रानें ठकसी, कशासि भकसी । वृथा वाग्जल्पाला ॥ जा मिळावया स्वामीला० ॥ १ ॥ मोड मी तूं हें, दवड वासना खोड हृदयींची तोड, वल्गना, कोंड इंद्रियें वोढ, पवना शून्य मंडळीं फोड, त्रिकुट हें सोड, जाणिवीं गोड सुख हें जोड । लाभ हा न वचे कोटि कल्पाला ॥ जा मिळावया स्वामीला० ॥ २ ॥ घोंक, अंतरीं रोंक लाउनी, मोख मनाला मेख मारुनि, रूपरेखविण देख, ब्रह्म हें ठोक, ज्ञान हें रोख, नाणें आधिं जोख, गुरुकडे चोख, करुनि घे । स्थूल दृष्टिनें भुलूं नको या शरीरसुखअल्पाला ॥ जा मिळावया० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा बूजें, त्या सुखिं रीजें, लावुनि तीजें त्या रशीं, भिजवुनि मन थीज, पुरतें मुजरा करिं हुजरातिला, गुज जाण हें गुज, गुरुचें बीज, अनादि निज । तेथ उघड झांक नसे डोळ्यांच्या मलपालीं ॥ जा मिळावया० ॥४॥

*पद ३१ वें.

गुरुजी जोगी ऑलख ऑलख ऑलख जागेरे ॥ ध्रु० ॥ विरक्तरंगें, ज्ञानगंगे स्नान तृप्त वैराग्यें, विभूति अंगें, निपट नागेरे ! नागेरे ! नागेरे ! गुरुजी जोगी० ॥ १ ॥ संसार न ठावा, शून्य विसावा रूप, अभावाचे रिघावा, नाहीं अनावा, गोसांवी मौनि बावारे ! बावारे ! बावारे ॥ गुरुजी०

*[हें पद महाड रागांत गातां येतें.]

१ डुलक्या देतोस. २ खुनशी. ३ कारण किंवा शेवट असें जें सत्य त्याचे ठायीं. ४ ज्ञानस्वरूप ज्ञानकळेच्या ठायीं. ५ समज. अनुभव घे. ६ गुंग हो, तल्लीन हो. ७ मुरून जाणें, तन्मय होणें [तीज हा शब्द वाडीप्रांतीं फार आहे. नारळांच्या राशींतून बरें वाईट अशी निवड करावयाची त्यास तिजून काढणें असें म्हणतात.] ८ पापण्यांला. ९ ऑलेख (अलक्ष्य) ही नाथपरंपरेंतील सांकेतीक खूण आहे. १० विरक्तियुक्त शुद्धसत्त्वरंगानें

॥ २ ॥ आनंद छोटा[1], प्रेमाच्या जटा, त्रिवेणी[2] वाटा, निघे गोल्हाटा[3], अवधूत मोठा रे! मोठा रे! मोठा रे ॥ गुरुजी जोगी० ॥ ३ ॥ वीतरागी[4] अनुरागी, भोगी ना त्यागी, अंतरिं निःसंगी, विराजे राजयोगी रे! योगी रे! योगी रे ॥ गुरुजी जोगी० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे या अंधाला, न पाहतां गेला, ऊर्ध्वपंथें आला, प्रेमपुरीं न्हाला, जीवनकळाबीज प्यालारे! प्यालारे! प्यालारे! ॥ गुरुजी जोगी० ॥ ५ ॥

पद ३२ वें.$

संत जातीचे सर्वांसीं अद्वेषी । हकनक त्यांला हे सर्वहि जन कीं द्वेषी । वरति दाविती गवलतां हे देशी[10] । त्यांच्या सन्मानें परम होती क्लेशी०॥ध्रु०॥ गायी हिंदूसी परम पूज्यमान । देखुनि दुश्चित मनिं हे मुसलमान । खाउनि दुभतें कीं निदानिं हे बेइमान । सुंदर वनितेचा कामि पुरुष दुस्मान ॥ १ ॥ वृक्ष आहे कीं उगाचि आपुले ठायीं । वाटे न जातो तो मौजेन घाली घायी । तो तंव कोणाचें कांहिंच खात नाहीं । अन्यायाविणें घडती हे अपायी ॥ २ ॥ चंद्रोदयीं कीं समस्त सुखी होती । तस्कर देखोनि परम दुःखी चित्तीं । अस्त व्हावा हें सतत हृदयीं चिंती । निंदक जनांसी साधुची तैसी खंती ॥ ३ ॥ हंस सेवितो सहज मुक्ताफळें । स्वाद कैसा तो नेणती कावळे । त्यांच्या अंगिचें जरिका मांस मिळे । मूर्ख साधूंच्या लांछनि देती डोळे ॥ ४ ॥ ज्याण

$[चाल ‘ निर्गुण माळ्यानें एक बाग लाविली ज्यानें ’ या तुकोबांच्या पदाच्या चालीप्रमाणें.]

---

१ आनंदमय ईश हाच (छोटा बच्चा, शिष्य) शिष्य आहे ज्यापाशीं असा. २ इडा, पिंगला, सुषुम्ना, यांचें ऐक्य झालेल्या ठिकाणास त्रिवेणी असें म्हणतात (त्या मार्गानें). ३ ललाटोर्ध्वभाग (ब्रह्मांडांतील कारणदेह). ४ परमवैराग्यशील, विरक्त. ५ प्रेमकळेशीं प्रीति ठेवणारा. ६ अंध झालेला जीव (धृतराष्ट्र). ७ आकाशपथें (सहस्रदलचक्रामधून). ८ जीवनरूपा परा ज्ञानकळा (अर्धमात्रा) तिचें बीज ॐकार. ९ वरवर लौकिकाचरण, वरकरणीपणा. १० देशरिवाजानुरूप.

साधूंची संगति करावी । त्याणें आधींची पुरति पारख घ्यावी । जीविंची खूण हे जातिनिशि समजावी । परतुनि सोहिरा म्हणे प्रीत विटों न द्यावी ॥ ५ ॥

पद ३३ वें.†

विश्वास ठेवीं प्राणिया नारायेण हरिवरी रे ॥ ध्रु० ॥ ज्यानें निर्मियलें ब्रम्हांड, येवढी पृथ्वी हे नवखंड । तिन्ही देव त्रिभुवनबंड, यमधर्मे जीवाला दंड । भूतिं भूत पिंड उदंड । ज्यानें उदंड चालतसे हें शरीर रे ॥ विश्वास० ॥ १ ॥ ब्रम्हादि वंदिती ज्याला, "नेति" वेद म्हणति त्याला । या जगाचिया पित्याला, कीं हें विश्व भरोनि रित्याला । तूं नकोचि विसरों त्याला । क्षण भाग्याचिये भरिं रे ॥ विश्वास० ॥ २ ॥ अवलोकुनियां भाळीं, घाली योगासन हें त्रिकाळीं । दिठी देउं नको आभाळीं, दृश्य पदार्थ या गाभाळीं । कांहीं पातक हें सांभाळीं । महातारुण्य लहरिबैरीरे ॥ विश्वास० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा हा भवतारी, देव युगायुगीं अवतारी । । जो पुरुष नव्हे नारी, हा आकारचित्रचितारी । नको घालवूं त्याविण काळ । होय व्यर्थ हे वांच्छा नानापरीरे ॥ विश्वास० ॥ ४ ॥

†[या पदाचा राग खमाज आहे].

१ नारायण या नांवाच्या उत्पत्ती विषयीं पुढील श्लोक अवलोकनीय आहेतः— [नराज्जातानि तत्त्वानि नराणीति विदुर्बुधाः । तस्य तान्ययनं पूर्वं तेन नारायणः स्मृतः ॥१॥ आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनवः । अयनं तस्य ताः पूर्वं तेन नारायणः स्मृतः ॥ २ ॥ अर्थः-पंडित लोक नारापासून उत्पन्न झालेल्या तत्त्वांना 'नर' असें समजतात. तीं नारें (तत्त्वें) पूर्वी परमेश्वराचीं अयनें (आश्रय स्थानें) झालीं होतीं ह्मणून त्याला 'नारायण' असें नांव पडलें ॥ १ ॥ उदक नरापासून उत्पन्न झालें ह्मणून त्याला 'नर' असें ह्मणतात. तें 'नर' (उदक) पूर्वी ईश्वराचें अयन (वसतिस्थान) होतें ह्मणून परमेश्वराला 'नारायण' असें नांव पडलें] तुकोबांनीं 'श्रीरंगनाथ स्वामीपाशीं' भागिरथीस अर्पण करण्याकरितां अभंगरूपी पत्रिका लिहून दिली त्यांत याच रहस्यार्थान्वयें ह्मटलें आहे—चारि वर्ण झाले जेथुनि निर्माण ' तो हा नारायण बाप माझा ॥ २ ॥ २ भाग्यमदाच्या भरावर ['तो त्याच्या भरीं भरला आहे किंवा त्याच्या भारावर बोलतो, असा वाडी प्रांतीं शब्द चालतो.] ३. दोन्ही भोंवयाच्या मध्यभागीं प्राणाला योगाभ्यासानें स्थीर करणें. ४ तारुण्य लहरीच्या भरावर. ५ ब्रह्मदेवापासून तों अति सूक्ष्म तृणापर्यंत सर्व स्थावर जंगमात्मक विश्वसृष्टि चित्रित करणारा चितारी. [यापुढें मुळांत पहा.]

लावणी पद्य ३४ वें.

अरे तूं धरूं नको ! धरूं नको ! लटिका हा अभिमान । शाश्वत नाहींरे संसारीं, देहा कोण जुमान । जेथुनि आलासी जन्माला, तेथ धरीं इनाम । सहसा होउं नको ! होउं नको ! भगवंतीं बेइमान ॥ ध्रु० ॥ हें तूं जाणरे सुजाणा, दों दिवसांचें बखेत । आयुष्य कितुकें हें कळेना, कसा येतसे वखैत । कांहीं गुरुमुखें समजुनि घे, पाव निरंजन तर्खेत् । याला दिरंगें तूं करूं नको, शेवट पडसिल फकर्त् ॥ अरे० ॥ १ ॥ जा० प० ॥ पुरता पहावा तनुचा चाळक हा कोठें । अनुभवीं पाहतां पाहतां, मन थोटें । सहसा नयेचि रे दाखवितां, हा म्हणुनि बोटें । रूपरेखविण देख अगोचर, हेंचि गूढ मोठें ॥ अरे० ॥ २ ॥ सावध करितां रे घरबार । भजनांचा करभार । देउनि सोडूं नको दरबार । मुळिंचा वारंवार ॥ अरे० ॥ ॥ ३ ॥ स्वरूपसागरिंचे तरंग । विचित्र नानारंग । आवरिं पवनांचा तुरंग । अंबरीं चाल तूं अंतरंग ॥ अरे० ॥ ४ ॥ गुप्त हे सत्ता कैसी तरंजं । करुनि कामक्रोध हे वर्जे । करणें देवापाशीं अर्जे । ठेउं नको जनांशीं गरज ॥ अरे० ॥ ५ ॥ नको साधुंचि हे हरकत । ययानें नाहिंच रे बरखैत । निंद्यवादाचें बहुखेतें । पुनर्बधिर मुका जन्मत ॥ अरे० ॥ ॥ ६ ॥ आतां जीवत्व हें उद्धारीं । चित्त देईं जगदुद्धारीं । गुंतुं देउं नको आकारीं । सतत रम तूं निराकारीं ॥ अरे० ॥ ७ ॥ सांडीं विषयांच विलाप । अवघा कर्मक्रियाकलाप । भगवद्गुणानुवाद आलाप । महदानंदीं होइं मिलाफ ॥ अरे० ॥ ८ ॥ भव हा दोराचा रे साप । कवणा असे पुण्यपाप । भ्रांति व्हावी हे निःपाँप । अरुपीं मिळोनि आपेंआप ॥ अरे० ॥

---

१ जुमानणें, पर्वा बाळगणं. हा स्थूल देह नाशवंत याची पर्वा काय? असें मान. २ वेळ, काळ. ३ प्रसग. ४ सिंहासन. ५ दिरंगाई, घालघसर. ६ एकटा, एकाकी. ७ प्राणवायूचा घोडा मन. ८ महदाकाशांत, ब्रह्मरंध्रांत. ९ अंतर्गत सुषुम्ना मार्गानें, गर्तानें १० स्पष्टीकरण करून पहा. [तरजणें हा शब्द वाडी-प्रांतीं फार प्रचारांत आहे. दागिना वगैरे तराजूंत घालून तोलून वगैरे पाहण्याचे क्रियेस तराजणें म्हणतात). ११ यःवृद्धि. १२ दुःख. १३ पापरहीत, निःशेष.

॥ ९ ॥ भेदुनि त्रिवेणिचा संगम । अद्भुत मन हा सारंगम । सहस्त्रदळीं पावावा सुगम । खरा मार्ग हा विहंगम[1] ॥ अरे० ॥ १० ॥ जेथ वेदाद्य न चलती तर्क । तेथ मावळले चंद्रार्क । महा अद्वैत पिउनियां अर्क । सोहिरा म्हणे हो गर्क ॥ अरे० ॥ ११ ॥

पद ३५ वें.

सुखी हो कीं त्या सुखीं । जेथ मनाची नलगे नखीं[2] ॥ ध्रु० ॥ जीवा तूं पैंक्षी[3] उदास होईं, ऊर्ध्वमूळ[4] महारुखीं । पुनरपि इच्छुनि पडों नको या, प्रपंच परम दुःखीं सुखी हो० ॥ १ ॥ भिन्न स्वभाव जनाचे देखत उपटुनि टांकी उखीं । भगवंताचें अखंड स्मरण कीर्तन कर हें मुखीं ॥ सुखी हो० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा शरीर हें तंव, तृणतुल्य[5] लेखीं । भोगी असतां जोगी हो तूं, आदेस कर ऑल्खीं[6] ॥ सुखी हो० ॥ ३ ॥

पद ३६ वें.

हें काय कसें प्राण्या पहा । पाहुनियां निश्चळ रहा ॥ ध्रु० ॥ शून्यामाजीं देह हें भासे । भासत भासत केव्हांचि नासे । सबाह्य याला कोण प्रकाशे । जवळींच असोनियां । न दिसे हां[7] ॥ हे काय० ॥ १ ॥ पंचभूतांची साक्षि येतीं[8] । साक्षि कैसी ते दिठीं[9] न येती । प्राप्त व्हावी गुरुदयें

---

१ या विहंगम मार्गाविषयीं सोहिरोबांच्या सिद्धांतसंहिता उत्तरार्धांत माहिती आहे ती पहावी. २ जेथें मनाची नखीं, (नख, बाधा) लागत नाहीं असें अवर्णनीय परम सुख, त्यामध्यें. ३ दोन पक्षी (जीव आणि इश) परस्परांस कदापि सोडून न जाणारे असे मित्र असून ते एकाच संसाररूपी वृक्षास चिकटून असतात. हे जीव पक्षा तूं त्या पैकीं उदास पक्षि ईश हो असा भाव. ४ ज्याचीं मुळें वर आहेत व शाखा खालीं आहेत असा (रुख=वृक्ष) सनातन जो अश्वत्थ वृक्ष त्यावर. ५ निर्जीवपणा, नाशवंतपणा. ६ पूर्वी सांगितलेली नाथपरंपरेची खूण (ऑलेख १ अ॰क्ष) त्या खुणेच्या संकेतानें ऑल्खि असें गुरूनें पुकारल्यावरोबर जो गुरुकृपापात्र शिष्य असेल तो आदेस [साईं आदेस असें प्रत्युत्तर दिल्याविना राहणार नाहीं. ७ आत्मा (साक्षी). ८ पंचभूतांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. ९ पण तें साक्षित्व कसें आहे तें जड दृष्टीला प्रत्यक्ष दिसत नाहीं.

ती[1] । तेचि कळेचा निदिध्यास वहा ॥ हें काय० ॥ २ ॥ पिंड ब्रह्मांड त्यागुनी सुख हें । सदैव स्मरतां असे सम्मुखें[2] हें । समूळ विलया जातें दुःख हें । दृश्यातीत आनंद महा ॥ हें काय० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा रवि शशि चाले । ज्याचे सत्तेनें जग हें हाले । हेंचि देखुनि योगी धाले । नवलचि परम अहाहा ! ! ॥ हें काय० ॥ ४ ॥

*पद ३७ वें.

प्राण्या उमजेना हें तुज । याची तूं न करिसि कां तरतूज ॥ ध्रु० ॥ सुकृत हें निष्काम नसे । वरि ज्ञान उगें लाभेल कसें । हा निश्चय स्वरूपिं केविं बसे । ही उपरमेना[3] दिठी, नकळे कीं हें गुज ॥ प्राण्या० ॥ १ ॥ शुद्धसत्त्व[4] हे सेना जुडती । सहज हे आकाशीं उडती । भवांश रज तम यांवरि पडती । अतिशय लागतें झूज ॥ प्राण्या० ॥ २ ॥ निरहंकृतिनें अद्वयभावें । जेथुनि आलें तेथ समावे । ब्रम्हीं नलगे हें अर्पावें । वरचेवरि हें कर्मा पडतें पूज्य ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ ज्ञानावीण जीव† अंध झाला । विषय सुखाला बहु रिझाला । वैराग्याचा अग्नि विझविला । कशानें पडेल हा बूज ॥ प्राण्या०॥४॥ म्हणे सोहिरा शरण यावें । अर्धमात्रा औषध प्यावें । व्यतिरेक अनुपान घ्यावें । उतरति हे भवसूज ॥ प्राण्या० ॥ ५ ॥

पद ३८ वें.

सदसद्विचार कांहीं करूं या रे । एक वेळ परम हा दुर्घट, दुस्तर भवसागर तरूं या रे ॥ ध्रु० ॥ भक्तिज्ञान वैराग्य जेणें, निजबोध उपजे

---

*या पदाचा राग कल्याण आहे. अन्यपाठः—† [अज्ञानें जीव अंध झाला]

---

१ तो ज्ञानदृष्टी. २ समोरासमोर. ३ दृष्टि अंतर्मुख होऊन, विराम; शांति पावत नाहीं हा भाव. ४ देहरूप कुरुक्षेत्रामध्यें शुद्ध सत्त्व (पांडवसेना) आणि भवांश=संसाराचे अंशरूप जे रजतमोगुणादि दोष (तेंच कौरव सैन्य) या उभयतांचें नेहमीं द्वंद्व युद्ध चाललें आहे. शुद्ध सत्त्व सेनेमध्यें मुख्य सरदार प्रत्याहार, धारणा अश्व, ध्यानाचें निशाण, तन्मयाचें एक छत्र, घस्तदार विवेक, दिवटा सद्बुद्धि, भालदार निजधैर्य, चोपदार वैराग्य इत्यादि यांना शुद्धसत्त्व सेना असें म्हणतात.

हृदया रे । संतति संपत्ति न येती कोणी, निर्वाणींच्या समया रे ॥ यारे ! सदस० ॥ १ ॥ अविद्यात्मक विकार सर्वहि, समूळ जाति लया रे । जेणें करुनि हे शीघ्रचि होइल, भगवंताची दया रे ॥ यारे ! स० ॥ २ ॥ नित्यानित्य विवेकें निवडा, जेवीं हंस सलिलपया रे । याहुनि आणिक तीर्थें नलगती, तुम्हां हे काशि गया रे ॥ यारे ! सदस० ॥ ३ ॥ देहसंरक्षण कैसें होइल, टाकुनिया किं भया रे । म्हणे सोहिरा निजधामीं रहा, निवावयाचे* तीरे ॥ यारे ! सदस० ॥ ४ ॥

पद ३९ वें.

तुला देव कधींच श्रमी न करी । त्याळा तूं विसरसी ना क्षणभरी ॥ ध्रु० ॥ प्रपंच मिथ्या भ्रांतिच हे असे । ब्रम्ह निरंतर सत्यचि तें दिसे । अंतरिंबाहेर तेंचि प्रकाशे । बसे निश्चय हा दृढ जरी ॥ तुला देव० ॥ १ ॥ भक्तकाजकल्पद्रुमस्वामी । तोचि चालक इंद्रियग्रामीं । प्राण्या भजसी जरी निष्कामीं । जगदुद्धारक हरी ॥ तुला देव० ॥ २ ॥ जन्ममृत्युजरादिक व्याधि । यांचें दुःख हें कधीं न बाधी । अनेक संसारिक उपाधी । सर्वांचि श्रम परिहारी ॥ तुला देव० ॥ ३ ॥ भूतद्वेष हा किमपि नसेल । दैवि[३]-दशा हे मनीं असेल । भूतदया हे हृदयीं वसेल । कवणचि न दिसेल अरी ॥ तुला० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा देह हें ऐसें पाहीं । कांहीं नासेल विश्वास नाहीं । त्वरित तूं कांहीं सार्थकीं राहीं । भजन करिसी लौकरी ॥ तुला देव० ॥ ५ ॥

---

*अन्यपाठः—+ [तयारें]

---

१ पाणी आणि दूध एकत्र केलें असलें तरी हंस पक्षी त्यांतलें पाणी वेगळें करून दूध पितो. २ तरून जाण्याच्या वरीवर (होडींत) बसण्याच्या [ज्ञाननौके-रूपून निघावयाच्या बेतावर] तयारीनें रहा हा भाव. ३ दैवी संपत्ति.

पद ४० वें.

अरे ! हा लाभ घ्यारे । परमामृत हें प्या रे ॥ ध्रु० ॥ ऐशी हे नरयोनी दुर्लभ । † साधूं न मिळे असा कीं सुलभ । संदेह नसतो काळ वल्लभ । मीनला एक समयारे ॥ अरे० ॥ १ ॥ लागला भवभ्रम हा मार्गे । भगवन्तीं चित्त केंवि लागे । उघडुनि ऐसें कोण सांगे ॥ अवघेंचि टांकुनि या रे ॥ अरे० ॥ २ ॥ ब्रह्मप्राप्तीची प्रीति असावी । संशय भ्रांति कांहिं नसावी । वैराग्याची कळा असावी । विवेक हृदयीं हा न्या रे ॥ अरे० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा नाश जाणुनी । चराचराला ध्यानीं आणुनि । अर्थज्ञान हें अंतरिं बाणुनि । लागा परमार्थाचे तयारे ॥ अरे० ॥ ४ ॥

पद ४१ वें.

प्राणी हो सदां सुखी रहा ॥ ध्रु० ॥ स्थूल देह हें कोठुनि चाले, कवण यांतुनि बोले । विषय सुखांत कोण डोले, ¶ द्रष्टा कोण कसा मी पहा ॥ प्राणी० ॥ १ ॥ पंचभूतसंयोगें सकाळिक, सुख दुःख हें सहा । जीव होत्साता शिवरूप मी, कधीं सोडूं नको धीर हा ॥ प्राणी० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा बुद्धियोगें हीं इंद्रियें आकळी दाहा । सहजसमाधींत निमग्न होउनि, म्हणोनि घ्या तुम्हि अहा ॥ प्राणी० ॥ ३ ॥

अन्यपाठः—† [साधु न मिळे] ¶ [परतुनि दृष्टिं कोण मी पहा]

---

१ असा देह वारंवार साध्य होणें शक्य नाहीं. आत्मप्राप्ति करून घेण्यास नरदेहांवांचून अन्य साधन नाहीं. म्हणून तुकोबा म्हणतात. [स्वर्गींचे अमर इच्छिताति देवा । जन्म आम्हा द्यावा मृत्युलोकीं ॥] २ आपणास पाहिजे तसा प्रीय, अनुकूल. ३ सांपडला (प्रसंगानुसार सांपडला आहे.) ४ मी मी असें म्हणणारा कर्ता भोक्ता साक्षी कोण तो पहा. ५ सहन कर. ६ योग युक्त होऊन, मीपणा सोडून कर्म आचरण करणें. व सिद्धि आणि असिद्धि या दोहोंच्या ठायीं समबुद्धि ठेवणें यालाच बुद्धियोग म्हणतात. [दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय । भ० गी० अ० २] अर्जुना समत्व चित्ताचें ! तेंचि सार जाण योगाचें । जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य आथि ॥ ७३ ॥ तो बुद्धियोग विचारितां । बहु तें पाडें पार्था । दिसे हा अपता । कर्मयोग ॥ ७४ ॥ परि तेंचि कर्म आचारिजे । तरीच हा योग पाविजे । जें कर्म शेष सहजें । योगस्थिति ॥ ७५ ॥ ज्ञानेश्वरी अ० २.]

पद ४२ वें.

आतां ओळखीं चिन्मात्र । अभिमान सोडीं मात्र ॥ध्रु ०॥ मिथ्या माया मृगजळ, लटिकें कुळगोत्र ॥ आतां० ॥ १ ॥ संसारीं राहणें, जसें जळीं पद्मपत्र ॥ आतां० ॥ २ ॥ याला कासया धुंडिसी, बहुत नलगे मंत्र तंत्र आतां० ॥ ३ ॥ पहा शरीर शोधुनी, कवणें घडियेलें हें यंत्र ॥ आतां० ॥ ४ ॥ याला चाळविता कवण, याचें कोणा हातीं सूत्र ॥ आतां० ॥५॥ वाद्यावीण वाजतें, अनाहत कीं वाजंत्रें ॥ आतां० ॥ ६ ॥ सोहिरा म्हणे जा तेथ, जेथ दिवस नाहीं रात्र ॥ आतां० ॥ ७ ॥

पद ४३ वें.

तरि सार्थक हेंचि करावें । सदैव आत्मस्वरूप स्मरावें ॥ ध्रु० ॥ मानूं नये हें आवरावें । चैतन्य सर्व समान धरावें । विश्रांतिकळेला वरावें । पुनती जन्मूनियां न मरावें ॥ तरि० ॥ १ ॥ अनादिभूमिके स्थीर व्हावें । मन हें गगना माजि जिरावें । सर्व नासुनि जें कां उरावें । तेचि कीं हृदयीं भरावें ॥ तरि० ॥ २ ॥ सोळा अतीत सतरावें । त्या परब्रह्म कशीं उतरावें । ब्रह्मरंध्रीं भितरावें । हा संसारसमुद्र तरावें ॥ तरि० ॥ ३ ॥

---

१ मनुष्यजन्माला यावें तर या पदांत पुढें सांगितल्याप्रमाणे सार्थक. करावें. असा असा भाव आहे. २ सत्य मानूं नये असें मनोराज्य. मनुष्य आपल्या मनोराज्यांत अनेक मांडे खात बसतो पण तो ते सत्यच आहेत असें मानील काय? या प्रकारचें जें मनोराज्य (मनोमय सृष्टि.) तें आवरावें असा भाव. ३ चित्कळा (चिच्छक्ति, सत्रावी पराप्रकृति) भगवद्गीता. अ० ५ श्लो० १३ पहा. ४ जो जन्मला आहे त्याला मृत्यु आहेच आणि जो मेला त्याला निश्चयें करून पुर्वजन्म आहे, असें भगवंतानी गीतेंत सांगितलें आहे याकरितां, ' अशा या जन्ममरणरूप राहाटगाडग्यांतून मुक्त व्हावें असा भाव. ५ अहं ब्रह्मास्मि हें स्फुरण जेथून उद्भवतें अशी भूमि. अनुभवाच्या चार भूमिका (विक्षेपता, गतायाता, संश्लिष्ठता, सुलीनता) पैकी सुलीनता—येथें स्थीर व्हावें हा भाव. [ब्रह्मीं चित्त निःशेष मुरे । केवळ शांतीच उरे । सुखाचा पुंज उतरे । ते सुलीन दशा ॥ १ ॥ विवेकसिंधु, मुकुंदराज] ६ अव्यक्त कूटस्थ. ७ पुरुषाच्या सोळा कळा त्या व्यतिरिक्त. ८ परमात्मा (परब्रह्म) ९ कसोटीस, बरोबरीस १० आंत प्रवेश करावा.

म्हणे सोहिरा नलगे फिरावें । जेथिल तेथ मुरावें । देहभान विसरावें । हेंचि वांच्छित मनिंचें पुरावें ॥ तरि० ॥ ४ ॥

पद ४४ वें.

सदांचि संतोषमय आंत आम्हीं आहों हो ॥ ध्रु० ॥ मन हें चंचळ, विसंबों ना पळ । निश्चळ निर्मळ, निरंजनीं राहों हो ॥ सदांचि० ॥ १ ॥ खेंचरें भूचरें, आणि हें जळचर । आइतें चराचर, नवल हें पाहों हो ॥ सदांचि० ॥ २ ॥ नेमिलें जें असे, दृष्टिसी न दिसे । चिंताचि ते नसे, होणार तें होवो हो ॥ सदांचि० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे तें साहूं, देवाला या नित्य गाऊं । देइल तें खाऊं, वरवर सोंग दावूं हो ॥ सदांचि० ॥ ४ ॥

पद ४५ वें.

मग चिंता ते हो कशाची ? । मुळीं सोडिलिया आशाचि ॥ ध्रु० ॥ भ्रांति फिटली देह नाशाची, अवघी गेली अवदशाचि । चळती कळती दैवदशाची, प्रभा हे अविनाशाची ॥ मग० ॥ १ ॥ प्रतीति नलगे हो विषाची, खाउनि विषयांच्या भासाची । हे लतिका भव पाशाची, समजुनि गुंडाळी गाशाचि * ॥ मग० ॥ २ ॥ योनी अपूर्व मनुष्याची, सेवा करणें जगदीशाची । संगति करणें सत्पुरुषाची, योगी ज्ञानी अशांची ॥ मग० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा रहाणी जळीं माशाची, तेंवीं समाधि तमाशाची । बाळें उन्मत्त जो पिशाचि । कृपा † मोद देती निशाची ॥ मग० ॥ ४ ॥

‡ पद ४६ वें.

संसार चिंता चिंतितांचि मन हें गेलें । नरदेह जन्माचें सार्थक नाहीं केलें ॥ ध्रु० ॥ इच्छिलें हें जोंवरि न घडे, सुख निद्रा हें तोंवरि न पडे ।

अन्यपाठः—*[गुंडाळेल गा ! साची] †[कृपा मोक्ष देता] ‡ [या पदाचा राग सारंग आहे.]

---

१ हृदयामध्यें. २ आकाशामध्यें फिरणारे. ३ पृथ्वीवर विचरणारे. ४ योग्यांच्या बाह्य वृत्ति तीन प्रकारच्या ह्मणजे; बालकाप्रमाणें सौम्य, उन्मत्त= उग्र. आणि पिशाचाप्रमाणें. ५ कृपारूप अमोद. ६ ब्रह्मकैफच देतात.

विवेक तरुवर समूळिं उपडे, सदां रोगेले * संसार० ॥ १ ॥ दिवसेंदिवस काया शोके, विवंचनाही पुढली घोके। नित्यानित्य बसती धोके, जीवित्व रोगेनें ॥ संसार० ॥ २ ॥ उत्तम योजिती सर्वकाळ, आपपरांची † पुरविति आळ । ‡ पावल्या मृत्यूचा वेळ, अवचित थोंगेले ॥ संसार० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा आत्मा न कळे, मिथ्या ह्या मृगजळींच विकळे। अन्यथामति निर्जेत लोळे, नव्हती जागेले ॥ संसार० ॥ ४ ॥

पद ४७ वें.

संतांचे दुर्गुण टाकुनि श्रेष्ठाचि गुण घ्यावा ॥ ध्रु० ॥ सुमनीं सुवास येतो मोठा। शेंवतीं सर्वांगाला कांटा ॥ १ ॥ दीपाअंगीं अवगुण असती। प्रकाश होतां अवघे न दीसती ॥ २ ॥ द्वाड वनिता हे रूपवति। कामिक (कामुक ?) पुरुषां प्रियकर होती ॥ ३ ॥ धनाची मोट ओझें भारी। केवीं त्यागिति नर संसारी ॥ ४ ॥ समुद्र ¶ क्षार न शमवी तहान। पुण्यासाठीं करणें स्नान ॥ ५ ॥ हिरा काठिण नव्हे अरुवार । $ लेइल्या होती तालेवार ॥ ६ ॥ क्रूर स्वभाविया रणशूर। त्याला अवश्य पाळी धूरं ॥ ७ ॥ बाळ उन्मत्त पिशाच्च साधु। मात्रचि घ्यावा ब्रम्हबोधु ॥ ८ ॥ सोहिरा म्हणे ग्राहक ज्याचा। तोचि संग्रह करील त्याचा ॥ ९ ॥

अन्यपाठ:—* [सदा मन रंगेलें]. † [आपपरांची करिती चाळ]. ‡ [पावल्या अंतकाळ]. ¶ ['समुद्र क्षारें न शमे तहान, 'समुद्र तोय न घालवी तहान,]. $ [उजळल्या होतो तालेवार].

---

१ नेहमी सुख असावें असें योजीत असतात. २ गडबडलेले. ३ दुःखी होतो. ४ हिरा कठीण असतो परंतु आंगावर भूषण ह्मणून धारण केला असतां अरुवार=कोमळ, सुंदर दिसतो आणि त्याचे धारणानें, ५ मोठे श्रीमंत होतात असा भाव. ६ मुख्य पुढारीपणा.

*पद ४८ वें.

पाव[1] ज्ञान दाव ध्यान लावि या मना ॥ ध्रु० ॥ याच देहीं याच डोळां मुक्तिचा सोहाळा। भोग राजयोग वश करोनि सांडी कामना ॥ माव० ॥ ॥ १ ॥ दिसतें तें हें नासतें कीं हें; । 'अविनाश असतें कीं हें'। वसतें तुझे हृदयीं असोनी; । तुजला फाम[2] ना ॥ पाव० ॥ २ ॥ सद्गुरुसी शरण जावें हंमेशा भजावें । निज गुज हें बुझावें जावें होउनि गगन† गा मना[3]! । सोहिरा म्हणे आहे[4] नाहीं पाहीं तूं सबाह्य ब्रम्ह । आद्यंत अनंतरूप निजधाम ना[5]? ॥ पाव० ॥ ३ ॥

पद ४९ वें.

नाच नाचे रे! या हरिरंगीं नाचें सहजसमाधि लागे, निद्रेमाजी होइजे जागें । समाधान मनाचें ॥ नाच नाचें० ॥ १ ॥ भ्रमर[6]गुंफे राहणें, निरंतर स्थीर होणें । उलटें[7] मान लोचनाचें ॥ नाच नाचें० ॥ २ ॥ बद्धता नाहीं, मग मुक्तता कैंची । नामचि नुरे मोचनाचें ॥ नाच नाचें० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे मीच नाहीं, मग दुजा तेथ कैंचा पाहीं । काज राहिलें पवनाचें[8] ॥ नाच नाचें० ॥ ४ ॥

---

*[हें पद दुताली आहे] अन्यपाठः †[गमन या मना]

---

१ ज्ञान प्राप्त करून घे आणि मग ध्यानाचें स्वरूप मनाला दाखव व त्याला त्याच ध्यानाच्या ठायीं लाव ह्मणजे निमग्न कर. २ शुद्धि नाहीं, तें तुला अगम्य आहे. [फाम हा शब्द वाडी प्रांतीं कुणबी लोकांत फार चालतो] ३ अगा हे मना गगन होऊन जावें=गगन सदृश परमात्मरूप होऊन जावें. ४ प्रतितीस येणाऱ्या सर्व पदार्थांचा निषेध केला असतां बाकी दृश्य कांहींच राहत नाहीं. मग बाकी जो राहतो तो आत्मा ब्रह्म आहे असें पहा. ५ ना=नाहीं काय? आहेच आहे. ६ योगशास्त्रोक्त सहस्रदलचक्राचा जो मध्य बिंदु ठरतो त्यास भ्रमरगुंफा असें ह्मणतात. ७ नेत्रांचे मान=महिमा, उलट होतें. अंतर्मुख दृष्टि होते असा भाव. ८ प्राणाचें कार्य शरीर (स्थूल देह.)

पद ५० वें.

श्रीगुरुसी भजें आजि मना रे ॥ ध्रु० ॥ चंचळपण टांकुनि घेई । सहजसुख हें मजमाजी मना रे ॥ श्री० ॥ १ ॥ निरंजनीं रंजोनियां । समज कीं हें निजकाज मना रे ॥ श्री० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आपणापें । तूर्येचा धरिं मौज मना रे ॥ श्री० ॥ ३ ॥

पद ५१ वें.

संतसमागम हाचि सुगम ॥ ध्रु० ॥ ज्यांचे कृपादिठी, वस्तुसि भेटी । निजीं निजसुख उगम ॥ संत० ॥ १ ॥ ज्यांचे वचनोक्तीं लाभे मुक्ति । जही मौनावलले निगम ॥ संत० ॥ २ ॥ सोहिरा हा चित्सागरीं । मिळे त्रिवेणीसंगम ॥ संत० ॥ ३ ॥

पद ५२ वें.

या रे सज्जन हो भजन कराया ॥ ध्रु० ॥ तनु मन धन हें अर्पूनि, सदिं सत्संग धराया ॥ या रे० ॥ १ ॥ आदिअन्तिं निजसुखशांति, एकांतीं वराया ॥ या रे० ॥ २ ॥ विषयां विकलेती, विद्या शिकलेती, पोट भराया ॥ या रे० ॥ ३ ॥ जन्मा आलेती, उगेंचि गेलेती, व्यर्थ मराया ॥ या रे० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे तुह्मांप्रति, मीं हेंचि तराया ॥ या रे० ॥ ५ ॥

पद ५३ वें.

वारवार तुम्हीं परब्रह्म आठवा ॥ ध्रु० ॥ तुटली सोय तुमची तुम्हीं, परतोनि गांठवा ॥ वारं० ॥ १ ॥ महाशून्यीं चैतन्यीं मनाला पाटवा ॥ वारं० ॥ २ ॥ लांब रुंद उंच नीच, नव्हे मोटवा ॥ वारं० ॥ ३ ॥

---

१ आवड, मोठेपणा. २ सद्वस्तु, परमात्मा. ३ वेद. ४ चैतन्य आत्मा हाच सागर. ५ इडा, पिंगळा आणि सुषुम्ना यांचें ऐक्य होऊन त्या चैतन्यसागरास मिळणें. ६ सद्रूपाच्या ठायीं किंवा रोज, नित्य (नित्य याच्या ऐवजीं सदीं असा अपभ्रष्ट शब्द वाडी प्रांतीं सर्वत्र वापरतात. ७ या शब्दावर पूर्वी पद सं० भा० १ पद १० पृष्ठ १५ व १६ येथें टीप आहे ती पहा.

जातीचा अजातिया घरीं, नेउनि बाटवा ॥ वारं० ॥ ४ ॥ निर्विकल्पीं कल्पना ह्या, सकळ आटवा ॥ वारं० ॥ ५ ॥ सोहिरा म्हणे [१]आंगीं [२]पूर्णानंद दाटवा ॥ वारंवार० ॥ ६ ॥

पद ५४ वें.

आण ध्यानीं त्या मनमोहन गहनाला ॥ध्रु०॥ निशिदिनीं गा, राहोनि उगा, निजरूपीं उमगा । आनंदघनाला आण० ॥ १ ॥ सेवीं सज्जनाला, ज्ञानयजनज्ञाला । सोडुनि जनाला, वेगीं लाग भजनाला ॥ आण० ॥ २ ॥ इन्द्रियें निरोधीं, कवण मी शोधीं । त्रिकुटीं बंद करीं, पवनाला ॥ आण० ॥३॥ सोहिरा म्हणे जा, निजधामीं निजा । मिळोनीच जा गगनाला ॥ आण० ॥ ४ ॥

पद ५५ वें.

कवण कवणाचे नये हो संगातीं ॥ ध्रु० ॥ माता पिता बहिणी बंधु । दारा सुत वृथाचि वेधु । जाण हा स्वप्नींचा आनंदु । ममंतापाशीं लाविती गेंदु ॥ तुझा परिणाम नसे त्यांच्या हातीं ॥ कवण० ॥ १ ॥ संसारीं तुझें मन हे विकळे । परि मी कोण हे तुजला न कळे ॥ विषयविलासीं झांकुनि डोळे । चंद्रोदयींचे जसे कावळे । शेवटीं तुजला काय मिळेल पहा ! मातिसी मिळेल या माती कवण० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा संतसमागम । सुगम करोनि निजउगम । चित्सागरीं मिळे त्रिवेणीसंगम । जयाला वर्णितां आगम निगम ॥ कुंठित *जये भुवनीं तो दीपक वावीं निर्वाती कवण० ॥३॥

अन्यपाठ. * (जय भुवनीं तो) जय हा शब्द अठरा संख्येचा दर्शक आहे. पृष्ठ ६६ पहा.

---

१ नाम, रूप, कुल आणि जात यांनीं युक्त असा जो जीव. तो ज्याला नाम, रूप, जाति, कुल, आणि संबंध नाहीं असा जो परमात्मा त्याच्या घरांत बाटवा. [सोहिरोबांनीं अन्य पदांत म्हटलें आहे कीं तितुकी प्रतीति बाणलिया मग कुळ नाहीं याती.] २ ज्ञानयजनाच्या ज्ञात्याला, भोक्त्याला. ३ प्राणवायूला. ४ समाधिस्थ व्हा. ५ "सद्रूप ब्रह्माला गगन हा महत्त्वदर्शक शब्द योजितात. ६ आगम=शास्त्रें व निगम=वेद हीं ज्या भुवनाच्या ठायीं कुंठीत होतात. त्या भुवनामध्यें (हृदय भुवनामध्यें.) ७ वातीविरहीत दीपक=स्वयंज्योति पुरुष (ॐकार स्वरूप=ज्ञान दीप).

पद ५६ वें.

तंव तुज देव भेटेना ॥ ध्रु० ॥ पांचांचे पंचवीस गुण । सत्व रज तम यांचें कारण । चळती प्रारब्धा प्रमाण । आत्माराम तो अलिप्त जाण । ऐसें समजुनी जोंवरि तुजला । देहाभिमान सुटेना ॥ तंव० ॥ १ ॥ पहिला दुर्घट गर्भवास । उपरि संसाराचा पाश । पडतां पडला नाना त्रास । राहणें मज कितुके दिवस । अधीक मी कां चढवूं आस । परतुनि कां येऊं जन्मास । ऐसें उदास होउनि मन हें जोंवरि विषयविलासीं विटेना ॥ तंव० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा काय तें साधूं । कवण रितीचा करणें शोधु । निरोधनीं तो कवण निरोधु । सकळांमाजी कवण तो साधु । बोधामध्यें कवण तो बोधु । आनंदीं कवण तो परमानंदु ऐसें उमजुनि चित्तीं जोंवारि विवेक हा उमटेना ॥ तंव० ॥ ३ ॥

पद ५७ वें.

साधु या प्रकारचे हो प्राणी ! । तूं ध्यानीं आणी ! । दृश्यभासाला दृष्टि ...गी । ज्याचे पिढीं नांदते तूर्याराणी जाणाहो जाणा ॥ साधुया० ॥ १ ॥ अद्वैताचें भजन करीत । हा लाभ त्वरित । घेउनि बैसति आनंदभरीत । सहजसमाधिवनितेला वरीत । जाणा हो जाणा ॥ साधु० ॥ २ ॥ जन्मा येउनि परम दक्ष । साधिति मोक्ष । लाविती निरंजनीं लक्ष । सकळ व्यापक स्वरूप हें अलक्ष । जाणावें जाणा ॥ साधुया० ॥ ३ ॥ केवळ संतोषाचे गोळे । हृदयींचे भोळे । मन हें प्रेमामाजी लोळे । लागती ज्यांचे परब्रम्हीं डोळे । जाणा हो जाणा ॥ साधुया० ॥ ४ ॥ टाकुनि इतर सकळ धंदा । लागति छंदा । भेदुनि गेले हो नादबिंदा । जाउनि मिळाले जगदादिकंदा ॥ जाणाहो जाणा ॥ साधुया० ॥ ॥ ५ ॥ जे जे समयीं जें घडले साहती । पाहण्याला पाहती । निजींचा निदिध्यास वहाती । अखंडीत जे निरालंबिं राहती ॥ जाणा हो जाणा ॥ साधुया० ॥ ६ ॥ सोहिरा म्हणे हो ! त्यांचे तोडी । नाहीं दुसरी जोडी त्यांची त्यांनाच ठावी गोडी । परमामृतसागरीं दिधली बुडी ॥ जाणाहो जाणा ॥ साधुया० ॥ ७ ॥

---

१ पंचमहाभूतांचे. २ या पंचवीस गुणांबद्दल पारमार्थिक पदसंग्रह भाग २ पृष्ट ७६ येथें खुलासा केलेला आहे. ३ शमदमादि, निरोध करणें. ४ अ, उ, म, अर्धमात्रा यांनी युक्त असा नादरूप प्रणव. व अर्धमात्रेवरील बिंदु चैतन्य. ५ द्रष्टा (पाहणारा) जो आत्मा त्याच्या पाहण्याला (दृष्टीला) दर्शनाला.

पद ५८ वें.

धुंडत धुंडत अवधूत जोगी ॥ ध्रु० ॥ सहज वाजवी अनाहत शिंगी ॥ धुंडत० ॥ १ ॥ ज्याचा तोचि एकटा निवृत्तिमार्गीं ॥ धुंडत० ॥ २ ॥ मीपण जोळूनि लावी विभूती आंगीं ॥ धुंडत० ॥ ३ ॥ अनुभववनीं हा, पूर्ण वैरागी ॥ धुंडत० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे चिन्मयमुद्रा राजयोगी ॥ धुंडत० ॥ ५ ॥

पद ५९ वें.

ऐसे जाणावे ते भक्त । तेच योगी तेचि मुक्त ॥ ध्रु० ॥ पराकमळ परपराग । तेथ गुंतति जैसे भृंग ॥ ऐसे० ॥ १ ॥ निरंजन हेंचि गुळ । तेथ मुंगीच केवळ ॥ ऐसे० ॥ २ ॥ अनाहत नागसर चांग । तेथ जैसे कीं ते भुजंग ॥ ऐसे० ॥ ३ ॥ समाधिधन निजज्योति । तेथ पायाळचि म्हणविती ॥ ऐसे० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे सत्रावीचें जीवन । तेथ निःसीम जैसे मीन ॥ ऐसे० ॥ ५ ॥

पद ६० वें.

हें तूं उमज रे ! अंतरिंचें गुज रे ! ॥ ध्रु० ॥ सौक्षिदृष्टिचें, प्रेमवृष्टिचें, सकल सृष्टीचें बीज रे ! हें तूं० ॥ १ ॥ स्वानंदाचें, विहंगमाचें, उडणें साचें, चहूं वाचाचें पूज ॥ हें तूं० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे हें विसरे मागें, अनुभव आंगे, येउनिच लागे, चिन्मयसेजे नीज ॥ हें तूं० ॥ ३ ॥

---

१ स्थिर चैतन्यमय मुद्रा धारण करणारा. २ परब्रह्म परागयुक्त असें पराकमल (परा किंवा आद्यशक्तिरूप कमल) सहस्रदल. ३ भूमींतील ठेवा काढणें झाल्यास जो मनुष्य पायाकडून निपजतो त्याचे डोळ्यांत एकप्रकारचें अंजन केलें असतां त्याला तो ठेवा दिसतो असें म्हणतात. ४ जें साक्षीच्याच दृष्टीनें पाहावयाचें. ५ ॐकार प्रणव हेंच बीज. ६ जेथें परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी या चारी वाचा निवांत होतात (पूज्य=शून्य होतात). ७ समाधिस्थ हो.

पद ६१ वें.

निजनिलयनिवासी जोगी हो ॥ ध्रु० ॥ नित्य निरंजिनिं निद्रा । चिन्मय लेउनि कानीं मुद्रा ॥ निज० ॥ १ ॥ अखंडित सोऽहं जपें । शिरीं तन्मयाचा टोप ॥ निज० ॥ २ ॥ सर्व वृत्ति तांडलिया । चाले पश्चिमे गोदडिया ॥ निज० ॥ ३ ॥ भक्ति वैराग्यें वाहविली । शुद्ध सत्व ज्याची सैली ॥ निज० ॥ ४ ॥ अनुहात शिंगी वाजे । तेणें गगनमंडळ गाजे ॥ निज० ॥ ५ ॥ नाद बिंदु कला ज्योति । आंगीं लावुनि विभूति ॥ निज० ॥ ६ ॥ भोगीं असतां जो वितरागी । सोहिरा म्हणे राजयोगी ॥ निज० ॥७॥

पद ६२ वें.

ज्ञानगंगातीरवासी बैरागी ॥ ध्रु० ॥ हांसत खेळत डोलत बोलत नित्य वैरागी । तन्मयबीजा सेउनि सहजा रंगे निजरंगी ॥ ज्ञान० ॥ १ ॥ चिन्मय गोपीचंदन नामें उजळी * सर्वांगी । बोध कमंडलु दंड विवेक त्रिवेणीमार्गी ॥ ज्ञान० ॥ २ ॥ चालत चालत पश्चिमपंथीं मध्यमा सुरंगीं । भोगुनि त्यागी जो वितरागी सोहिरा म्हणे राजयोगी ॥ ज्ञान० ॥३॥

पद ६३ वें.

हा तूं भोगरे । चिन्मय राजयोग ॥ ध्रु० ॥ मुनिजनवर्या, अमितकौमार्या, चैतन्यचर्या, सर्वज्ञसूर्या ॥ १ ॥ अमूपदीप, द्वीप (?) निवृत्तीचा

+ अन्यपाठः (निर्वांगीं)

---

१ आपलें स्थान=परब्रह्माचे ठिकाणी राहाणारा योगी. २ मी ईश्वर आहें असा जप [या पदांत परमात्मस्वरूप सद्गुरुशीं जोगीरूपाचें सादृश्य केलेलें आहे. जोगी पंथाचे लोक वाडीप्रांतीं फार आहेत. याचीं चिन्हें "कानांत मुद्रा, मस्तकावर टोप, गोदडी, सैली शिंगी, आंगावर विभूति इत्यादि. यांचें परमार्थपर वर्णन केलेलें आहे.] ३ ज्ञानगंगेच्या तीरावर राहणाऱ्या वैराग्याचें यांत रूपक केलेलें आहे. ४ सुषुम्ना मार्ग. ५ मध्यमावाचेच्या ठायीं (हंसः सोहं सोऽहं हंसः असा जप मध्यमेमधें होत असतो म्हणून मध्यमा सुरंगीं असें म्हटलें आहे.) ६ ज्याला मिती नाहीं असें कौमार्य आहे जिचें अशी जी सर्वज्ञ (सर्वसाक्षिणी) तूर्या हीच आहे तुझी चैतन्यचर्या (चैतन्यस्वरूपा, चालकशक्ति) अशा. ७ परमप्रकाशात्मक स्वयंप्रकाश दीप.

भूप, रूपातीताचें रूप ॥ २ ॥ विद्या[1]रविंदा, परा[2]प्रमदा, आनंदकंदा, सच्चिदानंदा ॥ ३ ॥ संसारतापा, उधळुनि वाफा, अद्वयकैफा, चिद्भ्रम[3]गुंफा ॥ ४ ॥ सोऽहं अ[4]नंगा, सबराभरीतरं[5]गा, मनतुरंगा, बुडविल चि[6]द्गंगा ॥५॥ म्हणे सोहिरा अहंभग्न, स्वतेज[7]अग्न, लावुनि[8]लग्न, स्वयेंचिहो मग्न ॥ ६ ॥

*पद ६४ वें.

ऐसा असला तरीच साधू म्हणूं आम्हि त्याला । समाधीचें स्मरण होतां अद्वय[9]अम्मल प्याला ॥ ध्रु० ॥ प्रथम ज्यानें मी हा कवण विवेक पाहीला । दोन्ही पाहुनि झाला पिंडब्रह्मांडा वे[10]यिला । मग जें उरे परब्रह्म होउनि राहीला ॥ ऐसा अस० ॥ १ ॥ घृतासाठीं दूध पोटाळुनि जन्मवरी । असला तरि तें बा तोंडीं, न पडे लौकरी । तैसें सगुण चाळुनि ज्ञानें चाळविल्या निर्धारी ॥ ऐसा० ॥ २ ॥ † सृष्ट्यादि अवतार ज्याला तरंगाप्रमाणें । ते ते ठायीं जाईना तो, मुळिंचेंचि जळ जाणें । व्यापक ज्याचें मनची गगना, नाहिं येणें जाणें ॥ ऐसा० ॥ ३ ॥ न ‡ शोधि[11]तां ज्यानें

*[या पदाची चाल "जन्मा आ‍ली वायां गेली, भक्ति नाहीं केली" या पदाप्रमाणें.]
अन्यपाठः—† [सृष्टि कीं अवतार ज्याला]. ‡ [न साधितां ज्यानें).

१ शुद्धसत्वप्रकृति (विद्या) हेंच कमल, एतद्रूपा. २ जीवरूपा प्रकृति आहे प्रमदा ह्मणजे स्त्रीप्रकृति ज्याची आशा. ३ चिद्रूप आत्मा हाच भ्रमर त्याचें प्रेमपुरःसर गुप्त रूपानें राहण्याचें वास्तव्य स्थान (गुहा) अव्यक्त चित्तस्वरूपा किंवा सहस्रदल चक्रांतर्गत मध्यबिंदुरूपा. ४ ज्याला अंग नाम रूप नाहीं अशा सोऽहं स्वरूपा. ५ आंतबाहेर व्यापून असणाऱ्या (रंगा) शुद्धसत्त्व रंगरूपा. ६ ज्ञानगंगा ७ स्वतःच्या तेजोमय अग्नीच्या योगानें अहंवृत्ती (भग्न) दग्ध करून टाकली आहेस अशा. ८ प्रकृति पुरुषाचें लग्न (ऐक्य) करून आपल्याच सुखांत निमग्न असणाऱ्या अशा ! अरे तूं हा चिन्मय राजयोगभोग भोग; हा तुलाच योग्य आहे. हा या पदांतील भाव. ९ ब्रह्मानंद प्राप्ति करून देणारा कैफी पदार्थ ज्याच्या सेवनानें द्वैतदृष्टि नाहींसी होते व अमली पदार्थ व अमल करणारा असा भेदच रहात नाहीं ह्मणून अद्वय. १० वेगळा, विरहित-(वायला हा शब्द वाडीप्रांतीं सर्वत्र प्रचारांत आहे.) ११ नीर आणि क्षीर एकत्र केले असतां त्यांतून हंस पाणी वेगळें करून दूध मात्र पितो. तर तसें न करितां परमहंसस्थितिनें

नाथसंकेत साधीला । रेचक पूरक कुंभकावीण, वायुचि हा प्याला । नवहि द्वारीं चळतां, दशवे द्वारीं स्थिरावला ॥ ऐसा० ॥४॥ ज्या वर्णाचे देह ते ते हाट नच मोडी । *मोलें रडति तैसी प्रपंचमाया हे न सोडी । श्रवणमनन-निदिध्यासें घेतो, निजसुखाची गोडी ॥ ऐसा० ॥ ५ ॥ सोहिरा म्हणे भेटल तेव्हां, तोसि आमुचा देवु । न्हेइल तेथें त्यांचे संगें सुखें आम्हीं जाऊं । त्याचे चरणीं माथा आम्हीं, वेळोवेळां ठेवूं ॥ ऐसा० ॥ ६ ॥

पद ६५ वें.

घे हरघडि हरिचें नाम । येणें पाव परात्परनिज सुखधाम ॥ ध्रु० ॥ सकलहि इंद्रियें, चाळक कवण हा, । ओळख तूं आत्माराम ॥ घे हर० ॥ ॥ १ ॥ निरंजनवनीं रंजवुनी मन । करिं तूं हें हृदय आराम ॥ घे हर० ॥ ॥ २ ॥ म्हणे सोहिरा आयुष्य सरतें, हे तुला न स्मरतें । राहुं नको बे-काम ॥ घे हरघडी० ॥ ३ ॥

†पद ६६ वें.

सेवीं निरंजनसुख हें सार । सर्वामध्यें पहा हो ॥ ध्रु० ॥ अनुभवें त्याग, विषयभोग । दृश्यातीत रहा हो ॥ सेवीं० ॥ १ ॥ उलटदिठीनें त्रिकुटावरी । अंतरज्योति पहा हो ॥ सेवीं० ॥ २ ॥ कल्पनामळ निर्मळ करी । ज्ञानगंगे नाहा हो ॥ सेवीं० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे कीं उर्ध्वपंथीं प्राणापान वाहा हो ॥ सेवीं० ॥ ४ ॥

अन्यपाठः—*[मेलयां रडति]. †[या पदाचा राग कल्याण आहे.]

(जसें मिळेल तसें भक्षण करावयाचें) तें शुद्ध न करतांच परमात्मस्वरूप सद्गुरुपासून नाथपरंपरेच्या खुणेच्या साह्यानें संकेत (आत्मज्ञानरूपी) साध्य करून घेतला. कोहं हें पाणी सोऽहं हें दूध [तुकोबाविषयीं रंगनाथांनीं म्हटलें आहे कीं:— " इतरें तें हारुनि कोहं । मग चाखियला तो सोहं । हा नोहे तुकया तैसा । अच्छेद्य पचविला कोहं.'

१ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यापैकीं ज्या ज्या वर्णांतजाईल ते ते हाट—बाजार (राहाटी, व्यवहार, वर्णाश्रमधर्म) मोडीत नाहीं. २ सुषुम्ना मार्गानें (ब्रह्मांडांत, ब्रह्मरंध्रांत.) ३ प्राण आणि अपान हे दोन वायु नेऊन स्थिर करणें,

पद ६७ वें.

तूं राजी मन करी । प्राणिया ईश्वरभजनावरी । नियत धरीं अंतरीं स्मरीं ॥ ध्रु० ॥ सज्जनरंजनीं निधि निरंजन । ज्ञानांजन निजदिठीं भरीं ॥ तूं राजी० ॥ १ ॥ म्हणे सोहिरा नरतनु दुर्लभ । आत्मलाभ हा संकटें नानापरि हरी ॥ तूं राजी० ॥ २ ॥

पद ६८ वें.

भजन करीं कार्यीं[1] सुख देतें ॥ ध्रु० ॥ कुतर्कांचा मार्ग निरोधी । न जावें आधीं मन विरोधीं । पुनरपि न करीं निंदेतें ॥ भजन०॥ १ ॥ संतांशीं सद्भाव धरावा । योगज्ञानाभ्यास[2] करावा. । सांपडेना उगें स्नानसंध्येतें ॥ भजन०॥ २ ॥ साधनसंपत्तीला आढळेना । सद्गुरुवांचुनि तें कीं कळेना । आत्मस्वरूप करीं स्थिर तें ॥ भजन० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मोक्षचिंतन । चित्ता लागे अलक्ष चिंतन । पारंगत[3] करी ब्रह्मपद तें भजन० ॥ ४ ॥

पद ६९ वें.

प्रीति धरीं त्रिभुवनपतिची ॥ ध्रु० ॥ निषिद्ध[4] मार्गीं *संयम[5] कांटे । लावुनि त्याविण गोड न वाटे । स्मरणचि करितां आनंद दाटे । पतिव्रतेला जेंवीं प्रीय पतिची ॥ प्रीति० ॥ १ ॥ जन्ममरण संसारभ्रमण । आपण कोण याचें विस्मरण । मूळ अज्ञान दुःखकारण । नासे उपाधि नाना विपत्तीची ॥ प्रीति० ॥ २ ॥ जगतरंग सुरंग उठती । उठले जेथुनि ते-

अन्यपाठः—*[स्वयंभ कांटे.

१ कार्यस्वरूप जे स्थूल व लिंगदेह त्यांमध्यें. २ ज्ञान आणि योग यांचा अभ्यास. ३ पलीकडील तीरास [परेच्या पैलतीरास] गेलेला प्रवीण, निष्णात]. ४ वेदामध्यें ज्याचा निषेध केलेला आहे असा मार्ग ज्या मार्गानें गेलें असतां जन्ममरणरूप संसार प्राप्त व्हावयाचा. अशा मार्गास संत कांटे लावून ह्मणजे तो मार्ग बंद करून [त्या मार्गास कांटे लावा किंवा त्या वाटेस शिरें (कांटेरी झुडपें) लाव. असें वाडीप्रांतीं ह्मणतात] ५ योगशास्त्रांत ' संयम ' हा शब्द जेथें वापरला असेल तेथें त्याचा अर्थ एकाच वस्तुविषयीं धारणा, ध्यान, व समाधि असा समजावा. [त्रयमेकत्रयसंयमः ॥ ४ ॥ पातञ्जल योगसूत्रपा ३.]

थाचि फुटती । एकमेंकावरि जैसे जुडती । चैतन्य एक अपांपतिची ।। प्रीति० ।। ३ ।। सोहिरा म्हणे ईश्वरसत्ता । दिसते नासते † मालमत्ता । तो तंव आपणियां नियंता । जेवीं नगरीं प्रतिमा नृपतीची ।। प्रीति० ।।४।।

पद ७० वें.

स्थीर करीं हें मन कीं तेथें ।। ध्रु० ।। नामरूप उच्चारितां भेद । सरल्या, उरलें मुळींच अभेद नेति नेति म्हणती वेद जेथें । स्थीर करीं० ।। १ ।। पाहातां आधीं शून्यचि वाटे । वाटति जाणीव चैतन्यीं आटे । सबाह्यांतरीं आनंद दाटे । मनबुद्धिविहीनें प्रकाश जेथें ।। स्थीर० ।। २ ।। चिद्भ्रमरें सहज सुखावे । श्वासोच्छ्वासीं तेथनि धांवे । चित्कलिकेंतिल आमोदसुधतें ।। स्थीर० ।। ३ ।। सोहिरा म्हणे हेंचि आराधन । कोणा न दिसे गुप्त हें साधन । नित्य वाटे समाधान जेथें ।। स्थीर० ।। ४ ।।

पद ७१ वें.

निश्चळ अचल अनंताला । भज परमप्रीति भगवंताला ।। ध्रु० ।। परमात्मा आत्मा हा अंतरसाक्षी, अनाम अतीताला । पूर्ण कृपाघन जो भूत-

---

अन्यपाठ.—† नाना मत्ता.

---

१ एकमेकांवर आदळतात. २ त्या लहरींचा आधार (एक चैतन्यसागर) आपांपतीच (सागरच). ३ स्थावरजंगमात्मक विश्वसंपत्ति. ४ कोणत्याही शब्दाचा उच्चार केला म्हणजे त्यापासून त्या शब्दानें विशिष्ट पदार्थांचा नामनिर्देश होतो व त्यामुळें 'अमुक एक पदार्थ, त्याचें स्वरूप अमुक प्रकारचें वगैरे बोध होतो त्यामुळें द्वैतभावना उत्पन्न होते. सारांश शब्दाच्या उच्चारानें नामरूपात्मक पदार्थांचा किंबहुना दृश्य जगताचा बोध होतो; पण हा भेद विवेकानें नाहींसा केल्यावर द्वैतकल्पना मावळते, व अभेद असें एकमेवाद्वितीयं ब्रह्मच शिल्लक रहातें. ५ शून्य आहे असें ज्या ज्ञानाला वाटतें ती (वाटति जाणीव) वाटणारें ज्ञान कूटस्थ अव्यक्ताचे ठायीं लय पावतें ६ विरहित. ७ परमात्मा हाच भ्रमर. ८ भगवंत शब्दाची व्याख्या आणखी आढळते ती:— [उत्पत्तिप्रलयं चैव भूतानामगतिंगतिम् । वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति ।। १] सर्व स्थावरजंगमात्मक जगाचा उद्भव आणि नाश हे कसे होतात, जग आलें कोठून जाणार कोठें, विद्या आणि अविद्या काय आहेत, हें सर्व जो जाणतो त्याला भगवंत म्हणावें. दुसरा अर्थ पूर्वी दिलेलाच आहे.

भावन, पावन करितो पतिताला ॥ निश्चल० ॥ १ ॥ भूतसंघ स्थावर जंगम, सोडुनि सेवीं तूं संताला । गुह्य गुरुबीज माग तयांप्रति, लाग विहंगमपंथाला ॥ निश्चल० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा पूर्ण प्रतीति, वेदांत श्रवण करीं ग्रंथाला । श्रवणमनननिदिध्यासें त्वरित घे, अनुभव हा एकांताला ॥ निश्चल० ॥ ३ ॥

पद ७२ वें.

तरि होय स्थीरासन अचळ मनाचें ॥ ध्रु० ॥ साधनाचें आराधनाचें इंद्रियवृत्तिनिरोधनाचें । फळ हें यावें सुफळ व्हावें दर्शन ज्ञानघनाचें ॥ तरि० ॥ १ ॥ चौरी खाणी चौरी वाणी, गगन पवन महि तेज पाणी । भगवत्सत्ता ध्यानीं आणीं, अवचित करि गमनाचें तरि० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा चालत प्रवृत्ति, सकळहि व्यावृत्ति निवृत्ति होउनी । चित्तवृत्तिला अर्धमात्रा औषध हें दमनाचें ॥ तरि० ॥ ३ ॥

पद ७३ वें.

करिं बा कांहिं तरी सार्थक या जीवाचें ॥ ध्रु० ॥ ज्ञानांजनें $चिद्भ्रम-भंजन करीं । निरंजनीं लय लावुनि अंतरीं । मानसपूजन सदाशिवाचें ॥ करिं बा० ॥ १ ॥ संतसमागम सदैव करिं का । आगम निगम वर्णिती जें का । त्रिवेणिसंगम स्वानुभवाचें ॥ करिं बा० ॥ २ ॥ कर्ण श्रवण बल विकर्ण गुण । हें वर्णव्यक्त्यतीत अर्थमनन । करी येणेंचि निष्कृंतन हें भवाचें ॥ करिं बा० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे हे सुफळ वारी । हे जन्म निवारी, बद्ध न पावें इंद्रियव्यापारीं । अजंप जपणें प्रणवाचें ॥ करिं बा० ॥ ४ ॥

अन्यपाठः—$[ज्ञानांजनेंचि भ्रम भंजन करीं]

---

१ सिद्धांत संहिता उत्तरार्ध पा० पहा. २ जारज, स्वेदज, अंडज, आणि उद्भिज्ज ह्या चार खाणी. ३ चार वाचाः–परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी. ४ इंद्रियव्यापार. ५ प्रणवाची ही अर्धमात्रा. ६ चित्त विभ्रम. ७ कर्णेंद्रियद्वारें श्रोत्रादि इंद्रियधर्मरहित असा जो बलवान शास्ता, अशाचे गुण श्रवण कर हें श्रवण. आणि जें श्रवण केलें त्यांत रहस्यार्थानें वर्णव्यक्त्यतीत अशा अर्थाचें मनन कर. हेंच मनन होय. ८ नाश. ९ नरदेह क्षेत्राची वारी (खेप). १० योगशास्त्रोक्त अजपानावांचा जप (सि. सं० उत्तरार्धासोबतची चक्रकारिका पहा.)

पद ७४ वें.

संसार नाहीं परब्रह्मचि पाहीं ॥ ध्रु० ॥ देह म्हणोनि पाहतां सर्वही विदेही ॥ संसार०॥ १ ॥ बुचकळूं नको या बहुविध कल्पनाडोहीं ॥ २ ॥ ॥संसार०॥ सोहिरादास म्हणे हेंची भज कां लवलाहीं ॥ संसार० ॥ ३ ॥

पद ७५ वें.

तूं कसा रे तरसिल प्राणिया । या हरिभजनावांचुनी ॥ ध्रु० ॥ तुझें चंचळ हें बहु चित्त । घडी नससी सावधचित्त[1] । असे चिंता हे क्वचित । नसे आत्मसुखाची प्रचीत । असे मृत्यु हा अवचित ॥ जीवित काय करिसि सांचुनी ॥ तूं कसा० ॥ १ ॥ केवळ बुद्धीचा तूं हीणें[2] । होसी शब्दज्ञानें प्रवीण । उपदेशउदकीं तूं पाषाण । सुख नेणसी विषयावीण । वैराग्य न धरिसि एक क्षण । काय करिसि ग्रंथ वाचुनी ॥ तूं कसा० ॥ ॥ २ ॥ सदैव तुझिये वदनीं निंदा । आन नसेचि दुसरा धंदा[3] । रे तूं अजाण दुर्मति मंदा । केवळ विषयमदमदांधा । रे तूं स्वभावें बेबंदा । साधुसंतांला जाचुनी ॥ तूं कसा० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे तूं मूढ रे । परमार्थ तुला हा गूढ रे । बाहेर लौकिक करिसी रूढ[4] रे । ये पुढें, यम घेईल सूड रे । तुझ्या जिण्या लागो चूड[5] रे । † अंतिं इंद्रियां[6] लासुनी ॥ तूं कसा रे० ॥४॥

पद ७६ वें.

आनंदमय असो कीं चित्त हें ॥ ध्रु० ॥ दृश्यभास हा नाश पावे । घडिघडि यावर मन जें धांवे । परतुनि मुळिंचें वळिलें व्हावें । समाधिसुखिं

अन्यपाठः—†[अति इंद्रियां लालचुनी].

---

१ स्थिरचित्त, सावध. २ हलका; मलीन. ३ भांडखोर; उच्छृंखल. ४ रूढीप्रमाणे बाह्य व्यवहार ५ माडाच्या झांपांच्या चुडत्यांचा वगैरे पेंढा बांधून तो पेटवून रस्त्यांत रात्रौ जातेवेळीं घेत असतात त्याला वाडीप्रांतीं चूड असें ह्मणतात. ६ (त्या चुडीनें इंद्रियां लासुनी=भाजून असा भाव). अंतकाळीं प्रेतदहन संस्काराचे वेळींही अशा चुडीनेंच तो विधि वाडीप्रांतीं करीत असतात. ७ समाधिसुख पावून हें चित्त पुनः आपल्या मूळाकडे वळलेलें असें व्हावें. त्या (विरचित=आभरण,) भोग भोगण्याचें साधन झालें.

अवचित हें ॥ आनंद० ॥ १ ॥ स्थावर जंगम भूतग्राम । नानालीला रूपनाम । आंतुनि खेळवी शरीरचाम[1] । आहे नाहीं हरिविरचित हें[2] ॥ आनंद० ॥ २ ॥ सर्वव्यापक अनंताला । प्राण्या स्मर तूं भगवन्ताला । तद्रुप मानी जीवजंताला । तुज सांगतों कर हित हें ॥ आनंद० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा तारक स्वामी । लय लागो त्या आत्मारामीं । ज्ञानकळा हे अंतर्यामीं । सदांचि सावचित हे ॥ आनंद० ॥ ४ ॥

*पद ७७ वें.

जगीं तूं धन्य एक ॥ ध्रु० ॥ देहपण विषयांसी आभारिलें[3] । धरिसी विषयांशी वेगळीक ॥ जगीं० ॥ १ ॥ सारासार हें जाणुनिया निकें[4] । न धरिसी हा भवशोक ॥ जगीं० ॥२॥ सोहिरा म्हणे मग नाहीं जन्ममरण । काय सांगों अलौकिक ॥ जगीं० ॥ ३ ॥

पद ७८ वें.

आनंदलें बहु मन हें ॥ ध्रु० ॥ करितां अंतररूप तर्मन[5] हें । त्यालें प्रेमाचा पर्जन्य[6] हें । केलें विवेक उपर्जन[7] हें । ऐकुनि अनाहत घनगर्जन हें ॥ आनंदलें०॥ १ ॥ भवांतूनि निघालें । केवळ महाशून्यीं रिघालें । ब्रह्मबोधेंचि धालें । झालें उपशम दम उन्मन हें ॥ आनंदलें०॥ २ ॥ व्यतिरेकें रिझालें । केवळ अन्वयावरि आलें । चैतन्यीं तद्रूप झालें । न करी पुनरपि आगमन हें ॥ आनंदलें० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे हें निश्चळ । समाधिसुखेंचि क्रमितें वेळ । पाहुनि भगवंताचा खेळ । कीं आश्चर्य महत् जनवन हें ॥ आनंदलें०॥४॥

*[या पदाचा राग कल्याण आहे.]

१ चर्म, कातडें. २ परमात्म्यानें घडविलेलें शरीर त्याच्या सत्तेनें चालतें म्हणून "आहे" आणि त्याशिवाय नाश पावतें म्हणून "नाहीं" सारांश क्षणभंगुर. ३ स्थूलदेह हें विषयाला आमंत्रण, भोग भोगण्याचें साधन झालें. ४ स्पष्ट, चांगलें. ५ ज्ञानाग्नीनें जड दग्ध करून अंतर्ज्योति प्रज्वलित करणें [यूपाग्रं तर्मनिर्मन्थ दारुणि त्वरणिर्द्वयोः ॥ इत्यमरः ब्रह्मवर्गः] ६ प्रेममेघाचा वर्षाव. ७ वृद्धी, लागवड [वाडीप्रांतीं, बागायताच्या लागवडीच्या वृद्धीस—उपर्जना हा शब्द वापरतात.]

पद ७९ वें.

अझुनी समजुनि काय बसलासी ? ॥ ध्रु० ॥ संतसमागम किमपी न रुचे । इंद्रियवर्ग हे मिळवुनि लुचे । परिणामाचें हित हें न सुचे । नरदेहीं येउनि तूं फसलासी ॥ अझुनि० ॥ १ ॥ वंध्येचें संतान प्रपंच । एकचि जागां मिळती पांचे । मिथ्या लागलि तुज हे भांचें । मोहचिकाला तूं डसलासि ॥ अझु०॥ २ ॥ *भ्रमलासी हाचि ध्यास वाहातां । पाहिला ना कधिं स्वस्थ राहातां । लाज न वाटे हें दुःख सहातां । कुसंगींच तूं †वसलासी ॥ अझु० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मूळ नसलासी । चुकलासी परब्रह्म ‡ अस्सलासी । अन्यथाज्ञानें कसलासी । केवळ मूर्ख तूं मज दिसलासी ॥अझु०॥४॥

अन्यपाठः—*[भ्रमलासी.] †[बसलासी.] ‡[असल्यासी.]

---

१ पंचप्राण. २ विवंचना, बंधन. ३ तुझें मूळचें रूप अज=जन्मरहीत असें नसलासी परंतु. ४ अस्सल=खरें, शाश्वत असें जें मूळचें तुझें परब्रह्मस्वरूप त्याला चुकलास आणि त्यावर अन्यथाज्ञानें=विपरीत ज्ञानानें (कसलास) जखडला गेलास. यावर बाबा महाराजकृत पद अगदीं समयोचित असल्यामुळें येथें दिलें आहे. [पदः—निजरूपविस्मरण झालें । म्हणुनी जग भासा आलें ॥ विपरीत ज्ञानेंकरुनी । भासुनियां नाहीं कळलें ॥ ध्रु० ॥ जाहलेंचि नसतां स्वरुपीं । कां हि गुणीं जेंवि अहित्व ॥ अज्ञानचि तेथें स्फुरण । उठलें स्वयमेव अहंत्व ॥ संकल्प नाम तयाचें । पावला तोचि महत्त्व ॥ चाल ॥ आवरण प्रथमरूप । जाहला तो मग विक्षेप ॥ तेणेंचि सकळही भुलले ॥ निज० ॥ ॥ १ ॥ पाहतां विचारुनि मूळीं । एक तें अधिष्ठान ॥ विवर्तासि ठाव कैंचा । जें सकळां यांसि निदान ॥ जेव्हां हें स्फुरणचि नाहीं । द्वैताचें कोठुनि भान ॥ चाल ॥ होतांचि त्रिपुटि ग्रास । आपणचि सकलहि भास ॥ जेव्हां हें स्फुरण निमालें ॥ निज० ॥ २ ॥ ऐसें हें ज्ञान देतां । ब्रह्मरूप सद्गुरुराव ॥ सेवुनि त्यां नमुनि पुसावें । त्यांचे पदीं धरुनी भाव । कृपाळू ते उमजुनि देती । तें हरपे देहभाव ॥ चाल ॥ ऐसे जे अभयदानी । जग तारिती आपण तरुनी ॥ राम ह्मणे [रूपें] पूर्ण निमाले ॥ निज० ॥ ३ ॥]

पद ८० वें.

तरि देवचि होइल प्राणी । जें कां शाश्वत ध्यानीं आणी ॥ ध्रु० ॥ विहंगम[1] हा आकाशीं *पाखाणी[2] । दृष्टिसी[3] सृष्टि[4] दिसे हे उखाणी[5] । शून्यांत चाऱ्ही खाणी । ईश्वराचें नवल हें वाखाणी ॥ तरि० ॥ १ ॥ वाणी टांकिल ओंगळवाणी । नामसुधारसें रंगली वाणी । ऐकतांचि हे कौतुक वाणी । पावे निरंजननिर्वाणीं ॥ तरि० ॥ २ ॥ होईल ¶प्रसिद्ध पुराणीं । निजकळा अनादि पुराणीं । अवघी केली विकारचुराणी । सोहिरा म्हणे प्रकटे तुर्या राणी ॥ त० ॥ ३ ॥

पद ८१ वें.

मग कांहीं चिंता नाहीं हो ॥ ध्रु० ॥ जन्म मरण हॅरि[6], शरण जाय हॅरि[7] । स्मरण करित हें राहे हो ॥ मग० ॥ १ ॥ व्यासवचनीं अभ्यास करुनियां[8] । ध्यास निरंतरवाही हो ॥ मग० ॥ २ ॥ म्हणे सोहिरा गीता वाक्य, संगितासि[9] आणुनि । गीत गाय सबाहीं हो ॥ मग० ॥ ३ ॥

पद ८२ वें.

प्राण्या देवचि होउनि राहा । तुज अलभ्य लाभ नरा ! हा ॥ ध्रु० ॥ ' नाश आहे कीं शरीर आवेंरा[10] ' ' हा, नपडे उमज मूढ गव्हारा ! हीः[11] ।

अन्यपाठः–*[पाल्गणीं.] ¶[होय. होय लय].

१ पंचभूतांसहीत असणारा हंस (जीव). २ पालाण करील, उर्ध्वगमन करील. ३ ज्ञानदृष्टीस. ४ जड सृष्टि. ५ उखाणी नक्कल, कल्पित कादंबरी. दिसेल ६ हरण करितो, नाश करितो ७ परमात्म्यास ८ योगाभ्यास करून (रहस्य जाणून) ९ सुस्वरनादंयुक्त (नादसंज्ञक अंतर्गत रूप जाणून) असें वाद्य साह्यास घेऊन १० वेष्टन, वेढा. चर्मानें वेष्टित असलेला देह (जड शरीर, अन्नमय कोश) ११ निषेधार्थक अव्यय (छेः ह्नः).

श्वास येतो कीं * अंगुल्या बारा हा, केव्हां निघेल नेणों कीं वारा हा। तयावीण कोण नाहीं दुसरा हा, स्मरीं मुळ ³सोऽहंबीजविसरा हों। ॥ प्राण्या० ॥ १ ॥ ब्रह्म ईश्वर जीव नाही तिसरा हा। अभिमान तुला नसरा हा ॥ प्राण्या० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे नको भेद कीं जरा हा। ओलांडी त्या अनाहत गजरा हा। पंचभूतें गुणातीत अज राहा। नित्य पी तूं प्रेमपाझर झरा हा ॥ प्राण्या० ॥ ३ ॥

अन्यपाठ:—*[आंगोळया]

---

१ अष्टांगुलं वहेद्वायुरनलश्चतुरंगुलं [स्वरोदय] यांत मुख्यतः योगशास्त्रोक्त सोहंक्रियेचें दिग्दर्शन केलें आहे. आपला प्राण हृदयस्थानांतून बाहेर निघून बारा बोटांच्या अवकाशामध्यें गमन करितो, तेथें तो थोडावेळ स्थिर राहून तेथून अपानरूप धारण करून पुनः हृदयकमलांत येऊन स्थिर राहतो. आतां हृदयांतून जो श्वास बाहेर येतो तो सूर्याप्रमाणें उष्ण असल्यामुळें त्याला सूर्यस्वर अथवा प्राण ह्मणतात. हा प्राण जेव्हां बाहेरून पुन: हृदयांत येतो त्यावेळेस थंड झाल्यामुळें त्याला अपान अथवा चंद्रस्वर ह्मणतात. यावरून सूर्य अथवा प्राणवायु हृदयाला उष्ण करितो, ह्मणून तो भोजन केलेल्या अन्नाचें यथार्थ रीतीनें पाचन करितो. आतां अपानरूपी चंद्र ज्यावेळेस बाहेर निघून प्राणरूपी सूर्यांत लीन होतो त्यावेळेस हृदयकमलांत अनंत तत्वें, त्यांत मुख्यत्वेंकरून साठ अथवा पांसष्ट तत्त्वें प्रकट होतात. या तत्त्वांत मन स्थिर केल्यानें सुख अथवा दुःख यापैकीं कांहींच समजत नाहीं. त्याप्रमाणें प्राणरूपी सूर्यस्वर, अपानरूपी चंद्रामध्यें ज्यावेळेस लीन होतो त्यावेळेस पुनः जन्म व मरण यांचा संभव मुळींच रहात नाहीं. दुसरें असें, प्राणवायु जितक्या वेळपर्यंत बाहेर काढून पुनः स्थिर ठेवावा तितक्या वेळापर्यंत कल्पना राहत नाहीं; व सर्व भ्रांति दूर होते. अपानस्वराला (चंद्रस्वराला) आंतमध्यें स्थिर ठेवल्यानें परमपद प्राप्त होऊं शकतें. [विशेष माहिती, पातञ्जल योगशास्त्राचा अभिप्राय या पुस्तकांत पहा. २ प्राणवायु. ३ मूळच्या ब्रह्मस्वरूपास विसरणारा. ४ हा जीव विसरणारा. ५ ब्रह्म, ईश्वर हे दोन वेगळे व तिसरा जो जीव तो भी असा अभिमान तुला योग्य नव्हे. (सावंतवाडी प्रांतीं "नसरा" योग्य नव्हे. शोभत नाहीं. या अर्थी वापरतात. जसें "तुका ह्यां नसरा" तुला हें शोभत नाहीं, योग्य नव्हे.) ६ हा जीवकूटस्थामधील भेद. ७ पंचभूतें आणि तीन गुण ययांतीत केवळ अज [जन्मरहीत परमात्मस्वरूप] होऊन राहा.

पद ८३ वें.

स्मरा रे प्राणियांनो हरिला स्मरा ।। ध्रु० ।। अझुनी गुंताल तुम्हि किती संसारा । स्वप्नप्राय हा दिसतो पसारा । विवेकें पाहा सारासारा । परात्पर अजरामरा स्मरारे० ।। १ ।। नरकीं न पडाल तें करा आचरण । भगवन्ताला यावें शरण । नित्य करावें नामस्मरण । येणें चुके जन्म मृत्यु जरा ।। स्मरारे० ।। २ ।। शरीर हें कवणें कैसें घडिलें । पंचभूतात्मक विषयीं जडलें । सोक्षित्व या मध्यें न सांपडलें । निश्चय हा दृढ धरा ।। स्मरारे० ।। ३ ।। सर्वहि गेलिया काय हें उरतें ? कोठुनि उत्पन्न कोठें मुरतें । पाहण्यांत पाहणें पाहा पुरतें । आनंदेंचि काळ हा हरा ।। स्मरारे० ।। ४ ।। सोहिरा म्हणे आयुष्य जातें । ब्रह्म हें नरदेहींहुनीच उमजा तें । संतसमागमें कीं समजा तें । चित्त हें त्यांताचि भरा ।। स्मरारे० ।। ५ ।।

पद ८४ वें.

तें तूं पाहीं परब्रह्म आपुलेठायीं । निरंतर त्याचाचि ध्यास वाहीं । संतसंग यास्तव करणें कांहीं । हृदयीं असोनि कोठेंच दिसत नाहीं ।। ।। ध्रु० ।। ज्याचे सत्तेनें शरीर उपजे नाशे । ज्याच्या तेजें शशि सूर्य हा प्रकाशे । जेथें राहायाला घर केलं कि आकाशें । ज्याला पाहतांचि कल्पना हे नाशे ।। तें तूं पाहीं० ।। १ ।। जीव झाला कोठुनि नेणें आला । शरीर संयोगें लुब्ध इंद्रियांला । देह हें सुटल्या मग काय होय त्याला । ऐसा विवेक उत्पन्न कोठुनि झाला ।। तें तूं पाहीं० ।। २ ।। आत्मा निर्गुण निर्विकार

१ ज्या ज्या रूपाची कल्पना बुद्धि करील त्या त्या रूपास प्रकाशविणारा हा साक्षी आहे, पण स्वत: तो वाणि आणि बुद्धि यांस अगोचर आहे; तर असा जो वाणि आणि बुद्धि यांस अगोचर साक्षी तो मुमुक्षूस प्राप्त तरि व्हावा कसा, असें जर कोणी ह्मणेल तर त्याचें उत्तर हेंच कीं सर्व पदार्थांचें निरसन झालें ह्मणजे अर्थातच तो शिल्लक राहतो. २ दृश्य जगताचें जें पहाणें त्या पहाण्यांत भेददृष्टि असते ती विवेकानें निरसून त्याठिकाणीं त्रिपुटीरहीत केवल परब्रह्मच पहाणें यालाच पुरतें पहाणें ह्मणतात.

तूंची । जें जें घडतें तें जाणसी आंतची । जन्मा आलें तें आहे कीं जातची । जें[1] कां अविनाश असतें राहातची ॥ तें तूं पाहीं० ॥ ३ ॥ जागृतींत जें जें दिसे *ज्याला । स्वप्नामांजी आणिकचि दिसे त्याला । सुषुप्ति माजी शून्यें[2] देखुनि म्याला । तिहीं अवस्थांचा साक्षी$ कोण झाला ॥ तें तूं पाहीं० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे चहूं वाचाचें जें मूळ । भेद नाशी कीं द्वैताचा समूळ । आच्छादिलें जेवीं मुंगीं काढी गूळ । तेवीं स्वरूप व्हावें सा[3]नकूळ ॥ तें तूं पाहीं० ॥ ५ ॥

पद ८५ वें.

आणि[4] या संताचें दर्शन नित्य रूप घ्यावें हो ॥ ध्रु० ॥ येउनियां मृत्युलोकीं । आत्महित अवलोकीं । अध्यात्म ऐकावें मुखीं । असावें कीं सदा सुखी । स्वस्थभावेंकरूनियां, त्याच अर्थीं चित्त द्यावें हो ॥ आणि-या०॥ १ ॥ स्थूल देह नामुनि जाय । मग कोठें आहे काय । याचा मोह धरोनि काय ! वैराग्य हें हृदयीं होय । ऐसें आत्मज्ञान पूर्ण, मनाला

अन्यपाठ---*[त्याला.] $ रामदासपंचायतनांतील साधुवर्य " केशव स्वामी " याचें याच अर्थाचें पारमार्थिक पद [पंचीकृत पंचभूतांचें । निर्मित कर्म प्रारब्धाचें । जाणसी अन्नमय कोशातें । द्रष्टा स्थूलाहूनि भिन्न ॥ अरे बाप तूं स्थूल कैंचा ततूसाक्षी ॥ १ ॥ मन बुद्धि इंद्रियें प्राण । एतद्युक्त भोगसाधन । कोशत्रय हें तुजला ज्ञान । अपंचीकृत सूक्ष्माचें ॥ अरे बाप तूं सूक्ष्म कैंचा तत् साक्षी ॥ २ ॥ अनाद्य विद्याऽनिर्वचनीया । हें तों कारणदेहद्वयां । जाणसी कोशा आनंदमया । कारणदेह द्रष्टत्वें ॥ अरे बाप तूं कारण कैंचा ततूसाक्षी ॥ ३ ॥ दृश्योपाधीचें तुज ज्ञान । तंव तुज द्रष्टा हें अभिधान । उपाधिविरहें द्रष्टेपण । तुझें तुजमाजी विरे ॥ अरे बाप तूं तूर्या कैंचा ततूसाक्षी ॥ ४ ॥ दृश्य द्रष्टा आणि 'दर्शन । जेथें त्रिपुटी होय क्षीण । तो तूं प्राणनाथ निर्गुण । केशव बोले अद्वय । अरे बाप तूं पूर्णब्रह्म । निःशब्द ॥ ५ ॥]

१ जें परब्रह्म. २ गाढ निद्रेमध्यें कांहींच दिसत नाहीं. सर्व शून्य भासतें. ३ जीवन्मुक्तीप्रत्यर्थ साह्यभूत, अनुकूल असणारें. ४ आणि या शब्दाचा संबंध पुढल्या चरणाशीं आहे ह्मणजे मृत्युलोकीं यावें " आणि " या संताचें दर्शन नित्यरूप घ्यावें.

या व्हावें हो ॥ आणि या० ॥ २ ॥ तन्मयें तद्रूप व्हावें । स्वरूपीं सुदृढ भावें । सर्व भूतीं तेंचि ध्यावें । अखंडीत तेंचि गावें । ब्रह्मरस पिउनि महा, आनंदांत यावें हो ॥ आणि या० ॥ ३ ॥ वर्णिलें जें वेदांतीं । चैतन्य हें आदि अंतीं । सांगितलें नाना ग्रंथीं । साधन हें नाना पंथीं । अलक्षीं हें लक्ष लावुनि, एकांताला न्यावें हो ॥ आणि या० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे हेंचि माग । याचि मोक्षकामा लाग । भ्रांतिचा हा फिटेल डाग । विश्व नाहीं तेथ जाग ॥ असोनि कीं याच देहीं, नलगे मग भ्यावें हो ॥ आणि या० ॥ ५ ॥

पद ८६ वें.

तूं कोठुनी कवण आलासी ! प्राणिया स्मरण नसे ॥ ध्रु० ॥ कर्म लागलें पाठीं । तेव्हां देहाशीं पडली गांठी । येथ गुंतसी भोगासाठीं । जड हें शरीर मानुनि मीच असें ॥ तूं० ॥ १ ॥ निर्मियला तुज ज्यानें । सर्व हें विश्व चाळितसे त्यानें । त्यातें तुज नाहीं पाहणें । जो कां समग्र आत्मा हृदयीं वसे ॥ तूं० ॥ २ ॥ नाशवंत हें पाहसी । याच्या विश्वासें तूं राहासी । अवघा ध्यास तोचि वाहासी । परि नेणसि हें मुद्दल कसें ॥ तूं० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा कांहीं । तुजला संतसमागम नाहीं । यास्तव पाहीं केवळ मोहीं । भवविभ्रम हा नयनीं बसे ॥ तूं० ॥ ४ ॥

पद ८७ वें.

कांहीं सार्थक करीं तूं प्राण्या लौकर रे ॥ ध्रु० ॥ देह हें स्थूळ भ्रमाचें मूळ । प्रपंच म्हणणें अवघें खूळ । शेवटीं तुजला हें प्रतिकूळ । अंतीं कांहीं नाहीं, हें तंव दिसे क्षणभर रे ॥ कांहीं० ॥ १ ॥ सोडुनि स्वार्थ धरीं परमार्थ । आत्महिताविण फिरणें व्यर्थ । गुरुमुखें समजुनि घ्यावा अर्थ ॥ सांगतील तुज तें, कांहीं चित्तीं धर रे ॥ कांहीं ॥ २ ॥ शरिरीं कवण हा साक्षि पाहा । त्याला पाहुनि तेथचि रहा, ध्यास निरंतर तोचि वाहा । विश्वातीत परमात्मा तो हा । तद्रूपची होउनियां जीव उद्धर रे

॥ कांहीं० ॥ ३ ॥ अनंतरूपीं हा अनंत वसतो । दृष्टिवीण हा सदैव दिसतो । कांहिंच नाही त्या रूपीं असतो । सर्वगतचि कीं, व्यापक हा विश्वंभर ॥ कांहीं० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा निश्चय व्हावा । तरीच तुजला पडेल ठावा । केवळ मिळसी जरि सद्भावा । संतवि वेद वदनीं नित्य वदावा । महा दुस्तरची भवनदि कीं हे माया तर रे ॥ कांहीं० ॥ ५ ॥

पद ८८ वें.

प्राण्या देव कसें उणें झालें ?. देवा तुज करुणत्व न आलें ॥ ध्रु० ॥ अमृतामाजीं राहतों, आणि विषय कांजी पितों ॥ १ ॥ जागृतीची नावड, कैसें स्वप्नचि वाटतें गोड ॥ २ ॥ अनर्घ्य रत्नहारा, टाकुनि पदरीं घेतों गारा ॥ ३ ॥ लटक्याचि मृगजळा, देखोनि तृष्णेच्या पसरीं ताळा ॥ ४ ॥ तूं गुरुकृपा माउली, सांडुनि ताडाची घेतों साउली ॥ ५ ॥ भवदोराची नागिण खायी, कर्मझांडणी झाडुनि घेई ॥ ६ ॥ न वचे अविनाशाचे घरीं, वृत्ति धांवे दृश्यावरी ॥ ७ ॥ आतां निरसीं हे मायाभाव, नांद तूं अंतःकरणीं देव ॥ ८ ॥ सोहिरा म्हणे मज हें देणें, आतां तूं तो कीं मी तूं होणें ॥ ९ ॥

---

१ देव, मनुष्य, पशु, पक्षी इत्यादि अनंत रूपांमध्यें २ हा इंद्रियातीत असल्यामुळें अनित्य जड अशा दृष्टीला (नेत्रेंद्रियादि साधनांला) दिसण्याजोगा नाहीं. ह्मणून ‘ ज्ञानदृष्टीनें, अंतर्मुख वृत्तीनें ’ मात्र सदैव दिसतो असा भाव. ३ कांहींच नाहीं असें रूप ह्मणजे शून्य स्वरूप. ४ वेदांनींही स्वमुखें करून ज्याला नित्य वदावा (त्याचे स्तुतिपाठ गावे) असा जो त्याचें स्तवन कर. ५ अमोलिक. ६ खात आहे. ७ प्रारब्धकर्मरूप केरसुणीनें झाडा घालून घेतों. [सर्पाचें विष उतरण्यासाठीं मांत्रिक लोक झाडणीनें झाडा घालितात.] ८ मायेचें कपट. ९ तूं, मी; तें, हें; आपण, दुसरा हीं शब्दयुग्में परस्पर विरुद्धार्थी आहेत. अन्यतेचा प्रतियोगी जो “ स्वयं ” शब्द तो कूटस्थवाची आहे, त्या कूटस्थ आत्म्यावर तूं या शब्दाचा प्रतियोगी जो मी शब्द तो कल्पिलेला आहे. [पंचदशी चित्रदीप श्लो० ४९ व ५० पहा.] ह्मणून येथें मीपणा नाहींसा होऊन तूंच होणें असें ह्मटलें आहे.

पद ८९ वें.

आहे तेवढें बरें । जरि का? कल्पना मुरे ॥ ध्रु० ॥ वनिंचिया तरूवरां । शिंची कोण तरि निरा । सहज हालती समिरें ॥ १ ॥ संचित क्रियमाण । पहिलें बांधोनि प्रमाण । देह धरिलें गिरिधरें ॥ २ ॥ ज्याचा तोचि कर्ता हर्ता । नसता अभिमान धर्ता । म्हणवुनि जीव हें नाम उरे ॥ ३ ॥ प्रपंचपरमार्थाला । नाणी द्वैत अभावाला । सोहिरा जाणें अंतरें ॥ ४ ॥

पद ९० वें.

देह हें शुक्तिपणीं । टाकुनि घेई मुक्तिमणी ॥ ध्रु० ॥ असोंगियानें सोंग घेतां । निजरूप पालटतां ॥ प्रबुद्ध न भुलती आभरणीं ॥ देह हें० ॥१॥ कर्दम अवघा सांडुनि । मग तें सोज्वळपण निवडुनी । घेती शुकीचि तें पाणी ॥ देह हे० ॥ २ ॥ वृक्ष समत्व हेलुनी । एक चंदन साच निवटुनी । नाग जडले प्रेमळपणीं ॥ देह हें० ॥ ३ ॥ भिन्नपणें स्थूल दृष्टि । मानुनी सूक्ष्मपणें सृष्टि । सोहिरा एकात्मा सगुणीं ॥ देह हें० ॥ ४ ॥

*पद ९१ वें.

गोवर्धनधारी वाचे बोल रे ॥ ध्रु० ॥ सनक सनंदन देव सुरवरां । ज्याचें स्वरूप सखोल रे ॥ गोवर्धन धारी० ॥ १ ॥ पाहीं चराचरीं एक अनेक । पार उतारी भव पल रे ॥ गोवर्धन धारी० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे निज देहीं सुखामृत । सेवुनि आनंदें डोल रे ॥ गोवर्धन० ॥ ३ ॥

---

* [या पदाचा राग गौडी आहे.]

---

१ संचितक्रियमाणादि प्राक्तन कर्म हें पहिलें प्रत्यक्ष प्रमाण बांधोनि ह्मणजे दृढ करून गोवर्धन धारण करणाऱ्या श्रीकृष्णानेंही त्याच आपल्या नियमानुरूप देह धारण केले असा भाव. २ शिंपीची चकाकी पाहून तें रुपें किंवा रत्न आहे ह्मणून उचलावें पण नंतर शिंपी आहे असें समजतांच ती जसी फेंकून देतात. ३ प्रज्ञावंत ज्ञाते. ४ बाह्य शृंगारधारणानें. ५ चिखल. ६ पोरट. ७ भवसमुद्राच्या पलीकडच्या तीरास

पद ९२ वें.

साधुजन वंद्य ॥ ध्रु० ॥ नित्यानित्य हें जाणुनि सत्यें । स्वरूपिं होती स्वसंवेद्य ॥ साधु० ॥ १ ॥ प्रकृति भुलाई, सांडुनि लवलाहीं । पाहती अनूतनें आद्य ॥ साधु० ॥ २ ॥ विद्या हे इतरिक, सांडुनियां निज एक । घेती अध्यात्म सुवेद्य ॥ साधु० ॥ ३ ॥ विषयसुखीं भेद, मानुनियां अभेद । सोहिरा पूर्णाल्हाद घेतो सुख सद्य ॥ ४ ॥

पद ९३ वें.

देउनि तनु मन, घे निजधन तें ॥ ध्रु० ॥ जन हें सांडुनि, विकल्प मोडुनि । देख एकांत विजन तें । देउनि० ॥ १ ॥ चित्तवृत्ति तेथचि रमती । सर्वेचि होय अमन तें ॥ देउनी० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मग प्रेमसुखामृत । सेवुनि पावे शमन तें ॥ देउनी० ॥ ३ ॥

पद ९४ वें.

धरीं हरि स्मरणाची आवडी । अपूर्व आहे गोडी ॥ ध्रु० ॥ देई संसारासी सोडी । सर्वे निजसुख जोडे जोडी ॥ धरीं० ॥ १ ॥ नलगे विषयसुखाची चाडी । तोडीं लिंगदेह बेडी ॥ धरीं० ॥ २ ॥ काढीं कल्पनेची आडी । पुरते निवृत्तिची कोडी ॥ धरीं० ॥ ३ ॥ निरसीं देहभास कांडी । सोहिरा ऊर्ध्वमूळीतें धुंडी ॥ धरीं ॥ ४ ॥

पद ९५ वें.

सदैव निराकार । मिथ्या मानीं हा आकार ॥ ध्रु० ॥ पाहातां अंतरदृष्टि । दिसे लटकीच अवघी सृष्टि ॥ आहे सतत निर्विकार ॥ सदैव०

---

१ नित्य आत्मा, अनित्य माया. २ सत्यत्वानें ह्मणजे अपरोक्षज्ञानानें जाणून. ३ आपल्याला आपणच जाणणारे. ४ भुलवणी, फसवणूक ५ जो आलीकडचा नसून मूळचा जुनाट असा परमपुरुष. ६ एक आत्मविद्या. ७ वेदांनी निर्णित केलेलें असें, निर्मळ. ८ सूक्ष्मदेह. ९ आडकाठी. अटक. १० तृणतुल्य असा देहभास. ११ अश्वत्थ (प्रपंचरूपवृक्ष). वृक्षाचें वर असणारें मूळ (परमपुरुष) त्याला.

॥ १ ॥ निज उगमासीं मेळुनी । सर्वे कल्पनेसी हेळुनी ॥ करी जो विषयांचा धिःकार ॥ सदैव० ॥ २ ॥ बाह्य विषय त्यागी । बरवा अंतर विषय भोगी ॥ सर्वे निजसुख स्वीकार ॥ सदैव० ॥ ३ ॥ सहोदर[1] एका निजींचा । जाणोनि जें जें देखे[2] त्याचा । सोहिरा न धरी अधिकार सदैव० ॥ ४ ॥

पद ९६ वें.

सेवुनि अर्धचंद्रा[3] । प्रेमे गाऊं रामचंद्रा ॥ ध्रु० ॥ लावुनियां निजमुद्रा[4] । स्वरूपीं भावुनि ज्ञानसमुद्रा[5] ॥ सेवुनि० ॥ १ ॥ हे भववृत्ति[6] आर्द्री(?)[7] हारोनि निजीं[8] नीजें योगिंद्रीं[9][10] ॥ सेवुनि० ॥ २ ॥ सुषुम्नेच्या छिद्रा । लक्षुनि मार्गे त्या खगेंद्रीं[11] ॥ सेवुनि० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे ब्रह्मरंध्रा । घेऊं सहजसमाधिनिद्रा[12] ॥ सेवुनि० ॥ ४ ॥

---

१ एक आत्मतत्त्वाचा बंधु, सहचारी. २ आत्म्याव्यतिरिक्त जें जे ऐश्वर्ययुक्त ह्मणून पदार्थ पाहतों, त्याचें आपल्याला मुळींच कांहीं महत्त्व वाटत नाहीं असें सोहिरोबा ह्मणतात. ३ ॐकाराच्या अर्धमात्रेचा अनुभव घेऊन ह्मणजे परमात्म्याचें अपरोक्ष ज्ञान झाल्यावर. ज्ञानेश्वरी अ० ६] ४ चतुर्थ मुद्रा खेचरी [कपिमार्ग] याविषयीं सिद्धांतसंहिता ग्रंथाच्या उत्तरार्धाचा १२ अध्याय पहावा. विशेषेंकरून पृष्ट ७६ पहा.] ५ नित्य आणि स्वयंप्रकाश असें जें साक्षिज्ञान हाच एक समुद्र [चैतन्यसागर] तो स्वरुपीं [सच्चिदानंद आत्मस्वरुपीं भावून ह्मणजे भावना करून पुढें पुढील चरणाशीं संबंध आहे. ६ संसाररूप प्रवृत्ति. ७ दुःखजनित(?). ८ आत्मस्वरूपामध्यें. ९ समाधिस्थ हो. १० योगीजनामध्यें इंद्र=प्रमुख अशा. ११ हंसपक्षाला [पक्षीं पंचभूतांसह असणाऱ्या जीवाला] ब्रह्मरंध्रांत कुंडली गेल्यानें चित्त निर्विषय होतें, त्यामुळें ध्यान निर्विघ्नपणें सतत चालतें; आणि त्या योगानें कैवल्यप्राप्ति होण्याला कांहीं अवकाश लागत नाहीं. आणि हंसपक्षी जसा जाळें तोडून आकाशांत निःशंक संचार करितो, त्याप्रमाणें जीव संशयरूप हृदयग्रंथीचा भेद झाल्यामुळें संसारपाशांतून मुक्त होऊन तरून जातो. असें अथर्व वेदांतील क्षुरिका उपनिषदांत सांगितलें आहे. १२ सहजसमाधि ह्मणजे राजयोगाची शेवटची पायरी. शरिरादिकांला श्रम झाल्यावांचून अनायासानें सिद्ध होणारा जो समाधि त्याला सहजसमाधि ह्मणतात.

पद ९७ वें.

अरे ! कांरे ? विसरलासी आपणियों तूं ॥ ध्रु० ॥ नाशिवंत जाणुनियां । मग निजसुख नेणुनियां । धरिसी भवबंधहेतु ॥ अरे कांरे० ॥ १ ॥ एक अनेक विरूढलासी । या चराचरीं तूंचि असती ॥ विश्वपटीं चित्तंतु ॥ अरे कांरे० ॥ २ ॥ फिरफिरत असती । कष्टें बहुत श्रमलासी । मिथ्या जन्ममरणा तूं ॥ अरे कांरे० ॥ ३ ॥ निज मुळींचा । जाणुनियां तूं आपणापें साचा ॥ सोहिरा निजपदीं रम तूं ॥ अरे कांरे० ॥ ४ ॥

पद ९८ वें.

सहज सुखी । ज्यालागीं नाहीं कोण दुःखी ॥ ध्रु० ॥ प्रवृत्ति ज्याणें ही निर्वृत्ति भावोनि । झाली विषयांसी दुर्विखी ॥ सहज०॥ १ ॥ सबाह्यांतरी आनंदमय । त्रिभुवन भरिलें हरिखीं ॥ सहज० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे पूर्ण सनातना । वंदुनियां निजसौख्यीं ॥ सहज० ॥ ३ ॥

पद ९९ वें.

नाहीं म्हणायाँ काय ? हरि वीण । कांसया कारिसी फार भ्रमण ॥ध्रु०॥ आपुलियां काजया । खेळ करितया । भूषण नाणितें काय ? दूषण ? ॥

अन्यपाठः—[1] [काजा खेळ करी तया].

---

१ आपल्या मूळच्या आत्मस्वरूपाला २ तूं मूळचा एकच आत्मा अनेकत्वाने विस्तार पावलेला आहेस. ३ विश्वरूप वस्त्रांत व्यापून असणारा चैतन्य ततु. [विश्वपटीं चित्तंतु त्यासी म्हणति कुलाई कुंचीः— रंगनाथ] ४ अज्ञान प्रवृत्ति हीच वास्तविक निवृत्ति आहे अशी दृढ भावना धरल्यानें दुष्ट विषानें युक्त असे जे विषय त्यांच्या विषयप्रवृत्तिरूप विषबाधेचीहि निवृत्ति झाली हा भाव. ५ आनंदाने. ६ हरीच्या प्राप्तीसाठीं फार भ्रमण कशासाठीं करतोस ? अमूक एका वस्तूंत हरि नाहीं, असे म्हणावयाला एक तरी वस्तु (हरिवीण) आहे काय ? ७ आपल्या कुटुंबाचें पोषण होण्यासाठीं म्हणून एकादा गारोडी गारोड्याचा खेळ करून जनास दाखवितो; कुटुंब पोषणानिमित्त तें कर्म आपणास आचरलेंच पाहिजे, व त्यावांचून निर्वाह नाहीं, असें जाणून मात्र तो तें कर्म आचरतो, पण स्वतः तो त्यांत लुब्ध

नाहीं० ॥ १ ॥ प्रयोजी *कृतांती आहार निराहारी । लक्षणीं असोनि जो विलक्षण ॥ नाहीं० ॥ २ ॥ मेदिनीं दखणें, आकाशीं लेखणें । सर्वेचि ठावुकी होय निजखुण ॥ नाहीं० ॥ ३ ॥ व्यक्तिसि हारोनि अव्यक्त घेउनी । मानिजे मग तें प्रमाण ॥ नाहीं० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे जें हें कल्पूं जातां † । निर्हेतुवीण न शोभे तें निर्गुण ॥ नाहीं० ॥ ५ ॥

अन्यपाठ—* [कृतांतांतरी]. † [कल्पूं जावां नीर । हेतुवीण न लभे तें निर्गुण]. [याचा राग केदार आहे]

नसतो, किंवा आश्चर्यचकीतही होत नसतो. तद्वत् आपल्या कर्तव्यकर्मास अनुसरून जो कांहीं खेळ करितो, त्याला त्या कृतीने दूषण येतें काय? इतकेंच नव्हे तर! तें कर्तव्यकर्माचरण त्याला भूषण आणीत नाहीं काय? ही साधारण गारोड्याची गोष्ट झाली; पण विश्वकुटुंबी जो हरि तो [आपुलिया काजया=विश्वरूप कार्यासाठीं] आपल्या योगमायेने जर [खेळ] कर्म आचरीत आहे; तर त्याला दूषण देतां येईल काय? [न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥ भ० गी० अ० ३ ॥ भावार्थ:—पार्था मला करावयाचें म्हणून कांहीं आहे असें नाहीं. त्रिभुवनांतील अमुक एक वस्तु मला मिळाली नाहीं, आणि ती मिळवायाची आहे असें नाहीं. तथापि मीं कर्म आचरितच आहे.]

१ सर्व जगाचा आहार पचविण्याचें [किंवा उत्पत्ति संहार करण्याचें] काम [कृतांतीं=मृत्यूकडे] कालरूपी अग्नीकडे (प्रयोजी) सोपवून तो (हरि) स्वतः निराहारी असतो असा भाव. २ त्रिगुणात्मक उपाधींच्या योगानें जरी तो सगुण साकार विश्वव्यापी होतो, तरी त्यांहून वास्तविक विलक्षण म्हणजे वेगळा अर्थात् निराकार व निर्गुण असा आहे. लक्षणांनी म्हणजे उपाधींनीं त्याचे स्वरूपांत कांहीं बिघाड होत नाहीं. ३ पृथ्वीचे ठायीं देखणें=त्वंपदपिंडकार्य पाहणें, अव्याकृत अव्यक्त अज्ञान अविद्या अधोमुख मकार मात्रा पाहणें. ४ शून्यापूर्वीचें जो एक अंक म्हणजे ॐ ह्या अक्षरावर (एक संख्येनें युक्त) ब्रह्माचा लेखा करणें म्हणजे शुद्ध माया, अर्धमात्रा मूलप्रकृति ज्ञान, महाकारण ऊर्ध्वमुख जाणावीं. अ० उ, म, ँ अर्धमात्रा व ० बिंदु मिळून पंचदेहाकृतींचा (आकाशांत=ब्रह्मांडांत) पांच प्रकारचा अनुभव घेणें. अमलानंदयोगी यांनीं शतश्लोकीमध्यें म्हटलें आहे की [ऊर्ध्वाम्नायबीज तें हें अनुभव प्रणवीं पंचदेहाकृतींचा । ऐसा गुह्यार्थ देवीप्रति शिव वदतो स्पष्ट हृत्पंकजींचा ॥४८॥] आत्मखूण. ५ जीवव्यक्तीस. ६ कूटस्थ ब्रह्म घेऊन. ७ सत्य, प्रत्यक्षप्रमाण. ८ जे हे कांहीं सांगितलें, ते जर कोणी कल्पूं जाईल, तर तें हेतुरहीत कर्म झाल्याविना, निर्गुण निराकार ब्रह्म हातास चढणार नाहीं हा भाव.

पद १०० वें.

सांडा भ्रमा ! हरिरंगीं रमा ॥ ध्रु० ॥ विषयसुख हें दुःखदायक । याहुनियां सुगमा ॥ हरि० ॥ १ ॥ जरि करिल कृपा, अनुभव सोपा । दावी स्वरूपा * पर अप्रतिमा ॥ हरि० ॥ २ ॥ गुजाचें गुज आहे हें निज । अगम्य जें निगमा ॥ हरि० ॥ ३ ॥ माझें मीपण हरिलें पूर्ण । सोहिरा म्हणे सुखा नाहीं सिमा ॥ हरि० ॥ ४ ॥

पद १०१ वें.

अरे ! सज्जन होउनी विजन देखें ॥ ध्रु० ॥ विषय मदादिक पोळुनि आघवे । जेथ सदाशिव तोखे[2] अरे० ॥ १ ॥ अनात्मक हें सकळहि आटुनी । अभेदनगीं[3] उमा उखे ॥ अरे० ॥ २ ॥ शंखध्वनि हे अनुदिनीं वाजत । नारि भुलत निजसौख्यें ॥ अरे० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे तें स्थान पाहे तो । पुनरागमनासि नोळंखे ॥ अरे० ॥ ४ ॥

पद १०२ वें.

मन हें कां रे ? विजनें जन देखेना ! ॥ ध्रु० ॥ सांडुनि भेदक अलंकार । अभेद एकचि लेणें ओळखेना ॥ मन० ॥ १ ॥ स्वरूपउगमीं नित्य निज नेमीं । इंद्रियवृत्तीसी राखेना ॥ मन० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे जहीं पूर्णत्वपणें । परमामृतरस चाखेना ॥ मन० ॥ ३ ॥

अन्यपाठः—* [स्वरूप स्वरूप हृ अपरप्रतिमा.]

---

१ अप्रतिम असें श्रेष्ठ स्वरूप, विश्वरूप, किंवा सगुण आणि निर्गुण स्वरूप. २ उदयप्रकाश अशावेळीं संतोष पावेल. ३ जीव शिव असा भेद जेथें नाहीं असा केवळ शिवरूप जो नग (पर्वत, मेरू, ॐकार) त्यावर उमा (अर्धनारी, अर्धमात्रा). हीच आहे उखा=प्रभातकाळ. ४ नामरूप रहित.

पद १०३ वें.

अरे रे ! प्राण्या ! वदनीं वद कां रे ! हरिनाम ॥ ध्रु० ॥ भजनीं निज मानस देईं । त्यजेनीं वैराग्य व्हेईं । विजनीं जनसमता घेईं । पूर्ण होइल निजसुखकाम ॥ अरे रे० ॥ १ ॥ धरिं कां दृढनिश्चय भक्ति । हरीं कां भवताप व्यक्ति । वरिं कां निजवैभव मुक्ति । हरिं कां जननमरणधाम ॥ अरे ! रे० ॥ २ ॥ उघडे निजज्ञानज्योति । विघडे अज्ञानपाती । सुघडे निज चक्षु होती । सोहिरा निजनामीं सुख विश्राम ॥ अरे रे० ॥ ३ ॥

पद १०४ वें.

पाहा हो ! नर पापी नर पापी । हरिभजनातें लोपी ॥ ध्रु० ॥ परनर मत्सर करितो । दशमुख नरसभे हीं पण देतो ॥ पाहा हो० ॥ १ ॥ मुखें दोष पराचे बोले । रामनामीं अरिपण केलें ॥ पाहा हो० ॥ २ ॥ निपुण परनारीसंगातें । केलें कल्पतरूसंगातें ॥ पाहा हो० ॥ ३ ॥ परधन देखुनि उघडी लोचन । नेणें आत्महित देहमोचन ॥ पाहा हो० ॥ ४ ॥ सोहिरा सद्गुरुचरणीं शरण । देईं ज्ञान हारि हे गुण ॥ पाहा हो० ॥ ५ ॥

पद १०५ वें.

पहा हो ! नर भला नर भला । हरि भजनीं तोषला ॥ ध्रु० ॥ करितो परनरपूजनातें । देखे सज्जन सद्रुप निरुतें ॥ पहा हो० ॥ १ ॥ मानी मायरूपि परजाया । करितो कल्पतरू जीवछाया ॥ पहा हो० ॥ २ ॥

---

१ विषय त्यागीं. २ एकांतांत. ३ मनुष्यस्थावर जंगमात्मक भूतसृष्टिचें अनेकत्व यांकडे समतेनें अद्वैतदृष्टीनें पहा. ४ पापण्या. ५ चांगलें घडलेलें; ज्ञानदृष्टीनें युक्त. ६ नर=विदेही जनकाच्या सभेंत सीतास्वयंवरप्रसंगीं रावणानें केलेल्या गर्वोक्तीला उद्देशून हे उद्गार आहेत. ७ श्रेष्ठ पुरुष, पुरुषोत्तम परमात्मा. ८ साधुजनांनीं जाणलेलें जें सद्रूप (तत्त्व, अपरोक्षज्ञान) निरुतें=खरें निश्चयात्मक. ९ कल्पवृक्षाच्या छायेंत बसून जसजशी कल्पना करीत रहावें, तसें तसें तो फल देतो, म्हणून त्याला कल्पतरू किंवा इच्छातरू असें म्हणतात. अशा कल्पतरूचें महत्त्व न जाणून, क्षुधेनें पीडित असा

शब्द बोले सद्भावाचा । हरघडि घोष करी नामाचा ॥ पहा हो० ॥ ३ ॥ परधन देखुनि झांकी नयन ।*करितो आत्महित अवलोकन ॥ पाहा हो० ॥ ४ ॥ सोहिरा सद्गुरु चरणीं शरण । करितो ऐशानररूपीं वंदन ॥ पाहा हो० ॥ ५ ॥

पद १०६ वें.

¶अपरांपर हरी । करितो नवल परी ॥ ध्रु० ॥ शबल शुद्ध हें जाणुनि एक । प्रकटे ज्ञाननिधी । दोहिं प्रकारें भावुनि आपण । खेळे चराचरीं ॥ अपरापर० ॥ १ ॥ एकी एक भुलवणी । मग दावी अनेक आभाळ दृष्टि आणोनि । मग हा सगुण जीव वरी ॥ अपरापर० ॥ २ ॥ कोठें आपें आपणा देखे । प्रेमसुख हारिखें । मानुनि *आलीढ देह चारी ॥ अपरापर० ॥ ३ ॥ भवभ्रम फेडुनि निज सोहंबीज । मांडोनि जपतो । सोहिरा देहीं निर्धारीं ॥ अपरापर० ॥ ४ ॥

पद १०७ वें.

घेई सुख दुर्लभ मानुनि लाभ ॥ ध्रु० ॥ सुगम समागमीं, चालतां आगमीं । सांडुनियां महि† डिंब³ ॥ घेई० ॥ १ ॥ रम्यपणीं मग देख प्रयाग । पूर्ण निरें भरे कुंभ ॥ घेई ॥ २ ॥ स्नान करोनि कलिमल विल-

अन्यपाठः—¶अपरंपार *[अलेढ्य] †(डिंभ.)

अज्ञानी जन त्या खालीं बसून कल्पना करील कीं मी येथे बसलों खरा, पण या या वृक्षांवर कोणी वेताळ झोटिंग असेल तर तो मला खाणार नाहींना? तर त्याच्या कल्पनेनुरूप त्याला फळ मिळणारच. तद्वत् परब्रह्मस्वरूप गुरुरूपी जो कल्पवृक्ष, त्याचे छायेंत बसून, त्याचें महत्त्व जाणून ज्यानें (जीवयाया=जीवन्मुक्त व्हावयाला) त्यापासून परमामृतप्राप्तीची इच्छा करून चिरंजीव होण्यासाठीं तो वृक्ष सुसाध्य करितो, तो नर भला असा भाव. [तुकोबा ह्मणतातः—जीवेश्वरभेद नुराया गुरुवचनें संशय टांका.

१ परा ह्मणजे जीवरूपा आणि अपरा ह्मणजे अष्टधा जड प्रकृति या उभयविध प्रकृती आहेत ज्याच्या स्वाधीन असा हरि. किंवा पर आणि अपर किंवा सत् असत् याच्याही पलीकडचा अथवा श्रेष्ठ. २ समसाम्य. ३ पृथ्वीरूप घटाभिमान. ४ कलीसंबंधीं पापमल धवून स्वच्छ झालेल्या अंगांचा.

यांगीं । शमेल अनळ डोंभे ॥ घेई० ॥ ३ ॥ शान्तपणें जहीं समीर प्रवाहीं । होउनियां स्वयंभ ॥ घेई० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे पुढें, अहं मी हें नातुडे । मिळोनि अर्वाचिक नभ ॥ घेई० ॥ ५ ॥

पद १०८ वें.

मुखें राम राम, बोल निजनाम ॥ ध्रु० ॥ नामामृत हें सेवुनियां रत । निजपदीं पावोनि विसरीं श्रम ॥ मुखें० ॥ १ ॥ भक्तिनेंच मुक्ति हे जोडे विरक्ति । सर्वेचि मन हें होय निष्काम ॥ मुखें० ॥ २ ॥ निष्कामपणें ओळखीं निज खुणें । पावोनि अंतरीं होसी आराम ॥ मुखें० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मग आरामपणें । आपेआपणची निज धाम ॥ मुखें० ॥ ४ ॥

पद १०९ वें.

श्रीगुरुप्रसादें आनंद ॥ ध्रु० ॥ एकीएक हा सर्व समूहा । दावुनी खंडितो भेदाभेद ॥ श्री गुरु० ॥ १ ॥ काया कमळीं मन हा भ्रमर । बैसोनि सेवितसे आमोद ॥ श्री गुरु० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे निज ज्ञान बरवें । ज्याचेनि होय सर्व सिद्ध ॥ श्रीगुरु० ॥ ३ ॥

¶पद ११० वें.

निजनयनीं हरि पाहसि जारे गा ! ॥ ध्रु० ॥ एक तेज हें सर्व प्रकाशुनी । आपण दिससी तूं जगा ॥ निज० ॥ १ ॥ गुणातीत जो ब्रह्म सनातन । पाहतां शांति वरीं गा ! ॥ निज० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे पृथ्वी पाहतां । पूज्य आपणापें गा ! ॥ निज० ॥ ३ ॥

पद १११ वें.

या बहुरूपीं अरे कां रे ! भुललासी ? ॥ ध्रु० ॥ कोठुनि येणें, कोठें जाणें । काय घेणें, निदानींसी ॥ या बहु० ॥ १ ॥ ज्याहीं दिधलें देह,

¶ [या पदाचा राग पूर्वी आहे].

१ कामरूप अग्नीचा भडका. २ अशब्द, मौनरूप आकाशरूप ब्रह्म. ३ मायेमुळें उत्पन्न झालेलीं नामरूपात्मक बहुतरूपें त्यास भुललास ? ४ कारणीं, किंवा शेवटीं काय घ्यावयाचें ?

तन्मय[1] प्रधान । चिन्मय[2]राज विराजमान ॥ आम्ही० ॥ ७ ॥ सोहिरा म्हणे भाटविलों[3] । अवघा अनुभव आणिला ॥ आम्ही० ॥ ८ ॥

पद ११९ वें.

गारुडी

ऐसा गारुडी गारुडी । आपणियाँ भुली[4] पाडी ॥ ध्रु० ॥ मृत्तिकेचें[5] करुनि भांडें । आंत भरियलीं लांकडें[6] ॥ १ ॥ पाणी[7] भरोनि त्या मध्यें । अग्नि[8] पेटविला सन्निधें ॥ २ ॥ झंझा[9] झणझणाटें बैसे । घडवट[10] हालतें आपैसें ॥ ३ ॥ घडवटासि दशें[11] टव्वाळें । आपणें[12] त्यामाझारी खेळे ॥ ४ ॥

१ सूक्ष्म भूतात्मक प्रधानतत्त्व. (महत्तत्त्व). हेंच आहे मुख्य प्रधान ज्याचा. २ ज्ञानस्वरूप चैतन्य आत्मा हा राजा सिंहासनावर विराजमान (आरूढ) झालेला. असा जो भाट तो सांगून त्यांत अवघा अनुभव किंवा रहस्यभाव आणला आहे. ३ भाटविला=भाटाच्या परंपरेचा वंशविस्तार; त्यांत अवघा ब्रह्मानुभव गोंवला आहे. सावंतवाडीप्रांतीं पिढी वंशावळ याअर्थीं विली हा शब्द वापरतात. ४ स्वस्वरूपविस्मरणरूप भुली=[आपण कोण, आपलें मूळ स्वरूप काय हें कळूं न देणारी] भ्रांति. ह्या गारूड्याच्या (अज्ञान व आवरणरूप) अजब (भुलीमुळें) नजरबंदीमुळें, जीवास 'मी कर्ता' मी भोक्ता, मी संसारी, मी ज्ञानी;' असा भ्रम उत्पन्न होत असतो. ५ मृत्तिकेचें भांडे म्हणजे अन्नमय कोश. स्थूल देह. ६ त्या भांड्यात [भरियाली=भरलीं] लांकडें म्हणजे स्थूल देहांत असणारीं हाडें. ७ मग त्या भाड्यांत आणखी, चित्त (चैतन्य) जलतत्त्व भरलें. ८ मग त्या सन्निधच, अग्नितत्त्व प्रज्वलित केलें; वास्तविक अग्नि व पाणी यांचें सांनिध्य संभवत नाहीं, पण या गारूड्याच्या खेळांत चमत्कृति ती हीच. कीं जसा त्यानें सागरामध्यें नित्य वडवाग्नि प्रज्वलित ठेवला आहे, तद्वत्च प्राण्याच्या जठरांत वैश्वानर नावांचा अग्नि प्रज्वलित करून ठेवलेला आहे. ९ कान झांकले असतां प्राणवायु आणि जठराग्नींतील होणारा ध्वनि ऐकूं येतो, हा अनुभव प्रत्यक्ष आहे. तसाच हृदयप्रदेशांतील विज्ञानमयादि जे कोश, त्यांची क्रिया ज्या कळेनें चालते त्या यांत्रिक कळेचें जें नादसंज्ञक रूप आहे त्याचा झणझणाट [नाद] अंतर्दृष्टि पुरुषांना मात्र कळतो. १० त्याच अंतर्गत यांत्रिक कलेनें हें शरीर [घडवट=घडविलेला शरिराचा सांगाडा] चालतें, हालतें, बोलतें इत्यादि क्रिया करितें. ११ टव्वाळें म्हणजे गोलकें, [इंद्रियें]. गारूडी खेळ करीत असतां, मनुष्याच्या तरट्यादिकांची (वांटोळ्या आकृतीच्या) कांहीं साधनांची त्याला जरूर लागते. तशा साधनपात्रास टव्वाळें म्हणतात. त्याप्रमाणें तेथें टव्वाळें म्हणजे दशगोलकें [दहा इंद्रियें] पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें. १२ त्यांमध्यें आपण सूत्रात्मा होऊन खेळतो.

दशव्या टव्वाळ्यांत जो बैसे । नवही प्रयोजेलीं भूलिवशें ॥ ५ ॥ पहिल्या टव्वाळ्यापुनि तंती । जोडिल्या चौथियां सतती ॥ ६ ॥ पहिली तंती वाजविली । तिघांजणांसि पडली भुली ॥ ७ ॥ दात्री स्त्रियेचें जो रूपडें तेणें झाले अनेक वेडे ॥ ८ ॥ कापुसासि अनेक रंग ।

---

१ दहाव्या टव्वाळ्यांत म्हणजे ब्रह्मरंध्रांत, (तालुस्थानीं). २ परब्रह्म रूपानें स्वस्थ बसून [कांही न कर्ता, न करविता, अशा स्थितीनें] नवही इंद्रियें, विषयादिकांमध्यें भुलि वश झालेलीं (भुललेली) अशीं [प्रयोजिलीं=] आपापल्या कर्मक्रियेंत प्रवृत्त केलीं. ३ पहिले टव्वाळ ब्रह्मरंध्र त्यापासून तंती. (तंतु=शिरा, शरिरस्थ ' इडा पिंगळा सुषुम्ना; ह्या तीन मुख्य नाड्या;) ४ त्या नाड्या पहिल्या टव्वाळ्यापासून चौथें म्हणजे हृदयस्थानच्या अनुहात चक्रापर्यंत सतत एकसारख्या जोडलेल्या अशा. ५ पहिली तंति [पक्षीं वाद्य विशेष तार] सुषुम्ना नाडी [अर्धमात्रा मूळप्रकृति, महाकारण. नादरूपा] वाजविली. [तज्जनित ध्वनि केला.] याविषयीं तुकोबानी एका पदांत म्हटलें आहे [मूळ अंबरीं ध्वनी झाली । ब्रह्म म्हणोनि हाक झाली । ब्रह्म असता हो नंदिनी अवघा आकार । गुरु बोलिला साचार ॥ २ ॥ ध्वनी माथां सिद्ध असतां । वेदशास्त्रें हो गर्जतां । येवढें ब्रह्मांड रचितां । मूळ विस्तार ॥ मु० ॥ ३ ॥ ६ त्रिविध अहंकारास. तामस [रुद्र] सात्विक [विष्णु] राजस (ब्रह्मा) अथवा विश्व, तैजस, प्राज्ञ. या तिघांस तुकोबांनीं वरील पदांत पुढें म्हटले आहे [ब्रह्मा, विष्णु, उमाकांत । हीं बाळे तिचे आंग्नत । नेत्र उघडूनि निश्चित । तनु दिसे स्वरुप आकार ॥ गु० ॥ ६ ॥] ७ जिच्याठायीं शब्दस्पर्शादि पांचही विषय पूर्णपणें एकत्र वसतात अशा स्त्रीचा मुखचंद्र, हेंच रुपडें दाखविलें तेणेंकरून ब्रह्मदेव, नारद, विश्वामित्र, परशरादिक वेडे झाले. पक्षीं जी आदिशक्तिमाया. तुकोबांनीं वरील पदांतच सुंदर वर्णन केलेलें आहे तें असें (असो ऐशी ती आदिशक्ति । तिची इच्छा या धरिली त्रिवर्तीं । तिसि कुणबीण म्हणती । पहा दूरवर ॥ गुरु० ॥ हिनें चैतन्य झांकिलें । अरुपासि रूप आणिलें । अनंत ब्रह्मांडिंचे पुतळे । नाचवी पहा रे! ॥ गुरु० ॥ निर्गुणासि गुण लाविले । निराकार आकारिलें । अनंतासि नाम ठेविलें । जीवित्वासि लाविलें पार ॥ गुरु० ॥ तुका म्हणे सावधान । परिसा मायेचें कारण । सप्त पाताळ या मायेनें । ग्रासिलें पाहा रे! ॥ गुरु० ॥) ८ विश्वरूपी शुभ्रपट (वस्त्र) त्यांत ओतप्रोत व्यापून असणारा चिद्रूप तंतु त्याचें मूळरूप कापूस (परमाणु, परस्वरूप किंवा अणुरूप आत्मा) त्या कापसाचा प्रथमतः तंतु; मग तंतूचें वस्त्र, त्या वस्त्रावर खळ लावून

देउनि केलें ज्ञान भग ॥ ९ ॥ पाषाणांत बहु झळाळी । पाहतां बुद्धिच ते आंधळी ॥१०॥ लोहासमान होय धातु । मध्यें दावी पिंवळी मातु ॥ ११ ॥ फाल्स समता होय पदार्थु । त्यांतहि दाविला बहु स्वार्थु ॥ १२ ॥ ४वेही

मग अनेक रंगांनीं चित्रित करून, (सोहिरोबांनीं या गारुड्यास अन्य ठिकाणीं, विश्व चित्राचा चितारी असें म्हटलेलें आहे.) त्यावर मनुष्य, पशु, पक्षी, पर्वत, वृक्ष व नद्या वगैरे सृष्टीचें दृश्य चित्र काढून, तो तशाप्रकारचा पडदा दाखऊनि ज्ञान भंग करून सोडलें. ह्मणजे तो विश्वपट आपलें मूळचें शुद्ध स्वरूप विसरून, रंगरूपाला भुलून प्रवृत्तिविषयक भ्रमांत पडला.

१ बुद्धिरूप पाषाण ह्मणजे (कांच किंवा गार नावांचा दगड यांजपासून बनविलेला आरसा; त्यांचा पृष्टभाग वास्तविक पाषाणवतच असतो; किंवा कांच व दगड हा पाषाणरूपच आहे; परंतु आंत त्याच्यांत बहु झळाली लखलखितपणा, तेज, किंचित पारदर्शकता ठेवली; परंतु आरशास स्वतः स्वरूपज्ञान मुळींच नसतें, ह्मणजे तो स्वतः जड [चैतन्यरहीत] असल्यामुळें आंधळाच असतो. त्यांत आपलें मुख पाहाणारा जो त्यास मात्र प्रतिबिंबाचें आणि त्यामुळें आपल्या मुखाचें ज्ञान होत असतें. यावरून बुद्धीला आंधळी असें ह्मटलें आहे. ही बुद्धि कूटस्थाच्या ठायीं कल्पित असून त्याच्या प्रकाशानें प्रकाशते. २ वास्तविक सुवर्ण ही धातु लोहासारखीच पण तींत पिंवळेपणा [मातु=आश्चर्यकारक तेज, नवल, मोहकता, सुशोभितपणा] दाखवून, प्राप्तिविषयक दृढतर इच्छाप्रवृत्तिरूप भुरळ घातली. लोह आणि सुवर्ण यांचें सादृश्य दर्शविलें तद्वतच. सुवर्ण व हिरण्यगर्भस्थ हेमबीज यांचें रहस्यार्थानें सादृश्य आहे. ३ फाल्स ह्मणजे कांचेचें बनावट मोतीं, तें होर्मिझ मोत्याच्या दाण्यासारखें चकचकीत दिसतें, पण त्याच्या स्वीकाराविषयीं बलवत्तर इच्छा होत नाहीं. परंतु हुबेहुब त्यासारखाच पदार्थ. [दृष्टीला एकसारखाच दिसणारा]. होर्मिझ मोतिदाणा; जो ह्या विश्वगारुड्याच्या साहाजिक इच्छाशक्तिप्रभावानें, आपोआप बनतो, तो स्वीकृत करण्याविषयीं मोठी स्वार्थबुद्धि ठेवलेली आहे. [पक्षीं खरें मोतीं व चिन्मय मोतीं नेत्रयुगुलांत असणारा मोतिबिंदु [चिन्मय मोतीं] त्यांत दिसणारी पुरुषाकृति (नेत्रांतील बाहुली) व आंतून पाहण्याचा [नामरूपात्मक विषय पाहण्याचा] अति स्वार्थ]. ४ याप्रकारचें हें नवल करून स्वतः आपण आपल्या आड होऊन [रीघुनि दावी जो पडिपाड असाही अन्यपाठ आहे. त्याचा संदर्भ मैत्रायणीब्राह्मणोपनिषदांतील श्रुतींत सांगितलेला ' सर्व प्रजांचा प्राणरूप सूर्य किंवा

नवल करुनि आड । होउनि दावी जो पडिपाड ॥ १३ ॥ ऐसा गारुडी जो न देखे । सोहिरा गारुड्यातें वोळखे ॥ १४ ॥

पद ११६ वें.

धन्य हा योग ! धन्य हा योग । देह टाकुनि सत्तासुखोंचि [शीं ?] हा भोग ॥ ध्रु० ॥ चित्रामाजी भिंती । असोनियां न दिसती [नसोनियां दिसती ?] । तैशी देख ज्योति दश्याकारें बा ! ॥ १ ॥ तरंगीं हा सागर ।

संवत्सर प्रजापति (अश्वरूप आत्मा) स्थिर करून ह्मणजे एकाबाजूस गुप्त राहून पडिपाड=ज्याला दुसरा पाड ह्मणजे उपमाच नाहीं, ह्मणजे त्या गारुड्यासारखा तोच एक गारुडी, असें नवल करून दाखवितो.]

१ निजरूप विस्मरण पावलेला जीव जो या गारुड्याचें दश्य गारूड प्रत्यक्ष पाहतो. गर्भात असणाऱ्या रेताला हात पाय डोकें असे नाना अंकुर फुटून शेवटीं तें चेतना पावतें, नंतर क्रमानें बाल्य यौवन आणि वार्धक्य या दशा मनुष्य अनुभवितो. आणि पाहणें, एकणें वास घेणें इत्यादि क्रिया करून आला तसा जातो यापेक्षां दुसरें गारूड तें कोणतें बरें ? पण या गारुड्याला मात्र (न देखे) पाहूं शकत नाहीं. पण जीवभाव समूळ नष्ट झालेला आहे ज्याचा असा हा सोहिरा, ह्या गारुड्याला पाहतो इतकेंच नव्हे, तर त्याला त्यानें पुरा ओळखलेला आहे. २ सत्ता=शुद्धसत्वगुणप्रधानमाया व सर्व शक्तिमान् ईश्वर [चैतन्य आत्मा] यांच्या संयोगजन्यसुखास (अव्यक्त सुखास) सत्तासुख असें ह्मटलेलें आहे. (रंगनाथानीं ह्मटलें आहे कीं=तो ज्ञानी । सत्तासुख जो मानी । चिद्रत्नाची खाणी । लावुनि ऐक्य निशाणी । रंगातीत निजरंगपदीं जो खेळे अचळ विमानीं । तो ज्ञानी ॥]. ३ तत्ववेत्ता (योगी) हा केवळ ब्रह्मच असल्यामुळें त्याला ईश्वरत्वही सहज येतें ह्मणून अर्थात् पूर्वोक्त सुखाचा भोग त्यास घडतोच. ४ अनेक चित्राकृतीनें रंगविलेली भिंत त्या रंगविलेल्या भागांत जशी अव्यक्त राहते (प्रत्यक्ष स्पष्ट दिसत नाहीं) किंवा ती चित्रित केलेली भिंत त्या चित्रित केलेल्या चित्रांत विरलेली (मुरलेली, झांकलेली) असल्यामुळें तन्मय झालेली भासते, पण वास्तविक त्या रंगरूपाकडे तिचा कांहीं संबंध नसतो, तद्वत् आत्मज्योति दश्य जगताकार भासते असा भाव. ५ समुद्रावर येणाऱ्या लाटांनीं समुद्र आच्छादित झालासें वाटतें किंवा मिठानें आगर आच्छादित केला आहे असें वाटते; तसेंच (ओगर=पक्वान्नें). अनेक पक्वानांनीं तांदुळाचें रूप आछादित केलेसें वाटतें.

कीं लवणी आगर । तांदुळीं ओगर । नानापरि बा ! ॥ २ ॥ घटीं मृत्तिका । पटीं तंतु एका । भज तेवीं सकळिका । आत्मरूपें बा ! ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे ऐशा बोधाची खूण । पावला तो जाण । योगिया ऐसा ॥४॥

पद ११७ वें.

दळण.

दळुं बाई दळु ! तोंवरीच गाऊं । दळण विसावे तें सुख सेवूं ॥ ध्रु० ॥
अभ्यासाचें जातें । विकार कणवट । दळुनि करूं पीठ । वासनेचें ॥ १ ॥
मनपवन दळणारी । बारा सोळा नारी । कारणाचे घरीं । पीठ न्हेवुं ॥ २ ॥
विवेकें पाणियें, शून्यांची पितळी । मळूनि करूं गोळी । ऐक्यत्वाची ॥३॥

---

१ त्याचप्रमाणें घटीं मृत्तिका. पटीं तंतु याप्रमाणें सर्वत्रीं आत्मरूपानें भज ह्मणजे हाच धन्य धन्य ! योग होय. २ दळण करीत असतां बायका साहजिक गाणें गात असतात त्यांत दळणाच्या प्रारंभीं 'दळुबाई दळु म्हणून' गीतास आरंभ होत असतो. ती कृति पाहून, सोहिरोबांसही स्फूर्ति झाली; व त्यांनीं परमार्थरूपानें, या पदांत दळणादि क्रिया दर्शविली आहे. दळण बंद झाल्यावर साहजिक काम आटपलें, श्रमव्याप बंद झाला, म्हणून बायकांस जो आनंद होत असतो, तें आनंदाचें सुख (पक्षीं=अव्यक्त सुख, निजसुख.) ३ योगाभ्यासाचें जातें त्याचें एक चक्र दम=हठयोग, वरचें चाक, फिरत राहाणारें; व दुसरें शम=राजयोग, खालीं स्थिर राहाणारें. ४ काम क्रोधादि साहा विकार किंवा [१ जायते=जन्मास येतो; २ अस्ति=आहे; ३ विवर्धते=वाढतो. ५ विपरिणमते=तारुण्यरूपानें विकास पावतो. ५ अपक्षीयते=वृद्ध होतो. ६ विनश्यति=नाश मृत्यु पावतो.] हे कण वासनेमुळे उत्पन्न झालेले म्हणून वासनेंचें पीठं करूं. ४ मन आणि प्राणवायु (मनुबाई हीच पवनचक्की.) ६ द्वादश आदित्याच्या बारा आकृति (पक्षीं योगशास्त्रोक्त अनुहात चक्राच्या बारा पाकळ्या आाण सोळा नारी म्हणजे चंद्राच्या षोडश कला किंवा विशुद्ध चक्र, कंठस्थानच्या षोडशमातृका, म्हणजे आत्मा प्रजापति ह्याच्या षोडशकला ह्या होत. ७ कारणदेह अविद्या (इच्छाशक्ति; सिद्धांतसंहिता उत्तरार्ध; चक्रकारिका पाहा). ८ पीठ मळायाला पाणी पाहिजे; तें विवेक हें पाणी (पक्षीं चित्त जल, चित्ताधिदेवता नारायण, जो विवेक्यांच्या विवेकीं. तेंच होय). ९ पीठ मळावयाला साधन, पितळी (ताट) पाहिजे तें शून्याकृति पितळी हें होय. (शून्य शब्दाचें स्पष्टिकरण पूर्वीं याच भागांत पृष्ठ १६ येथें केलेलें आहे.) १० जीव शिव ऐक्यत्वाची गोळी.

त्रिकूटचुलवणी । वैराग्याचा अग्नि । कल्पना इंधनीं । जाळ करूं ॥ ४ ॥ भक्तिचा हा तवा । निश्चयेशीं ठेवूं । साम्यते बसवूं । नीट ऐसा ॥ ५ ॥ व्यतिरेक गोळी । अन्वयेशीं चढवूं । अभेदाचे घडवूं । भाकरी हे ॥ ६ ॥ एकवेळ परतूं । सृष्टि नाहींपण । परतूनि मीपण । पुरतें भाजूं ॥ ७ ॥ काढोनियां ठेवूं । आनंदें निववूं । परेपरती सेवूं । लागों पुढें ॥ ८ ॥ सोहिरा म्हणे ऐशी । सेवितां भाकरी । नलगेचि चाकरी । करणें आतां ॥ ९ ॥

---

१ ब्रह्मांडांतील स्थूल देह, पक्षीं सगुण ॐकार यांत अकार; यांतील अग्नि आणि कल्पना हें सर्पण (लांकडें) करून. २ त्यावर भक्तीचा तवा ठेवून, दृढनिश्चय= (परमात्म्याचे ठायीं प्रीति). ३ चुलीवर तवा सारखा बसला पाहिजे; येथें चुलीचे पूर्वोक्त त्रिकुट (अ+उ+म) हे तीन धोंडे समभाग बसवून, त्यावर भक्ति हा तवा दृढनिश्चयपूर्वक समसाम्य [ह्मणजे जागृति स्वप्न, सुषुप्ति ह्या तिन्हीं अवस्थांत एकच जागृतीचा अनुभव येईल अशा रितीनें]. ४ व्यतिरेक व अन्वय याबद्दल पूर्वी व्याख्या दिलेली आहे. जेथें अन्वय व्यतिरेक असा भेद नाहीं अशी. ५ भाकरी एकवेळ परतावी लागते, त्याप्रमाणें एकवेळ परतूं, ती अशा रितीनें कीं, तिची एक बाजू म्हणजे विश्वसृष्टीच्या नाहींपणाचा भाग तो खालीं घालून, नंतर ती पुनः चुलींत पक्की करावी लागते, त्यावेळीं 'मीपण' पुरतेपणीं जाळून जाईल, अशा रितीनें भाजून काढूं, मग ती एकबाजूला काढून ठेवूं. कारण निवाल्यावांचून तिचा खाण्यांत उपयोग करतां येणार नाहीं म्हणून [शांत स्थितिमध्यें होणारा जो निजानंद त्यानें] निववूं (शांत करूं) ६ परेच्या पैलतीरीं जाऊन मग ती सेवन करूं. साधारणतः प्रवाशाचा क्रम असा असतो, कीं लांबचा प्रवास करावयाचा असला, म्हणजे बरोबर जो कांहीं भाकरी तुकडा घेतला असेल, तो जेथें नदी वगैरे सांपडेल, त्याच्या पैलतीरास पोंहोंचून, मग स्वस्थपणानें सेवन करावयाचा. मध्यंतरीं नदीचा अडथळा असला, म्हणजे नाव वगैरे मिळून पलीकडे जाऊन पोंचेपर्यंत, प्रवाशाचें चित्त शांत नसतें. पलीकडे पोंचल्यावर मग त्याला कांहीं भीति उरत नाहीं. ७ अन्य भाकरी चाकरी करून मिळवावी लागते. "चाकरी करावी भाकरी मागावी." अशी म्हण आहे पण या भाकरीच्या सेवनामुळें चाकरी करण्याचें प्रयोजनच उरत नाहीं; कारण लौकिकांत जसा धणी आणि चाकर हा भेद असतो, तसा या भाकरीच्या सेवनांत जीव चाकर, व ईश्वर धणी हा सेव्यसेवक भाव उरतच नाहीं; मग जेथें तसा भाव उरला नाहीं, तेथें चाकरी करावयाची ती कोणाची? चाकर, चाकरी, व धणी ही एकच होऊन बसलीं, तेथें कोणी कोणाची चाकरी करावी, व कोणी करून घ्यावी? हा भाव.

३ हिंदुस्थानी पदें.

पद १ लें.

तनकी सोबत दिलकी मोहबतें, जीवकी किल्लेदारी है। साचों बूरीं देखत जाने, मनकी जुमलेदारी है ॥ तनकी सोबत० ॥ध्रु० ॥ इंद्रिय ताफेमें हुजूर अम्मल, अपरचित्त राजी है। बिचमें धुंडत काम क्रोध और,

---

१ अन्नमयकोश; स्थूल देहाची संगत. २ मनाची. ३ प्रेम, प्रीति, ओशाळगतपणा, परतंत्रता. ४ स्थूल देह हा किल्ला दहा बुरुंजांनी [दशेंद्रियांनीं युक्त] असा किल्ला; ह्या किल्यावर जीव हा किल्लेदार असल्यामुळें, अशा त्या स्थूल देहाची सगत म्हणजे जीवाची किल्लेदारी आहे. [याविषयीं सोहिरोबाकृत पद्यसंग्रह भाग ३ रा यांतील बखर पहा.] ५ साच म्हणजे जें सत्य आहे तें. ६ बुरा=खोटें, असत्य देखत=प्रत्यक्ष+ज्यानें=जाणतो ७ हा जीव प्रत्यक्ष जाणतो कीं ही किल्लेदारी म्हणजे सर्व मनाची 'जुमलेदारी' आहे. जुमलेदारी म्हणजे जंगमादिक पदार्थ हालणारे, चालणारे, भ्रांति, मनोराज्य, स्वप्न, व स्मृति इत्यादि अवस्थांमध्यें भासणारे असे आहेत. जुमला हा शब्द वाडीप्रांतीं कागदोपत्रीं पदोपदीं वापरतात. गहाण किंवा विक्रित पत्र्यामध्यें "जमीनजुमला झाडझाडोरासह" असे शब्द लिहितात. ८ ताफा=समुदाय. इंद्रियांच्या समुदायामध्यें. ताफा म्हणण्याचा हेतु असा कीं ताफा म्हणजे नायकिणीचा संगीत साजिंदे. या इंद्रियांच्या समुदायामध्यें अहंकार हा मुख्य यजमान, विषय हे प्रेक्षकजन, बुद्धि ही नाचणारी कलावंतीण, इंद्रियें हीं तालमृदंग वाजवणारे. आणि त्या सर्वांस प्रकाशविणारा साक्षी हा दिवा इत्यादि समुदायसूचक हा शब्द आहे. ९ या समुदायामध्यें [हुजूर अम्मल] चिद्रूप आत्म्याची सत्ता [अपर चित्त] अपरा नामक अष्टधा निकृष्ट प्रकृति [भूमि, उदक, अग्नि, वायु, आकाश मन, बुद्धि आणि अहंकार अशी आठप्रकारें विभागलेली [भ० गी० अ० ७ श्लो० ४ पहा] राजी आहे म्हणजे तन्मय, व्याप्त होऊन राहिली आहे. १० आणि त्या प्रकृतींत [अंतःकरणवृत्तींत] असणारे जे काम, क्रोध, मोहादि रिपु [धुंडत=फिरत राहाणारे] ते जरी आपलें कार्य करीत आहेत, तरी ते [मुवाचि=मृतप्राय होऊन पडले आहेत अशा प्रतितीनें युक्त] प्रेतवत् मिथ्या आहेत असें जाणून [परचित्त=परा प्रकृतीनें युक्त असणारें चित्त] परा म्हणजे जीवरूपा उत्कृष्ट प्रकृति [विद्या] त्यांत राजी आहे=(आपल्याच निजसुखामध्यें) खुषी आहे. ही ज्ञानरूपा असल्यामुळें, तिच्या ज्ञानकलेस बाध आणण्यास अविद्या (अपरा) समर्थ नाहीं. व तिचें कार्य जगत् तेंही समर्थ नाहीं, कारण परा ही तत्त्वबोधानें युक्त असल्यामुळें, अविद्या व जगत् या दोहोंचाही तिच्याठिकाणीं लय होत असतो.

द्विरुक्ती

मोह, मुवाचि परचित्त राजी है ॥ तनकी० ॥ १ ॥ खाना पीना आना जाना दुनियांकों तो मिलना है । गैबिका जब हुकूम होंगा उस घडि हमकूं चलना है ॥ तनकी० ॥ २ ॥ करमका तो शीलुख झडना, नशीबसें यैहि लडतो है । हुयात पुरना तब तो जाने दो दिन मेरा गुत्ता है ॥ तनकी० ॥ ३ ॥ कहत सोहिरा गुरुगम्य ओहि, बात करे सो भला है । अलख पलखेमें खलक जायंगी रेहे न रेहे सो अल्ला है ॥ तनकी० ॥ ४ ॥

---

१ ह्या स्थूल देहाच्या संगतीनें [खाना, पीना=खावें, प्यावें.] प्रत्येक देहांत जन्मास आल्यावेळीं खावें प्यावें व देहसंरक्षण करावें. व याप्रमाणें [आना, जाना= जन्माला यावें व जावें म्हणजे उपजावें व मरावें] असें एक सतत रहाटगाडगें चालवीत जगताला मिळून असावें. प्रत्येक योनींत जन्म घ्यावयाचा आहे, व ज्या वेळीं गैबी (अनंतवाची काल) म्हणजे कार्यब्रह्म सूत्रात्मा हिरण्यगर्भ याचा हुकूम होईल त्याचक्षणीं जग सोडून जावयाचें आहे. २ पूर्वजन्मीं केलेलें संचित कर्म. ३ प्रारब्धानुरूप. ४ हें स्थूल देह. ५ प्रारब्ध कर्माचा क्षय होईपर्यंत हें देह त्याजबरोबर लढाई करीत असतें, म्हणजे संचित क्रियमाण आणि प्रारब्ध यांच्या अनुरोधानें क्रिया करीत असतें. ६ आयुष्याच्या आवधीपर्यंत माझा (मेरा) जीवाचा या देहाशीं वास्तविक संबंध आयुष्याच्या आवधीपर्यंत काय तो असतो; तोही नियमित ठरलेला, दोन दिवसांचा [गुत्ता=मक्ता, संबंध] म्हणजे जन्मास आलेला एक दिवस व जन्मांपासून मरेपर्यंतचा एक दिवस; किंवा ब्रह्मदेवाचा एक दिवस व एक रात्र मिळून दोन दिवसांत देहाचे अनेक फेरे होतात. ७ गुरूपासून प्राप्त झालेलें गुह्य ज्ञान मात्र सत्य आहे, व तदुक्त जें बोलणें [अनुभवगम्य] तेंच बोललें तर कल्याण आहे. वृथा बडबडण्यानें वाचेस शीण मात्र होतो. गुरुगम्य सत्य ज्ञानावांचून बाकी सर्व नाश पावणारें आहे [श्व० उ० अ० १ मं० १२ पहा]. असें पुढें सांगतात. ८ अलख=अलक्ष्य=अव्यक्त, त्याच्या; ९ पळांत, क्षणांत, निमीषान्मेष ह्मणजे डोळ्याची पापणी उघडण्यास व मिटण्यास जो काल लागतो त्या कालांत १० सर्व [दृश्य जग] प्राण्यादि सृष्टि. ११ नाहींशी होईल. १२ जें अव्यक्त बाकी कांहीं राहातें. १३ व जें जन्मून गत होतें तें. १४ पुरुष (ईश्वर) च होय. [पुरुष एवेद सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् । उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥ १५ ॥ श्वेताश्वतरोपनिषत् अ० ३ ॥ भावार्थः—(जें) हें सगळें जन्मलेलें जें जन्मून गत झालेलें, जें पुढें जन्मावयाचें, जें अन्नानें वाढतें त्याचा आणि अमरसृष्टीचा राजा पुरुषच].

पद २ रें.

येहि[1] हरदमके ऊपर झमके[2] गये गैबनाथ[3] ज्योति ॥ ध्रु० ॥ एक घडी मनकूं[4] देना । नयनमें ऑलेख[5] लेना । उनकेवास्ते[6] कायकुं होना पोथी ॥ यहि० ॥ १ ॥ उनका[7] ध्यान करत नहीं । दिलमें ग्यान रहत नहीं । और आपनें नशीब मोफत, दुनियां कायकुं रोती ॥ यहि० ॥ २ ॥ उनका मोल[8] नहीं माने । भरपूर भरावे[9] अस्मान । बिचमे खबे[10] [प?] गया दिनमान । काया शिंपी[11](?) मय हें मोतीं ॥ यहि० ॥३॥ सोहिरा कहे जोहां[12]-सों आवे । तहांमो[13] तो ऊर्ध्वे[14] [तूर्त] जावे । सहजसमाधी[15] पावे । साधु उन्मनिमें[16] सोती ॥ यहि० ॥ ४ ॥

---

१ ह्या एका मानवदेहधारी व्यक्तीवर. २ चमकून गेली. ३ गुरु गोरखनाथ-स्वरूप परात्पर पुरुषाची ज्योति. ४ त्याच्याठायीं (हृदयस्थाच्या आत्म्याच्या ठायीं एक घटकाभर मन द्यावें. ५ व त्याच्या प्रसादेंकरून नेत्रामध्यें अलक्ष मुद्रा धारण करावी (अलक्ष किंवा ऑलेख ही नाथपरंपरेची सांकेतिक मुद्रा आहे). ६ एवढ्याकरितां मोठेमाठ्या पोथ्या वाचण्याची काय गरज आहे. ७ त्या हृदयस्थाचें ध्यान करीत नाहींत, व मनांत ज्ञान ठरत नाहीं, आणि मग आपल्या नशिबाला दुनिया कां बरें रडते ? ८ त्याचें मोल करतां येत नाहीं; कारण मोल करायाला त्याच्या वजनाची किंवा किंमतीची दुसरी वस्तूच नाहीं. ९ तसेंच त्याचें अनुमानही करितां येत नाहीं. कारण तो निर्विकार आकाशाप्रमाणें ओतप्रोत व्यापून राहिलेला आहे. १० महदाकाशांत जसें दिनमान [सूर्यचंद्रादिकांच्या गतिमुळें होत असणारें कालमान खपून] [अनंताप्रत मिळून] जात आहे. ११ ह्या स्थूलदेहस्वरुप शिंपल्यांत असणारें मोतीं [चिन्मय मोतीं] महातेज. [औट-पीठाचिये तळीं । भ्रमरगुंफाचिया पाठारमाळीं । चिन्मय मोतीं ढळाळीं । महातेज ॥ १५ ॥ ज्ञानेश्वर, ज्ञानोपदेश,]. १२ ज्या ठिकाणाहून आला १३ त्या मूळच्या स्थानाप्रत पोंहचायाला होते. १४ ब्रह्मांडांत (ब्रह्मरंध्रांत.) (त्वरित) गमन होतें. १५ आणि सहजसमाधि [राजयोग] प्राप्त होता. १६ आणि मग साधु उन्मनिअवस्थेमध्यें सुखानें निद्रा करीत असतात.

पद ३ रें.

बैठा रे तो फकीरें आपने बंगलेमें बंगलेमें ॥ ध्रु० ॥ जिन्नें दंगा, इतना मंगा, जलें बिल गंगा गयीं बिहंगा । उड गयी अस्मानमें निर्गुनें जंगलमें ॥ बैठा रे० ॥ १ ॥ हार्ट छोडकर लगटें बाटका, घाट चढेंगा पवनें फाटकर ।

---

१ फकीर ह्मणजे प्रपंचरहीत [प्रकृतिविरहांत केवलत्वानें राहणारा गोंसावी, [जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवांण कांहीं ना तो गोंसावी । किंबहुना येकोपजीवी । एकमेकांची ॥ १० ॥ ज्ञानेश्वर, अमृतानुभव] परमपुरुष]. सर्वसंग परित्याग केलेला, परमहंस, तो. २ बंगला ह्मणजे स्थूलशरिरांतील योगशास्त्रोक्त द्विदल चक्रांतर्गत [अग्निचक्र, योनीचक्र, भृकुटिचक्र, बलवानचक्र, आज्ञ चक्र, श्री परमात्मा कोटिसूर्यवर्णचक्र इत्यादि नामानीं युक्त] अग्निचक्रबगला (ॐकार, कूटस्थ). याविषयीं सिद्धांतसंहिता उत्तरार्धांतील वतची चक्रकारिका, व पारमार्थिक पद्यसंग्रह भाग ३ रा यांतील [पद्य १ लें] बखर पहा.' त्या बंगल्यामध्यें बसलेला असा. ३ ज्यानें [इतना=एवढा] हा अवाढव्य विश्वोत्पतिरूप दंगा [जीव द्वैतरूप] मंगा=मागविला किंवा उत्पन्न करविला. ४ जलवाहक नदी. भवनदी अशी बिलगंगा, [श्वेताश्वतरोपनिषत् अ. १ मं. ५ पहा]. ५ गयी बिहंगा= विहंगमपक्षी=श्रोहंस; ललाटोर्ध्वभाग; योगशास्त्रोक्त ब्रह्मद्वारचक्राच्याठायीं श्री हंसाला [शिवानें या गंगेला मस्तकीं धारण केली आहे.] गयी=जाऊन मिळती झाली. ६ उड गयी=ऊर्ध्व गमन करिती झाली व [अस्मानसें=आकाशमार्गानें ॐकारावरून [ते ओंकाराचिये पाठीं । पाय देत उठाउठी । पश्यंतेचिये पाउटी । मागां घाली ॥ ३०३ ॥ पुढं तन्मात्रा अर्धवरा । आकाशाच्या अंतरां । भरती गमे सागरां । सरिता जेवीं ॥ ३०४ ॥ ज्ञानेश्वरी अ.]. ७ गुणरहीत जगल ह्मणजे वन; शून्यभुवन. ८ हाट=शक्तिचा बाजार छोडकर=सोडून; पक्षीं अणिमादि सिद्धि टाकून. [ज्ञानेश्वरी अ. ६ ओं. २९७ ती ३०० पहा]. ९ लगट= त्वरित पोहोंचण्याच्या (बाटका=) वाटेचा घाट ह्मणजे ॐकार; त्रिकुटगिरी, मेरू; [कुंडली चालन झाल्यानें ह्मणजे ती जागी होऊन तिनें प्राणाचा मार्ग खुला केल्यामुळें सुषुम्नेचा रस्ता, जसा एकादा कोष्टी किंवा कोळी नावांचा किडा आपण उत्पन्न केलेल्या तंतूवरून सहज जातो, तसा प्राणवायूला वर जाण्यास राजमार्गाप्रमाणें मार्ग अगदीं सुलभ होतो, असें याज्ञवल्क्यसंहितेंत सांगितलें आहे.] याप्रमाणें [घांट=चढेंगा] प्राणवायुचा घांट चढून जाईल. १० पवन=प्राणवायु; [फाटकर=तोडून] जेसा हंसपक्षी जाळें तोडून निःशंक आकाशांत संचार करितो, त्याप्रमाणें जीव प्राणवायुरूप ग्रंथीचा भेद करून तरून जातो. [ज्ञात्वा सुषुम्ना सद्भेदं कृत्वा वायुं च मध्यगम् । स्थित्वा सदैव संस्थानें प्राणरंध्र निरोध-

त्रिकुट श्रीहाट दोनों उलटकर; गोल्हाटमें ॥ बैठारे० ॥ २ ॥ ये[3] बिसमल्ला, रहिमान सुल्ला, हजरत मौला, जगत् जलाला, मत कर हीला अल्ला रखता नजरमें ॥ बै० ॥ ३ ॥ कहत सोहिरा, देखो अमीरा, मिले गौवांका दूध । दूध पिया और मगन हुवा, राव रंक नहि नजरमें ॥ बैठारे० ॥ ४ ॥

येत् ॥ १७ ॥ पवनो बध्यते येन मनस्तेनैव बध्यते । हेतुद्वयं तु चित्तस्य वासना च समीरणः ॥ २० ॥ तयोर्विनष्ट एकस्मिन्नुभावपिविनश्यतः । यत्रैव लीयते वायुर्मनस्तत्रैव लीयते ॥ २१ ॥ हटप्रदीपिकायां चतुर्थोध्याये आत्माराम-योगींद्रेणोक्तम्.]

१ त्रिकूट=स्थूलदेह; श्रीहाट=सूक्ष्मदेह; हें उलट कर म्हणजे दोनी देह टाकून. २ गोल्हाटमें=कारणदेहामध्यें. ३ ये=हाच. पुढें प्रणवस्वरूप अल्लाचे चार पादांचें दिग्दर्शन केलें आहे. व या पदाच्या ध्रुवपदांतील फकीर हाच प्रणवस्वरूप आहे असें दर्शविलें आहे, बांदेंगांवीं पूर्वी मुसलमान लोकांची वस्ती फार होती. हें शहर विजापूर सरकारच्या ताब्यांत असतांना एदिलाबाद या नावानें प्रसिद्ध होतें. मुसलमान मौलवी लोकांशीं सोहिरोबांचा बराच परिचय असे, व त्यामुळें महंमदी धर्माचीं तत्त्वें त्यांस बरीच अवगत झालीं होतीं. या चरणांत त्या धर्मांतील तत्त्वशाहदशानें; प्रणवाचे चार पाद दर्शविले आहेत ते असेः—बिसमल्ला=म्हणजे अभिमानी वैश्वानर हा प्रणवाचा प्रथम पाद; रहिमान सुल्ला=तैजस अभिमानी द्वितीय पाद; हजरत मौला=हजरत=खुदावंत+मौला=आनंदभोक्ता, आनंदमय, चेतोमुख, प्राज्ञ अभिमानी तृतीय पाद; जगत् जलाला=जगताला प्रकाशीत करणारा, जलाल=तेजोमय, सर्वेश्वर हा चतुर्थ पाद. याप्रमाणें ये या शब्दानें तोच प्रणव स्वरूप आहे असें दर्शविलें आहे. ४ मत कर=त्याग कर, लीन कर. हीला=अहंकार टाक [योगाभ्यासानें जसजसें अहंकाराचें विस्मरण होत जाईल तसतसें सूक्ष्म दृष्टीस निजानंदाचें अनुमान करितां येईल, असें विस्मरण होतां होतां अहंकार अगदींच सूक्ष्म होतो, तेव्हां साक्षात् ब्रह्मानंदाचा अनुभव होतो. ५ अल्ला=सकळ जग प्रकाशित करणारा स्रष्टा सूर्य त्यास तो फकीर आपल्या (नजरमें=) डोळ्यामध्यें (रखता=) ठेवतो. [अग्निर्मूर्द्धाचक्षुषी चंद्रसूर्यौ [श्रुति] चंद्रमामनसोजातश्चक्षोः सूर्यो अजायत ॥ पुरुष सूक्त ॥ अनादिमध्यान्तमनंतवार्यं । अनंतबाहुं शशिसूर्यनेत्रं ॥ भ० द्वा० ॥ दिशोभुजारविश्चक्षुर्वीर्यं शुक्रः प्रजापतिः ॥ भां० स्त० श्लो० ९९ ॥]. ६ सोहिरोबा म्हणतात अशा जो अमीर [परम समर्थ, सर्वशक्तिमान] फकीर त्याला (देखो) पहा; दर्शन घे. ७ त्या फकिरापाशी एक गौ=गाय [कामधेनु, त्रिपदा गायत्री, अमृतसंजीवनी, अमृतस्रवी अशा] आहे, तिचें त्याला नित्य दूध पिण्यास मिळतें. तें दूध पिऊन तल्लीन, तन्मय

पद ४ थें.

अजरामर[1] साहेब मेरा । मैं नमोज[2] करे (रूं?) हुकूम तेरा ॥ध्रु०॥ उनका नाम सुखें मैं गाऊं । तब संसारमें फेर न आवूं । दसवे द्वार[3]सदरपर जावूं । मुझमें[4] बैठ रहे दरबारा ॥ अजरामर० ॥ १ ॥ जो कोहि भक्त बच्चों[5] धेनू । जो कोहि मूं[6]बीन बजावत बेनू । जो कोहि तूर्या[7] बिराजत रेनुं[8] । मुदित मुदारा[9] ॥ अजरामर० ॥ २ ॥ जिन्नें मनपर मारा मेख[10] । ताकूं रूप नही बे रेख । सब दुनियांमें व्यापक एक । बडि दिलदारा अजरामर० ॥ ३ ॥ शू [छू ?] न्य भुवनमें गाजा[11] । आपहि मग्न रहे मनराजा । कहत सोहिरा बाजत बाजा । दिनशाम नगारा ॥ अजरामर० ॥४॥

पद ५ वें.

तुम[12] अच्छा हुक्का पीना ॥ ध्रु० ॥ अलख[13] तमाखू ग्यान अगनसें[14] । जलाकर[15] मायाधूर छोड देना ॥ तुम० ॥ १ ॥ ब्रह्मरंध्र[16]में त्रिकूट[17] चिलीम ।

होऊन समदृष्टि झालेला असा जो त्याच्या दृष्टीपुढे हा राजा आणि हा रंक असा भेद राहिलाच नाहीं. असा तो फकीर आहे.

१ जरामरणादि दुःखें ज्याला नाहींत असा. २ प्रार्थना. ३ ब्रह्मरंध्रद्वाराच्या सदरेवर. ४ त्या सदरेमध्यें. ५ भक्त हेंच वत्स त्या वत्साची धेनू ६ मुखावांचून मुरली वाजवितो. ७ अणुरेणुप्रमाण अतिकारण देहरूप तुर्या. ८ आनंदमय. ९ परम उदार. १० मन आजुबाजूला (संकल्पविकल्पादिकामध्यें) जाऊं नये म्हणून (मेख) खुंटी मारून ठेवणें, म्हणजे त्याचा लय करणें. ११ गर्जना करतो, ध्वनि, नाद करितो. १२ एका प्रसंगीं एक मनुष्य तंबाखू [गुडगुडी ओढीत] पीत बसला होता; ती कृति पाहून सोहिरोबा त्याला ह्या पदामध्यें अन्योक्तीनें उपदेश करितात कीं अरे बाबा ! तूं हा असला हुक्का कसला पीतोस ? तूं अविनाशी अक्षयी असा हुक्का पी. १३ अलख=अलक्ष=महाबिंदु, महाशून्यस्वरूप अव्यक्त चित्त हाच तमाखु. १४ तो ग्यान=ज्ञानस्वरूप+अगनसें=अग्नीनें. १५ जलाकर=जाळून टाकून, दग्ध करून माया हाच धूर मुखावाटे बाहेर सोडून द्यावा. (श्वे. उ. अ. २ मं. ९ व मं. ११ हे जिज्ञासूंनीं अवश्य पहावे). १६ योगशास्त्रोक्त सहस्रदलचक्रांतर्गत दहावें द्वार त्यामध्यें. १७ त्रिकूट=अ, उ, म; ह्या तीन मात्रांनीं युक्त प्रणव हेंच चिलीम—अमलानंदयोगी शतश्लोकीमध्यें म्हणतात (आरंभीं तीन अग्रात्मक प्रणव स्वयें वर्ततो स्थूलदेहीं) किंवा भोक्ता, भोग्य, भोग एद्रूप त्रिकूट अथवा परब्रह्म हेंच चिलीम.

प्राणअपानसें दमॅपरॅ दम लेना ॥ तुम० ॥ २ ॥ कहत सोहिरा संतसंग धरना । अहं मळसिं नैळी खलीलकर देना ॥ तुम० ॥ ३ ॥

पद ६ वें.

डरैमियां सब बिकार मियाँ दे दरसैंन परसन ॥ ध्रु० ॥ जायी अलख पलखकी जोग जुगतसें । तलक खलॅक बन जायी । त्रिकुटपारपर बैठे जोगी । अनाहत शिं [छिं?] गि बजायी ॥ डरमियां० ॥ १ ॥ अनुलोप पकरकर, आलाप करकर । विलॉप सबसें गाई। रंग ढंगका संग छोड दे, दीलॅ

---

१ प्राण आणि अपान ह्या दोन प्राणवायूंच्या योगानें. २ गुडगुडी ओढतेवेळीं दम=श्वास आकर्षण करून घ्यावा लागतो, त्या प्रमाणें दमावर दम मार (लेना=घे.) [श्वे० उ० अ० १ म० १४ पहा.] ३ गुडगुडीचा मध्य मेरू व [नली=] नळी यांत वारवार तमाखूचा मळ सांचतो; तो रोज साफ करून नळी वगैरे स्वच्छ ठेवावी लागते. येथें नळी म्हणजे सुषुम्ना धमनी ती मध्यें सांचणारी जी, अहंमली= अहंवृत्तिरूप मळी ती काढून स्वच्छ ठेवा; हा भाव. याच भावार्थाचें केशवस्वामीचें सुंदर पद येणेंप्रमाणें आहे [गुरुगोडी घेतली आम्ही । नित्य बैसोनि मंगलधामीं ॥ ध्रु० ॥ स्वात्मसुखाच्या नारळासी । धीर मेरु जोडिला त्यासी ॥ ॥ गुरु० ॥ १ ॥ भक्तिप्रेमाचें जीवन भरी । आंत वैराग्य भडभड करी ॥ गुरु० ॥ ॥ २ ॥ अकर्माचें चिलीम भरी । ज्ञानाग्नि ठेविला वरी ॥ गुरु० ॥ ३ ॥ स्वानुभवाची नळी जोडी । कल्पनेचा धूर सोडी ॥ गुरु० ॥ ४ ॥ द्वैत जाळुनि केली राख । केशवें गुरुगोडी घेतली देख ॥ गुरु० ॥ ५ ॥ ४ भिऊन गेलेला. ५ षड्भाव विकारांच्या योगानें. ६ हे सद्गुरू [थोर मनुष्या] ७ प्रसन्न होऊन दर्शन दे. ८ जायी=होत जात आहे. अलख=अलक्ष (अव्यक्ताच्या) पलखकी=एका क्षणाच्या निमिषोन्मेषांत योगयुक्तिमुळें, तलख—एकसारखी क्रमानें. ९ खलक=जगत् किंवा जीवसृष्टि बनली जाते. १० त्रिकुटाच्या घांटावर. ११ अनुहात नांवचा ध्वनि करणारी शिंगी. १२ मिथ्या भाषणाला आवरणें किंवा मौन स्वीकारणें. १३ सामवेद पूर्वक हां. सौं स्वरयुक्त आलाप घेऊन गाणें. १४ उत्तम गायन अथवा केवलकुंभक प्राणायामांत "एक चुटकी वाजविण्याच्या कालांची एक मात्रा अशा विविक्षेनें बाराच मात्रांचा काल होतो, त्याचप्रमाणें चौऱ्यायशीं विलापांच एक मध्यम प्राणायाम, आणि १२५ किंवा १२६ विलापांचा उत्तम प्राणायाम येथें ३६ मात्रा समजाव्या. विशेष माहिती, पातञ्जल योगशास्त्र अभिप्राय या पुस्तकाचें पान ७९ पाद: २ येथें पहा. १५ मन.

अंदमकुं मिलायीं ॥ डरमियां. ॥ २ ॥ शून्यें सागर नागैर हिंमेंत मछी होकर जायीं । कहत सोहिरा नकेल छोडकर । अर्केल बढीसों लिजायीं ॥ डरमियां० ॥ ३ ॥

पद ७ वें.

गगन कुवैंकुं चले पानियां मै ध्रु० ॥ नवद्वारकूं धुंडत धुंडत सुज्ञान गौळनि, गुनग्यान गोरसके मंथनि, मन पवन बिबेक लोनी बिकनेकूं, चलत है, त्रिकुटघाट गिरिगेंपट बाटकुं, उलट हाटेंसें खडी बदनेयां मै ॥ गगन० ॥ १ ॥ अनुहात मुरली बाजे, घन गाजे, गगन बनमें मगन मयोर, मन चित्त चकोर, चंद्र धरति जल दिन पवन गगनकी, मूरत सूरतैंबिन गैबें साहेब, खें रहते सब दुनियां पालनलालनलील, निरंजन. निर्गुन, राजे बिराजे कान्हैया मै[17] ॥ गगन० ॥ २ ॥ कहत सोहिरा, पवन बंदकर । फंद रहे सब मंद मद, महदानंद मुकुंद, नादबिंद कला ज्योति, आनंद आद समाध, लगी उन्मनि रेजनियां मैं ॥ गगन० ॥ ३ ॥

पद ८ वें.

नेहीं यही खुदा हुवे मेहरबान ॥ ध्रु० ॥ गगना जावे पवना जावे अगन जमीन जल जावे तीन्हों लोकके हेंकीम जावे नेबी रहे निर्बान ॥

---

१ आत्म्याला [मनाचा जो साक्षी, त्याला] २ शून्य हाच सागर त्यामध्यें ३ नागर=नगरोद्भव (विश्वरूप गाढ अंधःकारामध्यें) ४ धैर्यानें वास करणारी मच्छी=जीव मत्स्य होत्साता (पश्चीं मीनमार्ग धारण करणारा मत्स्य होत्साता) सुखानें वास्तव्य कर. ५ मिथ्या श्रम. ६ प्राज्ञबुद्धि (बढी=) बलवत्तर ती स्वीकृत कर. ७ गगनामधील विहिरीवर पश्चीं ब्रह्मरंध्रांत. ८ सु+ज्ञान=ज्ञानकलारूप गौळण. ९ तीन गुण आणि ज्ञान यांचें मंथन करणारी गौळण. १० गडद अंधःकारयुक्त (तमयुक्त) वाटेनें. ११ औहाट मार्गानें. १२ अंतर्मुख [बदनया] होत्साती खडी= (स्थिर) झाली. १३ नामरूपाविरहीत. १४ परात्पर गुरुरूप साहेब. १५ गगन सदृश परमात्मस्वरूप. १६ श्रीकृष्णभगवानजी. १७ मी त्याच्या संनिध खडी असणारी गौळण. १८ उन्मनिस्वरूप योगरूप रात्रीमध्यें. १९, हा परमेश्वर कृपाळू होत नाहीं. या परमेश्वराविना, बाकी, ' गगन, वायु, अग्नि, जमीन हीं सर्व [जलजावे] नाश पावतील. ' २० तीन लोकांचे तीन हकीम (मालक) ब्रह्मा, विष्णु, महेश हेही नाश पावतील. २१ अनंत आत्मा (निर्वाण) शेवटीं राहील.

नहिं यहि० ॥ १ ॥ कहत सोहिरा बनोया जीव जवा[1] हवाके लाल[2] । दर-
वेश हुवा दिल[3] बाव बंधके, उलटे[4] जोग जवान ॥ नहि यहि ॥ २ ॥

पद[5] ९ वें.

हजरत[6]नें दरसन[7] दीया । बडी बात बनाई[8] कीया ॥ ध्रु० ॥ कालकालमों[9] बोल[10] भरमके हालहाल[11] कीये, लाले[12] अलालकों बीज मेहालको[13] अंजी[14] अजमकूं न जात, तदबिर[15] देखे[16] दिदार[17] मुदार मनोहर, रूप रेख बिन देखकर चकित तेजसें[18] हुवा, तो आँखियां[19] जैसो तो च (झ?) किया, थकित

---

१ जीव आणि (हवा)=प्राणवायु यांचा जवा म्हणजे सांधा पतद्रूर बनविलेला २ लाल=प्राणाचा प्रीय. ३ मन हेंच व्याघ्र, त्याचें बंधन करून आपण दरवेशी बनला ४ अशा प्रकारचा बलवान उलटा योग करणारा परम समर्थ योगी कृपाळू होत नाहीं हें या पदांतलें तात्पर्य. ५ या पदांत असें दर्शविलें आहे कीं, इंद्रियनिग्रहरूप मोठा दम प्याल्यानें (शेवटीं " बडा दम पीया " असें म्हटलें आहे त्याप्रमाणें) विश्वरूपदर्शन साक्षात्कार होऊन, त्यामुळें होणारी अद्भुत कृति वर्णन केलेली आहे. व विश्व-रूपदर्शन म्हणजे काय व त्या विश्वरूपामध्यें भासणारी अद्भूत पंचीकरण कृति थोडक्यांत दर्शविलेली आहे. ६ योगेश्वरानें (अनंतरूप परमात्म्या विष्णूनें). ७ विश्वरूपदर्शन [भ० द्गी० अ० ११. श्लो० ४७ पहा.] ८ भयचकीत होऊन गोंधळून जाण्याजोगी घोर कृति (बनावट केलेली) [भ० द्गी० अ० ११. श्लो० ४९ पहा.] ९ युगायुगाचे ठायीं किंवा भूत, भविष्य, वर्तमान या कालां-मध्यें. १० भ्रमयुक्त जडदृष्टीनें पाहणाराला मात्र दिसणारें " बालरूप " राम-कृष्णादि अवताररूप] घेऊन. ११ दुष्ट जनांचा (दैत्यकौरवादि कुळांचा) [हाल हाल कीये]=नाश केला (भ० द्गी० अ० ४ श्लोक ८ पहा.) १२ लाल=लाल-रंगाची व अ+लाल रंगाची नव्हे अशी म्हणजे पांढऱ्या आणि काळ्या रंगाची रंगाची अशी अजा तिजपासून पुष्कळ प्रकारची प्रजा उत्पन्न करण्यासाठीं; तिला [श्वेताश्वतरोपनिषत् अ. ४ म. ५ पहा]. १३ गोकुलवृंदावन हाच एक महाल त्यामध्यें [पक्षीं=गो=इंद्रियें त्यांचे कुल समुदाय]. १४ पूर्वोक्त अजा (जिला जन्म नाहीं अशी) जी तिला आणि (अमलकूं=जो पुरुष) अज त्याला, नेन जात=याती किंवा कुल नाहीं अशी. १५ तदबीर=हिकमत, विज्ञान, कला. १६ पहा. १७ दिदार=दर्शन, मुदार=विश्वरूप. १८ महान् तेजोमय स्वरूप मुळें [भ. द्गी. अ. ११ मं. ४५ पहा]. १९ डोळे [तेजोमय रूप पाहून डोळे त-टस्थ होऊन गेले].

रहे, जैसो चंद्रेपर[1] प्रेम शरदेका[2], दरद[3] पीवा, तब[4] ब्रह्मीं हुवा आनंद[5] कॉदिल, मंद[6]का दिवा मंदकर[7], हृदी[8]भुवनमें ज्योत जो[9]गती जुगतजुगु[10]तसें मगते[11] मगत हैयाद[12] [त?] हुजुर[13]की, दया नजर[14]की जरदे[15]स्त सब फौज पवन[16]की, मौज मगन[17]की रहन[18] गगन[19]की, संलग्न[20] लगनसें[21], लगी, सुरतपर[22] नंगी[23] मुरतसें विराजमान्य [न?] सें, ललित[24] ललना[25] नटत नटत बिराजे बहुत भेख[26] धर, पवन[27] रसित[28] सुरत[29] धारा[30] व्यापक ठा [था?] रा

---

१ चद्रं+पर=चंद्रावर. २ शरद्‌ऋतूचें [शरत्काळीं चंद्राचे ठायीं अपरमीत तेज उत्पन्न होतें]. ३ चंद्रका=चंद्रापासून उत्पन्न होणारें [दरद=] अमृत [पीवा] पीवविलें, तेव्हां [किंवा ॐकाररूप अक्षर अमृत. "चंद्रापासून उत्पन्न होणारें अमृत अग्निमुखानें देव शुक्लपक्षांत पितात ह्मणून त्याला क्षयवृद्धि आहे.] देवात्मप्राप्ति आणि अमृताशन यांचीं संवादवचनें छांदोग्य श्रुतीमध्यें तृतीयाध्यायांत पुष्कळ आहेत तीं तेथें जिज्ञासूंनीं पहावीं. ४ त्यावेळीं [अमृत ह्मणजे ब्रह्मात्त्वभाव पावल्यावेळीं]. ५ दिल=अंतःकरण तें ब्रह्माच्या ठायीं [ब्रह्मीं] तादात्म्यरूप असणारा जो आनंदमय ईश तद्रूप (हुवा) होतें झालें. ६ आत्मज्ञानाला प्रतिबंधक असा जो अहंकार [हृदय दिवा]. ७ मंदकर=लीन करून, मालवून. ८ हृदय भुवनाच्या ठायीं. ९ जागृत असणारी ' अहं ब्रह्मास्मि ' स्वरूप आत्मज्योति. (स्फूर्ति) अशा ब्रह्मसाक्षात्कारद्वारा ब्रह्मात्मभाव पावतो ह्मणजे ब्रह्मरूप होतो. १० युक्तियुक्तीनें [योगयुक्तीनें]. ११ पुनः पुनः मागणें करून, प्रार्थना करून. १२ चीरंजीवपद, अमरत्व. १३ ब्रह्मादिपेक्षां श्रेष्ठ असा जो देवाधिदेव अनंत त्याची दया. १४ कृपादृष्टीची. १५ जर्जर झालेली अशी. १६ पवनाची सेना ह्मणजे प्राणवायूची फौज [रथांगाचा मेळावा। जेवीं रथ ह्मणजे पांडवा । कां अधोर्ध्व अवयवां । नाम देह ॥ १५१ ॥ करितुरंगसमाजें । सेना नाम निपजे । कां वाक्यें ह्मणिपती पुंजे । अक्षरांचे ॥ १५२ ॥ [ज्ञानेश्वरी अ. १३]. १७ तल्लीन, तन्मयस्वरूपाची. १८ स्थिरता. १९ महदाकाशाची. २० ऐक्य. २१ पुरुषाचें प्रकृतीशीं ऐक्य होणें (लग्न होणें). २२ उपरति—ज्ञानस्वरूपा जी पराप्रकृति तिच्याशीं. २३ केवळ नग्न अशा गोसांव्या बरोबर [मुरतसें=दिगंबर मूर्तिबरोबर, विश्वामध्यें विराजमान झालेल्या मूर्तीशीं]. २४ सुंदर. २५ स्त्री, प्रकृति. २६ पुष्कळ प्रकारचा पोषाख करणारी, नटणारी विश्वमाया. २७ प्राणवायुरूप. २८ कादंबिनी, मेघमाला. २९ स्वतंत्र, स्वच्छंद, प्रधान प्रकृति. ३० पूर्वोक्त मेघधारा वर्षाव करणारी (धारा) अशी जी प्रधान प्रकृति तिला (व्यापक=) व्यापून असणारा.

है बिरोना [विश्णा ?] नादेबिंदसें आद पुराना, आगम निगमसें पुकार पुराना, अनुहार्त [अनाहत ?] डंका बाजत राजा निर्गुन निरामया ॥ हजरतनें द० ॥ १ ॥ कहत सोहिरा निराकारेसों ॐकार, अर्धाक्ष (छैं ?) रसें मकारें उकार अकारसें भूतपसारा सारा, क्रीयो ग्यानशक्तिसें बिन्छाशक्ति अव्वलसें तो पैदा गगना, अंतःकरना ब्याना श्रवणा बाच्या शब्दसें ऊपर पवना, मन समाना त्वचा पानी स्पर्शन होना, बुद्धि उदाना नैना चरना रूप विषयमो देखो दहनी, चित्तसें प्राना रछें [स?] ना, छैं छ नार छैरंगसें एको जीवना, अहं घ्राना अपाना । बाहना गुद गंध धरत्रीकूं दिखना,

---

१ बिराना [विरिणा]=शून्य, निराश्रय. २ नादबिंदु यांनीं युक्त, प्रणवस्वरूप. ३ आद्य [पुराना=] जुनाट. ४ आगम=शास्त्रें-निगम=वेद यांनीं. ५ पुकार=स्तुतिवाद गाइलेला (पुराना=) पुराणांनीही गाइलेला. ६ अनुहात नांवाच्या ध्वनीचा, ' डंका '=गजर; आहे ज्याचा असा राजा. ७ गुणरहीत निस्त्रैगुण्य. ८ निरुपाधि, व्याधिरहीत, ब्रह्मस्वरूप. ९ त्या निर्गुण निराकार अक्षर ब्रह्मापासून ॐकार उद्भवला. १० त्या प्रणवांतील अर्धें अक्षर अर्ध मात्रा ॅ तिच्यापासून. ११ अ, उ, म ह्या तीन मात्रांनीं युक्त अशा प्रणवापासून. १२ आकाशादि सर्वभूत जात (पसारा) विस्तार झाला. १३ तशाच, इच्छाशक्ति; क्रियाशक्ति, ज्ञानशक्ति ह्या तीन शक्ति उत्पन्न झाल्या, व त्यांपासून. १४ अव्वलसें=पहिल्या प्रथम (पैदा) गगनाची उत्पत्ति झाली. १५ पुढें सर्व भूतांचे सत्त्वांश मिळून अंतःकरण बनलें, व वृत्तिभेदानें या अंतःकरणाचींच मन व बुद्धि अशीं दोन रूपें बनलीं. यापुढें सर्व पंचीकरणकृति दर्शविली आहे, त्याबद्दल ' पंचदशी तत्त्वविवेक' प्रकरण जिज्ञासूंनीं पहावें. १६ वायूला. १७ हस्तेंद्रिय. १८ अग्नी. १९ जिव्हेंद्रिय. २० पांच सूक्ष्मभूतें आणि महत्तत्त्व मिळून सहा प्रकार याचेच पुनः पंचीकरण कृतीनें ' पांच स्थूलभूतें आणि बुद्धि '. मिळून झालेले सहा प्रकार, किंवा पंचतन्मात्रें व बुद्ध मिळून सहा एकूण सहा गुणिले सहा बरोबर सहाछकें छत्तीस; मिळून छत्तीस तत्त्वांनीं युक्त अशी बनलेली नार क्षेत्रसंज्ञक प्रकृति (नारें ह्मणजे तत्त्वें यांनीं युक्त अशी) या छत्तीस तत्त्वांबद्दल ' ज्ञानेश्वरी अध्याय तेरा येथें विवरण केलें आहे तें पहा. २१ मूळ सूक्ष्म जें सहा रंग किंवा प्रकार त्या रंगांत एकच असणारें जीवनरूप एकच (पाणी उन्मनि) स्वरूप असा. २२ अपान वायुयुक्त अहंकार. २३ प्राणेंद्रियाच्या योगानें (बाहणें) श्वासोच्छवास करणें. २४ पृथ्वीला. २५ पहावें.

स्थूलको घर सूक्ष्मेका[2] [सूछमका?] रहना[3], पंचपंचेंको[4] पचा(ची?)स होना, एकोमेकोंसें[5] खिलना मिलना, मदत्त अर्दतसें आदबें रहना, तनकी रहना माल्लुम नहिं कछु साच रेंशीपर[9] साप होना, भूल अंजबका[10] पाक पकाना[11], । छोये छेटेकूं रसोय[13] देना, झूटाखाना[14] मुल्लुखमें[15] तो मुटकर जाना,

---

१ स्थूल देह हेंच घर. २ त्या घरांत लिंगदेहाचें वास्तव्य. ३ जड स्थूल देहाचा चालक लिंगदेह (सूक्ष्मदेह) आहे. तो वासनामय असल्यामुळें; जीर्ण झालेलें घर टाकून पुनः प्रयाणकाळीं वासनेसह जातो, व पुनः पिशाचपितरादि योनिमध्यें भटकत राहून पुनः एकादें नवें घर (स्थूलदेह) धारण करितो. या रितीनें त्याचें (रहना=राहाट घाट) राहणें, जन्ममरणरूप संसार चालत असतो. ४ अंतःकरणपंचक, प्राणपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, कर्मेंद्रियपंचक, विषयपंचक मिळून काम्य कर्म तम. हे अष्टपुरींचे विकार मिळोन लिंगदेह होतो. म्हणजे पंचभूतांपासून हे पंचवीस [पचीस] प्रकार उत्पन्न होतात. ५ या विकारांचे परस्पराशीं मिळून राहणें. ६ परस्परांस मदत करण्याचा इंद्रियाचा स्वाहजिक स्वभाव. ७ परस्परांच्या मुखतीनें ओशाळगत असणें, म्हणजे आपापल्या विषयाच्या ठायीं त्या त्या विषयांस महत्त्व देऊन असणें. ८ परंतु ह्या स्थूल देहाचें राहणें (अस्तित्व) असेपर्यंतच या इंद्रियांच्या चेष्टा चालतात; पण त्या देहाचें अस्तित्व कोठवर आहे? याचें ज्ञान त्या जड इंद्रियांस नाहीं. (कठोपनिषत् व० २ म० २४ पहा.) ९ वास्तविक दोरीवर जसा सर्पाचा भास व्हावा तद्वत् हें देहरूप कार्य म्हणजे केवळ भ्रम होय. १० परमाश्चर्यकारक पाक म्हणजे अन्न शिजविणें. ११ अग्न्यादिकांच्या साह्यानें पक्व करणें (बृहदारण्यकोपनिषत् ब्रा० ५ वें यांत सांगितले आहे कीं " सृष्टीच्या पित्यानें ज्ञान आणि तप (कर्म) याच्या साह्यानें सात प्रकारचीं अन्नें निर्माण केलीं. हीं अन्नें सर्वदां भक्षिलीं जात असून त्याचा क्षय होत नाहीं. याचें कारण पुरुष स्वतः कदापि क्षय न पावणारा आहे. तो हीं अन्नें पुनः पुनः (अजबका पाक पकाना) निर्माण करीत असतो. त्यानें जर तें कर्माच्या योगानें केलें नहीं, तर क्षय पावेल. १२ छायेमध्यें जो पुरुष असतो त्याची छटा म्हणजे आकृति. [बृ० उ० अ० २ ब्रा० १ मं० १२ पहा.] अशा त्या पुरुषदेहापासून पडलेल्या सावलीची बनलेली आकृति [छटा] असा जो अन्नमय स्थूलदेह त्याला. १३ रसोय=उदरपूर्तीसाठीं, अग्न्यादिकांच्या साह्यानें अन्न शिजवून भक्षणार्थ तयार करणें किंवा [भ० गी० अ० १५ श्लो० १४] या प्रकारची रसोय, कबिरांनीं म्हटलें आहे कीं, [यारों पेट बडा बांका । सबकूं लगा दिया ठोका ॥ तैत्ति० उ० ब्र० व० २ अनुवाक २ रा. पहा. १४ हा अन्नमय देह म्हणजे [झूटा खाना]

स्थेलें[1]स्थलकी पवनाकि सेना, ज्यांहांसुं आयाँ[2] उसपर जाना, देखत हमकूं क्याँ[3]? सब होना, महांकारनें[4] उनकूं पछाना, चारों[5] (हीं?) खानींका रखतखाना[6], स्थिरअचर[7] कोहि स्थावर[8] जंगम बहुत बल्लीकों[9] बसंत महंत अंतकंका[10]; चिदांग[11] पछिमें[12]पंथपर मत्त ग्यानसें[13] दत्त ध्यानसें[14], फक्त फकीरकों[15] तख्त निरंजनें[16] भक्त बडाँ[17] दम पीया। हजरतनें दरसन दीया ॥ २ ॥

मिथ्या आहे. व्रीह्यादिक हें मनुष्याकरितां केलेलें अन्न, व पशूकरितां केलेलें हीं अन्नें [झूटा खाना=खोटा भटारखाना] नाशवंत होत; हा भाव. १५ ह्या मृत्युलोकामध्यें (मुलुखमें=मुलुखामध्यें). ज्ञानोबांनीं म्हटलें आहे कीं, [कांट्याच्या अणुवर वसले तीन गांव। दोन ओसाड एक वसेचिना वसेचिना हाच मृत्युलोक होय.]

१ जागजागीं असणारी प्राणवायूची फौज [बृहदारण्यकोपनिषत् अ० २ ब्रा० ५ मं० १९ पहा.] २ ज्या ठिकाणांहून आला त्या ठिकाणींच पुनः जावयाचें आहे. ३ हें सर्व विश्वरूपदर्शन साक्षात्कारद्वारें प्रत्यक्ष पाहत असतां, त्याचा अंगिकार कसा करीन ? [देखत हमकूं क्या सब होना ? म्हणजे स्थूल, सूक्ष्म कारण या तीन देहांची मला काय जरूर आहे ? ४ चौथा देह जो महाकारण, यालाच (उनकुं पछाना) मला जाणलें पाहिजे. ५ चार खाणी म्हणजे जरायूज, स्वेदज, अंडज, उद्भिज्ज, (याबद्दल सिद्धांतसंहिता अ० १ पृ० ९ येथें टीप आहे ती पहा) ६ रक्तमय स्थूलदेह मनुष्यपश्वादिकांच्या स्थूलदेहांत असणारें रक्त हेंच जीवित्व होय. तें रक्त अन्नाच्या पचनद्वारें बनविण्याचा कारखाना उदरस्थ वैश्वानर अग्नाचा व्यापार. ७ पर्वतशिखरासारखें स्थिर असणारें व नाशरहीत चैतन्य. ८ स्थावर=पृथ्व्यादिक-जंगम=हालचाल करणारे प्राणी, पश्वादिक. ९ स्थिर अचर (अक्षर) असा (कोहि) कोणि एक स्थावरजंगमात्मक ‘ अनंत ’ वल्लींचा (वनस्पतींचा किंवा वल्ली म्हणजे परमहंस विवेकी यांचा) वसंत (वसंतऋतूमध्यें सर्व वनस्पति विश्व प्रफुल्लित होतें) किंवा सर्व विवेक्यांचा विवेकी. १० काळाचाही नियंता, शास्ता. ११ चित्+अंग=चिद्रूप पर्वत (मेरू, कूटस्थ). १२ पश्चिममार्गावर (सुषुम्नामार्गावर). १३ ज्ञानानें माजलेला. १४ परात्पर गुरु दत्त यांच्या ध्यानयोगेंकरून किंवा सद्गुरूनें दिलेल्या (दाखविलेल्या) ध्यानयोगेंकरून. १५ फक्त=(केवळ अद्वैत चैतन्यरूपानें असणारा) फकीर=गोसावी, परमहंस, परमपुरुष जो त्याचें. १६ मायारहीत एकांत स्थान आदिपीठ (औटपीठ) त्यावर आरूढ असलेला. १७ त्याचा भक्त (पक्षी हा सोहिरोबानाथ) दम म्हणजे शब्दादि विषयांपासून श्रोत्रादि इंद्रियें आवरून अंतर्मुख करणें या प्रकारचा (बडा=महान) दम प्यालों..

पद १० वें.

हजरैत प्यारे खुदा हमारे, क्या करेंगी हाल ॥ ध्रु० ॥ अस्मान जमिन-पर कछु नहिं देखो, नयनमें नयम उजाल ॥ हजरत० ॥ १ ॥ मीठा लगत है झूटा बे तनका, कायकुं बनाया महाल । हिरंका लगावे इस्के ऊपर, कब क्या जानों लि जावे काल ॥ हजरत० ॥ २ ॥ पगें पंजा शिर पैदा कीये, कायकुं उठाया बाल । दरद दिये तो बढे बढेकूं, कोहि पावेगा

---

१ हे प्रियकर महाराजा (खुदा=)परमेश्वरा, मला हा नरदेह देऊन माझे हाल कां बरें केलेस? २ अस्मान=आकाश व जमीन=पृथ्वी पक्षीं ब्रह्मांड व पिंड यांमध्यें वास्तविक असें आम्ही कांहीं पहात नाहीं. आमच्या डोळ्यांनी (दृश्य विश्व) पाहतों, त्या डोळ्यांत (नयनमें) नयन उजाल=तुझ्याच डोळ्याचा (सूर्याचा) उजाल=प्रकाश आहे; म्हणजे डोळ्यामध्यें वास्तविक जें द्रष्टृत्व तें तुझेंच आहे, कारण वास्तविक पाहाणारा द्रष्टा तूंच आहेस; परंतु तूं जो द्रष्टा तो ह्या आमच्या दृष्टांनें दिसत नाहींस, म्हणजे त्याचें ज्ञान आम्हाला होत नाहीं. जसें सूर्याकडे पाहिलें असतां आमचे डोळे दिपून जातात, टक लावून पहवत नाहीं व पृथ्वीवर पाहतों तें मृगजळवत् पाहतों. हा भाव. केशवस्वामी एका पदांत म्हणतात:—(सहज मी आंधळा गा! कांहीं न देखें डोळां । आपेंआप संचलेंसे निजस्वानंद कीळा ॥ ध्रु० ॥ मुळिंचा मी आंधळा गा । दृष्टि न देखों कांहीं । द्रष्टृपण कैंचें मज दर्शनासि ठाव नाहीं । एकाएकी एकला मी सुखस्वरूप पाहीं । याती कूळ वर्ण धर्म न स्पर्शे माझ्या ठायीं ॥ स० ॥ १ ॥) पुढें मुळांत पहा. काव्यसंग्रह ग्रंथमाला १३ पदसंग्रह भा० १] [बृ० उ० अ० ३ ब्रा० ४ पहा.] ३ हा खोटा पण फार प्रीय वाटणारा असा [तनका=स्थूल देहरूप तनूचा 'क्या कुं= कशासाठीं +] महाल कशाला घनविलास बरें? ४ ह्या देहावर काळ केव्हां झडप घालील त्याचा नेम नाहीं! काळ हा देह केव्हां घेऊन जाईल हें कळत नाहीं! ५ पग=पाय+पंजा=हाताचे पंजे+शिर अशीं ह्या देहाला पैदा=उत्पन्न केलींस, व त्या देहावर (क्याकुं उठाया बाल) केंस उत्पन्न केलेस ते कशाला? ६ दरद दिये०= मोठमोठे शंकर,ब्रह्मदेव, नारद, पराशर, विश्वमित्रासारखे यांनाही तुझ्या मायेनें दुःख देण्यास सोडलें नाहीं. मग अशा देवादिकानांही जर अशा प्रकारें दुःख दिलेंस (तर कोइ पावेंगा न्हथाल) तर ह्या मनुष्यजन्मांत कोण जय पावणार आहे? "न्ह्याल" हा शब्द वार्डाप्रांतींही फार प्रचारांत आहे.

न्हाल ॥ हजरत० ॥ ३ ॥ पेटके अंदर अगन किया तुम, भरभर कितना काल । एक बखत भरपूर किया तब, फेरफेर हुवे खाल ॥ हजरत प्यारे० ॥ ४ ॥ अजबे तुह्मारा गोष [घोष ?] रगतका बंद किया बेनाल । भरे जोवनमें अछा लगत है बढे जोरुके ख्याल ॥ हजरत प्यारे० ॥ ५ ॥ कहत सोहिरा पीछे लगा दिया, कायकुं सब जंजाल । बैठ न जाती नजर न तुमपर दील न होंगी लाल ॥ हजरत प्यारे० ॥ ६ ॥

पद ११ वें.

इंद्रियसें निकलगया, मगन हुवा मन ॥ ध्रु० ॥ रूपरेख नहीं उनकूं मिले निरंजन ॥ १ ॥ अनुभव हाटका बनियां, सब दुनियांका लालन ॥ २ ॥ उनकी चर्या बढी तुर्या, औरतसें खेलन ॥ ३ ॥ कहत सोहिरा जटील, उनका महील योग गहन [गगन] ॥ ४ ॥

पद १२ वें.

दिया बे तो दिल दान, फकीरा दिया बे तो दिलदान । लगी तो

१ तू पोटामध्यें (अगन किया) वैश्वानर नावाचा अग्नि उत्पन्न केलास. त्यामुळें खाल्लेले अन्न खाक होऊन जातें (भरभर कितना काल) वारवार कितीवेळां ह्मणून हें भरून काढावें ? एकवेळ भरपूर केलें तरी पुनः पुनः (खाल=खाली) रिकामें होतेंच. २ तुझ्या करामतीचें मोठें आश्चर्य आहे कीः—' घोष=मांस, व रक्त यांचा ह्मणजे ही आंत भरून बंद केलेला असा हा देह (बे=जसा) जसा नारळ आंत खोबरें पाणी वगैरे घालून बंद केलेला असतो तसा. नारळास वाडीप्रांतीं "नाळ" असें ह्मणतात. ३ भर अमदानीमध्यें (तारुण्याच्या भरांत) तरुण स्त्रियांचे ख्याल (विलास, हावभाव) फार आवडतात. ४ सोहिराबा ह्मणतात. हा देह उत्पन्न करून हा अशा प्रकारचा सर्व जंजाळ (उपद्व्याप, खटाटोप) मागें कशाला लाऊन दिलास ? त्यामुळें तुझ्याकडे आमची दृष्टी पोंचत नाहीं, आणि तुझ्या ठिकाणीं मन (लाल=) प्रेमभरित, तन्मय होत नाहीं. ५ तन्मय. ६ नामरूप व आकार नाहीं असा जो मायारहीत त्याला. ७ अनुभव बाजारांतला व्यापारी. ८ सर्व दुनियेचा (विश्वाचा) प्रतिपाळ करणारा. ९ चालचलणूक, वृत्ति. १० प्रकाश, तेज. ११ गगन किंवा अघटितघटनासामर्थ्ययोग हाच ज्याचा महाल. १२ हे फकीरा (हे सद्गुरु परमहंसा) हें दिल=अंतःकरण किंवा मन तुला दान दिल ह्मणजे अर्पण केलें. निखालस मनाचा लय केला हें द्विरुक्तीनें सांगतल आहे.

लगन गगेन बनमें, मगनमें मस्तान ॥ ध्रु० ॥ नाद नहीं, और ज्योति कला अकेला । तखियामें बैठे तो गर्क भये प्यारे जहां वहां करे गुजरान ॥ १ ॥ अलखेंमें दोनों गये तो पलख खपगया खलक । हकीम बीनसों [तो?] हुकुम क्या करे? मुरत है सुलतान ॥ २ ॥ कहतें सोहिरा देखो अमीरा, गैब बडे बादशाही । त्रिकूट अलंग उपर पलंग, पलंगमें पडे मलंगमें बाबू ॥ ३ ॥

पद १३ वें.

गुरुनें बंद किया वो नवँ दरवाजे ॥ ध्रु० ॥ तनका चोर अहं मूवा,

---

१ गगन हाच सुंदर बनवाटिका, त्यामध्यें लग्न [तादात्म्य] लागून गेलें (तो)= तेव्हां (मगनमें)=समाधिमध्यें उन्मनि अवस्थेच्या धुंदींत [मस्तान]=धुंद झालेला मस्त झालेला असा झालों. २ तेव्हां [उन्मनि अवस्था प्राप्त होण्याच्या पूर्वी, अनुभवणारे] नाद आणि बिंदु आणि ज्योति, कला इत्यादि उन्मनि अवस्थेमध्यें कांहीं नसून (अकेला) केवलत्वानें राहणार एकटा (फकीर)=गोसावी काय तो होता. ३ तत्तनलीन झालेला किंवा हृदय तक्यार्शी टेंकून बसलेला असा त्याला पाहून (तो= तेव्हां) त्याच्या ठायीं पूर्वोक्त मन [गर्क भये प्यारे] त्या प्रीय आत्म्याच्या ठायीं तन्मय होऊन गेलें आणि (वाहां)=त्याच्याच ठायीं [गुजरान]=तेथेंच कालक्रमण करून राहिलें. ४ अलख=अव्यक्ताच्या एका (पलख=एकक्षण) क्षणामध्यें (दोनों)=ब्रह्मदेवाचा दिवस आणि रात्र हीं दोन्हीं संपून गेलीं. म्हणून [हकीम]=मायेच्या योगानें बहुरूप झालेला इंद्रपरमात्मा त्याचाही लय झाला त्या अर्थी या जीवावर हुकूम कोण करणार. आपलें स्वरूपच (मुरत=अहंब्रह्मास्मि स्फूर्तिस्वरूप) परमात्मस्वरूपच आहे. ५ सोहिरोबा म्हणतात, पहिल्यानें (देखो अमीरा)=त्या परमेश्वराला पहा, जाणा आणि मग (गैब=परब्रह्म परमपुरुष) मोठ बादशाहा त्याला जाणा (पहा). ६ तो त्रिकूट=सगूण ॐकार त्यावर असलेला निर्गुण ॐकारस्वरूप पलंग आणि त्या पलंगामध्यें पहुडलेला (मलंगमें=आपल्याच आनंदामध्यें दंग झोंप घेत असलेला) बाबू=पुराणपुरुष भगवान, वसुदेव चितात्मक बालपुरुष (किंवा सूर्यनारायण.) ७ स्थूलदेहाच्या नव इंद्रियांचीं नव द्वारें हेच दरवाजे. ८ त्या स्थूलदेहांत असणारा जो (अहं)=अहंकार तो (मूवा)= मेला म्हणजे लीन होऊन गेला.

दिले[1] खुष हुशार हुवा । अबिनाश[2] तख्त बडा तख्त[3], निरंजनें[4] बनके राजे ॥ गुरुने० ॥ १ ॥ अलख[5] देख्या ध्यानमें[6], चौफेर मैदानमें[7] । दशवे द्वारके गुमानमें हम्मेश[8] नौबत बाजे ॥ गुरुने० ॥ २ ॥ ग्यानका[9] अंश, लेकर हुवा परमहंस । रहे तनका[10] भेद मशक ओहि लगावना लाजे ॥ गुरुने० ॥ ३ ॥ मुद्रा लगी अनंतकी[11], आदिनाथ[12] पंथकी । सोहिरा कहे बोध कैफ पिवे गुल्ल गाजे ॥ गुरुने० ॥ ४ ॥

पद १४ वें.

देखो[13] बे अवधूत गैबी[14] निरंजन निर्गुनवाला, पिवे प्रेमप्याला, शब्द सद्गुरू[15]

---

१ तेव्हां अंतःकरण (मन) आनंदीत होत्सातें सावध झालें. २ अविनाशी (तख्त= सिंहासन) योगशास्त्रोक्त द्विदलचक्र. ३ बडा=महान (बख्त=काल) आत्मा अनंत. ४ निर्लेप मायारहीत अव्यक्त वनाचें राजेंद्र सरकार. ५ अव्यक्त (अपरोक्ष ज्ञान). ६ योगाचें सप्तमांग जें ध्यान त्यामध्यें पाहिलें. ७ स्थूल=त्रिकूट, सूक्ष्म=श्रीहाट, कारण=गोल्हाट आणि महाकारण=औटपीठ असे चार फेरे आहेत ज्याला असें मैदान; पक्षी योगशास्त्रोक्त सहस्रदलचक्र. ८ सहस्रदलचक्रांत (ब्रह्मरंध्रांत) गुमानमें=अंतर्गत गुहेमध्यें हम्मेश=सार्वकाळ नौबत (प्रणवध्वनि, नाद) होत असतो. ९ ज्ञानाचा अंश (लेकर)=स्वीकारून. १० स्थूलदेहाचा भेद राहिला, (मी आणि माझें असा जो देहविषयक भेद तो, किंवा मी अमूक वर्णांतला, अमूक आश्रमी असा भेद तो). किंवा प्रकृतिपुरुष असा भेद तो भेद यःकश्चित मशक होय, त्याअर्थी ज्ञानाग्नि प्रज्वलित झालेल्या परमहंसाच्या हृदयास भेददर्शित्व लावण्यास तो लाजे (लाजतो) हा भाव. ११ अनंत आत्म्याची (अलक्षीमुद्रा). १२ नाथपरंपरेंतील मूळचा परमेष्ठिगुरु. १३ तुम्ही पहा. १४ परात्पर रूप (गुरु गोरखनाथ). १५ निर्लेप, निर्धूत असा. १६ उपदेश श्रवण करणारा जो शिष्य (चेला) त्याच्या देहेंद्रियांचा जो साक्षी म्हणजे तीन्ही शरिरांस पाहणारा जो सद्गुरु त्याचा शब्द म्हणजे 'तत्त्वमसि' हें महावाक्य त्याच्या ठायीं (किंवा त्या सद्गुरुच्या ठायीं) निरतिशय रत झालेला (चेला) किंवा ज्याच्या मुखापासून वेद निघाले असा शब्द ब्रह्मरूप जो वेदपुरुष त्याच्या ठायीं उपरतिनियुक्त असलेला (चेला) शिष्य, शिवस्वरोदयांत=शिव-पार्वतीला म्हणतात कीं, 'तत्त्वज्ञान गुरुपासून विधिपूर्वक समजून घेतलें पाहिजे; कारण सर्व शुभाशुभकार्यांचा विवेक तत्त्वज्ञानानें होऊं शकतो.

सुरत चेला, सब घट[1]व्यापक है अकेला ॥ देखो॰ ॥ ध्रु० ॥ कायापूर शहरके नव[2] गलिया फेरीसे आया, जुगुत[3] जुगुतके बडे अवलियां[4]। पुकारे[5]. सहज पवनसें[6], नवनाडीके[7] नलिया[8], ब्रह्मीं[9] बै [पै] ठे जब[10] भ्रमर[11] कमल कलियां[12] ॥ १ ॥ उलट [13]पछिमपंथसे चलना, तीन्हों[14] संधी मिलना, गगनमं[15]डलसें जब दम खुलना [खोलना; खाना ?] फेर आंखसें दिखनेकी बात कहना ॥ २ ॥ [16]नहिं बे [वे ?] बोधकूं आवना जाना, रहे दिल

१ जो एकटा असून सर्व देहांत (घटमें) अंतर्बाह्य व्यापून राहतो. २ देहरूप नग-रीच्या नवगल्या=नव इंद्रियांचीं नव द्वारें फिरून आलेला. ३ युक्तियुक्तीनें (योगयुक्तीनें). ४ बडे=महान+अवलिया—परम समर्थ योगी. ५ नाद करिता. ६ सहजें सहज (पव-नसें—श्वासोच्छ्वासवाहक प्राणवायुच्या योगानें) देहामध्यें नाद पुकारतो. ७ नवही इंद्रियांच्या आंत. ८ सुषुम्ना नाडी हीच एक नळी (शिंगी) तिच्या योगानें. ९ ब्रह्माच्या ठायीं (ब्रह्मरंध्रांत). १० ज्या वेळीं. ११ जीवअली (प्राणवायुरूप भ्रमर). १२ कमलकर्णिकेंत (ब्रह्मरंध्र चक्रामध्यें). समाधींत असणाऱ्या योग्याला, इंद्रियांस अविषय व केवळ बुद्धीनच जाणण्यास योग्य अशा कैवल्यसुखाचा अनुभव येतो. त्या आनंदांत योगी निमग्न असतां, पुष्पावरील मकरंद पान करणाऱ्या भ्रमराप्रमाणें समाधीपासून चलन होत नाहीं. १३ पश्चिम-मार्ग (सुषुम्नामार्ग) उलट्या योग (गोल्हाट) मार्गानें. १४ जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तूर्या या चार अवस्थांचे तीन संधी त्यांत जागृत राहणें. कुंडलीच्या चलन-वलनाच्या गतीवर जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुर्या या चार अवस्थांचा आधार राहिलेला असतो. यांत जेव्हां प्राण आणि अपान या दोहोंच्या बरोबर समान अंतरांत कुंडली मध्यें येते, तेव्हां जाग्रत् अवस्था होते. १५ गगनमंडल ह्मणजे सहस्रदलाच्या द्वारानें (जब=जेव्हां) दम (इंद्रियनिग्रह, इंद्रियें अंतर्मुख करून) खुलना=पुर्ण भरास यावा. खोलना=उघड करून अपरोक्षानुभव घेणें. खाना= समाधींत स्थिर होऊन राहणें (दम खाणें.) या प्रकारें मगज फाडून प्रबळ झालेला आत्मा बाहेर निघतो, व पुढें तो अखंड ॐकाररूप आत्म्याच्या स्वरुपांत व्यापून जातो. (फेर=मग, त्यानंतर) आंखसें नेत्रद्वारें (ज्ञाननेत्रांनीं) अपरोक्षज्ञान (तत्त्वज्ञान) पहाण्याची गोष्ट बोलावी ! त्यावांचून कांहीं होणें शक्य नाहीं हा भाव. १६ मग आत्मबोध स्थिर झाला. कांहा काल आत्मबोध व्हावा, व स-माधि विसर्जन झाल्यावर पुनः विक्षेप व्हावा असें त्याचें येणेंजाणें बंद होऊन तो स्थिर होतो हा भाव. व मग तो अंत:करणाच्या दरम्यान व्यापून असतो, त्या वे-ळेला निर्वाणस्थितींत (रहना जब आत्माना) आत्म्याचें राहणें होतें.

दरम्याना, निर्वान [ना ?] रहना [नी ?] जब आत्मना, हरघडिमें आनंद अम्मलमें झुलना ॥ ३ ॥ कहत सोहिरा कछु नहिं बाकी, मेहरबानी वाहांकी [जाहांकी ?] । तनमें कछु चीज नहीं वहियाकी उनकेवास्ते जबर्तब [अब ?] याद आदिनाथकी ॥ ४ ॥

पद १५ वें. राग काफी.

गुरुबिन नहिं आवत ध्याना रे ! परदेशि गारुडी ॥ ध्रु० ॥ निराधारमों पैदा कीया पवन पानि अस्माना । अभ्र खमें अगन अनंग बनायी धरती तेज मुळ जाना रे ॥ १ ॥ कहते आपसें सुनत आपसें चलत मकाना । आपसें रसनी आसकरके रस श्रोत्र शब्द सब बास उठावत प्राणा रे ॥ २ ॥ औरत रंग रसाल सकाम रतीभेटपर ध्याना रे । दिवानाँ होकर पीछें लगत

१ आणि मग तो सतत एक सारखा परमानंद (ब्रह्मानंद) अम्मलामध्यें झुलत असतो. २ मग त्याला आत्मस्वरूपावांचून इतर बाकी कांहींच कर्तव्य राहत नाहीं. ३ ही त्या (व्हांकी=त्याचीच) परात्परगुरुरूप आत्मसाक्षात्काराचीच (मेहरबानी कृपा होय). ४ देहामध्यें कांहीं वहीमाची=विक्षेप करणाऱ्या अहंभावाची चीज उरलीच नाहीं. ५ उनकेवास्ते=याचकारणामुळें. ६. जबतब=जेव्हां जेव्हां, हरघडी. ७ त्या आदिनाथाची (याद=आठवण, स्मरण) मी करितों. ८ गुरुवांचून ध्यानांत येत नाहीं (ध्यान=योगाचें सप्तमांग). ९ ब्रह्मभुवनांतला गारुडी (परमसमर्थ योगी ईश्वर) ह्या लोकचा (पिंडांतील जीव गारुडी नव्हे हा भाव). १० आकाररहित शून्यामध्यें. ११ वायु, जल, घटाकाश हीं उत्पन्न केलीं. १२ तसेंच जलाकाश [खं=] महाकाश, अग्नि व अनंग ह्मणजे काम हीं उत्पन्न केलीं. १३ त्याप्रमाणे पृथ्वी, तेज, हीं पाहून केवळ भूल पडते. १४ जडदेहांत वाचा उत्पन्न करून आपणच बोलतो, आपणच ऐकतो. (तुकोबांनीं ह्मटलें आहे कीं "होउनियां श्रोता वक्ता । आपुली आपण करी कथा "), आपणच इच्छेनुरूप पायांनीं चालत जाऊन मुक्कामास पोंचतो. १५ रसनेंद्रियाच्या द्वारानें आपण (आशकर=रसांची आशा करून, क्षुब्ध होऊन) रस चाखतो. श्रोत्रेंद्रियांच्या द्वारें शब्द श्रवण करितो, घ्राणेंद्रियाच्या द्वारें वास घेववितो. १६ स्त्रीचें रंगढंग रसाळ बोलणें इत्यादिकांस भुलून सकाम होत्साता रतिभेट घेण्याविषयीं ध्यान धरून असावें अशी भूल पाडतो. १७ इतकेंच नव्हे तर स्त्रीविषयाच्या ठायीं अगदीं दिवाणा होऊन जणूं पशुवत् तिच्या मागोमाग लागतो. मोठा मर्द पुरुष असून स्त्री-विषय दाखऊन त्याला वेडा करितो हा भाव.

है पुरुख बडा मर्दाना रे ॥ ३ ॥ इत्ता दिखावे इत्ता छपावे अजब नजरबंदखाना । कहत सोहिरा झूट साच सब दिलकुं दिया दरम्याना रे ॥ ४ ॥

पद १६ वें.

दिया है निज धन, लीया है तन[3] मन, लगन[4] गगनपर मगन हुवा मन ॥ ध्रु० ॥ अनाहत [अनुहात?] डंका बाजे, दशवे[7] द्वारके राजे; गैब निरंजन[8] दिया है ॥ १ ॥ निरालंबेका[9] महाल, सब दुनियांका[10] लाल; सब अर्धनारका खेल, देख अछा ओ जोबन[12] ॥ दिया है० ॥ २ ॥ अहं भूवा[13], अब सोऽहं हुवा, तब प्रेम पिवा, मै ओही[15] कहे जान, प्रेमपूरके गगन

---

१ हा जडदेह येथें दाखवितो व इतक्यांतच छपवितो, नाहींसाच करितो (अजब=आश्चर्यकारक) नजरबंदीचा प्रकार (खेळ). २ या गारुड्याचें हें विश्वगारूड खरें किंवा खोटें हें मानण्याचें (दिलकुं=मनाला, दीया=दिलें,) मनावर संपविलें. दरम्याना असें ह्मणण्याचा हेतु हाच कीं विषयाकार प्रत्यक्ष होण्याला विषय आणि मन ह्या दोहोंचा संयोग झाला पाहिजे; ज्याप्रमाणें मुशींत ओतलेलें तांबें तिच्यासारखेंच होतें, त्याप्रमाणें रूपादि विषयांस व्यापणारें मन खरोखर तद्विषयाकार झाल्यासारखें . दिसतें. ३ तन=स्थूल देह (तनु) आणि मन घेतलें आणि निजधन दिलें. कांहीं तरी महाल घेऊन धन द्यावयाचें असतें. तद्वत्. ४ ऐक्य, तादात्म्य (ज्योतिष शास्त्रांत साडेतीन घटकांचें लग्न होतें. त्याचप्रमाणें येथें प्रणवाच्या औट मात्रांशीं ऐक्य घडलें कीं लग्न. असा सांकेतिक शब्द वापरलेला आहे.) ५ गगनसदृश परमात्म्याच्या ठायीं मन मग्न झालें. ६ अनुहात नांवाच्या ध्वनीचा शरिरांत होणारा नाद हाच डंका (भेरी, नगारा). ७ दहावें द्वार ब्रह्मरंध्रस्थान, त्या स्थानचा राजा. ८ मायारहीत केवलस्वरूपानें राहणारा पुरुष आत्मा. ९ अन्य आश्रय रहीत, स्वयंसिद्ध (महाल=गगन महाल). १० सर्व दुनियेंतील जिवजंतूस प्यार असणारा जीव. ११ हें जीव द्वैत ह्मणजे सर्व (अर्धनार=अर्धनारी, अर्धमात्रा, प्रकृति) महामायेचा खेळ होय. १२ ती खुबसुरत भरयौवनवति माया पहा (तिचें स्वरूप जाण). १३ अहंकार मेला (लीन झाला) आणि सोहं (मी ईश्वर आहें) ह्मणजे ईश्वररूप झाला. १४ तेव्हां प्रेमरस प्याला. १५ मी सांगतों हें त्याचेंच सांगणें (सोहं ईश्वराचें) असें जाण, य तोच प्रेमपूराचें (नगराचें) गगन ह्मणजे व्याख्य आहे. शब्द गमनापासन झाला हा भाव.

॥ दिया है० ॥ ३ ॥ लगा लगन ग्यान अम्मलसें हुवा मगन । सोहिरा कहे ब्रह्मरंध्रमो गैब मन पवन ॥ ४ ॥

पद १७ वें.

जोरूलेंडकेनें क्या करना । दिलमें गुरुपद रखना ॥ ध्रु० ॥ जीवित आपेना कहेंगा । तो मट्टीमें मट्टी रहेंगा ॥ १ ॥ धनें तो बहुत पड्या खोलीमें । बखतकूं कुच (कुछ?) नहीं झोलीमें ॥ २ ॥ †पेटमें खुज-रतसें करे हजम । कहांसो पेट हुवा नहिं मालुम ॥ ३ ॥ जब छूटती नहीं बासना । तब फेर जनमकुं आना ॥ ४ ॥ सोहिरा करार करेंगा दीला! [दिला!?] । बडा जोडत साहेब अल्ला ॥ ५ ॥

---

† अन्यपाठः—पेटमे खजमतसें करे अलम. (हा पाठ चूकीचा आहे असें वाटतें).

---

१ त्याशीं लीन होऊन नम्रभाव झाला तेव्हां, ज्ञानरुप अम्मलाच्या योगानें (मग्न) तल्लीन झालों. २ गैब—हिरण्यगर्भ (सूत्रात्मा). हाच मन आणि प्राणवायु एतद्रूप होय. पक्षीं सोहिरोबांचे गुरु गोरखनाथ. ३ बायकामुलांनीं सुद्धां अंतःकरणांत गुरुपद ठेवावें, मग जाणत्या प्रौढ पुरुषांनीं त्याविषयीं उपेक्षा करावी हें योग्य नव्हे हें रहस्य. ४ आपलें जीवित्व म्हणावें तर तें स्थूलदेहाच्या आश्रयानें असतें, तें देह शेवटीं मातींत राहणार. ५ आपल्याच घराच्या खोलींत जरी धन पुष्कळ पडलेलें असलें, तरी आपण प्रवासांत असतां त्यापैकीं झोळींत (बटवींत) जर कांहीं नसेल, तर जसा कांहीं उपयोग होत नाहीं, तद्वत् आपलें जीवित या देहाला अंतकाळीं कांहीं उपयोगी पडत नाहीं हा भाव. ६ खाल्लेलें अन्न पोटांत गेल्यावर (खुजरतसें—कांहीं विलक्षण करामतीनें) तें हजम—पाचन होतें. हें कळतें (समजुतींत येतें.) पण पोट कोठून उत्पन्न झालें हें कळत नाहीं. (जेव्हां सगर्भ वाढलें । तेव्हांचि पोटिंचें घालें । तैसें मागिले पदीं बोलिलें । तेंचि होय ॥ ४८ ॥ वांचूनिया वेगळें । रूप करणें हें न मिळे । जेथीं आवंतिलें आंधळें । तें दुजियेनिसि ये ॥ ॥ ८४९ ॥ ज्ञानेश्वरी अध्याय १३) ७ जोंपर्यंत वासना सुटली नाहीं तोंपर्यंत पुनः पुनः जन्म घेतलेंच पाहिजे. ८ हें (दिला) मना ! तुला मी करार (निश्चयात्मक वचन, लेख) करून देतों कीं, तूं गुरुपदीं लीन हो, मग तुला (बडा साहेब) परमसमर्थयोगी (अल्ला) परमेश्वर (जोडत) प्राप्त होईलच.

पद १८ वें.

लगी मेरा मनमें प्रीत तेरी। तन मन धन उस बलहारी रे ॥ ध्रु० ॥ ग्यान कमलमें, बोध अमलमें, ज्योति विमलमें आलमेंश [अलमश?] न्यारी रे ॥ १ ॥ दृश्य [छें?] न आउंगी, अदछ रहूंगी, क्या कहूंगी, उनकी बडी दिलदारी ॥ २ ॥ जलकी मच्छीं, और गगनकी पक्षि [छी?] सुरत अलक्षकी [अलच्छकी] अछी प्यारी ॥ ३ ॥ कहत सोहिरा मगन रहे मैं, जाहां, ताहां सबसें जाकी पगबिन फेरी ॥ ४ ॥

पद १९ वें.

परबतपैर किल्ला, तुम ऊपर करो हल्ला। उलटें पलट [ख?]

---

१ एक गौळण (पक्षा अष्टधा प्रकृति) श्रीकृष्णपरमात्म्यास उद्देशून ह्मणत कीं माझ्या मनांत तुजविषयीं फार प्रीति जडली आहे. ती इतकी कीं माझा (तन—देह+मन) तनु व मन हीं केवळ (बलहारी—परमात्मा श्रीकृष्णपुरुष) आत्माच होऊन राहिलीं आहेत. २ ज्ञान हेंच कोणीएक कमल तें. ३ आत्मबोध (विमल—मलरहित) स्वरूप जलांत. ज्या पाण्यांत कमल उद्भवतें, त्या कमळाचा कंद, बुडाशीं चिखलांत असतो; पण पाण्यावर प्रफुलित होणारें कमल तें मलरहीत अशा पाण्यावर असतें. ४ आत्मज्योति—(कमलविकासाला सूर्यज्योतीची आवश्यकता असते; त्याप्रमाणें येथें) चित्सूर्य ज्योति (विमल—धूमरहीत अग्निज्योतीप्रमाणें मलरहीत) आलम+इश+न्यारी+है=आत्माग्नीपासून निराळेली ज्योति (न्यारा रे=पृथक जशी ज्योति प्रज्वलीत झाली असतां अग्नीपासून निराळी भासते.) ५ दृश्य =प्रत्यक्ष दिसणाऱ्या विश्वांत मी दिसण्यांत येणार नाहीं. ह्मणजे अव्यक्त स्थितींत राहणारी. ६ मोठा उदारपणा काय सांगूं! ७ जलांत राहणारा मच्छि (मत्स्य) किंवा गगनांत राहणारा पक्षी हीं जथच्या तेथें असलीं तरच आनंदीत असतात. त्याप्रमाणें मी त्या अलक्ष=(अव्यक्त कूटस्थ) परमात्म्याच्या ठायीं सुरत=उत्तमप्रकारें रत झालेली अशी त्याचें फार प्रीयपात्र आहें. ८ मीं ज्याठिकाणीं मग्न होऊन राहिलें आहे, त्या ठिकाणीं त्या प्रियकर आत्म्याची (पग+बिन=पंखावांचून ह्मणजे जीवहंसावाचून) फेरी=दर्शन साक्षात्कार होत असतो. (परमहंसरूपानें). ९ परबत=पर्वत, डोंगर (ॐकार, मेरू). १० पर=त्या पर्वतावर (पंचीकृत स्थूल व अपंचीकृत सूक्ष्म, अशा दोन शरिरांस आधारभूत असून ओतप्रोत आंत बाहेर व्यापून असणारा जो कूटस्थ त्यावर). ११ किल्ला=त्या अधिष्ठान कूटस्थाच्याचठायीं प्रतिबिंबित जो चिदाभासयुक्त लिंग (सूक्ष्म) व स्थूल देहरूपानें भासणारा किल्ला. त्यावर चाल करून जा. १२ उलट=उलटा योग मोल्हाट व पलट प्रत्याहाररूप.

चाल[1] तरी फत्ते[2] करे अल्ला[3] ॥ ध्रु० ॥ गनीमकी[4] फौजें[5] बडी बैठे घेर [घे?] बारी[6] । काम क्रोध लोभ मोह बडे धनक धारी[7] ॥ १ ॥ दस[8] बुरुंज बांके[9] न वाकबगारी[10] । मत्स[11] [छ?] रसें वहीम बदलामकी दोरी ॥ २ ॥ यम[12] नेम[13] करत जाव अछी मोर्चेबंदी[14] । जोग[15]जुगत धीर बडे बीर धारबंदी[16] ॥ ३ ॥ चोर हेरें[17] ले बातमी पाखंड रस्तखाना । पवनकी[18] मारो बत्तीसें [फत्तसें ?] लगाव तोफखाना ॥ ४ ॥ ग्यान[19] ध्यान तोफमें तो आंच देना दारू । बैराग्य[20] बत्ति लगा देना सरबतका[21] मारू ॥ ५ ॥ व्यतिरेक[22]

---

१ स्वारी (किल्यावर चालून जाणें). २ जिंकणें, किल्ला सर करणें. ३ परमात्मा. ४ परशत्रूची. ५ फौज=सेना (जैसा चेइला तो अर्जुना । म्हणे स्वप्नींची हे विचित्र सेना । मीचि जाहलों होतों ना । निद्रावशें ॥ २४६ ॥ ज्ञानेश्वरी ९). ६ हृदयगृहांत वास करणारी. ७ धनुर्धारी योद्धे. ८ त्या किल्यांत असणारे दहा बुरुज (स्थूल देहाचीं नव इंद्रियें व दहावें ब्रह्मरंध्र) ९ बलवत्तर, मजबूत. १० वाकबगारी=आंतील माहिती (अंतर्गतज्ञान) स्पष्टपणें न समजणारें अपरोक्ष ज्ञान. ११ म्हणजे ज्या किल्यांत मत्सर हाच वहीमी शत्रूस सामील होणारा सेवक आहे; त्याच्या हातीं बदलाम ही दोरी आहे, त्या दोरीवरून आंत प्रवेश करावा हा भाव. किल्यांत गुप्त रितीनें प्रवेश करण्याचे जे रस्ते ते आंतील वाकबगार लोकांसच माहित असतात, ते लोक फितूर झाले म्हणजे किल्यांत सहज प्रवेश होतो. १२ यम—योगांतील प्रथमांग होय. (याचे पांच प्रकारः—१ अहिंसा, २ सत्य, ३ अस्तेय, ४ ब्रह्मचर्य व ५ अपरिग्रह). १३ नेम—नियम हें योगाचें द्वितीयांग (याचेही पांच नियम आहेत ते असे,—१ शौच, २ संतोष, ३ तप, ४ स्वाध्याय, ५ ईश्वरप्रणिधान.) १४ बळकट मोर्चा (निशाण) दाखऊन सैन्यास इशारा करणें. १५ योगयुक्ति जाणणारे मोठमोठे धीर वीर. १६ हत्यारबंद. १७ गुप्त हेर चोरून शत्रूकडील बातमी आणणारा सेवक. (पक्षी पाखंडवाद करणारा); त्याच्याकडून "रस्तखाना म्हणजे दारुखाना" कोठें आहे ही सहज बातमी मिळेल. १८ मनप्राणवायुरूप (पवनयोग) मारा करा. (बत्तिसें—मन पवनरूप बत्तीच्या योगानें) किंवा फत्ते झाली म्हणून, तोफखान्याला बत्ती द्या हा भाव. १९ ध्यान—योगाचें सप्तमांग हांच तोफ, त्यांत ज्ञानस्वरूप दारू खेंचा (आंचून भरा). २० वैराग्य हीच बत्ति लावा. २१ एकसारखा तोफांचा मारा करणें. २२ व्यतिरेक हाच गोळा व अन्वयाची (रजगीरी)—रंजूक—(बत्ति लावण्याचें छिद्र.) तोफ उडविण्याची कृति.

गोला अन्वयकी रजगीरी । हरदमसें करते जाव बढी [डी?] मारगीरी ॥ ६ ॥ कोहि मुवे कोहि रवे जरदस्त हुबे सब । जोगराज ताबिनसें खोल देना तब ॥ ७ ॥ हस्तगत किल्ला हरकत रहे [ही?] ला । तीन्हों लोक आप हुवे अम्मलका जिल्हा ॥ ८ ॥ मंदुमी बडी सलामतका आगाज (आवाज?) तो करना । दसनाद अनाहत नौबत बजावना ॥ ९ ॥ असमानमें तो लाल बडा [ढा?] निशान [ण?] लगावना । एकबार जाना तो फेर नहीं आवना ॥ १० ॥ तखतमे [तख्त?] तो सक्त सख्त?] हुवा फस्त लूट फन्हा । सोहिरा हुवे खूब हुवा गैब] आलमपन्हा ॥ ११ ॥

पद २० वें.

फकीरा हरदम प्याला पीव ॥ ध्रु० ॥ झूट फकिरी देख तुमारी,

---

१ युक्तिप्रयुक्तानें. २ कोणि मरून पडले. ३ कोणि रडत आहेत. ४ अजर. ५ राजयोगानें किल्ला बिनहरकत स्वाधीन केल्यानें. ६ किल्ल्याचें दार उघडून आंत सहज प्रवेश करावा हा भाव. ७ शत्रूची हरकत दूर झालेला. ८ भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक (स्वर्ग, मृत्यु, पाताळ). ९ अ, उ, म, ँ अर्ध मात्रा यांनीं युक्त असा जिल्हा (भाग प्रणव). १० महान शौर्य. ११ सगळया लोकांनिशीं सुखरूप (सलामत) असल्याविषयीं १२ तोफा इत्यादिकांचे आवाज करून, इतर फौजेच्या तुकड्यांस इशारत करणें. (परमार्थिकपद्यसंग्रह भा० ३ यांतील पद्य १ लें बखर पहा. १३ योगशास्त्रोक्त अनुहात किंवा अनाहत नावांच्या चक्रामध्यें योग्यास अनुभवणारे दहा प्रकारचे नाद. १४ ते नाद करावे, वाजवावे. १५ महदाकाशांत (सहस्रदलचक्रांत). १६ तांबडें निशाण (पक्षी आरक्तवर्ण योगशास्त्रोक्त (श्रीगणपति) मूलाधारचक्र पहा.) १७ एक वेळ याप्रकारें जीवन्मुक्त होऊन जावें, आणि पुनः कधीं जन्माला येऊं नये. १८ हृदयस्थान हेंच तख्त. १९ आसक्त, आरूढ. २० इतर सर्व लूटून फन्ना करावेले (लय केला.) २१ परमानंदयुक्त झाला. २२ परमात्मस्वरूप गुरु गोरखनाथ. २३ मोठा बादशाहा. २४ शब्दादि विषयांसूपान श्रोत्रादि इंद्रिय आवरणें याला दम असें ह्मणतात. (हर दम ह्मणण्याचा हेतु हाच कीं हरघडी या प्रकारचा दम पी हा भाव). अशा प्रकारचा दमरूप प्याला पी (हिंदुस्थानीमध्यें "पीवो" किंवा "पीव" असें रूप होतें.)

कायकुं करना भेक [ष?] । भूकके खातर मगत भीक बे, कहां मिल रोटी धीव ॥ फकीरा० ॥ १ ॥ बोधेकी भंग करे बजरंग, तुम चंग हो पीकर दंग । झूल मातंगे तुम जंग, हो पीर पैगंबर जीवे ॥ फकीरा० ॥२॥ हरकत हीलीं [हिला?], छोड दे दीलीं [दिला?], मिल जावे साहेब अेल्ला । बि [भि?] स्मिल्लाके गैब गुहामें, अमीरेको बरक [ख?] तेनव नव [बरखत म्हीत्र?] ॥ फकीरा० ॥ ३ ॥ जोग जुगुतका कमायी चाहिये, जीवका हुवे शीव । कहत सोहिरा तनबीन देखे आपकूं आप चिरंजीव ॥ फकीरा० ॥ ४ ॥

पद २१ वें.

तेरे बिनें नहीं और मुद्रा, अब क्या कहूं! खुदा । धीर बीरे कोहि पीर पैगंबर दगा न किया खुदा ॥ ध्रु० ॥ घस्त ग्यानकी हस्ते [दस्त?] महालमें । मस्त हालमें ख्यालमें । दिलें बंदकर फंड छोड,

---

१ फकिरीचा बाह्य वेष. २ आत्मबोधस्वरूप भांग. ३ बैरागी लोक 'बंभोला' 'भोले बजरंग' असें ह्मणून भांग पितात त्यास अनुलक्षुन हें आहे. ४ गुंग. ५ हत्तीप्रमाणें डोलत राहा. ६ महान, मोठा, ७ मूर्तआत्मा विश्व. ८ आत्मा, तैजस. ९ प्राज्ञ जीव. १० अहंकार. ११ हे मना! १२ परमात्मा. १३ चैतन्य आत्म्याच्याच ठायीं प्रतिबिंबित (गैब) हिरण्यगर्भ, सूत्रात्मा त्याची (गुहामें) बुद्धिरूप गुहा, तीमध्यें १४ अमीर दिवसरात्रीयुक्त काळ संज्ञक प्रजापति, त्याची (बरकत) वृद्धि, क्षयरूपी राहटघाट. १५ नूतन नूतन. १६ योगयुक्तिरूप (कमाई) शक्ति, गति, पाहिजे, मग! १७ जीवाचा शिव बनतो. १८ स्थूलदेहावांचून (ह्मणजे मिथ्या स्थूल लिंग देह लीन करून). १९ केवळ आत्मस्वरूपानें आपणच 'आपल्याला चिरजीव आहे असें पाहतो. २० चराचरी, भूचरी, खेचरी, अगोचरी आणि अलक्षी; ह्या पांचही मुद्रा त्या तुजवांचून अन्य नाहींत, असें प्रत्यक्ष अनुभवास आलें, तेव्हां (अब) आतां (मेरा खुदा) हे माझ्या परमेश्वरा तुजवांचून आणखी निराळें काय सांगू? याप्रमाणें ऐक्य सिद्ध झाल्यामुळें २१ धीरवीर—पीर सर्वशक्तिमान ईश व पैगंबर—सूत्रात्मा हिरण्यगर्भ, हे आपल्या मायाभोहाच्या योगानें (दगा न किया) विक्षेप आणायाला समर्थ नाहींत हा भाव. २२ नेहमीं ज्ञानस्वरूप जो द्रष्टा त्याची घस्त—देखरेख, पहारा. २३ दस्त—सर केलेल्या मुलुखांत किंवा विराट पुरुषाच्या हस्तामध्यें असणारे इंद्रलोक त्यामध्यें. २४ हालमें=आपल्याच ऐश्वर्यांत, तोऱ्यांत [मस्त=उन्मत्त] २५ ख्यालमें=ख्यालिखुशालींत, परमानंदामध्यें २६ अंतःकरण [मन] लीन करून मनाचा लय करून.

बिलंदेर [बिलंद?] अंध जंजालमें ॥ १ ॥ तेरे दास होकर आस करेंगी, भवबंध[2] पाश खलासकी । यहि तमाशा[3] दमामा[4] बाजत. नौबत[5] है यहि[6] खलासकी ॥ २ ॥ बाट[7] जंगलकी घाट त्रिकुट[8] उलाट मन मैदानमें । औटपीठपर[9] पैठ प्रस्यंत[10] [11]ओहि गत उडत पंक्षि[12] [छी?] निदानमें[13] ॥ ३ ॥ धरत्री[14] छोड जल पवन[15] छोडकर दहन[16] धूंडत दर्म्यानमें[17] । पांच[18] पंचकी फौज काटत[19] मौज[20] लगत अस्मानमें[21] ॥ ४ ॥ आदमशाहाकी सब[23] मिजलशा [मदलशा?] तो जाकूं[24] हिंदु कहत है पाहिमाम् । एक[25] बिंद अविंध[26] कहत रहिमअज नमाज तो या इमाम ॥ ५ ॥ ये मैशार[27] हुशार होकर ले मशाल[28] खुषालकी[29] । काम क्रोधका शीस काट[30] बकशीस ले बे दुशालकी[31] ॥ ६ ॥ अव्वलका[32] कोहि नहीं बात सुनत कुरान

---

१ गुप्तरूपानें असणारे कामादि शत्रु [बिलंद] किंवा [बिलंदर] महापापात्मे जे अंधत्व देऊन [धृतराष्ट बनवून] जंजालमें=भवदुःखांत टाकणारे, त्यांचा (फंद=) छंद, नाद आजिबात सोडून देऊन. २ भवबंध पाश खलास (मुक्त) करण्याची आशा करितो. ३ भरपूर. ४ मोठ्या दणदणाटानें. ५ नाद. (प्रणव-नादयुक्त नौबत) ६ सर्व संसार नाश करण्यास हाच नाद कारण होय. ७ अव्यक्त जंगलांतली वाट. ८ त्रिकुटाचा घांट टांकून मन हेंच मैदान त्यामध्यें. ९ महाकारण देहांत (पैठ)–प्रविष्ट होणें. १०दहाही दिशाला व्यापून असणें (दिगंतापर्यंत पोंचणें). ११ या गतीने. १२ हंसपक्षी (जीवहंस). १३ महाकारणामध्यें. १४ पृथ्वी. १५ वायु. १६ आग्न [ज्ञानाग्नि]. १७ अंतर्गत हृदयाकाशामध्यें. १८ पांच भूतें व पंच तन्मात्रे यांची फौज [सेना]. १९ नाश करून (कापून काढून). २० परमाश्चर्य (लगत) वाटतें. २१ महदाकाशांत (ब्रह्मरंध्रांत). २२ आदमशहा–परात्पर गुरुरूप बादशहा वेदपुरुषाची. २३ सर्व (मिजलशा)–करामत, विज्ञान. २४ त्याला हिंदु "पाहिमाम् माम् पाहि–(माझ्यावर कृपाकर, साक्षात्कारानुग्रहद्वारानें दया कर.) असें म्हणतात. २५ असा जो एकच बिंदुरूप अद्वैत चैतन्यपुरुष त्याला २६ अविंध–यवन ज्या अजाला रहीम असें म्हणतात व नमाज गुढगे–टेकून ध्यान करणें (ध्यानासनाची एक वेगळी रीत) नमाज करून ज्याला "या इमाम" अशी हांक मारतात. २७ हे व्यक्तिरूप जीवा. २८ ज्योति (शुद्धसत्त्वरूप मशाल जोत). २९ आनंद-दायिनी. ३०कामक्रोधादिकांचे शिरछेंदन करून त्या चैतन्य आत्म्याकडून. ३१ प्रेम-भक्ति, प्रेमकलारूप (दुशाल) शालजोडी बक्षीस घे. ३२ हें मूलतत्त्व कोणी जाणत नाहींत. (अव्वलची बात=मुळचें गुह्य) त्या गुरुमुखापासून समजून घेत नाहींत. व पुस्तकीं लिहिलेलें (कुरान=महंमदी धर्मशास्त्र) पढतात तर तसें न करितां.

पढत किताबसें । अरथ [अर्थ?] खोलेपर भरम[2] खोलकर वाहासि निकल शिताबसें ॥ ७ ॥ सखुत[3] होकर शून्य तखतमें गैब[4] वखत दिये किल्ला । कहत सोहिरा बारोबार तूं नमाज कह तेरे यॉ अल्ला ॥ ८ ॥

पद २२ वें.

दिल मेरा आराम पाया । भगवान सुरत सब जमीन अस्मानमें नजरमें आया ॥ ध्रु० ॥ मृगजल माया उननें बनाया । झूटी काया क्या जानों मैं कब मर जाया ॥ दिल० ॥ १ ॥ इबरतें [इब्रत?] लाया[5] पवनें[6] कमाया । दशॅनादोंकी[7] छिंगी बजाकर अलॅख जगाया ॥ दिल० ॥ २ ॥ कहत सोहिरा खुदा[8] मिलाया । उन्नें फरमाया[9] निर्गुण गाया निरालंबकी[10] लगन लगाया ॥ दिल० ॥ ३ ॥

पद २३ वें.

मानस[11] मेरा मगन करे जब तब देखों राम ॥ ध्रु० ॥ अजब[12] नजरसें, छू [झू?] टा सबसें,[13] लग्या चित्तमों छंद । ग्यानविज्ञानसें आया [14]मेरी

---

१ त्याच्या गुरुमुखानेंच समजुतींत येणाऱ्या बहुत मौल्यवान अर्थावर लक्ष ठेऊन २ सर्व प्रकारचा भ्रम उघडा करून (भ्रम निरास करून त्यांतून मोठ्या [शिताबसें=] सावधगिरीनें. [निकल=सुटून जा] मुक्त हो. ३ शून्य तखतावर आसक्त होत्साता ४ गैब=हिरण्यगर्भ, कालात्मा त्यानें हा देहरूप किल्ला दिला आहे त्याचे स्वरूप जाणून ह्या अल्लाचें=परमात्म्याचें (या अल्ला,या अल्ला असें म्हणून) नमाज कर (कह=बोल.) ५ मोठी मरामत (निजधैर्य) लाया=स्वीकारलें. ६ पवनयोग सिद्ध करून घेतला. ७ दहा प्रकारचे नाद करणारी शिंगी वाजऊन अलॅख (अलक्ष= अव्यक्त) जागवलें, जागृत केलें. ८ परमपुरुषप्राप्ति करून घेतली. ९ त्या परमपुरुषानें निर्गुण निराकार गाण्याविषयीं (निर्गुणब्रह्माचें वर्णन करण्याविषयीं) आज्ञा केली. १० अन्य आश्रयरहीत स्वयंसिद्ध आत्म्याचें लग्न लावलें--तादात्म्य ऐक्य केलें. ११ माझें मानस (अंत:करण) त्या आत्म्यानें जेव्हां मगन आपल्याशीं तन्मय (आत्मरूप) केलें, तेव्हां राम (हृदयस्थ आत्मा) पाहिला. १२ आश्चर्यकारक दृष्टीच्या योगानें (अंतर्मुख ज्ञानदृष्टीनें, दिव्यदृष्टीनें). १३ सर्व नामरूपात्मक विश्वावरची दृष्टि सुटली, व ती अंतर्मुख होऊन रामाचाच चित्तामध्यें छंद लागला हा भाव. १४ [मेरी सूरत=माझें स्वस्वरूप] घन:श्याम गगन सदृश श्यामवर्ण परमात्मरूप आहे. असें त्या ज्ञान आणि विज्ञानाच्या योगानें (आया=कळून आलें).

सूरत घनःशाम ॥ मानस० ॥ १ ॥ प्रेम अम्मलकी चढनें चढायी कुंडमें [कुंडलिमें ?] उनका[3] पार । आंखनें देखना बडा जोम [ज्याम ?] ॥ २ ॥ रंग[6] अनंगमें जोरा होकर जिह सोजानी नार । मर्द [मरद ?] नारका हुक्का देखे सोहिरा दिनशाम ॥ ३ ॥

पद २४ वें. (राग—कल्याण)

दुनियांके हरहुनर[10] देख! सुरत[11] सब नबी[12] रतनपर जडीत जवा बनवा ॥ ध्रु० ॥ उलट[13] पलख पर दर्शनें[14] [दरसन ?] लेकर आधाचंद्र[15] पीवा ।

---

१ प्रेमरूप अम्मल (कैफाची). २ अग्निकुंडामध्यें (योगशास्त्रोक्त अग्निचक्रामध्यें, महापद्मचक्रामध्यें, किंवा ‘ कुंडलीचक्रामध्यें. ३ त्या पुरुषाचा. ४ परपार= परेच्या पलीकडचा पार (कडा, तड). ५ आखन=नेत्रामध्यें मोठा उग्रपणा (प्रेम अम्मलाच्या कैफामुळें नेत्रांत येणारें विलक्षण तेज) किंवा ‘ ज्याम= सांधा=अ उ म अर्धमात्रा यांचा सांधा (संधी ॐकार) तो नेत्रस्थानच्या द्विदल चक्राच्या योगानें पहावा. हा भाव. ६ लाल, पांढऱ्या व काळ्या रंगानें युक्त अशी जो अजा तिच्या (अनंगमें=) कामामध्यें जोर होऊन ज्या ठिकाणीं (सोजानी=) निजली गेली. [ऐश्वर्येशीं ईश्वरा । जियेचें अंग संसारा । आपण होउनि उभारा । आपणाचि जे ॥ २९ ॥ निदलेनि भ्रतारें । जो विये चराचरें । जियेचा विसंबला नुरे । आमुलेपणही ॥ ३७ ॥ अमृतानुभव ज्ञानेश्वर] ७ नार=प्रकृति; अर्धनारी. ८ मर्द=पुरुष आणि [नारका] नारी प्रकृतिचा हुक्क=तमाखु वगैरे पिण्याच्या चिलमीस हुक्का ह्मणतात. पुरुषाचें मुख हाच हुक्का, त्याजपासून निघणारा श्वासोच्छ्वासरूप प्राणवायू व तेजोमय ज्वाळा (ज्योति). ९ दिवस व रात्र ह्मणजे सतत सोहिरा तो हुक्का पहातो हा भाव. [रात्री आणि दिवो । पातली सूर्याचा ठावो । तैसा आपुलिया सार्ची वावो । दोघें जियें ॥ ४३ ॥ अमृतानुभव प्र० १] १० ह्या दृश्य विश्वाचा राहाटघाट कसा आहे पहा! ११ त्या विश्वाची सुरत= देखावा=(सर्व दृश्य पदार्थांचा नामरूपात्मक आकार) १२ नबी=अव्यक्त कूटस्थ त्याचें (रतन=रत्न=कूटस्थाच्या ठायीं चमकणारी बुद्धि हेंच रत्न त्याच्या भोंवतीं जडित=जडलेला कोंदण केलेला,) जवा=सांधा म्हणजे देह, मन, बुद्धि आदिकरून जें पंजर त्याचा बेमालूम सांधा बनविलेला आहे. १३ उलट=उलटा योग प्रत्याहार, त्याच्या योगानें, पलखपर=पलख=क्षण+पर=प्रत्याहारांत (जो नादाचा अनुभव येतो त्या नादांत आसक्त झालेलें चित्त) पंचविषयाची अपेक्षा करीत नाहीं, त्या करितां नादाभ्यासी लोक (पलख=) क्षणमात्रांत आपल्या चित्ताची चचलता जिंकून त्याला वश करितात. १४ दर्शन लेकर=दर्शन साक्षात्कार प्राप्त करून घेऊन.

अहं धरम कोही गरम नरम यहि सबका दरद मुवा ॥ १ ॥ नादबिंदके ऊपर दोहती अनाद गैब गौवा ॥ २ ॥ ऊर्ध्वशून्यमें दिलकूं गारत अमृत क्षीर पिवा ॥ ३ ॥ कहत सोहिरा नैनोमें देख्या तीन्हो लोककी हवा। जल स्थल पवन गगन छोडकर लगनमें मगन हुवा ॥ ४ ॥

प्रत्यहारामुळें बुद्धीच्या योगानें उत्पन्न झालेलं जं, हिरण्यगर्भरूप महत्तत्त्व अथवा आत्मा त्यामध्यें लय पावतें, या रितीनें सर्व इंद्रियादिक किरणांचा लय केल्यानें तुरीय पदरूप शान्त आत्म्याची प्राप्ति होते. १५ आधा=अर्धा+चंद्र=अर्धचंद्र. पूर्वोक्त शान्त आत्म्याच्या प्राप्तीमुळें. अर्धचंद्रापासून स्रवणाऱ्या अमृताचें पान घडलें.

१ मग 'अहंवाच्य जो' जीवधर्म त्या संबंधीं जो, (गरम=जठराग्नि, वैश्वानर) धर्म+[नरम=]तो शांत करण्याविषयीं अन्नाच्छादनादि आहार करण्याचा धर्म; यांतून [कोही=कोणताही] कांहीं उरत नाहीं. या सर्वांचें [दरद=दुःख] मुवा=मृतप्राय म्हणजे नाहींसेंच होतें. पूर्वोक्त अमृताचें सेवन केल्यानें, अलौकिक रसाचा अनुभव घेतल्यामुळें, लौकिक खाणें पिणें इत्यादिकांविषयीं त्यागबुद्धि उत्पन्न होऊन योगी त्या अमृताचेंच सेवन करितो, त्या योगानें भूक तहान इत्यादि सर्व दूर होतात. हा भाव. [विशेष माहिती 'पातञ्जल योगशास्त्राचा अभिप्राय' या पुस्तकांत पहा] २ प्राण व अपान यांचा संयोग करवून त्यांची सुषुम्नेंत गति करावयाची. याला मूलबंध म्हणतात. या क्रियेनें मूलस्थानीं (गुदा)चें बंधन होतें, म्हणूनच याचें नांव मूलबंध पडलें आहे. या मुद्रेनें प्राण, अपान, नाद व बिंदु यांचें ऐक्य होतें. याप्रमाणें सुषुम्नेंत ऐक्य झाल्यानें नाद (मेघाप्रमाणें ध्वनि) प्रकट होतो, आणि प्राण तसाच अपान यांचें हृदयावर गमन झाल्यामुळें, नाद व बिंदु यांचें ऐक्य होतें, नंतर हे चौघे मस्तकांत प्रवेश करितात, त्यामुळें योगसिद्धि होतें. ३ याप्रमाणें ऊर्ध्वगति झाल्यानें (ऊपर=वर+दोहती=दुभती=शुद्धसत्त्व दूध प्रसवणारी) अनादि गैब=जुनाट पुरुष. त्याची गौवा=गाय=अमृतसंजीवनी, सत्रावी कळा, कामधेनु आहे. [वाचा ही धेनु आहे तिचे स्वाहाकार, वषट्कार, हन्तकार, आणि स्वधाकार हे चार स्तन [बृहदा० अ० ५ वा ब्रा० ८ वें पहा.] ४ [ऊर्ध्वशून्य मनोभूत। ज्ञानेश्वर पंचीकरण] त्या शून्यामध्यें [दिलकूं=] मनाला गाढून टांकून (मनालय करून). ५ पूर्वोक्त अमृतरूपी क्षीर (दुग्ध) पिवविलें. ६ ज्ञाननेत्रांनीं पाहिली. ७ तीनही लोकांतील हवा म्हणजे तीन्ही लोकांतील राहाटघाट (जीव-धर्म=ऐश्वर्य;) ८ लगन=लग्न=ज्याप्रमाणें विवाहापासून (लग्नापासून) विस्तार वाढतो म्हणुन विवाहित स्थितीला प्रपंच किंवा संसार म्हणतात. याच अर्थानें रामदासांनीं म्हटलें आहे कीं "आधीं प्रपंच करावा नेटका" याचा भावार्थ हाच कीं, प्रथम प्रवृत्तिमार्गानें प्रपंचाचा अनुभव घेऊन, मग निवृत्तिमार्गानें (साक्षिरूपानें) त्याचें कौतुक पहात राहणें. हाच 'लगनमें मगन हुवा' म्हणण्याचा अर्थ.

पद २६. वें.

मुंडा दिल नहिं नहिं रहे, न जान । अरस परसपर घन बरसत, दिनें आदर्श हुवा ॥ ध्रु० ॥ ईषीकी नहीं बे किसीका बैठत, दिलकूं नहीं हिसका । जिसकूं चिर आंख लगावे, अंदर नबीनें करे नादवा ॥ १ ॥ देखत हैतो भेष [क?] तऱ्हांके, मुलुख रमते हवा । फकीरें हुवे अम्मल पीवे, देवे सब दुनियांकूं दुवा ॥ २ ॥ कहत सोहिरा घटमठ अल्ला, अहंका

---

१ मुंडन केलेलें दिल ह्मणजे मन (संन्यसित केलेलें, सर्वसंगपरित्याग केलेलें). किंवा (मुंडा=षंढ असा अहंकार ह्मणजे देहादिकांला मी असें ह्मणणारा जो चिदाभास तोच जीव मन हें त्याचें साधन आहे; व तें मनही नपुंसकच आहे, असें जें चिदाभासयुक्त मन तें (नहिं नहि रहे=) राहिलें नाहीं, ह्मणजे त्याचा लय झाला, असें द्विरुक्तीनें दर्शविलें आहे. अर्थात्, न=नाहीं + जान=जीवत्व, जीवभावही राहिला नाहीं हा भाव. २ अ + रस=रसरहीत, जड + परस=(परसं, भरड) पक्षीं शरीरक्षेत्र (ज्ञानेश्वरी अ० १३ ओ० ११० ती १२० पहा). त्यावर घन=मेघ ÷ बरसत=वर्षाव (मेघवृष्टि) करितो. पक्षीं दयाघन परमात्मा हाच मेघ तो चैतन्यजलाची वृष्टि करितो. ३ दिन=प्रकाशानें युक्त असलेला सूर्य, हाच आदर्श=आरसा (हुवा=) झाला. (तेजोमय सूर्यबिंबानें सत्याचें स्वरूप सार्वकाळ आच्छादिलेलें आहे. निर्मळ तत्त्व झालेला तत्त्ववेत्ता त्या तेजोमय आरशामध्यें स्वस्वरूप पाहूं शकतो. ४ कामादि षड्रिपूंचा (इषिका=बाण, कामशर + किसीका=कोणाचाही) बाण लागत नाहीं. ५ त्यामुळें (दिलकू=) मनाला हिसका पोंचत नाहीं, ह्मणजे मन आत्मस्वरूपापासून ढळत नाहीं. ६ ज्या मनाला ' चिर=चिरकालिक + आंख=नेत्र लगावे दिलें=दिव्यदृष्टि दिली आणि नेत्राच्या आंत त्या परमात्म्यानें द्रष्ट्याच्या रूपानें (नांदवा=) नांदणूक केली, किंवा (नादयुक्त प्रणवरूपानें राहिला. ७ मग दिव्यदृष्टीनें, तऱ्हेतऱ्हेचा (भेक, भेष=पोषाख). निरनिराळ्या शरिरधर्मानुरूप शरीरें धारण केलेल्या जीवाची विचित्र विश्वाकृति. ८ निरनिराळ्या देशांत (पंचीकृत भूतांपासून झालेलीं ब्रह्मांडें, चतुर्दश भुवनें इत्यादि देशांत) हवा खात सर्वांचा प्राणधर्म हिरण्यगर्भरूपानें) रमते=रमत जातो हा भाव. ९ अशा प्रकारें फकीर होऊन ब्रह्म अम्मल प्याला आणि सर्व दुनियांभर (दुवा) कल्याण इच्छित, आशिर्वाद देत फिरत राहतो. १० घट=प्रत्येक स्थूलदेह किंवा स्थूल सृष्टि + मठ=लिंगदेह, हृदयमठ (मठाकाश, महाकाश) यांमध्यें (अल्ला=) परमात्मा ओतप्रोत अंतर्बाह्य व्यापून राहिला आहे; (अशा अनुभव ज्ञानामुळें)

[अदमीका?] बरखत मूवा । जलथलमें ओही सांई देखत, हम्मेश खूष हुवा ॥ ३ ॥

पद २६ वें.

मुंडे हुषार हुषार हो खबरदार । देखो अलमं बढा क्षहार [सार ?] । कछु तो करामेतसें होना सांईका [व्या ?] बेपार ॥ ध्रु० ॥ अब तो मुंडे चुपं, सब तो झुटा तेरा जप, और भला बुरा खप । अस्मांनके खैर म्यान दर्म्यानसें कुंप (छंप?) ॥ १ ॥ अबे मुंडे ना लेले तेरे हिजडीका

अहंका=देही जीवाची किंवा (अदमीका=) व्यक्तिवाचक नामधारी देहाची (बरखत=वृद्धि) जन्म, तारुण्य, वार्धक्य, जरामरणादि अवस्था (मूवा=) मृतप्राय झाल्या. ह्मणजे जीवन्मुक्त झाला हा भाव.

१ जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं (ओही=) तोच (सांई=) परमात्मा पाहत पाहत (हम्मेश=) निरंतर खूष परमानंदयुक्त) होऊन राहिलें. २ अहंकाराला उद्देशून हें बोलणें आहे. वाडीप्रांतीं (मुंडा=हिजडा व हिजडी) मुंडा=षंढ पुरुष व हिजडी=षंढ स्त्री हें जोडपें, भिक्षेस घरोघर फिरत असतें. व पद संग्रह भा० २ पद ३३ पहावें). अरे ! हे मुंड्या ! हुषार हो सावध हो ! खबरदारीनें राहा. ३ पैगंबर (विराट पुरुष) हेंच मोठें शहर आहे (सार=तत्व). ४ त्या शहरांत (कछु करामतसें=) ज्ञानविज्ञानयोगाच्या करामतीनें (युक्तीनें) तुकोबांनीं ह्मटलें आहे " सांठविला हरि । जिहीं हृदयमंदिरीं ॥ १ ॥ त्याची सरली येरजार । झाला सफल व्यापार ॥ २ ॥) सांईका=परमात्म्याचा व्यापार (परमात्मप्राप्तीचा सौदा). ५ मुंडा पैशासाठीं बडबड करीत राहतो. तेव्हां घरधनी, त्यास ' चूप राहा ' असें सांगतो. येथें असें सुचवितात कीं योगावांचून इतर जपतपादि दांभिक बडबड सोडून चूप बस. [मौन धारण कर.] आणि खऱ्याखुऱ्या मार्गानें (खप=देह झिजव) जा. ६ आकाशाला खैर=खैरात करून टाकून धारणेच्या योगानें आकाशस्थानांत प्राणाचा निरोध करून आकाशाला (म्यान=) व्यापून असणारी सद्वस्तु तिच्या (दरम्यान=) आश्रयानें कुंप आकाशाचें वेष्टन होऊन किंवा छप=लपून, अव्यक्त होऊन रहा. [श्वे. उ. अ. ६ मं. २० पहा] ७ हे मुंड्या आतां तरी त्या तुझ्या संगतीस असणाऱ्या हिजडीचा (विपरीत कल्पना अविद्या हीच हिजडी) हिचा म्हाल= नामरूपात्मक दृश्य पदार्थ, तो [ना लेले=] स्वीकारूं नकोस.

म्हाल, तेरी खापेर[1] काफर चाल । जाहांको[2] ताहां सब तो रहे, अखेर तेरे हाल ॥ २ ॥ अबे मुंडे चैट[3], सब हिस्का करो गट्ट, और घूंसा[4] करो मट्ट । आशापाश[5] छोड मुंडे तेरेकूं जम[6] करेंगा गट्ट[7] [लट?] ॥ ३ ॥ अबे छोड बे मुंडे फंद[8] अछा होना लंगोटबंद[9], अब क्यौं बे हुवे अंध[10] । ऊप्पर[11] [ऊपर ?] म्यानसें दोनो[12] रहना सुलतानसें[13] चंद ॥ ४ ॥ अबे मुंडे लॅाल[14], बढे हो तुमे[15] मगन मस्तबाल, झ्याडा ल्यावे वालोबाल[16], । अलख मांनें[17] [म्यानें ?] खलक[18] देखो, खुदाके[19] तो ख्याल[20] ॥ ५ ॥ [21]ट बे मुंडे झट, खडे

---

१ तुझी [खापर=काफरी जातीच्या दुष्ट लोकांसारखी, काफर=क्रूर वर्तणुक आहे. २ ह्या मृत्युलोकांत क्रूर कर्म करून जें कांहीं मिळवशील ते (स्त्रीधनादि विषय) अथच्या तेथेंच राहतील, व अखेर (तुझ्या प्राणांतकाळीं) तुझ्या जन्माचे हालच आहेत. ३ तरि आतां (चट) झटदिशीं सावध हो, आणि (सर्व हिसका=) जन्ममरण-संसाररूप ओढाताण (गट्ट कर) नाहींशी कर. ४ . मुंड्यास क्रोध फार येत असतो, त्या अर्थीं ह्मणतात तुला सांगितलें ह्मणून क्रोध करूं नकोस! ५ आशारूप बंध. ६ यम=काळ. ७ गिळून टाकील. ८ छंद (ढंग). ९ सर्वसंगपरित्यागी (वैराग्यशील). १० आंधळा (धृतराष्ट्र) कां झालास? ११ उप्पर= उर्ध्व=वायुमूलक आकाश किंवा अपरब्रह्मरूप वेष्टन=(मुळांत "उपर म्यानसे" असे दोन शब्द आहेत, यामुळें असा अर्थ केलेला आहे " उपरम मनसें " असा पाठ आहे, तो तसा असल्यास ' उपरम झालेल्या मनाच्या योगानें ह्मणजे प्रत्याहाराच्या योगानें ' असाही अर्थ होईल.) १२ दोनों प्राण आणि अपान हे दोन्ही वायु (रहना) राहूं द्यावें (समान करावें) स्थिर करावें. १३ सुलतान+सें=बादशहा, हृदयस्थ मनोमय पुरुष (हंस) सें=त्यापासून, चंद=चंद्र असा भाव. १४ तेजाचा वर्ण आरक्त (लाल) किंवा कुंभकाचे वेळीं हृदयांत राहणारा चतुर्मुख, रक्तवर्ण कमल आहे आसन ज्याचें व सर्वांचा पितामह अशा ब्रह्मदेवाला उद्देशून हे शब्द आहेत. १५ या रीतीनें तूं [मगन=ध्याननिमग्न किंवा बडे मगन=मोठ्या धुंदींत, पिशाच्चवत् असणारा] पिशाच्च [मस्त=उन्मत्त] + बाल=बालकवत्] असे सिद्ध पुरुषाचे तीन प्रकार दर्शविले आहेत. १६ या प्रकारें या देहाचा केंसानकेंसाचा झाडा (शोध कर, अपरोक्षानुभव) घे हा भाव. १७ अलख=अव्यक्त, कूटस्थ, या अधिष्ठानावर [मानें=रूपानें, अस्तित्वानें). १८ सर्व प्राणि सृष्टि, नामरूपात्मक जगत् पहा. १९ पुरुष परमात्म्याचे २० विलास [अनेक रूपात्मक जगत् हा सर्व प्रकृतीचा परिणाम आहे, ज्या आधारावर हीं नामरूपें आहेत, त्या आधाराला सत्ता असें ह्मणतात, व त्यालाच पुरुष ही संज्ञा आहे.] २१ असा अनुभव घेऊन त्वरित (सर=निघट) त्या जगतापासून वेगळा हो.

दुनियांमें नट, निकल चष्मका (चक्षुषे) का झट, सबाहीं हंसगत [मत्त,महत् ?] तस्बिरींका धरत्री देखो पट ॥ ६ ॥ अबे मुंडे लॉलचंग, जोग जाहलिमकी भंग, तुम पीवो पडे रहो दंग । जबहूं देख्या तबहूं होना खुषालीका रंग ॥ ७ ॥ अल्लॉ कहां खोद, मुंडे कार्ट काम क्रोध, हरदंमसें करो च्यौद, और कैहांही बैठ कौन क्या करेंगा बेटिच्योद ॥ ८ ॥ झुल बे मुंडे झुल, तुम आपने दिलमें खुल, देखो भवनदीका पूल अल्लानें क्या कमती कीया क्यौं न करेंगा गुल ॥ ९ ॥ सोहिरा कहे खॉक, मुंडे दिल राखो पॉक,

---

१ आणि ह्या दुनियेमध्यें नटा प्रमाणें (खडे=स्थिर हो,) वास्तव्य कर तसा २ चाक्षुषीविद्या, सिद्धींचा दुरुपयोग, किंवा डोळ्यावरचा मळ अज्ञान, इत्यादिकांमधून [निकल] वेगळा हो. ३ आणि अंतर्बाह्य हंसगतीनें=हंसयोगाच्या मार्गानें गमन करून [मत्त, महत्=परमहंस] हो. ४ आणि मग अनेक चित्राकृति विश्वरूप [धरत्री=पृथ्वी] पटरूपानें पहा. ५ लाल=सुख [अद्वैतसुख] हीच एक [जाहलिमकी=तीव्र कडक] भांग ती तूं [पीवो=] पी आणि दंग होऊन पडून राहा. ६ जेव्हांजेव्हां पहावें तेव्हां तेव्हां तुझ्या अंतःकरणांत परमानंदाचीच [रंग=छटा] दिसावी. ७ अल्ला=आत्मरूप ठेवा (निजधन) कोठें तें शोधून काढण्यासाठीं खोदाखोद कर ? ८ तर हे मुंड्या कामक्रोधादिकांना पहिल्यानें कापून काढ ९ इंद्रियदमनरूप योगानें १० च्योद= (आपला आनंदावभास भोग भोगावा असें पुरुपास वाटतें, तेव्हां पुरुप (भोक्ता) विषयी होत्साता, प्रकृतीचा विषयरूपानें उपभोग घेतो) किंवा वेदोक्त चोदनानुष्ठान कर्म. ११ मग कोठेंही बस (कोणचाही आश्रमांत राहा). १२ बेटिचोद हा शब्द कन्यारत झालेल्या सृष्टिकर्त्या रजोगुणी ब्रह्मदेवास उद्देशून वापरलेला आहे. १३ हत्तीप्रमाणें (हत्ती नेहमीं निद्रावस्थेप्रमाणें आनंदमय स्थितींत झुलत असतो) तसा तूं परमानंदीं झुलत राहा. १४ परमानंदरूप हो. १५ भवनदी तरून जाण्याविषयीं निर्भय असा योगमार्ग पूल १६ परमेश्वरानें तुला काय कमी केलें आहे. १७ तो तुला प्रेम कैफ पाजून ब्रह्म अम्मलांत (गुल=) गुंग आनंदांत कां करणार नाहीं ? खचीत करील ! [तुकोबा म्हणतातः-" तो हा न करी तें कायी । कांरे लीन व्हाना पायीं]. १८ ज्ञानाग्नीनें दग्ध होऊन राख [खाक] बनलेलें. १९ पाक=गाळलेलें, शुद्ध केलेलें स्वच्छ निर्मळ.

देखो शून्यमें चिरे[1] आंख । हुवे मुत्रे क्या मरद[2] [मर्त्य ?] आदमी लाखों लाख ॥ १० ॥

पद २७ वें—नकीब[3]

आव[4] गगनमें महालका राजा,[5] हरदम[6] अनु [ना ?] हातका[7] बाजा, दिन र्शामसें गाजा,[8] आप सूरतसों सोज्यों[9] ॥ १ ॥ आव निरंजन[10] तख्त बडा बखत [बख्त[11] ?], मनका[12] राऊत पवनका[13] घोडा, आगमकी

१ चिर=चिरकालिक दिव्यदृष्टीच्यायोगानें [द्रष्टारूपानें] शून्यामध्यें पहा. २ की मरद=मनुष्यादि जीवपुरुष (आदमी=व्यक्ति) मर्त्य=जन्ममरणरूप संसारांत सांपडलेले, असे अनेक लाखोंलाख उत्पन्न होतात आणि मरतात. [शून्यामध्यें उत्पन्न होतात आणि [क्या=कां ?] नाश पावतात हें पहा, म्हणजे अहंकारामुळेंच [तुझ्यामुळेंच] त्यांना जन्ममृत्युरूप संसार प्राप्त होतो हा भाव. ३ मुळांत या पद्यापुढें ' नकीब ' असें म्हटलें आहे पण तो शब्द ' लकीब किंवा लकब ' असा असावासें वाटतें. म्हणजे पूर्वी राजेलोकांच्या दरबारीं भालदार उभे राहत असत. व राजाची स्वारी दरबारांत येतांच ते त्वरेत्वरेनें राजाचें वैभव प्रदर्शक जो ' ललकारणी ' करीत असत, त्याचें रूपक या पद्यांत केलेलें आहे. येथें भालदार म्हणजे निजधैर्य हा होय. लकब—हा शब्द, तलब किंवा धाईच्या प्रसंगीं वाडीप्रांतीं फार प्रसिद्ध आहे.] ४ आव=[आव किंवा आवो=याहो ! महाराजा.] ५ महदाकाश महालाचा राजा गगनसदृश परमात्मा. ६ हरदम=(हर=शिव=(हृदयकमलगत आकाशस्थ) पुरुषरूप चैतन्य) + दम=ध्यान वायूमधून ' हुं हुं हुं ' अशा ध्वनीनें युक्त श्वासोच्छ्वासरूप प्राणवायु (समष्टि प्राणरूप हिरण्यगर्भ नावांच्या सर्व प्राण्यांच्या कारणाला आधारभूत अंतरात्मा). ७ हाच योगशास्त्रोक्त अनाहत चक्रामधील (अनाहत म्हणजे नगारे वगैरे प्रमाणें ताडन केल्यावांचून आपोआप उत्पन्न होणारे जे ध्वनि ऐकूं येतात; हाच (हरदम अनाहतका बाजा= (बाजा=भेरि डंका=राजवाड्यांतील नौबतखाना; असें म्हणण्याचा हेतु. ८ दिवस आणि रात्र यांमध्यें गाजून (देहामध्यें नादरूपानें) गर्जना करून. ९ सुषुप्तीमध्यें (आनंदमयकोशांत (आपसूरतसें=आपल्या स्वस्वरूपानें) सोजा=निजला जातो, लीन होतो. १० मायारहीत एकांत स्थान हेंच तख्त=सिंहासन. ११ त्याच्या राज्य करण्याच्या कालाची मर्यादा म्हणजे (बडा=मोठा, महान + वख्त=काल=) अनंत काल. १२ मनोमय पुरुष हाच राऊत; घोडेस्वारांचा मुख्य शिलेदार १३ प्राणवायु (हिरण्यगर्भ) हाच घोडा.

चलनं, निगमकी रैनं [रहन?] ॥ २ ॥ आव धरत्रीका पाँया, छोडकर मायाँ, ग्यानकी गंया, मगन भया भूपका भूपाळ, सब दुनियाँको लाल ॥ ३ ॥ आव बिबेक पंजरका राम, तूर्या उनको आराम, ग्यान ध्यान तीरथसें अस्नान ॥४॥ अमृतअनुभवको पान, भगत उनकी भान, समाधके पेटमें पैदा, सत उनका बेटा ॥ ५ ॥ आव! प्रेमें उनका गांजा, बिनं पावसे माज्या नहि धर्ते लाजा, एकछत्र उनका राजा ॥ ६ ॥ आव! निगमं जलका मासा, सब आलमका तमाशा । खाने पीनेकी उनकी

१ शास्त्रें हींच त्या घोड्याचें चालणें. २ चार वेदरूप (रैन=लगाम) ज्याच्या तोंडांत आहे किंवा रहन=ठाणें [नेति नेति म्हणून स्थिर राहाणें] ३ पृथ्वीचा (आद्य) पाया=मूलाधारचक्रस्थ गणपतिस्वरूप. ४ मायेला टाकून (माया-व्यतिरिक्त असा]. ५ ज्ञानजलानें युक्त [शारिरस्थ नाड्या; इडा=गंगा; पिंगला=यमुना या दोन नद्यांचें संगमस्थान) अशी गया. ६ राजांचाही सार्वभौम राजा. ७ सर्व दुनियां ज्याच्या आनंदांत (लाल=सुख) सुखी आहे• असा. ८ विवेकरूप वज्रपंचर (पांजरा) त्यामध्यें वसणारा (आत्मा शुक). ९ तूर्या ही ज्याची विश्रांति. १० ज्ञानयोग स्वरूप जें ध्यान, हेंच तीर्थ (आध्यात्मिक तीर्थ) त्यामध्यें ज्याचें स्नान होत असतें. ११ आत्मानुभवरूप (अद्वैतानुभव) अमृताचें जो नित्य प्राशन करितो. १२ प्रेमभक्ति ही ज्याची बहीण. १३ निर्विकल्प समाधीच्या उदरांत उत्पन्न झालेला. १४ सत्=सद्रूप सोऽहं ईश्वर हाच ज्याचा मुलगा (ज्ञानाकारितां आणि कर्माकारितां, 'इंद्रियांना तसाच इंद्रियांचा नियामक जो ईश्वर त्याला त्याने प्रकट केलें हा भाव]. १५ निरतिशय आत्मप्रेम हीच ज्याची पिण्याची गांजा [पूर्वी राजे लोक विशेषें करून मुसलमान बादशहा कांहीं तरी कैफ करीत असत, त्याला उद्देशून हे उद्गार आहेत]. १६ इतर मादक गांजा ओढल्यावांचून माज [मस्तपणा, धुंदी] येत नाहीं, पण ही निर्निमित्त आत्मप्रीतिरूप गांजा ज्ञानवल्ली [बिन पावसे=तयार करून ओढल्यावांचून] माज येतो [ब्रह्मानंद अम्मल येतो] १७ मग कोणच्याही प्रकारची लज्जा धरीत नाहीं. (इंद्रियधर्मरहीत नंगा फकीर होतो] १८ पूर्वोक्त जें महदाकाश=खगोल हेंच ज्याचें सर्वत्र व्यापून असणारें एकच छत्र आहे तें छत्र धारण करणारा राजा. १९ 'आव, आव,' असा शब्द प्रत्येक कडव्याच्या प्रारंभीं वापरलेला आहे त्याचें कारण हेंच कीं, प्रत्येक वैभव वर्णन करण्याचे वेळीं "आव महाराज, अजि महाराज" असें म्हणण्याचा प्रघात होता. २० वेदरूप जलांतील मत्स्य (स्वर ॐ हा अक्षर मत्स्य) २१ आलम=अग्नि वैश्वानर.

खुजेरत दिल लालका[2] साईं ह[3]जरत ॥७॥ आव! जोग[4] पछी [क्षी ?] फल मुमुख[5]की जपमाळ, अनुतापका[6] तप, अजपका[7] जप, नाद बिंद कला [8]ज्योत उनकी तलब[9] ॥ ८ ॥ आव! आनंदका अजब[10], नजरका नचब[11] । सब[12] इंद्रियसें न्यारा, कहत सोहिरा, [13]सोऽहं महाल हमारा ॥ ९ ॥

पद २८ वें.

और कौन करे भजन जिनें[14] ॥ ध्रु० ॥ दिल[15] मेरा विसरों आपने बिचमें । सब झडती लीयी लंपट जननें[16] ॥ १ ॥ सबकी करामत उनके पास[17] । संग बिसंग सब कारण मनें[18]† ॥ २ ॥ गये जनम[19]का सांचा तो

अन्यपाठ:—†(शोधन नर कोहि मग्न उन्मन ?)

१ करामत अन्न पचवुन, रेतवृद्धि करणें, इत्यादि कर्म. २ दिल=मन लालका= मनाला।-लाल=सुख शांतिसुख प्राप्त झालेल्या मनाचा, ३ साईं=प्रभु, (हजरत) सर्व शक्तिमान ईश्वर किंवा आरक्तवर्ण मनाचा साईं ईश्वर. ४ योगरूप जो पक्षी त्यालाच प्राप्त होणारें फल. ५ मुमुक्षूंची जपमाळ (स्मरणी रूपमणिमाला). ६ अनुतापी (विरक्त) जे त्यांचें तप. ७ योगशास्त्रोक्त अजपा नांवाच्या बावन्नाक्षरी जपाचा जप. ८ नाद, बिंदु, कला आणि ज्योति याबद्दल पूर्वी बऱ्याच ठिकाणीं खुलासा केला आहे. ९ हीं चार ही ज्याची तलब= (प्रीय वस्तु वेळच्या वेळीं स्वीकारण्याचें व्यसन). १० आनदाचें परमाश्चर्य (ब्रह्मानंदप्राप्तीनें होणारें परमाश्चर्य). ११ दृष्टिचें नचब=नाचणें (नेत्रद्वारें येरझारा घालणाऱ्या बुद्धीचें) द्रष्टृत्व. १२ सर्व इंद्रियधर्मांहून वेगळा. १३ सोहिरोबा ह्मणतात या प्रकारचा जो (सोहं=मी ईश्वर आहे अशा सत्यज्ञानानें युक्त महाल) तो माझाही महाल आहे. कारण मीही त्या सोहंस्वरूपामध्यें वास करितों. १४ जिन=(स्वतः देवस्वरूप, भगवान्, सत्यज्ञानानंतरूप सर्वज्ञ बुद्ध झाल्यावर [और=] आणखी; भजनादि कर्म कोण करितो ?) [सिद्धांत संहिता पूर्वार्ध पृष्ठ ३ टी. ७ पहा.] १५ सर्व संगतीला कारणीभूत जें मन तेंच मी आपने बिचमे=) आपल्या सत्य ह्मणजे सोहं स्वरूपाच्या ठायीं विसरलों. १६ जनन, शरिरादि भाव उत्पत्तीला कारणीभूत स्थूलदेहाचा, विषयलंपट कर्मेंद्रिय आणि त्यांचे विषय, या सर्वांची त्या मानानें (झडती लीयी=) झाडा घेतला. १७ त्या मनापाशीं. १८ संग किंवा असंग याला कारण केवळ एक मनच आहे. १९ पूर्वजन्मार्जित संचित कर्माचा सांचा बलवत्तर आहे.

बडा ।. सो[1] धन्य [न?] नर कोहि मग्न उन्मन ॥ ३ ॥ तीन्हों[2] ग्राममें घटमठमें रहता । किसें मालुम भगवान ॥ ४ ॥ म्लेच्छ[3] बातसें ग्यान बताया । सोहिरा करे तेरे ध्यान ॥ ५ ॥

पद २९ वें.

भगवानके बंदे! रे[4] बाबू ॥ ध्रु० ॥ ऊर्ध्व[5] बनमों आराम होकर । अना [नु?] हातके[6] नादे रे बाबु ॥ १ ॥ जोगर्जुगुत[8] जागता जोगी । अंतर[9] आनंदें रे बाबु ॥ २ ॥ अजब[10] नज [च?] ब संसार झूटा । छोड्या[12] सबै धंदे रे बाबु ॥ ३ ॥ सोहिरा कहे महाशून्यमें रहता । लग्या[13] उन्मनि छंद रे बाबू ॥ ४ ॥

---

१ त्याचे शोघन करणारा (ज्ञानाग्नीनें तें कर्म दग्धबीज करणारा तो धन्य. नर कीं ज्याच्या मनाला उन्मनि अवस्था प्राप्त झाली सो=तो असा तो. २ भूर्लोक-भुवर्लोक व स्वर्लोक (किंवा स्वर्ग, मृत्यु, पाताल) यांमध्यें आणि घट=प्रत्येक स्थूल देहांत किंवा पृथ्व्यादि घटांत+मठ=लिंगदेह किंवा अभ्राकाशांत; तो भगवत्स्वरूप पुरुष कोठें राहतो ? (किसें मालुम)= कोणाला ठाऊक आहे. अर्थात् तो कोठें असतो हें कोणाला कळणार नाहीं हा भाव. ३ यावनी भाषेमध्यें ज्यानें ज्ञान सांगितलें असा जो त्याचें सोहिरा ध्यान करतो असा भाव. ४ भगवान गुरुचा (बंदे=गुलाम) + बाबु=बालक, लेंकवळा (राजेरजवाडे सरदार, मेहमान यांच्या प्रदरीं गुलामाप्रमाणें वागणारीं कांहीं माणसें वाडीप्रांतीं आहेत, त्यास बंदे किंवा लेंकवळे असें ह्मणतात.) येथें गुरुच्याठायीं अति लीनता दर्शविण्यासाठीं बंदे रे ! + रे=अरे) अरे मी गुरुचा बंदा, बाबू=लेंकवळा, (लेंक) असे शब्द वापरले आहेत. ५ हृदय वन (हृदयस्थान, हृदयाकाश) त्यामध्यें आराम पावून. ६ अनुहात चक्रांमधील नादे (नादानें=योगशास्त्रोक्त हृदयस्थानाचें अनुहातचक्र पहा.) ७ नादानें (अरे! त्या नादानें आराम पावलों हा भाव). ८ योगयुक्तीनें सतत जागृत असणारा (परमसमर्थ) योगी. ९ अंतर्गत (हृदयस्थ) आनंदानें युक्त. १० परमाश्चर्यकारक + नजर = दिव्य-दृष्टीच्या योगानें. ११ संसार खोटा असें जाणून. १२ सर्व प्रकारचा व्यवसाय (धंदे=इंद्रियव्यापार, विज्ञान) सोडून दिलें हा भाव. १३ उन्मनि छंदेकरून निमग्न झालेला असा महाशून्यामध्यें राहतो त्याचा छंद लागला हा भाव.

पद ३० वें.

आहा रे! जोगी! ऑलख! अवधूता! ॥ ध्रु० ॥ बिबेक[2] बैराग्य दोरा सू अजब[3] तांगडिया । निरंजनकी[4] बस्तां कीये बडी[5] गोदडिया ॥ १ ॥ मुं बीन[6] बजावे सुनों[7] गर्म्मत[8] नाद होंगी । मन बे भूल गया[9] ऐसी[10] अनुहात शिं [छी?] गी ॥ २ ॥ तन्मयकूं[11] दीया लीया पीयों[12] अर्धचंद्रा । चिन्मयका[13] उलटा–जोग खेचर[14] मुद्रा ॥ ३ ॥ औरत[15] बिवरत कोही नहीं नहीं उनक बाल । आप[16] बिन बात नहीं ऑंगोचि[17] अछा टॉल[18] ॥ ४ ॥ सब तमासा

---

१ वाडी प्रांतीं कानांत गोरखमुद्रा धारण करणाऱ्या जोग्यांची एक जात आहे त्यांचे चार भेद आहेत; "नाथ, गिरी, पुरी आणि भारती" (पक्षी जोगी म्हणजे योगी. त्याचें दर्शन झाल्यावेळीं म्हणतात आहा रे! योगी अवधूत दत्ता.) त्या जोग्यांचीं चिन्हें योगरहस्यान्वयें येथें दर्शविलीं आहेत. २ विवेक हा दोरा (तंतू) वैराग्य ही सू यांच्या योगानें ३ परमाश्चर्यकारक + तांगडिया=(ठिगळें ठिगळें जोडून एक गोदडी बनांवणें, जुळवाजुळव करणें. पक्षीं पंचभूतात्मक विश्वाची तांगडातागड, पंचीकरण.] ४ मायारहित एकांतस्थानची वस्ति स्वीकारली [वाडी प्रांतांत, हे नाथ जोगी लोक बहुतेक अरण्यांत व डोंगरांत राहत असतात] ५ बडी महान + गोदडिया=पूर्वोक्त गोदडी [महामाया, विश्वमायारूप गोदडी] ६ मुखा-वांचून (शिंगी) वाजवितो. ७ सुनों=तीं मी ऐकतों. किंवा तू ऐक ८ की तींतून मोठा गम्मतीचा नाद निघेल (होईल) ९ मनही त्या नादांत भुलून गेलें १० अशी ती उत्तम प्रकारची अनुहत शिंगी ११ त्या शिंगीचा जो नादरूप रज्जु (मोह) त्यानें बांधलेलें (तन्मय झालेलें) आपल्या चपलतेचा त्याग करून अंतर्मुख झालेलें मन, त्याला दिलें, आणि निरालंब ब्रह्माकार वृत्तीच्या प्रवाहाला धारण करणारी बुद्धि (लीया) स्वीकृत केली. १२ अर्धचंद्र प्याली [हो कां शारदियेचेनि बोलें । चंद्रबिंब पाल्हेलें । कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ॥ २५८ ॥ तैसें शरीर होये । जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये । मग देहाकृति बिहे कृतांत गा ॥ २५९ ॥ ज्ञानेश्वरी अ० ६] १३ चिन्मयका=बुद्धीचा + उलटा योग (जोग) १४ खेचरीमुद्रेचें लक्षण [सिद्धांतसंहिता उत्तरार्ध पृष्ठ १६ टीप १ येथें सांगितलें आहे तें पहा.] १५ औरत=स्त्री, पत्नी (कुटुंब) बिवरत–बायको बिबको असें म्हणतात तसें त्याला कोणाचाच प्रपंच नाहीं. किंवा त्याला कोणी बाळ मुलबाळही नाहीं १६ आपल्या स्वरूपावांचून दुसरी गोष्टच नाहीं. १७ केवल-त्वानें (केवळ शिवरूपानें) १८ मुखी किंवा रक्तांबर अशा ॐ कार स्वरूपानें..

छोडकर[1] नटियाँ[2] संसार झूटमें[3] । त्रिकूट[4] श्रीहाट[5] उलटे[6] बैठे गोल्हाँटमें[7] ॥ ५ ॥ औटपीठ[8] समाधमों भ्रमर[9] गुंफका बासी । पर्तबिंब[10] बे नहीं निरालंब[11] संन्यासी ॥ ६ ॥ ग्यान[12]गंगा तीरथ पछिम[13]पंथ चिदंबर[14] । द शवे [से[15] ?] द्वारकूं निद्रा कीये नाथ दिगंबर ॥ ७ ॥ नाद[16] बिंद कला ज्याके तनकी बभूत । रूप[17] नहीं रेख देख जग जागति ज्योत ॥ ८ ॥ आवर्ता[18] जाता पुरुख नहीं लग्या पैशूनता[19] । आपनें खेलसें खेलता सोहिरा कांहींचि न सूनता[20] ॥ ९ ॥

---

१ सगुण मायेचा (तमासा) खेळ टाकून. २ सोंगाड्याप्रमाण वर्तणूक करणारा. ३ मिथ्या संसारामध्यें. ४ त्रिकुट=ब्रह्मांडांतील स्थूल देह (ॐ) ५ श्रीहाट=तालूंत ज्ञानशक्ति राहण्याची जी जागा, त्या स्थानास ह्मणतात. ६ ही दोन्ही स्थानें (त्रिकुट=स्थूल व श्रीहाट सूक्ष्म) टाकून. ७ गोल्हाटमें=[कानशिलावरच्या भागीं दोन गोल्हाटें (दोन्ही गोल्हाटामध्यें श्रीहाट स्थान.) श्रीहाटामध्यें तृतीय नेत्र. तिसऱ्या डोळ्यावर औटपीठ स्थान आहे.] [वेदांची साक्षिणी । उभी असे गोल्हाटस्थानीं अवस्थातीत उन्मनि । भोगितो योगिराज सुखें ॥ ११ ॥ ज्ञानेश्वर, ज्ञानोपदेश.] ८ महाकारण देहरूप समाधीमध्यें [पैल तूर्येचे पाठारीं । औटपीठाचे शेजारीं । अर्धमात्रेचे महाद्वारीं । निजरूप उभें असे ॥ २ ॥ ज्ञानेश्वर, ज्ञानोपदेश.] ९ बुद्धिरूप गुहेमध्यें (पक्षीं—सहस्रदलचक्रांतील जो मध्यबिंदु त्या बिंदूच्या आंत भ्रमरगुंफा स्थान आहे) त्यांत वास करणारा. १० ज्याला प्रतिबिंबही नाहीं असा. पंचमुद्रांच्या अभ्यासानें, प्राण सुषुम्नेंत प्रवेश करून संचार करूं लागतो, तसतशी त्या स्वाभावीक बारा अंगुळांची गति कमीकमी होत जाते, व एक बोट गति राहिल्यानें साउली नाहींशी होते. (पातजलयोगशास्त्र अभिप्राय पादः २ पृ० ८७ पहा.) किंवा ज्याच्याठायीं अहं ब्रह्मास्मि स्फूर्तिही नाहीं, अर्थात् त्या स्फूर्तिरूपदर्पणांचाच जेथें अभाव, तेथें प्रतिबिंबाचाही संभव नाहीं. ११ अन्य आश्रयरहीत स्वयंभू स्थिर. १२ ज्ञानगंगा तीर्थावर नेहमीं स्नान करणारा. १३ वाममार्ग, सुषुम्नामार्ग, १४ चिदाकाश हेंच अंबर (वस्त्र). १५ दहावें द्वार ब्रह्मरंध्रस्थानीं निद्रा केली आहे ज्यानें असा. १६ नाद, बिंदु, कला ही ज्याच्या देहास लावण्याची विभुती. १७ रूप नाहीं आकार नाहीं. १८ जग हेंचि ज्याची जाग्रति स्वरूप ज्योति आहे, ही पहा. १८ येणारा जाणारा नव्हे असा पुरुष ह्मणजे क्षराक्षरातीत उत्तम पुरुष. १९ येणें व जाणें याला (पैशूनता) नष्टत्व दिलें ह्मणजे लय केला. २० कांहींच ऐकत नाहीं, याचा भावार्थ हाच कीं, समाधींत असणाऱ्या योग्याला इंद्रियास अविषय व केवळ बुद्धीनेंच जाणण्यास योग्य अशा कैवल्य सुखाचा अनुभव येतो, तेव्हां तो समाधीपासून चळन होत नाहीं. व वाचा श्रवणादि इंद्रियधर्म नष्ट होतात.

पद ३१ वें.

ऑलेख ऑलेख कर फेर जोगी औटकर बनीं[1] । नगरीमें[2] निज मैठकूं[3] जानेकूं बिचार करे मनीं ॥ ध्रु० ॥ नाडिबंदके अचळ चित्तकी कौपीन[4] लगावे । षट्‌वैरी बैरागी पिचकर वो बभुत चर्चावे[5] । अवधूत[6] नामें श्रवनीं अच्छा मुद्रा[7] बतावे ॥ १ ॥ अहं[8] फाटकर कफनी करकर आंगि चढावे । भावके[9] झोळी करकर भक्तिकूं बिचमें रखतावे । सबके समता[10] वंदुनि शिरपर छ [श ?] या बतावे ॥ २ ॥ विनंति वंदन करिजों तेरे जोडुनि करकमळ । मेहरबानीसें करिजो मेरा चित्तके गंगाजल । कहत सोहिरा[11] × × × × × × ॥ ३ ॥

---

१ ऑलेख ही नाथपरंपरेंतील (अलक्षमुद्रेची) खुण आहे. याप्रमाणें अलक्ष मुद्रा धारण केलेला. (या मुद्रेचें लक्षण ' सिद्धांतसंहिता उत्तरार्ध पृ० २३ टीप १ येथें खुलासा आहे तो पहावा.) असा (जोगी=योगी) ' ऑलेख ऑलेख ' पुकार करीत, औटप्रमाण (साडेतीन हात स्थूलदेह) बनीं=स्थूलदेहरूप वनामध्यें (अरण्यांत सांपडलेला म्हणजे नरदेहाला प्राप्त झालेला असा. (फेर=पुनः (उलट) असें म्हणण्याचें कारण (पूर्वाश्रमांत) आपल्या मूळ ठिकाणीं जाण्यासाठीं पुनः प्राप्त झाला असा भाव. २ शून्य नगरीमध्यें (आपल्या मूळच्या गावांत). जीव मुळीं शून्य नगरींतून निरिच्छ मनानें बाहेर निघाला होता. पण पुढें तो संसारवनामध्यें सांपडला. ३ मठ=संन्यासाश्रम (पक्षी पूर्वीच्या पदांत सांगितलेला ' भ्रमरगुंफा मठ) त्यामध्यें जाण्याचा त्यानें मनांत विचार केला, निश्चय केला: ४ नैष्ठिक ब्रह्मचर्याच्या योगानें स्थिर झालेल्या चित्ताची ज्यानें कौपीन (वज्रलंगोटी) करून लावली आहे, धारण केली आहे. ५ कामादि षड्रिपु (पिचकर=ज्ञानाग्नीच्या योगानें त्यांस जाळून त्यांचें भस्म करून, ती विभूति आंगाला चोळून (बैरागी बनला) वैराग्यशील झाला. ६ अवधूतादशा धारण केल्याच्या योगानें अवधूत नाम प्राप्त झालेला. ७ कानामध्यें पूर्वोक्त अलक्षी मुद्रा दाखविती. ८ अहंदेहाहंकार-(अहंवृत्तिरूप पट) रूप वस्त्र फाडून त्याची कफनी करून आंगी (आंगडें) आंगात चढवलें. ९ भावाची झोळी करून आंत नवविधा भक्ति ऐक्यरूपानें ठेवलेल्या आहेत. १० सर्व भूतीं समता ठेवून ब्रह्मरंध्रस्थानीं ज्यानें शय्या (सुख निद्रा) करून (समतारूप शय्या) दर्शविली आहे. ११ सोहिरोबा म्हणतात असा योगी ' ज्यानें माझें चित्त गंगाजल केलें, अर्थात आपल्या चैतन्यसागरामध्यें माझें चित्तगंगारूप जल सामील केलें; हे साधका! अशा पायीं, तूं करकमल जोडून (मनोमय कोशाचे दोन हस्त; कर्म, अकर्म; ते जोडून एकत्र करून (सम करून) विनंति (करिजों=) कर जा).

पद ३२ वें.

घर आये ओ जान नंदनंदन बंधनकी ॥ ध्रु० ॥ योहीं गुन समज करे सो प्रान पुराना, और सब नरकूं भ्रम भूली करकर काल किजावे ॥ १ ॥ सूरत सबाह्य देख बिनेतनसें बैस समजे समजावे ॥ २ ॥ प्रेमे प्रीतका देखनवाला, श्रीगुरुका प्रसाद सोहिरा सहज अंतर गावे ॥ ३ ॥

पद ३३ वें.

मेरो घरमें यही जग [जुग?] जाग रही रे ॥ ध्रु० ॥

---

१ घर=नरदेह (पक्षि, मठ किंवा आश्रम) आणि तदंगभूत (जान=जीवित्व, जीवत्व) हें नंदाचा नंदन=नारायण श्रीकृष्ण त्याला प्रेमपाशानें बंधन करण्यास योग्य (बंधन करण्याच्या लायकीचें) सहज प्राप्त झालें आहे. या देहांत प्राप्त होऊन जो हृदयस्थ नारायण (अनंत) त्याला बंधन करील, त्यालाच "नर" असें म्हणावयाचें. अर्जुनानें प्रेमपाशानें नारायणाचें बंधन केलें होतें, म्हणूनच त्याला "नर" असें म्हणतात. तुकोबांनीं म्हटलें आहे [नम्र झाला सर्वां भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥ १ ॥] तसेंच कबीर म्हणतात [बंगला खूब बनाया वे । अंदर नारायन सोये ॥ ध्रु० ॥]. २ या नरदेहाच्या साधनानें ज्यानें गुणकर्म (गुन=प्रकृतीच्या तीन गुणाचें कर्म. भ० द्गी० अ० ३ श्लो० २७ पहा.] समजून घेतलें (सो=तोच) तोच (पुराना=जुनाट+प्रान=हिरण्यगर्भरूपाप्रत पावलेला) नर होय. ३ ज्यांना ह्या प्रकृतीच्या गुणांचें अज्ञान आहे, असे जे अन्य नर त्यांना भ्रमाचें भुरळ घालून प्रतिजन्मीं (जन्ममरणरूप संसारांत घालून) काळ घेऊन जाईल. ४ त्या श्रीकृष्ण परमात्म्याचें स्वरूप, आंत (देहाच्या आंत) व बाहेर विश्वामध्यें) पहा. ५ बिनतनसें=इंद्रियें किंवा देहरहीत अशा देहाच्या आंत (हृदयांत बसून). ६ समज=विषयांचें ज्ञान+समजावे=इंद्रियांस आपापल्या विषयांचें ज्ञान करून देतो. [भ० द्गी० अ० १८ श्लो० ६१ पहा]. ७ तो फक्त एक प्रेमप्रीति (प्रेमभक्ति) मात्र पाहणारा आहे. [कृपाघन भक्तीं आकळिला]. ८ त्या परमात्मस्वरूप श्रीगुरूचा प्रसाद (साक्षात्कार) झालेला, हा सोहिरा सहज भावानें (साहजिक त्याच्याच स्फूर्तिप्रभावानें अंतर्गत हेतु गातो असा भाव.) ९ मेरा घरमें=(विराट स्थूलदेहामध्यें) यहि=हें+जग, किंवा जुग असा अन्य पाठ आहे त्या अन्वयें:—कलियुग म्हणजे सांप्रत 'कलियुग' रूपानें भासणारें जग.+ जाग रही रे=रै=अरे! + जागरही=सतत जागृतीनें राहिलेलें आहे भ० द्गी० अ० २ श्लो० ४५ यांत भगवंतांनीं सांगितलेल्या रहस्यान्वयें. "यहि जग जाग रही रे"

झंझो झण झणण बाजे बीना । नागरे नार नाँचत गावत जबहूँ कही रे ॥ मेरा० ॥ १ ॥ अढळ जंजीरमें बखतनि बैठ्या । फेर आवतकी बात नहीं रे ॥ मेरा० ॥ २ ॥ तलपेत प्रेमके नदिया बहात । हरबखत सोहिरा गहि रे ॥ मेरा० ॥ ३ ॥

पद ३४ वें.

परबेत परबत मैनाँ खडी ॥ ध्रु० ॥ बीनपंखं, पगवाँबिन,

असें ह्मटलें आहे. (यहि जुग) असा अन्य पाठ आहे त्याचें रहस्य असें कीं:— जीव हा जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडला आहे. तो युगाच्या आरंभीं जन्मास येऊन युगाचा लय होईपर्यंत एकसारखा या विश्वचक्राच्या फेऱ्यांत आहे, तो जागृत होईपर्यंत प्रत्येक युगांत असेंच रहाटगाडगें त्याला चालवीत आलें पाहिजे.

१ या चरणांत सूक्ष्मदेहामध्यें ब्रह्माचें जें नादसंज्ञकरूप असतें, त्याचें दिग्दर्शन केलें आहे. २ शून्य नगरीचे नागरिक ह्मणजे अ, उ, म; ह्या प्रणवाच्या तीन मात्रा त्यांची (नार=नारी अर्धनारी, अर्धमात्रा) कलावंतीण पक्षीं 'निरंतर ज्ञानस्वरूपें करून भासणारा जो कूटस्थ, त्याच्या प्रकाशानें प्रकाशित होऊन नानाप्रकारचें नृत्य करणारी बुद्धि, (नाचत=नाचणें=एकदां घटाकार होणें, एकदां पटाकार होणें.) ह्या विश्वनाटकांत अहंकार हा मुख्य यजमान, विषय हे प्रेक्षक जन, बुद्धि ही नाचणारी कलावंतीण, इंद्रियें हीं तालमृदंग वाजविणारे. ३ प्रथमतः नादब्रह्माचें रूप दर्शवून येथें शब्द (वाचा) ब्रह्माचें रूप दर्शविलेलें आहे. ४ अढळ=अक्षर कूटस्थ (चैतन्यसागर) त्यामध्यें असणाऱ्या + जंजीरमें= किल्ल्यामध्यें [सोहिरोबाकृत पद्यसंग्रह भा० ३ पद्य १ लें, व त्याचें परिशिष्टाचें पान ११–१२ पहा. ५ तलपत=तलगत, दोहीं तडांनीं वळसे घेत वाहणारी प्रेमनदी ती. [हरबखत=हरवेळां, सतत, नित्य;] वहात वहात जाऊन चैतन्यसागराला मिळाली आहे, ह्मणजे तन्मय झाली आहे. ६ परबत=पर्वत (शरीरस्थ कूटस्थाला त्रिकुटगिरी, मेरू हिमालय अशा संज्ञा योगरहस्यान्वयें दिलेल्या आहेत. (परबत परबत असें द्विरुक्तीने ह्मणण्याचें कारण हेंच असावें कीं, "प्रत्येक स्थूल देहामध्यें हा त्रिकुटगिरी आहेच अर्थात् त्या प्रत्येक पर्वतावर ' ही मैना (खडी) उभी आहेच. ७ मैना ह्मणजे वाणीरूप स्फूर्ति (स्थूलदेहरूप पिंजऱ्यांत राहून शब्द करणारी) ८ महत्तत्व आयेच्या ठिकाणीं असणारे [निवृत्ति आणि प्रवृत्ति हे] दोन पक्ष. ९ पगवाबीन= पाय नाहींत अशी. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, ह्या तीन पादांविरहीत अशी तीर्थरूपा.'

नखें चंचुवां; जीकी लगी लगन नयनसें [नैनोंमें?] बैंढी ॥ परबत० ॥१॥ अलच्छ पँच्छिनी [पच्छीनी?], शुभ संलच्छनी, [शुभसें लच्छिमी?], ऐशीकी प्रीत मनमें जडी ॥ परबत० ॥ २ ॥ कहत सोहिरा मर्दमँर्जीका, लाल गुरुजीका; इतर कोयि भेद जानत, बिरली गडी ॥ परबत० ॥ ३ ॥

---

१ विननख=जिला नखें नाहींत अशी. [मी देह आहें अशा बुद्धीनें युक्त जीं नखें तीं जिला नाहींत अशी.] २ दोन चंचुपुटें ह्मणजे जीव आणि शिव हीं होत. ३ तीक्ष्ण ज्ञानदृष्टिरूपा, दिव्यदृष्टिरूपा, ४ अलक्षी मुद्रा एतद्रूपा [या मुद्रेचें लक्षण सि. सं. उ० पृ० २३ टीप १ येथें दिली आहे ती पहावी.] ५ कल्याणकारी अशी सद्रूप लक्षणानें युक्त. ६ इनें कृपा केलेला असा जो. ७ (मर्द=धीर पुरुष प्राज्ञ) असेल आणि तसाच सद्गुरूचा लाल=प्यारा किंवा प्रेमसुखास प्राप्त झालेला जो पुरुष असेल, तोच हिच्या स्वरूपाचा भेद (वास्तविक मर्म) जाणण्यास समर्थ होईल. ८ पण असा गडी (पक्षी नरगडी) विरळा क्वचित् हिचें मर्म जाणण्यास इतर कोण पुरुष समर्थ होईल [देवीभागवत तृतीय स्कंध अ० १८ श्लोक ३६, ३७ पहा].

सोहिरोबानाथकृत पद्यसंग्रह भाग १ याचें शुद्धिपत्र.

१ चुकून राहिलेले शब्द, पाठभेद व शब्दांचें शुद्धिपत्र.

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
	पद १ लं.	
१	॥ ध्रू० ॥	॥ ध्रु० ॥
,,	परम प्रकाश	परम प्रकाशक
,,	तिन्ही गुण हे	तीन्हि गुण हे
२	जिव हे	जीव हे
,,	वि कासलें मन	विकासलें गगन
,,	अलख निरंजन	अलॅख निरंजन
	पद २ रें.	
,,	जीव हा उद्धार रे	जीव हा उद्धर रे
३	राम दाता	राम धणी दाता
	पद १० वें.	
१५	सर्व भूर्ती हा अगोचर	सर्व भूतिं हा अगम्य अगोचर
	पद ११ वें.	
१६	दुरित निवारी	दुरित निवारील
,,	शेवट आवरूं	शेवट मन आवरूं
	पद १३ वें.	
१९	जावासि	जीवासि (या पदाची चाल " कांहीं बोलो महाराज " या पदाच्या चालीवर आहे. राग कल्याण.)
२०	अन्यपाठ=जीवित्व	जीवित्व
	पद १८ वें.	
२२	पाण्याला पाणीरे (याचा अन्यपाठ शुद्धभागांत लिहिल्याप्रमाणें आहे.)	पाणीला पाणीं रे (याचा अर्थः— पाणी ह्मणजे हस्त. हृदयीं धरावा आणि हातास हातानें धरून आपलासा करावा हा भाव.)
	पद १९ वें.	
२३	जो भव रण घाय	जो कां भवरणघाय

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
	पद २१ वें.	
२४	स्वामि तो आठवा	स्वामि तो आठवा आतां
२५	सकळ सृष्टि	सकळही सृष्टि
	पद २३ वें.	
२६	सत् संताला	(अन्यपाठ):— सत् असताला
	पद २४ वें.	
,,	चिद्धन	चिद्घन
	पद ३० वें.	
३२	जिव हा	जीव हा
,,	वतंस	अवतंस
	पद ३१ वें.	
,,	मोठा कींरे ब हा	मोठा कीं रे बा ! हा
	पद ३२ वें.	
३३	पद २३ वें	पद ३२ वें
,,	॥ ध्रृ० ॥	॥ ध्रु० ॥
,,	नाम रूपी ण नाना	नामरूपीं या नाना
,,	बहु बतार	बहु अवतार
	पद ३३ वें.	
३४	शुभ वसनाला	शूभ्र वसनाला
	पद ३४ वें.	
३५	आमोदीं ठसा	आमोदीं डसा
	पद ३५ वें.	
३५	सर्वत्र बसे रे	सर्वत्र वसे रे
	पद ३६ वें.	
३६	सायास सांपडली	सायासें सांपडली
३६	फुगा रे	फुगारे
,,	जैसें जळ गा रे	जैसें जळ गारे

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
	पद ३८ वें.	
३७	मा वना	[अन्य पाठ]:—माव ना ?
	पद ३९ वें.	
३८	प्राण्या तूं	प्राण्या स्मर तूं
,,	निरंतरि हे	तपति निरंतरीं हे
,,	कमलनयन पहा	कमलनयन तो नयनिं पहा
	पद ४१ वें.	
३९	तें सदैव आहे येथ	तें सदैव आहे तेथ
,,	तें मिथ्या नासे तेथ	तें मिथ्या नासे येथ
	पद ४४ वें.	
४१	चहुं वाचा गूज	चहुं वाचातीत गुज
,,	दह हें	देह हे
	पद ४६ वें.	
४३	कवणा कोण भेटलें	[अन्यपाठ]:—कवणा काय भेटलें
	पद ४८ वें.	
४४	" विसरेना विवेक मंत्रा मी " या पुढील चरण चुकून पडावयाचा राहिला तो बाजूस लिहिला आहे	उगीं पाहतों जीवयंत्रा मी ॥ ६ ॥
	पद ४९ वें.	
४५	यांत जो	यांत जो अलिप्त ॥
	पद ५३ वें.	
४६	गभवाशीं	गर्भवाशीं
	पद ५७ वें.	
४८	चिद्गन	चिद्घन
	पद ५९ वें.	
४९	गंथर्व सुस्वरें	गंधर्व सुस्वरें

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
	पद ७० वें.	
५८	गंध न करी	गंधन [गंजन ?] करि
	पद ७१ वें.	
५९	असत्य वादी सदाचा	असत्यवादी सदांचा
	पद ८५ वें.	
६७	पारपर	[अन्यपाठ]:— पारंपर
,,	वरादना	वरदाना
,,	आनंदें ग्राचे	आनंदें नाचे
	पद ९३ वें.	
७१	अतवंत जीवनत	अंतवंत जीवजंत
,,	विस्मतितिनें	विस्मृतिनें
	पद ९५ वें.	
७२	भत्रभ्रम	भवभ्रम
	पद ९६ वें.	
७२	गोकळ वृंदावन	गोकुल वृंदावन
,,	अत्रतारी	अवतारी
	पद ९७ वें.	
७३	विराली हे बुद्धि	(अन्यपाठः)=" विराली देहबुद्धि " " विराली अहंबुद्धि "
	पद १०८ वें.	
७७	भक्त जना मुखीं	भक्तजना मुखीं
	पद ११९ वें.	
७९	गणि असोनि गुणातीत	गुणीं असोनि गुणातीत
	पद १२१ वें.	
८०	सभासिंच	साभासींच
	पद १२८ वें.	
८१	सांवळ सुरत	सांवळी सूरत

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
	पद १३२ वें.	
८३	परमामृत सुख	परमामृतसख
,,	सागत	सांगत
,,	आट्ठनि	आट्ठनि
	पद १३४ वें.	
,,	तुझा तूं विरखें जी हें निजब्रीद	तुझा तूंचि राखें जी हें निज ब्रीद
,,	भाविना	भाविता
,,	तूं गोविंद	तूं गोविंद
	पद १३५ वें.	
,,	सिद्ध चिदतर्यामा	सिद्ध चिदंतर्यामा
	पद १४२ वें.	
८५	तुझेनि योगें परमसुख ॥ ध्रु० ॥	तुझेनि योगें परम सुख आह्मां ॥ ध्रु०॥
	पद १५४ वें.	
९२	आनी	आनीं
,,	ह साह्यणें	हें शाह्यणें
	उपदेशपर पदें.	
	पद १ लें.	
९६	हा ॐकारहि जाहला	हा ॐकारचि जाहला
,,	(अन्यपाठः) हें हांकुनि जाता	हें टाकुनि जातां
	पद २ रें.	
९८	पडल	पडेल
,,	स्वयंप्रकाशश	स्वयंप्रकाशक
,,	(अन्यपाठः–) हें स ' प्रकाशश	सर्वप्रकाशक
	पद ३ रें.	
९९	विवेकाचि	विवकाची

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
	पद ४ थें.	
१००	(अन्यपाठ) येथें चूक आहे	ह्मणे सोहिरा*गुरुनाथ हा (येथें फुली पाहिजे)
,,	मूळ पदांत कसून या शब्दावर [२] आंकडा आहे	त्याची टीप पाठभेद या सदरांत गैबनाथ. या पुढें पडली आहे
,,	भगवं शब्दावर ३ आंकडा आहे	तो अंक रद्दबातल समजावा.
	पद ५ वें.	
१०१	घाळे	घोळे
,,	दुःख शोकें दांत वासून	दुःख शोकें पडतो दांत वासून
	पद १० वें.	
१०३	[अन्यपाठः] भा ने विण	भावनेविण
	पद १३ वें.	
१०५	(टीप) गर्भ वासाच	गर्भवासाचें
१०६	(टीप) जाव कुरंगा	जीवकुरंगा
,,	ाव ाय संसार	विषय संसार
	पद १५ वें.	
१०७	(टीप ८) टे हाचे	देहांचें
१०८	बा गा	बागा !
,,	(टीप १) हें बाबा	हे बागा !
	पद १८ वें.	
१०९	पारमळा	परिमळाला
	पद २० वें.	
१११	निरंजनीं छेद	निरजनीं छंद
	पद २३ वें.	
११२	मन हें आढा	मन हें ओढा
,,	विकला	विकल्प
	पद २५ वें.	
११३	विषयांची बस्त	(अन्यपाठः—) विषयांसी घसंत
,,	ती जे कां	जे कां

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध त पूर्ण.
	पद २६ वें.	
११४	अंतर बाहेर	अंतर बाहेर
	पद ३२ वें.	
११७	ज्याण	ज्याणें
	पद ३४ वें.	
११९	(चरण २) मन थोंट	मन होय थोटें
,,	सांडी विषयाच	सांडीं विषयांचा
	पद ३५ वें.	
१२०	(चरण) दु:खीं सुखी हो	दु:खी ॥ सुखी हो. ॥ १ ॥
	पद ३६ वें.	
१२०	(टीप ६) १ अ क्ष	१ अलक्ष
	पद ३९ वें.	
१२२	(चरण ५) कांहीं नासेल	कधीं नासेल
	पद ४६ वें.	
१२६	(च. २) जीविल्व रोगेनें	जीविल्व रोगेलें ॥
	पद ५२ वें.	
१२८	(च. ५) मी हेंचि तराया	मीं सांगतों हेंचि तराया
	पद ५४ वें.	
१२९	(च. ४) निजधाभी निजा	निजधामीं निजाला
	पद ६१ वें.	
१३२	निरंजिनीं	निरंजनीं
,,	तांडलिया	तांगडिया
	पद ६८ वें.	
१३६	(च. ४) ब्रह्मपद तें	ब्रह्मपद तें ॥ भजन० ॥ ४ ॥
	पद ७६ वें.	
१३९	(च. २) नानालील	नाना लीला

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
	पद ७९ वें.	
१४०	(टीप ४ कां हि गुणी	कीं हें गुणीं
	पद ८४ वें.	
१४३	(पृष्ठांक १४३) असा आहे, तेथें	१४३ पाहिजे
,,	(चरण २) कोठुनि नेणें	कोठुनि नेणों
	पद ९१ वें.	
१४७	(च. २) भव पलरे	भव पैल रे
	हिंदुस्थानी पदें.	
	पद १९ वें.	
१८७	(टीप ४) पर शत्रची	शत्रूची
	पद २० वें.	
१८९	कायकुं	कायकुं
	पद २१ वें.	
१८९	(टीप १०) अहकार	अहंकार
	पद २४ वें.	
१९३	(टीप ८)	आधीं प्रपंच
	पद २६ वें.	
१९६	क्षहार	शहार
१९७	(टीप १५) तुकोवा	तुकोबा
१९८	सुवे	मुंवे
	पद २७ वें.	
१९८	तख	तख्त
१९९	सत उनक	(अन्यपाठ) संत उनका
२००	फल	फल
	पद ३० वें.	
२०२	मबीन	मूंबीन
,,	उनक	उनका

सोहिरोबानाथकृत पद्यसंग्रह भाग १ ला यांतील पद्यांची सूचि.

ॐ

योगिराज सोहिरोबानाथकृत पारमार्थिक पद्यसंग्रह.

भाग २ रा.

प्रासंगिक व वेदांतविषयक पदें.

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १ ॥

भगवद्गीता अ. ४

हा

भगवंत बाळकृष्ण पै, रायकर.

व

डा० अनंत नारायण सांबारे, एल, एम, एन्ड एस.

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन
जुनाट हस्तलिखित प्रतींच्या आधारें तयार केला.

तो

'इंदुप्रकाश' स्टीम प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केला.

सन १९०७.

किंमत १। रुपया.

कैलासवासी

नामदार न्या. मू. महादेव गोविंद रानडे.

एम. ए., एल.एल. बी., सी. आय. ई., इ. इ.

यांस

त्यांची स्वदेशोन्नतीविषयीं कळकळ, मराठी भाषेच्या

उत्कर्षार्थ त्यांचे अगणित श्रम, इत्यादि अनेक

पूज्य गुणांचें अभिनंदन करण्याकरितां

हा भाग त्यांस प्रकाशकांनीं

अत्यादरपूर्वक अर्पण

केला आहे.

प्रस्तावना.

उदाराः सर्व एवै ते ज्ञानी त्वात्मैव मेमतम् ।
आस्थितः सहि युक्तात्मा मामेवानुत्तमांगतिम् ॥ १८ ॥

भ० गी० अ० ७

योगिराज सोहिरोबानाथ

आपल्या परम पवित्र आचरणानें, निःसीम ईश्वरनिष्ठेनें, अत्यंत नीति-श्रद्धेनें सामान्य जनांस भक्ति नीति ज्ञान वैराग्यादि सद्गुणमार्ग दर्शक जे अनेक महात्मे व सत्पुरुष या महाराष्ट्रांत अवतीर्ण झाले, त्यांत सोहिरोबा-नाथांची श्रेष्ठत्वानें गणना आहे. भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें आहे कीं जे पुण्यवंत असतात ते मला भजतात. त्यांचे चार भेद आहेत; आर्त म्हणजे रोगपीडित, जिज्ञासु म्हणजे ज्ञान मिळवूं इच्छिणारा, अर्थार्थी म्हणजे धनादि-कांची इच्छा करणारा आणि चौथा ज्ञानी. हे सर्वहि जन उत्कृष्ट, पण त्यांत ज्ञानी तर माझा आत्माच असें मी मानितों. या भगवद्वाक्यानुरूप सोहिरो-बानाथ हे परमात्म्याचे परम ज्ञानी भक्त होऊन गेले, यांनीं एका पदांत म्हटलें आहे कीं [कर्मभोग आणि ज्ञानयोग हा, समतुल्यचि सांवरूं ॥ ब्रह्मार्पण हें करुनि सकळही, अहंकृति परिहरूं ॥ प्रपंचरचना देखुनि कधींच, नयन न बावरूं ॥ म्हणे सोहिरा कैवल्य जीव हा, जिताचि असतां मरूं ॥ ५ ॥ पद्य सं० भा० १ पृ० १६ पद ११ पहा)

[अनेक देश फिरोन । जगदोद्धार केला पूर्ण । पंढरीसी येतां जाण । श्रीभगवान् आले सामोरे ॥ ११३ ॥ धरिला हातीं सोहिरा । म्हणती माझा तूं सोहिरा । भेटलासी मज योगेंद्रा । सुदीन खरा जाहला पैं ॥ ११४ ॥ आजी घडलीं पर्वे सकळें । ऐसें बोलिलें श्रीविठ्ठलें । देव भक्तांसि आलिंगन जाहलें । नाहीं उरलें द्वैत तयां ॥ ११५ ॥ रंगशिळेवरी भजन । सोहि-

रोबा ते करिती पूर्ण । विटेवरी जगजीवन । आनंदानें डोलतसे ॥११६॥ कांहीं दिवस राहुनी तेथ । तोषविला श्रीरुक्मिणीकांत । समर्थ अवतार गहिनीनाथ । सोहिरा ह्मणत जन त्यासी ॥ ११७ ॥ " श्रीराजाराम प्रासादीकृत, " " भक्त मंजरीमाला ग्रंथ " अध्याय ९४ वा]

महाराष्ट्र काव्योदधीतील भक्तिपर व परमार्थपर अशा कवितेंत या सोहिरोबानांच्या कवितेची श्रेष्ठत्वानें गणना आहे असें आम्हास वाटतें. यांच्या कवितेपैकीं "सिद्धांतसंहिता" ग्रंथ अ० १८ पूर्वार्ध व उत्तरार्ध हे भाग योगिराज "सोहिरोबानाथ त्रैमासिकांतून" आम्ही छापून प्रसिद्ध केले आहेत आज या भागांत १३८ पद्यांचा समावेश करून त्यास 'पद्य संग्रह भाग २' असें नांव देऊन महाराष्ट्रीय बंधूंपुढें सादर करीत आहों. यांत प्रासंगीक आणि वेदांतविषयक पदांचा मात्र संग्रह केलाआहे. शेवटीं सर्व पद्यांची वर्णानुक्रमवार सूची जोडली आहे. कित्येक ठिकाणीं हस्तदोषाच्या चुकीनें मुळांत शब्दच कमी पडले आहेत. (उदाहरणः—विठ्ठलपदपंचक पद ६ पृ० ८ येथें:—'निर्विकार ज्यासी' असें आहे तेथें 'निराकार, निर्विकार ज्यासी' असें पाहिजे होतें.) त्यामुळें छंदोभंग होऊन अर्थ विपर्यासही होतो. यासाठीं सोबत शुद्धिपत्र जोडलें आहे; त्याकडे जिज्ञासूंनीं लक्ष पुरवावें. याच भागांत अभंग सुद्धां द्यावे असा आरंभीं विचार होता परंतु तो बेत रहित करून हा भाग पुरा केला आहे; त्या बद्दल शेवटीं टीपेंत सूचना दिली आहेच.

ज्या गृहस्थांनीं या कवितेच्या जीर्णोद्धारार्थ द्रव्यद्वारा व अन्य तऱ्हेनें केवळ निरपेक्षबुद्धीनें सहाय्य केलें त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहों.

या भागांत आलेल्या पदांपैकीं बहुतेक पदें आम्ही शके १८०६ या वर्षी 'पदसंग्रह' नांवाचें पुस्तक निर्णयसागर छापखाना मुंबई यांत छापिलें त्यांतून प्रसिद्ध केलेलीं आहेत. परंतु त्या वेळीं सांपडलेल्या हस्तलिखीत पोथ्यांत बरींच अशुद्धें होतीं तीं तशींच राहून गेलीं होतीं. तीं या वेळीं

होतां होतील तेवढीं शुद्ध करून घेतलीं आहेत, व पाठ भेदही आढळले तेवढे दिले आहेत. बरींच पदें आजवर प्रसिद्ध न झालेलीं अशीं आहेत. ज्या सद्गृहस्थांकडून हलींच्या हस्तलिखित पोथ्या मिळाल्या त्यांचीं नांवें खालीं दाखल केलीं आहेत.

१ आमचे सन्मान्य मित्र रा. रा. दामोदर केशव ओक वास्तव्य सिताबर्डी नागपूर.

२ रा. रा. दत्तात्रय यशवंत उसापकर वा० वेंगुर्लें. यांनीं सत्पुरुष पूर्णदास ऊर्फ बाबा उसापकर यांच्या समाधिगृहांतील हस्तलिखीत ग्रंथसंग्रहालयांतून निवडून दिलेल्या पोथ्या.

३ रा. रा. नरहर व्यंकाजी राजाध्यक्ष वा० शिरवडें.

४ हरिभक्त परायण रा. रा. विठ्ठल अनंत मसुरेकर वा० मसुरें.

याबद्दल या सद्गृहस्थांचे आम्हीं अत्यंत ऋणी आहों. शेवटीं ज्याचे कृपेनें आजपर्यंत सुरळीत काम चाललें त्या दयाघन परमेश्वराचे आभार मानून हा लेख पुरा करितों.

प्रकाशक.

सोहिरोबानाथकृत
पारमार्थिक पद्यसंग्रह.

भाग २ रा.

प्रासंगिक आणि वेदांतविषयक पदें व अभंग इत्यादि.

विठ्ठलपदपंचक.

पद १ लें.

विषवत् या विषया । त्यजाना जाल तरींच लया ॥ धृ० ॥ आत्मसुखातें हरण कराया । विरचित यासि विरंची ॥ स्त्रीधन तेजें खड्ग विराजे ।

---

१ हें पद व पुढें अनुक्रमें दिलेलीं दुसरीं चार पदें एकूण पांच पदांमध्यें 'प्रसंग' असा आहे कीं " सोहिरोबा उत्तर हिंदुस्थानांत उज्जनी येथें गेले होते; त्या वेळीं तेथें एका धर्मशाळेंत वस्तीस राहिले; त्या गावीं 'विठ्ठलाचार्य' ह्मणून कोणी एक शास्त्रीबुवा राहत होते, ते त्याच गांवांतील चंपा नांवाच्या कोणे एके परस्त्रीशीं रत झालेले होते; रात्रौ सर्व सामसूम झाल्यावर, ज्या धर्मशाळेंत सोहिरोबा उतरले होते, तेथेंच एका बाजूस त्या दोघांचा एकांत होत असे. सोहिरोबा कोणी परकी मुशाफर आहेत असें जाणून तीं उभयतां त्यांची फारसी पर्वा बाळगीत नसत. त्यांचा हा गुप्त व्यवहार पुष्कळ वेळां सोहिरोबांस कळून आला, त्यावर त्यांनीं एका प्रसंगीं वर लिहिलें हें पद ह्मणून, 'अन्योक्तीनें' त्या विठ्ठलाचार्यास उपदेश केलेला आहे. पुढें विठ्ठलाचार्यांनें, सोहिरोबांचा वध करण्याच्या हेतूनें त्यांस एका विहिरींत ढकलून दिलें आहे. परंतु योगसामर्थ्यानें सोहिरोबा वांचले व त्या विहिरींतून वर आले. ही हृदयंगम हकीकत, या पांचही पदांमध्यें गुप्त अर्थानें दर्शविली आहे; त्याबद्दल पुढें प्रत्येक पदाच्या खालीं त्या त्या प्रसंगाविषयीं खुलासा केला जाईल. दुसरें या पांचही पदांमध्यें अशी खुबी आहे कीं, शेवटीं प्रत्येक पदांत 'विठ्ठल विठ्ठल' असें नाम वापरलें आहे. त्याचें कारण, लौकिक रीत्या हे विठ्ठलाचार्य (पक्षी गुणांच्या ओघाबरोबर वाहत जाणारा, संकल्पानीं कलुषित झालेला, स्पृहायुक्त, व्यग्र अशा दोषांनीं अभिमानाप्रत पावून मी मी माझें माझें ह्मण-

अवचित तोडिल काया ॥ एकेकातें सेवुनि गेले । पांचहि रमणी ठाया ॥ तद्रतिसंगास्तव या अंगा । काळाचि दंगा करिल भया ॥ विषवत्० ॥ माझें माझें ह्मणुनी जन हे । लंपट गेले पाहत तयां ॥ कटकट करिसी कटकट धरिसी । झटपट भुलसी लुट घ्याया ॥ विषवत्० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा विठ्ठल वदनीं । धरा विसर जाणुनि माया ॥ या निरसंगा करिं भव भंगा । तरिच सुरंगा पावसि या ॥ विषवत्० ॥ ४ ॥

णारा ' अहंकार ' होय.) अन्यपक्षीं विठ्ठल परमात्मा. पक्षी जसा जाळ्यांत बद्ध होतो, तसा तो जीव अहंकाराच्या योगानें आपला आत्मा बद्ध करितो. यास्तव ज्या-च्याठायीं संकल्प व अभिमान हीं असतात तो बद्ध होय. परंतु हीं ज्याच्याठायीं नसतात तो मुक्त असतो. ह्मणजे आत्मा व अनात्मा हे अगदीं परस्पर विरुद्ध धर्म-वान् आहेत; पण अनादि अविद्येच्या योगानें त्यांचें ऐक्य होतें व त्यामुळें हा जन्म-मरणप्रवाहरूप व द्वैतावभासरूप संसार उत्पन्न होतो. त्याचा बाध करण्यास सर्व दृश्याचा बाध करणारें सर्व वेदवेदांतप्रतिपादित असें जें ब्रह्म, तेंच एक समर्थ आहे, तें आत्मज्ञानानेंच अनुभवास येणारें आहे. आतां अन्य संदर्भ ' विठ्ठल ' (विद्+ठ+ल=विद्=ज्ञान+ठ=शून्य) (ज्ञानानें जो शून्य ह्मणजे वरील विठ्ठलाचार्यासारखा अज्ञानी) त्यातें ल [लाती]=उपदेशितो=ज्ञानी करितो असा जो परमात्मा त्याकडे लावलेला आहे. आणखी मुख्यत: अन्य कारण आहे तें असें कीं ' सांप्रत चालू कलियुगामध्यें, बौद्धावतार धारण करून मौनरूपानें गुप्त असणारा परमात्मा विठ्ठल [जो ज्ञानदेव, तुकोबा, नामदेव इत्यादि भक्तांस मात्र प्रत्यक्ष भेटत होता] तो आतांही भेटूं शकेल पण मनुष्याचें सर्व कर्म निर्विकल्प समाधीच्या योगानें दग्ध झालें पाहिजे. तसें झाल्यावर त्या स्वरूपाचा साक्षात्कार होण्यास मुळींच उशीर लागणार नाहीं; हें स्वत:च्या अनुभवानें सोहिरोबानीं सिद्ध करून दाखविलें आहे. याबद्दल सोहिरोबानीं आपल्या सिद्धांतसंहिता ग्रंथाच्या उत्तरार्धांत ' दशावतारमालि-का क्रमानें योगपर ' सिद्ध करून दाखविली आहे. त्यांत या बौद्धावतारा-विषयीं ह्मटलें आहे तें पहा. वर दाखल केलेल्या कारणामुळें या पांचही पदांच्या समूहास ' विठ्ठलपदपंचक ' असें नांव दिलेलें आहे. विठ्ठलाचार्य हा वेदज्ञ असून त्यांचें बरेंच शास्त्राध्ययन झालेलें होतें; परंतु उपरति झालेली नव्हती, ह्मणून त्याच्या मनबुद्ध्यादिकांवर ' स्त्रीधनादि विषयांचा पूर्ण पगडा बसलेला होता.' परंतु त्या विद्वत्तेचा उपयोग काय ? असें दर्शविलेलें आहे. याविषयीं श्रीमद्भागवत् स्कं० ११ अ० २६ श्लो० १२ येथें ह्मटलेलें आहे.

पद २ रें.

तुम्ही भोगा पररमणी । निजसुखवर्धक जी धमनी ॥ धृ० ॥ धरिं सत्संगा वरिं निःसंगा । कामचि भंगा हा असत्ता ॥ रमतां रमतां हरत

किं विद्यया किं तपसा किं त्यागेन श्रुतेन वा ।
किं विविक्तेन मौनेन स्त्रीभिर्यस्य मनोहृतम् ॥ १२ ॥

भावार्थ:—ज्याचें मन स्त्रियांनीं हरण केलें, त्याच्या विद्येचा काय उपयोग? त्याचें तपही निरर्थक; त्याच्या संन्यासाचें किंवा शास्त्राध्ययनाचें काय फळ? त्याचा एकांत वास आणि मौन सर्व कांहीं व्यर्थ समजावें.

पुढें चित्ताचा थोडासा मल दग्ध झाल्यावर ' हा इतका नष्ट झाला व आतां इतका नष्ट होण्याचा बाकी राहिला,' असा स्पष्टपणें दोहोंच्या भेदाचा निश्चय होणें व्यतिरेक संज्ञा वैराग्य ह्मणतात. हाच पुढच्या दुसऱ्या पदाचा विषय आहे इंद्रियें बाह्य विषयांच्या ठिकाणीं प्रवृत्त होण्यास असमर्थ झाल्यामुळें त्यांचा केवळ औत्सुक्यमात्रानें मनाच्या ठिकाणीं स्थिति होणें, याला एकेंद्रिय संज्ञा वैराग्य ह्मणतात. (हाच तिसऱ्या पदाचा विषय आहे.) या तीन वैराग्यांपासून चौथें सूत्रकारांनीं सांगितलेलें वशिकारसंज्ञा वैराग्य सिद्ध होतें. (हाच चौथ्या पदाचा विषय आहे.) व शुद्ध—ज्ञानयोग हा पांचव्या पदाचा विषय होय.

१ या पदाचा प्रसंग काय आहे, हें पहिल्या पदाच्या टीपेंत सांगितलेंच आहे. त्या पदांत ' विषवत् विषयांचा त्याग करून वैराग्य संपादन करण्याविषयीं ह्मणजे पर्यायानें (अपराविद्येचें) ज्ञान प्राप्त करून घेण्याविषयीं अर्थात् पहिला विकार जो अहंकार त्याच्या वृत्तीला लयास नेऊन आत्मसुखाच्या अनुभवानें निर्विकल्प होऊन सत्यसुखाचा लाभ करून घेण्याविषयीं उपदेश केला; तरी विठ्ठलाचार्यांचा पूर्वानुक्रम

शीतांशुर्मुखमुत्पले तव दृशो पद्मानुकारौ करौ
रंभागर्भनिभं तवोरुयुगुलं बाहू मृणालोपमौ ॥
इत्याल्हादकराखिलांगि रभसान्निःशंकमालिंगमा
मंगानि त्वमनंगतापविधुराण्येह्येहि निर्वापय ॥ १ ॥

याप्रमाणें चाललाच होता. ह्मणून या पदामध्यें त्यास असा उपदेश करितात कीं ' चर्मानें वेष्टित मांसमयी अशा पर स्त्रीचा तूं संग करीत आहेस, त्यानें तुला असंगता कधींच प्राप्त होणार नाहीं, कारण अशा स्त्रीशीं एक वेळ संग केल्यानें तृप्ति होते असें नाहीं; पुनः पुनः प्रतिदिनीं तशी इच्छा होतेच. अशा भ्रमोत्पादक इच्छेच्या तृप्तीसाठीं संचितानुक्रमानें जरी तूं अनेक जन्म घेतलेस तरी ह्या महा भयं-

अहंता । मायबाप ते पळत ह्मणी ॥ तुह्मी० ॥ १ ॥ कन्यासुतद्वय पोरें व्याली । जामातातें धरि पदरीं ॥ सासू सदरी देखुनि न्दरीं । त्रिवेणि भदरी जी तरणी ॥ तुह्मी० ॥ २ ॥ गीते माजी दुजीं आठवा । साहसष्ठींत ह्मणे किरिटी ॥ याविण सृष्टि सुख ना दृष्टि । रत तत्कंठीं प्रिय करणी ॥ तुह्मी० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा विठ्ठल वदनीं । वेदहि हाची धर्म वदे ॥ गुरुकृपेविण वर्माचि न कळे । यास्तव लागा तच्चरणीं ॥ तुह्मी०॥ ४॥

कर विषयवासनेच्या सेवनानें तुला खरोखर अशी शांति कधींच मिळणें नाहीं. करितां जर तुला खरोखर शांति मिळविण्याची इच्छा असेल तर चालू पदांत सांगितलेली ' तुह्मी भोगा, पर रमणी ' ही पर स्त्री [रमणी] भोग. एकवेळ जर तुला ह्या पररमणीचा संग घडला तर पुनः संगाचेंच कारण राहणार नाहीं आणि खोटा [असत्त] असा जो काम तो नाहींसाच होऊन जाईल. या स्थितीलाच सर्व—संगपरित्याग किंवा संन्यास असें ह्मणतात. सारांश जाणावयाच्या विद्या दोन, एक अपरा दुसरी परा. तेव्हां या पदांत पराविद्येचें तत्व सांगितलें आहे. ह्मणजे पर्यायानें ' बुद्धियोग ' हा या पदाचा विषय आहे.

नत्वा हिरण्यगर्भादीन्योगशास्त्रप्रवर्तकान् ।
वस्तु प्रस्तूयते सम्यक् कैवल्यानुप्रदायकम् ॥ १ ॥

या सृष्टीकडे विचारदृष्टिपूर्वक अवलोकन करून पाहिलें असतां असें ध्यानांत येतें कीं, प्रत्येक प्राण्याचे सुखप्राप्तीच्या साधनाविषयीं सर्व व्यापार सुरू आहेत; त्यांत स्वर्गादि सर्व सुखें अनित्य व परिणामीं दुःखमयच आहेत, खरें व अक्षय्य सुख ह्मटलें ह्मणजे कैवल्य [मोक्ष] हेंच मुख्य सुख होय. तें प्राप्त व्हावें याकरतांच सर्व श्रुति, स्मृति, पुराण, इतिहास इत्याद्यनेक साधनें भक्तवत्सल परमेश्वरानें निर्माण करून ठेविलीं आहेत. श्रुत्यादिकांचें प्रमेय व तत्प्राप्य एकच आहे खरें, परंतु अधिकारभेदानें अनेक साधनें सांगितलीं. साधनानें साध्य [कार्य], कांहीं प्रतिबंध नसेल तर अवश्य सिद्ध झालें पाहिजे. कार्यास प्रतिबंधक आहे किंवा नाहीं याचें ज्ञान उत्तम ज्ञानावांचून होणार नाहीं. यदाकदाचित् तसें ज्ञान प्राप्त झालें तथापि या जन्मांतच तें साध्य (मोक्षरूप कार्य) सिद्ध होईल, असें साधन प्रायः योगावांचून दुसरें नाहीं ! कारण योगी संसारबंधाला जें कारण प्रारब्धकर्म त्याचा उपभोगानें क्षय करण्याकरितां या जन्मांतच योगप्रभावानें अनेक देह धारण करून सर्व प्रारब्ध कर्म उपभोगानें सारून संसारबंधांतून मुक्त होतो, असें सामर्थ्य इतरांस नाहीं. म्हणूनच भगवद्गीतेंत ' तपस्वी, ज्ञानी, व कर्मनिष्ठ या सर्वापेक्षां योगी श्रेष्ठ आहे ह्मणून हे अर्जुना ! तूं योगी हो. ' असें श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितलें.

पद ३ रें.

तूं निंदुं नको सुजना । कुजना यम दंडिल रसना ॥ धृ० ॥ स्वगृह-धंदा टांकुनि मंदा । टळटळ फिरसी अनुवादा ॥ शक्तीहर कीं येइल

(१) पहिल्यानें या पदाचा मुख्यतः प्रसंग काय आहे, याचें पूर्वीच्या दोन पदामध्यें स्पष्टीकरण केलेंच आहे. पहिल्या पदांत स्त्रीधनादि विषयत्यागविषयीं उपदेश केला व पहिला विकार जो अहंकार त्याचा त्याग करून " यतमानसंज्ञ वैराग्य " स्वीकृत करण्याविषयीं सूचना केली. दुसऱ्या पदांत दर्शविलें कीं ' शरिरावरील आसक्ति सोडणें ह्मणजे सर्वसंगपरित्याग करणें हें परम कठीण आहे, ही गोष्ट खरी; पण जर नित्यसुख मिळवायाचें तर त्याचा मार्ग कितीही कठीण असला तरी तोच स्वीकारला पाहिजे. परंतु तितकें मानसिक सामर्थ्य नसेल, शरिरावरील ममता सुटण्याजोगी नसेल तर मग कर्में केलींच पाहिजेत; त्यांवांचून गत्यंतर नाहीं यासाठीं " बुद्धियोगमार्गानें " व्यतिरेक संज्ञा वैराग्य प्राप्त करून घ्यावें असें सांगितलें, कारण सुख मिळविण्याचे मार्ग दोनच. पहिला नित्यसुखाचा व दुसरा अनित्य सुखाचा (प्रवृत्तिमार्ग) त्यांतून वाटेल तो मार्ग आपल्या शक्तीचें तारतम्य पाहून तूं स्वीकार असें सांगितलें; परंतु विठ्ठलाचार्याच्या असन्मनावर त्याचा लवमात्र परिणाम झाला नाहीं, उलट तो क्रोधाविष्ट होत्साता, सोहिरोबांपाशीं येऊन, त्यांची अतिशय निंदा करून, त्यानें त्यांचा छल केला. सोहिरोबांनीं तें सर्व निमूटपणें सोसून घेऊन त्यास पुनः उपदेशच केला; तोच या चालू पदाचा विषय आहे. जसा पहिल्या पदांत अहंकार त्याग (अहंवृत्तित्याग) दुसऱ्यांत बुद्धियोग; तसाच या पदांत मनोनिग्रह किंवा मनोलय, हा मुख्य गर्भितार्थ आहे. व पर्यायानें असें दर्शविलें आहे कीं, बाबारे, तात्विक दृष्टया पाहूं गेलें तर जगामध्यें आत्मव्यतिरिक्त कोणतीही वस्तु सत्य नाहीं. हे दृष्ट व श्रुत सगळे पदार्थ नश्वर होत ह्मणून तूं सकळ इच्छा सोडून, सर्वसंग परित्याग करून, आत्मज्ञान मिळव. मनुष्य नाना शास्त्रांचें पठण करो, किंवा नाना प्रकारचे यज्ञयाग करो, नाना देवतांची पूजा करो, आत्मज्ञानावांचून सर्व खटपट व्यर्थ आहे.

आत्मज्ञानं विना पार्थ सर्वं कर्म निरर्थकम् ॥

[भगवद्गीता].

प्रवृत्तिमार्गामध्यें अनेक दुःखें आहेत, व त्यामुळें आपला नाश आहे, हे नाश दोन प्रकारचे आहेत. एक कालगतीमुळें होणारा व दुसरा मनुष्याच्या कृतीनें होणारा. मनुष्याच्या कृतीनें होणारा नाश सर्वांत भयंकर आहे. मनुष्याचे कामादि अति दुष्ट शत्रु त्याच्याच हृदयांत वास करतात.

गिरकी । पडसिल नरकीं कीं जीवना ॥ तूं निंदुं नको० ॥ १ ॥ परऐश्वर्यां पाहुनि जळसी । तोषसि ऐकुनि पररंध्रा ॥ दृष्टी पापी लोकां तापी । त्रास कदापी साहाविना ॥ तूं निंदुं नको० ॥ २ ॥ खद्योतासम तेजहि नसतां । भास्कर ह्मणवुनि मिरविसि भा ॥ सज्जन सदसीं निजयश वदसी । लाज न घेसी केविं मना ॥ तूं निंदुं नको० ॥ ३ ॥ संतच्छल श्री संतति नाश-न । कां न मानिसि या वचना ॥ जन्मापासुनि काय मिळविलें । अघ-

---

"आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः" ह्या गीतावाक्याप्रमाणें आपलें हित किंवा अहित करून घेणें आपल्याच स्वाधीन आहे. पुष्कळ मनुष्यें इतरांस दुःख देण्याचा धंदा करितात, व अशा प्रकारचीं घोर कर्में करितात कीं त्यापासून दुसऱ्यास त्रासच होतो. तारुण्याच्या व अहंपणाच्या धुंदींत मनुष्याच्या हातून अनन्वित कर्में घडतात. त्या दुष्ट कर्मांचा अंतकाळीं त्यास पस्तावा होऊन तळमळत ते प्राण सोडतात. पण मग पस्तावा होऊन काय उपयोग ? एकादी नीतिविरुद्ध अयोग्य गोष्ट करण्यास प्रवृत्त होते वेळीं ती गोष्ट आपल्याकडून घडूं नये ह्मणून आपली सद्बुद्धि नेहमीं सांगत असते. असें असून जाणून बुजून दुष्कर्माविषयीं मनुष्य उद्युक्त होतो. हें केवढें आश्चर्य आहे ? विठ्ठलाचार्यासारख्या कर्मठ व वेदशास्त्रपारंगत मनुष्यानें सोहिरोबासारख्या समर्थ योग्याचा छळ करावा व त्यांनीं केलेला उपदेश त्याला आवडूं नये हें केवढें आश्चर्य आहे पहा ! तुकोबा म्हणतातः—१ अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥ १ ॥ वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळ याती ॥ २ ॥ ऐसा हा निवाड झालासे पुराणीं । नव्हे माझी वाणी पदरचा ॥ ३ ॥ तुका म्हणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ॥ ४ ॥ २. कलियुगामाजीं थोर झालें बंड । नष्ट लोक लंड जाले फार ॥ १ ॥ नधीरे ती सोय न पुसती कोणा । जैसें येतें मना तैसें चाले ॥ २ ॥ सज्जनाचा वारा टेंकों नेदी द्वारा । ऐशिया पामरा तारी कोण ॥ ३ ॥ विश्वास तयाचा बैसेना कोठें ही । स्तुति निंदा पाहीं जीवीं धरी ॥ ४ ॥ तुका म्हणे कैसें-कैलें नारायणें । जाणावें हें कोणें तया विणें ॥ ५ ॥ [साधक जनांस ह्या निंदकांचा फार उपयोग होतो, असें तुकोबांचें मत आहे.] ३ निंदक तो परोपकारी । काय वर्णूं त्याची थोरी । जो रजकाहुनि भला । परि सर्व गुणें आगळा ॥ १ ॥ नेघे मोल धुतो फुका । पाप वरिच्यावरी देखा । करीतसे साधका । शुद्ध सरते तिहीं लोकीं ॥ २ ॥ मुख संवदणी सांगातें । अवघें सांठविलें तेथें । जिव्हा साबण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥ ३ ॥ तया ठाव यम पुरीं । वास करणें अघोरीं । त्यासी दंडण करी । तुका म्हणे न्हाणी ते ॥ ४ ॥

विरहित या कर मनना ॥ तूं निंदुं नको० ॥ ४ ॥ ह्मणे सोहिरा विठ्ठल वदनीं । पाहतां निंदक स्नान करा ॥ दुर्जन संगति देत अधोगति । भष्मि गुरूप्रति फल निधना ॥ तूं निंदुं नको० ॥ ५ ॥

पद ४ थें.

स्थान बरें जलवास । जेथें स्वामि नसे खल त्रास ॥ धृ० ॥ वर वर पाथर आसन विराजे । स्वार सजे महाराज ॥ जलदेवता नवविध कान्ता । दिव्य सुमनता दे हातास ॥ स्थान० ॥ १ ॥ ज्ञानतोय हे तरणिच पाहे । इतराचि नोहे जें बुडवी ॥ गंगागंगेति यो ब्रुयात्चें । दे फल साचें हरत भवास ॥ स्थान० ॥२॥ चंफा* माताऽऽचार्यचि त्राता । होतां संग विलास ॥ संचित व्यालें निमित्त ठेलें । सहज घडे संन्यास ॥ स्थान० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा शेषशायी हा । झाला विठ्ठलदास ॥ खल मित्रासम मानुनि केला । क्षीरसागर हा वास ॥ स्थान० ॥ ४ ॥

---

* अन्यपाठ=चंपा.

---

१ पहिल्यानें या पदाचा प्रसंग काय हें सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे पूर्वोक्त विठ्ठलाचार्य यानें नूतन काय विक्षिप्तपणा केला तें सांगावयाचें हा होय! या प्रसंगापैकीं चालू पद हें एकंदरींत अनुक्रमें चौथें पद आहे. पहिल्या दोन पदांमध्यें सोहिरोबांनीं विठ्ठलाचार्यास केलेला बोध पर्यायानें [अन्योक्ति रूपानें] केलेला होता; परंतु तिसऱ्या प्रसंगीं विठ्ठलाचार्यानें प्रत्यक्ष समोरासमोर जाऊन सोहिरोबांची अद्वातद्वा निंदा केली; त्यावेळीं सोहिरोबांनीं केलेला उपदेश प्रत्यक्ष आणि विशेषतः निक्षून केलेला असल्यामुळें, विठ्ठलाचार्याच्या पायांची आग मस्तकास जाऊन पोहोंचली. आणि त्या कारणानें रामदासांनीं ह्मटल्याप्रमाणें [कामक्रोध खवळला, तेणें सन्निपात झाला.] अशी त्याची स्थिति होऊन त्याचें विवेक ज्ञान समूळ नष्ट झालें. दुसरें ज्या चंपा नांवाच्या परस्त्रीशीं विठ्ठलाचार्यांचा संबंध होत होता, तीही अर्थात् सोहिरोबांचा द्वेष करूं लागली, कारण परपुरुषसंगरसायन चाखण्याविषयींच्या नित्य क्रमामध्यें तिला थोडासा व्यत्यय आल्यासारखा झाला व 'सोहिरोबांच्या मुखानें ही आपली गुप्त कृति उघडकीस येऊन चारचौघांत आपली फटफजिती होईल ह्मणून ती साशंक झाली. शेवटीं त्या उभयतांच्या विचारानें असें ठरलें कीं, सोहिरोबांस देहांतप्राय:श्चित द्यावें, व लगेच रात्रीचा समय पाहून सर्वत्र

पद ९ वें.

तोचि पहा तूं देव । सत् चित् आनंदाची ठेव ॥ धृ० ॥ निर्विकार ज्यासी । वेदहि वदती अति हर्षे ॥ नसतां स—करी आकर्षण करि । सूत्र

सामसूम झाल्यावर मदतीस दुसरे आपले चार अनुयायी जिवलग मित्र मिळवून 'सोहिरोबा योगनिमग्न स्थितींत होते अशा वेळींच त्यांस गांठून दोरांनीं, त्यांच्या देहाचें एका पाथरीशीं (मोठ्या दगडाशीं) बळकट रीतीनें बंधन करून एका खोल भयंकर विहिरींत त्यांस ढकलून दिलें, व आपण तेथून निघून गेले. कामक्रोधादिकांच्या आवेशापुढें बुद्धीचें कांहीं चालत नाहीं एवढें खरें सोहिरोबांस विहिरींत ढकलल्यावर तेथें नऊ प्रकाराच्या जलदेवतारूप (कांता) स्त्रिया प्रकट होऊन त्यांनीं त्यांस बंधनांतून मुक्त केलें, आणि ज्या दगडावर त्यांना बांधलें होतें तो दगड त्या विहिरीच्या पाण्यावर तरता करून, त्यावर सोहिरोबांस बसवून दिव्य पुष्पांनीं त्यांची पूजा केली; त्यांच्याशीं जलविहार केला, व त्यांस पूर्व स्थळीं आणून पोंचविलें आणि आपण अदृश्य झाल्या. या कृत्यामध्यें सोहिरोबांस भगवान् पतञ्जली मुनीनें सांगितलेला 'केवल कुंभक' नांवाचा प्राणायाम सहज सिद्ध करतां आला दुसऱ्या दिवशीं विठ्ठलाचार्यानें पाहिलें तर 'पूर्वीपेक्षां सोहिरोबा महदानंदांत बसलेले आहेत.' तेव्हां तो चकित होऊन त्यांजकडे एकसारखा पाहूं लागला; तेव्हां सोहिरोबांनीं त्याला उद्देशून जें काय कथन केलें, तोच या चालू पदाचा विषय आहे. पूर्वीच्या तीन पदांमध्यें योगास साक्षात् उपयोगी पडणारीं अशीं धारणा, ध्यान व समाधि हीं सांगितलीं आतां या पदामध्यें चित्त संयमानें प्राप्त होणाऱ्या अनेक प्रकारच्या सिद्धि, मोक्ष योग्य चित्ताचें स्वरूप, योगी कर्मस्वरूप इत्यादि सांगितलें आहे. सारांश चित्तसंयम हा या पदांतील मुख्य मुद्दा आहे.

१ त्या पदाचा प्रसंग असा आहे कीं पूर्वोक्त विठ्ठलाचार्यानें पाहिलें कीं आपण सोहिरोबांस बळकट रितीनें बांधून कूपांत ढकललें असून त्यांस कांहींएक इजा न होतां ते पूर्वीपेक्षां ब्रह्मानंदानिमग्न स्थितींत आहेत. तेव्हां त्याला परमाश्चर्य वाटलें आणि हें काय गूढ आहे हें त्याला कळेना! सोहिरोबांचा अधिकार त्या मूढाला काय माहित असणार? केशवस्वामीनें एका पदांत ह्मटलें आहे (योगीयाची खूण योगी जाणती आपण । इतरांस न कळें जरी झाले विचक्षणे ॥ ॥ धृ० ॥ वेदशास्त्रीं निपुण झाले पुराणीं संपन्न । सद्गुरुकृपेवीण हाता न चढे निज खूण ॥ १ ॥ ' शब्द ज्ञानें झाले जाणती छंद प्रबंध । ब्रह्माडींचें ज्ञान परि तो न कळे ब्रह्मानंद ' ॥ २ ॥ परंतु ह्या अद्भुत कृत्यावरून त्याला वाटलें कीं, हा कांहीं विलक्षण अधिकाराचा मनुष्य आहे! पण ज्यापाशीं आपण एवढा कृतघ्नपणा

प्रचारीं शव ॥ तोचि० ॥ १ ॥ शक्तीची निज अंतर शक्ति । भक्तीची निज भक्ति तरि ॥ मुक्तीची निज मुक्ति विराजे । जगदंबर भर पेंव ॥तोचि०॥ ॥ २ ॥ ह्मणें सोहिरा विठ्ठल वदनीं । शून्य ह्मणों तरि जग भरलें । कर्महि हरलें ज्ञानहि सरलें । एकचि उरलें तोंचि अचेव ॥ तोचि पहा तूं देव० ॥३॥

केला, त्यापाशीं कोठल्या तोंडानें जावें! या प्रकारें खजील होत्साता खालीं मान घालून राहिला. तीक्ष्ण ज्ञानानें परिपूर्ण झालेल्या सोहिरोबांनीं त्याचें हृद्गत जाणून त्याला ह्मटलें कीं, ' अरे बाबा, तुला ओशाळें होण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं कारण तूं केल्या कृत्याचा तुजकडे दोष आहे असें मुळींच नाहीं. ह्मणजे ' प्रकृतीचे जे गुण, त्यांजकडून सर्व कर्मांची उत्पत्ति घडते; पण अहंपणानें ज्याची बुद्धि मूढ झाली आहे तो आपणालाच कर्माचा कर्ता मानितो–' असें श्रीकृष्णांनीं गीतेचा अ० ३ श्लो० २७ मध्यें सांगितलें आहे, व पुढें श्लो० २८ व २९ मध्यें ह्मटलें आहे. परंतु हे महाबाहो, गुण आणि कर्म यांच्या वांटणीचें खरें स्वरूप जाणणारा जो आहे तो गुणांची प्रवृत्ति इतर गुणांच्या ठायीं होते,–ह्मणजे इंद्रियें विषयांकडे ओढ घेतात आणि या व्यापाराचेंच नाव कर्म,–असें जाणतो, आणि कर्माच्या ठायीं आसक्ति ठेवीत नाहीं.' ह्मणून ज्यांना प्रकृतीचें अज्ञान आहे, ते गुणाचा आणि कर्माचा अभिमान धरितात, त्यांना सर्व स्थिति ठाऊक नसते, ते मंद असतात ह्मणून ज्याला हें सर्व कळलें आहे त्यानें त्यांना उचकून चाळवूं नये. यासाठीं तूं मनांत कांहीं शंका आणूं नको; काय विचारावयाचें असेल तें विचार, त्यावर विठ्ठलाचार्य ह्मणाला असा तत्त्वज्ञानी पुरुष ओळखावा कसा? सोहिरोबा ह्मणतातः—अरे तूं विद्वान असून हें तुला कळत नाहीं कसें? याबद्दल श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलें आहे तें तुला माहित नाहीं काय?

> बाह्यस्पर्शेष्वलक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् ।
> स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥
> योंऽतः सुखोंऽतरारामस्तथांतर्ज्योतिरेव यः ।
> स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥

[मु. चं. टी.]

बाहेरून स्पर्श करणारे जे पदार्थ (इंद्रियांच्या स्पर्शापासून होणारे भोग) त्यांच्याठायीं चित्ताला आसक्त होऊं न देतां, अंतःकरणातील जें सुख त्याचा जो अनुभव घेतो, तो ब्रह्माच्या ठायीं अंतःकरणाची सांगड घालून अक्षय्य सुख प्राप्त करून घेतो २१ ज्याला आंतूनच सुख आहे, आंतूनच आनद आहे, आणि आंतूनच प्रकाश आहे, तो योगी ब्रह्मस्वरूप होऊन ब्रह्माच्या ठायीं निर्वाण पावतो ॥ २४ ॥ अरे याप्रमाणें

पद ६ वें.

दिसणें हें सरलें । अवघें प्राक्तन हें मुरलें ॥ ध्रु० ॥ आलों नाहीं गेलों नाहीं । मध्यें दिसणें हे भ्रांति । जागृत होतां स्वप्नचि हरपे । कर्पुरन्यायें

जो असेल तोच तत्त्वज्ञ, इतकेंच नव्हे, तर ज्याच्या चित्ताला कधींच विक्षेप होत नाहीं, त्याला तत्त्ववेत्ता ह्मणणें सुद्धां औपाचारिकच, तो स्वतः ब्रह्मच होय. अरे असा जो असेल (तोचि पहा तूं देव) तो (प्रत्यगात्मा) आणि सर्व साक्षिभूत स्वयमेव असा जो (बौद्धावतार स्वरूप हृदयपुंडरिकाच्या ठायीं स्थित असणारा विठ्ठल परमात्मा) हे एकच आहेत असें जाण? हाच या चालू पदाचा विषय आहे; आणि दर्शविलें आहे कीं–' देव मनुष्यास मुक्ति देतो, तो काय त्याजपाशीं मुक्तीचें गांठोडें आहे त्यांतून काढून देईल? तर मनुष्याच्याच प्रयत्नावर आहे. याविषयीं तुकोबांबांचा अभंग (नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें । आणुनी निराळें द्यावें हातीं ॥ १॥ इंद्रियांचा जय साधूनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥ २ ॥ दुसरें या पदांत अंतःकरणाविषयीं गुप्त भाव आहे. जसा पहिल्या पदांत अहंकार, दुसऱ्यांत बुद्धियोग, तिसऱ्यांत मनोलय, चवथ्यांत चित्तशुद्धि,' तसाच या पदांत अंतःकरण शुद्धि, हा गुप्त भाव आहे. ह्मणून या पदाचे चरण तीनच आहेत, कारण निर्विकार ब्रह्माचे ठायीं ' स्वगत, स्वजातीय आणि विजातीय असे तीन प्रकारचे भेद उत्पन्न होण्यास हें अंतःकरणच कारण आहे. याप्रमाणें जेव्हां मनुष्य बाह्य विषयांच्या ठायीं चित्त आसक्त होऊं न देतां अंतःकरणांतील जें सुख त्याचा अनुभव घेतो, आणि ब्रह्माच्याठायीं अंतःकरणांची सांगड घालून अक्षय्य सुख प्राप्त करून घेतो, तेव्हां त्याला सच्चिदानंद परमात्म्याचा अनुभव मिळतो. यावरून शुद्धांतःकरण सच्चिदानंदरूप आहे असें सिद्ध होतें, ह्मणून या पदाचे तीन चरण योजून तें सिद्ध केलेलें आहे.

१ सोहिरोबा उत्तर हिंदुस्थानांत उज्जनी येथें असतां त्यांनीं ' शके १७१४ चैत्र शुद्ध नवमी (अन्य ठिकाणीं ' दशमदिनीं ' असा पाठ आढळतो,) या दिवशीं आपली काया ' ब्रह्म ' केली. त्या प्रसंगाचें हें पद आहे. तुकोबांच्या प्रयाण काळाच्या संबंधानें जी स्थिति प्रसिद्ध आहे (कीं सतनु मुक्त झाला, योगाची सिद्धि हे तुकारामीं ॥) हीच अवस्था सोहिरोबांच्या प्रयाणकाळाच्या संबंधानें आहे अशी दंतकथा आहे. या गोष्टीस या पदाचा बराच आधार मिळतो. ह्या विषयाच्या सत्यासत्यतेच्या संबंधानें (परिशिष्टामध्यें) योगशास्त्र, उपनिषदें इत्यादिकांच्या आधारानें आह्मांस बरेंच लिहावयाचें आहे, तें ईश्वरेच्छेनें घडून येवो. तुकोबांच्या प्रयाणकाळच्या संबंधानें कोणी एकानें ' श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर ' यांस प्रश्न

जग हरलें ॥ दिसणें० ॥ १ ॥ दिसणें हाची जन्म योगियां ना दिसणें हा मृत्यु म्हणा । गैबि प्रसादें गैबचि जाहलें । आपआपणामध्यें लपलें ॥ दिसणें ॥ २ ॥ मच्छिंदर गोरख जालंधर हे । न्याया आले स्व-स्वरुपीं । जातां जातां गमनग्राम तें । समूळ कोठें ना गमलें ॥ दिसणें० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा सत्रा चवदा । मधु मासाच्या नवमदिनीं* । स-गुण स्वरुपीं¶ निर्गुण ठेलें । अनुभव हरले स्वरुप+ कळे ॥ दिसणें०॥ ४ ॥

---

* अन्यपाठ—मधुमासाच्या दशमदिनीं. ¶ निर्गुण स्वरूपीं सगुण मिनलें. + स्वरूप कळलें.

केला कीं, काय हो? जडदेह घेऊन तुकाराम गेला ह्मणतात, तो कसा? त्यावर रंग-नाथांनीं एका पदांत निकाल करून ठेवलेला आहे. (जड देहा घेउनि वाणी । गेला ती ऐका वाणी ॥ धृ० ॥ घट फोडुनि जनकादिक ते । अनुभविते झाले माती । हा नोहे तुकया तैसा । घट राखुनि धरिली चित्तीं ॥ १ ॥ इतर ते हारुनि दुग्धा । परिणामक घेती लोणी ॥ हा नोहे तुकया तैसा । पय राखुनि चाखी लोणी ॥ २ ॥ इतरें ते फोडुनि कोहं । मग चाखिपत्ता तो सोहं ॥ हा नोहे तुकया तैसा अच्छेद्य पचविला कोहं ॥ ३ ॥ इतरें त्या मिश्र पुटातें । देउनियां जड टाकि-यलें । तो नोहे तुकया तैसा । परिसानें हेमचि केले ॥ ४ ॥ जड बुद्धि अहं या देहा । निज स्वरूपीं वाहुनि गेला । निज रंगीं रंग पहाया । रंगानें निश्चय केला ॥ ५ ॥ या बोला सारांचि कथितों । दिसणें जें हाची जन्म । अदृश्य मरण योग्यां-चें । निजरंगीं अघटित धर्म ॥ ६ ॥) मिथ्याच उत्पन्न झालेल्या या नामरूपात्मक जगताचा त्याग करावा असें ज्यावेळीं सोहिरोबांस वाटलें तेव्हां ते रात्रीच्या वेळीं निर्वाण पावले. दुसऱ्या दिवशीं बराच वेळ झाला तरी नित्य क्रमाप्रमाणें हे उठले नाहींत कां! ह्मणून शिष्यमंडळीनें तपास केला तर ते शय्यास्थानीं नव्हते, परंतु त्या ठिकाणीं वर लिहिलेलें पद मात्र आढळलें. नंतर पुष्कळ तपास केला पण त्यांचा थांग लागला नाहीं. हें पद व पूर्वीं ‘ विठ्ठलपदपंचक या सदरांतील पांच पदें, आणि ‘ अवधूत नहीं गरज तेरी ’ हें महादजी शिंद्याच्या दरबारांत गाइलेलें पद हीं आह्मांस ‘ रा. रा. नरहर व्यंकाजी राजाध्यक्ष ’ यांजकडून मिळालीं.

(अलिजा बहाद्दर शिंदेसरकार ‘ महादजी ’ यांच्या वेळीं, त्यांच्या दरबारांत ग्वाल्हेर येथें एकवेळ सोहिरोबा गेले होते त्या प्रसंगीं केलेलीं पदें.)

पद ७ वें.

स्वरुपीं मजरा लावीं ठीक । उदरा मागुनि खाणें भीक ॥ ध्रु० ॥

१ शिंद्याचे मुख्य सेनापती ' जिवाजी बल्लाळ ऊर्फ जिवबादादा ' यांनीं ' सोहिरोबांस ' शिंद्याच्या दरबारांत नेलें होतें. स्वतः महादजी शिंदे यांचा नित्य भजनसांप्रदाय असे. स्वतः त्यांनीं कांहीं पद्यें करून ते त्यांचा भजनाचे वेळीं उपयोग करीत असत. तो भजन करण्याचा राजकीय थाटमाट वगैरे सोहिरोबांस त्यांनीं दाखविला, त्यावरून सोहिरोबांनीं या पदाअन्वयें त्यांस सुचविलें कीं, पहिल्यानें आपल्या स्वरूपाचे ठायीं (मजरा ह्मणजे बंदूक किंवा निशाण मारतेवेळीं बारीक दृष्टीनें नेम धरावयाचा तो.) मजरा लाव ह्मणजे मी कोण आहें, माझें वास्तविक स्वरूप काय आहे, हें जाण आणि मग काय करावयाचें तें कर; उगीच दांभिक भजन करून काय अर्थ आहे? तूं पराक्रमाच्या द्वारें मोठमोठीं राज्यें जिंकू शकशील पण मनोराज्य जिंकणें हें कर्म फार कठीण आहे आणि तें जिंकलेंस नाहीं तर तुला खरें सुख कसें होईल ? (कबीर ह्मणतात:—राजा दुखिया परजा दुखिया । दुखिया घर बरागी ॥ साच कहे सो सब जग दुखिया । झूटा कहे न जाई ॥ ब्रह्मा विष्णु शंकर दुखिया । जिन्नें सृष्टि कमायी ॥ धूत दुखिया अवधूत दुखिया । दुखिया है घट रंका ॥ कहत कबीरा ओ नहिं दुखिया । जिन्नें मनको जिंका ॥) यासाठीं विविध सृष्टपदार्थांकडे धांवणारें मन जो अनादि आकार रहित असा सच्चिदानंद परमेश्वर त्याच्या ठिकाणीं (राबिक) राबणूक करणारें होईल असें कर. श्रीमद्भगवद्गीतेंत ह्मटलें आहे.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥
यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

[भ. गी. अ. ३]

भावार्थ:—कर्मेंद्रियांना दाबून, मनांतून त्यांच्या विषयांचें चिंतन करीत जो राहतो, त्याचें मन वेडें होतें; आणि त्याला दांभिक ह्मणतात. ॥ ६ ॥ परंतु जो मनापासून इंद्रियें नीट आवरून, कर्मेंद्रियांच्या साधनानें कर्मे आचरितो, पण त्याच्या ठायीं आसक्ति ह्मणजे अत्यंत आवड धरीत नाहीं, तो श्रेष्ठ. ॥ ७ ॥ यावरून असें दर्शविलें आहे कीं (राजपद हें श्रेष्ठ नव्हे) तर वर सांगितल्या प्रकारचा अखंड (राजयोगी) राज्याचा अधिकार प्राप्त करून घेतो, तोच खरा राजा.

स्वइच्छ असणें, अलक्ष पाहणें । भजन करूं नको दांभीक ॥ स्वरुपीं० ॥ ॥ १ ॥ अचिंत्य स्मरणीं, अगम्य करणीं । अनादि आरंभीक ॥ स्वरुपीं० ॥ ॥ २ ॥ म्हणे सोहिरा निराकारीं, निराधारीं । मन करणें राबीक ॥ ॥ स्वरुपीं० ॥ ३ ॥

पद ८ वें.

दौलत देख §दिवानी मेरी । आपना मौज न करना फेरी ॥ ध्रु० ॥ कोहि दिन बनयांके दुकान । कोहि दिन पर्वतपर ठिकान ॥ १ ॥ कबहू बमुत फुल्ल लगवाना । कबहूं पगरीकूं बंधवाना ॥ २ ॥ *तनके करत कारभार । हमारे छत्तिस खिजमतगार ॥ ३ ॥ मन पवनकी पागा । सोहं पिलखानेकी जग्गा ॥ ४ ॥ करम कारखाना । हमारा नशीब जामदार-खाना ॥ ५ ॥ अहंकार कूं शींछा तीनों †मुलुख हमारी भीच्छा ॥ ६ ॥ जब सोहिरा तक्तपर बैठे । ‡तब सब दुनियां लंड पर बैठे ॥ ७ ॥

अन्यपाठ=§दिवाना. *तनके करत है बिगार. †हरदम खुष दिलसें बैठे. ‡तीन्हों लोक.

---

२ सोहिरोबांचा कांहीं विशेष अधिकार जाणून महादजीनें त्यांस सांगितलें कीं तुह्मांस सरंजामी करून देतों व तुह्मी आमच्या पदरीं आमच्या भजनी मेळ्यांत रहा. त्यावर या पदांत असें सांगतात, 'मला तुमचा इतमाम, सरंजाम, धनदौलत यांची मुळींच गरज नाहीं. मी त्याकरितां आलों नाहीं माझें गमतीखातर फिरणें आहे; कधीं बनियांके दुकान (पक्षीं विवेक बनियांचा बाजार) कोइ दिन पर्वपर ठिकाण (डोंगराच्या माथ्यावर=पक्षीं योगशास्त्रोक्त मेरू पर्वताच्या शिखरावर; पुढें याविषयीं अन्य पदांत याचें विवरण होणार आहे]. वरच्या पदांत राजयोग्याचें लक्षण सांगि-तलें आहे. त्या अन्वयें येथें असें दर्शवितात कीं तुझ्या राज्यांत छत्तीस खिजमतगार आहेत, (हीं छत्तीस तत्त्वें समग्र सांगितल्यास येथें विस्तार होईल तरी तीं ज्ञाने-श्वरी अ० १३ येथें पहावी.) मनपवन की पागा= 'ब्रह्मदारण्यकोपनिषद अ० २ ब्रा० ५ यांत ह्मटल आहे कीं, परमेश्वरानें सर्व रूपें धारण केलीं त्याचा हेतु असा कीं त्याचें (आत्म्याचें) खेरें रूप उघड व्हावें. इंद्र (परमेश्वर) मायेच्या योगानें बहु रूप दिसतो, त्यानें शंभर आणि दहा घोडे (इंद्रियें) जोडलेले आहेत हा आत्मा अश्वरूप होय, हा दहा, हजार, बहुत आणि अनंत होय. हें ब्रह्म होय. सोहं पिलखाने की जागा=(पिलखाना ह्मणजे हत्ती बांधण्याचा जागा; सोहिरोबांनीं

पद ९ वें.

अवधूत नहीं गरज तेरी । हम बेपर्वा फकीरी ॥ ध्रु० ॥ तुम हो राजा मै हों जोगी । पृथक पंथका न्यारा ॥ चार कोट जहागीर तुमारी । ओही पंथ हमारा ॥ १ ॥ सोना चांदी हमकूं नहिं चाहिये । अलख भुवनका

अन्य पदांत ह्मटलें आहे कीं ' सोऽहं बीज हत्ती झुलतिल दादा). ह्यावर पातञ्जल योगशास्त्राच्या अभिप्रायांत ह्मटलें आहे, ' ज्याप्रमाणें घरांत दिवा असतो, आणि त्याचे अनंत किरण प्रकाशत आहेत असें दिसतें, त्याप्रमाणें स्थूल देहांत ओंकार-रूप आत्मा दीपक आहे आणि त्याचा किरण सोऽहं आहे; त्यानें पंचप्राण, अंतःकरणपंचक, देहचतुष्टय आणि सर्व इंद्रियें वगैरे उत्पन्न केलीं आहेत.' [कर-मकारखाना हमारा] याविषयीं भगवद्गीता अ० ३ मध्यें सांगितलें आहे.

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।
गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥

[सु. चं. टी.]

हे महाबाहो, गुण आणि कर्म यांच्या वांटणीचें खरें स्वरूप जाणणारा जो आहे, तो गुणांची प्रवृत्ति इतर गुणांच्या ठायीं होते, ह्मणजे इंद्रियें विषयांकडे ओढ घेतात, आणि या व्यापाराचेंच नांव कर्म,–असें जाणतो. आणि कर्माच्या ठायीं आसक्ती ठेवीत नाहीं. (नसीब जामदारखाना)= संचित वगैरे कर्मे. भ. द्गी. अ० १८

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥ १४ ॥

[जब सोहिरा तक्त० तब सब दु०] यांत असें दर्शविलें आहे कीं ' जेव्हां आपण राजयोग तक्त [हृदयस्थ ज्ञान] वर तक्तनशीन झालों तेव्हां सर्व जग तृणवत् मानलें.

१ सोहिरोबांचा वास्तविक अधिकार काय आहे, हें महादजीस कळण्याजोगें नव्हतें, ह्मणून त्यानें सोन्यारुप्याचीं नाणीं वगैरे बराच गहिना सोहिरोबांपुढें आणून ठेविला, व विनंति केली कीं ' तुमचा योगक्षेम चालला पाहिजे, याकरितां या विष-याचा स्वीकार करावा. ' त्यावरून सोहिरोबा या पदांत ह्मणतात. अरे, मी अवधूत, मला तुझ्या ह्या विषयाची काय गरज आहे? यासंबंधानें मी ' फकीर ' असल्यामुळें बेपर्वा आहें. अरे तूं राजा आहेस; आणि मी जोगी आहें (पक्षी ' योगीराज. ' योगी याचें हिंदुस्थानींत जोगी असें रूप होतें. दुसरें जोगी शब्दानें ' केवळ अद्वै-

बासी ॥ महाल मुल्लख सब झांट बराबर हम गुरु नामोपासी ॥ २ ॥ तुम ढाली बन+ हम झोली बन* । चार कोट जहागीरी ॥ तीन कालमो दुवाय फिरती । घर घर अलख पुकारे ॥ ३ ॥ तुमबी डुबे हमबि डुबाये । तेरा हम क्या लीया ॥ कहे सोहिरा सुनो महादजी । प्रकाश जोग गमाया ॥ ४ ॥

+ अन्यपाठ=ढालीबंद, झोलीबंद.

त शिवरूपाशीं तादात्म्य दर्शविलें आहे.) ' श्वेताश्वतर ' उपनिषद अ० ६ मंत्र ९ मध्यें ह्मटलें आहे कीं—

न तस्य कश्चित् पतिरस्ति लोके न चेशिता नैव च तस्य लिंगम् ।
स कारणं करणाधिपाधिपो न चाऽस्य कश्चिज्जनिता न चाधिपः ॥

भाषांतरः—(या) लोकीं त्याचा कोणी धणी नाहीं, आणि (त्याच्यावर) अम्मल चालविणारा नाहीं आणि त्यास ' लिङ्ग ' नाहींच; तो (विश्वाचें) कारण इंद्रियांच्या राजाचा राजा, आणि यास कोणी बापाच्या ठिकाणीं नाहीं, आणि राजा नाहीं, या तत्वार्थानें ह्मणतात अरे, मी राजाचा राजा (सार्वभौम) आहें, तरी माझ्या राज्यांत सोनें चांदी इत्यादिकांच्या नाण्यांची गरजच पडत नाही, कारण मी अलक्ष्य भुवनाचा राजा आहें. ह्मणून मला महाल, मुलुख केवळ शष्पवत् 'आहेत मुंडकोपनिषद् खंड १ मं० ७ यांत ह्मटलें आहे कीं ' जसे पुरुषाच्या आंगावर केंस व लंव हीं उत्पन्न होतात, तद्वत् अक्षर ब्रह्मापासून (पूर्वोक्त शिवापासून) विश्वाची उत्पत्ति होते] अरे, मला क्षुधा नाहीं, पण मी एक गुरुनामाविषयीं मात्र (नामोपासी) नेहमीं क्षुधातुर आहें. तूं ढाल तरवार बांधणारा राजा. तुझ्या सारखीच माझी चार कोटीची जहागिरी; ती अशी [स्थूल त्रिकूट, सूक्ष्म श्रीहाट, कारण गोल्हाट, महाकारण औटपीठ; ही ब्रह्मांडांतील व्यवस्था आहे याबद्दल अन्यत्र खुलासा होईल.] तुझ्या राज्यांत दर दिवस तीन काळ, ह्मणजे प्रातःकाळ माध्यान्ह काळ व सायंकाळ याप्रमाणें [दुवाय] द्वाही [वाद्यसाधनानें केलेला इशारा, हुकूम, नौवत] फिरत असते. तशी माझ्या राज्यांत नादरूप नौबत फिरत असते. माझ्या राज्यांतले तीन काल ह्मणजे भूत, भविष्य आणि वर्तमान या तीनही काळीं प्रत्येक घरांत अलख ह्मणजे 'ॐ तत्सत् ' हा नाद पुकारला जातो [तुमबी डूबे हमबी डुबाये] अरे तूं ' मायामय भवसागरांत बुडालास, पण मी त्या भवसागराचें ' अगस्ति ऋषीप्रमाणें ' शोषण करून टाकिला. सारांश तू मायेमध्यें बुडालास आणि मी मायेलाच बुडवून सोडली. [तेरा हम क्या लिया] जेव्हां

२ वेदांतविषयक पदें.

पद १ लें.

ब्रह्मानंदीं निमग्न मन झालें। एकाएकीं देहभान अवघें गेलें। पूर्ण बोधाचें घर हें रिघालें। अंतरीं पाहणें पाहतां हें निमालें॥ ब्रह्मानंदीं० ॥ ॥ १ ॥ मूळ शोधितां सांपडला हा साक्षि। उडोनी फळीं बैसला जैसा पक्षी। चित्त गुंतोनी हरपे अलक्षीं। लक्ष लागलें केवळ अंतरिक्षीं॥ ब्रह्मानंदीं० ॥ २ ॥ दोरावरी सर्पपण भासलें। रूपामाजीच अरूप प्रकाशलें। प्रकाशानें हें समूळ नासलें। अभ्यंतरीं गगन विकासलें ॥ ब्रह्मानंदीं० ॥ ३ ॥ स्वसुख वसती हे झाली ज्ञानवल्ली। पूर्ण वैराग्यकुसुमानें फुलली। ज्यासि दैवें सांपडली गुरुकिल्ली। म्हणे सोहिरा तोचि अवलिया वल्ही॥ ब्रह्मानंदीं० ॥ ४ ॥

कोणी राजा सार्वभौम होतो, तेव्हां दुसरीं अनेक राज्यें खालसा करावीं लागतात. अरे, पण माझें तसें नव्हे, मी तुझे राज्यांतलें कांहीं घेतलें नाहीं. कारण माझें राज्य वर सांगितल्याप्रमाणें 'अलक्ष्यभुवन' ह्मणजे ब्रह्मभुवनांतलें आहे त्याअर्थी तेथें जीवसृष्टि पदार्थांचा उपयोगच नाहीं. [कहे सोहिरा० प्र० जो० ग०] अरे तूं (जीवसृष्ट) राज्य कमावलेंस पण 'प्रकाश' आणि जोग ह्मणजे योग हीं गमावलींस. 'विवेकसिंधु'मध्यें मुकुंदराजांनीं ह्मटलें आहे. [माझें ज्ञान प्रकटेल। तुझ्या वदनीं प्रकाशेल। तेथें शिष्य देहीं संक्रमेल। गुरुकृपा द्वारें ॥ ८१ ॥ ऐसें आदिनाथ बोलिले। तंव हरीनें मुख पसरिलें। तेथें तेजोमय प्रकाशले। जगदीश्वर ॥ ॥ ८२ ॥ सदाशिवाचेनि कृपावशें। शांभव तेजाचेनि समावेशें। ते वेळीं चित्त समरसे। हरिचे परब्रह्मीं ॥ ८३ ॥ निर्विकल्प समाधी प्रकटली। दृष्टी अर्धोन्मीलित झाली। अहंता निःशेष निमाली। ब्रह्मानंदसागरीं ॥ ८४ ॥

१ श्वेताश्वतर उपनिषद अ० ४ मं. ६।७ मध्यें सांगितलें आहे कीं 'दोन पक्षी एकमेकांस कधीं न सोडून जाणारे असे मित्र असून एकच वृक्षाला बिलगून राहतात. त्यापैकीं एक आहे तो मधुर फळाचें भक्षण करितो, आणि दुसरा कांहींएक न खातां पहात राहतो. त्याच वृक्षावर आपल्या स्वतःच्या दुर्बलतेच्या [अनीशत्वाच्या] योगानें निमग्न झालेला व मोहांत पडलेला असा पुरुष शोक करतो. परंतु दुसरा जो ईश आहे, तो तृप्त आहे असें जेव्हां तो पाहतो, आणि जेव्हां त्याचा महिमा त्याला कळतो, तेव्हां त्याचा शोक नाहींसा होतो.'

पद २ रें.

सद्गुरुकृपेनें भाग्य ऐसें आलें । ब्रह्मानंदीं मन संतुष्ट झालें ॥ ध्रु० ॥ सांपडली हे सुषुम्नेची वाट । देखियेला हा विवेकाचा हाट । तेथझाली हे सद्वस्तुची भेट । रूपरेख नाहीं पाहतां पाठीपोट रे ॥ सद्गुरुकृपेनें० १ ॥ आदिअत पाहतां नाहीं शून्यीं । शून्य सामावलें ज्या चैतन्यीं । अनिर्वाच्य होउनी ठेलों मौनी । निद्रा लागली सहज उन्मनी रे ॥ सद्गुरु कृपेनें० २ ॥ तत्व सेवियेलें जें सज्जनीं । दिठी सूदली त्या ज्ञानांजनीं तेणें तेजें लोपली दिनरजनी । निधी लाधली पूर्ण निरंजनीं रे ॥ सद्गुरु कृपेनें० ॥ ३ ॥ उमजों गेलों म्या कवण ऐसें आधीं । मग्न झालों त्या अनुहात नादीं । निजबोधें गगन समाधी । सर्वां आधीं हें स्वरूप अनादी रे ॥ सद्गुरु कृपेनें ॥ ४ ॥ पडला चित्सूर्याचा हो प्रकाश । केला अद्वयाब्जिनें+ विकास । अधऊर्ध्वीं कोंदलें चिदाकाश । अनुभव हृदयींचा वदला सोहिरादास रे । सद्गुरु कृपेनें० ॥ ५ ॥

+ अन्यपाठ=अद्वयाब्धिनें.

---

१ या पदांत असें दर्शविलें आहे कीं ' ब्रह्म अखंडैकरस आनंदरूप आहे, पण ब्रह्म सच्चिदानंदरूप आहे, इतके शब्द तोंडपाठ झाल्यानें कांहीं उपयोग नाहीं. बरें, व्याकरणादिकांच्या साह्यानें अर्थही समजला, तरी तेवढ्यानें तें प्राप्त होणें शक्य नाहीं. त्याचा साक्षात्कार ह्मणून जो आहे, तो झाल्याविना ज्ञान संपूर्ण होत नाहीं. तसें संपूर्ण ज्ञान होऊन कृतार्थ होईपर्यंत सद्गुरुची सेवा करून कृपा संपादन केली पाहिजे. ह्मणूनच सोहिरोबांनीं या पदांत प्रारंभींच ' सद्गुरु कृपेनें भाग्य ऐसें आलें ' हे शब्द घातलेले आहेत, आचार्यांनीं विवेकचूडामणिमध्यें ह्मटलें आहे कीं ' सत्यवक्त्या पुरुषाच्या सांगण्यावरून आत्मस्वरूप कसें आहे, याचा निश्चय पूर्ण विचारांतीं करतां येतो, शेंकडों स्नानें केलीं, शेंकडों दानें दिलीं व शेंकडों प्राणायाम खेंचले, तथापि त्यांच्या योगानें आत्मस्वरूपाचा निश्चय कदापि करतां येणार नाहीं.' तो गुरु कसा असला पाहिजे, त्याचें लक्षण सांगतातः–' चतुर्वेद जाणणारा, निर्दोष निरिच्छ, ब्रह्मज्ञानी जनांमध्यें श्रेष्ठ, ब्रह्माचे ठायीं लीन, निरिंधन अर्थात् काष्ठरहीत अग्नीप्रमाणें शांत, कांहीं कारणाशिवाय दयेचा केवळ समुद्रच व नम्र सत्पुरुषांचा बांधव--अशा प्रकारचा असावा. सोहिरोबांस ' गोरखनाथ ' नामक सद्गुरुपासून ज्ञाना-

नुभव मिळाला होता. (आतां गोरखनाथ आणि सोहिरोबा यांजमध्यें बरेंच अंतर आहे, या गोष्टीच्या सत्यासत्यतेबद्दल आह्मी मागाहून लिहिणार आहोंत तरी तूर्त एवढेंच सुचवितों कीं ' मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ, गैनीनाथ, निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, तुकाराम ' यांजसारखें पुरुष जे केवळ भगवत्स्वरूपीं मिळून तन्मय झाले ते रंगनाथांच्या ह्मणण्याप्रमाणें [भगवंत भक्त उभयतां समसाम्य दुसरें नाहीं] ते अविनाशी अनंत स्वरूप झालेले आहेत, ह्मणून ते ज्याच्यावर कृपा करतात त्यांना प्रत्यक्ष भेटतात. या गोरखनाथांचा अधिकार सर्व विश्रुतच आहे. असें नामदेवांनीं ह्मटलें आहे, सबंध पद फार मोठें आहे, ह्मणून त्याचा शेवटचा चरण घेतला आहे, [का. सं. ग्रं. मा. पद सं. भा. १ पद ३० पहा] ' मच्छींद्राचा पोर एक खेळिया शहाणा तो निरंजनीं खेळ खेळला रे ! । आपआपणाचा शोध करुनियां आपण निराळा राहिला रे ॥ त्रिकुट भेदुनि श्रीहाट रोधुनि गोल्हाट गड घेतला रे ! । विष्णुदास नामा ह्मणे पाहा संत हो ! विचारून देहाला रे ॥ ६ ॥

२ भाग्य असें ह्मटलें तें ' वैराग्य ' भाग्य होय. अमृतरायांनीं ह्मटलें आहे कीं [वैराग्यभाग्यासारिखें भाग्य नाहीं] या वैराग्याचें लक्षण ' आचार्यांनीं अपरोक्षानुभूतीमध्यें ' सांगितलें आहे.

ब्रह्मादिस्थावरांतेषु वैराग्यं विषयेष्वनु ।
यथैव काकविष्टायां वैराग्यं तद्धि निर्मलम् ॥ ४ ॥

ब्रह्मादिक पदें तुच्छें, दुःखदोषानुदर्शनें । वाटती काकविष्ठाशीं तोंचि वैराग्य निर्मळ ॥ [समश्लोकी वामनपंडित]

३ या ब्रह्मानंदाविषयीं पंचदशीकार ' ब्रह्मानंदे योगानन्दः या प्रकरणांत ह्मणतात, ' या ब्रह्मानंदाचें चांगलें ज्ञान झालें असतां या लोकींचे व परलोकींचे जे अनर्थ आहेत, त्यांपासून मुक्त होऊन मनुष्य आनंदरूप ब्रह्मच होतो. यास श्रुतीचेंही प्रमाण आहे श्रुतींत ह्मटलें आहे कीं, ब्रह्मवेत्त्यास परब्रह्माची प्राप्त होते. आत्मवेत्ता शोकसागरांतून तरून जातो. हा आत्मा एक आनंदसागरच आहे यापेक्षां मोठा आनंद दुसरा नाहीं. तो मिळाला तरच प्राणी आनंदी होतो त्यावांचून होणार नाहीं. सद्गुरुकृपेनें जेव्हां ब्रह्मस्थिति प्राप्त होते तेव्हां तो भयरहित होतो ' या पदांतील प्रत्येक शब्द विचार करण्याजोगा आहे आणि विशेषेंकरून ह्या पदाचे शेवटीं ' अनुभव हृदयींचा वद्ला सोहिरादास ' असें ह्मटलें आहे तें हल्लींच्या काळीं ' ब्रह्मानंदाचा ' अनुभव घेणाऱ्या तत्त्वविद् व्यक्तीचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे. ह्मणून सवडीनुसार ' परिशिष्टामध्यें ' यथामति विचार करावयाचा आहे.

पद ३ रें.

पाहें [1]कैसें हें आहे । आहे नाहिंतही राहे ॥ ध्रु० ॥ आधिष्ठान जें

---

१ या पदांत असें सिद्ध केलें आहे कीं ब्रह्म हें ज्ञात पदार्थ आणि अज्ञात पदार्थ यांहून अगदीं भिन्न असून केवळ बोधस्वरूप आहे; परंतु अनुभवज्ञानाच्या अभावामुळें, नास्तिक किंवा शून्यवादी तें नाहीं किंवा प्रत्यक्ष दिसत नाहीं असें जें ह्मणतात, त्या त्यांच्या नाहीं ह्मणण्यांतच सत्यज्ञानानंत अशा ब्रह्माचा आहेपणा स्वानुभवजन्य आत्मप्रतीतीच्या योगानें सिद्ध होतो. बोधाविषयीं अनुभव प्रत्यक्ष होत असून जो मनुष्य तसा अनुभव नाहीं ह्मणतो त्याला काय ह्मणावें ? बोधाचा अनुभव नाहीं, असें ह्मणणें चमत्कारिक नव्हे काय? कारण आत्मा हा अनुभवास विषय जरी न झाला, तरी स्वतःसिद्ध तो बोधरूप असल्यामुळें त्याचें अस्तित्व कधींही नाहींसें करितां येणार नाहीं. कारण सर्व वस्तूंचें ज्ञान व आपण आहों हेंही ज्ञान त्या आत्म्याच्या योगानें होतें, यास श्रुतीचेंही प्रमाण आहे ‘ हा पुरुष स्वयंज्योति आहे. सर्व विषयांच्या पूर्वी हा भासतो, असा जो भासमान आत्मा त्याला अनुसरूनच सर्व जगत् भासतें, ह्मणून त्याच्या प्रकाशानेंच सर्व पदार्थ भासतात.’ इत्यादि, श्रुति वाक्यें आत्म्याचें प्रकाशत्त्व सुचवितात. ‘ जें जाणण्यास योग्य आहे, तें सर्व तो जाणतो.’ ‘ त्याला जाणणारा दुसरा कोणीच नाहीं.’ तथापि तो नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं कारण तो नाहीं ह्मणणें ह्मणजे आपण नाहीं असें ह्मणण्यासारखेंच आहे. व आपण नाहीं, असें भ्रांतिष्टावांचून कोणीही कबूल करणार नाहीं. ह्मणूनच श्रुतीनेंही शून्यवाद्यांचा निषेध केला आहे. त्या श्रुतीचा अर्थ असा आहे कीं ‘ ब्रह्म नाहीं ह्मणणारा आपणच नाहीं असें ह्मणतों, असें होतें. कारण आपलें स्वरूप ब्रह्मच आहे.’ आतां आत्मा अमुक प्रकारचा आहे, असें सांगतांच येत नाहीं. कारण जो पदार्थ ज्ञानाला विषय आहे, तोच पदार्थ असा किंवा तसा आहे असें सांगतां येईल. परंतु आत्मा हा ज्ञानाला विषय मुळींच नाहीं उलट तो विषयी, ज्ञाता व ध्यानस्वरूप आहे. तेव्हां तो असा किंवा तसा हें कसें सांगतां येईल. घटादि जे इंद्रियांना प्रत्यक्ष दिसणारे पदार्थ, त्यांस आपण अशा प्रकारचे असें ह्मणतों, व जे इंद्रियाआड असणारे पदार्थ त्यांस तशा प्रकारचे असें ह्मणतों—आतां आत्मा हा विषयच होत नाहीं, कारण इंद्रियांची विषय ग्रहण करण्याची शक्ति ही त्याच्यामुळें प्राप्त झाली आहे. इंद्रियें फक्त त्यांच्या समोरील वस्तूंचें ग्रहण करूं शकतात. डोळा डोळ्यांच्या समोरचेच पदार्थ पाहूं शकतो, त्याच्या मागच्या वस्तू त्यास पाहतां येत नाहींत; आणि आत्मा तर इंद्रियें, मन व बुद्धि यांच्या पलीकडे आहे, ह्मणून इंद्रियें, मन व बुद्धि यांना तो जाणतां येत नाहीं, ह्मणून तो असा (ईदृश) असें ह्मणतां येत नाहीं व तो स्वयंप्रकाश, स्वसंवेद्य असल्यामुळें तो तसा (तादृश) असेंही ह्मणतां

जारेज स्वेदज । अंडज उद्भिज्ज बा हें ॥ जडचैतन्या व्यापुनि सर्वही । साक्षिरूपें पाहे ॥ पाहें० ॥ १ ॥ पंचभुतें स्थुल सूक्ष्म बुद्धि । इंद्रियें मन

येत नाहीं. या कारणास्तव आत्मा ज्ञानाला विषय नसून प्रत्यक्ष आहे. ह्मणूनच तो स्वप्रकाश आहे. व ' सत्यं ज्ञानमनंतं ' या श्रुतीनें जें ब्रह्माचें लक्षण सांगितलें, तें आत्म्यालाही लागू पडतें. कारण आत्माही सत्यरूप, ज्ञानरूप, आणि अनंत आहे, असें विचारा अंतीं सिद्ध होतें. यास दृष्टांत, 'घरांतील सर्व मूर्त (ह्म. साकार) पदार्थ काढून टाकले असतां जसें बाकी अमूर्त आकाश राहतें, त्याप्रमाणेंच आपणा व्यतिरिक्त जितके ह्मणून देहेंद्रियादिक मूर्तामूर्त पदार्थ आहेत, त्यांचें ' नेति नेति ' 'तें नव्हे, तें नव्हे' या श्रुतीनें निराकरण करून बाकी जो बोधरूप साक्षी राहतो, तोच बाधरहीत सत्य आत्मा होय. कांहीं नाहीं ह्मणणें व कांहीं आहे ह्मणणें यांत भाषेचा मात्र भेद आहे. एऱ्हवीं वास्तविक पाहिलें असतां बाधरहित साक्षिचैतन्य आहेच आहे.

१ जारज ह्मणजे जरायू नांवाच्या कोथळ्यांत (गर्भाशयांतून) उत्पन्न होणारे प्राणि, मनुष्यपश्वादिक; स्वेदज ह्मणजे घामापासून उत्पन्न होणारे, कृमिकीटक मत्कुणादिक; अंडज ह्मणजे अंड्यांतून उत्पन्न होणारे सर्पपक्ष्यादिक आणि उद्भिज्ज ह्मणजे वृक्षादिक.

दिव्योपपादुका देवानृगवाद्या जरायुजाः ।
स्वेदजाः कृमिदंशाद्याः पक्षिसर्पादयोऽडजाः ।
उद्भिदस्तरुगुल्माद्या ॥ इत्यमरः विशेष्यनिघ्नवर्गः

या चार प्रकारच्या प्राणिसृष्टीच्या उत्पत्तीस हें सद्रूप अद्वितीय ब्रह्मच कारणीभूत अधिष्ठान ह्मणजे मुख्य स्थान आहे.

२ जड ह्मणजे सर्व चराचर, आणि चैतन्य ह्मणजे त्या सर्व चराचरास आपल्या अनिर्वचनीय शक्तीच्या योगानें चेतविणारें जें अविनाशी स्थिर तत्व तें.

३ अन्नमय कोश (थूल देह) प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश (हे तीन्ही कोश मिळून सूक्ष्म अथवा लिंगदेह होतो) आणि आनंदमय कोश या पंचकोशांपासून अन्वयव्यतिरेकाच्या योगानें आत्म्याचें विवेचन (पृथक्करण) करून पाहिलें असतां आत्म्याचें साक्षित्व सिद्ध होतें. याविषयीं पंचदशी पंचकोश–विवेक पहा.

४ पंचभुतें (पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश) स्थूल देह, सूक्ष्म अथवा लिंगदेह, इंद्रियें, मन हीं जरी सर्व आहेत. तरी त्यांच्या या व्यवहारास कारणीभूत जी सत्ता ती विवेक व ध्यान यांच्या योगानें वेगळी केली असतां तीं मिथ्या ठरतात.

त्यजितां हें ॥ बिंदुल्यों मधि अमुनि नमुनि । चमकत चमकत जें वाहे ॥ पाहें० ॥ २ ॥ सधर्म साजे वृक्षें विराजे । मनोराज्य तें भाजे ॥

१ बिंदूलें ह्मणजे शून्य (गगन) त्यामध्यें सद्वस्तूचा आश्रय करून असणारी शक्ति. ही सद्वस्तूचेठायीं नानाप्रकारच्या विकारांची कल्पना करिते. श्री रंगनाथ स्वामि एका पदांत ह्मणतात कीं (देवस्वरूप कोणतें.? आहे पण । माया स्वरूप कोणतें ? नाहीं पण ॥) " सद्वस्तूची शक्ति माया (असुनि नसुनि) ह्मणजे विद्युल्लतेप्रमाणें, आहे ह्मणावी तर नाहीं आणि नाहीं ह्मणावें तर आहे. ज्याप्रमाणें आकाशांत चमकणारी वीज (भावरूपी गुप्त विद्युत्) ती चमकली ह्मणजे आहे असें वाटतें व पुन्हा गुप्त झाली म्हणजे नाहीं असें वाटतें " याठिकाणीं [चमकत चमकत जें वाहे] हे सोहिरोबांचे शब्द प्रत्यक्ष अनुभवाचे आहेत.

२ जर भासतें तर तें शून्य कसें ? पूर्वींच्या दोन चरणामध्यें पर्यायेंकरून ' सत्य आणि ज्ञान ' या दोहोंविषयीं दिद्दर्शन केलें. आतां या चरणांत ' अनंत ' ह्मणजे ज्या ब्रह्माचा अंतपार लागत नाहीं असें जें ब्रह्माचें सत्तास्वरूप त्याविषयीं बोध सुचवितात कीं तें अनंतब्रह्म सधर्मयुक्त होत्सातें (साजे)=प्रपंच अश्वत्थ वृक्षरूपानें विरूढलें जातें.

३ हेंच हेंहाप्रमाणेंच वटबीजादिकांचा विचार पहावा. कोणीकडे तें सूक्ष्मबीज आणि कोणीकडे तो अफाट वृक्ष. तस्मात ही माया आहे असा निश्चय यांतच समाधान आहे. हें अव्यक्त तत्त्व सधर्म होत्सातें जगत्प्रपंचात्म अश्वत्थवृक्षरूपानें विरजलें जातें ह्मणजे विस्तारलें जातें. याविषयीं श्रीकृष्ण गीतेच्या पंधराव्या अध्यायांत म्हणतात

उर्ध्वमूलमधः शाख मश्वत्थं प्राहुरव्ययम ।
छंदांसि यस्य पर्णानि यसं स्तं वेद सवेदवित् ॥ १ ॥

[सु. च. टी प्रपंच हा एक अश्वत्थ वृक्ष आहे. ' अ ' म्हणजे नाहीं, ' श्वस ' म्ह. उद्यां आणि ' स्था ' म्ह. राहणें, यांपासून उद्यां राहील याचा नेम नाहीं, अर्थात अशाश्वत असा ' अश्वत्थ ' शब्दाचा मूळ अर्थ आहे.] पुराणपुरुष हें त्याचें मूळ हें वर आहे आणि चरचराचा विस्तार या त्याच्या खांद्या, याखालीं लोंबत आहेत. वेद हींच त्याला छाया देणारीं पानें याप्रमाणें हा जो ' अश्वत्थ ' अशाश्वत पदार्थ, याला कोणी शाश्वत पदार्थ म्हणतात. पण याला जो खरेपणानें जाणतो, तोच वेद जाणता होय.

४ असा प्रश्न येतो कीं एका ब्रम्हापासून हे अनेक आकार कसे उत्पन्न झाले ? याच प्रश्नावर पंचदशीकारांनीं योग्य निकाल केलेला असून तोच [" मनोराज्य

निधर्मी बीजप्रायचि होउनी । अनुभव ठाकुनि जें लाहें ॥ पाहे० ॥ ३ ॥

तें भाजे " या शब्दाचा] तत्वार्थ आहे म्हणून येथें त्याच अनुरोधानें निकाल केलेला आहे. ज्याप्रमाणें पाण्यांत प्रतिबिंबित आपला देह दिसत असूनही त्याची उपेक्षां करून तीरावर असणारा जो खरा आपला देह त्याविषयीं मात्र सत्यबुद्धि असते. किंवा नानाप्रकारचें मनोराज्य होत असून त्याची जशी मनुष्य उपेक्षा करितो, त्याप्रमाणेंच नामरूपांची उपेक्षा करावी. हा व्यवहार असा आहे कीं, आतां जें दृष्टीस पडतें तें क्षणांत नाहींसें होतें. आमचें मनोराज्य एकाक्षणीं जसें असतें, तसें दुसऱ्या क्षणीं नाहीं. जी कल्पना एकदां झाली ती होऊनच गेली. पुनः ती व्हावयाची नाहीं हा जसा मनांतील व्यवहार तसाच बाह्य जगतांतीलही समजावा. तरुणपणीं बालपण नाहीं, म्हातारपणीं तरुणपण नाहीं, गेलेला बाप पुनः येत नाहीं आणि गेलेला दिवस गेलाच. ह्या क्षणभंगुर व्यवहारांत व मनोराज्यांत भेद मुळींच नाहीं याकरितां तो जरी भासला तरी त्याविषयीं सत्यदृष्टि सोडून द्यावी. हाच सोहिरोबांचा उपदेश कीं भगवंतांनीं गीतेंत सांगितल्याप्रमाणें या अश्वत्थ वृक्षास जो खरेपणानें जाणील त्याचेंच मनोराज्य (१ भाजे) ज्ञानरूप अग्नीनें दग्धबीज होईल आणि जें दिसतें भासतें तें मनोराज्यच होय तेंच भाजतें म्हणजे दग्ध होतें. सर्वान्तर्यामी आत्मा उत्पत्तीकाळीं येतही नाहीं, व मरणसमयीं जातही नाहीं, कारण कीं तो खण्डरहित आहे.

१ निधर्मी म्हणजे ज्याला आहार-निद्रादि शरीरधर्म नाहींत असे वृक्षादिक. पूर्वोक्त जो प्रपंचरूपी अश्वत्थ वृक्ष (निर्धर्म-मायामय-प्रपंच-वृक्ष) त्यामध्यें बीज ठेवणारा बाप आपण आहें असें भगवंतांनींच प्रत्यक्ष अर्जुनास सांगितलें आहे.

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

भ० गी० अ० १४ [मु. चं. टी.]

हे भारता, महत्ब्रह्म हें माझें गर्भ ठेवण्याचें स्थान म्हणजे माझी प्रकृति होय. तिजमध्यें मी गर्भ ठेवतों, आणि त्यापासून सर्व भूतांची उत्पत्ति होते.]

२ वर दाखविलेल्या वृक्षाच्या उदाहरणांतील अनुभवाप्रमाणें " बुद्ध्यादिकांचा साक्षि जो प्रत्यग्बोध अहंबुद्धीस विषय भास होतो, तो अद्वयानंदरूप आहे. आणि जो अद्वयानंदरूप परमात्मा, तो प्रत्यग्बोधरूप साक्षी आहे. असें एकमेकांचें जेव्हां ऐक्य सिद्ध होईल, तेव्हां त्वं पद वाच्यजीव ब्रह्म नव्हे [नाहीं] असें जें वाटतें, तें वाटणें नाहींसें होतें. आणि तत्पदाची अपरोक्षता, ही तत्काल नाहींसी होते.

म्हणे सोहिरा बहुविध गेले। कल्पकल्प नामुनि ठेले। परि आहेपण सत्य विलक्षण। जाणुनि गैबीपद पाहे ॥ पाहें० ॥ ४ ॥

असें झालें असतां पूर्णानंदस्वरूपी प्रत्यग्बोध साक्षीच केवळ राहतो. [सार्थ पंचदशी तृप्तिदीप श्लो० ७६–७७–७८ पहा.] ” [जें लाहे] याप्रमाणें प्रत्यक्ष अनुभवाला येऊन जें प्राप्त होतें.

१ सोहिरोबा ह्मणतात, कीं जें असत् ह्मणजे मुळींच नाहीं तें आहेसें होत नाहीं, आणि जें सत् ह्मणजे आहे, तें नाहींसें होत नाहीं, असा या दोहोंचा निर्णय तत्त्व–ज्ञान्यानीं जाणला आहे.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥
[भ. द्गी. अ० १३]

हें न जाणतां बहु विध प्राणि गेले. ‘ मोठमोठे धनुर्धर चक्रवर्ति, सुद्युम्न, इंद्र-द्युम्नादि, मोठमोठे राजे आपल्या आप्त वर्गांचा त्याग करून ह्या लोकापासून पर-लोकीं गेले. हेंचसें काय पण त्यांच्याहून मोठमोठ्यांची हीच गोष्ट आहे, गंधर्व, असुर, यक्ष राक्षस, उरग, ग्रह यांचा नाश होतो. देव आपल्या स्थानापासून च्युत होतात. याप्रमाणें बहुविध जीव नाहींसे झाले व नाहींसे होऊन ‘ अनंत वाचक कालाचे कल्पाचे कल्प निघून गेले आहेत.’ परंतु या ब्रह्माचें सत्य स्वरूप काय आहे तें त्यांना कळलें नाहीं.

२ वर सांगितल्याप्रमाणें नाहीं ह्मणणारे ह्मणोत परंतु आहेपण हें सत्य आणि विलक्षण (लक्षणरहीत) असें जाणून गैबी पद (पक्षी गुरु गोरखनाथ) यांचें पद (चरण कमल) पाहें (पाहतां झालों). गैबी पद पाहे, असें ह्मटलें आहे त्याचा भावार्थः—

पद्यते गम्यते चेति स्वस्वरूपं निरञ्जनम।
द्विविधं तत् परं ब्रह्म सगुणं निर्गुणात्मकम् ॥ १ ॥
[शंकरानंद]

पद ह्मणजे जें प्राप्त केलें जातें तें निर्विकार स्वस्वरूप. तें परब्रह्म सगुण आणि निर्गुण असें दोन प्रकारचें आहे. पैकीं निर्गुण स्वरूप वास्तविक असून सगुण स्वरूप कल्पिलेलें होय. जो पुरुष कर्म आणि उपासना या उभयतांना एकीकृत स्वरूपानें जाणतो, व तसेंच अनुष्ठान करितो, तो ज्ञाता कर्माच्या योगें मृत्यूला उल्लंघून उपा-

पद ४ थें.

तेणें मज सहज हा हृदयीं नित्य बेध लाविला ॥ ध्रु० ॥ वैराग्य हें आंगीं वसलें । तेव्हां अवघेंचि मिथ्या दिसलें । निजरूप नयनीं बसलें । कोठें नाहीं सुख असलें । एकाएकीं जीव हा परम विश्रांति पावला ॥ तेणें मज० ॥ १ ॥ पंचमहाभूतें जहालीं । तेणें सृष्टि रूपा आली । जेणें चंद्रें सूर्या चाली । नाम रूपा शोभा आली । जयामध्यें तीन्ही लोक समग्र सामावला ॥ तेणें मज० ॥ २ ॥ इंद्रियांची द्वारें कोंडुनी । पवनाचे पाय मोडुनी । सर्वही प्रपंच सोडुनी । मनाचिया वृत्ति तोडुनी । शून्य अवघें गगन फोडुनी गुप्त पंथ दाविला ॥ तेणें मज० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे जंव जंव पाहें । विश्व नाहीं तोचि आहे । सर्व गत व्यापुनि राहे । तेथिला कीं ध्यास वाहे । अहं सोहं समूळ अभिमान हा दुरावला ॥ तेणें मज० ॥ ४ ॥

सनेनें अमरत्त्व पावतो, ह्मणजे ब्रह्मलोकस्थ हिरण्यगर्भाच्या स्वरूपीं मिळून त्याच्या बरोबर [कल्पाच्या अंतीं] परब्रह्मस्वरूपास पावतो, तात्पर्य परोक्ष व अपरोक्ष ज्ञानानें जो पूर्ण असतो तो प्रत्यक्ष हें असें आहे, याप्रमाणें जाणून आत्मानुसंधान पूर्वक सर्व व्यवहार करितो.'

१ ज्याच्या गतिमुळें ह्मणजे प्रेरणेनें चंद्र सूर्य चालतात.

न तत्र सूर्यो भाति, न चंद्रतारकम् ; ।
नेमा विद्युतो भांति, कुतोऽयमग्निः ? ॥
तमेव भांतमनुभाति सर्वम् , ।
तस्य भासा सर्वमिदं विभाति. ॥

" श्वेताश्वतर " उपनिषद्]

त्याच्या पुढें सूर्य प्रकाशत नाहीं, चंद्र तारे (प्रकाशत) नाहींत; या विजा प्रकाशत नाहींत, मग हा अग्नि कोठून (प्रकाशणार) ? त्याच प्रकाशणाराच्या पाठीमागून सगळें प्रकाशतें, त्याच्या प्रकाशानें हें सगळें प्रकाशतें.

(पुढें चालू).

पद ५ वें.

परब्रह्म भेट रे। प्रपंचे पट हा फाट रे। दृश्यें चित्र आट रे। मज-माजी सदोदित आनंदचि दाट रे ॥ ध्रु० ॥ त्रिकुटाचा घांट रे। वोलांडुनि सुषुम्नो कपाट रे। वरी नादाचा दणदणाट रे ॥ बाहेर येऊं पाहतां

---

१ प्रपंच ह्मणजे व्याकृत भासमय विश्व होय. व पट ह्मणजे "सूत्राच्छादित (अनेक सुतें मिळवून विणलेला) पट (वस्त्र). माती कांच इत्यादिकांनीं बनविलेल्या घटासही हा (प्रपंच) शब्द योजिलेला आढळतो. याच संदर्भानें वेदांतामध्यें जगत्स्वरूपाचें वर्णन करतांना या (प्रपंच पट) शब्दाचा वारंवार लाक्षणिक उपयोग केलेला आहे. या जगत्प्रपंच रूप चित्रपटावर (चित्रपटावरील चित्रांप्रमाणें) आत्म्याचे ठायीं ब्रह्मदेवापासून तों अति सूक्ष्म तृणापर्यंत सर्व स्थावरजंगमात्मक-सृष्टि उत्तमाधमभावेंकरून दृष्टीस पडते. या पटाचे वस्त्रास आधारभूत तंतु ह्मणजे सत्त्व, रज, तम हे गुण ह्मणजे दोर आहेत या मुळेंच सोहिरोबांनीं या पदांत "प्रपंच पट हा फाटरे" असें ह्मटलेलें आहे.

२ दृश्य चित्र ह्मणजे वर सांगितलेलें, प्रत्यक्ष दिसणारें सृष्टीचें चित्र; जणुं पूर्वोक्त चित्रपट, पक्षीं, धुवट कापडावर (स्वतः चिद्रूप शुद्ध पटावर) खळ लावून त्याजवर मनुष्य, पक्षी, पर्वत, वृक्ष व नद्या वगैरे सृष्टीचें चित्र काढून तयार केलेला एक नकाशा.

३ त्रिकुटाचा घांट म्हणजे त्रिकूट नावांचा डोंगर (पर्वत) असा लक्षाणिक अर्थ घेऊन अनुभवज्ञात्यायोगिजनांनीं वारंवार सांकेतिक रूपक केलेलें आढळतें. यालाच ब्रह्मगिरी, द्रोणगिरी, हिमालय, मेरू अशीं अन्य नांवें आढळतात. (त्रिकूट ह्मणजे औट प्रमाण, ब्रह्मांडातील स्थूल देह) याच कारणामुळें सोहिरोबांनीं "त्रिकुटाचा घांट, ओलांडुनी" असें ह्मटलेलें आहे. घाट शब्दांचा लौकिक अर्थः—'भयंकर उंचडोंगरावर चढण्यासाठीं अडचणींतून सवडी सवडीनें केलेला रस्ता.' हा घाट ओलांडून जाणें ह्मणजे पूर्वोक्त जो त्रिकुटगिरी त्याचें शिखर ह्मणजे कूटस्थ (ॐकार) त्याला ओलांडून पलीकडे गेलें पाहिजे. तेव्हां प्रवेश व्हायाला महान् प्रयास पडतात. एक वेळ तीक्ष्ण तरवारीच्या धारेवर चालणें बरें! पण सतत केलेल्या तीक्ष्ण उपासनेच्या योगानें हा घाट ओलांडून जाण्याचें कर्म कठीण आहे. असें अमलानंदासारख्या महान् योगिजनांनीं ह्मटलें आहे.

४ सुषुम्ना नावांची देहांत असणारी पवित्र नाडी ही पाठिमागच्या कण्यांतून ब्रह्मरंध्रापर्यंत जाऊन पोहोंचते. ह्मणून योगशास्त्रांत हिला ब्रह्मद्वार असें ह्मटलेलें आहे. जिच्या योगानें (द्वारानें) ब्रह्मप्राप्ति होते अतएव येथें ही सुषुम्ना कपाट (द्वार) असें ह्मटलें आहे. (योगशास्त्रोक्त ब्रह्मद्वारचक्र पहा.)

नाहीं, कल्पनेसि वाट रे ॥ पर० ॥ १ ॥ विकासी[1] ल्हाट रे । मोडो मनें[2] पवनाची राहाट रे । टांकूं श्रीहाट[3] गोल्हाट[4] रे ॥ औट

---

१ वर सांगितलेलें जें ब्रह्मद्वार चक्र त्याचें स्थान ह्मणजे ललाटोर्ध्व भाग होय. अर्थात् या स्थानचें कमलयुक्त चक्र (पक्षीं आकाशकमल) तें विकासो ह्मणजे प्रफुल्लित होवो असा लाक्षणिक अर्थ घेतलेला आहे. (हें श्रीहंसस्थान आहे.)

२ मनपवन इंद्रियांचा स्वामी मन आहे व मनाचा स्वामी प्राणवायु (पवन) याअर्थीं येथें मनपवन हा शब्द योजिला आहे. त्या प्राणाचा स्वामि लय हा लय नादाचा आश्रय करून असतो. (नादाचा दणदणाट रे) याकरितां प्राणाचा लय साध्य करून घेण्यास योग्यानें झटलें पाहिजे असें योग बीजांत सांगितलें आहे. जेथें चित्ताचासुद्धां लय होतो अशा त्या स्थितींत मनपवनाची राहाटी (राहटगाडगें,) अर्थात्च मोडली जाते.

३ श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ हीं ब्रह्मांडांतील (योगशास्त्रोक्त सहस्रदल चक्रांतील) देहविशिष्ट लाक्षणिक नांवें आहेत. पूर्वी त्रिकूट ह्मणजे स्थूल देह असें सांगितलें आहे. आतां येथें पहिलें श्रीहाट ह्मणजे अंगुष्ठप्रमाण 'सूक्ष्म देह' (श्री=ज्ञानशक्ति, लक्ष्मी तिचा बाजार असा याचा लाक्षणिक अर्थ आहे.) नादाच्या चार अवस्था आहेत. त्यापैकीं घटावस्था असें जिला ह्मणतात, तिचा या स्थानीं योग्यांस अनुभव आहे, असें 'पातञ्जलयोगशास्त्राचा अभिप्राय या पुस्तकामध्यें लिहिलें आहे.' " ज्यानें दृढासन केलें आहे अशा योग्याचा प्राणवायु जेव्हां अपान, नाद व बिंदु यांच्यासुद्धां मध्यचक्रांत ह्मणजे कंठस्थानीं येतो, तेव्हां कंठामध्यें असणाऱ्या विष्णुग्रंथीचा भेद होऊन कंठाकाशांत अनेक नादांनीं मिश्रण झालेला असा (भेरी) नगाऱ्याप्रमाणें शरीरांत शब्द ऐकूं येऊं लागतो. पुढें परमानंद प्राप्त होणार अशाचा सूचक तो शब्द कंठांत येऊं लागला ह्मणजे योगी पूर्वीपेक्षां अधीक ज्ञानी होऊन देवासारखा तयार होतो. अशी घटावस्थेंत योग्याची स्थिति असते.

४ गोल्हाट ह्मणजे अंगुलप्रमाणें कारणदेह हृदयस्थानीं (हृदयाकाशांत) योगशास्त्रोक अनाहतचक्रामध्यें, जो ब्रह्मग्रंथी आहे, त्यामध्यें जो उलटा प्राणवायु आहे, त्यांतील ज्ञानवृत्तीला इंद्रियांच्या सहाय्यावांचून स्वतःच्या स्वरूपाचा यथार्थ बोध होत नाहीं; अशा त्या प्राणवायु राहाण्याच्या ठिकाणास गोल्हाट ह्मणतात. पूर्वी सांगितलेल्या नादांच्या चार अवस्थांपैकीं या ठिकाणीं नादाची " आरंभावस्था " शुरू होते. ज्या वेळीं प्राणायामाच्या अभ्यासानें अनाहतचक्राच्या ठिकाणीं असणाऱ्या ब्रह्मग्रंथीचा भेद होतो, तेव्हां मनास आनंद देणारा मंजुळ असा हृदयाकाशांत उत्पन्न झालेला ध्वनि शरिरामध्यें ऐकूं येतो. हृदयाकाशांत नाद होण्यास सुरवात झाली ह्मणजे योग्याचें हृदय आनंदानें भरून जातें. त्याला दिव्यरूप, लावण्य (सौंदर्य)

पिठावरुनी जाऊं, भ्रमरं-गुंफेनीट रे ॥ पर०॥ २ ॥ सोहिरा ह्मणे हा शेवट

इत्यादि गुण प्राप्त होतात. मोठा प्रतापी, निरोगी व ज्याच्या शरीराला उत्तम सुगंध येत आहे, असा या नादाच्या आरंभावस्थेंत योगी होतो. याचसाठीं हीं दोन्ही स्थानें टाकू व पुढें जाऊं असें सोहिरोबांनीं ह्मटलेलें आहे.

१ औटपीठ ह्मणजे मसूरिप्रमाण महाकारणदेह. याला आज्ञाचक्र, शर्वपीठ अशा अन्य संज्ञा आहेत.

या ठिकाणीं पूर्वोक्त नादाच्या (तिसऱ्या) "परिचर्या"वस्थेचा अनुभव योग्यास येतो. ह्यासंबंधानें पातञ्जलयोगशास्त्राच्या अभिप्रायांत येणेंप्रमाणें लिहिलें आहेः— [तिसऱ्या परिचर्यावस्थेंत शर्वपीठ जें आज्ञाचक्र त्या ठिकाणीं प्राणाचा लय झाला-असतां भोंवयांच्या मध्यें असणाऱ्या रुद्रग्रंथीचा भेद होऊन विशेष ज्ञान उत्पन्न करणारा असा शरिरांत ध्वनि ऐकूं येऊं लागतो. त्या वेळेस योग्याच्या मनास वाटतील त्या अणिमादि सिद्धि प्राप्त होऊं शकतात. व स्वाभाविक आत्मसुख प्राप्त झाल्या-मुळें आधि, व्याधि, जरा, दुःख वगैरे कांहीं राहत नाहींत ही परिचर्यावस्था होय.]

२ भ्रमरगुंफा ह्मणजे योगशास्त्रोक्त ब्रह्मरंध्रचक्र (मूर्ध्निस्थान) भ्रमरगुंफा ह्मणण्याचें कारण, गुंफा ह्मणजे गुहा (बुद्धिरूप गुहा) समाधींत असणाऱ्या योग्याला इंद्रियांस अगोचर व केवळ बुद्धीनेंच जाणण्यास योग्य अशा कैवल्यसुखाचा अनुभव या स्थानीं येतो. त्या आनंदांत योगी निमग्न असतां, पुष्पावरील मकरंदपान कर-णाऱ्या भ्रमराप्रमाणें चलित होत नाहीं. आणि या परमानंदापेक्षां त्याला दुसरी कोणतीही वस्तु अधिक प्रिय वाटत नाहीं. या करितां येथें लाक्षणिक अर्थानें भ्रमर-गुंफा असें नांव योजितात. यास्थानीं पूर्वोक्त चौथ्या " निष्पत्त्यावस्थेचा " अनुभव आहे. निष्पत्त्यावस्थाः—ब्रह्मरंध्रांत प्राण लीन झाल्यावर वीणा, मुरली इत्यादिकांसारखा ध्वनि ऐकूं येऊं लागतो; व योग्याला फारच विलक्षण सामर्थ्य प्राप्त होतें. ह्या चौथ्या अवस्थेंतील चित्ताच्या एकाग्रतेलाच राजयोग, तुर्यावस्था इत्यादि संज्ञा आहेत.

३ हा योगाच्या पूर्णानुभवाचा शेवट होय. कुंडली चालन झाल्यानें ती जागी होऊन तिनें प्राणाचा मार्ग खुला केल्यामुळें, पूर्वोक्त सुषुम्नेचा रस्ता, जसा एकादा कोष्टी किंवा कोळी नावांचा किडा आपण उत्पन्न केलेल्या तंतूंवरून सहज जातो; तसा प्राण वायूला वर जाण्यास राजमार्गाप्रमाणें अगदीं सुलभ होतो असें याज्ञवल्क्य संहितेंत सांगितलें आहे. प्राणवायूचा सुषुम्नेंत चांगला संचार होऊं लागला ह्मणजे मग समाधीचा भंग होत नाहीं आणि नंतर शेवटची उन्मन्यावस्था किंवा भूमावस्था असें जिला नांव आहे, ती योग्यास सहज प्राप्त होते. त्यामुळें योगी पुनः संसारांत येत नाहीं. याप्रमाणें ध्यानाची अगदीं परिपक्व अवस्था होऊन कुंडली जागी करणें या विधीला सुद्धां राजयोग ह्मणतात.

रे । लुटो अनुभवाची पेंठ रे । फिटो[२] मतांतर बोभाट रे ॥ चारि वाचा निवांत पडती, मुखें सुचेना गोष्ट रे ॥ ३ ॥

---

१२ अनुभवाची पेंठ ह्मणजे ॐकाराची पेठ. कोणचेंही राज्य काबीज करून घेतल्यानंतर विजयी झालेला राजा आपल्या लोकांकडून त्या राजधानीच्या शहराची पेंठ लुटवितो. त्याप्रमाणें येथें योग्याचें पूर्वी अभ्यास काळीं आपल्यापासून उत्पन्न झालेल्या अविद्येबरोबर लढाई करून बोधाला जय मिळून तो सुदृढ होत्साता विजयी झालेला आहे; अशा त्या शूर बोधराजानें सर्व प्रकारच्या कर्मांच्या अनुभवाची पेंठ ह्मणजे पूर्वोक्त (अधिष्ठान) भ्रमरगुंफा, ती लुटून फस्त केली असें तात्पर्य.

१३ अर्थात् सर्व प्रकारच्या कर्मांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळें, निरनिराळे मतवादी परमात्म स्वरूपाविषयीं जे निरनिराळे तर्क व अनुमानें करितात, त्या त्यांच्या परस्परांच्या मतांत असणारें अंतर हेंच बोभाटणें याच्या श्रवणानें दूषित झालेल्या चित्ताचा संशय फिटो. याचें रहस्य असें आहे कीं असंग, अद्वितिय जें ब्रह्मतत्त्व, तें न जाणतां मायिक जे जीव आणि ईश, यांविषयी लोक व्यर्थ कलह करतात-तृणार्चकापासून योगवाद्यांपर्यंत सारे ईश्वराविषयीं भ्रांतींत पडले आहेत. आणि लोकायत ह्मणजे देहात्मवाद्यांपासून सांख्यवाद्यांपर्यंत सगळे जीवाविषयीं भ्रांतींत पडलेले आहेत. हे भ्रांत कसे? तर जोंपर्यंत अद्वितीय ब्रह्मतत्त्वाचा बोध झाला नाहीं तोपर्यंत सर्व भ्रमांतच आहेत असें ह्मटलें पाहिजे. अशा लोकांस मुक्तिही नाहीं आणि ऐहिक सुखही नाहीं. आनंदमय ईश आणि विज्ञानमय जीव हे उभयतां क्रमेंकरून माया आणि बुद्धि यांवर अवलंबून आहेत, आणि त्या दोहोंस अधिष्ठान कूटस्थ आणि ब्रह्म हे अत्यंत निर्मळ आहेत. याचा स्पष्ट अनुभव मिळून अद्वैत बोध पूर्णपणें ठसला ह्मणजे कांहीं संशय राहत नाहीं. कारण प्रत्यक्ष ज्या गोष्टींचा अनुभव घेतला, त्याबद्दल संशय कसा राहील?

१४ चार वाचा ह्मणजे "परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी" ह्या चारही निवांत ह्मणजे निर्वात वायुरहित झाल्यामुळें स्तब्ध पडतात आणि त्यामुळें वृथा बडबडणें मुळांतच बंद होतें. कारण आंतून सूचना मिळण्याचें बंद पडल्यामुळें मुखानें गोष्टी (शब्दोत्पत्ति) तरि कशा निघतील [प्रणवाचिये पेठे । उल्हासें शब्द ब्रह्म माजिठें । तें जयाचिया यशा धाकुटें । वेह्नं न पुरे ॥ १ ॥ ज्ञानेश्वरी अ० ६]

पद ६ वें.

भुललें आजी हें मन ॥ ध्रु० ॥ जेथ दिवसे ना राती । तेथ जीवघँटाची हे माती । इंद्रियें आपापुलें खाती । जया पाहूं जातां झालीं तटस्थें नेत्रपातीं ॥ भुललें० ॥ १ ॥ अरुपाचें रूप । तो हा आकाशिंचा कुंपं । आंत बुडालें पुण्यपाप । देखुनी निर्वातीचौं दीप ॥ भुललें० ॥ २ ॥ लोपल्या

---

१ तेजोमय अमृतमय विश्वरूप अनंत असा जो मूळ पुरुष त्याविषयीं या पदांत दिग्दर्शन केलेलें आहे. हा पुरुष मनाच्या योगानेंच प्राप्त व्हावयाचा ह्मणून भुललें आजि हें मन मुद्यावर या पदाची सुरवात केली आहे. मनाच्या योगानें हें (ब्रह्म) प्राप्त व्हावयाचें, आणि मग (ह्या विश्वांत ब्रह्माहून) कांहींएक भिन्नत्व नाहीं. जो कोणी येथें भेद पाहतो त्याला पुनः पुनः जन्ममरण प्राप्त होतें.

२ हा स्वयंज्योतिपुरुष सूर्यचंद्रादिकांचाही भासक आहे. ह्मणून स्वतः सूर्याच्याठिकाणीं दिवस आणि रात्र हा भेद मुळींच असूं शकणार नाहीं, तद्वत् या शुद्ध पुरुषाच्याठायीं संवत्सरप्रजापतिरूप दिवस रात्री हा कालभेद असूं शकणार नाहीं.

३ स्थूल देह (घट) त्याचें उपादानकारण जी माती तिचें अधिष्ठान तोच पुरुष आहे.

४ इंद्रियांचा स्वभाव बाह्यविषयांचा उपभोग घेणें हा होय. प्रत्येक ज्ञानेंद्रिय किंवा कर्मेंद्रिय आपापलें काम करण्याकरितां ज्या विषयाचें ग्रहण करितें, तो विषय हें त्याचें अन्न होय. परंतु तीं इंद्रियें आत्मस्वरूपाचें ग्रहण करूं शकत नाहींत. ह्मणून आत्मा अमुक प्रकारचा आहे असें ज्ञान इंद्रियांस होत नाहीं.

५ डोळे तटस्थ झाले ह्मणजे सर्व इंद्रियें हीं आत्मस्वरुपाचे ठिकाणीं लय पावलीं.

६ परमात्म्यापासून आकाश उत्पन्न झालें व त्यापासून वायू, वायूपासून तेज याप्रमाणें क्रमानें चार भूतें उत्पन्न झालीं. पहिलें भूत दुसऱ्या भूतास व्यापून असतें. ह्मणून सर्व भूतांपेक्षां आकाश व्यापक आहे. परंतु परमात्मा हा आकाशासही व्यापून आहे. म्हणून त्यास आकाशाचा कुंप-वेष्टन असें म्हटलें आहे.

७ पूर्वोक्त स्वयंज्योति पुरुष (साक्षि.)

बारा[1] सोळा[2] । तांबा नोहे[3] गोरा काळा । सर्वीं सर्वत्र मोकळा । त्यानें धरिला माझा गळा[4] । चालविती कळा[5] ॥ भुललें० ॥ ३ ॥ भेद मोडला माझा । चहूं वाचातीत गुजा[6] । आपणापें होते पूजा । हें सख सर्व सुखाचा राजा[7] ॥

---

१ योगशास्त्रोक्त अनुहतचक्रांतील (द्वादशदलचक्र) यांतील कपासून ठपर्यंत असणाऱ्या बारा मातृका अर्थात् लोपल्या म्हणजे रुद्रग्रंथीचा भेद झाला असा भाव आहे.

२ सोळा कळा ह्मणजे योगशास्त्रोक्त विशुद्धचक्रांतील (षोडशदलचक्रांतील) सोळा मातृका (अ पासून अः पर्यंत) किंवा सोळा कळा ह्मणजे बृहदारण्यकोपनिषद अ० १, ब्रा० ५, म. १५ मध्यें सांगितलेल्या सोळा कळांनीं युक्त अशा संवत्सर-रूप प्रजापति ज्यास कळतो तो प्रजापति रूप होय. त्याचें वित्त ह्या पंचदशकला होत; आणि त्याचा आत्मा ही सोळावी कळा होय.

३ वेदांती असें ह्मणतात कीं लाल, पांढरा आणि काळा हे रंग, रज, सत्व तम गुणाचे सूचक आहेत किंवा तेज, उदक किंवा अन्न (पृथ्वी) या तत्त्वांचे सूचक आहेत.

४ गळा धरिला याचा भावार्थ पूर्वोक्त कंठस्थानचे विशुद्ध चक्रांतील (हृदय आणि कंठ यांच्यामधील) मनश्चक्र अर्थात् आपल्या ठिकाणचा जीवभेदच नाहींसा केला हा भाव. (कंठस्थान हें जीवात्म्याचेंच आहे.)

५ देहचालन करणारी पूर्वोक्त चैतन्य कळा ब्रह्मतेज देहांतील अग्निमंडळाच्या मुळाशीं आहे. तेथील अग्नि प्रदीप्त झाला असतां ब्रह्मतेज अभिव्यक्त होतें. घोषयुक्त प्राणवायूच्या योगानें जेव्हां हा अग्नि प्रदीप्त होतो तेव्हां ब्रह्मतेज अग्नि आणि वायु यांच्या उपाधींनीं युक्त होऊन प्रथमतः नाद मात्र प्रणवरूपानें आविर्भूत होतें. परंतु नंतर क्रमाक्रमानें हृदय, कंठ, तालु इत्यादि स्थानांचा त्यास रोध घडून त्याला नानावर्णाचीं रूपें प्राप्त होतात. आणि शेवटीं त्यापासून नानावेदशाखा उद्भवतात.

६ चार वाचांच्या पलीकडे असणारे (गुज) गुह्य (अव्यक्त)

७ *भगवद्गीता अध्याय ६* यांत सांगितलें आहे कीं [युंजन्नेव सदात्मानं योगी विगतकल्मषः । सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥ २८ ॥ भावार्थः—आपल्या मनाला स्वाधीन ठेऊन पापापासुन मुक्त झालेला जो योगी (राजयोगी), तो अनायासें ब्रह्माच्या साक्षात्कारचें अमर्याद सुख अनुभवितो हाच "हें सुख सर्व सुखांचा राजा" असें ह्मणण्याचा भाव.

भलळें० ॥ ४ ॥ न लावितां अंग्नि[1] । अजीं कायामाया केली भग्न । प्रकृति पुरुषाचें हें लग्न[2] । आंत सोहिरा झाला मग्न[3] ॥ भुलळें० ॥ ५ ॥

पद ७ वें. (चाल—देवा प्रसाद दे झडकरी)

हृदयीं चिन्मय सुखाचा बोध जाहला ॥ ध्रु० ॥ कांहीं नाहीं प्रतिकूळ । जाहलें स्वरूप अनुकूल । जया याति नाहीं कूळ । पाहतां आपुलें तें मूळें । समूळ हा शब्द[6] निमाला ॥ हृदयीं० ॥ १ ॥ होउनी अंहँ सोहं भग्न ।

---

१ गतप्राण झालेल्या मनुष्याचा जडदेह नाश करण्यासाठीं अग्नि लावावा लागतो. परंतु "आपण" जिवंत असतांनाच अग्नी न लावतां, अजीं (पूर्वोक्त अज=अजन्मा, निर्विकार आत्मा) त्याच्या ठायीं काया (स्थूल देह) भग्न केली हें तात्पर्य.

२ प्रकृति पुरुषाचें ऐक्य अव्यक्त (केवळ अद्वैत चैतन्य) स्थितीनें राहणें.

३ त्या अव्यक्त स्थितींतच आपण मग्न (तन्मय तल्लीन) होऊन गेलें असें ह्मणणें.

४ योगाचे सप्तमांग जें ध्यान त्या ध्यानाच्या समयीं योग्याचें कुंडली चक्र ज्या-वेळीं गुद अथवा मूलाधार चक्रावर येतें त्या वेळीं हृदयरूप गुंफेंत जो सोहंरूपी आत्मा आहे तो, पंचप्राण व कुंडली हीं ऐक्यत्वानें मिळून जातात. अशा वेळीं ओंकाररूप आत्म्याच्या अभ्यासाविषयीं सोहं आणि कुंडली हे दोघे व्यापून जातात, तसें झाल्यानें आपल्या स्थूल देहाचें भान रहात नाहीं; ह्मणून याला निर्विकल्प समाधि ह्मणतात. [पातंजल योगशास्त्राचा अभिप्राय]

५ ज्याला याति किंवा कूळ नाहीं असा चैतन्य आत्मा–मूळ (ॐकार) अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते । भावार्थः—हा अव्यक्त अमुक एक प्रकारचा असा निवडून दाखवितां न येणारा, हा अचिंत्य ह्मणजे मनानेंही जाणतां न येणारा हा अविकार्य ह्मणजे ज्याच्याठायीं कोणी कांहीं विकार उत्पन्न करूं शकणार नाहीं, असा ह्मटला आहे. भ० ग़ी० अ० २

६ या स्थितींत अंतःकरण स्वस्थ आनंदांत असतें, आणि जागृतावस्थेंत निद्रा-तुल्य असतां एकाग्र वृत्तीचा प्रवाह जाग्रता सारखा भासतो. तरी पण त्यासमयीं *श्वासोच्छ्वासाची गति बंद पडलेली असते. अर्थात् शब्द निमाला जातो.* याला जीवन्मुक्ति असेंही कोणी ह्मणतात.

७ प्राणी गर्भांत असे पर्यंत 'सोऽहं' ह्मणजे मी ईश्वर आहें असें ह्मणतो, जन्मास आला ह्मणजे 'कोऽहं' मी कोण आहें असें ह्मणतो, अव्यक्त बोध झाल्यामुळें हीं दोन्ही मावळतात.

जाहलें तद्रुपतेशीं लग्न । सदां स्वयेंचि संलग्न । आपण अंतरींच मग्न । होउनि पूर्णानंदें धाला ॥ हृदयीं० ॥ २ ॥ कीं तें नामरूपावीण । निरालंब हें निर्गुण । घेतां तेथिल हे खूण । गेलें व्यापें व्यापकपण । केवळ जाहलें उगवण । कीं या अनादि बीजाला ॥ हृदयीं० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ज्ञेय । ज्ञाता झाले ब्रह्ममय । अविनाश अप्रमेय । अखंडित निरामय । कीं हें सद्गुरुचें गुह्य । कीं अद्वय अम्मल प्याला ॥ हृदयीं० ॥ ४ ॥

पद ८ वें.

आरंभे[१] रंभःस्तंभ सदां[२] निरालंब जागला ॥ ध्रु० ॥ सज्जन रंजनीं नित्य निरंजनीं, ध्यासाचि लागला । त्रिकूट श्रीहाट गोल्हाट, औटपिठीं विरागला॥ आरंभ० ॥ १ ॥ आनंदडोहीं बुडाला, आठव नाहींच मागला । ज्याचियें सत्तेचा हाट, इंद्रियांचा नव्होचि पांगला ॥ आरंभ० ॥ २ ॥ सोहिरा पाहूं गेला, तहींच निमाला । ब्रह्मरसें धाला, नाहीं उमगला ॥ आरंभ० ॥ ३ ॥

पद ९ वें.

आजी म्यां सुखी झालोंचि सये ! हो ॥ ध्रु० ॥ निरालंबीं पडली हे मिठी । कांहिं केलिया दिठी, परतोनि नये हो ॥ आजि० ॥ १ ॥ चित्क-

---

१ ब्रह्मानंदानें.

२ आदिबीज ॐकार रंभः (रंभा) प्रकृति किंवा माया ही सर्वांची जनयित्री आहे. हीच कोणी एक कर्दळी तिचा आधारस्तंभ (गर्भ) पक्षीं पूर्वोक्त ॐकार ह्या ह्यांच्या योगानें भोक्ता, भोग आणि भोग्य ही त्रयी उद्भवली.

३ उत्पन्नकर्ता आणि नियंता ईश्वर (ॐकार) जीव आणि प्रकृति ह्मणजे सृष्ट्युत्पादक शक्ति एतद्रूप होय. हीं (सदां) सार्वकाळ असणारा (निरालंब) अन्य आश्रमरहित "स्वयं" असा (जागला) नेहमीं जागृतीनें असणारा जो परमात्मा त्याच्या ठायीं समाविष्ट आहेत. त्या स्वरूपाचाच आपल्यास ध्यास लागला, हें या पदाचें तात्पर्य आहे. या सर्वांचें रहस्य असें आहे कीं, देहांत असणारा जो हंस (जीव) त्याचा ईश्वरानें अंगिकार केल्यावर हा अंगिकार त्याला आपला खरा आत्मा परमात्मा स्वरूपच आहे आणि पुरुष किंवा प्रत्यगात्मा केवळ भासरूप आहे असें समजलें ह्मणजे तो सर्व पाशांतून मुक्त होतो.

लिका विकासली । जाहला चित्सूर्यउदय हो ॥ आजि० ॥ २ ॥ निरंजन नित्यानंद । निर्गुण निर्मळ निरामय हो ॥ आजि० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निजधामीं । अनामीं गेलेंचि हें मन विलया हो ॥ आजि० ॥ ४ ॥

पद १० वें.

काय झालें तें नयेचि सांगूं ! अंतरींच भोगूं ॥ ध्रु० ॥ धृताचा हा डोळा असतांचि, कल्पना बाहुली हे परतली । चालतां राहिली चालचि, वाचा बोलतांचि निमाली ॥ १ ॥ पुढिलें हें थोकलें, योजना मोडली आठवण मागली । दृश्य द्रष्टा मनीं न गणितां, मीपणें दोरीच हे काढिली ॥ काय० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आतां हारपली मुद्रा, सहजेंचि निद्रा उन्मनि लागली ॥ काय० ॥ ३ ॥

पद ११ वें.

झाला हो आनंद आजी ॥ ध्रु० ॥ इंद्रियें दमन, करोनि त्रिकुटीं गमन, होतां योगाचें शमन, नेणों काय झालें मन ॥ झाला० ॥ १ ॥ लागतां खेंचरी मुद्रा, उल्हास हा चित्समुद्रा, पिउनि अर्धचेंद्रा, आली सहज निद्रा॥

---

१ धृति ह्मणजे बुद्धि (अहंवृत्ति), तिचा डोळा (बाह्य वस्तु पाहणारें नेत्रेंद्रिय) त्याचें पाहणें कायम आहेच, पण त्या दृष्टीस बाह्य जगाचा प्रत्यय आणून देणारी जी इदंवृत्ति (मन) कल्पना बाहुली (पक्षीं डोळ्यांत मसुरिप्रमाण असणारी बाहुली 'महाकारण देहस्थ साक्षिण्यावस्था') ती मात्र परतली ह्मणजे स्वस्वरूपाकडे वळली, अर्थात् नामरूपें प्रत्यक्ष पाहत असतां तीं सर्व आत्माच आहेत असा प्रत्यय बिंबला गेला. २ जग. ३ पाहणारा. ४ मीपणाचा प्रत्यय हीच दोरी. दोरीवर सर्प भासतो पण दोरीच काढून टांकिली तर तीं ह्मणजे सर्पाचें भासणें व दोरीचें दिसणें हीं दोन्हीं नाहींच. ५ प्रणवाच्या साडेतीन मात्रांपैकीं अर्ध मात्रा. ॐ हें प्रणवाचें अक्षर होय. त्यावर ँ बिंदुयुक्त जो अर्धचंद्र लिहितात त्याचा नाद केल्यानें देहत्रयापलीकडचें महाकारण देहाचें ज्ञान होतें. अर्थात् तुरीयावस्थेचा अनुभव येतो. हा अनुभव ह्मणजे चंद्रकळेपासून स्रवणारें जें अमृत (अमरपणा) त्याचें पान होय. ॥ वाम-इडा दक्षिणे पिंगळा । मध्यें सुषुम्नात्रिवेणी मेळा । तेथें अमृतसंजीवनी कळा । ते सेविल्या अमरत्व पाविजे ॥ ७ ॥ उष्ण काळीं पोळलिया उष्णें करून । तो अर्ध चंद्र ऊर्ध्व करि पवन । तरि शीतळता होय प्राण । संतोष मानिजे ॥ २ ॥ ज्ञानेश्वर

झाला० ॥ २ ॥ चंद्रसूर्यबिंब, ग्रासुनियां प्रतिबिंब, सदा स्वयेंचि स्वयंभ, विकासला निरालंब ॥ झाला० ॥ ३ ॥ बारा सोळा आकळा, अनुभव हा मोकळा, जीव शिव हे न कळा, सेविली सेंत्राबी कळा ॥ झाला० ॥ ४ ॥ तूर्या हे भोगुनि गेलों आंतचि विरागुनी, नये कल्पना मागुनी, लंपट उन्मनि लागोनि ॥ झाला० ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे ज्ञान गंगास्नान, झालें गुरुचियेदयेन, जेथ न पावती नयन, तेथ झालें शयन ॥ झाला० ॥ ६ ॥

पद १२ वें.

काय मिळालें नयोचि तुका![2] झालों म्यां मुका ॥ध्रु० ॥ ॐकार कुंठला, शब्द मावळला । न बोलवे अमुका ॥ १ ॥ बुद्धि[3] विहंगिणी, संसार तरुवरि । उडो जातां समूळ मोडला डोंका[4] ॥ २ ॥ साधन नौकों,[5] नलगे तो रुकों[6] । सांपडलें भुका ॥३॥ सोहिरा ह्मणे, भ्रांति तिमिर दवडुनी तन्मय । उजळुनि चिन्मयदीपिका ॥ ४ ॥

पद १३ वें.

काय सांगूं सये ! बोलतांचि नये ! ज्या सुखालागोनी ॥ ध्रु० ॥ चोरुनि नेलें विश्वचि, येता उरला ना मागोनी । तन्मयशेजे पराप्रमदा, निमाली भोगुनी ॥ काय० ॥ १ ॥ सोहिरा ह्मणे आतां तूर्येत जागोनि । लागोनि उन्मनि निजलों निरंजनीं । जागणें त्यालागोनी ॥ काय० ॥ २ ॥

पंचीकरण] १ ज्ञानशक्ति. २ तुलना करण्यासाठीं (प्रत्यंतरासाठीं दुसरी वस्तूच नाहीं असा भाव.) ३ बुद्धी हीच कोणी पक्षीण (विहंगिणी).
४ तंगडी, पाय (हा शब्द सावंतवाडी प्रांतीं वापरतात.)
५ वर सांगितल्याप्रमाणें " जें काय मिळालें तें मिळविण्याचें साधन (नौका) ह्मणजे ज्ञानरूप नौका, [अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः । सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥ भावार्थः—जरी कदाचित् तूं सर्व पाप्यांपेक्षां अत्यंत पापी असलास, तरी तूं ज्ञानरूप नौकेच्या योगानें सर्व पापसमुद्र अनायासें तरून जाशील ॥ भ० ह्री० सु० च० टी० अ० ४]
६ इतर नौकांच्या उताराला नावाड्यास पैसा द्यावा लागतो. परंतु येथें (नलगे रुका) पैसा नको फुकटचें सांपडलें.

पद १४ वें.

काय म्या सांगों गे माये ! नवल जाहलें ॥ ध्रु० ॥ चैतन्यसिंधुमाजी, सैंधवकाया ही डोले ॥ काय० ॥ १ ॥ निर्वात कर्पुरदीपीं, प्रणवपतंग बोले ॥ काय० ॥ २ ॥ आकाशावरि जळें, त्यावरि कमळिणी खोले ॥ काय० ॥ ३ ॥ हात नाहीं पाय, ऐसे भ्रमर गुंतले ॥ काय० ॥ ४ ॥ नामाचि नुरतें केलें, लया आमोदें नेलें ॥ काय० ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे हें आंगाथिलें, तें रूपातीण देखिलें ॥ काय० ॥ ६ ॥

पद १५ वें.

निजानंदीं मन मुरलें उरलें चैतन्य ॥ ध्रु० ॥ ज्ञानगंगे न्हालें, पूर्णत्वा आलें, झालें समाधान ॥ निजा० ॥ १ ॥ आत्मयाशिं लग्न, होउनी नग्न, अंतरीं झालें मग्न ॥ निजा० ॥ २ ॥ आसन वाहात, भास न पाहात, चित्सुखसिंधुआंत ॥ निजा० ॥ ३ ॥ न करी उखीविखी, दृश्य न लेखी, झालों सदा सुखी ॥ निजा० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे काया, लटिकी केली माया, निर्गुण निरामया ॥ निजा० ॥ ५ ॥

पद १६ वें.

ऐशी कवणाची कवणती । मज खुणाविती हे ॥ ध्रु० ॥

---

१ मीठ (काया=स्थूल देह—हाच एक मीठाचा खडा)

२ कूटस्थ हाच एक कर्पुरप्रज्वलित दिवा.

३ अभ्राकाश (आकाशाचे वेदांतांत चार प्रकार आहेत. ते असे. घटाकाश, महाकाश, जलाकाश आणि अभ्राकाश) महाकाशामध्यें जें मेघमंडळ दिसतें त्यांत जें महाकाशाचें प्रतिबिंब तें अभ्राकाश होय.

४ परा शक्ति हीच एक कमलिनि ती (खोले) प्रफुल्लित झाली असा भाव.

५ सूर्य, चंद्र, अग्नि इत्यादि.

७ या पदांत असें दर्शविलें आहे कीं, ज्यावेळीं योगबलानें, चित् जड सर्व ग्रंथींचा नाश होऊन, जीव केवळ शिवरूप (स्थितप्रज्ञ) होऊन जातो, त्यावेळीं त्यास 'पुराणी प्रज्ञा' प्राप्त होते. ती प्रज्ञा शिवात्म्यापासून प्रसृत होते ह्मणून या

मेरूचे वरती । चंद्र सूर्याचे परती । तेथें दिवस ना राती॥ ऐशी० ॥ १ ॥

पदांत "कवणाची कवण" असें म्हटलेलें आहे "खुणाविती" असें म्हणण्याचा हेतु 'प्रज्ञा' ही जीवात्म्याची खूण; प्रज्ञेचें मूळ, ही शिवात्म्याची खूण; जीवात्म्याचे सगळे गुण त्या शिवात्म्यापासून आलेले आहेत. हा जीवात्मा प्रज्ञेच्या योगानें स्वर्गीं जाऊन अमर (शिव) होतो. ही प्रज्ञा मिळाली म्हणूनच वामदेव अमर होऊं शकला. [स एतेन प्रज्ञेनात्मनाऽस्माल्लोकादुत्क्रम्याऽमुष्मिन् स्वर्गे लोके सर्वान् कामानाप्त्वाऽमृतः समभवत् समभवत्। इत्योम् ॥ "ऐतरेय" उपनिषद् खंड १ अ० ३. ही प्रज्ञा प्राप्त झाली म्हणजे ती जीवात्म्यास शिवस्वरूपाचें (स्वस्वरूपाचें) ज्ञान करून देते, म्हणजे खूण पटविते. ही प्रज्ञा स्वतःस प्राप्त झाल्याविषयीं सोहिरोबांनीं गुप्तभाषेनें दिग्दर्शन केलें आहे; लौकिक स्त्रीपुरुषांमध्यें जो प्रत्यक्ष संभोगव्यवहार चालत आलेला आहे, त्याला अनुलक्षून या पदांत रूपक केलेलें आहे. या पदाचें बहुतेक रहस्य "तुह्मी भोगा पररमणि" ह्या पदाशीं जुळतें आहे. आत्मसुखाचा अनुभव घेण्याकरितां हें जोडपें वासनालुगडें फेडून उघडें (नग्न) होऊन आनंदानें क्रीडा करितें. परंतु त्यामुळें प्राप्त होणारें सुख काय आहे तें मात्र त्यांस बोलतां येत नाहीं. जसें मुक्यानें मेवा खाल्ला असतां, त्याला त्याचा स्वाद शब्दानें सांगता येत नाहीं, त्याप्रमाणें ही अलौलिक स्त्री कानडी आहे व तुकोबाच्या म्हणण्याप्रमाणें मराठा (हिरण्यगर्भ) भ्रतार करूं इच्छिते. [कानडीनें केला मराठा भ्रतार । एकाचें उत्तर एका नये]. ती दर्शविते कीं 'आपण अति गुह्यत्वें निजूंया [शयन करूंया] आणि संयोगाचे वेळीं विकारांचें कांकण (कंकण) वाजूं देत नाहीं कारण कांकणाच्या खळखळाटानें अन्यास जाग कळेल, त्यामुळें संगास अंतर येईल.

८ ऐशी=माया. विद्या. आत्मस्वरूपापासून पराङ्मुख करणारी व विषयाकडे वळविणारी ती अविद्या, व तीच बाह्य विषयांपासून स्वरूपाकडे वळविणारी व ब्रह्माची प्राप्ति करून देणारी ती विद्या. हिलाच माया म्हणतात. वसिष्ठ रामास म्हणतात, राम माया द्विधा भाति विद्याऽविद्येति ते सदा ॥ अर्थः—हे रामा ! माया ही सदोदित विद्या आणि अविद्या अशा दोन प्रकारें भासते. याच मायेस देवीभागवत स्कंध ३ अ० ३ श्लोक ५१ यांत—एषा भगवती देवी सर्वेषां कारणं हि नः ॥ महाविद्या महामाया पूर्णा प्रकृतिरव्यया ॥ असें म्हटलें आहे. म्हणूनच "ऐशी कवणाची" असें तिला म्हटलें आहे.

१ मेरू म्हणजे पाठीचा कणा. निवृत्तिनाथ, "परमप्रकाश" ग्रंथामध्यें म्हणतात. [दशवे द्वाराचें अग्र । तेंचि मेरू शिखर । तेथें सत्रावी सुंदर । उभी असे ॥३७॥

हातें देऊनि केधवां । नेणो दृश्याचा हा दिवा । मालविते हेवा ॥ ऐशी०

तियेचें घ्यावें दर्शन । तीप्रति करावें अनुष्ठान । तियेपासूनि ब्रह्माविष्णुरुद्र जाण। जाहले देखा ॥ ३८ ॥ केशव स्वामींनीं एका पदांत अगदीं याच सारखें रूपक केलें आहे तें असें [सांगतां दिसे बहु कोडें रे । कळेना तें झाले वेडे रे । अनुभवी खुण जाणती तेथिंची इतरांसि कानकोंडे रे ॥ ध्रु० ॥ मेरूचे शिखरीं उभि एक नारी । पति तिचा ब्रह्मचारी रे । त्याचिया संगें ते प्रजांसि व्याली परि ते कर्णकुमरी रे ॥]

१ येथें हात देऊनी हा शब्द गुह्यार्थानें वापरलेलेला आहे. लौकिकव्यवहारांत दिवा मालविण्याचा असला म्हणजे हातानें मालवितात. परंतु येथें "दृश्य" दिवा मालवायाचा आहे, तेव्हां तेव्हां त्यास "ऋत" हा हात पाहिजे (शास्त्रास अनुसरून जें यथायोग्य असतें त्यास ऋत म्हणतात.) याविषयीं तैत्तिरीयकोपनिषद् वल्ली दुसरी अनुवाक चवथा यांत वर्णन केलें आहे. "श्रद्धा हें त्याचें (विज्ञानमय कोषाचें) शिर होय; ऋत त्याचा उजवा हात; सत्य त्याचा डावा हात; योग त्याचें धड; आणि महत्तत्व त्याच्या नाभीखालचा प्रदेश.

२ दृश्य जग भासविणारा चिदाभास (अहंकार) हाच दिवा; तो मालविते. देहादिकांला मी असें म्हणणारा जो चिदाभास त्यास कर्ता असें म्हणतात, तोच जीव. मन हें त्याचें साधन आहे. त्या मनाच्या एक अन्तर्वृत्ति आणि दुसरी बहिर्वृति अशा क्रमानें होणाऱ्या दोन क्रिया आहेत. मी मी अशी जी अंतर्मुख वृत्ति ती कर्त्याला दाखविते. आणि इदं म्हणजे म्हणजे हें हें म्हणणारीं जी बहिर्मुख वृत्ति ती जगांतील बाह्य वस्तूंला दाखविते. वर सांगितलेला कर्ता क्रिया व निरनिराळे विषय सर्वांस एकदम भासविणारा, तसेंच सुषुप्तींतील शून्यस्थितीचाही अनुभव घेणारा जो एक कोणी ज्ञानरूप आहे, त्यास वेदांत शास्त्रांत "साक्षी" असें म्हणतात. दिवा जसा आपल्याच ठिकाणीं राहून सर्वत्र प्रकाश देतो, त्याप्रमाणें साक्षीही आपल्याच ठिकाणीं स्थिर राहून आंतबाहेर प्रकाशवितो. येथें आंतबाहेर म्हणून जो विभाग केला तो साक्षीस लागत नाहीं. तो देहांमुळें झालेला आहे. देहाचेबाहेर विषय आहेत. अहंकार आंत आहे. अर्थात् अहंकारदिवा मालवला कीं बाहेरचे विषय दिसण्याचें बंद झालें. सोहिरोबांनीं पुढच्या चरणांत "हेवा" हें पद घातलें आहे तें त्या विषयांस उद्देशून आहे. हेवा म्हणजे मत्सर बुद्धि ती, आणि दृश्य दिवा हीं दोन्ही. "मालविते" या क्रियापदानें त्या दोहोंचा म्हणजे अहंवृत्तीचा आणि इदंवृत्तींचा नाश करिते असें दर्शविलें आहे.

॥ २ ॥ काडुनि भेदांचें जोडवें । परे पैलाड पडावें । तेथें आनंदें क्रिडावें ऐशी० ॥ ३ ॥ वासना लुगडें । फेडुनि न्हावें कीं उघडें । सुख

---

१. वास्तविक आत्म्याच्याठिकाणीं कोणचाही भेद नाहीं. भेद काय तो नामरूपांचा; या भेदामुळेंच अहंताममता, पुण्यपाप, सुखदुःख हीं जोडपीं बनलीं आहेत. प्रकृतीनें हें जोडपें काढून टाकल्यावर मग आत्मा आनंदस्वरूपच आहे.

२ सिद्धांतसंहिता उत्तरार्ध अध्याय ११ पान ३१।३२. ३ री टीप पहा.

३ ब्रह्मज्ञानाची प्राप्ति झाली ह्मणजे निरतिशय आनंद प्राप्त होतो. कारण तैत्तिरीय उपनिषदांत " रसो वै सः । रसंह्येवायंलब्ध्वाऽऽनंदी भवति । अर्थः—हा आत्मा रस आहे. हा रस प्राप्त झाला असतां आनंदी होतो. " असें सांगितलें आहे. सारांश, सर्व विषयजन्यसुखाहून आत्मसुखच श्रेष्ठ आहे ही गोष्ट सिद्ध झाली. भागवत स्कंद २ अ० १ यांत सांगितलें आहे कीं [तेनात्मनात्मानमुपैति शांतमानंदमानंदमयोऽवसाने । एतां गतिं भागवतीं गतो यः स वै पुनर्नेह विषज्जतेऽग॥ ३१॥ त्याप्रकृतिरूपानें योगी सरतेशेवटीं आनंदस्वरूपी ईश्वराप्रत प्राप्त होतो, तें ईश्वरस्वरूप शांत आहे, ह्मणजे त्या रूपाला कोणतेही विचार नाहींत, व हा योगी आनंदस्वरूपच असतो. ह्या भगवत्स्वरुपानंदाची ज्याला एकवार प्राप्ति झाली तो पुनः परत ह्या संसारांत (जन्ममरणप्रवाहांत) निःसंशय येत नाहीं.]

४ संसारबंधन तोडण्यासाठीं वासना आणि विषय या दोहोंचा संन्यासानें त्याग केला पाहिजे. मनांत चिंतन केल्यानें आणि बाहेरच्या क्रिया केल्यानें वासना वाढते, आणि वाढत जाणारी वासना संसाराला उत्पन्न करिते. आचार्य ह्मणतात. एकान्तस्थितिरिन्द्रियोपरमणे हेतुर्दमश्चेतसः । संरोधे करणं शमेन विलयं यायादहं वासना ॥ तेनानन्दरसानुभूतिरचला ब्राह्मी सदा योगिन-स्तस्माच्चित्तनिरोध एव सततं कार्यः प्रयत्नान्मुनेः ॥ १ ॥ " विवेक चूडामणि " भावार्थः—एकांतीं वास केल्यानें इंद्रियांना उपरति होते; उपरति झाल्यानें चित्ताचा संरोध (शम) होतो, चित्त निरोध झाल्यानें अहंकाराची वासना लयास जाते. आणि वासना लयास गेल्यानें योग्याला निरंतर ब्रह्मसंबंधीं अविचल आनंदरसाचा अनुभव येतो. तस्मात् योग्यानें प्रयत्नानें चित्ताचा निरोधच निरंतर केला पाहिजे.

बोलतां कानडें॥ ऐशी०॥४॥ नेदी विकाराचें कांकण वाजो। ह्मणे अति[3] गुह्यें निजों। परतुनि[4] मागुतीं न उमजों ॥ ऐशी० ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणेना

---

१ पंचदशीकार ह्मणतात [समाधिनिर्धूतमलस्य चेतसो निवेशितस्यात्मनि यत्सुखं भवेत्। न शक्यते वर्णयितुं गिरा तदा स्वयं तदंतःकरणेन गृह्यते ॥ १ ॥ भावार्थः—समाधीच्या अभ्यासानें ज्याचा मल धुऊन टाकला आहे व ज्याचा प्रवेश आत्मस्वरूपीं झाला आहे, त्याच्या चित्तास जें सुख होतें त्याचें वर्णन वाणीनें करणें अशक्य आहे; तें स्वतः अंतःकरणानेंच ग्रहण करावयाचें.]

२ या ठिकाणीं प्रेमपाशानें बद्ध झालेल्या स्त्रीपुरुषांच्या एकांतांतील स्थितीचें रूपक केलें आहे. घरांतील वडील माणसांस, व विशेषतः व्यवहार जर चोरटा असला तर, दुसऱ्या कोणालाही बिलकुल सुगावा लागतां कामानये ह्मणून दोघेंही फार खबरदारी घेतात. ती इतकी कीं, स्त्री आपल्या हातांतील कांकण किंवा पायांतील पैंजण, जोडवें वगैरे यांचा आवाज होऊं देत नाहीं. त्याचप्रमाणें प्रकृतिपुरुषांचा समागम होऊन समाधिसुखाचा अनुभव घेतांना विकल्प ह्मणजे अनेक मनोविकार जागत झाले असतां, समाधीचा अखंड प्रवाह भंग होईल, व त्यामुळें ब्रह्मानंद प्राप्त होणार नाहीं असें दर्शविण्याकरितां विकाराचें कांकण वाजूं देत नाहीं, व पायांतील "भेदाचें जोडवें" काढून टाकिते, असें ह्मटलें आहे.

३ "अति गुह्यें निजों ह्मणजे शयन करूं" हे शब्द अति गूढ अर्थाचे आहेत. याबद्दल विवरण सि. संहिता. अ. १२ पान ६५ वर टीपेंत केलें आहे तें मह्मा.

४ या रितीनें जो ब्रह्म जाणतो तो स्वतः ब्रह्मच होतो. आणि ज्या अर्थी ब्रह्माला जन्म नाहीं, त्या अर्थी त्याला पुनर्जन्मही नाहीं.

५ सोहिरोबा ह्मणतात कीं, कदाचित् वर सांगितलेल्या गुप्त व्यवहारास व्यभिचार असें कोणी ह्मणतील, तर तो व्यभिचार होत नाहीं. कारण परस्त्री आणि परपुरुष यांच्या समागमासच व्यभिचार ह्मणतात. परंतु हें प्रकृतिपुरुषाचें जोडपें अनादि आहे व यांचा समागम अनादि आहेच. केवळ जीवाच्या अज्ञानामुळें हा समागम होत नाहीं व त्यांची ताटातूट झालेली असते. येथें ती ताटातूट नाश पावते, या अनादि जोडप्यांची भेट होते, त्यामुळें दोघांचा दोनपणा नाहींसा होऊन केवळ भेदरहित एकपणा राहतो. तेव्हां जेथें द्वैत नाहीं तेथें व्यभिचार कसा होईल? अर्जुनालाही भगवान् श्रीकृष्णानीं हेंच सांगितलें आहे. "प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययं" भ. गी. अ. ९ श्लोक २ या ठिकाणीं या रहस्यास "धर्म्य" ह्मणजे सकल धर्मांचें सारभूत असें ह्मटलें आहे. जर हें सुख व्यभिचारजन्य असतें तर त्यास "धर्म्य" असें भगवंतांनीं ह्मटलें नसतें.

व्यभिचार । आंगीं बोधाचा संचार । योगी जाणती चतुर ॥ ऐशी० ॥ ६ ॥

पद १७ वें.

विवेकें हा गोरक्षक गोधनें राखे । विरळा कोणी देखे सद्गुरू कृपें ॥ ध्रु० ॥ उन्मेख पहांटे अवेचटेंचि सोडी । भेदाची हे काडी सेवूं नेदी ॥ १ ॥ मनपवन काठी वैराग्य करतटीं । विषयांच्या आवाठीं धावूं नेदी

१ वरील पदांत वर्णिलेल्या स्थितीचा अनुभव हा प्रवृत्तींतील रोजच्या अनुभवाच्या उलट असल्यामुळें प्रवृत्तींतल्या माणसांस त्या संबंधाचें ज्ञान होणें असंभवनीय आहे. कारण तें शब्दांनी सांगतां येण्यासारखें नाहीं, ह्मणून सोहिरोबा ह्मणतात कीं, अनुभवी योगी आहेत त्यांनाच हें कोडें उलगडण्यासारखें आहे.

२ विवेक हाच एक गोरक्षक (पक्षीं आपले गुरु गोरखनाथ) ह्मणजे गुराखी (गुरें संरक्षण करणारा) असें कल्पून या पदांत रूपक केलेलें आहे. सद्गुरुकृपा होऊन, त्यायोगें ह्या विवेकगुराख्यास प्रत्यक्ष पाहणारा असा क्वचित् असें दर्शवितात. भगवंतांनीं गीतेंत अ. ७ येथें ह्मटलें आहे (मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ३ ॥ [सु. च. टी.) सहस्रावधि मनुष्यांमध्यें एकादा कोणी सिद्धि मिळविण्याचा प्रयत्न करितो, ज्यांना सिद्धि मिळाली, त्यांतून एकदाच मला सत्यत्वेंकरून जाणतो.] विवेक ह्मणजे आत्म्याचें स्वरूप तेवढें नित्य आहे, आणि दृश्य ह्मणजे जग अनित्य आहे असा जो निश्चय तो. आचार्यांनीं अपरोक्षानुभूतींत ह्मटलें आहे [नित्यमात्मस्वरूपं हि दृश्यं तद्विपरीतकम् । एवं यो निश्चयः सम्यग्विवेको वस्तुनः स वै ॥ १ ॥ [वामनीटीका] आत्मस्वरूपची नित्य, दृश्य सर्व अनित्य हें । जो निश्चय बरा ऐसा, नित्यानित्यविवेक तो ॥ १ ॥ ३ इंद्रियें हीं गोधनें (गुरें) होत. ४ ज्ञानसूर्याचा उदय होण्याच्या समयास. गुरें पहाटेसच सोडावयाचीं. त्याप्रमाणें योगसाधनास इंद्रियगोधनें सोडण्यास, पंचपंच उषःकाल हाच योग्यकाल होय. (बृहदारण्यकोपनिषद् अ. १ ब्रा. १ मं. १ पहा.) ५ अकस्मात् एकाएकीं. चटदिशीं. ६ ब्रह्माच्याठायीं भेद आणणारीं जीं नाम आणि रूपे हींच तृणें, तीं सेवन करायाला मुळींच देत नाहीं. कारण हा विवेक गुराखी गुरें मोकळीं कशीं सोडील? आणि त्यांचेकडून भलतेंच अन्न कसें खावविल ? ७ मन व प्राण यांचा संयम ही काठी वैराग्यरूपी हस्तामध्यें धारण करून या इंद्रियगोधनांस ' कामादि विषयांच्या स्थानांत ' जाऊं देत नाहीं. (कोकणांत तुरळक तुरळक अशीं निरनिराळीं घरें बांधण्याची वहिवाट आहे. कांहीं पांच दहा घरें एकत्र असलेल्या भागास " आवाठ " असें ह्मणतात.

॥ २ ॥ षट्चक्रें चोंहाटा न्हे ओलांडुनी । सरळ सुषुम्नेचे पाणदिनें ॥ ३ ॥ ब्रह्मरंध्र डोंगरा निजसुख चारा । सत्रावीच्या निरा पाजवुनियां ॥ ४ ॥ गोल्हाट टांकुनी औटपीठावरुनी । आणितो गोठणी सहस्रदळिं बा ॥ ५ ॥ अन्वयव्यतिरेकें हांकोनियां पैठां । हृदयींच्या गोठां आणुनी बांधी ॥ ६ ॥ बांधणुक कसी नवलाव परि । सोहिरा ह्मणे जेथ दावें ना दोरी ॥ ७ ॥

---

१ योगशास्त्रोक्त, सहा चक्रें. २ चोंहाटा ह्मणजे चार वाटा जेथें एकत्र मिळतात अशी जागा. ह्मणजे सहस्र दलचक्र, सहा चक्रें ओलांडून सहस्रदळीं घेऊन जातो, असा भाव. ३ सुषुम्नेचे पाणदिनें. (कोकणांत, गुरें चारणीस नेण्यासाठीं शेतांमधून, दोन बाजूंस मजबूत कांटेरी झाडें लावून कायमचें कुंपण केलेलें असतें त्यांमधील वाटेस पाणद असें ह्मणतात.) योगशास्त्रांत हा सुषुम्नामार्ग पवित्र मानलेला आहे. ही नाडी ब्रह्मरंध्रस्थानापर्यंत जाऊन पोहोंचते. ४ ब्रह्मरंध्र ह्मणजे मस्तकांतील तालुस्थानची पोकळी, मूर्धा, व डोंगर ह्मणजे प्रणव ओंकार.

५ " निजसुखचारा ह्मणजे अनुकूल गोष्ट झाली ह्मणजे सुखरूप बुद्धि होते, आणि प्रतिकूळ झाली ह्मणजे दुःखरूप होते. हीं दोन्ही नसतांना जी स्थिति तीच निजानंद. हाच त्या गुरांचा चारा. ६ गुरांस पाणी पाजलें पाहिजे. "ब्रह्मगिरी" डोंगरावर पाण्याची उत्तम सोय ह्मणजे प्रत्यक्ष " सत्रावी " जीवनकला ह्या अक्षय झरीचें पाणी पाजतो. ७ गुरें जंगलांत चरत असतां ऐनदुपारीं विश्रांतीकरितां त्यानां सावलीच्या जागीं बसवितात त्यास " गोठण " ह्मणतात. विवेकगुराखी इंद्रियगुरांस सहस्रदल चक्ररूपी गोठणींत कांहीं वेळ ठेवतो, व मग तेथून खालीं हृदयांत आणून बांधतो. सोहिरोबांनीं या ठिकाणीं ध्यानमार्गाची एक उत्तम खूण सांगितली आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ८ सिद्धांतसंहिता उत्तरार्द्ध पा. ४६ टीप १ पहा. इंद्रियांस विषयांपासूनपरतवून हृदयाचे ठिकाणीं आणून एकाग्र करितो, ह्मणून हृदयास गोठ्याची उपमा दिली आहे. कारण त्या ठिकाणीं अंगुष्ठमात्र पुरुषाचें एकाग्र अंतःकरणानें ध्यान करितात.

९ गोठ्यांत गुरें बांधण्यास दावें किंवा दोरी लागते, परंतु इंद्रियगोधनास तशा-प्रकारचें बंधन बिलकुल लागत नाहीं. विषयाकडे जेव्हां इंद्रियें धांवतात, तेव्हां तीं जरी मोकळीं अशीं वाटतात तरी अविद्येच्या बंधनानें तीं जखडलेलीं असतात; परंतु हृदयस्थ परमात्मज्योतीकडे जेव्हां तीं वळतात, तेव्हां मिठाचा खडा समुद्रांत टांकिला असतां तो जसा विरून समुद्ररूपास मिळतो, त्याप्रमाणें तीं आपला इंद्रियभाव विसरून स्वरूपीं लय पावतात. अर्थात् तीं बंधनरहित होतात; तथापि त्याची चळवळ

पद १८ वें.

नवल हें गुज समाधि सहज । चित्सुख निजीं निजति योगीराज ॥ ध्रु० ॥ नाथिलें हें मृग देखोनि आला । वेडा हा पारधी पाठिसी लागला ॥ लागतां लागतां पूर्वे निघाला । अवचटोचि वरचे डोंगरीं गेला ॥ १ ॥ पावतां पावतां डोंगरही विसरला । पारध्यासी मृगें समूळ ग्रासिला ॥ ग्रासितां ग्रासितां मृगही निमाला । सोहिरा ह्मणे तें सुख लाधलें मला ॥ २॥

बंद होते ह्मणून त्यांस बांधलें आहे असें दर्शविलें आहे. परंतु ही बंधनाशिवाय बांधणूक आहे, ह्मणून तिला सोहिरोबा "नवलपरीची" असें ह्मणतात.

१ या पदांत सहजसमाधीचें लक्षण सांगितलें आहे. समाधीचे प्रकार तीन आहेत. "सविकल्पसमाधि, निर्विकल्प, व सहजसमाधि." समाधि म्हणजे अंतःकरणाच्या वृत्ति ज्या विषयाकार झाल्या आहेत, त्या विषयरहित करून अखंड ब्रम्हाकार होणें, आणि ध्यान करणार, ध्येयवस्तु व ध्यान ह्या त्रिपुटीनें रहित होऊन प्राण, मन इत्यादिकांचा आत्मस्वरूपीं लय करणें यास समाधि म्हणतात. सहज-समाधि (राजयोग) याचें लक्षण शरीरादिकांला श्रम झाल्यावांचून अनाया-सानें सिद्ध होणारा जो समाधि त्याला सहजसमाधि म्हणतात. वेदांतमतांतील राज-योग तो हाच होय. २ नाथिलें म्हणजे मिथ्या मृग, मृग म्हणजे मन, संसार हा केवळ मनानें उत्पन्नकेला आहे. तेव्हां असल्या कपटी मृगास पाहून राम जसा फसला तसा हा जीवरूपी पारधी फसतो. ३ वेडा पारधी म्हणजे जीव. ४ पूर्वे म्हणजे योगशास्त्रोक्त आज्ञाचक्रांत, पिंगला अथवा सूर्यकळेच्या बाजूस परमात्मा हाच सूर्य, ज्या दिशेला उगवतो त्या दिशेस, म्हणजे स्वरूपाचे ठिकाणीं. ५ ब्रम्हगिरी अथवा मेरू, (ओंकार). ६ सोहिरोबा ह्मणतात, तें सुख प्रत्यक्ष मला प्राप्त झालें. याचा अर्थः—जेव्हां ब्रह्मरंध्रांत प्राण स्थिर होतो तेव्हां त्या योग्याला निर्वाणस्थिति प्राप्त होते. त्यापासूनत्याला काळ व कर्म इत्यादि कोणाचें भय राहत नाहीं. त्या स्थितींत पूर्वी कधींही अनुभविलेला नाहीं असा अलौकिक अखंड ब्रह्मनंद प्राप्त होतो.

पद १९ वें.

अंबे तनु मन ध्यान नेंई ॥ ध्रु० ॥ निज उगम तुज माजि सहज । तें समाधिसुख घेई ॥ १ ॥ स्वतः सिद्ध सहाविया योगिनी । हा भव जाणुनियां तूं गे माई ॥ २ ॥ आपें आपणामाजी स्वरुपीं नसे दुजी । सोहिरा ह्मणे हेंचि भावुनि ध्याई ॥ ३ ॥

पद २० वें.

आह्मी नहों हो पांचांतले नहों पंचविसांतले । एवढ्यांतही वळखोनियां वेगळे आह्मी आंतले ॥ ध्रु० ॥ सत्व रज तम आह्मी नहों त्रिगुणांतले । केवढाही प्रपंच केला तरि नहों त्यांतले ॥ १ ॥ आह्मी नहों हो मंत्रांतले नहों हो तंत्रांतले । बहुत बोलुनि काय नहों मायेच्या यंत्रांतले ॥ २ ॥

---

१ या पदांत पराप्रकृति किंवा ' कुंडलिनी शक्तीविषयीं दिग्दर्शन केलें आहे. ज्ञानेश्वरी अ. ६ मध्यें ह्मटलें आहे [ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा । जया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ॥ ७२ ॥ जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मया शिवाची करंडी । जे प्रणवाची उघडी । जन्मभूमि.] हृदय-स्थानांत कुंडलिनीचा संबंध पंचप्राणाबरोबर झाल्यानें कुंडलिनीच्या झोंकाप्रमाणें प्राणवायु सर्व ठिकाणीं गमन करितो. ही शक्ति स्वतःसिद्ध पृथक् राहून पंचमहाभूतादि सृष्टि उत्पन्नकर्त्री होते; ह्मणून या पदांत तिला सहावी योगिनी असें ह्मटलें आहे. योग्यानें ही कुंडलिनी नियमित रीतीनें चालवून श्वास ब्रह्मरंध्रांत नेल्यानें तो (उदानवायु) परमपदाची प्राप्ति करवितो. [ह्याबद्दल पातञ्जलयोगशास्त्र, हटप्रदीपिका, ज्ञानेश्वरी अ. ६, यांत विस्तृत रीतीनें खुलासा केलेला आहे.]

२ पराप्रकृति ही परमपुरुषाची शक्ति ही शक्ति परमपुरुषास सोडून स्वतंत्र कधींही राहूं शकत नाहीं. जेथें पुरुष तेथें ही असावयाचीच. उत्पत्ति ज्या ठिकाणाहून त्याच ठिकाणीं तिचा लय होतो ह्मणून स्वतःचा उगम स्वतःच्या ठिकाणीं सहज आहे, असें दर्शवितात. ३ पंचप्राणांतले (प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान).

४ हीं पंचवीस तत्त्वें अशीं:—१ पुरुष, १ प्रकृति, १ महतत्व, १ अहंकार, ५ महाभूतें, ५ ज्ञानेंद्रियें, ५ कर्मेंद्रियें, १ मन ५ ज्ञानेंद्रियांचे विषय. याशिवाय निरनिराळे ग्रंथकार या तत्वांचें निरनिराळ्या प्रकारें वर्णन करितात.

आह्मीं नहों हो [1]लक्षांतले नहों हो [2]पक्षांतले । सोहिरा ह्मणे अनिर्वाच्य केवळ [3]अलक्ष्यांतले ॥ ३ ॥

पद २१ वें.

निजें[4]स्मरणीं तत्पर मन हें होवुनि राहूं ॥ ध्रु० ॥ मृगजलवत् हें जाणुनि सकळिक विषयसुखासि न पाहूं ॥ १ ॥ ऊर्ध्वमुळीं कीं याचि तत्[6] ठायीं सुख भोगिलें [7]संतीं ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा आदि[8]नाथ गुरु गुप्त निरंजन जें कांहीं । हरि हर ब्रह्मा जेथुनि झाले चित्सुखवनवसंतीं ॥ ३ ॥

पद २२ वें

ब्रह्म अंमल प्यालों उन्मत्त झालों ॥ ध्रु० ॥ आपपर विसरलों । संसारांतुनि विसरलों ॥ १ ॥ अनुभवाचा प्याला । रूपाविण देखिला ॥ २ ॥ अगोचर रसाला । रसनेविण प्राशिला ॥ ३ ॥ कैफ हें उतरेना । उतरतां उरेना ॥ ४ ॥ डोलत डोलत चालिलों । नेणों काय बोलिलों ॥ ५ ॥ झाला ऐसा चढवा । सोहिरा परे पडावा ॥ ६ ॥

---

१ लक्षचौऱ्यायशीं योनीमधले. २ दोन पक्षी जीवशिव. वेदांतविषयक पदें. १ ल्या पदावरील १ टीप पहा. ३ अलक्ष्य निर्गुणब्रह्म. जें वाचा आणि मन यांना लक्ष्य, ज्ञेय होत नाहीं. ह्मणून अलक्ष्य. ४ आपलें मूळचें जें परमात्मस्वरूप त्याचें स्मरणांत. ५ प. सं. भा. २. पा. २१ टीप ३ पहा. ६ ब्रह्म हें सर्व उपाधिविरहित आहे त्या ठिकाणीं स्त्रीपुरुषभेद नाहीं असें जें निर्गुण तें तत्.

७ परंतु जें तत् या पदानें ब्रह्म सांगितलें, तेंच अविनाशी व सत्य आहे ह्मणून "सत्" याप्रमाणें तत्सत्पदाचा अनुभव आला ह्मणजे आनंदपदाचा अनुभव मिळणारच हें दर्शविण्याकरितां "सुख भोगिलें" व तें सुख "चित्सुखवनवसंतीं" या शब्दांनीं दर्शवितात. याबद्दल. प. सं. भा. १ ला. पान ९ वरील टीप २ री पहा.

८ हा सांप्रदायिक शब्द आहे. महागुरू ब्रह्मादिदेवांचाही गुरु.

या पदांत मदिरानंद आणि ब्रह्मानंद यांचें सादृश्य मोठ्या खुबीनें वर्णन केलें आहे, व ठिकठिकाणीं दोघांतील भेदही दाखविला आहे. मदिरारसास साधनें लागतात, व त्यापासून होणारा आनंद इंद्रियांच्या द्वारें भोगावा लागतो. ब्रह्मरसाला इंद्रियांच्या साह्याची जरूरी नसते, हें दुसऱ्या व तिसऱ्या कडव्यांत दर्शविलें आहे. मदिराप्राशनानें कैफ चढतें व त्यामुळें पिणारा झिंगतो व उन्मत्त होतो. तसेंच ब्रह्मरसप्राश-

पद २३ वें.

एसें काय मिळालें कळेना ॥ ध्रु० ॥ चौरी सहा त्रैलोक्यमंडल । शम दमीं पाहतां कोठेंचि हें आढळेना ॥ ऐसें० ॥ १ ॥ जें जें दिसे तें नयेचि

नानें उत्पन्न होणाऱ्या आनंदानेंही ब्रह्मवेत्ता डुलतो. मात्र फरक एवढाच कीं, मदिरेमुळें उन्मत्त होतो, ह्मणजे मत्तपणाचा अतिरेक होतो, व ब्रह्मानंदानें उन्मत्त ह्मणजे मत्तपणाला टाकून जी अवस्था त्या अवस्थेंत (तुरीयावस्थेंत) जातो. दुसरें दारूबाज माणूस संसाराचें मातेरें करितो. तसाच ब्रह्मरसाचा घुटका घेणारा माणूसही संसारपाश छेदून टाकतो, ह्मणून तोही संसारास मुकतो. सारांश, हें अद्वितीय कैफ चढलें ह्मणून सोहिरोबा आपण परावाचेच्या पलीकडे अर्थात् तुरीयावस्थेंत गेलों असें सांगतात. या कैफामुळें वैखरी वाचा बंद होते, त्यामुळें तें सुख बोलून दाखवितां येत नाहीं. मौन प्राप्त होतें. तसेंच मदिरेच्या धुंदींत काय बोलतो, तें ज्याचें त्यास कळत नाहीं. हें कैफही इतकें जबरदस्त आहे कीं, तें उतरतां उतरत नाहीं, परंतु तें एकदां उतरलें ह्मणजे उरत नाहीं. मात्र दोहोंच्या न उरण्यांत फरक एवढाच कीं, ब्रह्मानंदाचें कैफ उतरलें तरी अज्ञान उरत नाहीं, व कायमचें स्वस्वरूपाचें ज्ञान प्राप्त होतें, आणि मद्याचें कैफ उतरलें, व सावध होऊन देहभानावर आला, तरी देहात्मभाव शिल्लक राहतो तो राहतोच. अर्थात् अज्ञान कायम राहतेंच.

१ या पदामध्यें असें दर्शविलें आहे कीं, देश, काल, आणि वस्तु यांचा ज्यास मुळींच परिच्छेद नाहीं, असें जें निरंश ब्रह्म तें सत्यज्ञानानंत असून केवळ बोधस्वरूप आहे. त्या ब्रह्मास जो जाणतो तो स्वतः ब्रह्मच होतो. या प्रकारचें ब्रह्म आपल्यास मिळालें, पण तें काय मिळालें तें शब्दांनीं सांगतां येत नाहीं! व मनास कळत नाहीं. २ चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वणवेद).

३ सहा शास्त्रें (सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मिमांसा आणि वेदांत. किंवा सहा मतें [षट् दर्शनें] १ सौर, २ शाक्त, ३ गाणपत्य, ४ शैव, ५ वैष्णव, ६ स्कांद.

४ यत्नेंकरून जो वासनांचा त्याग करणें त्यास 'शम' असें ह्मणतात. आणि इंद्रियांच्या बाह्यवृत्तींस कोंडून ठेवणें याला 'दम' असें ह्मणतात. या म्हणण्याचें रहस्य असें आहे कीं, वेदशास्त्रादि सर्व धुंडाळलीं आणि ब्रह्मलोकापर्यंत पोंहोचून ब्रम्हांड जरि धुंडाळलें तरी तें ब्रम्ह आकलन होत नाहीं. परंतु तें या नरदेहांत मात्र आयतें कोंडलेलें सांपडतें; तें मिळविण्याचा योग्य प्रयत्न मात्र झाला पाहिजे. (भगवद्गीता अ० १५ श्लो० ९।१०।११ पहा).

सैरिसें । कर्ताचि नासे वरि अनारिसें तें कवणचि हें तुळेना ॥ ऐसें० ॥ २॥
मळ निर्मळ ह्मणे कल्पनाचि मळवी । आपण हें मळेना ॥ ऐसें० ॥ ३ ॥
संसारभयें भितें मनैंचि पळवी । आपण हें पळेना ॥ ऐसें० ॥ ४ ॥
अनुभवतरुवरी फुलेंविण फळलें । देंठाविण फळ कदाचि हें गळेना ॥ ऐसें०

---

१ जें जें प्रत्यक्ष दिसतें तें तें त्याच्या (सरिसें) जवळ येतच नाहीं. कारण सूर्यासंन्निध, तम कसें प्रवेश करील? मूळांत कर्ताच नाहींसा होतो मग कर्म आणि त्याचें फल कोठून असेल? यांचा नाश झाला तरी (वरि अनारिसें—पृथक् अनिर्वाच्य) कांहीं राहतें तें कोण? याची तुलना करायाला दुसरा पदार्थच उरत नाहीं ह्मणजे अव्यक्त असा भाव.

२ मलिन किंवा निर्मळ असें ह्मणणारें कोण? तर तें कल्पनाच ह्मणविते. जर कल्पनाच विराली तर शुद्ध किंवा अशुद्ध असा संकल्प करायाला कोणी उरलें नाहीं, तर तसें ह्मणणार कोण? ह्मणून त्या कल्पनेलाच (हें ब्रह्म) मळवितें, म्हणजे तिला शून्यरूप करितें. (तम हा शून्याचाच स्वभाव आहे.)

३ जन्ममरणरूप संसारामध्यें मरणादि दुःख भीतीला भिणारें जें मन! त्यालाच हें (ब्रह्म) दूर पळवतें (मनच भितें, असें ह्मणण्याचें कारण आमचा सर्व संसार मनाचाच केलेला आहे.)

४ अनुभवतरू ह्मणजे सनातन अश्वत्थ वृक्ष. ईश्वर आपल्या मायाशक्तीच्या योगानें प्रपंचरूपी म्हणजे जीव जगद्रूपानें भासतो. अनुभवज्ञानाची जेथें पराकाष्ठा झालेली असते त्या स्थितीला योगशास्त्रांत ईश्वर असें ह्मटलेलें आहे [तत्र निरातिशयं सर्वज्ञबीजं ॥ भावार्थः—जशी परमाणूच्या ठिकाणीं अल्पत्वाची व आकाशाच्या ठिकाणीं महत्वाची परम मर्यादा झाली असते; तशी चित्तधर्म जे ज्ञानादिक हे कोठें थोडे अधीक, असे कमजास्तीपणानें दिसतात; तेव्हां यांची सुद्धां कोठें तरी परममर्यादा असलीच पाहिजे. त्या ज्ञानादिकांची जेथें पराकाष्ठा झाली असते, तो ईश्वर होय. [पातञ्जलयोगसूत्र ६५ पादः १] "फुलेंविण फळलें." या म्हणण्याचा हेतु असा आहे कीं, सद्वस्तुवरील पहिला विकार आकाश होय, आकाशाला बहुतेक ज्ञानिजनांच्या ग्रंथांत "खपुष्प" असें म्हटलेलें आहे. याचें कारण तें काल्पनिक आहे. जसें अश्वत्थ वृक्षास फूल दिसून येत नाहीं पण फळ दिसतें, तद्वत् आकाशाचें मुख्य स्वरूप अवकाश (परमाणूंचीं बनलेलीं चार भूतें) एतद्रूप फल प्रत्यक्ष दिसतें. पण अद्वैतदशेमध्यें ब्रह्मतत्त्वाचें वर्णन श्रुतिमध्यें असें केलेलें आहे कीं, तें निश्चल व गंभीर असून तेथें तेज नाहीं, तेथें तम नाहीं, जें वाणीनें सांगतां येत नाहीं, असें कांहीं एक अनिर्वचनीय अव्यक्त बाकी राहतें तें.

॥५॥ जें जें दिसतें तें तें त्यांनींचि चळे । परि आपण हें चळेना ॥ ऐसें० ॥ ६ ॥ निखिल चिन्मय बोध मुराला । प्रकाश उरला अढळ हा ढळेना

" देंठाविण फळ कदांचि हें गळेना " याचा भावार्थ असा आहे कीं, वृक्षाप्रमाणें या प्रपंचास (जगास) पुण्य आणि पाप अशीं दोन बीजें आहेत. तशींच सुख आणि दुःख हीं दोन फळें आहेत (सुख स्वर्गादिसुखें) ती दोन्ही सदेंठ आहेत, कारण कर्मजाड्य (सकाम कर्मं) या देंठास लागून आहेत. पण सर्वात्मबुद्धीनें प्रेमलक्षणयुक्त निष्कामभक्तियोगेंकरून चित्तशुद्धि झाल्यानें अनुभवास आलेलें पण अव्यक्त असल्यामुळें देंठावीण ह्मणजे निरालंब आहे. अर्थात् देंठाच्या आश्रयावाचून (स्वयं) निर्निमित्त स्थिर आहे, त्याअर्थी तें गळण्याची भीतीच नाहीं. श्रीमद्भागवत स्कं० ११ अ० १४ यांत भगवंतांनीं उद्धवास सांगितलें आहे कीं:—आद्यंतवंत एवैषां लोकाः कर्मविनिर्मिताः । दुःखोदर्कास्तमोनिष्ठाः क्षुद्रा नंदाः शुचाऽर्पिताः ॥ ११ ॥ मय्यर्पितात्मनः सभ्य निरपेक्षस्य सर्वतः । मयाऽऽत्मना सुखं यत्तत्कुतः स्याद्विषयात्मनाम् ॥ १२ ॥ अकिंचनस्य दांतस्य शांतस्य समचेतसः । मयाऽऽसंतुष्टमनसः सर्वाः सुखमयादिशः ॥ १३ ॥ भावार्थः—यज्ञानुष्ठाननित्यनैमित्तिकर्में इत्यादिकांचीं फळें (ह्यांनीं मिळविलेले स्वर्गादि लोक) कर्मीच्या योगानें रचलेलीं असल्यामुळें उत्पत्तिविनाशवंत असतात. त्यांचा परिणाम दुःखद व त्यांचें पर्यवसान मोहांत घडतें; त्यांत आनंद अत्यल्प असतो. परंतु हे उद्धवा, ज्यानें विषयाची इच्छा सोडून माझ्या ठिकाणीं चित्त लावलें त्याच्या अंतरीं मी परमानंदरूपानें प्रकाशमान होतों, मग त्या स्वस्वरूपभूत परमानंदाच्या योगानें त्याला जें सुख प्राप्त होतें, तें विषयांनीं ज्यांचीं चित्तें व्यापलेलीं असतात त्या पुरुषांना कोठून मिळेल? एकंदरींत निष्कामभक्ति हेंच श्रेष्ठ साधन होय. इतर साधकांचें सुख त्या त्या (स्वर्गादि) लोकांपुरतेंच असतें; आणि भक्तांचें सुख तर सर्वत्र परिपूर्ण असतें: पहा:–ज्यानें कोणत्याही वस्तूचा संग्रह करणें सोडलें, इंद्रियें आकळिलीं, मन शांत केलें, सर्वत्र समबुद्धि ठेविली, व माझ्यायोगेंच (परमेश्वराच्याच प्रेमानें) चित्त सर्वथा संतुष्ट राखिलें, त्याला सर्व दिशा सुखमयच असतात.

१ याविषयीं प्रारंभींच सांगितलेंच आहे. कठोपानिषद् अ. २ व. ५ मंत्र १३, १४ मध्यें ह्मटलें आहे कीं विनाशी वस्तूंमध्यें जो अविनाशी आहे, सचेतन वस्तूंमध्यें जो चेतना उत्पन्न करणारा आहे, जो एक असून पुष्कळांच्या (संसारी लोकांच्या) कामना तृप्त करितो, तो स्वतःच्या ठायीं वास करणारा आत्मा जे ज्ञाते पुरुष पाहतात, त्यांस शाश्वत शांति प्राप्त होते, इतरांस होत नाहीं. १४ त्यांस अवर्णनीय परमसुख प्राप्त होतें. तें प्रकाशात्मक आहे असें स्पष्टपणें त्यांस दिसतें.]

॥ ऐसें० ॥ ७ ॥ सोहिरा ह्मणे मज हें घडलें । थकचि पडलें मन हें जडलें फिरोनि कीं वळेना ॥ ऐसें० ॥ ८ ॥

पद २४ वें.

उघडा कीं हा चाळवितो । कान डोळा हालवितो । दृश्य दिवा माळवितो ॥ ध्रु० ॥ ब्रह्मरूप झाली दृष्टि । मुखें निघती त्याच गोष्टी ॥ १ ॥ आंगाचि झालें निरंजन। हें मन झालें उन्मन ॥२॥ सूत्र धरोनि उभी माउली। हे काया खेळवि बाहुली ॥ ३ ॥ सकळ भरलें तत्त्व नीरीं । जगबुद्‌बुद हें तयावरी ॥४॥ सोहिरा ह्मणे हेंचि धन्य । हेंचि आंगीं भरलें चैतन्य ॥ ५ ॥

---

१ मन त्या सुखाच्या आनंदांत थक पडलें त्या आनंदाची मीमांसा तैत्तिरीयकोपनिषदांत अ० ८ येथें येणेंप्रमाणें केली आहे. पराकाष्ठेचा चपल, अत्यंत दृढनिश्चयी, चांगलें वेदाध्ययन केलेला, अप्रतिम बलवान, तरुण, सर्व पृथ्वीवित्तानें परिपूर्ण झालेला चक्रवर्ती अशा पुरुषाला जो आनंद होईल तो मनुष्यास प्राप्त होणारा आनंद होय. असे मनुष्याचे शंभर आनंद एकवट झाले ह्मणजे मनुष्यगंधर्वांचा एक आनंद होतो. असें मनुष्यगंधर्वांचे शंभर आनंद एकत्र झाले ह्मणजे देवगंधर्वांचा एक आनंद होतो. हे असे देवगंधर्वांचे शंभर आनंद एकत्र व्हावे तेव्हां चिरस्थायी पितरांचा एक आनंद होतो. असे पितरांचे शंभर आनंद एकवटतील तेव्हां स्वर्गांतील आजान देवांचा एक आनंद होतो. आजानदेवांचे शंभर आनंद एकत्र झाले ह्मणजे यज्ञकर्मेंकरून देवलोका गेलेल्या कर्मदेवांचा एक आनंद होतो. असे कर्मदेवांचे शंभर आनंद एकत्र केले ह्मणजे देवांचा एक आनंद होतो. असे देवांचे शंभर आनंद एकत्र झाले ह्मणजे इंद्राचा एक आनंद होतो. असे इंद्राचे शंभर आनंद एकत्र झाले ह्मणजे बृहस्पतीचा एक आनंद होतो. असे बृहस्पतीचे शंभर आनंद एक झाले ह्मणजे प्रजापतीचा एक आनंद होतो. हे असे प्रजापतीचे शंभर आनंद एक झाले ह्मणजे ब्रह्माचा एक आनंद होतो. हाच आनंद वेदाध्ययन केलेल्या कामना त्याग केलेल्या महर्षीला प्राप्त होतो. हा जो (परमात्मा, ब्रह्म) पुरुषाच्या ठायीं असतो तोच आदि त्याच्या ठायीं असतो; असा तो भिन्न दिसला तरी एकच होय. हें असें परमात्मस्वरूप ज्याला कळतें तो हा लोक सोडून गेल्यावर त्यास अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आणि आनंदमय अशा आत्म्यांचें क्रमाक्रमानें आकलन होतें.]

पद २५ वें.

आमुचा येथ अपराध काय । आंगीं भरलें निरामय । जो इंद्रियें चाळवी, त्याणें धरिली आपुली सोय ॥ ध्रु० ॥ डोळा झाला ब्रह्मरूप । वाचा करिते आलाप । मनासि घडला हाचि जप ॥ १ ॥ इंद्रियांतें उपेक्षुनी । धारणा हे रक्षुनी । गेला आपुलें मूळ लक्षुनी ॥ २ ॥ ज्ञानवैराग्यें हा आगळा । भवीं असोनि वेगळा । झाला अभिमान हा पांगळा ॥ ३ ॥ नको पाहूं देहाचि चाल । दृष्टि करोनि सखोल । ध्यातें तुह्मीं अनुभवाचें बोलें ॥ ४ ॥ ऐसें कवणें केलें कवण जाणे । सोहिरा ह्मणे मीं हें नेणें । पदरीं बांधिलें अविनाश देणें ॥ ५ ॥

पद २६ वें.

आनंद जिरला । चिन्मयबोध मुरला ॥ ध्रु० ॥ नाहीं एक दुजेपण, आपेंचि आपण ॥ १ ॥ आपणही नसेल, तेंचि काय असेल ॥ २ ॥ असलेपणही नासलें । मज म्यां ग्रासिलें ॥ ३ ॥ नकळोनियां कळलें । कळलें पणही गळलें ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे दावूं कसें । तुला काय दिसे ॥ ५ ॥

पद २७ वें.

स्थिरावली निजदिठी । आपणापें पडली मिठी ॥ ध्रु० ॥ आगमानिगमा गुज । तेंचि सुख स्वयें बुंज । लागली सहजें नीज हो ॥ १ ॥ चौशून्य महाशून्यीं । बुडोनि लाधलें मौन्य । भोगिलें चित्सुख चैतन्य

---

१ तारण. (तरणोपाय) २ शास्त्रें, नारदपंचरात्रादि तंत्रें इत्यादिकांना. ३ वेदांना. ४ समजणें. ५ सहजसमाधि. ६ प्राण आणि अपान हे दोन प्राणवायु मावळतात तें त्रिशून्य होय. व चौं. ह्मणजे चौथें जें शून्य तें शुद्ध चैतन्य (ॐ) ७ महाशून्य ह्मणजे सोहं ब्रह्म. हें अणुरूप आहे [शरीरमार्गीं वर्ते त्रिशून्याचा। तिहींसि तिवडा ॐकाराचा । चौथें निःशून्य भवबंधाचा । ठावचि पुसे ॥ १ ॥ तरी प्राण आणि अपान । दोन मावळती तें त्रिशून्य । चौथें व्यापक गहन । मोक्ष मुक्तिपद तें ॥ २ ॥ ज्ञानेश्वर, पंचीकरण.

हो ॥ २ ॥ आकाशाचा भरला कुंभ । कवणीकडे प्रतिबिंब । विकासला निरालंबहो ॥ ३ ॥ जेथ गेल्या नाहीं येणें । हें कीं ज्याचा तोचि जाणे । कुंठलें वाचेचें बोलणें हो ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे मजमाजी सहज । मावळली निजीं नीज । गैब जाहला योगिराज हो ॥ ५ ॥

पद २८ वें.

माझी मेळ वेळ नलगतां झाला समाधी ॥ ध्रु० ॥ मन ही कन्या वर, वरी शून्या । लग्न मौन्या चैतन्या ॥ १ ॥ कान ना डोळा ययां निराळा । दिसे हे लीला जगबुद्‌बुद जळामाजीं ॥ २ ॥ जगदभ्रव्योमा पूर्णकामा । हृदयआरामा आत्मारामा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे गैबा मूळबिंबा । आरंभरंभस्तंभा निरालंबा ॥ ४ ॥

---

१ महाकाश ह्मणजे ज्यामध्यें सूर्य, चंद्र व नक्षत्रें प्रकाशित होतात अशी अवाढव्य पोकळी हाच एक कुंभ ह्मणजे घट भरला ह्मणजे त्या घरांतील पोकळींत पाणी घालून तो आंगणांत ठेवला असतां त्यांत साभ्र नक्षत्र ढग आणि नक्षत्रें यांसहीत जें आभाळाचें प्रतिबिंब पडतें तें. ‘जेथें निरालंब (परब्रह्म परमब्रह्म) विकासला तेथें बिंबभूत ईश व प्रतिबिंब जीव हे कोणीकडे ? त्यांचा तेथें पत्ता काय लागतो ? हा भाव आहे.

२ समाधि सिद्ध व्हायाला योगशास्त्रांत निर्णय केल्याप्रमाणें जप इत्यादिकांस लागणारा काल व सर्व कर्माचा बरोबर रीतीनें मेळ पडला पाहिजे. तरच समाधि सिद्ध होतो. पण माझा समाधि, मेळ आणि वेळ न लागतां एका क्षणांत सिद्ध झाला, असें या पदांत दर्शविलें आहे, त्याचीं कारणें पुढील चरणांत दिलीं आहेत. मुख्य रहस्य असें आहे कीं मनामध्यें विक्षेप येतो, तो न यावा ह्मणून समाधि लावावयाचा, तो विक्षेपच जर माझा गेला, तर तो समाधि तरी कशाला पाहिजे ? कारण विक्षेप आणि समाधि हे दोन्ही मनाचेच धर्म आहेत, आणि मला तर तें मन मुळींच नाहीं; मग विक्षेप कोठून असणार? आतां अनुभव घेण्याकरितां समाधी करावा असें जर ह्मणावें तर मीच अनुभवरूप आहें मग मला दुसरा आणखीं अनुभव तो कोठून व्हावा.

पद २९ वें.

सत्ता तोचिं हा ऐसा निःश्चय झाला पहा ॥ ध्रु० ॥ भ्रांति ओंगळी झाली पांगळी । जनीं आगळी अंतीं वेगळी ॥ १ ॥ प्रवृत्ति सरती निवृत्ति हरती । विवेकावरती होउनि उरती ॥ २ ॥ आहे अभावरूप नाव । दिसे हे माव लटिकें झाला ॥ ३ ॥ नचले तर्क जहीं अर्क । गर्क तें हें अतर्क्य ॥ ४ ॥ भुलीव भुलती अबोल बोलती । योगी खुलती अंतरिं डुलती ॥ ५ ॥ म्हणे सोहिरा वाचे गुज तें आपुलें निज । अनादि बीज सहज ॥ ६ ॥

पद ३० वें.

कांहीं[2] नाहीं जेथ ! तेथ झालें ! रूपा आलें हो ॥ ध्रु० ॥ अनादी हा अरूप, साक्षि जैसा दीप । तेथुनियां नामरूप एकेक निघालें हो ॥ कांहीं० ॥ १ ॥ जितुकें चराचर दृष्टीसि गोचर । आंत अगोचर, चैतन्य रिघालें हो ॥ कांहीं० ॥ २ ॥ विस्मरतां सोहं, उठलें हें कोहं । देहबुद्धि अहं विषयीं हें लाधलें हो ॥ कांहीं० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे हृदयीं प्रकाशलें । पूर्ण ज्ञानकमळ विकासलें । दिसलें जें भासलें तेंचि मुखें गालें हो ॥ कांहीं० ॥ ४ ॥

पद ३१ वें.

[3]मन मग्न केलें गुरुनाथें ॥ ध्रु० ॥ स्वरूप कळलें, मी पण गळलें । मिळलें आनंदातें ॥ मन० ॥ १ ॥ सहज पिसावलें, मुळीं विसावलें । पावलें मोक्षपदातें ॥ मन० ॥ २ ॥ शून्यचि जितलें, निर्गुणीं रुतलें । गुंतलें निज

---

१ आत्मा अनंत व अकर्ता असून तोच सत्ता ह्मणजे विश्वरूपानें व्यापून आहे असा निश्चय झाला. सकल भ्रांति दूर झाली असें या पदाचें रहस्य आहे. २ नामरूपरहित निर्गुणब्रह्माचे ठाईं. ३ मी देह अशी बुद्धि ह्मणजे अहंवृत्ति व विषय यांत मीपणाचा प्रत्यय आल्यावांचून बाहेरचें जग आह्माला कदापि समजणार नाहीं ह्मणून इदंवृत्तीचें (मनोमय सृष्टीचें) बीज अहंवृत्तींत आहे.

छंदातें ॥ मन० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा, सुलीन होउनी । तल्लीन झालों अनाहत नादातें ॥ मन० ॥ ४ ॥

पद ३२ वें.

अवचटेंचि आजि ऐशी गुरुकृपा हे फळली । आपुलें स्वरूप पाहतां कल्पनाचि हे गळाली । अनुभवतेजामाजी देहबुद्धि हे जळाली । निरंजनीं दिपवाळीची[१] दीपमाळी पुंजाळिली ॥ अवचटेंचि० ॥ १ ॥ ज्ञानदिठी पाहूं जातां झाला संसारचि लटका । सत्तारूप कळों आलें तंव तंव यत्नांतुनि सुटका । बंधाची ती दोरी[२] तुटली तंव झाली कीं हे सुटका । गैबचि[३] हा प्याला प्यालों पूर्णप्रेमाचा घुटका ॥ अवचटेंचि० ॥ २ ॥

---

१ कोकणांत प्रत्येक ग्रामदेवांच्या देवालयासमोर एक उंच दगडी खांब बांधून त्यावर दिवे लावण्याची व्यवस्था केलेली असते त्या खांबास "दीपमाळ" असें ह्मणतात. दिपवाळीच्या दिवसांत, उत्साहप्रसंगीं व शरदृतूंत 'त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशीं, एकूणएक देवालयासमोरील ह्या दीपमाला प्रज्वलित करीत असतात. एका वेळीं दिपवाळीच्या दिवसांत दीपोत्साह केलेला पाहून सोहिरोबांस स्फूर्ति झाली. आणि त्यांनीं निरंजनीं दीपमाला प्रज्वलित केली; पुंजाळणें ह्मणजे तेजोमय ज्योति अतिशयेंकरून प्रज्वलित करणें. श्रीकृष्णांनीं अर्जुनास विश्वरूप दाखविलें त्या वेळीं ही दीपमाळ अशीच प्रज्वलित केली होती. [दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता । यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥ १२ ॥ भावार्थः—आकाशामध्यें सहस्र सूर्यांची जर एका क्षणीं प्रभा पसरली, तर ती त्या महात्म्याच्या प्रभेसारखी कांहींशी दिसेल. २ भवबंधास कारण जी दोरी (प्रकृति —सत्व, रज, तम; हे दोर जिच्या मधून उत्पन्न होतात अशी.] ३ गैब हा शब्द मुख्यतः सूत्रात्मा—हिरण्यगर्भ—ईश्वर एतद्रूप 'आपले' गुरु गोरखनाथ या अर्थीं वापरलेला आहे. जसा वायु सर्व प्राणक्रिया चालविणारा आहे. तसा सूत्रात्मा हिरण्यगर्भही आहे [वायुर्वै गौतम तत्सूत्रं वायुना वै गौतम सूत्रेणायं च लोकः परश्च लोकः सर्वाणि च भूतानि सन्दृब्धानि भवन्ति ॥ भावार्थः— गौतमा! वायूच तें सूत्र होय. वायुरूपसूत्रानें हा लोक, परलोक आणि सर्व भूतें ही गोवलेलीं आहेत. "बृहदारण्यक ५–७–२] सूत्रात्मा हिरण्यगर्भ ईश्वरच आहे' तथापि त्याची आपल्या व्यापारांकडे नियत प्रवृत्ति चालते, ती कोणी अधिष्ठाता मानल्याशिवाय चालणें अनुपपन्न होईल, कारितां परमेश्वर त्याचा अधिष्ठाता अशी

इंद्रियें हीं शोधूं गेलों तंव हारपली साक्ष । अधोर्ध्व[1] टांकिता हें मौन आलें कीं प्रत्यक्ष । विहंगमें[2] उडों गेला तव मोडिले[3] पक्ष । असो कीं हें देह नसो सोहिरा झाला अलक्ष ॥ अवचटेंचि० ॥ ३ ॥

पद ३३ वें.

अहंकार[4] हा मुंडा, कल्पना हिजडीसंगें नाचे चहूंकडे ॥ ध्रु० ॥ नारी ना पुरुषावीण हिजडियेचें रूप । अविवेकमुखें करी विषयीं आलाप

संभावना करणें योग्य होय. हाच एक ब्रह्मरस होय. रस सांठविण्यास कांहीं पात्राची जरूर आहे. कारण पात्रावांचून रसाचें आकलन होऊन तो पितां येणार नाहीं. तो प्याला ह्मणजे महद्ब्रह्म होय. [सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवंति याः । तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥ कौंतेया सर्व गर्भांमध्यें जे देह उत्पन्न होतात, त्या सर्वांचें उत्पत्तिस्थान महत् ब्रह्म, त्यामध्यें बीज ठेवणारा पिता मी । भगवद्गीता, सुबोधचं. टी. अध्याय १४] अर्थात् प्रकृतिरूप आवरण नाहींसें केलें; जसें रस प्याल्यावर पात्र सहज विसर्जन केलें जातें. पूर्ण प्रेमरसाचा घुटका=भक्तिप्रेमाचा घोंट प्यालों असा भाव. वाडीप्रांतांत 'गैब' हा शब्द सर्व साधारण आहे "गैबांत राहणें ह्मणजे वर्मांत किंवा अटकांत राहणें." असें ह्मणतात कीं मी तुझ्या गैबांत आहें काय? किंवा मी तुझ्या गैबांत तसा सांपडणार नाहीं, अथवा 'मला जो तूं दबवतोस तो काय? मी तुझ्या गैबी आहें" इत्यादि. सर्व गर्भांचा ज्यांत समावेश होतो असें जे पूर्वोक्त महत् ब्रह्म हेंच आवरणास कारण आहे. सर्व जग त्याच्या गैबांत सांपडलें आहे. तें आवरण नाहींसे झालें कीं जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मनुष्य मुक्त झाला.

१ पिंड आणि ब्रह्मांड (ऊर्ध्व). २ देहस्थ हंस जीव. ३ प्रवृत्ति व निवृत्ति हे दोन पक्ष ते मोडल्यामुळें कांहीं न कारितां न करवितां परमहंस होऊन बसला; हा भाव. ४ या पदाचें रहस्य असें आहे कीं, अहंकार हा मुंडा (नपूंसक, षंढ पुरुष), आणि कल्पना–हिजडी (नपूंसक, षंढ स्त्री) यांना उद्देशून या पदांत परमार्थपर रूपक केलेलें आहे. वाडी संस्थानांत हें जोडपें भिक्षेकरितां घरोघर दर वर्षी एक वेळ फिरत असतें. हिजडीबरोबर एक मुंडा असतोच. हें जोडपें धान्यादि दाण्याची भिक्षा घेत नाहीं; फक्त दर घरास एकेक पैसा घेत असतें. पूर्वीच्या सरकाराकडून त्यांना हा पैसा वसूल करण्याचा हक्क होता. हल्लीं तसा प्रकार नाहीं. परंतु जर पैसा देण्याविषयीं कोणी कुरकुर केली, तर हिजडी नेसण्याचें वस्त्र एकीकडे करून आपलें गुह्यस्थान त्यास दाखविते, व तें पाहिलें

॥ १ ॥ विचाराची दाढी बोडुनी दावी सुरेखपण । ह्मणोनि सज्जनीं तें न देखावें आपण ॥ २ ॥ स्थिर भूमिं हिजडियेचा पाय न धरे निका । धरों जातां मुंडा ठोकी भेदाचा हा धुमका ॥ ३ ॥ सर्वांगीं हिजडी न्हेसे वासनेंचें लगुडें । द्वेषाचा दक्षिणांगीं पदर सोडिला मुंडें ॥ ४ ॥ प्रवृत्तीचे पाठीवरि तृष्णेची हे वेणी । नेत्र द्वारें पाहुं जातां घालिते गंवसणी ॥ ५ ॥ हिजाडियेचे कानीं अनर्थाचीं तानवडें । पाहूं जात्या महामोहें मोहुनीच पाडी ॥ ६ ॥ इंद्रियांच्या द्वारीं गुंतुनि पाडिसी कां? अलक्ष्या । लोभ टांकुनी झडकरेंसी चल चल दे भिक्षा ॥ ७ ॥ दान धर्म व्रतें आम्हा दाणे ह्मणते नका । आशेचें खीण न पाहतां द्रव्य पैसा टांका ॥ ८ ॥ सोहिरा ह्मणे दे परता जाउं दे खटपट । निघोनि गेलिया आहे समाधीच नीट ॥ ९ ॥

तर अशुभकारक असून त्यामुळें क्लेश उत्पन्न होतात असा समज आहे. यामुळेंच यांच्याशीं कुरकुर न करितां पैसा टाकून याची रवानगी करितात. एक वेळ हें जोडपें सोहिरोबांचे घरीं आलें, त्यावरून त्यांस ही स्फूर्ति झाली. या पदांत शेवटीं त्यांनीं आपल्या घरच्या मंडळीस ह्मटलें आहे कीं, "सोहिरा ह्मणे दे परता जाऊं दे खटपट" द्रव्य पैसा घेऊन निघून गेल्यावर मग नीट समाधीच आहे. हें रहस्य आहे.

१ हिजडी ही एका ठिकाणीं स्थिर रहात नाहीं (चित्त स्थिर होऊं देत नाहीं.) कदाचित् तिचा पाय धरों जातां ह्मणजे कोठें स्थिर होऊं लागलाच, तर मुंडा (अहंकार) भेदाचा (कामक्रोधादि भेद करणाऱ्या विषयांचा) दुमका (धपका) ठोकतो. यापुढें सर्व ह्या जोडण्याच्या स्वरूपाचें तिच्या कानांतील तानवडें इत्यादिकांचें वर्णन केलें आहे.

२ दान, धर्म, व्रतें इत्यादि या प्रकारच्या दाण्याची भिक्षा नको असें ह्मणणें. आशेचा खीण=क्षण. एक क्षणाचा उशीर न करितां द्रव्य पैसा द्या. खीण हा शब्द त्यांच्या बोलण्याच्या रीतिप्रमाणें वापरलेला आहे. कोणी वाईट मार्गानें मिळविलेल्या द्रव्याचा दुरुपयोग करूं लागला असतां त्या संबंधानें बोलावयाचें असल्यास एक ह्मण प्रचारांत असलेली वाडीप्रांतांत पदोपदीं आढळून येते. ती अशी कीं—हिजडीचा माल मुंड्यानेंच खावा.

पद ३४ वें.

(पिंगळा[1])

वैराग्य हें लागेल राबा । अंतरसुख हें जागेल बाबा । निशाण हे शून्याची भेटी । होइल चैतन्याची दृष्टि ॥ १ ॥ दृश्यातीत वृत्ति पैसा । समर्थ तुज एक जोडेल ऐसा ॥ २ ॥ सहज करूं नकोचि यत्न । अमोल्य रत्न जोडेल दादा ॥ ३ ॥ जगबुद्बुद कीं एकचि अंबु । बोध हा तुज होईल बाबू ॥ ४ ॥ अनुतापाचें उगवेल साळकं[2] । विवेक पोटीं होईल बाळक ॥ ५ ॥ निद्रेमाजी होसिल जागा । मनपवनाच्या बांधसिल पागा ॥ ६ ॥ अबोल वाचे बोलसिल बाबा । सोहंबीज हत्ती झुलतिल दादा ॥ ७ ॥ निष्कामीं हे वृत्ति बुडती । कामधेनुचीं चवरें पडती ॥ ८ ॥ झालिच नाहीं दिसेल काया । समाधि तुज एक जोडेल राया ॥ ९ ॥ भक्ति मुक्तिशीं विकेल भाई । कैवल्यसुख हें पिकेल बाबा ॥ १० ॥ सोहिरा बोले पिंगळा ऐसा । देहीं असोनि वेगळा दादा ॥ ११ ॥

पद ३५ वें.

(पिंगळ्याचें ज्योतिष[3])

आजी चंद्रासारिखा हाता आला । सूर्यासारिखा भयीं पडला । गगना-

---

१ पिंगळा ह्मणून एक प्रकारचा भिकारी हातांत एक डुगडुगें घेऊन प्रातःकाळींच दारांत बसून बडबड करीत असतो. तो पहिल्यानें दादा, बाबा, ह्या विशेषणांनीं गौरवित होत्साता कांहीं नमन सुरू करितो. तुला पैका जोडेल, तुला मुलें होतील अशा प्रकारें भविष्य सांगत असतो. त्याचें हें चऱ्हाट बराच वेळ चाललें असतें. कोणी पैसा दिला तर आणखी वस्त्र द्या ह्मणतो, वस्त्रही कोणी दिलें तर धान्य द्या ह्मणतो. शेवटीं आतां कांहीं मिळत नाहीं व ऊठ चालता हो, जातोस कीं नाहीं, असें सांगण्याचा प्रसंग येईपर्यंत, तो कांहीं हालत नसतो. व त्याच्या डुगडुग्याची टकळी एकसारखी चालू असते. अशा पिंगळ्याची बडबड ऐकून त्याचप्रमाणें या पदांत त्याच्या भाषेनें परमार्थपर रूपक केलें आहे. २ कमळ. ३ (हा शब्द वाडीप्रांतात अझून फार प्रचारांत आहे.) पूर्वीच्या पदांत सांगितलेलें नमन आटपलें ह्मणजे मग पिंगळ्यांचें ज्योतीष सुरू होतें. तदनुरूप या पद्यांत हुबेहुब रूपक केलें आहे. या दोन्ही पद्यांत जो परमार्थपर गुह्य अर्थ आहे, त्याचें सविस्तर विवरण केलें असतां फार विस्तार होतो ह्मणून तें काम सुज्ञ वाचकांवरच संपविलें आहे.

सारिखा टांकिला । घांट जेथ ॥ १ ॥ आजि करणीसारिखा समर्थ । विरक्तीसारिखा परमार्थ । बोलासारिखा अर्थ । हाता आला ॥ २ ॥ आजी करणीसारखी चाल । मौन्यासारिखा बोल । विवेका सारिखें नवल । वाटलें जेथ ॥ ३ ॥ आजी अकर्त्यासारिखी करणी । जिवंतासारिख्या मरणीं । वैराग्यासारिखी हरिणी । निवाली जेथ ॥ ४ ॥ आजी अकर्त्यासारिखें वर्म । अजन्म्यासारिखें कर्म । भ्रांतिसारिखा भ्रम । हरला जेथ ॥ ५ ॥ आजी अलक्ष्यासारिखी माता । गगनासारिखा पिता । वायुसारिख्या सुता । जन्म झाला ॥ ६ ॥ आजी तेजासारिखी लेंक । उदकासारिखा लेक । पृथ्वीसारिखा मोदक । दिधला हातीं ॥ ७ ॥ आजी जनांसारिखें वन । अभिन्नासारिखें भिन्न । चैतन्यासारिखें चिन्ह । दिसतें कीं हें ॥ ८ ॥ आजी आइत्यासारिखा यत्न । चैतन्यासारिखें वतन । अमोलासारिखें रत्न । जोडलें कीं हें ॥ ९ ॥ आजी निरंजनासारिखी वस्ती । सोहं बीजासारिखा हत्ति । बोधासारिखी मस्ती । आंगा आली ॥ १० ॥ आजी अॅलेखासारिखा जोगी । अनुहातासारिखी शिंगी । अरूपासारिखा सोंगी । भासला आजी ॥ ११ ॥ आजी प्रेमासारिखा पूर । गगनासारिखा अंकूर । कैवल्यासारिखा आगर । पिकला जेथ ॥ १२ ॥ आजी ज्ञानासारिखें स्नान । अनुभवासारिखें भोजन । समाधीसारिखें शयन । मिळालें आजी ॥ १३ ॥ आजी सोहिऱ्यासारिखा जोशी । सद्गुरुसारिखा पोशी । संतोषासारिखा सुखराशी । करोनि ठेला ॥ १४ ॥

---

१ अज जो जन्म मरण रहीत आत्मा त्या सारखें. २ परा शक्ति (त्रिपदा गायत्री) ३ गगन=ॐ कार [पंचब्रह्म विकासमूर्ति शिव तो ॐकाररूपी पिता । गायत्री सकळां गिरां प्रसवते माताचि ते तत्त्वता ॥ अमलानंद, शतश्लोकी.] ४ वायु=सूत्रात्मा हिरण्यगर्भ. ५ तेज=तैजसापासून झालेली लेंक (इच्छाशक्ति) ६ उदक=(आप) विष्णु. ७ पृथ्वी=अहंकार (ब्रह्मा)

पद ३६ वें.

सद्गुरु हा प्रसन्न जाहला । विश्रांतीसी हृदयीं आला । पूर्णानंद जीव धाला । अखंडाकारें ॥ सद्गुरु० ॥ १ ॥ दृश्यभान छेदिलें । चंद्रमंडळ भेदिलें । पिंडींचिया शोधिलें । आत्मया रामा ॥ सद्गुरु० ॥ २ ॥ जेथ सुखावले संत । ज्ञानवनवसंत । विवेक जाहला पसंत । सर्व देखणा ॥ सद्गुरु० ॥ ३ ॥ विश्व चळतें कीं हें जेणें । जया नाहीं येणेंजाणें । मार्गस्थ जीवाचें पेणें । देह हें जाणा ॥ सद्गुरु० ॥ ४ ॥ ब्रह्म व्यापक जेथवरी । अनुभव जाहला तेथवरी । आतां कांहीं हेतवरी । राहिला नाहीं ॥ सद्गुरु० ॥ ५ ॥ संसार हा बाजार । करितां न पावे येरजार । सुटला आहे सेजार । अहंकाराचा सद्गुरु० ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे समाधिस्थ । जया नाहीं उदो अस्त । संप्रज्ञात छंद अस्त । स्वात्मसुखीं या ॥ सद्गुरु० ॥ ७ ॥

पद ३७ वें.

आपेंचि लागली जेथ उन्मनि नीज ॥ ध्रु० ॥ संकल्प हा त्यजिला । त्यजुनी नीजगुंज बूझला ॥ बुझुनी निवांतचि निजला । करोनि तन्मय शेज ॥ आपेंचि० ॥ १ ॥ मनबुद्धिऐक्य वडलें । सुषुम्नेसवें भिडलें । दशवें द्वार उघडलें । समूळेंशीं संसारा या पडलें पूंज ॥ आपेंचि ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आलें मौन्य । शून्यामाजी गेलें शून्य । उरलें हें चैतन्य । निरालंब सहज ॥ आपेंचि० ॥ ३ ॥

---

१ समाधि दोन प्रकारचा आहे. एक असंप्रज्ञात समाधि व दुसरा संप्रज्ञात समाधि [वितर्कविचारानन्दास्मितारूपानुगमात्संप्रज्ञातः पातञ्जलयोगसूत्र १७ पा. १] संप्रज्ञात समाधीचें स्वरूप असें:—भाव्य पदार्थांविषयीं संशय किंवा खोटें ज्ञान वगैरे कांहीं नसून त्याचें स्वरूप जेणें करून उत्तम प्रकारें समजतें, त्यास संप्रज्ञात समाधि असें ह्मणतात. २ सहवासीय जनांचें वेष्टन-संबंध आवरण इत्यादिकांचा अस्त ह्मणजे (अंत) झाला हा भाव [निर्वेश उपभोगः स्यात्परिसर्पः परिक्रिया । विधुरं तु प्रविश्लेषेऽभिप्रायश्छंद आशयः ॥ इत्यमरः] ३ गुह्य उमजला. ४ ब्रह्मरंध्र. ५ पूज्य, शून्य, संसाराचें वाटोळें झालें.

पद ३८ वें.

निजजनवसंत सुखावले जिच्या संगा लागोनि ॥ ध्रु० ॥ आदि अंत नाहीं जिसी । पूर्णानंदाची राशी ॥ भोगिति हे निदिध्याशीं श्रवणमननीं ॥ निज० ॥ १ ॥ नाहीं जेथ यम नेम आपणापेंचि आराम ॥ शुद्ध सुमन शमदम । मदनमालिनी ॥ निज० ॥ २ ॥ टाकिलें हें त्रिकूट । भेदोनियां श्रीहाट ॥ वस्तीला गोल्हाट । औटपीठवासिनी ॥ निज० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे चतुष्पदा[१] । भोगुनियां परमपदा ॥ भोगिती अनुपम्य स्वादा । तूर्या उन्मनि ॥ निज० ॥ ४ ॥

पद ३९ वें.

ब्रह्मबोधेंचि निवालों[२] । आतां काय मी बोलों ? ॥ ध्रु० ॥ पाहतें[३] पाहणें उडालें । लय लक्षाचि बुडालें । कोठें नेणें विसावलों ॥ ब्रह्म० ॥१॥ असलेपण[४] न मोडतांचि । म्या नसलेपणेंचि । असें कांहीं नहोनियां ठेलों

---

१ विश्व, तैजस, प्राज्ञ आणि प्रत्यगात्मा असे चार पाद (पाय) आहेत जिला अशी संत्रावी कामधेनू (तूर्यावस्था).

२ जागृत्स्वप्नसुषुप्तीचे ठायीं असणारा प्रपंच ज्या ब्रह्माच्या योगानें प्रकाशित होतो, तें ब्रह्म मी असें ज्ञान झालें असतां प्राणी सर्व बंधापासून तत्काल मुक्त होतो.

३ अभ्यासबलानें अधिकाधिक गति होते आणि त्यामुळें देहादिकांपासून मी निराळा आहें, असा अनुभव अधिकाधिक स्पष्ट होत जातो. या अनुभवाचा परिणाम शेवटीं असा होतो कीं, भोक्त्याचें खरें स्वरूप जागृदादि तीन्हि अवस्थांमध्यें अन्वयव्यतिरेकांहीं करून निवडल्यामुळें, साक्षी हा असंग आहे असा निश्चय होतो. अर्थात् स्थूल दृष्टीनें जें पाहणें तें नाहींसें होतें.

४ जागृदादि तीन्हि अवस्थांचें असलेपण (अस्तित्व) मोडलें नाहीं ह्मणजे तें बंद झालें असें नाहीं, तर "त्या अवस्था मला नाहींत मी कांहींच करीत नाहीं मी असंग साक्षी आहें" असें पूर्णपणें जाणून 'कांहीं न होनियां ठेलों' ह्मणजे अव्यक्त होऊन राहिलों असा भाव. जाग्रत्स्वप्नसुषुप्ति यां पैकीं ज्या ज्या दशेंत जें जें साक्षीस दिसतें तें तें त्या दशेपुरतेंच. ह्मणजे जागृतींतील स्थूल दृष्टि जागृतींतच. स्वप्नांतील सूक्ष्मदृष्टि स्वप्नांतच, आणि सुषुप्तींतील अज्ञान सुषुप्तींतच असा अनुभव सर्व लोकांस आहे. "स यत्तत्रेक्षते" इत्यादि श्रुतींनीं असें सिद्ध केलें आहे कीं, त्या त्या अवस्थेमध्यें साक्षीच्या दृष्टीस जें जें पुण्यपाप पडतें, त्यापासून तो अगदीं निराळा असतो.

॥ ब्रह्म० ॥ २ ॥ कवणें कांहींच ना दिधलें । नेणों कसें समाधान हें झालें । नित्य डोलोंचि लागलों ॥ ब्रह्म० ॥ ३ ॥ प्रतीति-पाखीं उडों गेलों । पहिलाचि पांगळलें । अवघें अंबरचि झालों ॥ ब्रह्म० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे आंगीं आलें । गाढें मौन्याचि माखिलें । माझा मीच प्यालों ॥ ब्रह्म० ॥ ४ ॥

पद ४० वें.

परब्रह्मपद भोगी हा जोगी[६] ॥ ध्रु० ॥ मुखाविण कैसी वाजविते पहा, अनाहतशिंगी[७] ॥ परब्रह्म० ॥ १ ॥ आंगचि नाहीं, हे प्रतीतिची[८], पुरी गोदडी हे आंगीं ॥ पर० ॥ २ ॥ मोहरें[९] आलें दृश्य, कदाचि नेघे, झाला वीतरागी[१०] ॥ परब्रह्म० ॥ ३ ॥ भोगही न म्हणे, त्यागही न जाणे, सोहिरा रमला राजयोगी ॥ परब्रह्म० ॥ ४ ॥

---

१ ज्ञानेश्वरी अ० ६ श्लो० ४१५ वरील टीप अवश्य पहा. २ पक्षांहीं (पंखांनीं) ३ पांगळा झालों. तुकोबांनीं एका पदांत ह्मटलें आहे (पांगुळा झालों देवा मज हात ना पाय.) ४ आकाश (गगन).

५ जयांचिया इंद्रियांच्या घरा । नाहीं विषयांचिया झारा । जो आत्मबोधाच्या वोवरां । पहुडला असे ॥ ६२ ॥ असतेनि देहें एतुला । जो चेतुचि दिसे निदेला । तोचि योगारूढ भला । ओळखें तूं ॥ ६३ ॥ [ज्ञानेश्वरी अध्याय ६]

६ या पदांत "जीवेश कल्पनारहित स्वयंप्रकाश शिवस्वरूपी जो कूटस्थ तद्रूप झालेला जो योगी त्यावर "जोगी" असी कल्पना करून रूपक केलेलें आहे. ज्ञानेश्वरांनीं ही एका ठिकाणीं असेंच ह्मटलें आहे. [बेडा तामसा जोगी देखिला गे माय]

७ अनाहत नांवाचा शरिराचे आंत होणारा ध्वनि हीच ज्या जोग्याची शिंगी (वाद्यविशेष) स्थूल किंवा सूक्ष्म देहच नाहींत ज्याला असा हा जोगी आहे.

८ जागृत्स्वप्न सुषुप्ति तूर्या या चारी अवस्थांमधील प्रतीति एकत्र केलेली (पुरी ह्मणजे पूर्ण प्रतीति) हीच गोदडी (कंथा) आंगीं=उन्मनि अवस्थारूप प्रकृति हेंच ज्याचें अंग त्यावर. ९ पुढें=समोरासमोर आलेलें दृश्य (नामरूपात्मकजग) १० अणुरेणूपासून ब्रह्मलोकापर्यंत विषय काकविष्ठेप्रमाणें तुच्छ मानणें याप्रकारें वैराग्य स्वीकृत केलेला.

पद ४१ वें.

झाला ब्रह्मबोध लागली समाध ॥ ध्रु० ॥ सुषुम्नेच्यों छिद्रीं । स्थिरावलों ब्रह्मरंध्रीं । भेदोनियां नादबिंद ॥ झाला० ॥ १ ॥ मना वाचे नाकळे। ऐसें देखिलें निराळें । रूपावीण हें अगाध ॥ झाला० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे काय वानूं । हारपलें देहभानू । सद्गुरु भेटला हा सिद्ध ॥ झाला० ॥३॥

पद ४२ वें.

झालें हो समाधान । गुंतोनि कोठें नेणों ! ठेलें हें मन ॥ ध्रु० ॥ त्रिकुटाचे वाटे, उघडोनियां दारिवैठें । भेटुनि आलों कोणा ? नेणो ! कोठें अवचटें ॥ झालें० ॥ १ ॥ पुढली हे कीं मागली, नेणों कैंची चांगली । अतर्क्यचि लागली, निद्रा हे सहज ॥ झालें० ॥ २ ॥ जन्म नाहीं मरण, जेथ व्यक्ति नाहीं वर्ण । सोहिरा सच्चिदानंद-अजीं पूर्ण ॥ झालें० ॥ ३ ॥

पद ४३ वें.

मन हें ब्रह्मबोधं बुडालें ॥ ध्रु० ॥ आत्माग्नीचें दर्शन होतां । कर्पुरमानें उडालें ॥ मन० ॥ १ ॥ चित्सुखसिंधु हा पाहूं जातां । सैंधवमानें

---

१ शून्यद्वार (योगशास्त्रोक्त ब्रह्मद्वारचक्र सुषुम्ना नाडीच्या मार्गानें आज्ञाचक्रांत (नेत्रस्थानीं) प्राणवायु गेल्यावर तेथून ब्रह्मरंध्रस्थानीं वर चढविण्यासाठीं मध्यतरीं असणारें छिद्र. २ वैश्वानर नांवाचा शरिरांत होणारा नाद. बिंदु=ॐकार. ३ द्वार, दरवाज्याचें कवाड (सुषुम्ना कपाट " मैत्रायण ब्राह्मणोपनिषद् प्र० ६ म० २१ मध्यें सांगितलें आहे कीं " उर्ध्व (हृदयापासून ब्रह्मरंध्रापर्यंत) जाणारी सुषुम्ना नामक नाडी, जींतून प्राणसंचार करितो, ती तालूच्या आंत कुंठित होते. ती (अभ्यासानें वश केलेला.) प्राण, ओंकार (त्रिकूट स्थूलदेह) आणि (ब्रह्मध्यानांत निमग्न) मन यांहीं युक्त झाली म्हणजे तींतून त्यानें उत्क्रमण करावें, आणि जिव्हेचें अग्र तालूच्या मुळाशीं फिरवून कोणत्याही इंद्रियांचा उपभोग न करितां, महिम्याच्या महिमा पहावा. (म्हणजे अर्थात आत्म्यानें आत्मा पहावा) तेथून तो निरात्मकत्वाप्रत पावतो आणि त्यामुळें त्यास सुखदुःखाचा अनुभव घडत नाहीं त्यास केवलत्व (मोक्ष) प्राप्त होतें.) ४ अज=जन्मनाशरहित सच्चिदानंदरूप जो आत्मा त्याच्याठायीं. ५ मीट.

विराले ॥ मन० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मजमाजी आतां । नेणों काय झालें ॥ मन० ॥ ३ ॥

पद ४४ वें.

लागोनि लग्न । मग्न मन ठेलें हो ॥ ध्रु० ॥ काया नाहीं माया, तया ठाया लया गेलें हो ॥ मग्न० ॥ १ ॥ हृद्गत सदयहृदया, उदया आलें हो ॥ मग्न० ॥ २ ॥ संकल्प हा क्षया जाउनीं, अक्षय दया त्यालें हो ॥ मग्न ॥ ३ ॥ आरंभरंभस्तंभीं, निरालंबीं गैब जाहलें हो ॥ मग्न० ॥ ४ ॥ तुटका संसार घोंटुनी झुटका, प्रेमघुटका प्यालें हो ॥ मन ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे जेथुनि येणें, ज्याचें तेणें नेलें हो ॥ मन० ॥ ६ ॥

पद. ४५ वें.

लेइलें आजी चिन्मय लेणें ॥ ध्रु० ॥ आंगाहुनि जहीं, दुजें नाहीं, सबाह्य पाहीं, सर्वांगीं देखणें ॥ लेंइलें० ॥ १ ॥ अवचित घडलें, मौनेंचि पडलें, अंतरिं जडलें, तें मनबुद्धि नेणें ॥ लेइलें ॥ २ ॥ कर्म गाळवी, वर्म आळवी, इंद्रियें चाळवी, कवण येणें ॥ लेइलें० ॥ ३ ॥ पाहतां न दिसे, दिसल्यावीण असे, सकळ प्रकाशें, जग चळे जेणें ॥ लेइलें० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे, पावलों निजखुणें, दिधलें येणें, अविनाश देणें ॥ लेइलें० ॥ ५ ॥

पद ४६ वें.

आतां काय मी बोलों । कीं उगा आनंदेंचि डोलों ॥ ध्रु० ॥ दिठी गेली

---

१ आरंभःसंभमस्त्वरा । आरंभः त्रयमारंभमात्रस्य । यल्लक्ष्यम् । उद्धात-प्रणवो यासमिति । इत्यमरः.

२ ज्याला वाणी आणि मन जाणूं शकत नाहीं अशा आत्मा आहे; ह्मणून त्याला मौन ह्मणतात. हा जरी वाणीनें सांगतां येत नाहीं, व मनाच्या विचारांत येत नाहीं, तथापि अध्यात्मज्ञानी त्याला जाणून त्याचा साक्षात्कार करून घेतात. (पातञ्जल यो. शा. अ. सहजसमाधी, राजयोग.) ३ दृष्टि.

परतोनि नये । सांगों येतां बुडाली सये ॥ आतां० ॥ १ ॥ आनंदहीनें राहणें । हें वर्म ज्याचें तोचि जाणे ॥ आतां० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे पाहूं गेलों । गेलेपणही विसरलों ॥ आतां० ॥ ३ ॥

पद ४७ वें.

हें लाधलें सहज मौन्य । कीं शून्यामाजी गेलें शून्य ॥ ध्रु० ॥ जीव-शिवभेदाचें दैन्य । फिटोनि प्रकाशलें चैतन्य ॥ हें० ॥ १ ॥ निरालंब हें गगन । शेजे घातलें उन्मन ॥ हें लाध० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे केलें शयन । जेंथ न पावती नयन ॥ हे० ॥ ३ ॥

पद ४८ वें.

विहंगमें अवचटें उडाला । चंद्रमा सागरीं बुडाला ॥ ध्रु० ॥ जळाविण सिंधु देख तमासा । राहिला कैसा मासा । सवें चंद्रमा नेला ग्रासा ॥ १ ॥ अग्नि आमिषा लुब्ध होउनि पडला । मुंगिमुखीं मासा ॥ २ ॥ निजसुख गोडाला । मुंगि मिळाली उत्तर नये तोंडाला ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ही खूण उमगी । तोचि जाणावा योगी ॥ ४ ॥

पद ४९ वें.

तरि म्या कैसेनि हो पांगेंला ॥ध्रु०॥ बद्धतां मुक्तता ह्मणे हा कवण ? । पाहूं जंव गेलों, लागचि ना लागला ॥ तरि० ॥ १ ॥ आदिं पाहूं गेला,

---

१ "सत्यंज्ञानमनंतं" या श्रुतींत सांगितल्याप्रमाणें (आनंदरहित) पूर्णबोध स्वरूपानें राहणें (सत्यरूप, ज्ञानरूप, आणि अनंत या आत्मतत्वानुरूप) २ पक्षी (हंस) जीव. ३ या पदांतील खूण "केशव स्वामीच्या" ह्मणण्याप्रमाणें (योगियाची खूण योगी जाणती आपण) योग्यांनींच जाणावयाची आहे. ४ ओशाळगत, गरजू. ५ बद्धता किंवा मुक्तता असें मानणारा कोण ? तर "चिदाभास भ्रम" होय. त्याचें स्वरूप काय हें पाहूं गेलों तर त्याचा पत्ताच लागला नाहीं. या भ्रमाला कारण हेंच कीं, बुद्धि ह्मणजे काय ? चिदाभास कशाला ह्मणावें ? आत्म्याचें स्वरूप कोणतें ? आणि त्यामध्यें जग कसें झालें ? या प्रश्नाचा उलगडा न होणें तोच मोह; आणि यालाच संसार असें ह्मणतात. कर्तृत्वादि बुद्धि-धर्म आणि स्फुरणरूप आत्म्याचा धर्म हे दोन्ही त्याच्यामध्यें आहेत ह्मणून चिदा-भास हा भ्रम आहे.

अंतींहि विसरला । नाहींच उमगला ॥ तरि० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे आतां ज्ञान अज्ञान हें । न बोलतां उगा राहिलों चांगला ॥ तरि० ॥ ३ ॥

पद ५० वें.

सदोदित लागली उन्मनि ॥ ध्रु० ॥ [1]महाशून्य निरामय, निर्गुण निरंतर, राहिलें निरंजनीं ॥ सदो० ॥ १ ॥ त[2]प्तलोहें तेवीं, आत्मारामीं, हें जीवन मानें, गेलें कीं जिरोनी ॥ सदो० ॥ २ ॥ भ्रमरगुंफा सिंधु, सैंधव हे दिठी, गेलीच आतां नये कीं फिरोनी ॥ सदो० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणें आतां, चालतां बोलतां, कत्रणींच नाहीं अभिमानी ॥ सदो० ॥ ४ ॥

पद ५१ वें.

निजसुख सेवूंचि लागलों ॥ ध्रु० ॥ सेवितेंचि[3] सरे, [4]अपार तें उरे आपणेंचि भागलों ॥ निज० ॥ १ ॥ बैसतें [5]स्थान तें मा[6]नें विसरलों । तटस्थचि झालें, तेथचि कीं विरागलों ॥ निज० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे कवणें ठायीं हें । काय सेवियलें सांगूं ! नाहींच उमगलों ॥ निज० ॥ ३ ॥

पद ५२ वें.

नेणो हें काय ऐसें पडलें ॥ ध्रु० ॥ [7]नावाथिलें मन, शोधूं हें जातां । जातेनेंशीं दडलें ॥ नेणो ॥ १ ॥ आपणा मोडुनि, लंपट होउनी, । कवणाशीं हें जडलें ॥ नेणो० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे वाचा, कुंठानि अवचटे, [8]मौन्यचि मग पडलें ॥ नेणो० ॥ ३ ॥

---

१ सोऽहं ब्रह्म (चार शून्याहून पलीकडचें अणुरूप). २ तापलेलें लोखंड पाण्यांत बुडविलें असतां तें जसें पाणी आकर्षण करून घेतें, तद्वत् आत्मारामाच्या ठायीं जीवत्त्व आकर्षून नष्टप्राय झालें हा भाव.

३ मन. ४ चैतन्य. ५ मी कोणीएक आहें असा जो अभिमान तोच नाहींसा झाला. ६ प्रपंच (अश्वत्थ) वृक्ष. ७ मी अमूक ठिकाण धरून बसलों आहें या प्रकारचें अनुमान. ८ नामरूपानें " हें हें " अशा दर्शक सर्वनामांनीं नांवाजलेलें. ९ परिवारासह (इन्द्रियांसह) सध्यां असणाऱ्या व पुढें उत्पन्न होणाऱ्या वृद्धीसह गुप्त झालें.

पद ५३ वें.

सये ! मज लागली सहजसमाधि ॥ ध्रु ॥ पाहतां सखोलचि, रूप अलोलचि, बोलतां बोलची नये ॥ सये० ॥ १ ॥ शांत्यरविंद, आमोद सोऽहं मद, पूर्णप्रबोध सदये ॥ सये० ॥ २ ॥ मजमाजी माहेर, रम्य मनोहर, सुंदर मेरू निलये ॥ सये० ॥ ३ ॥ सज्जन रंजनीं, नित्य निरंजनीं, सोहिरा ह्मणे झाला लय ॥ सये० ॥ ४ ॥

पद ५४ वें.

गुरुजी ऑलेख निरंजन ॥ ध्रु० ॥ व्यक्ति ना वर्ण, तें ऐकोनि कर्णी। निवालें अंतःकरण ॥ गुरु० ॥ १ ॥ ज्याचिये द्येन, समाधिशयन। स्थिर झाले नयन ॥ गुरु० ॥ २ ॥ दिवस ना राती, तैल ना वाती। उजळली दीपज्योति ॥ गुरु० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे, आरंभ रंभःस्तंभ। विकासला निरालंब ॥ गुरु० ॥ ४ ॥

---

१ अपूर्व, चमत्कारिक. २ शांति हेंच कमल सोऽहं (आत्मा) हा सुगंधयुक्त मद. ३ मेरुशिखर (कूटस्थ आत्मा हेंच स्थान तिचें) हेंच आहे आश्रय स्थान जीचें. ४ ऑलिख किंवा अलख (अलक्ष्य) ही आदिनाथ सांप्रयांतील नाथपरंपरेंतील सांकेतिक खूण आहे. आदिनाथ सांप्रदायाचा प्रवर्तक मत्स्येंद्रनाथ, त्याचे शिष्य गोरखनाथ हेच सोहिरोबानाथांचे गुरु होत. ५ मैत्रायणब्राह्मणोपनिषद् प्र० ६ मं. २७ यांत सांगितलें आहे कीं "पर, अपर, निराकार ब्रह्माचें तेज ही शरिराची उष्णता होय आणि शरीर हें धृत होय (हें त्यावर ओतलें असून त्याच्या योगानें ब्रह्माची उष्णता जी एरवीं अदृश्य असते, ती उज्वलित होते.) मग ती आविर्भूत झाली असतां हृदयाकाशाच्या ठायीं राहते. नंतर (चित्ताच्या एकाग्रतेच्या योगानें) ते (उपासक) हृदयाकाश काढून टाकतात; त्यामुळें ती ज्योतिप्रमाणें अभिव्यक्त होते. त्या कारणास्तव उपासकांचें त्या ज्योतीशीं त्वरित ऐक्य घडतें. हा कोश हृदयाकाशमय, आनंदमय परमश्रेष्ठ (आलय) आश्रय स्थान. हा अग्नी व सूर्य यांचा तेजोरूप आहे. अर्थात् दिवस आणि रात्र हा कालनिदर्शक भेद तेथें नाहीं. ह्मणून नित्य, स्वयंप्रकाश आहे.

पद ५५ वें.

आरंभ रंभः(?)स्तंभ निरालंब स्वयंभचि झालों ॥ध्रु० ॥ मूळ आलें हाता पाहतां पाहातां, आंतचि निमालों । सोऽहं बीज, निज गुज, । बुझोनियां ठेलों ॥ आरंभ० ॥ १ ॥ संगचि सोडी, आत्मा आवडी, झाली हे जोडी । मनाच्या अनेक ओढी, अनेक मोडी, लागलि हे गोडी ॥ आरंभ० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे सये तन्मय, मुरलें उरलें चिन्मय, । आपणा गांठी, पडली मिठी, दिठी परतोनि नये ॥ आरंभ० ॥ ३ ॥

पद ५६ वें.

हरला काम, झालों आराम, जडला आत्माराम । विश्वाभ्र[2] व्योम, जें निजधाम, नाहीं रूपनाम ॥ ध्रु० ॥ त्रिवेणीसंगम, त्यावरि उगम, लाधला सुगम । झालों परागम, ना पुनरागम, उडाला विहंगम ॥ हरला० ॥ १ ॥ निज नरेंद्रा ज्ञानसमुद्रा, पिउनि अर्धचंद्रा । मध्यम छिद्रा, खेचरी मुद्रा, ही लागली सहज निद्रा ॥ हरला० ॥ २ ॥ दिसत नासत असत, म्यां असलाचि असें सत् । आदी ना अंत कैची घस्त, हाचि चित्सुखवन-वसंत ॥ हरला० ॥ ३ ॥ संसारचित्र, पुसोनी हे नेत्र, म्या झालों कीं स्वतंत्र । ना जन्मपत्र, तेथ कैचें गोत्र, नलगेचि दुसरा मंत्र ॥ हरला० ॥ ४ ॥ नलगे आराधन, लाधलें हें धन, ओळखिला चिद्घन । पवनहि गिवसोन, मुरालें हें मन, झालें कीं उन्मन ॥ हरला० ॥ ५ ॥ पूर्ण प्रबोध, आमोद समाध, हे लाधली अनादिसिद्ध । जो मूळकंद मुकुंद, स्वयें मज-माजी अद्वैतानंद ॥ हरला० ॥ ६ ॥ ना प्रतिबिंब, हाचि हा स्वयंभ,

१ समजणें, अनुभव घेणें. २ विश्व (जग) हेंच अभ्राकाश त्याचें व्योम (त्याला वेष्टून असणारें आकाश). ३ इडा, पिंगळा, सुषुम्ना यांचा जेथें संगम होतो, असें योगशास्त्रोक्त आज्ञाचक्र. त्या ठिकाणीं त्याचा मूळ उगम (ॐकार) तो पर+अगम्य= अगम्य असें परब्रह्म. ४ पुनः जन्मास येणें. ५ हंस जीव. ६ अद्वैतानंद हा जग-न्मिथ्यात्वचिंतनानें प्राप्त होतो (अद्वैतानंद एवस्याज्जगन्मिथ्यात्वचिंतया ॥ पंचदशी, चतुर्दश प्रकरण.)

विकासला निरालंब । आरंभ रंभःस्तंभ, पाहता आंतचि झालों गैब ॥ हरला० ॥ ७ ॥ सोहिरा म्हणे देहभानचि हरलें, चालणें बोलणें सरलें । तन्मय विरलें, चिन्मय मुरलें, काय नेणों हें उरलें ॥ हरला० ॥ ८ ॥

पद ५७ वें.

तो मी मिनलों आपुलिया उगमीं ॥ ध्रु० ॥ प्रपंच वाढे मोडे । परि मज विसर आपुला न पडे ॥ १ ॥ उठला भास पावे नाश । स्वरूप निराभास ॥ २ ॥ देहासि या जाणे, आपुली हे लीला ह्मणे । परि या संगें नाहीं येणें जाणें ॥ ३ ॥ घटमठीं अवकाश, तैसा जीव ईश्वर हा भास । तो गेलिया उरतें हें आकाश ॥ ४ ॥ अवस्थात्रया, टांकुनि माया । अंतीं जाय लया ॥ ५ ॥ न लावितां अग्न, अजीं काया केली भग्न । प्रकृति-पुरुषाचें हें लग्न, आंत सोहिरा झाला मग्न ॥ रे मन भुललें ॥ ६ ॥

पद ५८ वें.

नीज रे! लागली मज, केली हे चिन्मय सेज । उपमे अतीत तेज, हारपलें सोहं बीज ॥ ध्रु० ॥ जेथुनि जन्मली काया, पातलों त्या निज ठाया । त्यागिली लटिकी माया, मन गेलें विलया ॥ १ ॥ होउनिया तन्मय, ठेलें कीं हें निरामय । अगोचर सुख सये ! दिठी हें परतोनि नये ॥ २ ॥ राहिल्या सकळ गोष्टी, मिथ्याचि भासली सृष्टी । ओळखिली चिद्घनवृष्टि, मुळीं मावली दृष्टी ॥ ३ ॥ उल्हास चैतन्यसिंधु, उदेला अर्धेंदु । सेविला पूर्णबिंदु, झाला कीं हा आनंदु ॥ ४ ॥ कवणचिया प्रतिबिंबीं, पाहतां ना आरंभरंभःस्तंभीं । पावलों म्या अवलंबीं, स्थिरावलों निरालंबीं ॥ ५ ॥

---

१ जागृति, स्वप्न, सुषुप्ति. २ अग्निस्पर्शावांचून अजीं (अजनिर्विकार आत्म्याच्या ठायीं) देह (स्थूल देह) भग्न केलें. ३ आत्मा व मन यांचें ऐक्य होणें. ज्या वेळेस प्राण सुषुम्नामार्गानें वर जाऊन ब्रह्मचक्रांत लीन होतो, त्या वेळेस चित्ताचा सुद्धां लय होतो, ती जी समरसता (एकरूपता) त्यालाच समाधि ह्मणतात.

बोधचि हा त्रिशुद्धि, माझी मज नाहीं शुद्धि । विराली समूळ बुद्धि, सदोदीत समाधी ॥ ६ ॥ दिन नाहीं रजनी, तेथचि कीं रंजोनी । निर्गुण निरंजनीं, सहज हे उन्मनि ॥ ७ ॥ कासया हें बंधन, सोहिरा ह्मणे साधन। सांपडलें निज धन, झालें आतां समाधान ॥ ८ ॥

पद ५९ वें.

लागला निदिध्यास अविनाशसुखाचा ॥ ध्रु० ॥ निराकार निर्गुण निरंजन निरामयाचा ॥ लागला० ॥ १ ॥ धन्य हें मौन्य, महाशून्य चैतन्य अखंडिताचा ॥ लागला० ॥ २ ॥ ज्ञान निरवधि, सहज समाधी, सकळकळानिधीचा ॥ लागला० ॥ ३ ॥ कलिमलदहन, गहन मनमोहन, दयार्णवाचा ॥ लागला० ॥ ४ ॥ कायादंडन, नलगे मुंडन, नलगे रुको[2] हा सदा फुकाचा ॥ लागला० ॥ ५ ॥ निष्काम आराम, हा राम, कल्पद्रुमाचा ॥ लागला० ॥ ६ ॥ दुमदुमिलें[3] अंबर[4], स्थिरावली नजर, होता हे गजर, अनाहत[5] ध्वनींचा ॥ लागला० ॥ ७ ॥ ह्मणे सोहिरा दास. उद्रास, हा छंद सदा सच्चिदानंदाचा ॥ लागला० ॥ ८ ॥

पद ६० वें.

नीज लागली हे उन्मनि ॥ ध्रु० ॥ निष्काम हा राम आराम । ना भूमि ना व्योम अनाम निजधाम ॥ १ ॥ मना लागलें गोड सुख हेंचि अखंड । बुद्धि विरागली सये ना मागली ॥ २ ॥ झालें कीं समाधान अंतरींच मग्न । दृश्याहुनि निराळा झांक आली डोळां ॥ ३ ॥ स्वप्न ना

---

१ प्राण, मन, आणि वाणी यांची त्रिवार शुद्धि (निश्चयेंकरून त्रिवार खरें). २ पैसा [द्रव्य]. ३ दणाणून गेलें. ४ अंबर=महदाकाश (सहस्रदलचक्र) त्यांत होणारा मेघनाद. मेघनादानें जसें आकाश दुमदुमलें जातें तद्वत्. उपनिषदांत अनेक प्रकारचे नाद सांगितले आहेत. परंतु त्या सर्वांत मेघनादच श्रेष्ठ सांगितला आहे. कारण त्यापासून सच्चिदानंदप्राप्ति हें फल सांगितलें आहे. ५ अनाहत ह्मणजे नगारे वगैरे प्रमाणें ताडन केल्यावांचून आपोआप उत्पन्न होणारे जे ध्वनि ऐकूं येतात ते.

सुषुप्ति तूर्या ना जागृति । शून्याचिये बाजे चैतन्याचे सेजे ॥ ४ ॥ उदो नाहीं अस्त तेथ अजीं स्वस्थ । सोहिरा ह्मणे हें गुज समाधि सहज ॥ ५ ॥

पद ६१ वें.

लागलें मन हें गुरुच्या चरणीं ॥ ध्रु० ॥ टाकुनि अग्न पवन। गगन आपहि धरणीं ॥ लागलें० ॥ १ ॥ नाना कुंभीं हा प्रतीबिंबीं । एकचि तरगी ॥ लागलें० ॥ २ ॥ जो कां अनाम आत्माराम । आराम नामस्मरणीं ॥ लागलें० ॥ ३ ॥ आगमां निगमां न कळे ज्याची । अघटित हे करणी ॥ लागलें० ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे म्या पुनरपि । न पडें जन्ममरणीं ॥ लागलें० ॥ ५ ॥

पद ६२ वें.

मन हें आजी सच्चिदानंदें वेधलें । जन्मा येउनी परमसुख हें साधलें । अंतरीं मी हा कवण ऐसें शोधिलें । सहज ब्रह्मबोधें बोधलें ॥ ध्रु० ॥ संसारांतुनि सुटलें, मन हें आजी विषयभोगांसि विटलें । आपण सर्वांगेंशीं फुटलें, दृश्य लटिकें हें लिगाडे[1] तुटलें ॥ १ ॥ राहिली मीपणाची हे कळवळ, निवाली त्रिविधे[2] तापांची तळमळ । गेली संशयाचिही खळमळ, झालें निष्काम निःसंग निर्मळ ॥ २ ॥ संकल्पाचिये सावुले सोडुनि नग्न होउनी आत्मेशीं हे भग्न । नाहींपणा लागुनि गेलें लग्न, अनुभवसुखीं आंतचि झालें मग्न ॥ ३ ॥ आपुलिया उगमीं स्थिरावलें, निद्रासमाधिमाजी सामावलें । निश्चल निराळीं पूर्ण गोवलें, सायुज्य अविनाशपदा पावलें ॥ ४ ॥ पूजाविधिविधान पारुषलें[3], सकळ[4] कर्म विकर्मा-

---

१ चिकटून राहाणें. गुंतागुंती. २ आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक असे तीन प्रकारचे ताप. ३ बंद पडलें. ४ गीता अ० ३ यांत कर्म म्हणजे काय हें सांगितलें आहे. (श्लो० २७।२८) प्रकृतीचे जे गुण त्यांजकडून सर्व कर्मांची उत्पत्ति घडते. पण अहंपणानें ज्याची बुद्धि मूढ झाली आहे, तो आपणालाच कर्मांचा कर्ता मानतो. परंतु हे महाबाहो, गुण आणि कर्म यांच्या वांटणीचें खरें

कर्म लया गेलें । सिद्धिफल हें परिपक्वतेसि आलें, पापपुण्याविरहित होउनि ठेलें ॥ ५ ॥ कांहीं कल्पावेंचि सोडिलें, चळल्या देहाचें भान मोडलें। सगुणींच हें निर्गुण जोडलें, सोहिरा ह्मणे परमामृतसागरीं बुडालें ॥ ६ ॥

पद ६३ वें.

काय मी सांगूं सये वो! बोलतां नये वो! नवलाचा हा जोगी । मुखावीण कैसी वाजवी, गैबं गाजवी, ज्याची [१]अनाहत शिंगीं, संसारीं असोनि नाहीं हो, नीट पाहीं हो, ऐसा नित्य वैरागी ॥ नवळाचा हा जोगी ॥ ध्रु०॥

स्वरूप जाणणारा जो आहे, तो, गुणांची प्रवृत्ति इतर गुणांच्या ठायीं करवितो, ह्मणजे इंद्रियें विषयांकडे ओढ घेतात, आणि या व्यापाराचेंच नांव कर्म,–असें जाणतो, आणि कर्माच्या ठायीं आसक्ति ठेवित नाहीं. (सुबोधचंद्रिका टी.) कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः । अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ १७ ॥ कर्मही जाणलें पाहिजे, विकर्म ह्मणजे शास्त्रविरुद्ध कर्म कोणतें, हेंही जाणलें पाहिजे, आणि अकर्म कर्मापासून मुक्त राहणें तें कसें, हें ही जाणलें पाहिजे. कर्माचें ज्ञान फार गहन आहे. [गी. सु० च० टी० अ० ४] पुढें अठराव्या श्लोकांत सांगितले आहे कीं " सामान्य लोकांच्या मतें, कांहीं न करणें हें अकर्म असें जरी आहे, तरि या अकर्मामध्यें ही कर्म घडतें. हें जो जाणतो तो सर्व मनुष्यांमध्यें बुद्धिमान, तो सर्व कर्में आचरित असतांही योगी होय. [सु० चं. टी.]

१ वैश्वानर नांवाचा ध्वनि (कान झांकले असतां प्राण वायु आणि जठराग्नींतील होणारा ध्वनि ऐकूं येतो. सागराची गर्जना (गाज) जसी नेहमी चाललेली असते तद्वतच देहामध्यें ही गाज चालली असते.) २ अनाहत ध्वनि= [योगादि धारणेनें दश नादांचा ध्वनि ऐकूं येतो. त्यांचा उपक्रमः––१ छिन छिनीनाद–शांति प्राप्त होऊन मन स्थीर होतें. २ शिंगीनाद–एकाग्रता होऊन कवित्वशक्ति येते. ३ तंतांनाद–हा सारंगी सारमंडाळासारखा; यापासून संकल्प विकल्प हरतील. ४ तालनाद–अखंड ध्वनि चालतो, वाचा सिद्ध होते. ५ सुस्वर नाद–हा नाद पांवामुरलीप्रमाणें; यापासून, वर्तमान, भविष्यादि कळून येतलि. ६ गर्जनाद–(खर्जनाद) हा नाद सिंहगर्जनेसारखा; दूरदृष्टि होते. ७ शंखनाद. यापासून, चौदा विद्या येतील. ८ घोषनाद–हा वेदघोषा सारखा; सर्वांच्या अंतरींचें कळों येईल. ९ भेरीनाद–नगारा इत्यादिकांप्रमाणें. यापासून सर्व सिद्धि प्राप्त होतील. १० मेघनाद यापासून मन चिंतलेठायीं जाईल. (सच्चिदानंदप्राप्ति होईल) [ज्ञानदेवकृत अभंग]

टाकुनि त्रिविध त्रैगुणीं, लक्ष निर्गुणीं लावुनियां अखंड । नाशवंत ऐसें जाणुनि ध्यानीं आणुनि, त्यजीं पिंड ब्रह्मांड । मन पवन हलोकले नेत्र झांकले, काय बोलों उदंड ॥ नवलाचा० ॥ १ ॥ दुधामाजी घृत जैसें हो, रूप तैसें हो, मायेमाजी हा गुप्त । सर्वी सर्वत्र हा व्यापक, जगन्नायक, परमानंदें तृप्त । नाद बिंदु कला ज्योति, आंगि लावुनि विभूति, परमामृतें तृप्त ॥ नवलाचा० ॥ २ ॥ पटामाजी जैसा तंतु हो, आदिअंति हो, जैसा बीजीं वट । तैसा सकळ हा विस्तार, ज्याचा निरंतर, जैसा गगनीं घट । सोहिरा ह्मणे तो हा ऑाल्लेख; नाहीं रूपरेख, झाला मजमाजी प्रकट ॥ नवलाचा० ॥ ३ ॥

पद ६४ वें.

जन्मा आलियाचें काज हो ! । झालें आज हो ! सांपडलें हें मूळ । कोठिल कोण हें पाहतां, तेथ राहतां, जया याती ना कूळ । येणें जाणें नाहीं जयासि, जैसें गगनासी, वरि मायेचा खेळ । टाकुनि सकाळिक बोलणें, नित्य डोलणें, ब्रह्मानंदीं केवळ ॥ सांपडलें मूळ ॥ ध्रु० ॥ सर्वी सबाह्य हा व्यापक, सुखदायक, जया आदी ना अंत । देहीं असोनियां नाहीं हो, कळा पाहीं हो, ऐसा गैब अतीत । पाहणें परतोनि पहा हो, तेथ राहा हो, जो कां महा महंत । त्रिभुवनींचा राजा हो स्वामि माझा हो, भेटला भगवंत ॥ सांपडलें मूळ ॥ १ ॥ आतां करणें कांहीं नलगे पूजा हो, देव दुजा हो, कीं हें अनादिबीज । कळोनि आलें हें मनाला, नकळे जनाला, निरंजनीं रीझ । लागोनि गेला हा सत्य हो, हेंचि नित्य हो, निजीं लागली नीज । बाहेर आंत प्रकाश पडला, मोहांधःकार दडला, हा सहज ॥ सांपडलें मूळ ॥ २ ॥ उफराटा रोंक हा दृष्टीचा, नाश सृष्टीचा, झाला परम प्रकाश । चिदाकाशिंचा दिनमणि, ज्ञानकमळणी, झाला परम विकास । सिद्धांताचा सेवुनि चारा स्वच्छंद,

---

१ निर्बळ झाले क्षीण झाले. २ चैतन्य.

झाला आनंद, प्रपंच दिसला सद्गुरुकृपा या नाव हो ! महानुभव हो ! म्हणें सोहिरादास ॥ सांपडलें मूळ ॥ ३ ॥

पद ६५ वें.

आजी हा जीव ब्रह्मानंदीं रमला रे ! ॥ ध्रु ॥ संदेहीं न पडतां देहीं, पाहतां विदेही, मी हा गमला ॥ आजी० ॥ १ ॥ दिनमौन, नाहीं कीं दिव्यमान, तेजें अभिमान, सहज दमला ॥ आ० ॥ २ ॥ आंगीं चिन्हें उमटली कैशीं, कीं पुन्हा नये ऐशीं, गुन्हा सकळ खमला ॥ आ० ॥ ३ ॥ जैसे सतींप्रति कांपती, कीं जन भूपती, तैशीं इंद्रियें जपती, अमला ॥ आ० ॥ ४ ॥ म्हणे सोहिरा भूतीं कीं भरला, भरोनि उरला, जवळ दुरला, न कळे मला ॥ आजी० ॥ ५ ॥

पद ६६ वें

निजबोधें जाहला गर्क । जेथ नुरती हे चंद्रार्क ॥ ध्रु० ॥ पाहुं जातां चित्सुख सिंधु । सैंधव मानें बुडाला तर्क ॥ निज० ॥ १ ॥ सोहिरा-म्हणे एका एकीं । जाहला जाणिवेचा संपर्क ॥ निज० ॥ २ ॥

---

१ मी मी असें ह्मणणारा जो जीव त्यालाच ' मी देही नसून विदेही (देहरहित चैतन्य आत्मा अहंब्रह्मास्मि) आहें असें वाटलें. त्यांत कांहीं संदेह राहिला नाहीं असा भाव. २. दिवसाचें अनुमान करायाला कारण जो सूर्य तोही नाहीं, किंवा रात्रीचें तेज प्रकाशित करणारा दिव्यमान चंद्रही नाहीं तेजोमय विश्वरूप दर्शनाच्या योगानें, सर्व प्रकारचा अभिमान नाहींसा झाला [अनादिमध्यांतमनंतवीर्यमनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् । पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् ॥ १९ ॥ तुला आदी नाहीं, मध्य नाहीं, अंत नाहीं; तूं अनंतशक्ति, अनंतहस्त, चंद्र सूर्य हे तुझे नेत्र, तुझ्या मुखामध्यें अग्नि भडकत आहे, या सर्व विश्वाला तूं आपल्या तेजानें तापवित आहेस, असा तूं मला दिसतोस ॥ भगवद्गीता, सु० चं० टी० अ० ११] ३. अपराध (अनंत जन्मांचें संचित) खमला=माफ झाला. ४. कोणी सती जाऊं लागली ह्मणजे तिचा आशिर्वाद घेण्याविषयीं ' जन किंवा भूपती=राजा सुद्धां ' जपतात. व तिचा शाप होईल ह्मणून कांपत असतात, तद्वत अमल=मलरहीत जो आत्मा, त्याला इंद्रियें भितात व त्याचा कोप होईल ह्मणून जपतात. (कारण वाघेलो, गुजराथचा शेवटचा रजपूत राजा याचें चारित्र पहा. ह्मणजे सतीच्या शापाचें वगैरे सादृश्य कळेल.)

पद ६७ वें.

काय म्यां सांगों अगोचर । नवल ! तुझें हो ॥ ध्रु० ॥ पोकळ कर्ण, येथ नाहीं कोण । ऐकों येतें तें काय हो ॥ अगोचर० ॥ १ ॥ उगीच कीं बापुडी, दिसते हे चामडी । कठीण मृदु केंस निवडी हो ॥ अगोचर० ॥ २ ॥ श्वेत भंवतें काळें वरतें, । दिठीसि कैसें दिसतें हो ॥ अगोचर० ॥ ३ ॥ तेवींच जिव्हेस, दिसतें हें मांस । कवण घेतो रस हो ! ॥ अगो० ॥ ४ ॥ नासिकीं केवळ, दिसतो अनीळ, । कवण घे परिमळ हो ! ॥ अगोचर० ॥ ५ ॥ देह हें झालें, ऐसें कवणें देखिलें । शेवटीं कोठें गेलें हो ॥ अगोचर० ॥ ६ ॥ ययाचा कर्ता, न गावे धरितां येथ । तरि मरता, कोण हो ! ॥ अ० ॥ ७ ॥ सत्ता[२] समाधान, जडा ना ज्ञान । तरि कवणा

---

१. परमेश्वराच्या अगाध सत्तेचें अगोचर नवल काय सांगावें ! कान पोंकळ, तेथें ऐकूं येण्याचें प्रत्यक्ष कांहीं साधन दिसत नाहीं, परंतु शब्द ऐकूं येतो, व कान बंद केले असतां शरिरांत होणारा ध्वनि ऐकूं येतो, हें काय आश्चर्य आहे ? त्याच-प्रमाणें देहाचे वरवर मृदु असणारी चामडी बारीक मोठे केंस निवडते; आणि डोळ्यांमध्यें पहिल्यानें सभोंवार पांढरें बुबुळ असून त्यावर काळें बुबुळ आहे, असें असतां आंतून दिसतें कसें ? त्याचप्रमाणें इंद्रियांच्या पृथक् पृथक् क्रिया गुप्त रितीनें होत आहेत. हें काय नवल आहे ? काय चमत्कार सांगावा ! गर्भांत असणाऱ्या रेताला हात पाय डोकें असे नानाअंकुर फुटून शेवटीं तें चेतना पावतें, नंतर क्रमानें बाल, यौवन आणि वृद्ध या दशा मनुष्य अनुभवितो. आणि पाहणें ऐकणें वास घेणें इत्यादि क्रिया करून आला तसा जातो, यापेक्षां दुसरें गारूड तें कोणतें ? बरें हे देह झालें असें कोणीं पाहिलें (झालेपणाचा प्रत्यय कोणास आला) याचा कर्ता कोण आहे, तो न गावे (सांपडत नाही) ह्मणजे त्याला धरतां येत नाहीं; तर येथें प्रत्यक्ष मरता (मरण पावणारा) मेला जातो तो कोण. २ सत्तेचें स्वरूप समाधान ह्मणजे शांत आहे. सत्तेचा पहिला विकार आकाश, तें जसें सर्वत्र व्यापून आहे, परंतु त्याची हालचाल कांहींच दिसून येत नाहीं. आतां जडा ह्मणजे जड जी माया तिचें स्वरूप अज्ञान (ना+ज्ञान) हेंच आहे. कारण ज्ञान काळीं ती नष्टप्रायच आहे. ही माया तमोरूप (जड) आहे असें तापनीय उपनिषदांत सांगितलें आहे. या विषयीं अनुभूति प्रमाण आहे असें स्वतः श्रुतीच ह्मणते. " जडं मोहत्मकं तच्च " (तें मायारूप जड आणि मोहात्मक आहे.) असें श्रुति अनुभवास आणिते. यावरून घटादि पदार्थांचें (स्थूलदेह ह्मणजे रुधिर,

अज्ञान हो ! ॥ अगो० ॥ ८ ॥ सोहिरा म्हणे गेलें, मीपण नेलें । देह तरि चाले कैसा हो ॥ अगो० ॥ ९ ॥

पद ६८ वें.

चिन्मय मोतीं हें मज आलें ! देहभान गेलें [1] । सांग काय पां उरलें ? लयलक्षाचि मुरलें ॥ ध्रु० ॥ सांपडला हा अनुभव, हरले भावाभाव । आपोंचि गळाली हे माव, उजळला स्वयमेव ॥ देहभान० ॥ १ ॥ अवचटोंचि म्या निघालों, कोठें नेणों गेलों । पाहतां पाहतां निमालों, सहजींच सामावलों ॥ देहभान० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे हा सुखलाभ । मीनलाचि स्वयंभ । पराप्रमदा वल्लभ, स्वयंभारंभः स्तंभ ॥ देहभान० ॥ ३ ॥

पद ६९ वें.

निजरूपें तरि अनुभव सोपा ॥ ध्रु० ॥ कल्पना काजळी जेथ मावळे । नाहीं करी जयीं भवविक्षेपा ॥ निज० ॥ १ ॥ सर्वेही सोज्वळ, निजतत्त्व निर्मळ । कोण धरी मग पुण्यपापा ॥ निज० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे- ज्यांहीं हें सुख सेविलें । नाहींत तयां लागीं पुनरपि खेपा ॥ निज० ॥ ३ ॥

अस्थि, मांस इत्यादिकांनी बनलेलें जड शरीर अन्नमय कोश) जें स्वरूप तें जड आहे. असें जर आहे तर अज्ञानाचा प्रत्यय कोणास येतो ? जसें:–पदार्थ आहे हें पाहावयाला डोळा पाहिजे तसा तो नाहीं हें समजायाला ही डोळाच पाहिजे. याचें समाधान हेंच कीं, द्वैत मायाकल्पित असल्यामुळें तें मुळींच खोटें आहे. ह्मणून उरलेलें जें अद्वैत तेंच भासतें असें ह्मणावयाचें. घटादि पदार्थ जे आह्मास भासतात त्यांत ज्ञानरूपानें तें प्रत्यक्ष अनुभवास येतें.

१ अज्ञानकाळीं मी देह ही बुद्धि दृढ असते. पण तें देह (जड शरीर) गेलें त्याबरोबर मीपण ही (देहादिकांस अनुलक्षून मी मी असें ह्मणणें तें) नेलें (ह्मणजे नष्ट होतें); ज्या अर्थीं जड शरीर नाहींसें झाल्याबरोबर मीपणाचा प्रत्ययही नाहींसा होतो, त्या अर्थीं तें (विज्ञान) क्षणिक अर्थात् जडच आहे, ह्मणजे त्याच्यामध्यें "प्रज्ञान" दिसून येत नाहीं. प्रज्ञान ह्मणजे ज्या चैतन्याच्यायोगेंकरून हा जीव पाहतो, ऐकतो, वास घेतो, बोलतो व हें गोड, हें कडू असें रसनाद्वारें जाणतो त्यास "प्रज्ञान" असें ह्मटलें आहे. यावरून असें स्पष्ट होतें कीं, अस्तित्वकालीं " मी मी " ह्मणणारी जी अहंवृत्ति ती देह-

पद. ७० वें.

कल्योण केलें हो येणें ! त्याला केविं उत्तीर्ण होणें । सुफळ झालें हें जिणें, पुनरपि जन्माला या नाहीं येणें हो ॥ ध्रु० ॥ तीन्ही लोक चळती जेणें, प्रभव प्रलय तेणें । अविनाश दिधलें देणें, त्याचें रूप कैसें तें मी नेणें, हो । कल्याण० ॥ १ ॥ नित्य ज्याचें नाम घेणें, आतां कांहीं नाहीं उणें । दैन्यचि पळालें भेणें, लेइलें शांतीचें हें लेणें । कल्याण० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे मन वेणें, करूनि बोधाचें केणें । देह हें वाटलें पेणें, झालें ज्ञानगंगे न्हाणें ॥ कल्याण० ॥ ३ ॥

पद ७१ वें.

तरी अघटित हें घडलें । चित्त स्वरुपीं जडलें ॥ ध्रु० ॥ क्रोध शांति रूपें एक होउनी । व्याघ्र धेनुशीं जहीं सख्य पडलें ॥ तरि० ॥ १ ॥ ममता भास अदर्शीं मिळोनी । गरुड पिच्छांवरि व्याळ क्रिडले ॥ तरि० ॥ २ ॥ लोभ मतंगज पंचपंचाननीं । भेटोनि खेंव दिधलें ॥ तरि० ॥ ३ ॥ पूर्ण जळांमध्यें काष्ठ हुताशीं । पां! हें प्रज्वळलें ॥ तरि० ॥ ४ ॥ सोहिरा निजमहितळीं राहोनी । रवि चंद्र आकळिले ॥ तरि० ॥ ५ ॥

चालन व्हायाला कारणीभूत नव्हती, तर मग त्या वेळीं देह चालन होत होता कसा ? तो चालन व्हायाला अन्यच कांहीं कारण होतें असें सिद्ध होतें. जर आत्मा नाहीं म्हणता तर त्या गोष्टीचें निराकरण काय तें सांगा? हें या पदाचें रहस्य.

१. 'या पदाचा राग कानडा' असें जुन्या वहींत लिहिलें आहे. २. स्वर्ग, मृत्यु, पाताल किंवा भूर्लोक, भुवर्लोक, स्वर्लोक. ३ स्वच्छ निर्मल. ४ भांडार, सांठा, भांडवल. ५ थोडा वेळ प्रवासांत केलेला मुक्काम. ६ कूटस्थ आत्म्याच्या ठायीं. ७ लोभ हा माजलेला हत्ति आणि इतर कामक्रोधादि पांच किंवा पंचविषय मिळून सहा, पंच हे पंचमुख जो निर्विकार शिव त्याच्याठायीं. ८ आलिंगन दिलें. ९ चैतन्यजळामध्यें १० ज्ञानरूप अग्नानें (यथैधांसिसमिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन । ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥ भ० गी० अ० ४). ११ पिंडामध्यें राहूनच (भूलोकीं राहून).

पद ७२ वें.

सज्जन हा चुकलेला आला । दर्शनें परम हा जीव धाला ॥ ध्रु० ॥ येथेंचि असतां दिसला नाहीं । वसला देहीं न करी कांहीं ॥ सदैव त्याचा ध्यास वाहीं । विसविली नाहीं हे जपमाला ॥ सज्जन ० ॥ १ ॥ अंतरिं बाहेर प्रकाश पडला । मोहअंधार हा सहज दडला । विदेहपणें कीं जीवीं हा जडला । चिन्मय लावियली दीपमाळा ॥ सज्जन० ॥ २ ॥ ॥ प्रपंच दिसला उदास सारा । अवघ्यां चाळक एकचि वारा । सिद्धांताचा सेवुनि चारा । स्वच्छंदें आनंद जाहला ॥ सज्जन० ॥ ३ ॥ म्हणे सोहिरा चिद्घनाला । वर्षाव होतांचि पूर जाला । द्वैताचा हा फेर निमाला । एकचि झाला नदीनाला ॥ सज्जन० ॥ ४ ॥

पद ७३ वें.

कळतांचि हें चैतन्य । कां वाहावें दैन्य ॥ धृ० ॥ एकचि निश्चय, धरावें निजलय । नाहीं तयासी तें कांहीं न्यून ॥ १ ॥ प्रेमामृत, हें घेउनियां रत, । होउनि देखिजे सर्व शून्य ॥ कळतांचि० ॥ २ ॥ कोठें कांहीं पाहतां नाहीं । जाणोनि उगें मग द्यावें मौन्य ॥ कळतांचि० ॥ ३ ॥ सोहिरा निजनिधी, पूर्ण समाधि । लागुनी राहे तो येथें धन्य ॥ कळतांचि० ॥ ४ ॥

पद ७४ वें.

आगमैनिगमपदसार ॥ ध्रु० ॥ पाहे न पाहिलें, सेवी न सेविलें । जेथ वसे मनोहर ॥ आगम० ॥ १ ॥ प्रकाश प्रकाशक, नि‍ैच नवें कौतुक । होती तीन्ही लोक, एकाकार ॥ आ० ॥ २ ॥ तें सुख बोलतां, बोल अबोलता ।

---

१ चैतन्य मेघाचा वर्षाव होतांच पूर आल्यामुळें नदीनाला (ओहळ, लहान ओढा) हीं सर्वच जलमय होऊन गेल्याकारणानें ' ही नदी, हा नाला ' या प्रकारें जो द्वैतरूपी फरक (फेर) तो नाहींसा झाला. २ या पदाचा राग सारंग आहे असें लिहिलें आहे. ३ नित्य.

होउनि राहे सुंदर ॥ आगम० ॥३॥ शास्त्रसमूहेंशीं, [२]आभासादिक। पहुडे अमरें-गणांतर ॥ आ० ॥ ४ ॥ निजसुखरंगणीं, देख निठोर[३]पणीं । सोहिरा ह्मणे मिळुनि, असा सादर ॥ आगम० ॥ ५ ॥

पद ७५ वें.

जीवें[४]लग भेटला । जीवन प्रेमें आलंगिला ॥ध्रु०॥ अनादि[५] निजशक्तीशीं प्रवृ[६]त्तिसंगाला । लागुनि जो मुळींचा हारपला ॥ जीवलग० ॥ १ ॥ समदृष्टि अवलोकुनि, पहिले उत्पत्ति[७] गुण हारोनि । [८]पूर्णतत्त्वें ओळखिला ॥ जीवलग० ॥ २ ॥ [९]बाह्य नादाला सद्दुनि आला । ब्रह्मरंध्रस्थानीं श्रवला, अनाहत[१०] नादाला ॥ जीवलग० ॥ ३ ॥ त्रिविध तीन्ही अवस्था देखुनि । चौथे तूर्यपदासि येउनी । सेजे उन्मनि पहुडला ॥ जीवलग० ॥ ४ ॥ देहीं देहातीत होउनि, प्रवृत्तिनिवृत्तिला भावोनी । सोहिरा निज-क्ष्यासि आला ॥ जीवलग० ॥ ५ ॥

पद ७६ वें.

होतें! मीचि हारिलें निजधनें! चौथेली सांपडलें ॥ ध्रु० ॥ [१३]पहिलें निर्गुण निराकार, आलें व्यक्तिसी साकार । होतें अविद्येनें घेरिलें ॥ निजधन ॥ १ ॥ [१४]पंचविसांचे संघटीं, पंचविसा एकवटी । करोनि

१ चिदाभासयुक्त जिव. २ तेहतीस कोटी देवागणांचें अंतर (हृदय) त्यांत पहुडे. ह्मणजे देवगणांचा आत्मा होतो असा भाव. ३ निष्ठुरपणानें (भीतिरहित होऊन). ४ या पदाचा राग कानडा आहे असें लिहिलें आहे. ५ मूळमाया (मूलप्रकृति). ६ बहिर्मुख वृत्ति (जन्ममरणरूप संसार). ७ मनाचे तीन गुण (सत्व, रज, तम,) ८ पूर्णतत्त्वें (शुद्धसत्वबुद्धीनें). ९ वैश्वानर नांवाचा स्थूल शरिरांत होणारा ध्वनि. १० अनाहत नावांचा योगशास्त्रोक्त ब्रह्मरंध्रचक्रांत होणारा ध्वनि. ११ आत्मारामरूपी ठेवा. १२ तूर्या (ज्ञानशक्ति). १३ मुळांत तें निर्गुण निराकारच होतें तें साकार होऊन व्यक्तीला आलें (विश्वरूप झालें) पण त्याला अविद्येनें घेरलें होतें. १४ पंचवीस तत्त्वांच्या संघट्टणानें (पंचीकरणकृतीनें). तीं पंचवीस तत्वें अशीं:––आकाशादि पंचमहाभूतें व त्यांचीं शब्दस्पर्शादि पांच तन्मात्रें (विषय, सूक्ष्मरूपें) दहा इंद्रियें व (अंतःकरणाचा):––मन, बुद्धि, अहंकार

"तत्पदां" आणिलें ॥ निजधन० ॥ २ ॥ अभिन्नतेचे नयनीं, आपें आपणा देखोनी। आणुनी "त्वंपदीं" ठेविलें ॥ निजधन०॥३॥ तत्त्वें महत्तत्वीं ठेवुनी, ठेलें पांचैवेलागुनी । निरुतें "असि" पदीं ठेविलें ॥ निजधन० ॥ ४ ॥

आणि चित्त असा चार प्रकारचा भेद इतका हा चोवीस प्रकारचा सगुणब्रह्माचा संख्याविशेष भेद तत्वज्ञानी पुरुषांनीं सांगितला आहे, आणि काल हें पंचविसावें तत्व असें कोणी ह्मणतात. तो काल सृष्टी करणारा व संहार करणारा असा आहे.

१ या पंचवीस तत्वांच्या ऐक्यत्वानें तत्पदाला आणलें. तत्पद ह्मणजे:—जें ब्रह्म तमोगुणप्रधान मायेचा स्वीकार करून जगाचें विवर्तोपादान कारण झालें, व जें ब्रह्म शुद्धसत्वप्रधान मायेचा स्वीकार करून जगाचें निमित्तकारण बनलें, तें तत्पदानें दर्शविलें जातें. २ मीच ब्रह्म आहें (अहंब्रह्मास्मि) 'अहं' आणि 'ब्रह्म' या दोन पदांचे सामानाधिकरण्य करून जीवब्रह्माचें ऐक्य दर्शविणाऱ्या दृष्टीनें. ३ आपे (जीवानें) आपणच आपणा (पूर्वोक्त अहं शब्दाचा अर्थ असा आहे कीं, देश-कालवस्तुपरिच्छेदरहित परिपूर्ण असा परमात्मा तत्त्वज्ञानास अधिकारी अशा देहाच्याठायीं बुद्धीचा साक्षि होऊन जो प्रकाशत आहे त्यालाच अहं- असें ह्मटलें आहे. तोच आपण आहें असें) पाहून तें (निजधन) त्वंपदीं आणून ठेवलें. ४ त्वंपदाचा अर्थ असा आहे कीं:—पूर्वीं तत्पदानें दर्शविलें तेंच ब्रह्म जेव्हां मलिनसत्वप्रधान म्हणजे रजस्तममिश्रित व कामकर्मेंकरून दूषित अशा अविद्येचा स्वीकार करितें, तेव्हां तें त्वंपदानें दर्शविलें जातें. ५ पंचतत्वें. महत्तत्त्वीं ठेऊन [महत्तत्त्व ह्मणजे—' जें सर्व वेदामध्यें प्रसिद्ध निर्मळ, सत्वगुणात्मक व रागद्वेषादिरहित असें भगवत्प्राप्तीचें स्थान म्हटलें आहे, व ज्याला वासुदेव नांमक चित्त असेंही म्हणतात तें महत्तत्त्व होय. त्याला अधिभूतरूपानें महत्तत्त्व, अध्यात्मरूपानें चित्त आणि उपास्यरूपानें वासुदेव अशा संज्ञा आहेत. त्याचा अधिष्ठाता क्षेत्रज्ञ होय. हें महत्तत्त्व जशाचा तसाच राहणारा जगाचा पहिला अंकूर होय. [श्री मद्भागवत, तृ० स्कं० अ० २६]. ६ पांचवी अवस्था जी उन्मनि तेथें ठेलें. (प्राप्त झालें). ७ "निरुक्तें" असाही अन्य पाठ आहे. निरुतें म्हणजे यथार्थत्वेंकरून "असिपदीं" ठेविलें. [पूर्वी तत्, त्वम् अशा दोन पदांचें विवरण केलें आहे. आतां असि पदानें त्या दोहोंचे ऐक्य दाखविलें. "तत्त्वमसि" हें सामवेदापैकीं छांदोग्यश्रुतींतील महावाक्य आहे. त्याचा अर्थ असा आहे कीं:—" सदेव सौम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्" या श्रुतीनें सृष्टीच्या पूर्वीं जी स्वगतादि भेदशून्य नामरूपरहीत सद्वस्तु होती, ती आतांही तशीच आहे, असें दाखविण्यासाठीं येथें तत्पदाचा उपयोग केला, ह्मणून तत्प-

सोहिरा ॐकाराला ठावो, नाहीं ऐक्यापाशीं गांवो । सौख्य अनुपम्य जोडलें ॥ निजधन० ॥ ९ ॥

पद ७७ वें.

जग मग ठेंगणें! ठेंगणें । स्वरूपीं पूर्ण होणें ॥ ध्रु० ॥ अहं हें सोडुनी घेणें । सहज गतीचें ठाणें ॥ जग० ॥ १ ॥ कर्ता करविता तो

दाचा अर्थ तीच सद्वस्तु असें समजावें. आणि उपदेश श्रवण करणारा जो शिष्य त्याच्या देहेंद्रियांचा जो साक्षि ह्मणजे तीन्ही शरिरांस जो पाहणारा तोच येथें त्वंपदानें दाखविला. आणि " असि " ह्मणून जें क्रियापद या वाक्यांत आहे त्यानें " तत् " आणि " त्वम् " या दोन्ही पदांचें ऐक्य सांगितलें. याचा अनुभव मुमुक्षूनीं घ्यावा.

१ सोहिरोबांनीं येथें असें दर्शविलेलें आहे कीं, आपला ठिकाणा जर कोणास पाहिजे असेल, तर आपण ॐकाराच्याठायीं (ठावो) प्रविष्ट आहें. ऐक्यापाशीं (पूर्वोक्त तत् आणि त्वम्, याचें जें ऐक्य सांगितलें तेथें) गांव म्हणजे ठिकाण नाहीं; कारण तेथें सप्तभूमिकापैकीं सातवी केवळ शांत अशी उन्मनि अवस्था असल्यामुळें देशकालवस्तुपरिच्छेदरहित तें स्थान आहे. [य उपास्ते त्रिमात्रेण ब्रह्मलोके स नीयते । स एतस्माजीवघनात्परं पुरुषमीक्षते ॥ ४४ ॥ शैब्यप्रश्नांत असें सांगितलें आहे कीं, जो ॐकाराची उपासना करितो तो ब्रह्मलोकास जातो; तो समष्टिरूप उपाधीपासून मुक्त होऊन परमपुरुषाप्रत पावतो, म्हणजे ब्रह्म होतो. .[सार्थ पंचदशी, ध्यानदीप]. या पदांत असें दर्शविलें आहे कीं माझें निजधन बहूत जन्मापासून हारपलें होतें तें कर्मयोग आणि ज्ञानयोग यांच्या उपासनेनें (या पदांत सांगितल्याप्रमाणें तत्त्वें चालन करून) तें शोधून काढलें. पंचदशीकारांनीं, ध्यानदीपांत ह्मटलें आहे. ज्याप्रमाणें जमिनींत खोल पुरून ठेवलेला ठेवा मिळण्यास खणण्यावांचून दुसरा उपाय नाहीं, त्याप्रमाणें माझ्या स्वरुपाची (परमात्म स्वरुपाची) प्राप्ति व्हावी असें ज्याच्या मनांत असेल त्यानें आत्मध्यानच केलें पाहिजे. दुसरा उपाय नाहीं. येथें मी हाच कोणि एक ठेवा आहे. मी ह्मणजे परमात्मा त्याजवर बसविलेला देहरूप धोंडा काढून टांकून बुद्धिरूप कुदळीनें मनोभूमी पुन: पुन: खणली असतां आत्मठेवा मनुष्यास मिळेलच मिळेल. यथाऽगाधनिधेर्लब्धौ नोपायः खननं विना । मल्लाभेऽपि तथा स्वात्मचिंतां मुक्त्वा-न चापरः ॥ ५३ ॥ देहोपलमपाकृत्य बुद्धिकुद्दालकात्पुनः । खात्वा मनोभुवं भूयो गृह्णीयान्मां निधिं पुमान् ॥ ५४ ॥ पंचदशी, ध्यानदीप]

जाणे । घेई पर तत्त्वाचे खुणे ॥ जग० ॥ २ ॥ देहालागीं निराळें होणें । जीवनीं जैसें कमळ आलाणें ॥ जग० ॥ ३ ॥ पहा हें स्थूळ अस्थिर पेणें³ । जाणुनि ब्रह्मीं सदोदित असणें ॥ जग० ॥ ४ ॥ विकल्पविरहित असणें । सोहिरा ह्मणे अघटित घडणें ॥ जग० ॥ ५ ॥

पद ७८ वें.

निर्मुळें तें फळ सांपडलें वोजें ॥ ध्रु० ॥ टाळ तें मूळ कीं मूळ तें टाळ । या तरु लागीं अलग जें ॥ निर्मुळ० ॥ १ ॥ पाहतां ज्या फळीं अनेक फळें । एक एकांतही एक मुळीं जें ॥ निर्मुळ० ॥ २ ॥ चारी सहांसही शमदमादिकां । ना कळेचि निजवर्ण निरुज जें ॥ नि० ॥ ३ ॥ राजयोगादिकीं सेविलें आवडी । अमूल्य बहुत अनुपम्य जें ॥ निर्मुळ० ॥४॥ सोहिरा फलामृतें समृद्ध होउनी । दृढपणें निज दृष्टि धरी जें ॥ निर्मुळ० ॥ ५॥

पद ७९ वें.

पाहीं हो ! पायीं ! सहज गती चाले जो गोंसावी ॥ ध्रु० ॥ पाहतीं गृहस्थाश्रमी ऐसा भावी । स्त्रीसहं वंशवृद्धि बहुतें दावी । ज्याची गोष्टी

---

१ पृथक्पणानें वरवर तरंगलें जातें. २ स्थूल शरीर, जड शरीर. ३ प्रवासांत थोड्या वेळासाठीं केलेला मुक्काम. ४ देंठावांचून असणारें फळ (अव्यक्त) कैवल्यमोक्ष. ५ सुरस, मधूर. ६ वरून येणाऱ्या पारंब्याखालीं जमिनीस टेंकल्या म्हणजे पुन्हां मुळांत त्याचें बुंध बनतें. असा जो वट (अश्वत्थ) " उर्ध्वमूल मधःशाख " वृक्ष त्या वृक्षाहून जें अलग (पृथक्) आहे. ७ चार वेद, सहा शास्त्रें राजयोग, हठयोग. ८ आरोग्य देणारें (रुजा=रोग भवरोग त्यांतून मुक्त करणारें). ९ गोस्वामी (गो=इंद्रियें त्याचा धनी, स्वामी) कूटस्थ आत्मा (शिव) गोसावी ह्मणण्याचें कारणः–' ज्याचें स्वरूप म्हणजे शक्ति (देवी) होय. आणि त्या देवीवांचून अमूकच असा वेगळा नाहीं. म्हणून गोसावी असें म्हटलें [जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना येकोपजीवी । येकयेकाची ॥ १० ॥ जयादेवाचें रूप तेचि देवी । देवीविण अमूकसा नसे तो गोसावी ॥ अमृतानुभव, ज्ञानेश्वर.] १० देवी (शक्ती) सह [हा ठावोवरि वियोग भिडे । जें बाळ जगा एवढें । वियाली पण न मोडे । दादुलेपण ॥ ६ ॥ [वियोग येथ वरी होता झाला । कीं जगा ऐसा कार्य बाळ जन्मला । हा दोघांचा तिसरेपणा उमटला । परी मोडतीना दोन्ही] [अमृतानुभव, ज्ञानेश्वर].

असे त्याला ठावी । तोचि एक पूर्ण अनुभवी ॥ पाहीं हो० ॥ १ ॥ गृहधर्म करितां सकळहि त्यागी । विषयभोगीं असतां जो वीतरागी । पापपुण्याची चित्तीं नये विषार्गी । तोचि एक धन्य राजयोगी ॥ पाहीं० ॥ २ ॥ निजबोध हा सदैव हातीं दंड । धरोनि चाले शांतिपथीं चाड । चित्स्वरुपीं लावुनियां अखंड । ज्ञानवल्लीच्या कैफांसि वोसंड ॥ पाहीं० ॥३॥ देहालांगीं वेगळीक हेचि विभूति । लावुनि बैसे चहूं आसनाचे अंतीं । अंतररंगाची भगवीं पांघुरला तीं । प्रेमालयीं मस्तकीं जटा स्फुरती ॥ पाहीं० ॥ ४ ॥ चतुःष्पदेचे ध्यानीं जो निमग्न । तेथ झाला अवधूत अवघा नग्न । माझें मी हें स्मरण झालें भग्न । सोहिरा पूर्णालयीं झाला हो निर्विघ्न ॥ पाहीं० ५

पद ८० वें.

वेगळे नव्हती आत्मा जीवात्मा दोघे जण ॥ ध्रु० ॥ ठायिंच्या ठायींच जें कां आहे । तें कांहिं केलिया डळमळ नोहे । हें जो दीर्घदृष्टि करोनि पाहे । भिन्न भाव दाविती हे त्रिगूण ॥ वेगळे० ॥ १ ॥ पारंपर हें सहज

---

१ वोसंडणें–टाकणें अथवा सांडणें, भरून वाहणें, भरपूर होणें, २ सिद्धासन, पद्मासन, सिंहासन, व भद्रासन हीं चार, तशींच वीरासन व स्वस्तिकासन हीं दोन मिळून सहा आसनें मुख्य आहेत [पातञ्जल योगशास्त्राचा अभिप्राय. मुळांत सविस्तर पहा.] ३ उन्मनि अवस्थेचे (जागृति, स्वप्न, सुषुप्ति, आणि तूर्या असे चार पाद (पाय) आहेत जिला.) ४ अविनाशी असें जें ब्रह्म जें अमुक म्हणून सांगतां येत नाहीं; जें अव्यक्त, जें सर्वत्र भरून राहिलेलें, जें अचिंत्य, जें कूटस्थ म्हणजे माया, प्रपंचामध्यें असून स्थीर, जें अचल, जें ध्रुव म्हणजे नित्य आहे. [भ० गी० अ० श्लो० २।३।४ अवश्य पहा] ५ सत्त्व, रज, तम, हे तीन गुण. ६ परंपरेनें चालत आलेला पुरातन योग (हा श्रीकृष्णानीं अर्जुनास विश्वरूप दाखवून समजून दिली, त्याचप्रमाणें उद्धवासही ज्ञानोपदेश केला.) गीता अ० ४ येथें श्रीभगवान अर्जुनास म्हणाले “सर्वदा सफल असा हा योग मी विवस्वानाला सांगितला होता. [विवस्वानाचे दुसरें नांव सूर्य हा सूर्यवंशाचा मूळ पुरुष, विवस्वानाचा पुत्र मनु, मनूचा पुत्र इक्ष्वाकु] विवस्वनानें मनूला सांगितला, मनूनें इक्ष्वाकूला सांगितला. याप्रमाणें हा योग क्रमाक्रमानें येतां येतां सर्व राजर्षींना समजत गेला. पुढें तो दीर्घ कालामुळें नष्ट झाला; तोच हा पुरातन योग, तूं माझा भक्त आहेस ह्मणून, आज तुला मी सांगितला कां कीं हें उत्तम रहस्य आहे.” [गी० अ० ४ श्लो० १।२।३ पहा.]

सृष्टि भूतीं रचना हे आघवी ॥ मोठा आहे ऐसा जो लाघवी । धरोनि वर्ते संचित[3] क्रियमाण ॥ वेगळे० ॥ २ ॥ निर्गुण नोहे विषयरसीं आसक्त । सगुणयोगें इंद्रियमुखीं प्रविविक्त[4] । पाहती ज्यालागीं योगी नित्य मुक्त । मंदमती लाविति आरोपण ॥ वेगळे० ॥ ३ ॥ जे जे घटीं जैसा आहे धर्म । तेथें मिळोनि करी तो तो स्वधर्म । करोनि नाहीं ज्या लागीं बद्ध कर्म । मिथ्या भावी तें अज्ञान मीपण ॥ वेगळे० ॥ ४ ॥ पाहतां अंतरदृष्टि सोयें । सवें जीव हा ह्मणतो शिवपण लोहे । भिन्नपण कांहीं जेथ न साहे । सोहिरा बोले समरसेंशीं निज खूण ॥ वेगळे० ॥ ५ ॥

पद ८१ वें.

चिदानंदींचा ऐसा राजा[6] । सदोदीत भोगी निज[7] भाजा । काय वानूं मी त्याच्या साजा । पाहिं पाहिं तेथील नवल वोजा ॥ ध्रु० ॥ मन हारोनि झालें मनोहर । तेचि शोभती अति रहंवर । महिभ्रमणीं बोधें नित्य स्वार । पंच¶ तिसांसि[11] एक सरदार । चिदानंदीचा० ॥ १ ॥

---

१ पंच महाभूतांच्या ठायीं. २ गारुडी, चेटकी, मायावी (विश्वगारोडी) ३ सांख्यशास्त्रांत सांगितलेल्या सृष्ट्युत्पत्यादि कर्मांचे सिद्धीला अवश्य लागणाऱ्या पांच कारणांपैकीं पांचवें कारण जें दैव (प्रारब्ध) त्याचे भेद—संचित=पूर्वजन्मांपासुन सांचत आलेलें कर्म, आणि क्रियमाण=सांप्रतकाळीं (प्रस्तुत जन्मांत) घडणारें. ४ प्रविविक्त=सूक्ष्म अथवा लिंगदेहांतील, भोग. (गुप्त भोग)—'स्थूल देहांत, स्थूल भोग; सूक्ष्म देहांत, प्रविविक्त; कारणदेहांत आनंदभोग; व महाकारणदेहांत, आनंदावभासभोग. याप्रमाणें आहेत. ५ दोषारोप. ६ अविद्येमध्यें प्रतिबिंबित जो चिदात्मा (प्राज्ञ किंवा स्थितप्रज्ञ). ७ प्रज्ञा (बुद्धि,). ८ आश्चर्यकारक. ९ अश्व (मनोहर अश्व). १० नित्यमहि (पृथ्वी) तळांवर भ्रमण करण्यासाठीं " बोध राजाची (मनोहर अश्वारूढ होऊन) स्वारी निघते असा भाव. ११ पांच आणि तीस मिळून छत्तीस (?) तत्वांचें जे (क्षेत्र=स्थान) त्यावर हा (बोधराजा) मुख्य सरदार आहे. वर जी निजभाजा सांगितली तीच छत्तीस तत्वांनीं युक्त आहे. [छत्तिसां सदतिसावें । चोविसां पंचविसावें । तीन्ही नुरोनि स्वभावें । चतुर्थ जें ॥ ज्ञानेश्वरी अ० १४].

¶ "विसांसि" असा पाठ असावा ह्मणजे पंचवीस तत्वांची बेरीज जमेल, नाहीं तर पस्तीस तत्वें बेरीज होते, ती चूक आहे.

अें निज सांडुनी निज सोऽहं बीज । तेंचि डुलती महा मतंगज । कामधेनु दुभे दिवस सांज । रवी आगळा तेथ तेजःपुंज । चिदानंदींचा० ॥२॥ ज्याच्या मंदिरा चौंन्ही दरवाजे । चोपदार चौंन्ही उभे ठेले जे । शब्द निःशब्दीं मंत्रीं बैसला जे । अनाहंत भेरी नित्य वाजे । चिदानंदींचा० ॥३॥ उन्मनीचें सतत ज्यासी स्थान । तेथ हारपलें देहभान । तेथ सहज निजीं निजोन । सोहिरा झालाचि तेथ लीन चि० ॥ ४ ॥

पद ८२ वें.

सद्गुरुकृपावृष्टि उघडे दृष्टि ॥ ध्रु० ॥ नित्य अनित्य पाहोनी । ज्यांहीं निजस्वरुपीं लय लावोनी । दिधली अवभासोंसी पृष्टी । सद्गुरु० ॥ १ ॥ भवभ्रमासी हेळोनी[१०] । सवें निज उगमासी मेळोनि । हरिली जीवदशेची गोष्टी । सद्गुरु० ॥ २ ॥ ज्याचेनि निज हरिखें । सोहिरा जीव शिव हे नोळखे । ज्याला तूर्यपद समेष्टी[१२] ॥ सद्गुरु ० ॥ ३ ॥

पद ८३ वें.

याहुनि काय तें बोलणें । आनंदें डोलणें ॥ ध्रु० ॥ प्रेमभरें मन भरलें । चैतन्यहेम नगीं आभरलें ॥ या० ॥ १ ॥ असोनियां तरि जनीं । वस्ति केली निरंजनीं[१३] ॥ जा० ॥ २ ॥ सोहिरा पारंपरं[१४] हें सांगे । दिसति तितुकीं मायीसोंगें[१५] ॥ या० ॥ ३ ॥

---

१ जीव संबंधीं (कोहं) जडजात. २ मी ब्रह्म आहें (असें बीजरूप चैतन्य) तेंच महा (महामोहादि) मोठे मत्त झालेले गज ज्या गजशाळेंत डुलत आहेत. ३ सत्रावी संजीवनी. ४ चार वेद. ५ अग्नि, वायु, आदित्य व अंगिरस. ६ नादरूपस्थानीं मंत्री (ॐकार). ७ अनाहत नांवाचा ध्वनि (नगारे, चौघडा इत्यादिकप्रमाणें होणारा). ८ नित्य (आत्मा) अनित्य (माया). ९ मिथ्याभास (मृगजळाप्रमाणें होणारा प्रपंचाभास) त्याकडे पाठ केली असा भाव. १० उपेक्षा करून. ११ मूळ उत्पत्तिस्थानाला. १२ सर्वत्र व्यापून असणारें. (सर्व कारण शरिराचा अभिमान बाळगणारा जो आत्मा ईश्वर तो समष्टि आहे) आत्मतत्व. (त्याची, महाकारण देहांतील अवस्था तूर्या होय.) १३ मायारहित स्वयमेव ज्ञानस्वरुपी परमात्म्याचेठायीं. १४ परंपरागत मूळपुरुषापासून चालत आलेल्या योगाचें रहस्य. १५ त्या योगावांचून इतर सर्व सोंगें जेवढीं प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येतात तीं मायेचीं आहेत.

पद ८४ वें.

ज्ञानसिंधुशिरोमणि! नकळे कवणा ज्याची करणी ॥ ध्रु० ॥ धुंदांधःकार[1] दाटे। मग तें रूपें[2] दिसे गोमटें। केलीं जीवपणाचीं लेणीं[3] ॥ ज्ञान० ॥ १ ॥ लेणीं विभूषित शोभे भुषिला। योगी जाणती निज तुरीय[4] वहिला। योगें तूर्यपदाचे मिळणीं ॥ ज्ञान० ॥ २ ॥ मिळणी होता जाणपणाला। ज्ञाता नाहीं ऐसा झाला। न दिसे ज्योतिरूपाशीं तुळणी ॥ ज्ञान० ॥ ३ ॥ सोहिरा बोलणें बोलों गेला। सगुण[5] देशीं रावो निमाला। न दिसे मागें पुढें कोण्ही ॥ ज्ञान० ॥ ४ ॥

पद ८५ वें.

निजींवीण नीज! नये सये वो! मज ॥ ध्रु० ॥ नयना अलक्ष्य जें। वाचे अमुख तें। तेथ परतोनि मी नये ॥ सये वो० ॥ १ ॥ परेचे उपरिये, पाळखीं[6] पहुडंये। सहजचि घेई आल्हये ॥ सये वो० ॥ २ ॥ तेथ चौवी[9] जणी, गाती निगमपणीं[10]। तें सुख तयांसि भूल! ये ॥ सये वो० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे, मग तें सुख पावणें। चुकवणें हा भवनिरय ॥ सये वो० ॥ ४ ॥

पद ८६ वें.

निजसदनीं[11] धरिं धीर ॥ ध्रु० ॥ भवें[12] मेरू हा पृथ्वी उलथिल। त्रिकुटीं[13]

---

१ धुंद+अंधःकार=निबिड तम. २ त्या अंधःकारामध्यें तेजोमय अनंत अशा पुरुषाचें (विश्वरूप). ३ त्या मूळ आत्मरूप सुवर्णाचेच जीवरूपानें अनेक अलकार बनले गेले. ४ तूर्यावस्थेचा धारणकर्ता. ५ सगुण देशाचा राजा (चिदात्मा). ६ पाळण्यामध्यें. ७ निजलेला (सगुण बाळ). ८ पाळण्यास झोंके देतेवेळीं बायका 'आल्हये' असा शब्दघोष उच्चारित असतात. ९ चार वाचा परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी. १० वेदघोषानें. ११ निजसदनीं=आत्म्याचें वास्तव्य स्थान जी बुद्धिरूप गुहा तेथें धैर्यानें राहा. [शनैः शनैरुपेरमद्बुद्ध्या धृतिगृहीतया। आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥ २५ ॥ धैर्याच्या साधनानें बुद्धीला आपल्या स्वाधीन ठेवून, हळुहळु विषयांपासून मागें सरावें, उत्तम रितीनें मनाला आपल्याठायीं निश्चळ करावें, आणि त्यामध्यें कांहीं कल्पना न आणतां स्थीर रहावें ॥ भ० द्वी० सुबोध चं. टी. अ० ६] १२ कामक्रोधादिकांना उत्पन्न करणारा जो रजोगुण तोच भव (संसाररूप मेरू=आधारभूत पर्वत). १३ स्थूलदेहांत (विराट स्थूलदेह).

राहुनि स्थीर ॥ निज० ॥ १ ॥ विषय कोरान्न हें न मिळे तरि । सेवुनि गंगेचें नीर ॥ निज० ॥ २ ॥ रवि चंद्रावीण अंधत्व भासेल । गोल्हाटीं[1] पेटवीं वैश्वानरें[2] ॥ निज० ॥ ३ ॥ शोकमोहाचा पडे पर्जन्य । प्रेरुनी ज्ञान-समीर ॥ निज० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे अभय[3] ओपितां । होसिल व्योमीं[4] गंभीर ॥ निज० ॥ ५ ॥

पद ८७ वें.

सहस्रदळ कमळ हें सुंदर । आत्मा बैसे निज आमोदीं मधुकर । जीव शिव हे करोनि दोन्ही अधर । सेवी सत्रावीचे पयोधर ॥ १ ॥ परमानंदें आनंदति योगी । सज्ञानिये[6] विज्ञानाचे[7] भोगी ॥ ध्रु० ॥ जन्ममृत्याची चुकली येराजारी । विनटलें जें श्रीगुरुपद निर्धारीं । परमपद हें जाहलें ज्या साहाकारी । एकाएकीं पावलें निराकारीं ॥ परमानंदे० ॥ २ ॥ मन हें हारोनि झालें मनोहर । भ्रमरगुंफे घेतला पाहुणेर । त्यातीत ज्याचें निज-मुरलीचें माहेर । सोहिरा म्हणे भावोनि हरिहर ॥ परमानंदें० ॥ ३ ॥

पद ८८ वें.

शामसुंदर मुरलीधर ॥ ध्रु० ॥ जीव शिव एकाकार । देखोनि स्वरूप नार । चुंबन देती दोन्ही अधर । शाम सुंदर० ॥ १ ॥ योगियां सत्रांवी ते तत्त्वता । भावोनियां माता । जीवविती नित्य पयोधर । शाम सुंदर० ॥ २ ॥

---

१ कारणदेहांत २ वैश्वानर नांवाचा अग्नि. ३ साक्षात्कार होऊन हृदयस्थ भगवंतानें अभय दिल्यावर. ४ आकाशांत. ५ शांत स्वरूप. ६ आत्मवेत्ते. ७ विज्ञान. मय कोश हा बुद्धीचा बनलेला असतो, अशा उत्कृष्ट कोशाच्याठायीं निर्दोष शुद्ध ब्रह्म असतें तें आत्मवेत्ते जाणतात; [मुडकोप नि. मु० २ खं० २ मं० ९ पहा]. ८ या पदाचा राग 'असावरी' आहे. ९ प्रकृतिरूप (शक्ति) हीच नार=स्त्री (पक्षीं वेणु, मुरली) जीव आणि शिव हे दोन अधर (ओंठ) मुरली तोंडांत धरून दोन्हीं ओंठांनीं चुंबन दिल्याविना आंतून ध्वनि (स्वर) उत्पन्न होणार नाहीं. १० तीच योगियांची सत्रावी (कामधेनु, योगियांस स्तनपानें करून जीववि-णारी माता.) [या कारणें मी पिता । महद्ब्रह्म हे माता । अपत्य पांडुसुता । जगडंबर ॥ १७ ॥ ज्ञानेश्वरी अ० १४].

भवार्क हा तप्त वेळां । निववितो ज्ञान जळधर । श्री सद्गुरु जप निर्धार । शामसुंदर० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे निजीं । निज सुखाऽमृत । स्मरे ज्यासी शशिधर ॥ शाम सुंदर० ॥ ४ ॥

पद ८९ वें.

अधःशून्य उर्ध्वशून्य, त्रिशून्य चौंशून्या । भेदोनि महाशून्यीं गेला ॥ १ ॥ दोरांवेगळा बांधोनियां, जेथ । इंद्रियांचा धणी(फणी?) हा धरोनियां न्हेला ॥ २ ॥ त्रिकुट श्रीहार गोल्हाटीं पैठ, औटपीठ । टाकुनी भ्रमरगुंफे आला ॥ ३ ॥ वैखरी रोधोनि, मध्यमा भेदोनी, पश्यंति सोडोनी । परेनें वरियला ॥ ४ ॥ सोहिरा निःशब्दसुखें सुखावोनी । सत्राविच्या स्तनपानीं गुंतला ॥ ५ ॥

पद ९० वें.

उमज देशिवें द्वार । निरंतर नांदे सत्रावी नार ॥ ध्रु० ॥ नादाचा नाद । जहीं निजसुखस्वाद । सुषुम्नेवरी होय अनाहत गजर । उमज० ॥ १ ॥ इडा, पिंगळा, प्राण रोधुनी सेवीं । अखंडित वाहे आकाशीं नीर । उमज०

---

१ अधःशून्य म्हणजे अकार. उर्ध्वशून्य=मकार–त्रिशून्य=उकार. (प्राण आणि अपान हे दोन जेथें मावळतात तें त्रिशून्य) चौं (चार्थे)=ॐकार (चैतन्य). २ सोहं ब्रह्म. ३ सत्व, रज, तम ह्या दोरां विरहित. ४ इंद्रियांचा राजा मन. ५ अनक्रमें=स्थूल, सूक्ष्म, कारण देहांत पैठ (प्रविष्ट) होऊन. ६ महाकारण देह. ७ योगशास्त्रोक्त सहस्रदल चक्रांतील ब्रह्मरंध्रस्थान (तालु). ८ अनुक्रमें चार वाचा. ९ नादातीत नाद= Voice of silence. १० ब्रह्मरंध्र. ११ ज्ञानकला (नार=स्त्री, प्रकृति, शक्ति). १२ सुषुम्नानामक नाडी ब्रह्मरंध्रांत मिळते तेथें. १३ अनाहत नांवाचा ध्वनि. १४ यांत "केवल कुंभक" नांवाच्या प्राणायामाचें लक्षण सांगितलें आहे. हा प्राणायाम सिद्ध झाला असतां, सूर्यचंद्राला धारण करणाऱ्या रात्रंदिवसाचा अभाव झाल्यामुळें "सुषुम्ना" कालभोक्त्री (काळाला भक्षण करणारी) होते. अर्थात् प्राणाचा सुद्धां सुषुम्नाद्वारांत (वरील पदांतील "ककार खिडकी") प्रवेश होतो; व ज्यामुळें उन्मनि अवस्था सहज प्राप्त होते. म्हणून हा केवळकुंभक प्राणायाम दुसऱ्यांपेक्षां श्रेष्ठ आहे. त्यांतील अनुष्ठानाचा प्रकार या पदांत "इडा, पिंगला" या शब्दांनीं गुप्तार्थीनें दर्शविला आहे. "इडा जी डाव्या नाकपुडीकडे आहे, तिनें सोळा मात्रांपर्यंत प्राणाचा पूरक करावा; चौसष्ट मात्रांपर्यंत त्याचा पोटांत कुंभक करावा; आणि बत्तीस मात्रांपर्यंत, उजव्या नागपुडींत राहिलेल्या "पिंगला" नाडीच्या वाटे रेचक करावा. इत्यादि. [पातञ्जलयोगशास्त्राचा अभिप्राय–साधनपाद=प्राणायामविवरण पहा.]

॥ २ ॥ ककार खिडकी उघडुनी, नाद बिंदु भेदोनी । सुखेंचि सुख हें भोगीं, उन्मनि अरुवार । उमज० ॥ ३ ॥ अहं सोहं सकट, भरोनियां घोंट। आपेआप निघोट निजींच निर्भर । उमज० ॥ ४ ॥ सोहिरादास म्हणे, स्त्री पुरुष नपूंसक । विना चौथें देख हें निराकार । उमज० ॥ ५ ॥

पद ९१ वें.

ब्रह्मबोधें हें भुललें मन ! कोठें नेणों गेलें ॥ ध्रु० ॥ देखोनियां चिन्मात्र चित्, मग तन्मय होउनि ठेलें ॥ ब्रह्मबोधें० ॥ १ ॥ माझें मीच हें नाठवे, देहभान विसरलें । ब्रह्मबोधें० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे चित्सिंधुगाजी, सैंधवमानें कीं विरालें । ब्रह्म० ॥ ३ ॥

पद ९२ वें.

परब्रह्मचि आघवें । सुखें सुखचि हें भोगावें ॥ ध्रु० ॥ जेथें आहे तेंचि आहे । म्हणों नये होयें नोहे । सर्वं मीपण हें त्यागावें ॥ परब्रह्म० ॥ १ ॥ उगें होइल तें तें पहावें । सोऽहंबीजें हें जपावें । नित्य स्वानुभूतिचिया

---

१ परब्रह्म. २ सागरांत मीठ विरतें त्याप्रमाणें (चिद्रूप सागर व मन हें मीठ). ३ वास्तविकपणें संकल्पाचा न्यास केला असतां, जीव ब्रह्मच आहे. म्हणजे देहेंद्रियादि युक्त जो चिदाभास (जीव) त्याला अधिष्ठान जो कूटस्थ, तो आहे तेंच आहे. शैवपुराणांत असें म्हटलें आहे कीं; "हा कूटस्थ सर्वकाळीं सारखा आहे. मनाच्या वृत्ती असतांना तो त्या वृत्तींचा साक्षि होऊन असतो. वृत्ती उत्पन्न होण्यापूर्वीं त्यांच्या प्रागभावाचा साक्षि होऊन असतो. मुमुक्षुदशेंत जिज्ञासेचा साक्षि होऊन राहतो. तो साक्षि सच्चिदानंदरूप आहे. [जैसा किडाळा दोष जाय । तरि पंधरें तेंचि होय । तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं ॥ १ ॥ तैसा देहाकार नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला । आधींचि आहे ॥ २ ॥ ज्ञानेश्वरी अ० ६]. ४ जो संन्यासी आहे त्यानें "नारायण" नामावांचून 'होय किंवा नको' याप्रकारचें दुसरें कांहीं बोलूं नये असें आहे; पण त्याःबरोबर मीपण (अहंकार) टाकलें पाहिजे. अर्थात् वरंवर वेषधारी संन्यास उपयोगीं नाहीं. खरा संन्यास झाल्यानें त्याला अवघें परब्रह्मच आहे. [ऐकें संन्यासी तोचि योगी । ऐशी एकवाक्यतेची जगीं । गुढी उभविली अनेगीं ! शास्त्रांतरीं ॥ १ ॥ जेथ संन्यासिला संकल्प तुटे । तेथचि योगाचें सार भेटे । ऐसें हें अनुभवाचेनि घटे । साचें जया ॥ २ ॥ ज्ञानेश्वरी अ० ६]. ५ ॐ हें एकाक्षर ब्रह्म. ६ साक्षात्कारामुळें प्राप्त होणारा आत्मानुभव (आत्मबोध.)

गावें ॥ परब्रह्म० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे, भावोनि देव । तेथ कांहींच न मागावें ॥ परब्रह्म० ॥ ३ ॥

पद ९३ वें.

ब्रह्मबोधें गुल्ल* झालें । मन उन्मनीं रिझालें ॥ ध्रु० ॥ ज्ञानाऽनळें[1] भव इंधनें[2] । पोळुनि ज्ञेयांचि[3] हें विझालें ॥ ब्रह्म० ॥ १ ॥ द्वैतोऽद्वैत[4] हें खंडुनी । महीं अद्वैतीं बुझालें ॥ ब्रह्म बोधें० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे चिन्मात्र हें । मग तन्मय होउनि ठेलें ॥ ब्रह्म० ॥ ३ ॥

पद ९४ वें.

आदि नाहीं अंत ! तोचि आपुला सिद्धांत ॥ ध्रु० ॥ पाहतें पाहणें जेंथ विसाव्या आलें । उन्मनीं रिघालें मन कीं हें ॥ १ ॥ आकाशाचा डोळा, चिन्मय सर्वांगचि झाला । मजमाजी देखिला नाहीं कोणी ॥ २ ॥ मीचि मजला नुरें जागा, दुजा उरे तेथ कें गा । सोहिरा म्हणे हें सहज, निजवर्म बुझों कीं गा ॥ ३ ॥

पद ९५ वें. (जोहार)

जोहार माय बाप जोहार । सारासार सांगतों विचार ॥ ध्रु० ॥ कवणाचा कोण हा कोठिल जाणोनियां नेणा ! कीं जी । जाणिवेशीं नेणपण लया गेलें निज निजीं ! कीं जी ॥ १ ॥ सत्ता जेथ हरपली, माध्यांन्हीं जैसी सावुली । मन बुद्धि हे ठकली नसोनि ! कीं जी ॥ २ ॥ नाहीं माय नाहीं बाप नाहीं रेख नाहीं रूप । रूपाचा हा स्वयंदीप लावितां लाविला निश्चळ उमजोनि

१ ज्ञानाग्नीनें. २ भव (प्रपंच) हेंच काष्ठ. ३ जाणण्यास योग्य (विषय). ४ द्वैत+अद्वैत=द्वैत म्हणजे जीव आणि ईश हे वेगवेगळे आहेत असें मानणें. अद्वैत=ते भिन्न भिन्न नसून एकच आहेत असें मानणें. ५ तिसरें परब्रह्माचें ठिकाणीं (केवळ अद्वैत चैतन्य). ६ सूर्य [चन्द्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत ॥ पुरुषसूक्त]. ७ माध्यान्हकाळीं सूर्य बरोबर मस्तकावर आला असतां आपली सावली आजूबाजूस पडत नाहीं म्हणजे तिचा अभावच होतो.

* गुंग झालें १ तन्मय.

कीं जी ॥ ३ ॥ सेखीचें सुख, हारपे जेथ नाम रूपाचा चळथे । निरालंबीं पहुडे नाथ, अरुवार उन्मनि शेजीं ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे धरोनि सोडा, कल्पनेचा करोनि घोडा । धांव घ्या महाशून्यामाजी ! कीं जी ॥ ५ ॥

पद ९६ वें.

परा प्रेम गुमानें ॥ ध्रु० ॥ आकळ ना कळे आगमें अगोचर । मना वाचे दिठी अनुमान ॥ परा० ॥ १ ॥ सच्चिदानंद पद अव्यय । आंगिंचेचि हें महिमान ॥ परा० ॥ २ ॥ निराकार निर्विकार जेथ नाहीं दिनमान ॥ परा० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मग सर्व भूतिं । पहा हेंचि समान ॥ परा० ॥ ४ ॥

पद ९७ वें.

सहज निद्रा आपेंचि मज लागली ॥ ध्रु० ॥ उलटा योग खेचरिमुद्रा । लागोनि विरागली ॥ सहज० ॥ १ ॥ पुढील हे योजना मुळींच मोडली । आठवण नुरे मागली ॥ सहज० ॥ २ ॥ नारि पुरुषावीण कवण हें नेणों । निजोनियां जागली ॥ सहज० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे सोऽहं रवी अगस्ती । न्हेली मी हेरें सावुली ॥ सहज० ॥ ४ ॥

पद ९८ वें.

उन्मनी नीज सहजेंचि मज लागली ॥ ध्रु० ॥ चिन्मयें धालें, पुढील विसरलें । आठवण नुरे मागली ॥ उन्म० ॥ १ ॥ ब्रह्मबोधें आपेंचि हे । चित्तवृत्ति विरागली । उन्मनी० ॥ २ ॥ तन्मय दीपिका लावोनियां ।

---

१ शेवटचें. २ चाळाचाळ. ३ सुंदर, मृदु. ४ गुप्त गुह्य (एकांत). ५ वेदानां. ६ प्रत्यहार (कपिमार्ग). ७ वैराग्ययुक्त झाली, विराली. ८ [जेथ पुढील पैसे पारुखे । मागील स्मरावें तें ठाके । ऐशिये सरिसिये भूमिके । समाधी राहे ॥ १ ॥ उपायें योगारूढ । जो निरवधि झाला प्रौढ । तया चिन्हाचा निवाड । सांगेन आइके ॥ २ ॥ ज्ञानेश्वरी अ० ६]. ९ मी मी अशी जी अहंवृत्ति हीच (हेर)= तुच्छ, क्षुद्र, हलकट १० [जयाचिया इंद्रियांच्या घरा । नाहीं विषयांचिया येरझारा । जो आत्मबोधाच्या वोवरां । पहुडला असे ॥ १ ॥ असतेनि देहें एतुला । जो चेतूचि दिसे निदेला । तोचि योगारूढ भला । वोळखें तूं ॥ २ ॥ ज्ञानेश्वरी अ० ६].

कवण नेणों हे जागली । उन्मनी० ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे जागतां निजली । परतोनि ना उमगली । उन्मनी० ॥ ४ ॥

पद ९९ वें.

परब्रह्मीं मुरलें मन ॥ ध्रु० ॥ बोध अबोध हा हारोनि गेला । सहजेंचि हें झालें उन्मन । पर० ॥ १ ॥ त्रिविध[1] ताप हा निमाला । वर्षूचि लागला चिद्घन । परब्रह्मीं० ॥ २ ॥ टाकोनि हे गुण[2] सकळ सगुण । रूपातीत रूप हें निर्गुण । पर० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे बोलणें निमालें । कांहींच नाहीं त्याहीं झालों लीन । पर० ॥ ४ ॥

पद १०० वें.

मी काय हो! हें सुख वानूं अनुमान! ॥ ध्रु ॥ वाचा हे गळे प्राण पांगुळ । सहज मिळे जहीं नाहीं दिनमान । मी० ॥ १ ॥ व्यक्त ना अव्यक्त बद्ध ना मुक्त । हें निज निर्जीचें महिमान । मी० ॥ २ ॥ परम प्रमेय हें अपर[3] ना परें[4] । नाम अनाम गुमानें[5] ॥ मी० ॥ ३ ॥ चित्रींची भिंती नसोनियां असती । तैंवी हें सम समान ॥ मी० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे मी, हा[6] टाकूनि पहा । जीव शिव अभिमान ॥ मी० ॥ ५ ॥

पद १०१ लें.

मजमाजी जागली हे! सहजेंचि सद्गुरुची कृपा ॥ ध्रु० ॥ स्वात्मसुखाचा उगम मीनला । अनुभव हा सोपा ॥ मज माजी० ॥ १ ॥ आपणापें देखोनि ठेविलें । दूरीच पुण्यपापा ॥ मजमाजी० ॥ २ ॥ दृश्य हारोनि दर्शनीं भरिलें । द्रष्टत्वाच्या मापा ॥ मज माजी० ॥ ३ ॥ सकळ

---

१ आधिदैविक आधिभौतिक, अध्यात्मिक असे तीन ताप (दुःखें). २ सत्व, रज, तम. ३ अपर म्हणजे अपरा निकृष्ट प्रकृति [पंच महा भूतें, मन, बुद्धि आणि अहंकार या आठ प्रकारांनीं विभागलेली. ४ परा=जीवरूपा श्रेष्ठ प्रकृति [भ० गी० अ० ७ श्लो० ४।५ पहा]. ५ गुप्त, गुह्य अंतरित. ६ मी मी हा अभिमान (मी जीव किंवा मी शिव या प्रकारचा अभिमान).

जप हे टांकुनि होय । जपचि हा अ[1]जपा ॥ मज माजी० ॥ ४ ॥ जाणीव तम हा हारोनि उजळिलें । स्वयंप्रकाश दीपा ॥ मजमाजी ॥ ५ ॥ सोहिरा म्हणे म्यां मीनलों । निवृत्तिभुवनाचिया भूपा ॥ मजमाजी० ॥ ६ ॥

पद १०२ रें.

सद्गुरुचे कृपेनें झालें मनचि हें तन्मय ॥ ध्रु० ॥ दिठी[2]ची उफराटी[3] मिठी पडोनि । मीनलें निरामय ॥ सद्गुरु० ॥ १ ॥ अपरा हारोनि परा मिळाली । उपरति सुख हें अप्रमेय ॥ सद्गुरु० ॥ २ ॥ अहं सोहं हें नुरवुनि आलें । मजमाजी चिन्मय ॥ सद्गुरु० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मग वाटे आला । हा बरवाचि समय ॥ सद्गुरु० ॥ ४ ॥

पद १०३ रें.

मजमाजी मीपण हें तैसें सहजेंचि हरलें ॥ ध्रु० ॥ सैंधव[4] मन हें, चैतन्यसिंधुमाजीच विरालें ॥ मज माजी० ॥ १ ॥ संकल्पा[5]निळ राहत सद[6]सत्तरंग हे जिराले ॥ मज माजी० ॥ २ ॥ असणें नसणें घट मठ दोन्ही । चिदंबरीं मिळाले ॥ मज माजी० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे मग मिळोनि उरलें । आपणियां लाजलें ॥ मज माजी० ॥ ४ ॥

पद १०४ थें.

न बोलवे यावरी आतां एक आणि दोन्ही ॥ ध्रु० ॥ संकल्प त्यजुनी, निवांतचि राहिलों निरंजनीं ॥ न बोलवे० ॥ १ ॥ कवणाठायीं तें नेणों !

---

१ योगशास्त्रांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत बावन्न मूलबीजोक्त मंत्रजप सांगितला आहे, त्यास " अजपाजप " अशी संज्ञा आहे. [अजपानाम गायत्री योगिनी मोक्षदायिनी । तस्याः संकल्पमात्रेण जीवन्मुक्तो भवेन्नरः ।] २ दृष्टीची. ३ अंतर्मुख वृत्ति, ज्ञानदृष्टि. ४ मन हेंच मीठ. ५ संकल्प+अनीळ=संकल्प=मी अमुक केलें, अमकें मला करावयाचें आहे याप्रकारें मनाच्या नानाविध इच्छा. अनिळ=वायु. ६ संकल्पवायु शांत झाल्यावर अर्थात् सत+असत÷तरंग द्वैताद्वैत विचार. ७ मीपण (आपल्या मी म्हणण्याच्या मिथ्याज्ञानामुळें ओशाळें होऊन) लाजलें.

पीर ! मन गेलें कीं विरोनि ॥ न बोलवे० ॥ २ ॥ आपणां पाहूं जातां, कल्पना गेली हारपोनी ॥ न बोलवे० ॥ ३ ॥ मजमाजी पडली मिठी, दिठीं[1] नये हे परतोनी । न बोलवे० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे हें चैतन्य, लाधोनी सहजेंचि आलें मौन्य, आपेंचि लागली उन्मनि ॥ न बोलवे० ॥ ५ ॥

पद १०५ वें.

भव[2]दंडितमंडित[3] हो ! अखंडित तुम्ही गावा ॥ ध्रु० ॥ देउनि तनु मनमोहन गहन । शांतिसुख चांगार्थी[4] ॥ अखंडित० ॥ १ ॥ आत्मशुद्धि त्रि[5]शुद्धि विशुद्धि । सुसमाधि महिमा गावा ॥ अखंडित० ॥ २ ॥ त्रि[6]कुट श्रीहाट गोल्हाट भेदोनि । त्रिवेणीसंग मागावा ॥ अखंडित० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे अपर[7] प्रेम । परानारिसंग भोगावा ॥ अखंडित० ॥ ४ ॥

पद १०६ वें.

मज माजी हे[8] विकासली हो ! सहजेंचि साजणी ॥ ध्रु० ॥ निष्काम हें जळ, निर्गुण दिनमणि माजी; जैसी कमळिणी ॥ मज० ॥ १ ॥ आनंद प्रेम आमोद सुखीं रमे, मानस हें भृंगपणी ॥ मज० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे निशीं चारी प्रहर हे; हारपती चौथी[9] जणी ॥ मज० ॥ ३ ॥

पद १०७ वें.

मीच नाहीं जेथ । दुजा कैंचा तेथ ॥ ध्रु० ॥ एकीं एक झालें तयीं

---

१ दृष्टि (बाह्य जगाची जागृतींतही निद्रेप्रमाणें विस्मृति झाली म्हणजे उपरमाची पराकाष्ठा झाली. "केशवस्वामानीं म्हटलें आहे." सहज मी आंधळा गा । कांहीं न देखें डोळां ॥) २ भव=[जन्ममरणरूप संसाराश्रय जो काल त्याला] दंडित= शिक्षा करणारा. ३ पण भवाचें भूषण आहे (अश्वत्थरूपानें विरूढला आहे). ४ चांगुलपणा. ५ स्थूल, सूक्ष्म, कारण तीन्हि देहांचें शोधन "विशुद्धीं"=' योगशास्त्रोक्त कंठस्थानचे षोडशदल चक्रामध्यें' झाल्यानें. ६ अनुक्रमें योगशास्त्रोक्त ' मणिपूर, अनाहत, विशुद्ध (स्थूल, सूक्ष्म, कारण) भेदन झाल्यानें, भगवत्साक्षात्कार होईल ! त्यापाशीं, त्रिवेणी=योगशास्त्रोक्त आज्ञाचक्रांतील विद्याशक्ति (परा) तिचा संग मागावा. ७ अपरा हीच निरतिशय प्रेमरूपा त्या प्रेमानें युक्त होऊन, परानारीचा संग भोगावा. ८ उन्मनि अवस्था. ९ चार वाचा (परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी.)

दीनें नाहीं नाथ ॥ मीच० ॥ १ ॥ आदि नाहीं अंत जातां नाहीं पंथ ॥ मीच० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे, आपणापें असावें सनाथ ॥ मीच० ॥३॥

पद १०८ वें.

बाइ वो ! आतां कायी हें ! मी सुख सांगों ॥ ध्रु० ॥ निजदिठीं सुदलें अंजन । हाता आलें हें निजधन । कवणाचि विकल्प नये लागों ॥ बाई वो० ॥ १ ॥ न दिसे देव भक्त, नाहींच कीं बद्ध मुक्त । कवणापाशीं काय मागूं गो ॥ बाइ वो० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मज हें घडलें । अवचटें ठकेंचि पडलें । स्वानुभूतीचा भोग भोगों ॥ बाइ वो० ॥ ३ ॥

पद १०९ वें.

मजमाजी घडलें सुख हें ! सांगों काय ? सये ! ॥ ध्रु० ॥ आनंदें निवाली । तेथचि कीं निमाली । दिठी गेली हे परतोनि नये ॥ सांगों० ॥ ॥ १ ॥ निरंजनीं निरत । निःसंग निर्मळ । मिनलें निर्गुण निरामय ॥ सांगों० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे आतां घडणेंचि विघडलें । झालों म्या निजींच कीं निर्भय ॥ सांगों० ॥ ३ ॥

पद ११० वें.

झालें हो ! सुख चिन्मय बाई ॥ ध्रु० ॥ भाव हरला, बोध मुरला, प्रकाश उरला । सांगो म्या कायी ॥ झालें० ॥ १ ॥ रूपेरेखविण मीनलें बाळक । अहं वोंवाळुनि घेऊं बलायी ॥ झालें० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे आतां मिळणें वोंवाळणें । हारुनी मी मज उरलें नाहीं ॥ झालें० ॥ ३ ॥

---

१ दीन=दुबळा, दरिद्री. २ नाथ=स्वामि, धनिक, दाता. ३ ज्ञानांजनाच्या योगानें प्राप्त झालेली दिव्य दृष्टि. ४ अव्यक्त आत्मठेवा. ५ अकस्मात् थक्क होणें, चकीत होणें. ६ आत्मसाक्षात्काराचा. ७ आकारास येणें (घटाचें घडणें, जन्मास येणें). ८ भाव म्हणजे ईश्वरी तेजाचें अज्ञानतमानें आच्छादित करून टाकणारा तमःप्रकृतीचा स्वभाव तो. ९ सृष्टीच्या प्रारंभीं बालकरूपानें असणाऱ्या वटपत्रशाई परमेश्वराचें यांत दिग्दर्शन केलें आहे. रूपरेख असें म्हणण्याचें कारण, मायाकल्पित नामरूपात्मक जगाचा त्यावेळीं अभाव

पद १११ वें.

बोला आंत खोली, खोली सर्वें गेली । वाचा निमाली, कवण जागां ? ॥
॥ ध्रु० ॥ हा सांग बापा, अनुभव सोपा । आपुलिया रूपा, ओळख कैसा

होता; हेंच होय. तें जें मूळस्वरूप (बालक) त्यावर अहं हेंच बुद्धि लवण तें ओंवाळून त्या सुंदर बाळकास झालेली स्थूलदृष्टीची (जडबुद्धीच्या दृष्टीची) दृष्ट काढून टाकूं हा भाव. लहान मुलांस नजर बाधते असा बायकांचा समज असतो म्हणून त्यावर मीठ ओंवाळून " अलाई बलाई जाऊं " असें म्हणून तें मीठ अग्नींत टाकून त्याची दृष्ट काढीत असतात. [स त्वं भृतो मे जठरेण नाथ कथं नु यस्योदर एतदासीत् । विश्वं युगांते वटपत्र एकः शेते स्म मायाशिशुरंघ्रिपानः ॥ ४ ॥ भा० तृ० स्कं० अ० ३३ [देवहुती कपिल भगवंतास म्हणते हे समर्था–प्रलयकालीं ज्या तुझ्या उदरामध्यें हें सर्व जग प्रविष्ट झालें होतें, आणि जो तूं मायेनें बालकाचें रूप धारण करून आपल्या पायांचा आंगठा चोखीत चोखीत एकटाच वडाच्या पानावर शयन करीत होतास, त्या तुझें मी उदरांत कसें बरें धारण केलें ? तेव्हां तुझी लीलाच अतर्क्य आहे.]

१ बोला आंत खोली यासंबंधानें–" बृहदारण्यकोपानिषद् अ० २ ब्रा० २ मं० ३ यांत म्हटलें आहे, त्याबद्दल मुळांत सविस्तर पहा. [नेत्रस्थानीं एक पानपात्र आहे. त्याचें तोंड खालीं आहे, त्याचें बुड वर आहे. त्यांमध्यें यश नानारूपानीं ठेवलें आहे. त्याच्या प्रांतभागीं सप्तऋषी बसले असून आठवी जिव्हा ब्रह्माशीं संवाद करिते–ज्याचें खालीं तोंड आहे व वर बुड आहे असें जें हें पानपात्र तें शिर होय. कारण त्याचें तोंड खालीं असतें आणि बुड [मस्तकावर असतें. जें नानारूप यश त्यांत ठेवलें आहें असें म्हटलें आहें, तें अर्थात् शिराच्या ठायीं जें प्राण एतद्रूप होय–त्याच्या प्रांतभागीं जे सप्तऋषी बसले आहेत असें म्हटलें आहे ते अर्थात् प्राण (इंद्रियें) होत आणि आठवी जिव्हा ब्रह्माशीं संवाद करते असें जें म्हटलें आहे, तें अर्थात् शब्दब्रह्म होय.] दुसरें योगशास्त्रोक्त आज्ञाचक्रांत (नेत्रस्थानीं) एक त्रिकोणाकृति कोश आहे असें अमलानंदयोगी शतश्लोकीमध्यें म्हणतात, [वन्हेंदू रविबिंदु त्यांत विलसे त्रै-कोन कीं कोश तो । जो कां नील सुनील पीतमय त्या मध्यें अतिश्वेत तो ॥] तें या उद्देशानेंच म्हटलें आहे असें वाटतें. तेथून वाचा उद्भवून 'महाशून्य म्हणजे चैतन्य–(ब्रह्मरंध्र) शून्याधिष्ठान ब्रह्माच्या ठायीं निमाली जाते (तिचा लय होतो). ज्ञानेश्वरी अ० ६ येथें म्हटलें आहे कीं [गगनीं गगन लया जाये । ऐसें जें कांहीं आहे । तें अनुभवें जो होवे । तें होऊनि टाके ॥ १ ॥ म्हणोनि तेथिचि मात । न चढे बोला हात । जेणें संवादा-चिया गांवा आंत । पैठी कीजे ॥ २ ॥ अर्जुना येन्हवीं तरि । इया अभिप्रायाचा

॥ १ ॥ ब्रह्मीं भाव हरला, मग उगम मुरला। मग उरला कवण तो गा?॥ ॥ २ ॥ सोहिरा म्हणे सांगे सखया। आपुलिया ठाया निजतां भजें ॥ ३ ॥

पद ११२ वें.

गुरुकृपें आजी अविनाश सुख जोडलें ॥ ध्रु० ॥ दर्शनें त्रिदेहाच्या, देहाचें भान मोडलें ॥ गुरुकृपें० ॥ १ ॥ पूर्ण प्रेम पिणें, न कल्पिणेंचि हें सोडिलें ॥ गुरु कृपें० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे शून्येंचि, चैतन्यीं हें मन बोढिलें ॥ गुरुकृपें० ॥ ३ ॥

पद ११३ वें.

स्मरण ना मागलें लय लागलें ॥ ध्रु० ॥ नारी पुरुष नपूंसकाविण। चिन्मय सुख हें चांगलें ॥ स्मरण० ॥ १ ॥ कवणेठायीं म्हणोनि पाहतां। मनचि कीं विरागलें ॥ स्मरण० ॥ २ ॥ शोधूं गेलें तयींच न्हेलें। परतोनि ना उमगलें ॥ स्मरण० ॥ ३ ॥ एकाविणें ना दुजेंही। परत कल्पितें विभागलें ॥ स्मरण० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे अंतर गुज हें। न सांगोनियां सांगलें ॥ स्मरण० ॥ ५ ॥

पद ११४ वें.

नीज लागली उन्मनि ॥ ध्रु० ॥ अहं त्यजोनी, सोऽहं उमजोनी, राहिलों

जो गर्व धरी। ते पाहें पां वैखरी। दुरी ठेली ॥ ३ ॥ भ्रूलता मागलीकडे [पूर्वोक्त त्रिकोण कोशाच्या] जेथ मकाराचें आंग न मांडे। सडेया प्राणा सांकडें। गगना येतां ॥ ४ ॥ पाठीं तेथेंचि तो मेंसला। तैं शब्दाचा देवो मावळला। मग तयाही वरी आदु भविन्नला। आकाशाचा ॥ ५ ॥ आतां महाशून्याचिया डोहीं। जेथ गगनासीच थावो नाहीं। तेथ तांगा लागेल काई। बोलाचा इया ॥ ६ ॥]

१ आपल्या जाग्यावरच निजला मग कोणाची उठ म्हणण्याची भीति नाहीं. २ स्थूल, सूक्ष्म या दोन देहांविरहित. ३ नारी (स्त्री, बुद्धि) पुरुष (प्राज्ञ आत्मा) नपूंसक (मन). ४ अव्यक्त (चित्त). ५ सांगितलें (सांगलें असा प्रघात वाडी प्रांतांत चालतो). न सांगोनियां सांगलें=म्हणजे "हें अनुभवाचें बोलणें जर अनुभवानें जाणलें नाहीं, तर ऐकणारास त्यापासून कांहीं फायदा नाहीं. कारण तें "नळी फुंकिली सोनारें, इकडूनि तिकडे गेलें वारें." याप्रमाणें होणार आहे.

निजोनी ॥ नीज० ॥ १ ॥ पूर्णाल्हादीं, आनंद कदीं, सच्चिदानंदीं, रिझोनी ॥ नीज ॥ २ ॥ निवटोनि एके, निज कळिके, निर्गुण भूमिके, रुजोनी ॥ नीज० ॥३॥ सोहिरा म्हणे अज्ञानें, ज्ञेय ज्ञाता ज्ञान हें विझोनी॥नीज०॥४॥

पद ११५ वें.

सुख सार सरिते ! निजजनकल्पलते ॥ ध्रु० ॥ कलिमल दहनी ! मन मोहनी ! जगदुन्मलते ॥ सुख सार० ॥ १ ॥ अद्वयाब्जिनी ! चित्सुख दिन मणि ! देखुनियां खुलते ॥ सुख० ॥ २ ॥ मज माजी मीपण हें नुरवुनि, अखंडित डुलते ॥ सुख० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे निज गुज, बुझवुनियां निजानंदें डुलते ॥ सुख० ॥ ४ ॥

पद ११६ वें.

माहेश्वरी ! कुमारि ! गौरी ! ॥ ध्रु० ॥ तनुमनमोहिनी गहनी । तूं परा प्रेम सुंदरी ॥ माहेश्वरि० ॥ १ ॥ निर्जी निजसुखसदनीं । मदनीं सज्जन वनवैराग्यआँगारी ॥ मा० ॥ २ ॥ सोहिरा म्हणे मजमाजी सहज । अर्धनटेश्वरनारी ॥ माहेश्वरी० ॥ ३ ॥

---

१ शुद्ध सत्त्व बुद्धि २ उद्भवून, उत्पन्न होऊन (जमीनींतून आपोआप प्रकट होणाऱ्या वनस्पतींस रुजींव म्हणतात. तसेंच कित्येक भूमींतून उद्भवलेलीं ज्योतिर्लिंगांस स्वयंभू (रुजींव) असें म्हणण्याचा प्रघात आहे. ३ विपरित ज्ञान, देहासच निरुपाधिक असंग आत्म्याला कर्ता मानणें इत्यादि. ४ गीता अ० १८ श्लो० १८ पहा. ५ प्रधान प्रकृति (विद्या, परा) हीच एक सरिता (नदी अशी कल्पून ईश्वराशीं तिची तुलना केली आहे. [श्वेताश्वतरोपनिषद् अ० १ म० ५ पहा.] ६ महेश्वर संबंधीं जी शक्ति आद्यप्रकृति तिजबद्दल या पदांत दिग्दर्शन आहे. [मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् । श्वेताश्वतर, उ० अ० ४, १०] प्रकृति माया आहे आणि त्या मायेला सत्ता स्फूर्ति इत्यादि देणारा महेश्वर मायी आहे.] ७ मिठागरांची लागवड करणारा जो मुख्य कुणबी त्यास आगरी किंवा आगारी असें कोंकणांत म्हणतात. ८ अर्धे आंग स्त्रीचें व अर्धे पुरुषांचे (अर्धनारि नटेश्वर=महेश्वर, शिवशक्ति.)

पद ११७ वें.

त्या अगम अगोचराचें ध्यान हें! ॥ ध्रु० ॥ अपरोक्ष वस्तूचें ज्ञान । सर्वांचें निदान । उत्पत्ति स्थिति लय जेथुनि हें ॥ त्या० ॥ १ ॥ काया चाळिल्या सर्व वाळिल्या । सोहिरा म्हणे रूप निरंजन हें ॥ त्या० ॥ २ ॥

पद ११८ वें.

चालवितो कुंडी हे! तयाची गोडी लागली ॥ ध्रु० ॥ होउनी उदास, विषयांची आस, त्यागिली ॥ चाल० ॥ १ ॥ विसरला आपण, आठवण ना, मागली ॥ चाल० ॥ २ ॥ सोहिरा ह्मणे, सहज निद्रा हे मुद्रा, चांगली ॥ चाल० ॥ ३ ॥

पद ११९ वें.

लाधलें हो! अनादि निजबीजँ सहज मज हें ॥ ध्रु० ॥ सकळ भूप अमूप अरूप दीप ॥ १ ॥ अकुळ अगोत्र स्वतंत्र पवित्र चिन्मात्र ॥ २ ॥ अभेद बोध जगत्कंद महदानंद ॥ ३ ॥ ज्याणें प्राण चळे, हें शरीर खेळे, तो मज मेळे, अनंत डोळे ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे क्षेम, परा प्रेम जगनगहेम ॥ ५ ॥

पद १२० वें.

चिन्मय सुखोंचि आम्ही झालों समाधान ॥ ध्रु० ॥ मजमाजी सहजेंचि देखिलें निधान ॥ चिन्मय० ॥ १ ॥ आवडे तेव्हां भोगावें विधि नों विधान ॥ चिन्मय० ॥ २ ॥ सोहिरादास ह्मणे ज्ञानेशीं हरलें विज्ञान ॥ चिन्मय० ॥ ३ ॥

---

१ पंचकोशविवेक करून देह वेगळे व आत्मा वेगळा केला. २ शरीर. ३ परमात्मा ॐकारस्वरूप. ४ भगवत्स्वरूप (आत्मसाक्षात्कार). ५ विधि= यथाशास्त्र जें कर्म तें. ६ विधान=यज्ञक्रिया, संस्कार. ७ प्रपंचज्ञान, अनुभवज्ञान.

पद १२१ वें.

साजणी वो बाई! धुंडूं लाग! धुंडूं लाग ॥ ध्रु० ॥ तुझिया अवगुणा लागुनि दुरावे कान्हया। कोठें आहे गे हरि सांग ॥ साजणी० ॥ १ ॥ अव्यक्तरूपीं जो नांदत जगीं। एक अनेक धरी सोंग ॥ सा० ॥ २ ॥ निजमना वरि घेशिल तूं जरि। काय करावा वीतराग ॥ साजणी० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे तूं महाकारणीं[2], वोळशील झणी। नाहीं मग हे तुझी पांग[3] ॥ साजणी० ॥ ४ ॥

पद १२२ वें.

सये! संगमीं मग बोलोंचि नये ॥ ध्रु० ॥ उत्पत्ति आगम जेथील तेथाचि। मिळोनि गेलें मग तूं मी ॥ १ ॥ देह विदेह हें जयाला। काय किती सांगों मी ॥ २ ॥ सोहिरा म्हणे जयीं आहे निरामय। नव्हे तें एकही नामी ॥ ३ ॥

पद १२३ वें.

मग पाहिलेंचि नाहीं ज्यांहीं हो ॥ ध्रु० ॥ दृश्यपणें तरि होय कीं नोहे। ज्ञानवशें बोलिला हो ॥ मग० ॥ १ ॥ द्रष्टयालागीं जो देखे निरंतर। ज्ञाता निःसिम लाहो ॥ मग० ॥ २ ॥ दर्शन ज्ञेय ते आठव हारोनि। नाठव आठवला हो ॥ मग० ॥ ३ ॥ सर्व सुखामृतीं होउनियां रत। सोहिरा निजीं निजला हो ॥ मग० ॥ ४ ॥

---

१ एक श्रीकृष्णाविषयीं विरही झालेली गौळण अन्य सखीस द्विरुक्तीनें म्हणते 'श्रीकृष्ण कोठें आहे; या विषयीं शोध करूं लाग. तुझ्याच दुर्गुणामुळें तो दुरावलेला आहे. त्याला शोध तो कोठें आहे तें सांग याप्रमाणें अन्योक्तीची कल्पना करून, असें दर्शविलें आहे कीं 'कीं बाई! बुद्धी! तूं जर हें काम (श्रीकृष्ण परमात्म्याचा पत्ता लावण्याचें) मनावर घेशील तर मग आणखी, वीतराग (वैराग्य) कशाला पाहिजे? २ हे बाई! तूं जर एकवेळ महाकारणी वोळशील (शुद्ध सत्वीं वळशील) तर. ३ मग तुझा पांग (आर्जव, ओशाळगतपणा) नको (म्हणजे तूंच माझ्या स्वाधीन होशील असा भाव. ४ या पदाचा अर्थ समजण्याकरितां सिद्धांतसंहिता पूर्वार्ध अध्याय १ ला. पहा.

पद १२४ वें.

मी मज देखलिया रे ! मग नाहीं श्रम ॥ ध्रु० ॥ मी तूं हें जेथ निरसुनीच गेलें । केंविं उरे भवभ्रम ॥ मग० ॥ १ ॥ श्रुतींसि अगोचर तूं तुज भेटसी । कोण धरी मग नेम ॥ मग० ॥ २ ॥ शब्दसा[1] जीवधर ब्रह्मीं मिळाला । कोण करी उपक्रम ॥ मग० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे जगीं जो अपरंपार । निजदेहीं परब्रह्म ॥ मग० ॥ ४ ॥

पद १२५ वें.

मी[2] मज टाकुनि आणिक पाहूं काय ? ॥ ध्रु० ॥ निशिदिनीं गोरस[3] पूर्ण होरस[4] । सेवनीं जो प्रीति लावे[5] ॥ मी० ॥ १ ॥ काम निष्काम जो जाणुनि पुरुषा । प्रकृति लावी भुलाय[6] ॥ मी० ॥ २ ॥ बोबडेपणीं बोले सखोल । शब्दरूपें पर[7] ल्हाय ॥ मी० ॥ ३ ॥ सोहिरा म्हणे निशिदिनिं ध्यातां । नाहीं विषयसुखलाहाय[8] ॥ मी० ॥ ४ ॥

पद १२६ वें.

ज्या मनानें निजीं भोगियलें सुख ॥ ध्रु० ॥ मजमाजी मीपणा नुरेचि देखणा । सर्व हरिलें भवदुःख ॥१॥ मूर्ततीत अमूर्त परात्पर । भावोनियां तें अलेख[9] ॥२॥ सोहिरा म्हणे निज हेंचि काज । देखोनियां तें अदेखे ॥ ३ ॥

पद १२७ वें.

तुझी दया हो देवा ॥ ध्रु० ॥ लटिकी केली काया । निरसली हे माया ।

---

१ शब्दासहवर्तमान जीव धारण करणारा सोऽहं आत्मा. २ जें कांहीं चराचर पदार्थमात्र सगळें जग तें मिथ्या होय, म्हणून 'हें सर्व मीच आहें, अशी भावना झाली असतां स्वात्म्यानें सकल जग आच्छादलें असें होतें. यावरून "माझें वांचून आणखी दुसरें काय पाहूं असें म्हटलें आहे. ३ दिवसरात्र अष्टौप्रहर गोरस=योगशास्त्रोक्त "सत्रावी कामधेनु तिचें दुग्ध" ४ कोंकणांत लग्नसमारंभाचे वेळीं, वरपक्षाकडील वराडीमंडळीस वधुपक्षाकडून केलेल्या मेजवानीस "होरस" असें म्हणतात, त्या वेळीं भोजनप्रसंगीं पदार्थ नको असला तरी पानावर वाढून अन्नाचा विचका करून टाकावयाचा, असा एक वेडगळ प्रघात आहे. ५ लावतो. ६ भूल (भुलवणें) ७ पर=(परब्रह्म) ल्हाय मिळवितो (प्राप्त करून घेतो. ८ लाहो=इच्छा, लाभ. ९ अदृश्य, गुप्त.

मन गेलें विलया । तुजशीं चिन्मय निरामया ॥ तुझी० ॥ १ ॥ काया बेगडिची बाहुली । गमली अभ्रींची सावुली । ऐशी अविनाश माउली ॥ तुझी० ॥ २ ॥ जगबुद्बुद नीरा वीतराग वैराग्यागरा । सोहिरा म्हणे अजरामरा ॥ तुझी० ॥ ३ ॥

पद १२८ वें.

परतोनि मागुता आतां नये दिठी ॥ ध्रु० ॥ योगाची पाउंठी, करोनि शून्याचिये भेटीलागीं । गेलों उठाउठी, स्थीर बैसलों गोल्हाटीं ॥ पर०॥१॥ अभ्यास बारुवां करुनी, सुषुम्ना विवर फोडोनी । झालों पैरपार उतरुनी, निज सुखासवें पडली कीं मिठी ॥ परतोनी० ॥ २ ॥ वैखरी मध्यमेमाजी, विराली सहजीं । पुढें आली नीज निजीं, मुखें न सुचती गोष्टि ॥ परतो०॥ ॥ ३ ॥ स्वानुभवहाटीं, स्वानुभूति हे गोमटी । प्रेमें होउनियां भेटी, पदरा दिधली गांठी ॥ परतोनी० ॥ ४ ॥ सोहिरा म्हणे निजपदपटीं, तें रूप डोळिया वाटी । फिरुनि उमजेना समदृष्टीं, काय जाहलें शेवटीं ॥ परतोनी० ॥ ५ ॥

पद १२९ वें.

परमानंद सेविती, निरंजनीं योगिराज जे ॥ ध्रु० ॥ नेणों काय ! अखंडितें

---

१ शिडी, पाउलवाट. २ लगबगीनें. ३ आड करून. ४ बाजारांत, पेठेंत. ५ जे योगिराज [राजयोगाच्या शेवटच्या पायरीवर पोंचलेले ब्रह्मात्मे.] आहेत ते [निरंजनीं=] मायाविरहित एकांत स्थानीं परमानंद (परम ब्रह्माच्या प्राप्तीमुळें होणाऱ्या आनंदाचें) सेवन करितात. (आनंद आत्मानंद)=तो कसा याचें रहस्य सांकेतिक शब्दांनीं या पदांत दर्शविलें आहे. ६ नेणों काय ! =या म्हणण्याचा हेतु हाच कीं तेथें जाणिवेचा लय होतो त्यामुळें तो आनंद अमुक प्रकारचा हें सांगतां येत नाहीं. याच रहस्यानें सोहिरोबांनीं अन्य पद्यांत म्हटलेलें आहे कीं (सेविला काय जाणो मुक्यानें मेवा). ७ खंडरहीत (अखंडैकरस परमानंदरूप) एकसारखें. म्हणजे तें सत्य ज्ञानानंतरूप आहे. इंद्रियजन्य आनंदाप्रमाणें क्षणिक नव्हे.

अना [नु १'] हतध्वनि बाजे । मनमयूं [यो !] र, सुखविचित्र,

१ ज्यावेळीं प्राणायामाच्या अभ्यासानें अनाहत चक्राच्या ठिकाणीं असणाऱ्या ब्रह्मग्रंथीचा भेद होतो, तेव्हां मनास आनंद देणारा मंजूळ असा हृदयाकाशांत उत्पन्न झालेला ध्वनि शरिरांत ऐकूं येतो हृदयाकाशांत नाद होण्यास सुरवात झाली म्हणजे योग्याचें हृदय आनंदानें भरून येतें. याप्रमाणें अनाहत म्हणजे नगारें मृदंगाप्रमाणें ताडन केल्यावांचून, आपोआप उत्पन्न होणारे जे ध्वनि ऐकूं येतात ते. २ बाजे म्हणजे वाजती असा अर्थ किंवा अनाहत ध्वनियुक्त हृदयस्थानचें अनाहतचक्र (द्वादश दल) स्वरूप बाज (शय्यास्थान=पलंग=अंत:करण समाधिस्वरूप सेज) पक्षीं परमात्म्याची 'अखंडैक रस परमानंद सेवन करण्याची सेज' [शक्ति=गुप्त विद्युतशक्तिस्वरूप बाज=माया. पारमार्थिक प्रदसं० भा० २ पृ० २१ टी० १ पहा. ३ या चरणामध्यें जें रहस्य आहे तें शब्दांनीं साथे वर्णन करणें अशक्य होय. कारण तें स्वानुभवज्ञानगम्य आहे. तथापि साधारण रहस्य एवढेंच आहे कीं; "अखंडैकरस" परमानंदाचा प्रत्यक्ष अनुभव घेणारा ब्रह्मनिष्ठ राजयोगी, प्राप्त देहधर्मानुसार कर्माचरण करीत आहे असें भासत असलें, तथापि तो अंतर्गत अंत:करणोपाधीपासून असंग असतो. तो परमात्मरूपच झालेला असतो, म्हणून जसा परमात्मा स्वत: असंग असून मायेच्या योगानें तो ससंग आहे असें अविवेकी जनांस भासतें. तद्वत् जगद्रूपकार्याचें उपादान कारण परमात्मा असून तो असंग कसा? हें या चरणांत गुप्त संकेतानें मयुराचा दृष्टांत देऊन सिद्ध करून दाखविलें आहे. तो मनोमय पुरुष हृदयांतरीं बसत असून सर्वांचा ईश सर्वांचा अधिपति आहे. हाच कोणी एक मयूर पक्षी मयूर पक्षाचा पिसारा अनेक वर्तुलाकृति टिपकेदार गोलांनीं युक्त असून अनेक रंगांनीं चित्रित झालेला असतो हें सर्वांच्या पहाण्यांत आहेच. ह्या पक्षांच्या जातींत मादि जी लांडोर तिला तशा प्रकारचा पिसारा नसल्यामुळें ती नरमयूराप्रमाणें सुशोभित दिसत नाहीं. या पक्षांमध्यें संभोग सुखोपभोगांविषयीं [सुखविचित्र] एक विचित्र कल्पना आहे ती इतर पक्षांप्रमाणें या जातींतील नरमादीचा प्रत्यक्ष शरीरसंबंध [संग] होत नसतो. तर प्रावृट्काळ आला व आकाशामध्यें मेघगर्जना [गगन घन गाजे] होऊं लागली म्हणजे नरमयूरास परमानंद होत असतो, त्या आनंदाच्या भरांत तो साहजिक नृत्य करूं लागला म्हणजे, त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागतात. ते अश्रुबिंदु लांडोर आपल्या प्रेमानंदांत येऊन, आपल्या मुखावाटे झेलून पिते; व त्याचमुळें तिच्या इच्छेनुरूप तिच्या उदरांत त्या नरमोराच्या पिसाऱ्या सारखी आकृति ज्यांत आहेत अशीं अंडीं बनतात, व त्यांतून प्रतिमयूरदेह उत्पन्न होतात.

गगनेघने गाजे [जें ?] ॥ परमानंद० ॥ १ ॥ जेथें झाहलें आत्मज्ञान,

---

ह्मणून येथें " सुख विचित्र " असें ह्मटलें आहे. याच रहस्यानें सोहिरोबांनीं अन्य पद्यांत ह्मटलें आहे कीं, [वैराग्यविवेकें संगाविराहित सदैव सुख हें सेव]. खऱ्या सुखाची [निजसुखाची].

१ गगन=महदाकाश. याचें रहस्य वर येऊन गेलेंच आहे. २ मेघनाद [गाजे] गर्जना करितो [निष्पत्त्यवस्था=ह्या चौथ्या अवस्थेंतील चित्ताच्या एकाग्रतेलाच तुर्यावस्था इत्यादि संज्ञा आहेत. अथर्ववेदाच्या हंसोपनिषदांत नाद अनेक प्रकारचे सांगितले आहेत परंतु त्या सर्वांत मेघनादच श्रेष्ठ सांगितला आहे; कारण त्यापासून सच्चिदानंदप्राप्ति हें फळ सांगितलें आहे; करितां त्याचेंच अनुसंधान करावें. पातजलयो० शा० २० विभूतिपाद: ३ पृ० १२४ पहा.] मेघ इत्यादिकांच्या नादास घननाद असें ह्मणतात व अशा नादाच्या ध्वनींतच आपल्या सर्व वृत्ति स्थिर करून ' मनमयूर ' [पूर्णज्ञानवान योगी] चंचल गुणयुक्त मनाच्या विषयांचा त्याग करून साहजिक परमानंदांत तल्लीन होऊन जातो. हा भाव. ३ जेथें=ज्या प्रज्ञेच्या (स्वयंबुद्धि, स्थिरबुद्धि) ठायीं पूर्ण आत्मज्ञान झालें; ती प्रज्ञा हीच अंतरिंची सांज=(सांज ह्मणजे रात्र. रात्रीला सांज असें ह्मणण्याचा प्रघात वाडीप्रांतीं आहे. पक्षीं अविद्यारूप निशा) तेजोमय (अंनतें) स्वरूपाच्या मध्यभागांत (अंतरीं=हृदयस्थानीं) अदृश्य रूपानें (तमःप्रधान) जी अविद्या अथवा ईश्वरीमाया मूळ गुप्त संकल्पानें राहिली आहे ती. याचें रहस्य असें कीं, या चरणांत वैराग्य व उपरति व पूर्णज्ञान यांचें दिग्दर्शन केलें आहे. [उपरति शब्दाचा अर्थ योगविद्येच्या ग्रंथांत असा आहे कीं, सविकल्प आणि निर्विकल्प समाधीच्या अभ्यासानें प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा आणि स्मृति अशा पांच वृत्तींचा निरोध होतो, त्यालाच उपरति म्हणतात. इचा अभ्यास करणाऱ्या पुरुषांच्या हृदयाची वासना नष्ट होते त्यावेळेस ही उपरति मोठें अलौकीक ऐश्वर्य देते. चित्ताच्या सर्व वृत्तींचा निरोध झाल्यानें विस्मरण होतें. ही अवस्था प्रधानरूप आहे; कारण ही वैराग्य आणि उपरति या दोहोंला उपकारी साधन असल्यामुळें साक्षात् मोक्ष देते. हें सर्व खरें परंतु जोंपर्यंत पूर्णज्ञान झालें नाहीं तोंपर्यंत मोक्षाची प्राप्ति होत नाहीं. आतां गुप्तविद्येच्या पूर्णज्ञानाला अंतर्दृष्टीनें जे चमत्कार दिसतात ते असेः—सुषुप्तीप्रमाणें [अंतरिंचे साजे] जर विस्मृति होऊन जाईल, तर ध्याननिष्ठाच्या उपरतीचा सीमा होत अशा स्थितींत स्वयंबुद्धीच्या प्रकाशानें सत्य आत्मज्ञानाचा निश्चय होतो. अशा स्थितींत सोहं आणि ॐकार हे दोन एका वृत्तींत स्थिर राहतात. यावेळीं स्वरूपाच्या मध्यभागांत अदृश्यरूपानें जो अविद्या अथवा ईश्वरीमाया मूळ गुप्त संकल्परूपानें राहिली आहे, तिच्या मध्यभागीं

अंतरिंचे सांजे [अंतरींच साजे ?] । रूपरेख नाहीं, आंगीं स्वयंबोधमाजे ॥ परमानंद० ॥ २ ॥ संसार हा नाशवंत, घडलेवीण काजें । शरीरभोग नै

अनंतकोटी ब्रह्मांडाची उत्पत्तिस्थितिलय होताहेतसें दिसतें. पातञ्जलयो० शा० र० वि० पा० ३ पृ० १०७।१०८ पहा. [" अंतरींच साजे " अन्यपाठ आहे त्याचें रहस्य हेंच. समाधीच्या अभ्यासानें ज्यांचा मल धुवून टांकला आहे, ज्याचा प्रवेश आत्मस्वरूपीं झाला आहे, त्याच्या चित्तास जें सुख होतें त्याचें वाणीनें वर्णन करणें अशक्य आहे; तें स्वतः अंतःकरणानेंच ग्रहण करावयाचें. म्हणून हें अंतरांतच साजतें असा भाव.]

१ शारिरादि सौंदर्यभाव व रेख आकृतिविशेष शब्द, स्पर्श, नामरूपादि भाव ज्याला नाहींत असा भाव. अशा ब्रह्माच्या आंगीं म्हणजे "अहंब्रह्मास्मि" स्फूर्तिरूप अंगाच्या ठायीं. २ जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादि तीन्ही अवस्थांमध्यें भोग, भोक्ता, आणि भोग्य, ही त्रिपुटी भासते परंतु या त्रिपुटीपासून निराळा चैतन्यरूपी साक्षि सदाशीव मी आहें असा जो बोध तोच स्वयंबोध हा माजे (दृढ, बलवत्तर होतो असा भाव). ३ स्थूल व सूक्ष्म देहांला अनुसरून असणारा जन्ममरणरूप नाशवंत संसार; एतद्रूप काजें. ४ काजें=अविद्या (अज्ञान) रूप कारणापासून उद्भवलेलीं काजें ह्मणजे कार्यें. विश्वांतील एकंदर घडामोड व जन्ममरण एतद्रूप कार्यें, हीं परमपदरूपीं अविनाशी स्थिति प्राप्त झाल्याच्या योगानें गंधर्वनगर किंवा स्वप्नाप्रमाणें घडलींच नाहींत (घडलेवीण काजे) असें वाटलें हा भाव. ५ ज्याप्रमाणें अग्निप्रवेश केलेल्या मनुष्याचा मनुष्यपणा त्याचा देह जळेपर्यंत नाहिंसा होत नाहीं त्याप्रमाणें प्रारब्ध कर्मांचा क्षय होईपर्यंत (शरिर भोग न सुटे) जीवित्व व्यवहार जात नाहीं. ज्याप्रमाणें " हा सर्प नव्हे दोरी आहे " असें ज्ञान झाल्यावर देखील, पूर्वीच्या भीतिपासून उत्पन्न झालेलें कंपादिक, अगदीं बंद होण्यास कांहीं वेळ लागतो, त्याप्रमाणें भोगादिकही हळुहळु बंद होतात आणि ज्याप्रमाणें ती दोरी पुन्हां अंधारांत टाकली असतां, पुनः सर्पासारखी भासते, तसें ज्ञात जाहल्यावर देखील चिदाभासास मी मनुष्य अशी विपरीत प्रतीति केव्हां केव्हां होते; तथापि तेवढ्या दोषामुळें तत्त्वज्ञानास धोका मुळींच नाहीं. कारण, जीवन्मुक्ति हे कांहीं व्रत नव्हे. तर ती केवळ वस्तूची खरी स्थिति आहे.

सुटे, परि चित्तवृत्ति लाजे ॥ परमानंद० ॥ २ ॥
सोहिरा ह्मणे उलट दिठी, धनुष्य मत्स्यराजें । अहं-

---

१ चित्तवृत्ति ह्मणजे चिदाभासयुक्त अंत:करणवृत्ति. या चिदाभासाचा लय झालेला सुषुप्त्यादि अवस्थामध्यें अनुभवास येतो. अशा विचारानें आपला खोटेपणा मुमुक्षु वारंवार समजून घेतो. याप्रमाणें आपला खोटेपणा समजून घेऊन आपला खचीत नाश होणार आहे, असें जाणून पुन: भोगाची इच्छा करीत नाहीं, ठीकच आहे, मरणास टेंकलेला मनुष्य विवाहाची इच्छा कधीं करील काय ? मग मी भोक्ता ह्मणून पूर्वी जसा व्यवहार तो करीत होता, तसा पुन: करण्याला, नाककापलेल्या मनुष्याप्रमाणें, तो लाजतो आणि मनांत खंत बाळगून, प्रारब्ध निमूटपणें भोगतो. जेव्हां आपलेंच भोक्तृत्व खरें मानण्यास याला लाज वाटते, तेव्हां साक्षीला भोक्तृत्व तो लावणार नाहीं हें कशास सांगितलें पाहिजे ? राजाचा वारसपुत्र जसा आपणास राज्यपदवी मिळावी या इच्छेनें राजासारखेंच आचरण करितो, तसा हा चिदाभासही साक्षीप्रमाणें शांत असण्याविषयीं प्रयत्न करितो. [ब्रह्मवित् ब्रह्मैव भवति] ही श्रुति ध्यानीं आणून तो ब्रह्माचेंच चिंतन करितो, दुसरें करीत नाहीं. २ योगाभ्यासानें चित्ताचा निरोध झाल्यानें त्याचा उपरम होऊन आत्म्याकडे त्याची दृष्टी परतते आणि तो योगी आपल्यामध्येंच आपण सुख पावतो. तें सुख अतींद्रिय असून बुद्धीस मात्र ग्राह्य असतें. (सोहिरोबानीं सिद्धांतसंहिता पूर्वार्ध अ० ९ पृ० २०४–२०५ येथें मीनार्ग सांगितला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य पहावा. ३ याप्रमाणें उलट दृष्टीच्या योगानें, उपनिषद्रूप धनुष्य हें महा शस्त्र घेऊन, [मत्स्य राजे ह्मणजे सकल योगांचा राजा जो मीन मार्ग (सि. सं. अं १२ पृ. ३१ पहा]–त्याच्या योगानें किंवा भवसागरामध्यें असणारे जीव मत्स्य त्या सर्वांचा राजा मत्स्यावतार स्वरूप विष्णु [सि० सं० अ० १० पृ० ३२ पहा.] हें लक्ष्य त्याचा भेद करावा असा भाव. श्रीरामांनीं सीतास्वयंवरप्रसंगीं शिवधनुष्याचा भंग केला होता; तसेंच पंडुपुत्र अर्जुन [जिष्णु] यानेंही स्वयंवरप्रसंगीं मत्स्यभेद केला होता; या उभयविध लक्षभेदाचे रहस्य यांत गुप्त अर्थानें दर्शविलें आहे असें दिसतें. ह्मणजे:–नर–अर्जुन [जिष्णु], नारायण-श्रीराम (विष्णु) यांनीं मनुष्यदेह धारण करून ज्या रीतीनें वर्तन करून दाखविलें. तशा प्रकारें वर्तणूक ठेऊन तद्वत् अधिकार प्राप्त करून घेतला तरच हा मत्स्यराज योगसिद्ध होऊन त्याच योगानें ब्रह्मलक्ष्याशीं तादात्म्य होईल असें दर्शविलेलें आहे. याप्रकारें धनुष्य (प्रणव ह्मणजे ओंकार हें धनुष्य होय.) त्यावर आत्मा हा बाण जोडावा आणि (तिरंदाजें ह्मणजे शरसंधान कौशल्यतेनें

कोर शूरबोधा मिळे तिरंदाजें ।। परमानंद० ।। ४ ।।

किंवा शरसंधान कौशल्य करणाऱ्या धनुर्धरानें) लक्ष्य जें अविनाशी ब्रह्म त्यावर सोडावा ह्मणजे अहंकार ' शूर बोधराजाशीं ' (मिळे) तन्मय (एकात्मक) होऊन जाईल.

१ शास्त्रांत सांगितलेल्या योगाभ्यासानें अहंकाराचें जसजसें विस्मरण होत जाईल तसतसें सूक्ष्मदृष्टीस (उलटदिठीस) निजानंदाचें अनुमान करतां येईल. असें विस्मरण होतां होतां अहंकार अगदींच सूक्ष्म होतो. तेव्हां परमानंदाचाच अनुभव येतो. ही स्थिति निद्रा आहे अशी शंका कोणीं घेऊं नये. कारण निद्रेंत अहंकार अगदीं लीन ह्मणजे नाहींसाच होतो. तसा येथें होत नाहीं. कारण तसें होईल तर निद्रेप्रमाणें देह लागलाच पडेल. जेव्हां द्वैतही भासत नाहीं आणि निद्राहि नाहीं अशा वेळीं जें सुख भासतें तोच परमानंद (ब्रह्मानंद) असें भगवंतांनीं गीतेंत सांगितलें आहे. [पंचदशी ब्रह्मानंदे योगानंद प्र० पहा.]

२ शूर बोधराजा असें ह्मणण्याचें कारण हेंच कीं:—'याप्रमाणें ज्ञान स्थिर झाल्यावर दुसऱ्या साधनाची जरूर नाहीं या ज्ञानास बाध आणण्यास अविद्याही समर्थ नाहीं, व तिचें कार्य जें जगत् तेंही समर्थ नाहीं. कारण, पूर्वींच तत्त्वबोधानें त्या दोन्हींचाही समग्र नाश झालेला आहे. आतां हें बाधीत द्वैत डोळ्यांना दिसलें तर दिसेना बापडें ! तेणेंकरून ज्ञानाला मुळींच धक्का नाहीं. जो पाशुपतास्त्राला देखील दात देत नाहीं त्याच्या आंगाला निष्फळ बाणनीं काय होणार ? पूर्वी अभ्यासकाळीं आपल्यापासून उत्पन्न झालेल्या नानाप्रकारच्या (घडलेवीण काजें) कार्यांही करून विस्तार पावलेल्या अविद्येबरोबर लढाई करून बोधाला जय मिळून तो सुदृढ झाल्यावर त्याला तिजपासून कसली बाधा होणार आहे ? आतां अज्ञान व त्याचीं कार्यें हीं केवळ प्रेतें होऊन पडलीं राहींत. (पंचदशी तृप्ति दीप पहा.)

(या भागांत प्रारंभीं अभंग सुद्धां घालावे असा विचार होता परंतु ज्याअर्थीं " स्फुट काव्यें " यासदराखालीं तिसरा भाग स्वतंत्र केला आहे व त्यांत श्लोक सवाया वगैरे घातल्या आहेत त्याअर्थीं अभंगही त्यांतच घालणें योग्य वाटल्यावरून नुसतीं पदें देऊनच हा भाग पुरा केला आहे.)

संपादक.

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ अधिक टीपा.
		१ प्रासंगीक पदें, विठ्ठलपदपंचक.
१	१	ह्या पांचही पदांतील "विठ्ठलाचार्य" यांचें उपनांव दीक्षित असें होतें अशी माहिती उज्जनी येथें मिळते.
		[विषवत् या वि०]=येथें विषयांस विषवत् ह्मटलें आहे, त्याचें रहस्य हेंच कीं, इंद्रियें व विषय यांच्या संयोगापासून होणारें जें सुख तें प्रारंभीं अमृतासारखें गोड वाटतें, परंतु तें अंतीं विषासारखें कडू आहे. ह्मणून भगवंतांनींही "भगवद्गीता अ० १८ श्लोक ३८ येथें त्या सुखास राजस असें ह्मटलें आहे. आचार्यांनींही विवेकचूडामणिमध्यें ह्मटलें आहे, कीं, विषय हे आपल्या आंगच्या दोषांनीं कृष्णसर्पाच्या विषापेक्षांही जलाल आहेत; कारण कृष्णसर्पाचें वीष दंश झालेल्याच्याच प्राणाची हानी करितें, पण विषय आपल्याकडे नुसती दृष्टि टांकली कीं लागलेच त्याला पछाडतो. [विवेकचू० म० श्लो० ७९ ते ८४ पहा. ह्या स्त्रीविषयाच्या संबंधानें पुरूरव्यानें केलेला धिःकार श्रीमद्भागवत स्कं० ११ अ० २६ येथें वर्णन केला आहे, तो पाहण्याजोगा आहे.
,,	,,	[विरचित यांसि विरंची०]=आत्मसुखाचें तुह्मापासून हरण करावें ह्मणून, विरंची ह्मणजे ब्रह्मदेव, त्यानें हे स्त्रीधनादि विषय निर्माण केले आहेत, कारण द्वैतसृष्टीचा उत्पन्न कर्ता असा हाच महदहंकार होय; आणि याच अहंकारत्यागाविषयीं या पदांत गर्भित भाव दर्शविला आहे. [आचार्यकृत विवेकचूडामणि श्लो० ३०४ पहा.]
,,	,,	[स्त्रीधनतेजें०]=येथें स्त्रीधनतेजें हा शब्द गुह्यार्थानें वापरलेला आहे असें दिसतें. [बृ० उ० अ० ६ ब्रा० २ मं० १३ पहा.] [खड्ग विराजे०]=" श्रीमद्भागवत तृतीयस्कंद अ० ८ श्लोक २० " यांत सांगितलें आहे कीं:—" ब्रह्मदेव आपला स्रष्टा कोण याचा शोध करीत असतां फारच मोठा काल [शंभर वर्षें] निघून गेला; जो काल

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		ईश्वराचें शस्त्र असून प्राणिमात्रांस मरणरूप भय उत्पन्न करीत होत्साता आयुष्याचा नाश करितो. तसेंच “ तृतीय स्कं० अ० ३० श्लो० ६ ते १० यांत सांगितलें आहे कीं:— “ जो दुरात्मा मूढ आहे, व व्यभिचारिणी स्त्रियांनीं एकांत स्थळीं पसरलेल्या संभोगादिरूप मायाजाळांनीं ज्याचें अंतःकरण व इंद्रियें आकृष्ट झालीं आहेत, असा तो कालपाशाच्या (मृत्यूच्या) स्वाधीन झालेला पुरुष मोठ्या वेदनेनें नष्टबुद्धि होऊन मरण पावतो.
१	२	[एकेकातें सेवुनी गेले.]=शब्दस्पर्शादि पांच विषयांतून एकेकच विषय मात्र ज्यांनीं सेवन केला, ते ह्मणजे मृग, गज, मत्स्य, पतंग, भृंग; हे नाश पावले मग [पांचही रमणीठाया=] ते पांचही विषय एका स्त्रीच्या ठायीं वास करितात. [तद्रति संगा=] तेव्हां अशा स्त्रीच्या रतिसंगास प्रवृत्त झाल्यामुळें काल दंगा करून अंतकालीं भय उत्पन्न करील तर त्यांत नवल तें काय ! [शुक्रनीति श्लो० ७ ते ११ अवश्य पहा.] विवेकचूडामणिमध्यें आचार्यांनीं ह्मटलें आहे. [शब्दादिभिः पंचभिरेव पंच पंचत्वमायुः–स्वगुणेन बद्धाः । कुरंगमातंगपतंगमीनभृंगानरः पंचभिरंचितः किम् ‖ १ ‖ भावार्थः–“ स्वतांच्या गुणांनीं बांधलेले हरीण, पतंग, मत्स्य आणि भुंगा हे पांच प्राणी शब्दादिक पांच विषयांपैकीं अनुक्रमें एकेक विषयावर आसक्त झाल्यामुळें मरण पावतात, तर मग पांचां विषयांच्या ठायीं आसक्त झालेला मनुष्यप्राणी, विषयाच्यापायीं मरणप्राय दुःख पावेल यांत काय सांगावयाचें आहे.
”	”	[माझे माझे ह्मणुनि०]=हे स्त्रीधनादि विषय माझे, माझे, ह्मणून, त्या विषयांनां अंतकालपर्यंत पाहत राहून, प्राणत्यागकाळीं त्या विषयांना सोडून निघून गेले [धनानि भूमौ पशवस्यगोष्ठे । मार्या गृहद्वारिजनः स्मशाने । देहश्चितायां परलोकमार्गे । कर्मानुगो गच्छति जीव एकः ‖ १ ‖] अशांनां तूं पाहतोस आणि मुखानें [रामदासांनीं ह्मटल्याप्रमाणें “ मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ” अशा प्रकारें.] कटकट करिसी ह्मणजे ! कटकटा ! अरेरे ! गेला बिचारा, वाईट झालें

पद्य	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		असें ह्मणतोस, पण पुनः स्वतः तशाच प्रकारच्या कटकटींचा [क्लेश-कारक विषयांचा] स्वीकार करितोस. क्षणमात्र झालेलें स्मशानवैराग्य नष्ट झालें कीं पुनः [झटपट] या विषयांची लूट प्राप्त करून घ्यायाला भुकतोस. तात्पर्य, देहांत सचैतन्य जीवात्मा स्थित असेपर्यंत काय तो देहगृहाचा जीव हा मोठा अभिमान वागवितो, आणि [माझें माझें] मी व माझें असें घोंकितो, परंतु तोच देह त्यागून जातो, तेव्हां तो अभिमान (अहंकार) केवळ वृथा होता असें अन्य जनांस वाटतें मात्र; पण ते तरि तसलेच. [म्हणे सोहिरा विठ्ठल०]= या चरणांत नामसंकीर्तन हें पहिलें आणि सोपें साधन सुचवितात. [नामसंकीर्तन साधन हें सोपें जळतील पापें जन्मांतरिचीं ॥ १ ॥ तुकाराम] वाल्मिक ह्या नाममात्रेंकरूनच तरला; यासाठीं मुखांत विठ्ठल विठ्ठल असें नाम धरा असें सांगितलें. [घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठ्ठलाचें ॥१॥ तुकाराम.] येथें "सोहिरा विठ्ठल" हे शब्द गुह्यार्थानें योजिले असावे [सोहिरा= सः + हिरा= सोहिरा= अज्ञानतिमिरांधःकाराचा नाशकर्ता जो चिद्रूप आत्मा (प्रत्यगात्मा) + सः= तो=सोहिरा आणि विठ्ठल परमात्मा मिळून ऐक्य दर्शविलें आहे. [शेवटीं तो संत सोहिरा पांडुरंगमुकुटीं जडला हिरा । तेणें किरिट दिसे साजिरा । लाजवी दिनकरा स्वप्रकाशें ॥ ११९ ॥ राजाराम प्रासादीकृत भक्तमंजरीमाला ग्रंथ अ० ९४] "ध्यानीं धरा" असा अन्यपाठ आहे त्याचा अर्थ योगाचें सप्तमांग जें ध्यान त्याच्या योगानें त्याला पकडा. असा असावा.
१	२	[विसर जाणुनि माया०]= या विठ्ठल परमात्म्याचें नाम मुखांत धरा. माया (अविद्या) द्वैतानें या आत्म्याचा तुह्मास विसर पडला आहे ह्मणून तो प्रत्ययास येत नाहीं. ही त्याची माया त्याच्या भक्तीनेंच उमगळी जाते. भगवंतांनीं उद्धवास सांगितलें आहे कीं [गुणमय्या जीवयोन्या विमुक्तो ज्ञाननिष्ठया । गुणेषु मायामात्रेषु दृश्यमानेष्ववस्तुतः । वर्तमानोऽपि न पुमान्युज्यतेऽवस्तुभिर्गुणैः ॥ २ ॥ भावार्थः— मद्भक्तास विषयासक्ति म्हणून कधींही होत नाहीं, कारण ज्ञाननिष्ठेच्या योगानें गुणमय अशा जीवोपाधीपासून तो मुक्त होतो, आणि हे मायारूपी गुण [अर्थात त्रिगुणात्मक विषय] मिथ्या आहेत असें तो पहातो,

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		यामुळें सर्व विषयांचेठिकाणीं व्यवहार करीत असतांही, त्या मिथ्या गु·णांच्या ठिकाणीं संग (आसक्ती) पावत नाहीं.]
१	२	[या निरसंगा करिं भव०]=या निरस भव अंगा भंग करीं [नि+रस+अंग=रसरहीत जड अंग] रसरहीत जो आत्मा त्याविरहीत जड प्रकृतिरूप अंग [शुष्क काष्ठवत् हाडांमासाचा बनलेला स्थूलदेह; तदंग-भूत भव ह्मणजे संसार भंग करून टांका हा भाव.
,,	,,	[सुरंगा पावसिया.]=सु + रंग=शुद्धरंग, निजरंग [सुवर्णोपमेय आत्मा हिरण्यगर्भ] विठ्ठल त्याप्रत पोंहोंचशील. कठोपनिषत् अ० २ व० ६ मं० १७ पहा.] उज्जनी येथें सोहिरोबांच्या मठा जवळ “ वीर विठ्ठल ” नामकदेवाची मर्ति असून तेथें देवालयही आहे.
		पद २ रें
२	३	या पदांत अन्यपाठ आढळले आहेत ते येणेंप्रमाणें (चरण १): —करितां संगा या निःसंगा० (चरण २):—सास सघरी० । त्रिवेणि भद्रीं.
,,	,,	या पदांत मुख्यतः बुद्धियोगाचें रहस्य आहे, ह्मणजे अर्थात् स्थित-प्रज्ञ पुरुषाचें लक्षण दर्शविलें आहे. (श्री ज्ञानेश्वरी अ० २ ओं० २६७ त्या २८४ अवश्य पहा; ह्मणजे याचें रहस्य कळेल.
,,	,,	(तुह्मी भोगा०)=भोगा असें ह्मणण्याचें रहस्यः—निद्रेच्या पूर्वक्षणीं जी वृत्ति बाहेरचें जग सोडून स्वरूपाकडे वळल्यानें स्वरूपसुखांत निमग्न होऊन लीन होते, त्या अवस्थेच्या कोशाला आनंदमय कोश ह्मणतात. असा हा अंतर्मुख वृत्तीचा परिणामरूप आनंदमय कोश त्या कोशांत ब्रह्मसुखाचा उपभोग घेतो; त्याकाळीं त्या सुखानें बिंबित अशा अज्ञानवृत्ति असतात, त्यामुळें भोग घडतो. त्या अज्ञानवृत्ति सूक्ष्म ह्मणजे अस्पष्ट आहेत, आणि बुद्धिवृत्ति त्यांपेक्षां स्पष्ट आहेत, असें वेदांतपारंगत पुरुष ह्मणतात. ही गोष्ट ‘मांडुक्य तापनीयादि श्रुतीमध्यें स्पष्ट करून सांगितली आहे.

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		(सुषुप्तिस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवानंदमयो ह्यानंदभुक् × × × मांडु० उ०) याचा भावार्थ:—“ विज्ञानमयवाच्य जीव सुषुप्तीमध्यें स्वरूपाशीं ऐक्य पावून आनंदमय होऊन चैतन्यप्रतिबिंबित वृत्तीच्या योगानें तेथील ब्रह्मानंदाचा भोग घेतो. (शिवाय पातञ्जलयो० शा० चा अभिप्राय साधन पादः २ व कैवल्यपादः ४ पहा.
२	३	[पररमणी]=रमणी ह्मणजे स्त्री प्रकृति. पररमणी पराविद्या [पराप्रकृति. “ देवी भागवत प्र० स्कं० अ २ श्लो० ४ व तृतीय स्कं० १८ श्लो० ३६, ३७ व भगवद्गीता अ० ७ श्लो० ४, ५ आणि मुंडक उ० मुं० १ खं० १ मं ५, ६ याप्रमाणें पहा.]
,,	,,	[निजसुखवर्धक जी धमनी.]=निजसुख=इंद्रियें आणि त्यांचे विषय यांच्या संयोगजन्य सुखव्यतिरिक्त जें अंतःकरणांतील सुख तें. योगाभ्यासानें मन शांत झालें असतां, त्यामधील रजतमादि कल्मष नाहींसे होऊन हें सर्व ब्रह्मच आहे, असें योग्यास ज्ञान होऊन निरतिशय सुखाची प्राप्ति होते, आणि आपल्यामध्येंच आपण तो सुख पावतो, तें सुख अतींद्रिय असून केवळ बुद्धीस ग्राह्य असतें. या प्रकारचें जें सुख तें [वर्धक=] वृद्धिंगत करणारी ह्मणजे साक्षात्कारास साधनीभूत अशी शुद्ध धर्म अधिकाधिक वाढविणारी. पंचदशी ब्रह्मानंदे योगानन्दः प्र० ११ श्लो० ९३ ते ११५ पहा.] धमनी=सुषुम्ना धमनी. सुषुम्ना नावाची शरिरांतील मुख्य नाडी. [क० उ० अ० २ व० ६ मं० १६. प्रश्नोपनि० प्र० ३ मं० ६, ७ व पातञ्जल योगशास्त्र आणि हटप्रदीपका इ० ग्रंथ पहा.]
,,	,,	[घरिं सत्संगा वरिं नि०] योगाभ्यास करणाऱ्या पुरुषांना परब्रह्मप्राप्ति होण्यास सर्वात्मरूप भगवंताचेठिकाणीं केलेल्या निष्काम भक्तीसारखा दुसरा सुखकर मार्ग नाहीं. पण ह्या सर्वांनाही “ सत्संग ” मूळ कारण आहे; दुष्ट लोकांचा समागम हाच जीवात्म्याला बंधन करणारा दृढपाश आहे; आणि तोच समागम त्यानें सत्पुरुषाचे ठिकाणीं केला, तर तें मोक्षाचें उघडें द्वार आहे. (श्रीमद्भागवत स्कं० ३ अ० २५ श्लो० १९, २०). “ वरिं निःसंगाः=संगरहीत

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		असा जो कूटस्थ आत्मा त्याला वर [भ० द्गी० अ० १२ श्लो० ३, ४ पहा.] अन्यपाठ [करितां संगा या निःसंगा । कामचि भंगा हा असत्ता ॥] असा आहे. त्याचा अन्वय=" या निःसंगासंगा करितां हा असत्ताकामचि भंगा." अर्थः= या पदांतील पररमणीचा संग हा वर सांगितल्याप्रमाणें इंद्रियें आणि त्यांचे विषय यांच्या व्यतिरिक्त असल्यामुळें "निसंगसंग" आहे. कारण सुषुप्तीसंबंधीं जो आनंदमय कोश त्याच्या प्रतीतिकाळीं इंद्रियांदि किरणांचा लय होतो. [बृ० उ० अ० ४ ब्रा० २ मं० २।३ व, मैत्रायण ब्रा० उ० प्र० ७ मं० ११ पो० मं० १, २, ३ हे अवश्य पहा.]. या प्रकारच्या संगाकरितां (आत्मप्रतीतीकरिता, प्राप्तीकरितां.) हा "असत्ता कामच" (विषयेंद्रिय संयोगजन्य कामच) पहिल्यानें भंगा=नाहींसा करून टांका. अर्थात् विषयवैराग्य धारण करा असा भाव. सत्ता ह्मणजे माया आणि असत्ता=अविद्या असे मायेचे दोन भेद होतात. सत्ता हा आत्मज्ञानास मुळींच विरोधी नाहीं. याच उद्देशानें तुकोबांनीं एका अभंगांत ह्मटलें आहे (आजवरि होतों तुझे सत्तेखालीं । तोंवरि तूं केली विटंबणा ॥ १ ॥ आतां तुज राहों नेदीं या देशांत । ऐसा म्या समर्थ केला धणी ॥ २ ॥ सोपें रीघ केला कोठें बाळपणीं । होतीस पापिणी काय जाणों ॥ ३ ॥ तुका ह्मणे म्या हा बुडविला व्यवहार । तुझेंचि ढोंपर सोलावया ॥४॥) सोहिरोबांनींही अन्य पदांत (पद्यसं० भा० १ उपदेशपर पदें. पद २ पृ० ९७) म्हटलें आहे कीं "वैराग्य विवेकें संगाविरहित सदैव सुखें हें सेव."
२	४	(मायबाप ते पळत ह्मणी.)=माय=आई अविद्या (कल्पना) व बाप=अहंकार; ही दोन्हीं त्वरित पलायन करितात. ह्मणजे लीन होतात. तुकोबांनीं याच उद्देशानें ह्मटलें आहे कीं (आईबाप दोन्ही जीवेंचि मारावे । चरण वंदावे बायकोचे ॥ १ ॥ (अन्य अभंगः=) सून घरासी आणिली । लेंक पळोनियां गेली ॥ १ ॥ ऐसा तिचा पायगुण सासू गेली ती मरून ॥ २ ॥ सासरा मेला बरें झालें. । घरदार हाता आलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशा नरी । घरोघरीं असाव्या ॥ ४ ॥ सोहिरोबांनीं एका अभंगांत (पद्यसं० "स्फुट काव्यें"

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		पृ० ५७ अभंग २२ यांत) निरंजन सेजे सुलीन कलावंती । भोगिती सततीं योगीराज ॥ १ ॥ अविद्या हे माता अहंकार पिता । टांकिली ममता कन्या कीं हे ॥ २ ॥ याप्रमाणें ह्मटलें आहे.
२	४	[कन्यासुतद्वय [दो ?] पोरें व्याली]=ही पररमणी " त्रिपदाख्य गायत्री " [ही जगाच्या द्विविध स्थितीची सूचक आहे, ह्या दोन स्थिति ह्मटल्या ह्मणजे मूर्त व अमूर्त अशा होत] असल्यामुळें " व्याली " असें ह्मटलें आहे. (दोन पोरें व्याली. कन्या=निष्काम भक्ति, ही कन्या (भ० द्गी० अ० १८ श्लो० ५५ व त्यावरील ज्ञानेश्वरीची टीका ओं० ११३० तथा १२४५ अवश्य पहा). आणि [सुत=आत्मबोध हा पुत्र होय. याविषयीं आचार्यांनीं एका श्लोकांत ह्मटलें आहे. (हा श्लोक " सिद्धांतसंहिता पूवार्ध अ० ८ पृ० १४७ टीप १ येथें सार्थ दिलेला आहे तो तेथें पहावा.) कीं, आत्मबोध आणि ईशभक्ति हीं दोन आपत्यें प्रसवणारी अशी जी शांति पररमणी तिच्याशीं जें रममाण झाले, तेच मात्र मनुष्य, इतर मनुष्यत्वानें आरोपित केलेले पशूच होत.
"	"	(सासू सदरी)=सासू=स्फूर्ति आदिमाया; अर्थात् ही पररमणीची सासू होय. कारण पुरुष ईश्वर हा त्या स्फूर्तिरूप दर्पणांत प्रतिबिंबित झालेला आहे. ह्मणून पररमणि (महामाया) ही त्या पुरुष ईश्वराची शक्ति (प्रकृति) असल्यामुळें आदिमायेची सून झाली. (सोहिरोबाकृ० महदनुभवेश्वरी, अ० ३ पृ० ५३ टीप ३ येथें दिलेली " ब्रह्मवृक्ष वंशावळी " पहा.). याच रहस्यान्वयें असणारें (ग्या नीमला शिवशंकर । पार्वतीवर ॥ ध्रु० ॥ हें तुकोबांचें सुंदर पद का० स० ग्रं० मा. अनेक क० कृ० प० सं० भाग १ यांत प्रसिद्ध आहे) पाहण्याजोगें आहे. (सदरी=सत्+अरी=सद्रूपाच्या विरुद्ध असणारी असद्रूपा. तुकोबांनींही एका पदांत ह्मटलें आहे. [हें पदही सदर संग्रहांत आलें आहे " हिनें चैतन्य झांकिलें । अरूप रूपासी आणिलें । अनंत ब्रह्मांडिंचे पूतळे । नाचवी पहारे ॥ ७ ॥ निर्गुणासी गुण लाविले । निराकार आकारिलें । अनंतासि नाम ठेविलें । जीवित्वासि लाविलें पार ॥ गुरु बोलिला साचार० ॥ ८ ॥ " किंवा सदरीं=शुद्धसत्वचौक (सोहिरोबा-

पद्य.	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
		कृत पद्य सं० भा० ३ पद्य १ लें बखर पृष्ठ ७ पहा. (सघरी असा अन्य पाठ आहे त्याचा भावार्थ हाच असावा कीं:—" बलवान, सधैर्य विलक्षण, दुस्तर (भ० द्रो० अ० ७ श्लो० १४ व त्यावरील ज्ञानेश्वरीची टीका ओं० ६८ त्या १०२ अवश्य पहा).
२	४	(देखुनि नदरीं)=दखुनि='पाहून' याच्या ऐवजीं देखुन ह्मणण्याचा प्रघात वाडीप्रांतीं फार आहे.) नदरीं=डोळ्यांनीं (दृष्टीनें) पाहून तिला (त्या सासूला) ह्या (प्रज्ञारूप) स्थिरबुद्धि पररमणीरूप दिव्य दृष्टीच्यायोगानें पाहून (श्वे० उ० अ० १ मं० ३ व मं० ७ पहा) (त्रिवेणि भदरी (भदरीं ?) (भद्री ?)=त्रिवेणी=तीन नद्यांचे प्रवाह एकत्र मिळतात असें स्थान. (द्विदलचक्र (ॐ) सि० सं० उ० पृ० २० सोबतची चक्रकारिका पहा). पक्षीं. इडानाडी (गंगा), सरस्वति (सुषुम्ना) आणि पिंगला (यमुना). ह्या एकत्र जेथें मिळतात असें स्थान. (भदरी=तडाग, तडागीं. बाजू. कडा. नदीच्या एका बाजूस भदर असें वाडीप्रांतीं ह्मणतात. पक्षीं सुषुम्नेची पश्चिमतड (परपार; किंवा परपारास पोंचविणारी (पार करणारी) तरणी=नौका.
,,	,,	(जी तरणी).=जी=ही पररमणी केवळ ज्ञाननौकाच आहे (मुंडक उ० खं० २ मं० ७ व भ० द्रो० अ० ४ श्लो० ३६ हीं अवश्य पहा.
,,	,,	(गीतेमाजीं दुजीं आठवा.)=भगवद्गीतेच्या (दुजीं) दुसऱ्या अध्यायामध्यें (आठवा अवतार जो श्रीकृष्ण तो दुसऱ्या अध्याच्या साहासष्ठाव्या (साहासष्टांत) श्लोकांत ह्मणतो, हे ! किरीटी ह्मणजे पार्था (नास्तिबुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना । न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥) याविषयीं आचार्यांनीं एका श्लोकांत ह्मटलें आहे कीं " जे शांति रमणीच्या ठिकाणीं रममाण झाले, तेच मनुष्य इतर ते पशू होत. (हा श्लोक "सिद्धांतसंहिता पूर्वार्धाचें पान १६७ टीप १ येथें सार्थ दिला आहे तो अवश्य पहावा).

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
२	४	(याविण सृष्टिं सुख नों दृष्टि)=या विश्व सृष्टीमध्यें (नामरूपात्मक दुःखमय जगामध्यें) या शांति पररमणीविना अन्य सुख म्हणून दृष्टीस पडावयाचें नाहीं. म्हणून तुकोबांनीही म्हटलें आहे (शांतिपरतें नाहीं सुख । येर अवघेंचि दुःख ॥ १ ॥ म्हणवुनि शांति धरा । उतराल पैलतीरा ॥ २ खवळलिया कामक्रोधीं । आंगीं भरती आधिव्याधि ॥ ३ ॥ तुका म्हणे त्रिविधताप । मग जातील आपोआप.) ज्ञानेश्वरी अ० २ ओं ३४२ ती ३५० व अ० ६ ओं० २५४।२५५ पहा)
,,	,,	[रत तत्कंठीं प्रियकरणी]=यासाठीं त्या शांति प्रियकरणीच्याच कंठीं रममाण हो. कंठीं असें म्हणण्याचें रहस्य हेंच असावें कीं, कंठ देशांत [योगशास्त्रोक्त विशुद्धचक्र असून त्यांत] जीव शिवात्मक षोडश ग्रंथींचा अर्थात् अउन्मनाचा लय व्हावयाचा असतो व शांति हा मनाचा अभ्यास आहे.
,,	,,	[विठ्ठलवदनीं वेदही हाचि धर्म वदे]=विठ्ठल परमात्म्याच्या मुखां-पासून निघालेला वेद तोही हाच [सनातन] धर्म सांगतो आहे [हाच म्हणण्याचा हेतु ऋग्वेदादि चारी वेदांमध्यें दोन विद्या सांगितल्या आहेत १ परा व २ अपरा. परा=जिच्या अध्ययनानें निर्गुण निराकार परब्रह्माचें ज्ञान होतें. म्हणून ती परा श्रेष्ठ विद्या होय, व ह्याच विद्येचें गुह्य ह्या पदांत सांगितलें आहे. (मुं० उ० मुं० १ खं० १ मं० ४।५।६ पहा.) पक्षीं (शास्त्री) विठ्ठलाचार्य हा स्वमुखेंकरून हाच वेदप्रतिपादित धर्म सांगतो आहे (म्हणजे मुखानें वरवर बडबड मात्र करितो), परंतु सद्गुरुकृपेवांचून ह्या गुह्य ज्ञानाचें (अपरोक्ष विद्येचें) वर्म काय आहे हें कधींही कळणार नाहीं.
		पद ३ रें.
३	५	पूर्व पदांत [पद २] सोहिरोबांनीं अन्योक्तीनें केलेला हितोपदेश विठ्ठलाचार्यास न आवडून, त्यानें त्यांची यथेच्छ निंदा चालविली, त्यावरून पुनः सोहिरोबांनीं विठ्ठलाचार्यास उपदेशच केला. ठीकच आहे; तत्त्ववेत्त्याची मूढांनीं निंदा केली तरी तो त्यांची उलट निंदा

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		किंवा स्तुति न करितां, जेणेंकरून त्यांस ज्ञान होईल असेंच वर्तन ठेवितो. जेणेंकरून अज्ञान्याला बोध होईल, असेंच आचरण ज्ञान्यानें ठेविलें पाहिजे, कारण ज्ञान झाल्यावर, अज्ञ जनांस उपदेश करण्यांवांचून त्याला दुसरें कर्तव्यच उरलें नाहीं. असो; या कर्तव्यास अनुसरून केलेला उपदेश, हाच चालू पदाचा विषय आहे.
३	५	मनोलय [मनोनिग्रह अथवा मनाची तूष्णि स्थिति] हाच या पदांत मुख्य गर्भितार्थ आहे. येथें अशी शंका येईल कीं:—विठ्ठलाचार्यांनें निंदा केली म्हणून त्याला सोहिरोबांनीं उपदेश केला, असा या पदाचा वास्तविक संबंध असून त्यांत मनोलयाचा उल्लेख केलेला कोठें दिसत नाहीं ? त्याचें उत्तर हेंच कीं, मनामधील रजतमादि दोष जाऊन जो अद्वैत झाला, आणि त्यामुळेंच मीच सर्व भूतांचा आत्मा आहे, असें जो पाहतो, तो कोणाची निंदा किंवा स्तुति कशी करील ? विठ्ठलाचार्यांसारखा वेदशास्त्रपारंगत पुरुष किंवा एकादा नामधारी संन्यासी जोंपर्यंत कामक्रोधादि दोषांनीं व्याप्त आहे, तोंपर्यंत तो अद्वैत झाला असें म्हणतांच येणार नाहीं. (ईशावास्योपनिषद् श्लो० ६ तसेंच श्रीमद्भागवत स्कं० ११ अ० २८ श्लो० ८।९ पहा.)
,,	,,	याप्रमाणें मनोमय होऊत अद्वैत स्थिति बाणल्यास कामक्रोधादि विकारांपासून मोठे अनर्थ होतात. (विठ्ठलाचार्यांचें या प्रकारचें वर्तन हा त्याचाच परिणाम होय.)
,,	,,	या पदांत एकीकडे “अपरभूतात्मा” पक्षी आचार्य विठ्ठल व अन्य बाजूस “ परब्रह्म परमात्मा विठ्ठल ” अर्थात् एक पतीत विठ्ठल व दुसरा पावन विठ्ठल. अशी व्यवस्था केली आहे. आधीं पतीत विठ्ठल व मागाहून पावन विठ्ठल. कारण जर पतीतच कोणि नाहीं तर पावन शब्दाचें प्रयोजनच उरत नाहीं. याच रहस्यान्वयें तुकोबा म्हणतात (जरि मी नव्हतों पतीत । तरि तूं पावन कैंचा तेथ ॥ १ ॥ म्हणुनि माझें नाम आधीं । मग तूं पावन कृपानिधी ॥२॥ लोहो महिमान परिसा । नाहीं तरि दगड जैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे याचकभावें । कल्पतरू मान पावे ॥ ४ ॥.)

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
३	५	आतां अन्य रहस्य असें कीं " तपाच्या योगानें तत्त्व प्राप्त झालेला (सत्त्वाच्या योगानें मन प्राप्त होतें, मनाच्या योगानें आत्मप्राप्ति घडते, व आत्मप्राप्ति झाल्यानें पुनरावृत्ति घडत नाहीं.) आत्मविद्या, तप व आत्मचिंतन, ह्यांच्या योगानें ब्रह्मप्राप्ति करून घेतलेला. [ह्याप्रमाणें जो वागतो तो [हिरण्य-गर्भाच्या] पलीकडे जातो, तो केवळ देवांच्याही वरच्या पदवीस पोंचतो; फार काय पण हें जाणणारा, [आत्मविद्या, तप व चिंतन] ह्या तिहींच्या योगानें ब्रह्मोपासना करील तर त्यास, अक्षय, अपरिमित, अनामय अशा सुखाचा अनुभव घडेल. मग ज्या देहेंद्रियांच्या यो-गानें तो परिपूर्ण असून, त्यांस अगदीं वश झालेला असतो, आणि ज्यामुळें केवळ सारथ्यापारखी त्याची स्थिति झालेली असते, त्यापासून तो मुक्त होऊन त्यास आत्म्याशीं सायुज्य प्राप्त होतें. [मैत्रायण ब्रा० उ० प्र० ४ मं० ४ पहा). असा पुरुष " सोहिरोबानाथ " जो याप्रमाणें सतत उपासनेच्या योगानें परब्रह्म परमात्म्या विठ्ठलाशीं सायुज्य पावला तो. परंतु, विठ्ठलाचार्य हा नीच कर्म करून अघोर गतीला पोंहचला. याप्रमाणें दोन मार्ग दाखविलेले आहेत. रामदासांनीं ह्मटलेलें आहे कीं:-[पहिला भक्त तो कायेचा । दुसरा भक्त तो वाचेचा । तिसरा भक्त तो मनाचा । चौथा भक्त तो वेगळा । अगम्य त्याची लीळा ॥ ३ ॥ [नित्य नैमित्तिक विधिसंग्रह सोपान, जोगीछंद.] याच रहस्यान्वयें भगवंतांनीं गीतेंत अ० ६ श्लो० ६ येथें ह्मटलें आहे (बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः। अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥]
,,	,,	या पदपंचकाच्या पहिल्या व दुसऱ्या पदाचे चरण प्रत्येकीं चार चार याप्रमाणें आहेत. त्याचें रहस्य असें असावें कीं:—" पहिल्या पदांत पर्यायानें ' स्थूलसूक्ष्मादि चार देहांवरील सहज असणारे ' अहं-बुद्धीचें निरसन सांगितलें. दुसऱ्यांत (' तुह्मी भोगा पररमणी, या गर्भितार्थान्वयें) परादि चार वाचांचें लयसाक्षित्व दर्शविलें. पण या चालू पदाचे चरण मात्र " पांच " आहेत, त्याचें कारण हेंच असावें कीं, या पदांत मुख्यतः पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अद्वैतस्थिति

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		बिंबण्यास (मनोलय) उन्मनि अवस्थाः= (तिसरी मुद्रा= मीनमार्ग= ह्याचें लक्षण= " मन निराकाराच्या ठायीं लीन करून जिव्हेनें मौन ह्मणजे निंदा स्तुति इत्यादि वर्ज केलीं पाहिजेत, असें आहे. सि. सं. पृ. व •३० यांत या मुद्रांचीं लक्षणें सांगितलीं आहेत.) प्राप्त झाली पाहिजे अर्थात् जाग्रदादि पूर्वींच्या चार अवस्थांचा त्याग झाला पाहिजे. पुढील चौथ्या पदाचेही पुनः चारच चरण आहेत, त्यांत अव्यक्त चित्त जयाच्या योगानें " विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा; ह्या चार आत्म्याचें लयसाक्षित्व अनुक्रमें दर्शविलें आहे. आतां पुनः पांचव्या पदाचे फक्त तीनच चरण आहेत, त्याचें रहस्य हेंच असावें कीं, पूर्वोक्त रितीनें ज्यास क्रमाक्रमानें योगाची सिद्धी मिळाली त्याचें सच्चिदानंद परमात्म्याशीं (विठ्ठलाशीं) ऐक्य होतें, ह्मणजे तो सत्, चित् आणि आनंद " ह्या तीन पदांनीं युक्त असा युक्तात्मा होऊन परब्रह्माशीं ऐक्य पावतो.
२	६	(स्वगृहींधंदा)=स्वगृहीं ह्मणजे नव द्वारें (इंद्रियें) यांनीं युक्त असें आपलें देहरूप गृह तें सत्य नसून याचा चालक आत्मा (जीव) ब्रह्मच आहे (तो संसारी नव्हे.) असें जाणणें, हा या घरचा वास्तविक धंदा होय. (भ. गी. अ. ५ श्लो. १३ व त्यावरील ज्ञानेश्वरीची टीका ओं. ७३ ती ७५ अवश्य पहा). (अनुवादा)= व्यर्थ बडबड, पाखांडवाद करीत फिरणें. श्रीमद्भागवत स्कं. ११ अ. २१ श्लो. २६, २७ पहा.
,,	,,	(शक्तीहर कीं येइल गिरकी)= कालात्मशक्तीमुळें प्राणोत्क्रमणकाळीं येणारी गिरकी, भोंवळ (भ. गी. अ. १५ श्लो. ७ व श्रीमद्भागवत तृतीयस्कंद अ. २९ श्लो. ३७।३८।३९ हीं अवश्य पहावीं).
,,	,,	(पडशिल नरकीं कीं जीवना). नरक हेंच आहे जीवन ज्याचें अशा, कृमिकीटकादि योनीप्रत जाशील हा भाव. (श्रीमद्भागवत तृतीय स्कं. अ. ३० श्लो. १८ व ३३ पहा).

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
३	६	(सजन सदसी निजयश वदसी)=येथें दोन अर्थ निष्पन्न होतात; पहिला शापानुग्रहसमर्थ अशाप्रकारचें ज्या साधूचें शुद्ध-यश सत्+असी=हीच कोणि एक उत्तम तलवार तिजपुढें स्वतःच्या वैभवाची (विद्वतेची) प्रौढी सांगतोस. दुसरा अर्थ;– सज+न+स+दशी=दश इंद्रियें आणि अकरावें मन, यांसह सज (अल-क्षभुवनामध्यें गमन करण्यास तयार) झाला नाहींस, आणि तशा शुद्ध यशाची प्रौढी सांगतोस (कठ उ० अ० २ व० ५ मं०१ अवश्य पहा.)
”	”	(लाज न घेसी केविं मना)=ज्याला आपण काम, संकल्प श्रद्धा अश्रद्धा धृति, अधृति, लज्जा, बुद्धि, भय असें ह्मणतों, तें सारें केवळ मन होय. ह्मणून “लाज न घेसी केविं मना ” असें ह्मटलें आहे. (मैत्रायण ब्रा० उ० प्र० ६ मं० ३० पहा) (जन्मापा० काय० अघवि० या कर मनना)=जन्म घेतल्यापासून पातकाचाच मात्र संचय करीत आलास, त्या व्यतिरिक्त दुसरें कांहीं मिळविलेंस काय ? कांहीं नाहीं. दुसरें जन्माच्या प्रथम सुरवातीपासून एक कोठलें तरी (काय= देह) देह मात्र मिळवित आलास, त्यावांचून ‘अघविरहित अस [आत्मज्ञान] मिळविलेंस काय ? तुकोबांनीं ह्मटलें आहे [येउनि संसारा काय हीत केलें । आयुष्य नाशिलें शिश्नोदरा ॥ १ ॥ विषय सेवितां कोण तृप्त झाला । इंधनीं निवाला अग्नि कोठें ? ॥ २ ॥ देखोनी मृगजळ भांवावलीं वेडीं । विचाराची थडी न ठाकती ॥ ३ ॥ ऐशिया जिवांची सोय न लाविसी । निष्ठुर कां होसी कृपाळुवा ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा अगाध पैं थोरी । सर्वांचे अंतरीं पुरलासी ॥ ५ ॥]
”	”	[कर मनना.]=मनन कर असें म्हणण्याचा हेतु हाच कीं:— “आत्मा दर्शन, श्रवण, मनन व निदिध्यास ह्यांस योग्य आहे [बृ० उ० अ० २ ब्रा० ४ मं० ५ पहा].
३	७	[म्हणे सोहिरा विठ्ठल व०]=सोहिरोबा म्हणतात कीं, निंदक असा जो विठ्ठल (पक्षी केवळ नामधारी विठ्ठलाचार्य) त्याला पाहतां क्षणींच सचैल स्नान करा; कारण दुर्जनाची संगती अधोगति (नरकवास)

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		देणारी आहे. याप्रमाणें सोहिरोबांनीही पण सचैल स्नान केलेंच आहे. तो प्रसंग पुढच्या (४ थ्या) पदांत येणारच आहे. [भ० गी० अ० १८ श्लो० ६७ व त्या वरील ज्ञानेश्वरीची टीका अवश्य पहा.]
३	७	[पाहतां निंदक स्नान करा]=ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरींत म्हणतात. [जो माझियाचि कां निंदा । माझीच करी ॥ ४ ॥ या कारणें धनंजया । तो भक्त मेधावी तया । तरि नको बापा हया । शास्त्रा आतळों देवों ॥ ५ ॥ काय बहु बोलों निंदका । योग्य स्रष्टयाहि सारिखा । गीता हे कवतिका । लागिंही नेदीं ॥ ६ ॥ ज्ञानेश्वरी अ० १८ ओं० १५०५ ती १५०८ किंवा संपूर्ण, अवश्य पहा.]
"	"	[भीष्मगुरुप्रति फल निधना.]=दुर्जन शिरोमणि जो दुर्योधन त्याची संगती केल्यामुळें (त्याचा पक्ष म्हणजे कैवार घेतल्यामुळें) भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य यांना [फल निधना] मरण प्राप्त झालें. भारती युद्धामध्यें भीष्म आणि द्रोण हे रणामध्यें पतन पावले, एवढे मोठे धनुर्धर आणि इच्छामरणी असतांनाही त्यांना केवळ दुर्जनसंगतीमुळेंच हा प्रसंग गुदरला हा भाव.
		पद ४ थें.
४	७	[स्यान बरें जलवास]=विठ्ठलाचार्यांनें (पक्षी प्रजापति आत्मा) (आचार्य विठ्ठल [मैत्राय० ब्रा०उ० प्र०२ मं०६ पहा] वेदपुरुष). सोहिरोबांस ज्या उदकांत ढकलून दिलें होतें, तें (जलवास) जलरूप वास्तव्य स्थान फारच चांगलें (परमानंददायक) होय. संन्यास धर्मानें अंतःकरणांत नारायणस्वरूप झालेल्या योग्याचें लक्षण या पदांत दर्शविलेलें आहे. [या नारायण शब्दाबद्दल. पद्यसंग्रह भाग १ ला पृष्ठ ११८ टीप १ येथें खुलासा आहे. तो अवश्य पहावा.] दुसरें या पदांत पर आणि अपर [कूटस्थ आणि चिदाभास] अशा दोन प्रकारच्या भूतात्म्याचा प्रकार दर्शविलेला आहे. म्हणजे जो (अपर भूतात्मा) गुणांच्या ओघाबरोबर इकडे तिकडे लोटला जातो, वासनांच्या

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		योगानें कलुषित होतो. तो अस्थिर, चंचल, विकारवश, स्पृहायुक्त व व्यग्र असून त्याच्या ठायीं अभिमानित्व होतें, आणि, तो ' मी आहे ' ' हें माझें आहे ' असें मानितो. तो आपल्या आत्म्याच्या योगानें आत्म्यास बद्ध करितो; परंतु दुसरा पर [शुद्धात्मा ज्याला ब्रह्म, चिन्मात्र, प्रज्ञानघन आदिकरून नांवें आहेत, तो स्वयंनिर्मित सृष्टीच्या ठायीं प्रवेश करून जेव्हां भूतमात्रापासून भिन्न असा दिसत नाहीं, तेव्हां त्यास भूतात्मा असें ह्मणतात.] ज्याला आत्माच असें ह्मणतात. तो वास्तविक पाहतां विकाररहीत व अकर्ता आहे. ' मैत्रायण ब्रा० उ० प्र० ३ मं० १ ते ५ पहा ' जल=पक्षीं चित्-जल=अव्यक्त चित्तरूप जल [भगवद्गीता अ० १२ श्लो० १ ते ८ व अ० १८ श्लोक ५७ ते ६० व त्यांवरील ज्ञानेश्वरीची टीका जिज्ञासूंनीं पहावी.] याच रहस्यार्थाविषयें तुकोबांनीं ह्मटलें आहे कीं, (देव वसे ज्याचे चित्तीं । त्याची धरावी संगती ॥ १ ॥) सोहिरोबा ह्मणतात, या जलवासासारखें परमानंददायक असें अन्य स्थानच नाहीं. ज्या ठिकाणीं विठ्ठलाचार्यासारख्या दुष्ट (खलांचा) लोकांचा उपद्रव स्वप्नांतही असूं शकणार नाहीं. पक्षीं रजतमादि गुणांपासून उद्भवणारे कामादि दोष, यांचा उपद्रव स्वप्नांतही असूं शकणार नाहीं; स्वप्नांत ह्मणण्याचा हेतु हाच कीं, जेथें स्वप्नदेहाचा ह्मणजे लिंगदेहाचाच अभाव असतो, तेथें त्यांचा उपद्रव कसा असेल ? सोहिरोबाच्या देहाचें बंधन करून त्यांस जलांत लोटण्यासाठीं, विठ्ठलाचार्यानें (आनंदमयानें) सोबतीस घेतलेले दुसरे चार अनुयायी पक्षीं अन्नमयादि चार इतर कोश होत. दोरांनीं बंधन केलें ते दोर ' सत्व, रज, तम, हे होत. [भगवद्गीता अ. १४ श्लो० ५।६।७ व त्या वरील ज्ञानेश्वरीची टीका अवश्य पहा] विहिर म्हणजे बुद्धिरूप गुहा होय [मैत्रायण ब्रा०उ०प्र०२ मं०५।६ पहा व व श्वेताश्वर उ० अ०३ मं० २० व अ० ६ मं. १५ हीं जिज्ञासूंनीं पहावीं.]
४	७	[वर वर पाथर]=सोहिरोबांस उदकांत टाकून दिल्याबरोबर त्यांचा जड देह तळास जाऊन बुडावा ह्मणून विठ्ठलाचार्यानें त्यांच्या देहाशीं बांधलेली पाथर जी, तेथें अष्टमहासिद्धी प्रगट होऊन त्यांनीं आपल्या

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ अधिक टीपा.
		प्रभावानें [ज्ञानेश्वरी अ० ६ ओं० २९५ ते २९८ अवश्य पहा.] त्या पाण्यावर तरती केली, व तेंच सिंहासन बनवून त्यावर सोहिरोबांस महाराजांप्रमाणें बसविलें. याप्रमाणें [सजे=तींवर, 'हा [सोहिरोबा] महाराज स्वार झालेला (सज्ज झालेला, आरोहण केलेला.) पक्षीं जड बुद्धि [अपरा=अष्टधा प्रकृतिरूप पाथर (पृथा, पृथ्वीरूपा) तीवर स्वार झालेला. केशवस्वामीनें एका पदांत ह्मटलें आहे कीं:— 'आठ तळुल्या एकत्र जाहल्या । त्या माजीं पडला हिरा रे ॥ केशव ह्मणे उखळाउखळीं । त्यांचा मी डिम्बर झालों रे ॥ १ ॥ हें पद संपूर्ण खालीं दिलें आहे] किंवा सर्वांचा पितामह जो (आचार्य) त्याचें रक्तवर्ण कमलासन, अर्थात् त्या पितामहाशीं ऐक्य पावलेला सोहिरोबा त्या आसनावर महाराजाप्रमाणें स्वार होऊन सज्ज झाला, ह्मणजे ती प्रकृति आपल्या स्वाधीन करून घेतली हा भाव. [तैत्तिरीय उ० व० १ अनुवा० ६ मं० १।२ पहावे] यांत केवलकुंभक प्राणायामाच्या सिद्धीची खुण आहे असें वाटतें. रहस्य हेंच कीं भगवंतांनी गीता अ० २ श्लो० २३ येथें सांगितल्याप्रमाणें [नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥] असणाऱ्या आत्म्याशींच जो ऐक्यत्व पावला, त्याला जळ बुडवील कसें ? याविषयीं तुकोबाचे [१ हरिचिया भक्तां । नाहीं भय चिंता ॥ १ ॥. [२] प्रारब्ध क्रियमाण । भक्तां नाहीं जाण ॥ १ ॥. [३] ध्यानीं योगीराज बैसले कपाटीं ' हे तीन अभंग, ' [३] निर्णयसागरांच्या गाथेंत अनुक्रमें २०८७।२०८८।२०८९] जिज्ञासूंनीं अवश्य पहावे]
४	७	[नवविध कांता] कांता=स्त्रिया=ह्या नवविधा भक्ति किंवा नवनिधी होत. श्रीमद्भागवत स्कं० ३ अ० २३।२४ येथें सांगितलें आहे, कीं योगशास्त्रोक्त अमृतबिंदु नामक तीर्थामध्यें स्नान घडलें असतां, दिव्य शांति प्राप्त होते. व नवनिधी प्राप्त होतात. भगवान कर्दमऋषीनें योगसामर्थ्यानें स्त्री देवहूतीला अर्धें शरीर आहे, असें मानून आपल्या स्वरूपाचे नऊ विभाग करून तिच्या ठिकाणीं रेत स्थापन केलें, त्यामुळें तिचे ठिकाणीं नऊ कन्या झाल्या, त्या कन्या, जगाची उत्पत्ति करणाऱ्या ब्रह्मदेवानें, कर्दम देवहूति यांच्या संमतीनें मरीचि अथर्व प्रभृति ऋ

पद्य	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		ऋषींना दिल्या. सविस्तर मूळांत पहा. दुसरें श्वेताश्वतर उ० अ० १ मं० ४ यांत सांगितलेल्या आठ प्रकारच्या सिद्धि व नऊ प्रकारच्या तुष्टि हेंच या नऊ संख्येचे गुह्य आहे.
४	७	(दिव्य सुमनता.) त्या नवविध स्त्रियांनीं दिव्य या प्रकारचीं सुमनें (पुष्पें) घालून सोहिरोबांची केलेली पूजा. दुसरें दिव्य म्हणजे तेजोमय, अमृतमय, पूर्णचंद्रोपमेय, सन्मनाची नवविधा भक्तीच्या योगानें हातास सांपडलेली आनंदता. (दे हातास)=यांत दर्शविलें आहे कीं, चित्तशुद्धि झाली असतां, स्वर्गादि लोकींचीं सर्व ऐश्वर्यें आपोआप इच्छा न करितां प्राप्त होतात. हातास चढणें, तळहातावरील पदार्थाप्रमाणें कोणचाही पदार्थ प्राप्त होणें, हा, लौकिक शब्दार्थ, परंतु रहस्य असें आहे कीं:— विराट पुरुष (परमात्म्याचा नारायण नामक आद्यावतार=श्रीमद्भागवत तृतीय स्कंद अ० ६) त्याच्या हस्तापासून उत्पन्न झालेले माहेंद्रादिलोक. अर्थात् हातामध्यें असणारें दैवत इंद्र यांना उद्देशून लिहिला असावा. या पदांत विद्यानंदाच्या अनुभवाची खुण आहेसी वाटते. ह्याच आनंदाची प्राप्ति पांडुपत्नि पृथा (कुंती) हिनें करून घेऊन चित्तजय संपादन केल्यामुळ, तिला (सुमनता प्राप्त होऊन) इंद्रासारख्या देवापासूनही उपभोग मिळाला.
,,	,,	(ज्ञानतोय हे तरणिच पाहें. इतरचि०)=सोहिरोबा म्हणतात, कीं या विहिरींतील पाणी हें ज्ञानतोय (ज्ञानस्वरूप उदक) होतें, म्हणून आपण त्यांत बुडालों नाहीं. इतर डोहांतलें जळ जें, जड पदार्थ बुडवून रसातळास पोंहोंचवीत असतें, तशा प्रकारचें हें जल नव्हे, इतकेंच नाहीं, तर हें तोयही केवळ एक तारून नेणारी (तरणिच) नौकाच आहे ! पहा ! त्या नौकेनेंच योगी तरून जातात. याबद्दल ' या पदपंचकांतील पद २ रें चरण २ (जी तरणी) येथें स्पष्टिकरण केलें आहे.
,,	,,	(गंगागंगेतियोब्रुयांचें०) गंगे+गंगेतियोब्रुयात्+चें=गंगेंत प्रत्यक्ष जाऊन स्नान न करितां, नुसतें गंगा गंगा असें त्रिवार मुखानें म्हटलें असतां मनुष्य मुक्त होतो, असे गंगास्तुतीमध्यें सांगितलें आहे.

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		सोहिरोबा ह्मणतात ! तर मग ! मी तर ! प्रत्यक्ष त्या गंगेंतच होतों, त्या अर्थीं (त्याचें) त्या गंगास्तोत्रांत सांगितलेल्या प्रकारचें जें वास्तविक फल तें (दे) मला दिलें; आणि ज्या फलाच्या (सत्यरूप फलाच्या) प्राप्तीनें जन्ममरणरूप सर्व संसार (भव) हरण केलेला आहे. (सोहिरोबांचा सि० सं० पू० अ० ९ पृ० २०९ श्लो० ३८ व त्याची टीका पहा.
४	७	चंफा माता(आ)चार्यचि त्राता=सोहिरोबा ह्मणतात कीं:-विठ्ठलाचार्यांची प्रीय पात्र स्त्री जी चंफा ती आपली माता होय. आणि चार्य ह्मणजे विठ्ठलाचार्य (त्राता भवसमुद्रांतून तारून नेणारा) हा आपला (पिता) त्राता होय. या उभयतांचा जो संगविलास झाला, त्यामध्यें आपलें पूर्व संचित व्यालें:-असें ह्मणण्याचा हेतु असा असावा कीं:-' या प्रकृति पुरुषांचा संबंध ' 'अज+अजा ' या प्रकारचा आहे [अजा-मेकां लोहितशुक्लकृष्णा बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाः । अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्यः ॥ ५ ॥ श्वे० उ० अ० ४ भावार्थः—एक लाल पांढरी आणि काळी अजा [जिला जन्म नाहीं अशी. लौकिक अर्थ बकरी.] आहे, ती एकरूपा असून पुष्कळ प्रकारची प्रजा उत्पन्न करीते. एक अज आहे तो तिजवर प्रीति करितो, आणि तिच्याशीं शयन [संगविलास] करितो; दुसरा एक अज आहे तो ह्या भोग भोगलेलीला सोडून जातो.] ह्मणजे यांच्या संगामध्यें संचित उत्पन्न झालें. पक्षीं पिता आचार्य ह्मणजे चिदात्मा (जीव) व माता [चंफा] चैतन्याधिष्ठित शक्ति [चितिशक्ति] यांच्या संभोगामध्यें इच्छारूपी संचित प्रारंभीं उत्पन्न झालें. तेंच सकल जीवांच्या प्रारब्धाचें मूळ होय. [पंचदशी, द्वैतविवेक, श्लो० १० तें १४ पहा.] व तेंच निमित्त कारण होऊन हा सहजच आपल्यास संन्यास घडला; असें सोहिरोबा म्हणतात. याविषयीं केशवस्वामीचें सुंदर पदः— [पद ॥ सिद्धांत हा चोख रे ॥ अनुभवी जाणती तें खरें ॥ ध्रु० ॥ त्रिवेणी शेळी गाभणी झाली । म्हैशासी ते प्रसवली । त्याचेनि संगें रूपासि आली । गगनासि पाघर घाली रे ॥ सि० ॥ १ ॥ ढवळे गाईचा शिंगाडा पाडा । तो निजबळें अति गाढा । आंगिचेनि बळें सरसावला । तेणें जिंकिला रायाचा घोडा रे ॥ सि० ॥ २ ॥ वृद्ध

पद्य.	पृष्ठ.	पद्यांचा अर्थ.
		संन्यासी वेश्येसि रतला । पंचवीस पुत्र व्याला रे । अनामिकासी शरण गेला । त्यानें शुद्ध बुद्ध त्यासी केला रे ॥ सि० ॥ ३ ॥ निंबाच्या झाडीं एक आंबा जो लागला । वांझेच्या वळभीं नेला रे । सेवूं गेला तो जिवेंचि मेला । मरोनि परता झाला रे ॥ सि० ॥ ४ ॥ आठ तळुस्या एकत्र झाल्या । त्यामाजी पडला हिरा रे । केशव म्हणे उखळा-उखळीं । त्याचा मी डिम्बर झालों रे । गुरुमुखें याचा उगल करावा । नेणोनि म्हणती हें कोडें रे. ॥ सि० ॥ ५ ॥] श्रीमद्भागवत तृतीय स्कंद अ० २८ यांत भगवंत कपिलांनीं सांगितलें आहे कीं:—"योगेंकरून जेव्हां विवेकी पुरुष स्वस्वरूपाचे ठिकाणीं रममाण होतो, तेव्हांच त्याला ब्रह्मलोकापर्यंत सर्व लोकांविषयीं वैराग्य उत्पन्न होतें; नंतर माझ्या ठिकाणीं निरतिशय प्रीतीनें युक्त, व आत्मस्वरूपाचें तत्त्व जाणणारा तो भक्त माझ्या अत्युत्तम अनुग्रहानें स्वस्वरूप साक्षात्कार झाला, म्हणजे 'देहाद्यभिमानरूप संशयरहीत' व धैर्ययुक्त होत्साता माझ्या आश्रयानें राहणाऱ्या परमपुरुषार्थरूप कैवल्य नामक आपल्या निरतिशयानंदरूप स्वरूपास सहज पावतो. प्रारब्धकर्मांच्या शेवटीं लिंगशरिराचा नाश होऊन, ह्या स्वरूपास जाऊन पोहोंचलेला योगी पुन: मायारूप संसारांत कधींही पडत नाहीं."
४	७	[म्हणे सोहिरा शेषशाई हा । झाला विठ्ठ०]=येथें सोहिरोबांनीं आपलें व आपल्या पित्याचें नाव मोठ्या खुबीनें दर्शविलें आहे, सोहिरा शेषशायी या शब्दानें अनंतशयन आत्म्याशीं आपलें ऐक्य दाखवून पुढें आपल्या पित्याचें नाव 'अनंत' हें गुह्यार्थानें [विनावांदाखल] दर्शविलें आहे. [शेषोऽनंतो वासुकिस्तु सर्पराजोऽथ गोनसे ॥ ४ ॥ इत्यमरः] अनंतशयन नारायण स्वरूपाप्रत पोंहोंचलेला हा सोहिरा परमात्मस्वरूप जो परब्रह्म विठ्ठल त्याचा दास झाला असा भाव.
"	"	[खळ मित्रासम मानुनि केला । क्षिर०]=दीक्षित विठ्ठलाचार्य खळ खरा, परंतु समदृष्टि झालेल्या सोहिरोबांनी त्याला मित्र असें मानिलें, कारण त्याच्याच कृतीमुळें त्यांस [सोहिरोबांस] हा प्रत्यक्ष क्षीरसागरवास घडला. पक्षी खळ विठ्ठल म्हणजे अनीशत्वाच्या योगानें मोहांत पडलेला

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
		असा पुरुष व दुसरा ईश हे परस्परांस कधीं न सोडून जाणारे मित्र आहेत [श्वेताश्वतर उ० अ० ४ मं० ६, ७ अवश्य पहा.
		पद ५ वें.
५	८	या पदांत चरण दुसरा यांत [निर्विकार ज्यासी] असें आहे, तेथें [निराकार निर्विकार ज्यासी] असें पाहिजे आहे. या पदांत सच्चिदानंद परमात्म्याशीं जीवात्म्याचें ऐक्य दर्शविलें आहे याबद्दल तेथें खालींच खुलासा केला आहे, म्हणून येथें विस्तार केला नाहीं.

सोहिरोबानाथकृत पद्यसंग्रह भाग २ याचें शुद्धिपत्र.

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध पूर्ण व पाठभेद.
	१ प्रासंगीक पदें.	
	पद १ लें.	
१	प्रासंगीक आणि वेदांत विषयक पदें व अभंग	प्रासंगीक आणि वेदांतविषयक पदें
"		॥ ध्रु० ॥
"	विषवत् या त्रिषया	विषवत् या विषयां
"	विरचित याशी	विरचित यांशी
"	ह्मणे सोहिरा विठ्ठल वदनी धरा	(अन्यपाठ) ह्मणे सोहिरा विठ्ठल ध्यानीं धरा०
२	या निरसगा	या निरसंगा
	टीप.	
३	या पदाच्या टीपा लेखांत (टी. १ पृ० ३) " पुढें थोडासा मळ दग्ध झाल्यावर " असें वाक्य आहे; परंतु त्याच्या पूर्वी (शुद्ध व पूर्ण भागांत दाखल केल्या-प्रमाणें) मजकूर पाहिजे आहे.	वैराग्य चार प्रकारचें; त्यांत, विषयांत इंद्रियांची प्रवृत्ति करविणारें जे काम, क्रोध इत्यादि चित्तमळ; त्यांचा दाह करण्याकरितां जो प्रयत्न तें यतमान संज्ञा वैराग्य होय.
	पद २ रें.	
३	॥ धृ० ॥	॥ ध्रु० ॥
"	घरिं सत्संगा वरिं निःसंगा	(अन्यपाठ):–करितां संगा या निःसंगा
४	सासू सदरी	(अन्यपाठ):–सासू सबरी (सदरीं)
"	त्रिवेणि भदरी	(अन्यपाठ):–त्रिवेणि भद्री(भदरीं)
	पद ५ वें.	
८	॥ धृ० ॥ निर्विकार ज्यासी	॥ ध्रु० ॥ निराकार निर्विकार ज्यासी
	टीप.	
"	(टीप १ पंक्ति ६) झाले विचक्षणे	झाले विचक्षण
११	(अलिजा बहादर शिंदे सरकार०):–	यां मजकुराचा संबंध पुढें (पृ० १२) पद ७ तीं ९ यांशीं आहे

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध पूर्ण व पाठभेद.
	पद ७ वें.	
१२	(टी. १ पं. १२) दुखिया घर बरागी	दुखिया घर बैरागी
	पद ९ वें.	
१४	पृथक पंथका न्यारा	(अन्यपाठ):–राजाध्यक्ष यांजकडून मिळालेल्या वहींत आहे तो येणें-प्रमाणें:–" पथर पथरका कूरा " परंतु आह्मीं दिलेला पाठ रहस्याशीं जुळता असल्यामुळें दिलेला आहे.
१५	(पृ. १४ वरील टी. १) पडत नाहा	पडत नाहीं
"	(तमबा डूबे	(तुमबी डूबे
"	भवसागराचें	भव सागरासच
	२ वेदांतविषयक पदें.	
	पद १ लें.	
१६	स्वसुख वसती	स्वसुखवसंतीं
	पद २ रें.	
१७	आदि अत पाहतां	आदि अंत पाहतां
	पद ३ रें.	
२१	(टीप ३) विर–जलें	विराजलें
२२	(टीप १) निधम गायामय	निर्धर्म मायामय
	पद ५ वें.	
२६	(चरण २) विकासी लल्लाटरे	विकासो लल्लाट रे
	पद ८ वें.	
३२	(चरण ३) ब्रह्मरसें धाल्य	(अन्यपाठ):–ब्रह्मानंदें धाल्य
	पद १६ वें.	
३९	[टीप ३] आहे तें महा	आहे तें पहा
	पद २० वें.	
४३	(चरण १) नहीं त्यांतले	नहीं आह्मी त्यांतले

पृष्ठ	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध पूर्ण व पाठभेद.
	पद २३ वें.	
४७	त्यानेंचि चले (चरण ६ यांत) 'त्यानेंचि, यावर टीपेचा अंक (९) पडला आहे तो (१) पाहिजे व चरण (७ यांत) 'चिन्मय बोध' या शब्दावर (१०) अंक पडला आहे तेथें (२) पाहिजे.	त्यानेंचि=(पहिल्यानें या पदाच्या टीपेंत (टी० १) सांगितलेल्या) परब्रह्माच्या योगानें व "चिन्मय-बोध=आत्मबोध" यावर कठो नि-षत् अ. २ व. ५ मं. १३।१४ यांच्या आधारें तेथें टीप दिली आहे; ती (२) अंकावरची समजावी.
	पद ३६ वें.	
५७	पूर्णानंद जीव घाला	पूर्णानंदें जीव घाला
	पद ७२ वें.	
७५	हा जाव घाला	हा जीव घाला
	पद ७५ वें.	
७६	(टी. १०) ब्रह्मचक्रांत होणारा ध्वनि	हृदयस्थानच्या अनाहतचक्रांत होणारा ध्वनि
	पद ८० वें.	
८[illegible]	(चरण ५) शिवपण लोह	शिवपण लाहे
	पद ८८ वें.	
८५	भवार्क हा ततवेळां	भवार्क हा तप्तवेळां
	पद ११४ वें.	
९५	(चरण २) आनंद कदीं	आनंदकंदीं
	पद १२२ वें.	
९७	(चरण २) देह विदेह हें जयाला	देह विदेह हें जाय लयाला
	पद १२९ वें.	
१०२	(टीप १) तसें शात झाल्यावर	तसें ज्ञान झाल्यावर
१०४	(टीप. १) अहकार	अहंकार

सोहिरोबानाथकृत पद्यसंग्रह भाग २ यांतील पदांची सूची

ॐ

योगिराज सोहिरोबानाथकृत
पारमार्थिक पद्यसंग्रह.

भाग ३ रा.

बखर, श्लोक, अभंग इ०

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १ ॥

भगवद्गीता अ. ४.

हा

भगवंत बाळकृष्ण पै, रायकर.

व

डा० अनंत नारायण सांबारे, एल, एम, एन्ड एस.

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन
जुनाट हस्तलिखित प्रतींच्या आधारें तयार केला.

तो

'इंदुप्रकाश' स्टीम प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केला.

सन १९०७.

किंमत १ रुपया.

कैलासवासी

नामदार न्या. मू. काशिनाथ त्रिंबक तेलंग.

एम. ए., एल.एल. बी., सी. आय्. ई., इ. इ.

यांची लोकोत्तर विद्वत्ता, देशसेवा, तसेंच नि-

ष्कलंक व पवित्र आचरण, वगैरे अनेक

गुणांचें हें अल्पसें स्मारक म्हणून हा

भाग त्यांस प्रकाशकानें अत्यंत

आदरानें अर्पण

केला आहे.

प्रकाशक,

भगवन्त बाळकृष्ण पै रायकर.

प्रस्तावना.

सर्वव्यापिनमात्मानं क्षीरे सर्पिरिवार्पितम् ।
आत्मविद्या तपोमूलं तद्ब्रह्मोपनिषत्परम् ॥ १६ ॥

४ श्वेताश्वत० उ० अ० १.

श्रीसोहिरोबानाथ हे सत्पुरुष सावंतवाडी संस्थानापैकीं बांदें (एदिलाबाद) या गावीं सुमारे पावणेदोनशें वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांनीं ब्रह्मतत्त्वाचें विवेचन करून योगसाधनादि अनेक मार्गांचें फारच सुलभ साध्या भाषेंत उत्तम रीतीनें स्वानुभव सिद्ध व मार्मिक असें निवेदन केलें आहे. [धन्य सोहिरोबा साधु समर्थ । श्री गहिनीचा अवतार सत्य । तारावया जड जीवांतें । जन्मले नाथ भूठायीं ॥ १०८.॥ नानातऱ्हेचीं करूनि पदें । पूजिलीं जेणें भगवत्पदें । उद्धरोनि जग विविधें । स्वात्मपद सेविलें पैं ॥ ११८ ॥ शेवटीं तो संत सोहिरा । पांडुरंग मुकुटीं जडला हिरा । तेणें किरिट दिसे साजिरा । लाजवी दिनकरा स्वप्रकाशें ॥ ११९ ॥ [राजाराम प्रासादीकृत भक्तमंजरी माला ग्रंथ. अध्याय ९४ वा.] यांच्या प्रेमळ व ज्ञानप्रचुर काव्यापैकीं "सिद्धांत संहिता अ० १८ संस्कृत प्राकृत" हा ग्रंथ, व प्रासंगीक व वेदांत विषयक पदांचा एकत्र समावेश करून त्यास पद्यसंग्रह भाग दुसरा असें नांव देऊन, पूर्वी "योगिराज सोहिरोबानाथ" या नांवाच्या त्रैमासिकामध्यें छापून प्रसिद्ध केलींच आहेत, व आतां यांच्या कवितेपैकीं बखर, सवाया, श्लोक, अभंग इत्यादि पद्यांस "पारमार्थिक पद्यसंग्रह भाग तिसरा" असें नांव देऊन, आमच्या प्रिय, श्रद्धाळू महाराष्ट्रीय बांधवांस सप्रेम अर्पण करीत आहों. मंगलरूप परमेश्वरानें अशी सुसंधी त्वरित जुळवून आणली ही त्याची कृपा होय. याच भागांत यांचे किरकोळ लहान लहान

ग्रंथही द्यावे असा प्रारंभीं विचार होता, म्हणुनच माथाळ्यास "स्फूट काव्यें व किरकोळ ग्रंथ श्लोक इत्यादि" असें लिहिलें होतें, परंतु किरकोळ ग्रंथांचा समावेश एका पृथक् भागांत करणें इष्ट वाटलें, म्हणून तशी व्यवस्था करून हा भाग पुरा केला आहे. या भागांतील पद्यांपैकीं पद्य पहिलें शिवाय करून बाकीचीं पद्यें "सोहिरोबा आंबिये कृत पदसंग्रह, नांवाच्या पुस्तकांत श० १८०६ या वर्षी आम्हीच प्रसिद्ध केलीं होतीं. त्या काळीं सांपडलेल्या हस्त लिखित पोथ्या फार अशुद्ध असल्यामुळें त्या संग्रहांत बरींच अशुद्धें राहून गेलीं होतीं. तीं हल्लीं मिळालेल्या पोथ्यांवरून होतां होतील तेवढीं शुद्ध करून घेतलीं आहेत. पद्य पहिलें (बखर) हें गद्यात्मक काव्य आजवर उपलब्ध न झालेलें असें आहे; व हें बरेंच दुर्बोध असल्यामुळें, याजवर परिशिष्टरूपानें शेवटीं संक्षिप्त टीकालेख यथामति जोडलेला आहे, त्यांत चुका असावयाच्याच. परंतु उद्देश एवढाच कीं या लेखाच्या निमित्तानें मूळ विषयाकडे जिज्ञासूंचें लक्ष लागावें. व्यवहारदृष्टि सर्वांना आहे. तात्विकदृष्टि प्रायः नाहींच. ब्रह्मज्ञानाच्या लाभाची सर्वांस अपेक्षा आहे, परंतु मार्ग उमगत नाहीं; तो ह्या लहानशा पुस्तकाच्या साह्यानें कळेल, व साधनें आणि युक्त्या मिळतील, व ब्रह्मज्ञानाची थोडीसी गोडी कळेल. बऱ्याच ठिकाणीं हस्तदोषामुळें चुका राहून गेलेल्या आहेत; त्यासाठीं शेवटीं शुद्धिपत्र जोडलें आहे. परिशिष्टांतील पान १६ येथें असलेल्या चुकीची दुरुस्तीहि शुद्धिपत्रांत केलेली आहे; तरी तिकडे लक्ष पुरवावें.

या भागांत दिलेलीं पद्यें ज्या हस्तलिखीत पोथ्यांवरून शुद्ध केलीं; त्या कोणाकडून मिळाल्या हें पुढें दर्शविलें आहे.

१ रा. रा. दत्तात्रय यशवंत (राजाध्यक्ष) उसपकर; वास्तव्य वेंगुर्लें यांनीं सत्पुरुष "पूर्णदास उर्फ बाबा उपसकर" यांच्या समाधिगृहांतील हस्तलिखीत ग्रंथसंग्रहालयांतून काढून दिलेल्या पोथ्या.

२ रा. रा. शंकरराव भिकाजी गंगणेकर; वास्तव्य मुंबई यांनीं दिलेल्या हस्तालिखीत पोथ्या.

याबद्दल या सद्गृहस्थांचे आणि या पद्यांच्या जीर्णोद्धारार्थ द्रव्यद्वारा व अन्य तऱ्हेनें केवळ निरपेक्षबुद्धीनें ज्यांनीं साहाय्य केलें त्यांचे आम्हीं अत्यंत ऋणी आहों.

शेवटीं ज्याच्या कृपेनें येथवर सुरळीत काम चाललें, त्या दयाघन परमेश्वराचे आभार मानून हा विनंतीलेख पुरा करितों.

मिति चैत्र शुद्ध १ शके १८२८.

प्रकाशक,

भगवंत वाळकृष्ण पै रायकर.

या भागांतील पद्यांचा विषयानुक्रम.

सोहिरोबानाथकृत

पारमार्थिक पद्यसंग्रह.

स्फूट काव्यें व किरकोळग्रंथ श्लोक इत्यादि.

१ बखर गद्यात्मक.

श्रीमन्महाभिषेकविशेषत्वाधिकारनिजानंदनिलयनिवासितप्ररुढस्वानुभूतिपुलिनानंदविहितनिमग्नमहानुभावलालनलीलपराप्रमेयप्रेमार्जितविभवमोचनसुर सहायशीलनिष्कलंकआरामरमणकलिमलदहनलोकलालनलीलगहनमनमोहनवि

---

१ बखर ह्मणजे खलिता जसें एकादा मांडलिक, सरसुभा, मुजुमदार, (इलाखाधिपति) त्याजकडे संपविलेल्या प्रांतांत कांहीं अव्यवस्था, दंगेधोपे, बंड, परचक्र, इत्यादि प्रसंग गुजरले असतां, आपल्या मुख्य चक्रवर्ति सार्वभौम राजापाशीं, त्यासंबंधानें कुमक पाठवून योग्य बंदोबस्त करण्यासाठीं खलिता (धामधुमीच्या हकीगतीचा गोषवारा) लिहीत असतो; तद्वत् " सच्चिदानंद परमात्म्यापाशीं " चिदात्मा जो (जीवात्मा) तो आपल्याकडे संपविलेला [याठिकाणीं ' सोहिरोबांनीं, ' जर्जरा किल्ला असें नांव, योजिलें आहे; त्याचें कारण; देहदुर्ग किल्ला हा (शरीरे जर्जरे भूते व्याधिग्रस्ते कलेवरे) याप्रमाणें होऊन नाश पावणारा आहे. आणि हा दुर्ग दुर्गमही आहे [" दुर्लभो दुर्गमो दुर्गो " असें विष्णुसहस्रनामांत ह्मटलें आहे. मोठ्या कष्टें जो योग्यांस । सत्य असें जाणावयास । ह्मणून कवींनीं नाम त्यास । दुर्गम असें ठेविलें ॥ ७८ ॥ ब्रह्मज्ञान जाणण्याला । विघ्नें फार प्रयास ज्याला । ऐशा कष्टें प्राप्त होई तयाला । दुर्गनाम अर्पिलें]. विराट पुरुष शहरांमधील " " कायादुर्ग किल्ला " याबद्दल विशेष धामधुम झाल्याची हकीगत कळवीत आहे कीं:—या किल्ल्यावर माझी नेमणुक करण्याचा आपला मूळ हेतु असा कीं, म्यां जीवानें हा संसारदुर्ग तीन्हीकाळीं खोटा असून जन्ममरण फल देणारा आहे, प्राण्याचें कर्म हेंच त्याचें मूळ आहे, तो परमविस्तीर्ण आहे, विपरित ज्ञान, मी श्रेष्ठ आहें असा गर्व, हर्षवृत्ति, इत्यादि त्या दुर्गाला जणुं काय अनेक दरवाजे आहेत. काम, (प्रिय विषयांविषयीं इच्छा) क्रोध, (इच्छेला प्रतिबंध झाला असतां उत्पन्न होणारी रोषवृत्ति) लोभ, (विषयसंरक्षणबुद्धि) इत्यादिकां-

स्तारतारकप्रणतप्रतिपालकभक्तजनवत्सलजगदखिलपालनसत्यसेतुसकलकला-निधिअगाधसुहृदउन्मनमंचकविराजितकरुणार्णवश्रीसच्चिदानंद स्वामींचे शेवेशीं, विज्ञापना येथील वर्तमान आजतागायत स्वामिचरणार्त सूचितसमयीं स्वानु-गतस्वहितभाव निजस्वामींचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे.

विषयीं यथार्थ ज्ञान करून घेऊन, श्रवण, मनन, निदिध्यासन, इत्यादि अनुष्ठानानें मी असंग आहें, मी कोठेंच असक्त होत नाहीं असा निरंतर अनुभव हेंच (असंग शस्त्र नेहमीं धारण करून) सतत वासुदेवाचें (वासु-देव=वा+असुदेव ह्मणजे वा–विकल्पानें, पर्यायानें असूनांम् प्राण व इंद्रियें यांचा–देव प्रकाशक सर्व प्राणेंद्रियांना प्रकाशित करणारा आत्मा) जो तूं त्या तुझें चिंतन करणारा असून, सतत धैर्योत्साहयुक्त राहून, ऐहिक सर्व कर्तव्यें यथान्यायें करून, आणि आपल्या कर्माचरणाच्या असंख्य दोषांपासून मुक्त राह-ण्यास्तव आपलें अंतःकरण शुद्ध ठेवून, अनन्यभावेंकरून नेहमीं तुला शरणागत होऊन त्यायोगें मीं आपल्या मूळच्या (ह्मणजे तुझ्याच स्वस्वरूपास) स्वरुपीं मिळून जावें, असा आपला मूळ उद्देश, तो वास्तविक आहे, कारण—(सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । जोंवरी हा प्राण जाय त्याचा ॥ १ ॥ आणिकांचा धाक न धरावा मनीं । निरोपावचनीं टळों नये ॥ २ ॥ समय सांभाळुनी आगळें उत्तर । द्यावें भेदी वज्र तयापरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरी ह्मणावें सेवक । खादलें तें अन्न एक होय ॥ ४ ॥) जेथ पावतों (बाल्यावस्थेंत) आपल्या वासुदेव स्वरूप चित्ता-त्मक व्यवस्था या किल्यांत होती तेथपर्यंत ह्या आपल्या एकनिष्ठ सेवकाच्या अज्ञान स्थितीमध्येंही, या किल्ल्याच्या बंदोबस्तासाठीं आपण नेमलेले कामगार, आपल्या मूळ उद्देशानुरूप, कर्तव्यतेस स्मरून यथास्थितपणें याची देखरेख करीत होते.

सत्त्वं विशुद्धं वसुदेवशब्दितं यदीय ते तत्र पुमानपावृतः ॥
सत्त्वे च तस्मिन्भगवान्वासुदेवो ह्यधोक्षजो मे मनसा विधीयते ॥ २३ ॥
[भागवत च० स्कं० अ० ३]

भावार्थः—शुद्ध अंतःकरणालाच वसुदेव ही संज्ञा आहे कारण त्या निर्मल अंतः-करणांत, तो षड्गुणैश्वर्य पुराणपुरुष भगवान् वासुदेव कोणत्याही प्रतिबंधाशिवाय अनुभवास येतो. त्याचें स्वरूप इंद्रियगोचर नाहीं. अशा त्या परमेश्वराची मी नम-स्कारानें नित्य आराधना करीत असतों. याप्रमाणें शिवानें गिरिजेस सांगितलें आहे. परंतु पुढें प्रौढ दशेंत स्वतः माझीच पत्नी अविद्या कामादि म्लेच्छ वैरीयांस लुब्ध होऊन रत झाली त्यामुळें ह्या किल्यातील एकूण एक वाटा त्यांस कळून येऊन, त्या म्लेच्छांचा किल्यांत प्रवेश झाला; त्यांनीं किल्ला ताब्यांत घेऊन आपलें निशाण

यानंतर इकडील हकीगत. स्वामीची आज्ञा घेऊन निजसत्तेचा[३] अंश शिरीं

या किल्यावर फडकाविलें आहे. त्यांच्या मेळांत आमचा मनाजपिंत मुजुमदार गुंग होऊन किल्यांत असुर जोरा फार माजला. त्यामुळें माझें कांहीं शहाणपण चालत नाहीं तर अशा समयीं स्वामीनीं कृपा करून आपले अति विश्वासु सरदार ' हठयोग, दम ' ' आणि राजयोग, शम ' हे दोघे पाठवून द्यावे. त्यांच्या अतुल पराक्रमामुळें या किल्यांतील रिपुभावना मिथ्या होऊन जाऊन स्वामीचा व माझा बोज राहील. अशा प्रकारें जीवानें (सच्चिदानंद परमात्म्यापाशीं) हा खलिता लिहिलेला आहे. (श्रीमद्भा० तृ० स्कं० अ० ९ श्लो० ८।९).

क्षुत्तृट्त्रिधातुभिरिमा मुहुरर्द्यमानाः शीतोष्णवातवर्षैरितरेतराच्च ।
कामाग्निनाऽच्युत रुषा च सुदुर्भरेण संपश्यतो मन उरुक्रम सीदते मे ॥८॥
यावत्पृथक्त्वमिदमात्मन इंद्रियार्थमायाबलं भगवतो जन ईश पश्येत् ।
तावन्न संसृतिरसौ प्रतिसंक्रमेत व्यर्थापि दुःखनिवहं वहती क्रियार्था ॥९॥

भावार्थः—हे अच्युता! उरुक्रमा! क्षुधा, तृषा, कफ, वात, पित्त, शीतोष्ण वायु, वृष्टि, परस्पर (स्त्रीपुरुषांमध्यें) अति दुःसह असा कामाग्नी व क्रोध यांनीं वारंवार पीडित झालेल्या प्रजांना अवलोकन करणाऱ्यानें माझें मन फार दुखित होतें. हे ईश्वरा, जोंपर्यंत हा लोक, षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा तुझ्या इंद्रियें आणि विषय यांच्या रूपानें परिणाम पावलेल्या मायेच्या सामर्थ्यानें युक्त असें हें जग, तुझ्याहून निराळें आहे, असें पाहतो तोंपर्यंतच ज्यामध्यें कर्माचीं फळें भोगावीं लागतात, आणि तेथपावेतों वस्तुतः खोटा परंतु दुःखें देणारा असा हा संसार निवृत्त होत नाहीं.

२ हीं सर्व सच्चिदानंद आत्म्याचीं विशेषणें आहेत. जसें आपल्या वरिष्ठाकडे, एकाद्या आश्रितास, विनंतिपत्र पाठवावयाचें असलें म्हणजे वरिष्ठाच्या अधिकारपरत्वें मायना प्रारंभीं लिहावा लागतो, तद्वत् विशेषणांनीं युक्त असा हा मायना आहे.

३ निजसत्ता म्हणजे सर्वशक्तिमान ईश्वराची माया. आणि असत्ता म्हणजे जीवाची शक्ति अविद्या होय. (शिरीं मुद्रा स्वीकारून असें पुढें म्हटलें आहे. तें ब्रह्मरंध्रस्थानास उद्देशून आहे. बालक जन्मास येतांच त्याचें निर्मळ तालुस्थान कांहीं वर्तुळाकृति भुक भुक उडत असलेलें सर्वांच्या पाहण्यांत आहेच.) ही सर्व सृष्टि द्विविध आहे. हीचा कांहीं भाग अंतर्यामी परमेश्वरानें उत्पन्न केला आहे. व कांहीं भाग जीवानें केला आहे.

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
स मायी सृजती त्याहुः श्वेताश्वतरशाखिनः ॥ २ ॥
[सार्थपंचदशी विद्यारण्यकृत द्वैतविवेक]

यांतून भाषांतराचे कांहीं उतारे मात्र घेतले आहेत. विशेष विवरण मुळांत पहा. माया ही प्रकृति आहे आणि त्या प्रकृतीस धारण करणारा परमेश्वर होय. तो परमेश्वरच या सृष्टीस उत्पन्न करितो. अशा अर्थाच्या श्रुति श्वेताश्वरशाखेंत आहेत. ऐतरेय उपनिषदांतही प्रमाण आहे. ' हें जग पूर्वीं आत्माच होतें.' त्याच्या ईक्षणानेंच हें जग उत्पन्न झालें तो संकल्पमात्रें करून लोकांप्रत उत्पन्न करिता झाला. तैत्तीरीय श्रुतींतही असें सांगितलें आहे. ' आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, औषध अन्न, देह हीं क्रमें करून एकापासून एक अशीं मूळ ब्रह्मापासूनच उत्पन्न झालीं. मी एकाचा अनेक होईन अशा संकल्पेंकरून तप करून तो सर्व जग उत्पन्न करिता झाला. छांदोग्य श्रुतींतही असेंच ह्मटलें आहे. ' हें जग पूर्वीं एक सद्वस्तूच होतें एकाचें अनेक व्हावें अशी त्यास इच्छा झाली. तेज उदक, अन्न, अंडज, जरायुज आणि उद्भिज्ज अशी सृष्टि त्यांतूनच उत्पन्न झाली.' तसेंच अथर्ववेदाचें प्रमाण आहे. ' ज्याप्रमाणें प्रज्वलित अग्निपासून ठिणग्या (किटाळें) बाहेर पडतात त्याप्रमाणें सचेतन अचेतन पदार्थ अक्षर ब्रह्मापासून उत्पन्न होतात. ' बृहदारण्यकांतही असेंच आहे. हें जग पूर्वीं अव्याकृत ह्मणजे विकाररहित होतें. तेंच पुढें नामरूपांहीं करून सविकार झालें. तीं नामरूपें विराटादि देहांत स्पष्ट आहेत. विराट् , मनु, नर, गो खर, इत्यादिकांपासून तो पिपीलीकांपर्यंत सर्व द्वंद्वें ईश्वरानेंच उत्पन्न केलीं; असें वाजसनीय म्हणतात. या श्रुतींत आणखी असेंही सांगितलें आहे कीं, ' जीवसंबंधीं एक विलक्षण रूप उत्पन्न करून ईश्वर त्या देहाचे ठायीं प्रवेश करता झाला. ' लिंगदेह कल्पनेस आधारभूत जें आधिष्ठान चैतन्य तें, त्यावर कल्पिलेला लिंगदेह, व त्या लिंगदेहाचे ठायीं असणारा चिदाभास तो, या तिहीस मिळून जीव असें ह्मणतात. जडदेहाचे ठायीं जीवरूपानें ईश्वरच प्रविष्ट झाला आहे. महेश्वरसंबंधीं जी माया आहे तिचे ठायीं सृष्टि उत्पन्न करण्याची जशी एक शक्ति आहे तशीच तिच्या आंगीं मोह घालण्याचीही पण शक्ति आहे. ती शक्ति जीवास मोहपाशांत घालून सच्चिदानंदरूपाचा विसर पाडते. त्या मायामोहानें परतंत्र होऊन मी देह अशा अभिमानें तो शोक करितो, ' असतेचि ठायीहून गमन भावना केली. असा अन्य पाठ तोही योग्य असून याच अर्थाचा आहे. आद्यंतांतील आत्मा उत्पत्ति काळीं येत नाहीं. नाशकाळीं नाश पावत नाहीं, भ्रमानें तो आला गेला असें बिंब प्रति बिंबन्यायानें वाटतें.'

छाया शरीरे प्रतिबिंबगात्रे यत्स्वप्नदेहे हृदि कल्पिताङ्गे ।
यथात्मबुद्धिस्त वनास्तिकाचिज्जीवच्छरीरे च तथैव मास्तु ॥ १६५ ॥

विवेकचूडामणि, शंकराचार्य.

मुद्रा स्वीकारून+ असत्तेऱ्याठायींहून गमनभावना केली, ते *जंजेरा मुकामीं येऊन पोंचलों. स्वामींनीं सरंजाम केला. त्याबरहुकूम गुणत्रय कारण महाभूतेंसहीत महत्तत्व निसबतीनें राखोन निजाज्ञेबरहुकूम जंजीरेची बंदोबस्ती केली. बि. तपशील.

१ कारखाना इमारत.

१ सगुणपुरा मध्यभागीं (१) गुणसाम्य बुनाद (२) सूक्ष्म तट (कलम १) भाग १

१ दहा बुरुज दरवाजे नव (९), (१) दशवाचौकी सदर (कलम १) भाग २

१ भृकुटी अग्निचक्र बंगला (भाग ३)

१ अंतःकरण कोठी (भाग ४)

४

२ नेमणुका शहरकोट.

१ वाक बुरुंज दरवाजा एक (१) असामी चार

१ किल्ला मजबूत वक्तव्य (असामी एक) १ }
१ नामजाद वैश्वानर नाईक (असामी तीन) ३ } ४

+ अन्यपाठ=असतेचि ठायींहून गमन भावना केली. * जंजिरे—मराठयांच्या इतिहासाचीं साधनें या सदराखालीं शिवछत्रपतीचें चरित्र वि. वि. मा. यांत छापलें आहे. पहा ' त्यांत जंजीरे हा शब्द विशेष बंदोबस्तीचा किल्ला याअर्थी वापरलेला आहे.'

भावार्थः—या देहाच्या छायेवर, याच्या (पाण्यांत वगैरे पडलेल्या) प्रतिबिंबावर, आणि हृदयांत ज्याच्या अवयवाची कल्पना केली जाते अशा स्वप्नदेहांतील देहावर तुझी जशी कोणत्याही प्रकारची अहंबुद्धि नाहीं, तद्वत् या जिवंत शरिरावर ही तुझी अहंबुद्धि नसावी. एकादा पुरुष गमन करीत असतां त्याचे ठिकाणीं इष्टोत्पत्तीस येणारी गति त्यानें गमनव्यापारत्याग केला असतां (चालणें सोडून दिलें असतां) ज्याप्रमाणें कायम राहत नाहीं, तद्वत् आत्म्याची स्थिति आहे.

१ पाणी बुरुंज (असामी सोळा) १६.
१ किल्ला मजकूर गृहितत्त्व (असामी दोन) २ } १६
१ नामजाद इंद्रोजी नाईक (असामी १४) १४

१ चरण बुरुंज (असामी तीन) ३
१ किल्ला मजकूर गंतव्य (असामी दोन) २ } ३
१ नामजाद त्रिविक्रमराव (असामी १) १

१ उपस्थ बुरुंज दरवाजा एक (असामी ६)
१ किल्ला मजकूर मन्मथ (असामी पांच) ५ } ६
१ नामजाद प्रजापतसिंग (असामी एक) १

१ पायु बुरुंज दरवाजा एक (१)
१ किल्ला मजकूर विसर्जनत्व (असामी एक) १ } २
१ नामदाज नैऋत्यजी (असामी एक) १

३ नेमणुका जंजीरा (जर्जरा) अंतर कोट

१ कर्णबुरुंज दरवाजे २ (असामी १२)
१ किल्ला मजकूर श्रोत्रोजी कदम (असामी २) } १२
१ नामजाद दिक्‌सिंग (असामी १०)

१ त्वक् बुरुंज (असामी ६)
१ किल्ला मजकूर स्पर्शत्व (असामी एक १) } ६
१ नामजाद पवन नाईक (असामी पांच ५)

१ चक्षुबुरुंज दरवाजे दोन असामी (१४)
१ किल्ला मजकूर दृष्टित्व (असामी २) } १४
१ नामजाद सूर्याजीराव (असामी १२)

१ रसना बुरुंज (असामी १०)
१ किल्ला मजकूर रसिकतव्य (असामी ६) } १०
१ नामजाद वरुणोजी मोहिते (असामी ४)

१ घ्राण बुरुंज दरवाजे दोन (असामी ३)
१ किल्ला मजकूर गंधत्व (असामी २) } ३
१ नामजाद अश्विनो नाईक (असामी १)

१ कारकून असामी पांच (५)
१ मुजुमदार मनाजीपंत, मंतव्य नोबती १६
१ कारखाननीस बुद्धिपंत, बोधव्य नोबती १२
१ फडणवीस चित्तोपंत, चेतव्य नोबती ९ } ५
१ चोकनीस अहंकारपंत, अहंकर्तृत्व नोबती १
१ सबनीस व्यानाजीपंत, व्यापकत्व नोबती १

५

४ सरनोबत्त, शुद्धसत्व, दशवा चौका सदर कलम (१)
१ बाजे लोक असामी चार (४)
१ घस्तदार विवेक
१ दिवटा सद्बुद्धि
१ भालदार निजधैर्य.
१ चोपदार वैराग्य.

५

४

एकून तेरीज

१ सदर दशवा चौका	(१)	१ श्रीहाट अंतर कोट	(१)
१ सदर भ्रमरगुंफा	(१)	१ त्रिकूट शहर कोट	(१)
१ औटपीठ अनाहत नौबतखाना	(१)	१ कारकून असामी पांच	(१)
१ गोल्हाट बाले किल्ला	(१)	१ बाजे लोक असामी चार	(१)
४		१ नायकवडी असामी दहा	(१०)
		५	
९			२५

येणेंप्रमाणें कारकून व नायकवाडी व बाजे लोक यांची चाकरी हुजूरची आज्ञा, 'जे दिक्‌सिंग आदीकरून' नैर्ऋत्यादि आपापुले स्थानीं नेमणुकेप्रमाणें अनुक्रमें चाकरीस खबरदारी असून मुळतत्वीं बंदोबस्ती असावी. व अनाहत नौबत होतांच सद्‌बुद्धि दिवटियाचे मुजरेस धैर्य भालदार यानें सर्व नायकवडी व कारकून व बाजे लोक यांस ताकीद करोन निवृत्तिपंथें दशवे द्वारीं, सदरेस मुजरेस जावें. व तदुपर विवेक घस्तदार व वैराग्य चोपदार यांनीं सद्‌बुद्धि दिवटी घेऊन बुरुंजाचे प्रति चौकीस अनंग नौबत करीत असावें. "जे कामादि षट् वैरी म्लेच्छ" विपरीत कल्पना ग्रामींहून येऊन जंजिरा भेद करतील त्याविषयीं अति बंदोबस्तीनें असावें; ऐशियास, "आमची गृहिणी अविद्या रिपूशीं वश होऊन अवेद्य शब्दें अफाट जाहली, तिशीं संकल्प विकल्प क्लीब तियेचे विश्वासु ऐसे होते, असें असतां, मनाजीपंत मुजुमदार यांही पांचही कारकून हात वसोन दृश्य लांच देवोन, वश करोनि घेतली; सेवकाशीं विपरीत झाली, तेव्हां अवघ्या चौकिया पारख्या जाहल्या; आण घालमेल करोन हेतु संगें षट् वैरी म्लेच्छ यांनीं जंजीरा घेतला. आण असुर जोरा माजला; मग अवघेच असुर मिळोन सुलाख करोन सुषुप्तीचे समयीं कारण संधीस सेवकास दस्त केला; अन्यथाज्ञान बडी केली; आण मोह मोकळदार अहर्निशीं राखतच आहे. अनाहत नौबत मना करोन कोहं आरोळी करीत आहेत विवेक घस्तदार बांधला, सद्‌बुद्धि दिवटी मालविली, मग कुबुद्धिचूड प्रज्वळून अविवेक घस्तदार नेमिला. "कामीदखान भालदर लोकांस ताकीद करोन विषयीं प्रवर्तविती." नित्य स्वारी करितात. स्वधर्म पेंठा नागवून अधर्म अभिवृद्धि करिताहेत. स्वामींची आज्ञा उल्लंघून अहंता जारिणीशीं लुब्ध झाले, आण वर्तणुक मनेच्छा कारितात. 'जे' श्रोत्र चौकीवर दिक्‌सिंग नायकवडी विषय श्रवणीं खबरदारी कारितो. त्वक् चौकीवर पवननाईक स्पर्शविषयीं लुब्ध होतो. चक्षु चौकीवर सूर्याजीराव दृश्य विविधाकारें प्रमाण मानून मग्न

जाहला आहे. रसना चौकीवर वरुणोजी मोहिते, रसत्वीं गुंग जाहले. घ्राण चौकीवर अश्विनोनाईक गंधविषयीं लुब्ध होतो. वाक् चौकीवर वैश्वानरनाईक नित्य कुतर्क बोलता मग्न आहे. पाणी चौकीवर इंद्रोजी नाईक जमेदार कुक्रियत्वीं संदाट होऊन आपला उद्योग करीत आहे. चरण चौकीवर त्रिविक्रमराव कुकर्म चालन करितो. उपस्थ चौकीवर प्रजापत-सिंग हिंदूचें रूप घेऊन न जाणवितां एकीं विविधस्त्रीरूप भोगून मग्न जाहला आहे. वायु चौकीवर निर्ऋत्यजी वेळोवेळीं किल्ला झाडीत नाहीं; आळस माजला आहे. यामध्यें मनाजीपंत मुजुमदार खूष होऊन संकल्प मंतव्यता संचित फार केलें. चित्तोपंत फडणवीस पापाचा झाडा राखोन यादबस्ती मांडीत नाहीं. व्यानाजीपंत सबनीस त्वगेंद्रिय अहंक्रियत्व चौकीवर विषय अडिश्री नागे चोरून गुप्तपणें खातो. अहंकारपंत चौकनीस लोक उणे असले तरि भरहजिरी लावून राज गुदस्त सेवितो. असे कारकून व नायकवडी व बाजे लोक विपरीत धर्मे माजोन, सर्वाभ्य कारभारी मुजुमदारापाशीं सेवकाचें कांहींच चालत नाहीं. सेवक स्वामीचा पुरातन एकनिष्ठ ऐसें असतां उमज पडत नाहीं; आण स्वामि समर्थ असे दाखले असतां मुजुमदार साहेब सादर सेवितो. परंतु सेवकाची वस्तु असोन, "हां, जी, साहेब;" ह्मणवत नाहीं. हें सेवकास पूर्ण कळोन आलें; तदुत्तर मदत करतील तर, स्वामीचे अति विश्वासु हुजराती सरदार दोघे आहेत; "हठ योग दम," "कीं, राज योग शम." हठयोगें पायुबुरुंज शहरकोटचा दरवाजा फोडून मणिपुरीं तळ द्यावा; तेथून पठाळा करोन निर्ऋत्य व प्रजापतसिंग यांस दस्त करोन, पुढें ऊर्ध्वपंथें शिड्या घेवोन दशदळ चर टाकून, द्वादशदळीं पोहोंचतांच मागोन निरोधाचे रजपूत सामानासहवर्तमान येतील, त्यांहीं कुंडलिनी दारुबलें दशदळचरीं पुरोन ठेवलेवर द्वत्पुरीं मनाजीपंत मुजुमदार यासी दस्त करोन आणतांच मागोन जालंधरो बर्लास बत्ती द्यावी. मग अवघेच बुरुंज उधळतील, हें जाणोन सकळहि लोक

सुषुम्ना कपाटीं रिघतील; मग विशुद्ध चक्र बाले किल्लेचे दरवाज्यावर वोढि-यान मोर्चा लागतांच अवघे लोक इडा पिंगळा मार्गें रिघतील. सदर दशवे चौकीचे भृकुट बंगलेवर बसतील; तेव्हां ककार खिडकी उघडून सुमन शामवर्ण आरोळी देतील; तेव्हां सदरेवर चिन्मय खासबारदार रिघतील. आणि पूर्वस्थान भेरी ठोकतील, व गलीम पराभव पावून तन्मय ढाल लावतील, सोहं फत्तेचे आवाज करतील, तेव्हां सेवक हुशार होऊन स्वामीचा स्वामीस मिळेल. आज्ञेबरहुकूम पूर्वानुक्रम चालवील. आण सेवकाची गृहिणी अविद्या रिपूशीं वश होऊन तेंच रूप अवगली होती, तीस गिंवसोन आशेचें नासिक तोडून, द्वेषाचे कर्ण छेदून सर्वा-वयवीं विभांडून पुनतीं दृश्य लांचास, तोंड न दाखवी असें होऊन, नामरूप नुरे असें होईल, आणि त्रिकुटीं तीन वाटा करून संकल्प विकल्प क्लीब दवडून मुत्सदत्व दूर करोन, क्रियेचें मलिनत्व बाधलें, तें श्रीहठीं अनु-ताप तीर्थी, स्नान करोन, घटक्रिया संपादोन, प्रायःश्चित होम गोल्हाटीं करोन, भावाभाव समिधा जाळोन, कल्पनावृत घालोन, वेदांत द्विजाचे साक्षीनें, उपनिषद् भाग उच्चारोन, पंचगव्य सत्रावीचें घेवोन, सेवक निज-धाम सदरेस स्वस्थ बैसेल. असा एक उपाय, परंतु येणेंकरोन जजीरा जरदस्त होऊन जीर्ण होईल. ऐशिया साठीं, सुलभ जोकां "राजयोग" सरदार अति विश्वासु रवाना केलियास, या किल्लेचा व आपला अब्रु राखोन रिपु भाकता मिथ्या होईल, तो अर्थ योजावा. हा येथिंचा विशदार्थ असे. रिपु भावनेस कारण जो मुजुमदार हाच लक्षून, दमाचे वाटे न पडतां, सकळ दरवाजे बुरुंजां न कढतां, अलक्ष मार्गें उतरोन, तयांचा ठाव पाहोन आपलासा करावा; मग आपण तो एक होतांच, एकपण नुरवून अति अव्यक्त प्रमेय जडांतच विपरीत गलीम लोक, पूर्व स्मरणीं येतील; तेव्हां सेवकाचें संकट वावो होईल. स्वामींची सत्ता अहर्निशीं वर्ततां सेवकास सेवकपणा कैंचें उरेल; आण सेवकपणाचा ठाव मोडतांच, स्वामीपणाचा

ही निजध्यास हरेल; तेव्हां सेवेशीं कोण उरेल? ऐसें सर्व स्वामि समावो। मग सकळ जिणें वावो। आपण आपुला निर्वाहो। रक्षिता कवण ॥ ऐसें संकलित विद्यमान। शेखीं विद्यमाना विहिन। स्वामिसेवक निदान। आपणच कीं ॥ स्वामीची सत्ता निवडिली। मग मज नामजाद भजली। तयेचि समर्थी बुजली। आपेंआप जहीं आली। संकल्प नीद तयीं मज लागली। भासली नामजाद ॥ आतां स्वामिरूप अगाध। मजमाजीच कीं ॥ ऐसें आपणापें स्वामीपण। शिरीं ठेवोनि [१]प्रमाण। सकलावयवीं निपुण। सेवकपण ॥ ऐशिया मानें लिहिली बखर। आपुला आपण अखेर। सोहिरादास ॥ शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना। शके १६७२ प्रमोद नाम संवत्सरे ॥संपूर्ण॥

---

[२] स्फूट पद्यें (सवाई छंदाच्या चालीवर)

(१)

संसारीं वीटेना भ्रांतीहि फिटेना तोंवरि भेटेना देव तया। जातीचा निष्ठुर केवळचि क्रूर नाहीं जयासि ते भूतदया ॥ अंतरीं मळ बाहेरि निर्मळ करुनि आलाही काशि गया। सोहिरा म्हणे यम दंडितसे कीं शेवटीं घालितसे निरया ॥ १ ॥

(२)

नित्य स्मरीं हरि ध्यान हें अंतरीं जीव हा उद्धरीं येणेंचि गा। सिद्धचि हें सुख रूप नाहीं रेख अज्ञानें हें तुज नेणवे गा ॥ देह हें पे[३]णेंचि दुःखाचें केणेचि [४]म्यालासि या भवमेणेंचि गा। सोहिरा म्हणे तुला नासुनि हेतुला आत्मा आंतुला नेणवेगा ॥

---

१ यावर आलहिदा परिशिष्टरूपानें टीप द्यावयाची आहे.

२ ह्या पद्यांमध्यें छंदशास्त्राच्या नियमाप्रमाणें सवाई छंद बरोबर जुळत नाहीं, ह्मणून ह्या पद्यांचा गाथा छंदच आहे असें ह्मटलें पाहिजे.

३ प्रवासांत थोड्या वेळांकारितां वाटेंत केलेला मुक्काम.

४ किडाळ, कीट.

(३)

देख देह तृण अंतरिंची खुण टाकुनि त्रिगुण राहें किं गा । आपुला अभाव दृश्य दिसे माव कल्पनेचा घात्र पाहें किं गा ॥ आत्मा हा अरूप साक्षि जसा दीप त्याचाचि ध्यास तूं वाहें किं गा । सोहिरा म्हणे हें संचित वंचित विदेही होउनि राहें किं गा ॥

(४)

दावितसे देवा आत्मस्वयंमेव संतांची ती सेवा कारण हो । जीव तें शिवचि होउनि तल्लिन पावले दीन उद्धारण हो ॥ जीवन्मुक्तत्वीं कीं युक्तचि होउनी उक्ताचि योग सुधारण हो । सोहिरा म्हणे मूळ बिंदु आनदु हाचि भवसिंधुतारण हो ॥

(५)

विश्व विचित्र हें चित्रचि पाहति राहति निमग्न नित्य किं हे । सूख सारुनी दुःख निवारुनी असतांचि पाहति भग्न किं हे ॥ हारोनि सर्व हि फ़िरोनि देखति दूरुनि दृश्य संलग्न किं हे. । सोहिरा म्हणे त्या संपत्ति दैवतिं देहिंच लाविती लग्न किं हे ॥

(६)

संकेतें जाण हा लिंगदेहावरि लंकेंत राम जसा कीं रिघे । आसुरि संपत्तिमाजि हे सर्वहि राक्षस मारित गूणें तिघे ॥ अन्वय स्थापि बिभी- षण बोधे हा लोक चिरंजीवींचि अवघे । सोहिरा म्हणे जीवीं सर्वहि जाणुनि आणुनि ध्यानीं हे चवेंघे ॥

---

१ प्रकृति पुरुषाचें ऐक्य.

२ सत्व, रज, तम, ह्या तीन गुणांपासून उत्पन्न झालेले आसुरी स्वभाव हेच राक्षस.

३ पूर्णबोध स्वरूप जो रामावतार तो अन्वय बिभीषणाची लिंगदेह लंकेमध्यें स्थापना करिता झाला. हे अवघे चिरंजीवच आहेत कारण आज प्रत्यक्ष असणाऱ्या विश्वरूप विराट पुरुषाच्या लिंगदेहलंकेमध्यें त्याचें सततचें राज्य चाललें आहे.

(७)

दृश्य हें आटलें सूखाचि वाटलें तेंचि कीं दाटलें अंतरिं हें । मिथ्याचि हें देह फिटला संदेह विदेह ब्रह्म निरंतर हें ॥ बुद्धिचें बोधव्य चित्ताचें चेतव्य मीपण झालें अवतारी हें । सोहिरा म्हणे मग्न झालें मन अनुहात नादें वाजंतरिं हें ॥

(८)

येवढेंचि भूमंडळ ज्यावरि भासत औघेंचि नासत दृश्य किं हें । अनादि ब्रह्म हें अगम अगोचर इंद्रियांतीत अदृश्य किं हें ॥ अनन्यभक्त विरक्तचि मुक्त जे तयांप्रति आहे सादृश्य किं हें । सोहिरा म्हणे योगी जैसा जो पाहत त्याप्रति जाणत दृश्य किं हें ॥

(९)

भक्ति करितया सन्निध श्रीहरि पावतो लवकरि वेळ नसे । संसार खेळ हा हेळसुनी मनिं त्यांतचि त्याला किं टेळितसे ॥ वर्मचि जाणुनी चर्म वृथा किं हें कर्मचि ब्रह्मिं तें मेळत असे । सोहिरा म्हणे चैतन्य सनातन लक्षुनि प्रेमेंचि लोळतसे ॥

(१०)

ब्रह्मचि लाभलें तेणोंचि कीं भलें नरदेह शोभले यास्तवची । अनारिसें

---

४ 'अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमाश्च बिभीषणः' अश्वत्थामा, बलि, व्यास, हनुमान, आणि बिभीषण हे नेहमींच चिरंजीव आहेत, असा भाव; कारण त्यांची कार्यें विराट स्थूल देहांत (विश्वांत) आज प्रत्यक्ष घडत आहेत.

५ राम, लक्ष्मण, बिभीषण, आणि मारुती (राम) बोधस्वरूप आत्मा–लक्ष्मण विवेक, बिभीषण सद्भाव मारुती ह्मणजे मरुत (प्राणवायु)

१ बुद्धीला बोध देणारें, चित्ताला चेतना देणारें आणि तेंच 'मीपण' ह्मणजे 'अहंब्रह्मास्मि' हें स्फुरण तेंच अवतारिक दशावतार घेणारें सच्चिदानंद ब्रह्म होय. हा भावार्थ.

२ अनाहत ध्वनि उत्पन्न करणारें वाद्य (वाडीप्रांतांत वाद्यांस वाजंतर ह्मणतात.)

जनीं विरक्तची मनीं करितों निरंजनीं वास्तवची ॥ वेदांची गति अनिर्वाच्यें ध्याति अतीत गति मति हा स्तवची । सोहिरा म्हणे निजानंदचि दाटला संसार वाटला नवलची ॥

(११)

दृष्टिसि बाणलें शून्यचि आघवें देहाच्या लाघवें गुंतेचि ना । भितो कीं यमाला न चुके नेमाला योग्य क्षेमालागिं कुंथेंचिना ॥ सर्वचि भोग हा रोग दिसे वरि इंद्रियांच्या घरिं येताचिना । सोहिरा म्हणे देव संताचि पाहति मिथ्या हें चित्तिं घेतिचना ॥

(१२)

आदि नसे अंतींहि नाहींच मध्यें हें वोईच भासतसे । योगानें सोडिला भोगानें वेढिला रोगानें कोंडिला त्रासतसे ॥ संग करितां हा रंग दिसेवरी क्षणोक्षणीं किं हे नासतसे । सोहिरा म्हणे जीव नाथिलाचि भव शाश्वत मानुनि आसतसे ॥

(१३)

संसारिंचें सुख हें मिथ्याचि आहे किं उगाचि वाहतो ध्यास किं हा । अवघाचि हा भ्रम केवळचि श्रम नाहिं आराम अभ्यास किं हा ॥ ब्रह्मीं हें अर्पण कर्म करूं नेणें मीपणावीण संन्यास किं हा । सोहिरा म्हणे कीं हा देहचि देखतो विस्मयें नेणें शून्यास किं हा ॥

(१४)

चित्तचि चैतन्य होउनि राहिलें सर्वचि पाहिलें शून्यचि हें । भिन्न न मानि हें चिन्ह तया प्रति नाहिं जगाचें पैशुन्यचि हें । अंतर बाहेर अंबर दाटलें देह न वाटलें शून्याचि हें ॥ सोहिरा सहजें आहेचि पाहत आपें-चि पातलें मौनचि हें ॥

---

१ क्षणिक (वाडीप्रांतांत हा शब्द कुळंबी लोकांत फार प्रचारांत आहे.)

(१५)

देहाचे संगति व्यर्थ गेलि मति अंतिं नाहिं गति ज्यासि किं हे। सर्व काळीं धंदा हाचि मतीमंदा संताचि ते निंदा ज्यासि किं हे ॥ व्यर्थाचि हें जिणें आत्मज्ञानविणें अन्वयें नेणेंचि न्यास किं हा। सोहिरा म्हणे खुणे पावलियाविणें कांहीं नेणें अभ्यास किं हा ॥

(१६)

आठवितां हरि सुख हें अंतरिं ब्रह्म सर्वांतरिं व्यापिलें हें। स्थावर जंगम दृष्टिसि हा भ्रम अज्ञानें कर्म आरोपिलें हें ॥ शरिरें हिं साजिरीं मुर्कुडी माझारिं संसार आजारिं खपलीं, हें। सोहिरा म्हणे तुज स्वहिताकारणें केवळ तत्त्व निरूपिलें हें ॥

(१७)

हें नरदेह गमावुनि विभ्रमें संसार करणें व्यर्थ किं हा। कोठिल कोण मि काय वाहतसें विस्मयें नेणोनि अर्थ किं हा ॥ स्वार्थचि मानुनि दृश्य पदार्थीं अवघाचि भोगि अनर्थ किं हा। सोहिरा म्हणे देहरोग भोगची आत्मवियोग किमर्थ किं हा ॥

(१८)

संत समागम दुर्लभ मानुनि सुलभ लाभ अलभ्य किं हा। आत्मनिदर्शुन सर्वत्र निरसन वर्षेचिद्घन लभ्य किं हा ॥ मानव योनींत वंद्य तो आनंद सर्वभूतिं समसाम्य कीं हा। सोहिरा म्हणे तो सज्ज्ञान सज्जन चंदन ज्ञान सौरभ्य कीं हा ॥

(१९)

सुमन देहिं सुगंध तसा हरि वारि हें व्याप्य कीं रामरसा[१]। जेविं घटीं मठिं व्यापक अंबर देख दिगंबर देव तसा ॥ लक्ष हें लावुनि नित्य

---

१ रामरस म्हणजे मीठ. त्या मिठाच्या खड्यांत जसें पाणीच व्यापून असतें तद्वत्.

निरंजनिं असोनियां किं देहांत नसा । सोहिरा म्हणे परब्रह्म सुखांत आंतले आंतचि स्वस्थ बसा ॥

(२०)

कोठिल कोण कसा मिं हें जाणुनि इंद्रियें रोधुनि नित्य राहा । निर्गुण निर्मळ शांत सदोदित तेथिलची निजध्यास वहा ॥ आसत नासत सर्व प्रपंच हा शून्यचि राहिलें त्यांत रहा । सोहिरा म्हणे तें पाहणें पाहतां अलक्ष्यीं लक्ष्य आनंद महा ॥

(२१)

रूप रेख दिठीविणें देखतो अवधूत दिगंबर हा । ज्याचिये पोटिं ब्रह्मांडें हिं कोटि अनंत अपार चिदंबर हा ॥ सर्वत्र व्यापक भूतकलापक ज्ञान प्रकाशक ईश्वर हा । सोहिरा म्हणे तो संतसमागमें सूलभ होय निरंतर हा ॥

(२२)

संसाररोग हा भोगची मानुनीं शोक कीं करिती ते लोकपिसे । धांवत मृग मृषाजळ देखत तेंविंच दृश्य हें स्पष्ट दिसे ॥ क्लेशचि पावती देहमिषें परि ईश्वर भक्तिचा लेश नसे । सोहिरा म्हणे मन भ्रमीत होउनि केवळ पावले जीवदशे ॥

(२३)

विस्मय पावुनि जीवदशें हरि अंतरिंचा किमपी न दिसे । तर्कचि नाकिं कुतर्क वसे मनिं केवळ अज्ञान बाधतसे ॥ माति घटीं पटिं तंतु वसे तेविं सर्व घटीं हा देव असे । दर्शित सृष्टि भरे म्हणे सोहिरा संतसमागम ज्यासि नसे ॥

(२४)

सज्जन रंजन नित्य निरंजन अंजन ज्ञान सूर्य नयनीं । निर्गुण निर्मळ नित्य सदोदित जागृत होउनियां शयनीं ॥ अधृति जाउनी धैर्य स्थिरा-

वळें मग्नचि होउनियां गगनीं । सोहिरा म्हणे गुरुगम्य सुखामृत दीवस ना आणि ते रजनी ॥

(२५)

संत जनां देंव गुप्त निरंजन मूर्खजना देव पाषाण हा । नैराश्य भाषण ज्ञानि जनांप्रति आनचि तें कथि मूढ किं हा ॥ चोरचि आपण थोरचि मी म्हणे घोरचि वाहतो ओघा किं हा । सोहिरा म्हणे त्याचे दर्शन कासया साधका त्याग तूं स्पर्शनिं हा ॥

(२६)

आच्छादिला कीं हा तंतु पटीं दिठि विस्मय पावला माति घटीं । देह हें देखोनि विस्मृति होतसे आत्माचि हा नटला किं नटी ॥ पूर्विल पुण्य हें पूर्ण गुरुकृपें ज्योतिच वेगळि हे निवटी । सोहिरा म्हणे तो हा सर्वचि त्यागुनि शेवटिं बसला मोक्षपटीं ॥

(२७)

जन्मासि आलासि संसारिं घालासि त्यांताचि झालासि गर्क किं गा । न घेसि अनुभव बाधतो हा भव कांहिं न चाले तर्क किं गा ॥ क्षोभेंचि अभ्र हें लोभ किं यामिनि आच्छादिला ज्ञान अर्क किं गा । सोहिरा म्हणे तूं नेणोनि वर्तसी फुकट भोगिसी नर्क किं गा ॥

---

१ गुणक्षोभ झालेली जी माया (महाकारण देह) हेंच अभ्राकाश ह्मणजे खऱ्या आकाशास झांकून टाकणारें निबिड मेघमंडळ (पक्षीं) ज्ञानाकाशास आच्छादून टाकणारें अज्ञानपटल (अभ्र).

२ लोभ हीच यामिनी ह्मणजे अमावास्येंची अंधकारमय निशा; अशा रात्रींतु अभ्र आल्यावर मग अंधकाराचा परमावधीच ह्मटला पाहिजे (पक्षीं) तमःप्रधान कारण देह (अविद्या) हीच रात्र.

(२८)

नरदेह नेर्म चर्म दिसे बरि नेणसि अंतरिं वर्म कि हें । पांचांचें पंचक लिंगदेहात्मक वर्तत वासना कर्म कि हें ॥ सुखें स्वधर्म हें देतचि आघवें दु:खचि देत विकर्म कि हें । सोहिरा म्हणे जीव ब्रह्मचि होतो मुक्तचि होत अकर्म कि हें ॥

---

१ क्रीडा, लीला इत्यादिकांचें स्थान ' क्रीडा लीला च नर्म च ' इत्यमर:

२ प्रंचमहाभूतांच्या विवक्षित मिश्रणानें (पंचीकरण कृतीनें) बनलेलें स्थूल देह (पंचक) ह्मणजे पांच प्रकारचे विपर्यय (भ्रम,) निरनिराळ्या जातीचें अज्ञान किंवा संशय यांचा समूह. ते विपर्यय असे:—तम, मोह, महामोह, तामिस्त्र व अंध-तामिस्त्र, किंवा पतंजलीच्या मतें अज्ञान, आत्मप्रीति, प्रीति, द्वेष, व भय. योग सूत्रें १।८।२।१ सांख्य सूत्रें ३।३७ पहा.

३ पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पंचप्राण, मन आणि बुद्धि एकूण सतरा मिळून लिंगदेह (सूक्ष्म देह) होतो.

४ स्वधर्मानें वागणें हेंच खरें सुख.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

भ. गी. अ० ३

येथें स्वधर्म ज्ञानयोग होय. कारण योगावांचून शांति प्राप्त होत नाहीं. भगवंतांनीं गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे कीं,

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥

[मु. चं. टी.]

ज्याला योग नाहीं त्याला बुद्धि नाहीं, ज्याला योग नाहीं, त्याला भावना ह्मणजे ध्यान नाहीं, आणि ज्याला ध्यान नाहीं, त्याला शांति नाहीं, ज्याला शांति नाहीं, त्याला सुख कोठून ?

५ विकर्म ह्मणजे शास्त्रविरुद्ध जें कर्म तें. या अशास्त्रीय द्वैतामध्यें तीव्र आणि मंद असे दोन प्रकार आहेत; कामक्रोधादिक जे मनोविकार ते तीव्र होत, आणि मनोराज्य हें मंद होय.

६ पूर्वोक्त स्वधर्मानें नेमलेलें जें कर्म तें अकर्म, ह्मणजे तें करून न केल्यासारखें होय. असें भगवंतांनींही सांगितलें आहे.

(२९)

केव्हांचि नासत नकळत हें देह यास्तव ईश्वरभक्ति करीं । अज्ञान जावया सज्ज्ञान व्हावया सत्वर संतांचि कास धरीं ।। अनुभव घेउनी अंर्ते-रिंचा हा अक्षयची निज शांति वरीं । सोहिरा म्हणे देव विस्मरों नये येणेंचि सर्वही दुःख हरीं ॥

(३०)

न लागे आवडि आत्मरुपीं जया कारण कीं भया तेंचि तया । चैतन्य-चालक नेणोनि पालक देखत देह हें भूलवाया ॥ नेणोनी वाढ हा भू गुणत्रय आत्माचि ध्यावा हें नाहिं जया । सोहिरा म्हणे तो पापिया जा किं घेतसे एकाकी निरया ॥

(३१)

चौरीहि खाणित दृष्टिसि नाणित शोधितसे किं हा देव दुजा । जाणुनि नेणति मूर्ख हे जन पाषाण भावुनि करिति पूजा ॥ जेथुनि झालें हें दशमें

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥

स्वधर्मानें नेमलेलें जें कर्म तें अकर्म, ह्मणजे तें करून न केल्यासारखें होय, अर्थात् त्यापासून कर्माचा दोष लागत नाहीं । आणि सामान्य लोकांच्या मतें, कांहीं न करणें हें अकर्म असें जरी आहे, तरी या कर्मामध्येंही कर्म घडतें । हें जो जाणतो, सर्व मनुष्यामध्यें बुद्धिवान, तो सर्व कर्मे आचरीत असतांही योगी होय. भ. द्री. सु. चं. टी. अ० ४

१ लिंगदेहस्थ आत्मा, अंगुष्ठमात्र पुरुष त्याचा अनुभव जाणतात ते अमर होतात.

अंगुष्ठमात्रः पुरुषोंऽतरात्मा । सदा जनानां हृदये संनिविष्टः ॥
य एतद् विदुरमृतास्ते भवंति ॥

श्वेताश्वतरोपनिषद अ० ३

२ पंचभूतें आकाशादि पांच भूतें व सत्व, रज, तम यांच्या योगानें झालेला (वाढ) विश्वविस्तार.

३ उद्भिज्ज, अंडज, स्वेदज व जरायुज ह्या चार खाणी.

४ दहावें द्वार ब्रह्मरंध्र.

अग्र कीं विसरोनि जाती त्या मूळबीजा। सोहिरा म्हणे कीं हे दुःखचि पावति नेणोनियां गुरुगम्यै गुजा ॥

(३२)

चौऱ्यायशीं लक्ष योनिमध्यें हें नरदेह अलभ्य लाभ तुला । या मध्यें ईश्वर आहे तरि कसा अनुभव घ्यावा किं हा आंतुला। नीच भवांतुनि रींघ निरंजनिं बा गूणचि तीघ हे बद्ध तुला। सोहिरा म्हणे हाचि कर्मसंन्यास न ऐसें त्रिवीध या हेतुला ॥

(३३)

मिथ्याचि मानुनि वर्ततो या देहिं नैराश्येंचि जीव शुद्ध किं हा। देखे निरामय निर्गुण निर्भय जिताचि मुक्त प्रबुद्ध किं हा ॥ विरळाचि मानव योनिमध्यें तो सर्वहि साधन सिद्ध किं हा। सोहिरा म्हणे तो ब्रह्मचि होउनि सर्वचि सांडि विवीध किं हा ॥

(३४)

ईश्वरें उत्पन्न सर्वचि केलें हें जें यांतील उपमा कीं त्यासि नसे। शून्य हें व्यापक ज्ञान प्रकाशक चैतन्य त्यांत अतीत असे ॥ योग हा साधला देव आराधिला निश्चयें लाधला दैववशें। सोहिरा म्हणे स्वयंब्रह्म हें सन्निध अंतरीं निश्चय दृढ वसे ॥

(३५)

साधुच्या अंतरिं काय वसे जें तें कळेचि केवळ मूर्ख जनां। सर्वांचि सारिखें नरदेह हें देखे न दिसे संत असाच मना ॥ हा दृश्य पदार्थ किं साचचि मानुनि चिंति अनेकाचि या कामना। सोहिरा म्हणे तो हा सर्व जाणे परि चित्त नयेचि किं हें दमना ॥

---

१ सद्गुरुद्वारें प्राप्त होणारें गुह्य (शुद्ध ज्ञान).

२ स्फुट श्लोक प्रारंभ.

(वृत्त शार्दूलविक्रीडित.)

नीरालंब[1] निरंजना[2] मुळिं[3] जिवा होऊनि जा गर्क हो

---

१ जितके ह्मणून दृश्य पदार्थ आहेत त्या सर्वांचें अधिष्ठान जें 'सच्चिदानंद ब्रह्म' तेंच येथें निरालंब ह्या शब्दानें दाखविलें आहे.

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥
[भ. द्री. अ० १३ मु. चं. टी.

ज्याच्या ठायीं सर्व इंद्रियांचा गुणाभास होतो, तथापि त्याला कोणचेंही इं मुळींच नाहीं, ज्याला कशाचीही आसक्ति नाहीं, तथापि जें सर्वांला आधारभूत जें स्वतः निर्गुण, पण जें गुणांचें आश्रयस्थान. [तें निरालंब निर्गुण । जीवाचें स्थान । ह्मणोनि व्हावें लीन । तेथेंचि पैं ॥ १ ॥ मी ब्रह्म येणें आकारें । ब्रह स्फूर्ति स्फुरे । ते विचारितां तत्व निर्धारें । उठे निरालंबीं ॥ २ ॥] मुकुंदराज. विवेकसिंधु.

२ मायारहित एकांत–रंजनरहित निष्कलंक आत्मा (वरील 'मी ब्रह्म' हें स्फुरण.) याचा अर्थ असा आहे कीं प्रारंभीं हें सर्व विश्व आत्मरूप होतें. त्याचा आकार पुरुषाचा होता. त्यानें आपल्या आजूबाजूस पाहिलें, तो त्यास आत्म्याविना दुसरें कांहीं दिसलें नाहीं. तेव्हां तो पहिल्यानें ह्मणाला, 'हा मी आहें.' ह्मणून तो 'मी' हें नाम धारण करणारा झाला. [निरंजन] परंतु एकपणामुळें त्याचें रंजन होईना; रंजन होण्यास दुसऱ्याची जरूरी असते. एकट्या मनुष्याचें रंजन होत नाहीं ह्मणून त्याला दुसरें कांहीं असावें अशी इच्छा झाली; मग त्यानें आपल्याच देहाचे दोन विभाग केले, आणि त्यापासून पति आणि पत्नी अशीं उद्भवलीं. पुरुषार्ध जें शून्यवत् होतें तें स्त्रीच्या योगानें (प्रकृतीच्या योगानें) पूर्ण झालें. त्यानें तिला आलिंगन दिल्यावरून मनुष्य जन्मास आले. (बृहदारण्यकोपनिषद् अ० १ ब्रा० ४ थें मं. १ ते ३ पहा.)

३ 'जीव' हा परमात्म्याचाच अंश, अनादि जी अविद्या त्या अविद्येच्या उपाधींत सांपडल्यामुळें, जीवास मोह उत्पन्न होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो, व अनेक यातना भोगतो. या यातना जेव्हां तो आपलें मूळ ह्मणजे परमात्मस्वरूप ओळखतो, तेव्हां अविद्येचा नाश होतो, व जन्ममरणाचे फेऱ्यांतून मुक्त होतो. ह्मणून प्रत्येक मुमुक्षु जीवानें आपलें मूळ जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

तेव्हां होतिल एक रूप समता इंदू अणी अर्क हो
जेव्हां राहिल हा तुझा विविध कीं औधाचि कूतर्क हो
सोहीरामत दूर होईल तुझा तेव्हांचि हा नर्क हो १

अर्थज्ञानचि कांहिं स्वल्प समजे तेणेंचि गर्वा चढे
आम्हांवांचुनि अन्य या महितलीं ज्ञानी दिठी नापडे
साधुत्वा मिरवी सदा अविधि जो पाखांडवादी उडे
सोहीरामत ऐशियासि तरि हो कैसेनि युक्ती घडे २

नाना पंथ वितंड काढुनि भल्या कोणा तरी आडवी
त्याहूनी मज सुज्ञ लोक वदती प्रौढी किं हे वाढवी
जिल्कें उत्तम आपणासि असणें आशाचीहे औढवी
तो प्राणी जणु सोहिरा वदतसे अज्ञान बीभांडवी ३

भक्तीनें भगवंत नित्य वरुनी कालासि या दौडिजे
योगाभ्यास निरंतरीं असुनियां या इंद्रियां जिंकिजे
दीर्घद्वेष परस्त्रीथे जपती ते वाचेचिये डंकिजे
सोहिरामतकीं तयांशि सहसा संसर्ग हा ना किजे ४

दुष्टाला जरी संतसंगति घडे सद्बुद्धि नाहीं तया
दुर्गंधीच अपानद्वारिं उपजे सौगंध ही खातया

---

१ इंदु=इडा आणि अर्क=पिंगला या एक होतील. ' इडापिंगळा एकवटती । गांठी तिन्ही सुटती । साही पदर फुटती ॥ चक्रांचे हे ॥ मग शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे अनुमानु । तों वातीवरी पवनु । गिंवसिता न दिसे ॥ ज्ञानेश्वरी अ० ६ ओं० ४४।४५

२ छद्मी भाषण करणार, टोंचून मनास लागेल असें बोलणारे.

प्रेमें क्षीरचि पाजिलें तरि* बहू संपत्ति हाला तया
साधूसंगति भक्तिवांचुनि असे कीं तोचि[1] वैरी तया ५

ज्याला देखुनि सर्व भूतिं उपजे सामान्यैं नोहे दया
तो सुस्नात सदैव जाण मग त्या येथेंचि काशी गया
जो व्यापी सकलांभुतीं अगम जो दृष्टीस आला जया
सोहीरा वदतो समान निरखी रंका अणी राजया ६

---

* अन्यपाठ=अही.

---

१ दुष्ट मनुष्याला जरी साधूची संगती घडली, तरी त्याला सद्बुद्धि प्राप्त होत नाहीं, याला दृष्टांत देतात कीं उत्तम केशरकस्तुरीमिश्रित सुगंधी पदार्थ जरी भक्षण केले, तरी गुदद्वारांत दुर्गंधीच उत्पन्न व्हावयाची. किंवा सर्पाला दूध पाजलें तरी त्याची संपत्ति हालच (विषच). मनुष्य केवढाही विद्वान असो, पंडित असो, जर त्याच्यामध्यें ईशभक्ति व सत्संग हीं नसलीं तर त्याचा तोच वैरी (आत्मघातकी) समजला पाहिजे. श्रीकृष्ण उद्धवास सांगतात कीं साधूच्या समागमानें माझ्या ठिकाणीं भक्ति प्राप्त झाली कीं तो पुरुष माझें ध्यान करणारा होतो, आणि मग तो ध्यानशील पुरुष साधूंनीं दाखवून दिलेल्या माझ्या स्वरूपास आयासावांचून निश्चयें प्राप्त होतो.

सत्संगलब्धया भक्त्या मयि मां स उपासितः ।
स वै मे दर्शितं सद्भिरंजसा विंदते पदम् ॥ २५ ॥

पण जो अविवेकी याप्रमाणें साधन करून घेत नाहीं, तो शत्रूप्रमाणें आपणांशींच शत्रुत्व चालवितो.

अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥

[भ. ग्री. अ० ६ श्लो० ७]

२ येथें दर्शवितात कीं, आपलीं मुलें पोसून जगाचा मायबाप, म्हणविणें अशा प्रकारची सामान्य=सर्वसाधारण दया ती दया नव्हे. सर्व भूतमात्रांच्याठायीं समता झाली पाहिजे. ज्ञानोबा म्हणतात. [जो सर्वांभूतांचे ठायीं। द्वेषातें नेणेंच कांहीं। आप पर जया नाहीं। चैतन्या जैसें ॥ १ ॥ तैसें अवधिया भूतमात्रीं । एकपणें मैत्री। कृपेशीं धात्री। आपण जो ॥ २ ॥

सर्वत्रीं बघतां उदासिनमना कांहींच ना वाटतें
ही पंचात्मक सर्व विश्वरचना संभूत हें आटतें
ना पाचारित अंगिं येउनि बहू वैराग्य हें दाटतें
सोहीरामत भ्रांतिचें वसन कीं निभ्रांत हें फाटतें ७

निर्गूणीं लय लावितां उपरमें हा जीव जातां भितो
काढी तर्क कुतर्क मूर्खमणी हा वाच्यांश आरंभितो
लोकां दावित सोंगढोंग बरवें साधू नव्हे दंभितो
सोहीरामत तत्वसार विवरीं जाणा मुख स्तंभितो ८

ब्रह्मानंदिं निमग्न होउनि असे तो जाण साधू भला
येऊनी नरदेहिं यासि बरवा आत्माचि हा लाभला
राहो या कि जनीं कि थोर विजनीं कोठें तरी शोभला
सोहीरामत जाण पंचविषयीं निःसीम जो क्षोभला ९

धेनूवर्ण अनेक भासति परी दुग्धांत नाना नसे
यावत्स्थावर जंगमादिकिं असें जो चाळितो मानसें
होणें आपण हो जयासि बरवें सर्वांहुनीं सानसें
सोहीरामत बीज हें समजलें निर्गुण नीदानसें १०

---

२ सगुणब्रह्माचें ध्यान करणारे योगी निर्विकल्प समाधींत भांबावून जातात. त्याचें कारण त्यांना उपरति झालेली नसते. असें असतां भलभलतेच कुतर्क काढून अनुभवावांचून ते पाखांडवाद करितात, व साधुत्वाचा तोरा मिरवितात. ते उघड दंभी आहेत असें ओळखावें. विद्यारण्यस्वामी पंचदशींत ह्मणतातः— सगुणब्रह्माचें ध्यान करणारे योगी निर्विकल्प समाधींत भांबावून जातात. असें गौडपादाचार्यांनींही सांगितलें आहे. त्यांच्या वार्तिकांत असें सांगितलें आहे कीं, हा अस्पर्शयोगाख्य समाधि सगुण यांग्यांना कठीण जातो. ज्याप्रमाणें निर्जन अरण्यांत मुलें भितात, त्याप्रमाणें निर्विकल्प समाधींत भय नसूनही योगी घाबरतात. हे शुष्क तर्कपटु जे माध्यमिक ते अचिंत्य ब्रह्मस्वरूपीं भांबावून जातात, असें आचार्यांनींही ह्मटलें आहे.

१ पूर्वोक्त निर्गुणोपासनेच्या उपायानें (चिकित्सेनें).

कोण्याकारणें भास नाश जगता शोधासि लागें मना
बोधें गुल्ल कि डुल्ल तूं प्रतिदिनीं सांडीं दुजी कामना
हा मी कोण शरीर चाल(त?) कसें कां तूज हें कामना
सोहीरामत याविना निजखुणें चित्सूख आरामना ११

जो नेती निगमा जितेंद्रियदमा जो ना गमे आगमा
भक्तीनेंच सुसाध्य कीं सहज तो साधूचिया संगमा
दावी लावि मना परे परथडी जो आपुल्या ऊगमा
सोहीरा समजोनि की उमजला पंथेंचियासूगमा १२

शाखापर्ण अनेक भासतिपरी एकाचि वृक्षाचिया
तैसें विश्व विवीध कीं नगलिला चिद्धेमें मुख्याचिया
वाटे जाउं नको निमीष भारि तूं या सर्व लक्षाचियौं
लक्ष्यीं तूंचि अलक्ष्य लाव लय हें शैद्धांत लक्षांचिया १३

निद्रेमाजि भ्रमांत स्वप्न दिसतें तैसें कि हें भासणें
तें नासे कि तयेक्षणीं विलसतां जागर्ति संकाशणें

---

१ ज्या परब्रह्म स्वरूपाविषयीं वेदांनीं 'नेति नेति' असें ह्मटलें. मोठमोठे जितेंद्रिय, हठयोगी यांनाही त्या स्वरूपाचा अंत कळला नाहीं. परंतु एका निष्काम भक्तियोगानेंच तो सुसाध्य होतो. आणि मग तसें झाल्यावर 'अंतःकरणांत साधुसंगाविषयीं' प्रेरणा देतो व मनास परेच्या पलीकडे नेऊन आपल्या स्वरूपीं जीवन्मुक्ति देतो. सोहिरोबा ह्मणतात कीं हा जो भगवत्प्राप्तीचा अति सुलभ मार्ग, त्यायोगेंकरूनच आपण तरलों गेलों.

२ चैतन्य हेंच सुवर्ण [चित्+हेम=चिद्धेम]

३ दृश्य जगताच्या.

४ लक्ष चौऱ्यायशीं योनी फिरफिरून शेवटीं मनुष्य जन्मीं प्राप्त होतो असें मानलें आहे. (लख चौऱ्यायशीं भुगत गमाई । बेढ भागमां नरतनुपायीं ॥ तुलसीदास) त्या दुर्लभ नरदेहाच्या द्वारें उच्चारली जाणारी जी वैखरी वाचा तिच्या शब्दांत ह्मणजे त्या वाचेचें जें मूळ तेंच लक्षिण्यास योग्य आहे तेथें (अलक्ष्यीं) लक्ष लाव.

ज्ञानाग्नी हुतकर्म हें करुनियां सर्वेंद्रियालासणें
सोहीरा मग हो म्हणे निजपदीं आनंद उल्हासणें १४

वाचेचें मुळ जाणुनी गुळकरीं वाचाचि हे गातया
प्रासी मानसदासि होउनि कळों तेथील सूगौतया
चित्सिंधू मिळणी मिळोनि मिळते हें चित्त गंगातया
तैसें ऐक्याचि सोहीरा म्हणतसे या आत्मलिंगातया १५

पिंडींचों रहिवासि तो न म्हणवे. ब्रह्मांड रोमावळी
ज्याची तो किं समर्थ हा जगपती साकार हा मांवळी
सद्भक्तांप्रति सानुकूल विभुतो जो सर्व कामावळी
हे वाजे स्मरसोहीरा ह्मणतसे त्याचीच नामावळी १६

---

१ यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥ १९ ॥
[भ. द्वी. सु. चं. टी. अ० ४]

ज्याचे सर्व उद्योग फळाच्या इच्छेपासून मुक्त आहेत, आणि ज्याचीं सर्व कर्मे ज्ञानरूप अग्नीनें दग्ध ह्मणजे निर्मळ झालीं आहेत, त्याला ज्ञातेजन पंडित ह्मणतात.

२ वाचा गाणारा (उच्चारणारा) तेंच वाचेचें मूळ असें जाणून ती गोड ह्मणजे अमृत कर. बृहादारण्यकोपनिषद अ० ४ ब्रा० १ मं. २ यांत याज्ञवल्क्यानें जनकास सांगितलें आहे. वाचा परब्रह्म जाणून घेऊन जो ब्रह्माची उपासना करितो, त्याचा त्याग करीत नाहीं, सर्व भूतें त्याप्रत मिळतात व तो देव होऊन देवाप्रत जातो.

३ सूगा; हा शब्द वाडीप्रांतांत व गोवेंप्रांतांत फार प्रचारांत आहे. शुद्धि, सुगावा (व्यवस्था).

४ विश्वात्मा (ब्रह्मा).

५ प्राज्ञ (संहारकर्ता रुद्र).

६ सद्भक्ताच्या मनोरथांच्या पंक्तीच्या पंक्ती पूर्ण करणारा जो भगवान् (विष्णु) हिरण्यगर्भ.

७ त्या विष्णूची नामपंक्ति (विष्णुसहस्रनामावळी)

नक्षत्रेश सुधीं चकोर संवके कें दुसरें खाईल
निर्गूणीं मन वेधलें तनुचिया कीं पोषणा जाइल
देवा तूं नच देसिकाय जनतें देऊनियां देईल
स्वप्नींचें धन सोहिरा म्हणतसे कीं जागृतीं येइल १७

लोकीं आश निराश अंतरीं जया हा जाण संन्यासि हो
संसारी सम सारिखा दिसतसे आलिंगि शून्यासि हो
कोणी आदरभार फार करितां संकोच मान्यासि हो
सोहीरा मत चिन्मयाशिं रमला प्राशूनि मौन्यासि हो १८

मिथ्या कल्पितसे भ्रमासि मन हें ध्यावाच याचा खुन
हे जिव्हे रस गुप्त वाहत असे ध्यावा किं या चाखुन
अंतर्ज्ञानें तराजिं घे समजुनी हा जीव का जो खुन
सोहीरा मत कोण चिंतितं पहा मी हेंचि नीरेखुन १९

---

१ चकोरपक्षी नक्षत्रेश जो चंद्र त्यापासून उत्पन्न होणारें अमृताविषयींच संवके (लुब्ध होतो) तो दुसरें कांहीं खाईल काय? (मन हा चंद्र आणि चित्त हा चकोर, असा गर्भितार्थ आहे.)

२ लौकिक आशाबद्धतेच्या संबंधानें (अंतःकरणापासून ज्यानें (निराश) त्याग केला तोच खरा संन्यासी.

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥

[भ. ह्री. सु. चं. टी. अ० ६]

श्रीभगवान् ह्मणाले:–कर्माच्या फळाची आसक्ती सोडून, करायाला योग्य असें कर्म जो करितो, तोच खरा संन्यासी आणि तोच खरा योगी. ज्यानें अग्निहोत्र टाकलें आणि ज्यानें लौकिक कर्माचा त्याग केला तो नव्हे.

३ मान्य असा जो योगी (पक्षी संन्यासी) त्यास.

४ ताजव्यामध्यें (अंतर्ज्ञान हाच ताजवा) जीवाला अंतर्ज्ञान ताजव्यामध्यें जोखून आत्मा व अनात्मा यांची निवड केल्यावर हा जीव 'परमात्मा' आहे असें दिसून येईल हा भावार्थ.

५ मी माझें अशी चिंता वाहत असणारा ह्मणजे देहांत (मी ह्मणणारा) तो कोण आहे हें नीरखून ह्मणजे अंतर्दृष्टीनें पहा.

या संसारपुरास मीं बघतसें मिथ्याचि आकार हा
मायाव्यापक जाण हा बहुविधा *साभास वीकार हा
हे गूणत्रय साम्यकीं प्रसवली तैसाच ॐकार हा
सर्वांचें मुळ सोहीरा म्हणतसे अंतीं निराकारहा २०
मर्यादेवारि सागरा गिरिवरा कोणी धरिली धरा
वारा सूर्य शशांक व्योमिं वरुषे हा कोण धाराधरा
चोवीसांवरि एक पंचविसवें स्फूर्ति कशी पंधरा
सोहीरा उमजीं म्हणे मम मना त्या भाक्ति गंगाधरा २१
संसारी रमसी मना भ्रमसि तूं कां भोगिशी आपदा
अभ्रींची जसि साउली दिसतसे कोणाचि हे संपदा
शाल्यन्नोदन दिव्यभोग रति हे कीं नूपजे श्वापदा ?
सोहीरा म्हणतो विवेक नसतां आरूढेनी ज्यापदा २२

---

१ साभास मायेमुळें जगताचा भास होतो तो क्षणिक होतो; परंतु तो मिथ्या होय. म्हणून जगद्रूपी विकार हा सभास आहे.

२ सत्व, रज, तम, हे तीन गुण जिच्यामध्यें सारख्याप्रमाणानें आहेत अशी मूलप्रकृति हीच जगाला प्रसवली, म्हणजे जगाची धात्री, आणि ॐ कार हा पिता.

अमलानंदयोगी, शतश्लोकीमध्यें म्हणतात.

पंचब्रह्मविकासमूर्ति शिव तो ॐकाररूपी पिता ।
गायत्री सकळां गिरा प्रसवते माताचि ते तत्वता ।।

३ पंचमहाभूतें व त्यांचे शब्दादि पांच विषय, दहा इंद्रियें आणि मन, बुद्धि, चित्त, अहंकार मिळून चोवीस, जो काल तें पंचविसावें तत्व.

४ पांच भूतांपैकीं पहिलें जें निर्विकार आकाश तत्व तें वजा करून बाकीचीं चार भूतें, पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें, एक मन मिळून स्फुरण पावणारीं पंधरा तत्वें.

५ निष्काम भक्तिरूप गंगा (गंगानदी) ही ज्यानें मस्तकीं धारण केली आहे असा जो शिव. अमलानंदयोगी यांनीं म्हटलें आहे. ' हृद्बीजार्थान्वयी त्याप्रती अनुभविती शुद्ध विज्ञानरूपी ' याचा भावार्थ, योगशास्त्रोक्त सहाही चक्रांतील हृद्बीजें घेतलीं असतां ' ॐनमः शिवाय ' असा मंत्र सिद्ध होतो.

६ त्रैलोक्याचेंही वैभव मिळविण्याविषयीं समर्थ असा नरदेह (पद) प्राप्त झाला असून पश्वादिकांप्रमाणें विषयभोगांची इच्छा करितोस.

हीं भूतें धरिता धरा स्थिरचरा कोणी नसे गोचरा
कीं पिच्छे उठतां उठोनि सुटतां ठावें नसे खेंचरा
ज्याड्यत्वें तनुसंगतेवरी सरी पावों नको भूचरा
सोहिरा मतलक्ष हें अनुदिनीं लावीं कीं सेंद्रोचरा २३
आकाशावरि अभ्र भासत असे तैसेंच कीं हे जन
त्यांचा सूड धरी विवेक करितो सर्वज्ञ कीं सज्जन
नित्यानित्य विचार सार करितां येणें भव भंजन
सोहीरा मत राज योगिसदनीं जो भोगि नीरंजन २४
बोलाचें रुप देखुनी अनुभवें तूं बोल हा राम रे
तूर्याकामिनि कांत जो जगपती एकांत आराम रे
शद्वाचीं पठणें बहू शिकवुनी तीं काय कीरासरें
सोहीरामत जाण चेष्टित तनू निश्चीत वारां भरे २५
या देहीं असतां जया दिसतसे जैसा मि ऊकाशि हो
ऐसें ज्ञानार्टके तरी मगतया येथोंचि हे कोंशि हो

---

१ जें सत् ह्मणजे शाश्वत असून अगोचर (अदृश्य) आहे (सत्+अ(?)+गोचर)

२ कीरासारखी (पोपटासारखीं) (शब्दें ब्रह्म कोण झाले । अन्न ह्मणतां कोण धाले । शिकविलें तैसें बोले । शुकपक्षी जैसा ॥ श्रीरंगनाथ निगडीकर.)

३ प्राण अपान इत्यादि वायूंच्या चेष्टांनी युक्त असे हे देह, निश्चयेंकरून, वायुच्या भ्रमणानें फिरत आहेत.

भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ।

[भ. ग्री.]

४ उदासीनाचा देह ब्रह्मरूप । नाहीं पुण्यपाप लागत त्या ॥ १ ॥ अनुताप आंगीं अग्निचिया ज्वाळा । नाहीं मृगजळा विझों येत ॥ २ ॥ दोष ऐशा नावें देहाचा आदर । वीटलें अंतर अहंभावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाय नासोनियां खंती । तंवचि हे चित्ती बद्धता ते ॥ ४ ॥ हा शब्द सावंतवाडी प्रांतांत प्रचारांत आहे. उकासु ह्मणजे प्रवाशी (भवपुरांतील प्रवाशी.)

५ अमलानंदयोगी ह्मणतात (तो आत्माराम, ‘ वाराणसि निजतनु ’ भागीरथि ज्ञानरूपी । सच्छ्रद्धा ते भवानी अनुभव अतित्कृष्ट विश्वेश साचा । वर्ते जो या प्रकारें स्थिति शिव वदतो उद्धरे वंश त्याचा ॥)

ज्ञप्तिमात्र निखीलहो निविटिलें एकीं अनेकांसि हो
सोहीरामत दृश्य तें स्वरुपकीं नायेचि तूं कासिहो २६

हे राया करिंबादया अनुभवें ब्रह्मांड हें भेदिन
प्रापंचावरि इंद्रियां निघतयां वरचेवरी छेदिन
आनंदोत्तर मग्न होत असतां आम्हांसि हा सूदिन
द्यावें हें मज सोहीरा तुजकडे मी मागतों कीं दिन २७

एकीं एकचिहा अनेक दिसतो नाहींच कीं दूसरा
ऐसें राहुनियां मनीं अनुदिनीं भेदासि या संव्हरा
आपूलें रुप हें अरूप गमलें हें ज्ञान ज्याशीं सरौ
सोहीरा जड या जना ह्मणतसे त्याचा करा आसरा २८

जोडीं सद्गुरुसी विलोकुनि तयीं होसील निर्बंधन
विश्वाचा धनि कोण हा करुनियां आरंभि आराधन
इंद्रीयें दमुनी निराळ गमनीं योगासिया साधन
ज्ञानाभ्यंजन सोहिरा ह्मणतसे हें सिद्ध सन्मद्धन २९

सांडूनी तुज सारिख्या प्रभुवरा आणीक कोणा भजों
ऐशी यावरी जोडली तनु असे या मानवा लाभ जो

---

१ अद्वैत असल्यामुळें दुसऱ्या वस्तुशीं तुलना करतां येत नाहीं.

२ अशा ज्ञानाशीं ऐक्य व्हा, अनुसरा.

३ सद्गुरुस्वरूप भगवंताचें दर्शन घेसील तेव्हांच बंधनरहीत होशील,

४ सद्गुरुहस्तानें ज्ञान अभिधानक अंजन नेत्रांत लावून घेणें हेंच (सिद्ध) ठरलेलें सत+मत्+धन=हा माझा उत्कृष्ट अभिप्रायरूप ठेवा.

५ मी ब्रह्म येणें आकारें । ब्रह्मरूप स्फूर्ति स्फुरे । तें विचारितां तत्व निर्धारें उठे निरालंबीं ॥ १ ॥ आपुलिये जन्म भूमिके । वस्ती बहुतें पुण्यें ठाके । तेथें निमिजे तरि चुके । अधःपतन ॥ २ ॥ देहाच्या जन्मभूमिकेचें । एवढें महिमान साचें । तरि जन्मस्थान जीवाचें । तें अगाध महिमान कीं ॥ ३ ॥ (विवेकसिंधु, मुकुंदराज.) ह्या आद्य कवीनेंही ह्या नरदेहाचें भाग्य केवढें वर्णनकेलें आहे पहा. पण त्याविषयीं विचार मात्र मनुष्याकडून झाला पाहिजे.

ब्रह्मादीं किं अनेक चित्र उमटे मायेसि आरंभ जो
सोहीरा मत जाण तूं अचल हा तूर्या भुमिस्तंभजो ३०

हा देहांतरिं कोण पाहत असे साक्षीच कीं शोधिला
योगें आकळिला मनासि कळला सर्वांचिये आदला
आनंदेंचि निमग्न होउनि तया म्यां नित्य आराधिला
सोहीरा मत पाक हा गैगनिंचा अग्नी विणें रांधिला ३१

---

१ तूर्या भूमींचा आधारस्तंभ (प्रत्यगात्मा) ज्या ठिकाणीं जाग्रत, स्वप्नादि कोणचीही अवस्था नाहीं अशी गुणातीत अवस्था ती तूर्या होय. मुकुंदराजांनीं विवेकसिंधुमध्यें म्हटलें आहे (स्वरूपाचें अनुसंधान । तोचि देह महाकारण । तेथें तूर्या अवस्था जाण । सर्व साक्षिणी ॥ १ ॥ तूर्येची परिपक्वता । तेचि उन्मनी अवस्था । निंबोळियास मधुरता । जैसी पक्वदशे ॥ २ ॥)

२ 'पाक हा गगनींचा अग्नीविणें रांधिला' असें म्हणण्याचा हेतु. पूर्वोक्त तूर्या तीच प्रणवाची अर्धमात्रा तिचें स्थान ब्रह्मरंध्र आहे. या स्थानीं प्रणवाचा चतुर्थ पाद तो नादात्मक असल्यामुळें तेथें शब्द ब्रह्म मावळलें गेलें. 'व जो सर्वत्र संचार करणारा सृष्टि व्यापून असलेला अग्नि वैश्वानर.'

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।

[भ. ग्री. अ० १५ [

हा त्या पुरुषाचें मुख्य आहे, म्हणून अग्नीविणें (शब्दोच्चारावांचून) रांधिल (सिद्ध केला) असें म्हटलें. (हेच तूर्यगा मैत्रा । प्रणवींची अर्धमात्रा । याचें स्थान पवित्रा । ब्रह्मरंध्र ॥ १ ॥ आनंदा व भासभोग । सहांचा समयोग । ऐसा निपजला प्रसंग । शुद्ध सत्वें ॥ २ ॥ या समस्तांचा गुण । तो प्रणवाचा चतुर्थ चरण । स्वरूपीं निर्गुण । नादात्मक तो ॥ ३ ॥ जेथें वर्णाचा नाहीं उच्चार । ध्वनि मात्राचा व्यवहार । म्हणूनि अर्धमात्रा ऐसा निर्धार । जाणिजेस तूं ॥ ४ ॥ तथापि चतुर्थ चरण । येणें शब्दें बोलिले योगीजन । तेथें परमात्माचि सगुण । निरूपिजे पैं ॥ ५॥ विवेकसिंधु मुकुंदराज) बृहदारण्यकोपनिषद आ० १ ब्रा० १ यांत म्हटलें आहे प्रभातकाळ हा यज्ञ करण्यास योग्य अशा अश्वाचें शिर आहे; (प्रजापतीवर हें रूपक आहे. सर्व कांहीं प्रजापतिपासून उद्भवतें. अश्वाच्या निरनिराळ्या अवयवांस जीं नावें दिलीं आहेत तें प्रजापतीचेंच केवळ वर्णन आहे.) सूर्य त्याचा नेत्र आहे, वायु हा त्याचा प्राण आहे. वैश्वानर अग्नि हा त्याचें मुख होय, हा अश्व आपलें अंग हलवितो तेव्हां विजा चमकतात असें समजावयाचें. त्याचें खिंकाळणें हा शब्द

जो स्वामी सकळां जगा प्रसवला त्याचेंच घे दर्शन
जो दूरीं असतां अलिप्त विषयीं सृष्टीस सूदर्शन
होणें नाहीं गुरुत्विगें करिं मना साधू पद स्पर्शन
सोहिरा सविवेक तूं करीं ह्मणे संकल्प कीं नाशन ३२
पाशीं देव असे तुलाचि न दिसे तें आड अज्ञान हो
त्याचा नाश करीं निरंजन वरीं प्रख्यात हें ज्ञान हो
तेंही पावलिया जया किं निलया तें शुद्ध विज्ञान हो
तें भोगी तिच सोहीरा ह्मणतसे तें मुक्त सद्ज्ञान हो ३३
प्रारब्धाधिन देह हें कीं असतां कोणावरी कोपसी
रात्रंदीवस खेद हा करुनियां भक्तीसि कीं लोपसी
आतां सांगतसें किं सर्वही मना जैं ईश्वरीं आपिसी
सोहीरा मत वीश्व हें मग तुला निष्कीं दिसे ओपसी ३४
प्रारब्धास्तव हें घडे तंवपडे देहासि या भोगणें
या जन्मार्जित कर्मभोगवि यया जैसें किं हें ऊसणें

होय. (ध्वनीच्या सामर्थ्यावर मूर्तत्वाचा आरोप करून त्यास शब्द अशी संज्ञा दिली आहे.) मूळांतील सविस्तर पहा. येथें सोहिरोबांचा यज्ञ ह्मणजे असा.

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे ।
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥
[भ. द्री. सु. चं. टी. अ० ४]

कोणी प्राण आणि अपान यांचा गतीचा निरोध करून प्राणायाम करणारे जन, प्राणांचा अपानाच्या ठायीं, आणि अपानाचा प्राणाच्या ठायीं यज्ञ करितात.

१ देव तुझ्याच पाशीं आहे पण तुला तो दिसत नाहीं एवढेंच, केशवस्वामी ह्मणतात:—कसा विसरूं म्या तयासी । आहे मजपाशीं.

२ खोट्या धातूच्या अलंकारादिकांवर (ओप ह्मणजे) सुवर्णादिकाचा वरवर केलेला मुलामा.

३ प्रारब्ध हे देहास असून तें अनिवार्य आहे. याविषयीं अमलानंद शतश्लोकीमध्यें ह्मणतात. (ज्याचा पुत्र जगन्निवास हारि त्याणें प्राणशोकें दिला । ज्याचा बालक तो रमापति स्वयें त्याच्या पदीं शृंखळा ॥ ज्याचा सारथि विश्व पालक, वसे नीच्या विराटा घरीं । सेवा ते करिती तथापि न चुके प्रारब्ध सर्वांपरी ॥ १ ॥)

ऐसें हे कळुनि उगें विकळुनी कोणावरी रुसणें
सोहीरामत पंथ हा सुगमकीं चोरांसि कीं पूसणें ३५

रामावीण कुनाम घेउनि जनीं कां वाउगा झांकसी
चौहाटीवरि हे निधींकिं दिसतां कां नेत्र तूं झांकिसी
पूर्णस्वानुभवा विणेंचि टकणें पाखांड हें शीकसी
सोहीरामत मुक्त पंक्तिजवळी तूं फालेंसें वीकसी ३६

गोडी मानुनियां मनीं अनुदिनीं संसारबांधी मळा
तो मायाजळिं मीन आमिष भुली आसूडला होगळा
लक्षूं धांवति इंद्रियें बहुवसें दृश्यावरी आगळा
सोहीराजारे पाहिला तरि म्हणे ज्ञानाविशीं आंधळा ३७

अज्ञानें बहुभास भासतिपरी एकाचि तंतूपटीं
तैसा विश्वविलास वेश धरितो ऐक्येंचि हा कापटी

---

१ जसें ह्मणतात कीं काय? तो मार्ग! चोरासुद्धां पुसावा, इतका निर्भय आहे. येथें अहंकार हा चोर (अन्य ठिकाणीं सोहिरोबांनीं अहंकारास उंदीर असें ह्मटलें आहे अशा उंदिरास गणराजांनीं नेहमीं आपलें वाहन करून ठेवलेला आहे.

२ चार वाटा एकत्र मिळतात अशी जागा ती (चव्हाटा) सावंतवाडीप्रांतांत प्रत्येक गावांत ग्रामदेवाच्या देवळाच्या आजुबाजूस चव्हाट्याची ह्मणून जागा आहेच. (पक्षी पूर्वोक्त तूर्या अथवा शुद्ध सत्व चौक) ब्रह्मरंध्र स्थान तेथेंच रामरूप निधि (ठेवा) सांपडावयाचा. केशवस्वामी ह्मणतात. अरे भाईनों ! हा रामरूप ठेवा चव्हाट्यावर फिरे पडला आहे; पण तुमच्या नजरेस येईना. (प्रेम आलें सुखा, तुह्मीं राम लुटा फुका । लूट मोठी भाई, घेणार कोणी नाहीं.)

३ अरे ज्या ठिकाणीं (मानससरोवरांत) चिन्मय मोत्यांचा सुकाळ आहे त्याठिकाणीं फालसें ह्मणजे बनावटी खोटें मोती विकायाला बसला आहेस! ज्ञानोबा ज्ञानोपदेशामध्यें ह्मणतात. (औट पीठाचिये तळीं । भ्रमर गुंफेचिया पाठार माळीं । चिन्मय मोती ढळाळी । महातेज ॥ १ ॥ पायातळां तरीं ब्रह्मपाणी । मकराहूनि ऊंच गगनीं । आदिमध्य अवसानीं । त्याचा मार्ग न सांपडे ॥ २ ॥)

४ कापटी असें ह्मटलें ह्मणून आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. कारण प्रीयभक्तांच्या शिव्यासुद्धां देवास गोड असतात. शिव्यांची तर गोष्ट सोडाच! परंतु भृगुनें प्रत्यक्ष उरांत लत्ताप्रहार केला तो आनंदानें गृहण करून ' श्रीवत्सलांच्छन '

५

जो संकल्प विवीध भासवितया ठेवूं नका नेहटीं
सोहीरा इतुकेनि बैस म्हणतो अजरामराचे पटीं ३८

आदी अंतिं नसे जगातित असे ज्याचेनि सर्वै दिसे
ती सत्ताच अनंतरूपिं विलसे हें ज्ञान संतींवसे

ह्मणून भूषण धारण केलें. पण अभक्तांचे यज्ञयाग किंवा वेदघोष यांजकडे तो ढुंकून सुद्धां पाहत नसतो. तुकोबांनीं अशाच शिव्या दिलेल्या आहेत (अरे माझ्या विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ॥ १ ॥ तुझी रांड रंडकी झाली । तुझी माय व्यर्थ व्याली ॥ २ ॥) कपटी ह्मणण्याचें कारण, ' जड आणि मोहात्मक अशी जी माया तिचा अंगिकार करून (ऐक्यैंचि) नाना विश्वविलास करून दाखवितो. (माया ही तमोरूप (जड) असें तापनीय उपनिषदांत सांगितलें आहे, ' जडं मोहात्मकं तच्च ' तें मायारूप जड आणि मोहात्मक आहे असें श्रुति अनुभवास आणिते. तें बाळगोपाळांच्या अनुभवास आल्यामुळें ' अनंतही आहे असें श्रुति ह्मणते. घटादि अचेतन पदार्थांचें स्वरूप तें जड असें समजावें आणि जेथें बुद्धि कुंठित होते तोच मोह असें लोक ह्मणतात.

१ धूर्वोक्त जो मायामोह विविध संकल्प भासवितो. त्याला नेहटीं नेटानें, निश्चयानें) शेवटीं राहूं देऊं नका. ह्मणजे जी माया व्यवहार दृष्टया खरी, युक्तीनें ' नो सदासोत् ' या श्रुतीवरून अनिर्वाच्य (ह्मणजे तिचें रूप आहे असें ह्मणतां येत नाहीं, व नाहीं असेंही ह्मणतां येत नाहीं) ह्मणून ज्ञानदृष्टीनें मायेचें रूप तुच्छ, असें श्रुतीनें सांगितलें. यासाठीं ज्ञानदृष्टीनें तिच्या मोहास राहूं देऊं नका असें ह्मटलें.

२ जन्ममरणादि विकारांपासून असंग जो कूटस्थ.

३ जो कूटस्थ पट आदीं (मुळांत) नव्हता व अंतींही नसून जगाहूनही निराळा आहे असें असून पुन: आश्चर्य असें पहा कीं, ज्या चित्रपटावर मनुष्य, पशु, पक्षी पर्वत वृक्ष व नद्या वगैरे सृष्टीचें चित्र दिसून येतें. त्याचें कारण त्याची सत्ता होय.

४ त्या सत्तेनें (मायेनें) असंग जो कूटस्थ आत्मा त्याला जगाचें रूप आणलें. आणि चिदाभास रूपानें जीव आणि ईश यांना तिनेंच निर्माण केलें. एवढें जग करूनही तिचा कूटस्थास लवमात्र संपर्क नाहीं. असा हा मायेचा स्वभाव दुर्घट रचनेचा आहे. व ती सत्ता अनंत स्वरूपामध्यें विलसत आहे याचें प्रत्यक्ष ज्ञान संतामध्यें वसतें. ह्मणजे तिचें खरें स्वरूप त्यांनीं ओळखलें आहे. परंतु अहंकृति वश झालेल्या प्राण्यांच्या चित्तास तो उमज पडत नाहीं. ते पिसे (वेडे हा शब्द गोमांतक प्रांतीं प्रचारांत आहे.)

चित्ताला नुमसे अहंकृति वशें ते प्राणि जाणापिसे.
सोहीरामत पातले जिवदशे लुब्धोनि दर्शीं कसें ३९

शाली अंगरखे नरूचुनि रुचे वैन्यासि या घोंगडी
कीं नीरीं बुडणेंचि गोडि गमते त्यासी नको सांगडी
अज्ञानें भ्रमितासि नावडतसे साधूगडी बांगडी
सोहीरा म्हणतो तो पराभव तया कें होय मायागडीं ४०

हा इच्छा तरुखांडुनी कारिसि तूं कांहींवरीं कूपहो
झांकूनि किरनेत्र मंडल पहासी ओंविसां रूपहो
अव्हेरूनिच सूरभी दुभतिये घे कूर्मीचें तूपहो
सोहीरा मतबुद्धिहीन नरतो अज्ञान आमूपहो ४१

---

१ जंगलांत राहणारा जो 'धनगर' (सावंतवाडीप्रांतांत या लोकांची वस्ती बरीच असून हे जंगलाच्याच आश्रयानें राहतात. सावंतवाडी शहरांतील, पदार्थसंग्रहालयांत तेथें उत्पन्न होणाऱ्या विशेष वस्तूंपैकीं ह्मणून एक धनगराचें हुबेहुब चित्र करून ठेवलेलें आहे.

२ दोन लहान लहान नांवा (होड्या) एकत्र बांधलेल्या असतात. त्यामुळें उलथून पडण्याची मुळींच भीति नसते ह्मणून वाडीप्रांतांत बहुतेक नद्यांस ह्या सांगड्या असतात.

३ पूर्वोक्त मायामोह.

४ हींवर ह्मणून एक निरुपयोगी वृक्ष आपोआप उगवणारा असून त्याची उत्पत्ति वाडीप्रांतांत फार आहे. बहुतेक हें झाड नद्यांच्या कांठांनीं फार उगवतें, त्यास त्या प्रांतातील कुळबी लोक 'न्हीव' असें ह्मणतात. यांतील भावार्थ असा कीं 'दारांत असलेला कल्पतरू मुळानिशीं खणून काढून त्या कूपांत (खळग्यांत) ह्या न्हीव वृक्ष लावण्याची तजवीज करतो.

५ मासा पकडण्यासाठीं पाण्यांत सोडलेल्या गळास लावलेलें आमिष.

६ कामधेनु (सुरभी पक्षी सत्रावी कामधेनु).

७ कासवी ह्मणून एक प्रकारच्या जातींचा प्राणी नदीमध्यें असतो त्यापासून तुपासारखा दिसणारा घाणेरडा पदार्थ निघत असतो. (किंवा वंध्या गाय जी अविद्या अहंता तिचें तुप जड अन्न रेतादि हें.)

कैसी प्रीति बसेल त्या हरीपदीं निष्काम पुण्याविणें
इच्छूनी फलकर्म हें कारि तया संसारओटी जिणें
दारापुत्र कलत्र वित्तमदिरा हालाचि जैसी पिणें
सोहीरामत जाण बा पुनरपीं यातायेतीं झुंपणें ४२

या ब्रह्मार्पण कर्म हें करुनियां नैराश्य कीजे फळा
येणेंवीण कळा किं जाण सकळां ज्ञानेंविणें निष्फळा
वैराग्यासि अहर्निशी धरुनियां अंतर्गता चोखळा
सोहीरा ह्मणतो किं नागलतिका बीजाविणें सूफळा ४३

घेऊनी समता, शरीरममता सांडूनि, सत्संगतीं
गाती, ध्याति अनंत ईश्वररुपीं सानंद सद्रंगती
बैसूनी बहु एक मेळ सरिसे अर्थाचिये पंगति
सोहीरा ह्मणतो पुजूं भगवती अर्धांग ऊपांगती ४४

---

१ विष.

२ जन्ममरण रूप संसारांत पडणें.

३ नागलतिका हा शब्द फारच गुह्यार्थानें वापरलेला आहे, नागवल्ली हा शब्द 'कुंडलिनी शक्ति पक्षी (अनंत सत्ता) 'अनंता' ह्या अर्थी वापरलेला आहे, आतां नागवल्ली (पानवेल).

तांबूलवल्ली तांबूली नागवल्ल्यप्यथ द्विजा ।

इत्यमरः

ह्या आणि 'अनतां' हा शब्द अमरकोशांमध्यें सहा ठिकाणीं वापरलेला आहे. त्यामध्यें उपलसरा, दूर्वा इत्यादि वेली फळावांचून (बीजावांचून) सुफल होणाऱ्या आहेत. अन्यत्र संबंधही तत्वार्थानें येथें लागू आहे. (ऐश्वर्येंशीं ईश्वरा । जियेचें आंग संसारा । आपुला होऊनि उभारा । आपणचि जो ॥ १ ॥ पतीचे निअरूपणपणें । लाजोनि आंगाचें मिरवणें । केलें जगा येवढें लेणें । नाम रूपाचें ॥ ६ ॥ ज्ञानेश्वर, अमृतानुभव.)

४ सत्+रंग=शुद्धरंग (शुद्ध सत्व, मूळचा शूभ्रपट, स्वयमेव, चिद्रूप) त्या रंगानें युक्त ह्मणजे तन्मय होतात.

५ अर्धांग ह्मणजे अर्धनारी (सत्ता) आणि उपांग ह्मणजे माया (शक्ति) ज्ञानेश्वर, अमृतानुभवामध्यें ह्मणतात (स्त्रीपुरुष नाम भेदें । शिवपण एकलें नांदे । जग

तूं राजा असली परी न दिससी या मानसा पाथिका
तूझा तूंचि जनीं जना वळख तूं कीं आपणा नायका
तूझ्या संनिध गा जगाप्रसवली ही प्रकृती[1] नायिका
सोहीरामत देव सूलभ तया ज्ञानप्रदा नायका[2] ४५

होतो होड[3] अगाज कीं परि पहा ते केवढी सीबती[4]
सत्ता सूक्ष्म सन्निधानि किं तसी सर्वेंद्रियीं राबती
ओढी हात भरी वरोनि सरतें दूरी किं हो लांबती
सोहीरामत ज्ञानवर्म कळतां हे कल्पना थांबती ४६

गूणाशीं समता तरी न ह्मणवे रत्नासि पाषाण हो
गाईचें बघतां पवित्रपण तें विष्ठा नव्हे शेण हो

सगळें अधार्धें । पणें जिहीं ॥ १ ॥ दों ओंठीं एक गोष्टि ! दों डोळियां एक दृष्टि तेंवीं दोवीं जिहीं सृष्टी । येकचि जेवीं ॥ २ ॥ जे स्वामीचिये सत्ता । वीण असों नेणें पतिव्रता । जियेवीण सर्व कर्ता । कांहींच ना जो ॥ ३ ॥ (उपाग) सर्व शून्याचा निष्कर्षु । जया बाइला केला पुरुषु । तेणें दादुलेन सत्ता विशेषु । शक्ति जाली ॥ ४ ॥ ऐश्वर्यैशीं ईश्वरा । जियेचें आंग संसारा । आपुला होऊनि उभारा । आपणचि जो ॥ ५ ॥) ज्ञानोबांनींही याप्रमाणेंच अमृतानुभवामध्यें नमन केलें आहे. (सांडूनि मीठपणाचा लोभु । मिठें सिंधुत्वाचा घेतला लाभु । तेवीं अहं देऊनि शंभू । शांभवी झालें ॥ १ ॥ शिवशक्ति समावेशें । नमन केलें म्या ऐसें । रंभागर्भ आकाशें । रिघाला जैसा ॥ २)

१ प्रकृति (मूल प्रकृति नायिका ह्मणजे पूर्वोक्त सत्ता (मुख्य प्रधान प्रकृति) ज्ञानोबा अमृतानुभवांत ह्मणतात. (कैशीं स्वसुखाचीं आळुकीं । जे दोनीपण मिळोनि एकीं । नेदितीच कौतुकीं । एकपण फुटों ॥ १ ॥ हा ठावोवरि वियोग भिडे । जें बाळ जगाएवढें । वियाली पण न मोडे । दोघुले पण ॥ २ ॥ आपुलिये आंगीं संसारा । देखिलिया चराचरा । परि नेदितीच तीसरा । झोंक लागों ॥ ३ ॥]

२ या प्रकारचा देव (निर्विकार शिव) तो "जो ज्ञान (नायक) शिरोमणि (ज्ञानदेव) त्या एकालाच तो सुलभ आहे.

३ होड=मोठा आवाज. हा गोमांतक प्रांतांतील शब्द आहे.

४ तोफ (सीबती)

चिंधी हातभरी परी मिरवलें जें राजनीशाण हो
सोहीरामत संत मानव तरी कैसेनि ते दोषि हो ४७

सर्वी सज्जनता सुनिश्चित वरी शत्रुत्व पैसा किं हो
आटाआटि करोनि वेंचिति बहू जे प्राण रेसा ।किं हो
जैसा त्या हिरव्या तृणा लगबगां झैसाचिं धांवे किं हो
स्वानंदाविण सोहिरा ह्मणतसे आह्मासि कांहीं नहो ४८

हा गोविंद सुवंद्य नंदसुत तो गौळ्यांत साकारहा
वेणू वाजवि धेनु चारित उभा राहात नौ[2]तारहा
योगी भोगिति गोपवृंदवनिता पाहूनि नौ[3]तारहा
सोहीरामत जाण अंतसमयीं स्वामी भवा तारिहा ४९

---

१ वास्तविक सज्जनता सर्व साधारण झाली असती; ·परंतु ह्या जगांत "निश्चयें करून" पैसा द्वेषमत्सरादि उत्पन्न करितो. अमृतराय ह्मणतात. [तुह्मीं ऐका। साखे सहोदर ह्मणती पैका ॥ ध्रु० ॥ पैक्यापासुनि रथ गाडी। पैका बांधीत असे माडी। पैक्यापासुनि शालजोडी। पैका उडवीत असे घोडीं। लावुनि सडका ॥ १ ॥ पैक्यापासुनि कामकाज। पैका मिळवी बहुत व्याज। पैका मायेचें निज-बीज। पैका बहू रत्न महाराज। कागद रोखा ॥ २ ॥ पैक्यापासुनि कारभार। पैका हिंडवी दारोदार। पैका दुःखाचा डोंगर। पैका गर्वाचा सागर। बुडवी कटका ॥ ३ ॥ पैक्यापासुनि पुराणश्रवण। पैका करी वेदपठण। पैका करी नृत्य गायन। पैका करी झूज भांडण। पैका लावितसे टपका ॥ ४ ॥ पैक्यापासुनि कन्यापुत्र। पैका मिळवी इष्टमित्र। पैका महारत्न विचित्र। संचित टका ॥ ५ ॥ पैका जमामाची निधी। जेथें पैका तेथें बुद्धि। ज्याला पैका न मिळे कधीं। तो नित्य फिका ॥ ६ ॥ ऐसें पैक्याचें आख्यान। ऐका तुह्मी चित्त देऊन। पैका पाहून भुलले जन। अमृतेश्वर निर्मळ वचन। लाधला लटिका ॥ ७ ॥] असें अमृतराय ह्मणतात पैसा लटिका आहे असें (सद्गुरु) वचन आपण लाधलों; तद्वत् सोहिरोबा ह्मणतात कीं स्वात्मानंदावांचून आह्मांस कशाचींच गरज नाहीं.

२ ज्ञाननौकेच्या योगानें भवसागर तारून नेणारा.

३ नवयौवन शामसुंदर असा.

आह्मां दुर्लभ गोपिवल्लभ हरी जो वश्य भक्तां तयां
ध्याती अंतरिं जे निरंतर मुखें सद्भावनें गा तया
सिद्धांती रमती कळा कि गमती ही संत सांगा तयां
सोहीरा चुकवूनि दुर्गति ह्मणें मोक्षासि या जा तयां ९०
हे पारंगत ग्रंथ सर्वहि करी आनंद नाहीं मना
जिज्ञासू[1] किं विजाति होउनि जनीं मान्याचि हे कामना
आत्मा अंतरला अनंतरुपि हा चित्तींच हे फामना
सोहीरामत जाण तूं ममतया कल्पांति आरामना ९१
चंद्राचे उदयीं समग्र भरती येते जसी सागरा
उद्यानीं सुमनें वसंत समयीं वृक्षासि कीं डोंगरा
वस्तू संनिधगा जगा प्रसवली हे प्रकृती नागरा
सोहीरा ह्मणतो जळें सिनिप जे हे लोणें[2] मायागरा ९२
भ्रांती ही दमती कळाचि गमती चिद्वृति उद्दामती[3]
बुद्धि ये समती विवेक रमती अभ्यास मुद्दामती
आनंदें गमती करोनि वमती तन्मात्र लुब्धामती
सोहीरा कुमती प्रपंचि घुमती आत्मासि बेफामती ९३
हा वैकुंठपती मनांत जपती त्या पातकें कांपती
देहा संग हिरा पतीत मैरजे[4] ब्रह्मार्पणें[5] घापती

१ जिज्ञासु ह्मणवितो ही कामना (हा हेतु) योग्य आहे. परंतु हा जिज्ञासुपणा विजातीयच झटला पाहिजे. कारण हा अनंतस्वरूपी आत्मा अंतरला. याबद्दल चित्तांत [फाम=शुद्धि हा शब्द वाडी प्रांतांत व गोंवें अमलांत प्रचारांत आहे.] कधीं कल्पनाच येत नाहीं. चित्तशुद्धी झाल्याविना जिज्ञासु कसला!

२ मीठ [मायानामक आगरामध्यें]

३ उल्लासित.

४ पाच नामक रत्न.

५ केलें जातें किंवा घातलें जातें या अर्थी.

देतो हे सुमती कधींच कुमती संसारिना लिंपती
सोहीरामत ना कधीं विलपती संरक्षि त्यां श्रीपती ९४

हें तापत्रय देखुनी उपजला संत्रास चित्तास हो
ते सद्ब्रह्मपदीं सदींच[1] मिळतांना लभ्य हा त्रासहो
माया भासत व्यापकें पटचिह्ना जो एक सूतास हो
सोहीरामत सर्व ब्रह्म दिसतें सद्रूप सूतास हो ९५

हा विष्णू भगवान संकटिं हरि दासांशि जो सारथी
स्वामी आपण अर्जुना रथीं बसे प्रख्यात जो भारतीं[2]
देखोनि कुल गोत्र श्रेष्ठ गुरुते तोवीरें[3] हा वीरथी
सोहीरा ह्मणतो कीं युद्धि भविली हे ज्ञान[4] भागीरथी ९६

आकारीं भगवंत देख बरवा कैशा परी वर्ततो
डोळा कान किं नाक मूख दिसतें वर्तोचि वीवर्ततो
सत्ता आपुलि आपणाधिन असे तो शून्यिं किं पर्ततो
सोहीरामत तोचि संत समजा आनंदिं कीं नर्ततो ९७

---

१ सद्ब्रह्माच्या ठायीं किंवा, सतत निरंतर या अर्थीं [सदीं हा शब्द, वाडीप्रांतीं, ‘ प्रतिदिनीं किंवा सतत या अर्थीं वापरला जातो]

२ भारतीयुद्धप्रसंगीं.

३ अर्जुन युद्धप्रसंगीं मोह पावून विकळ झाला.

४ ज्ञान भागीरथी (भगवद्गीता) याविषयीं ज्ञानेश्वर ह्मणतात. [ह्मणोनि महाभारतीं नाहीं । तें नोहे लोकीं तिहीं । येणें कारणें ह्मणिपें पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ १ ॥ आतां भारतकमळपराग । गीताख्य प्रसंग । जो संवादला श्रीरंग । अर्जुनेंशीं ॥ २ ॥ नातरी शब्द ब्रह्माब्धि । मथिला व्यासबुद्धि । निवाडिलें निरवधी । नवनीत हें ॥ ३ ॥ मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडासिलें विवेकें । पद आलें परिपाकीं । आमोदासी ॥ ४ ॥ जें अपेक्षिजे विरक्तीं । सदा अनुभविजे संतीं । सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ॥ ५ ॥ जे आकर्णिजे भक्तिं । जे आदि वंद्य त्रिजगतीं । ते भीष्म पर्वीं संगती । सांगिजेल ॥ ६ ॥ जे भगवद्गीता ह्मणिजे । जे ब्रह्मेशानीं प्रशंसिजे । जे सनकादिकीं सेविजे । आदरेंशीं ॥ ७ ॥]

देवापाशीं तुझा सुनेत असतां तोटाचि नाहीं तुला
कोणी एक विशीं अपूर्ण न करीं कल्पीत या हेतुला
अदृश्यीं असतां प्रकाशत भला आत्माचि हा आंतुला
सोहीरामत भक्त हो मग तुला संसार हा केतुला ५८

औटी हात शरीर बंदिं पडतां आह्मी ह्मणों थोर हा
पांचाचें सुख सेवुनी संवकला कायेमध्यें चोर हा
मिथ्या आदरितो किं या मृगजळीं संसारची घोर हा
सोहीरामत नर्क भोगि पुढती माहान दुर्वार हा ५९

नित्यानित्यविचार[1] नित्य करितां उद्धार होतो जिवा
जैसा तो सुविकास होत बरवा सूर्योदयीं राजिवां
तेवीं संतसमागमें उमजुनी चिच्चिंतनीं ताजवा
सोहीरामत जाणुनी अनुभवा स्वानंदचीं[2] राजिवा ६०

ज्या वर्माविण कर्म हें करुनियां शुद्धांश जो सांडिसी
राखोंडी फुंकणें कणेंविण उगा कोंडाचि तूं कांडिसी
टांकूनी सुटका वरि किं लटका व्यापार हा मांडिसी
सोहिरा निजवैर्यदुर्ग ह्मणतो ज्ञानेविणें पाडिसी ६१

ही सृष्टी सकळैक वर्तत असे ज्याच्या निरोपावरी
त्या ज्ञानेंचि उदास होउनि मना वे भक्तिची पायरी
दृष्टी देउं नको निमीष भारि तूं यादृश्य[3] रोपावरी
सोहिरा लय लावि तूं ह्मणतसे या नीजरूपावरी ६२

आत्म्याचें निजरूप चर्मदिठिला कैसेनी तें भासतें
जेथें तेथेचि पाहतां गगन तें शून्यींच आभासतें

---

१ आत्म्याचें स्वरूप तेवढें नित्य आहे आणि दृश्य ह्मणजे जग अनित्य आहे असा दृढ विचार त्याला नित्यानित्य विवेक ह्मणतात. २ सतत असणारा निजानंद. ३ जगद्रूप प्रपंचवृक्षावर.

आलें नामरुपा सगूणपण तें तत्काल हो नासतें
सोहिरामत ब्रह्मरूप उगमीं ठायींच तें आसतें ६३

आशा तूं कवणाचिही धरुं नको त्या इश्वरावांचुनीं
कोण्या आचरणीं कृपा करि हरि ग्रंथीं पाहा वाचुनी
अभ्यासें मन लाव शून्यभुवनीं पहा कसें लांचुनी[1]
सोहिरा ह्मणतो भवांतुनी पुढें नरकासिया कांचुनी[2] ६४

चित्सूर्योदयिं[3] ती प्रकाशत मतो संसार नाशी तमा
तें मी कोण असें निरेखुनि पहा बोधासि या उत्तमा
ऐसें कोण करी तरि परि शिरीं सद्गुरुचा हात मा
सोहिरा ह्मणतो जनीं मग तया कोणाचि नाहीं तमा[4] ६५

त्याला प्रीय असो अरण्य गृह कीं राहेल तैसा असो
जो सर्वात्र अनंत विश्वरुपि तो पाहेल तेथें दिसो
आह्मा कोण सुअर्थ स्वार्थ बरवा आनंद चित्तीं वसो
सोहिरामत तोचि संत समजा बैसेल तेथें बसो ६६

जन्मा येउनियां जयासि बरवा आत्माचि हा लाभला
तो प्राणी किं घरीं वनांतरिं असो कोठें तरी शोभला
देवा गात सुध्यातसे मनि खुला जाईल तेथें भला
ध्याणें कीं दृढ सोहिरा ह्मणतसे वीरागें[5] आरंभिला ६७

सद्भक्तीकरितां जयावरि असे श्रीनाथ संतुष्ट हा
नाहीं मान अमान कांहिं न धरी नामामृतें पुष्ट हा
नाहीं क्लेशहि लेश मानसिं नसे उद्देश ना दुष्ट हा
सोहिरामत देव पाहत असे सृष्टींत अदृष्ट[6] हा ६८

---

१ लालुच दाखवून. २ कांच घेऊन, भिऊन. ३ चैतन्य आत्मा हाच सूर्य. ४ पर्वा [तमा=(निस्पृहस्य तृणं जगत् अशी स्थिति) हा शब्द वाडीप्रांतीं प्रचारांत आहे.] ५ विरक्ति, विषयवैराग्य. ६ अव्यक्त ह्मणजे प्रत्यक्ष न दिसणारा.

योगाचें बळ पूर्ण तूं करूनियां नीरंजनीं न्हे मना
तेव्हांचि तुज सोडि नित्य प्रतिती संसार कूकामना
नीरालंब अनंत सत्यस्वरुपीं होणें घडे सामना
सोहिरा ह्मणतो स्तवीं किमपिही केव्हांचि बेफाम नों ६९

भावार्थेचि पतीतपावन हरि भक्तांसि जो भेटतो
मिथ्या दावि भवासि सांग करितां औघीच कीं वेंठ तो
त्या मोहांतुनि काढुनी मनचि हें नीरंजनीं दाटतो
सोहिरामत दृश्यसंगतिविना आनंदची वाटतो ७०

देवाला स्मर तूं दुरीत हर तूं संदेह नीवार तूं
कांहीं हारविहार तूं करिं परी भ्रांतीस नीवार तूं
चित्तालाचि सुधार तूं अनुभवें हा जीव उद्धार तू
सोहिरा लछ(?) लावि तूं ह्मणतसे त्या नित्यशुद्धीं रतूं ७१

पाठीं स्वामि समर्थ देव असतां भक्तांसि कें वाण हो
आधिं संकट पाडितो परि पहा पाहात निर्वाण हो
तूर्याकामिनि या सुवासिनिस दे सन्मानसा वाण हो
सोहिरा मग तैं ह्मणे मिळतसे हे सिद्धि कल्याण हो ७२

---

१ वाईट इच्छा. २ संघटन, बरोबरी. ३ स्तवन करण्यामध्यें. ४ निष्काळजी, दिलगीर. ५ नाहीं. ६ कोणचेंही काम अंतःकरणपूर्वक न करितां केवळ 'जुलमाचा रामराम' ह्मणून करावयाचें (वाडी प्रांतीं, जमीनदार लोक कुळांकडून (शेतकऱ्यांकडून) कोणचाही कामधंदा सक्तीनें करून घेतात त्यास वेंठ असें ह्मणतात.] ७ओतप्रोत व्यापून राहील अशा प्रकारें लीन करितो. ८ नामरूपात्मक जगाच्या संगतीवांचून. ९ सर्वत्र व्यापून असणारा आनंदमय ईश तो आपणच आहें असा अनुभव येतो. १० सुवासिनी स्त्रिया परस्परांस वाणें देत असतात. त्याचें रूपक यांत केलेलें आहे. [हे सन्मना तूं तूर्यासुवासिनीस सर्व दृश्यविषयांचें वाण देऊन टाक हा भावार्थ.] तूर्या हीच एक खरी सुवासीण; कारण तिचा पुरुष अक्षर आहे.

या कामासि मनीं प्रवेश घडतां मोहीत रोमांकिं रे !
नोहे हें सुख जाण केवळचि तूं पीसी मदीराचि रे
ज्या यंत्रीं नळिकेचिया[2] पडतसे पाशींच मोहें किरें[3]
तेवीं मूकासि सोहिरा ह्मणतसे मोहें[4]चे रामीं किं रे ७३

आत्माग्नीवरि हा जिवत्त्व नग तूं सर्वोंचि ऊलोंख हो
[6]सांचोटीं पडती वरीहि कढती नेणीवें[7] कीं लाख हो
हेमीं भेद नसेचि डांक मनचीं[8] हें द्वैत सूलाख हो
सोहिरामत सृष्टि हे निपजते अश्वत्थि[10] या लाख[11] हो ७४

लंडी[12] दंडि वितंडवाद करितो तो मूर्ख पाखंडि हो
काढी कल्प उगेंचि अल्पमतिनें मध्येंच मूषांडि[13] हो
बोधेना जड तो विजाति[14] पढतो काढीत कुष्मांड[15] हो
सोहिरा मत साधु सूर्य उदयीं हा राहु कुष्मांड[16] हो ७५

---

१ स्त्रियांच्या अंकीं [मांड्यांच्या ठायीं] तुकोबा ह्मणतात. [तुका ह्मणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे.] २ पोपटास पकडण्यासाठीं केलेलें नलिकायंत्र. ३ त्या नलिकापाशांत तें किरें पोपटपक्षी. [जैसा ते शुकाचेनि आंगभरें । नलिका भोंविन्नली एरीं माहेरें । तरि तेणें उडावें परि न पुरे । मन शंका ॥ १ ॥ ज्ञानेश्वरी अ० ६] ४ महामोह ह्मणजे अज्ञान. त्याचें स्वरूप; देह मीच, लाभ काय तो विषयसंसार; सत्य काय तें हेंच आहे; आत्मा अन्यत्र कैंचा ! या मोहानें आत्मा जो राम त्याला अंतरतोस. ५ व्यक्त कर, निर्मळ कर. ६ सोनें कढविण्यासाठीं सोनारलोकांकडे मातीचें भांडें असतें त्यास सांचोटी ह्मणतात. ७ त्यांत अज्ञान, अजाणपण हीच लाख कढून जाते हा भाव. ८ सुवर्णांत भेद नाहींच-मनोमय प्रपंचरूपद्वैत हीच लाख. ९ स्वच्छ कर, चोख कर. १० नामरूपात्मक विश्वसृष्टि ही [उर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्] या पिंपळ वृक्षापासून. ११ लक्षावधि प्राणि. १२ दांडगा दंडी ह्मणजे संन्यास दीक्षा धारण केलेला असून ही. १३ हेंबेंतुंबेंवर येतो [रेडे, बैल इत्यादि जनांवरें शिंगानें माती उकरतात त्यास वाडीप्रांतीं मुषांडी. असें ह्मणतात.] १४ विपरीतज्ञान. १५ कुतर्क. [हा शब्द वाडीप्रांतीं प्रचारांत आहे जसें:—तो भलतीच कुष्मंडलें काढीत असतो]. १६ काळोखी आणणारा राहूग्रह [कोंडून जाणें, गुदमरणें याच्या ऐवजीं 'घुसमटणें' असा शब्द वाडीप्रांतीं वापरतात.]

हा पूर्वार्जित भोग योग बरवा देहासिया भोगवी
या जीवा शिवरूप लाधत वरि आयुष्य हें जोगवी
निर्वीकल्पस्थिती असूनि सहजीं हा संग आरोगवी
सोहिरा मत अंतरीं त्रिहिन तो बाह्मीं दिसे सोंगवी ७६

आपूल्या समसाम्य मानित मनीं साधूसि संसारि हो !
त्याळा पाहत दानवावत वरी क्षोभेल कंसारि हो
मूका अंध बधीर कुब्ज घडवी जन्मींच दारिद्रि हो
सोहिरामत जेथ जाइल तया कोणी न धिःकारि हो ७७

आनंदें भजिजे सदांच पुजिजे आकाशिचा कुंभ हो
इंद्रीयें सुमनें वरी झडकरी दे वायुचा धूप हो
सोऽहं गंध सुगंध लेपुनि पहा तूं आपुलें रूप हो
सोहिरामत तीनि पालटुनि तूं सद्ब्रह्मची पूर्ण हो ७८

---

१ पहिल्या चरणांत सांगितलें आहे कीं, देहाला प्रारब्ध आहे, जरी योगाभ्यासें करून जीवाला शिवरूप प्राप्त होऊन तो निर्विकल्प झाला, तथापि हा प्रारब्धभोग आयुष्यावधीपर्यंत [वरि=तोंपर्यंत, तोंवरि] आयुष्य जोगवितो [पुरवितो] व त्यामुळें त्याला सहजीं, स्वप्नांतील अवस्थेप्रमाणें बाह्यप्रतीति होते; परंतु हृदयांतील अज्ञानरूप संशय, ज्ञानरूपशस्त्रानें तोडून टाकून जो (अंतरीं विहिन) अंतःकरणसंशयरहीत झाला त्याला कर्मापासून बंधन प्राप्त होत नाहीं; व तो नटा-प्रमाणें बाहेरून [बाह्मीं दिसे सोंगवी=सोंगाड्या] वास्तव्य करितो हा यांतील भावार्थ आहे. २ संसारांत लुब्ध झालेला मनुष्य साधूस आपल्याप्रमाणेंच मानितो आणि तो साधु देवाप्रमाणें असतांना त्याला दानववत् ह्मणजे असुराप्रमाणें लेखितो. त्यावर कंसाचा काळ जो श्रीकृष्णपरमात्मा त्याचा क्षोभ होऊन जन्म जन्माचे ठायीं मुका, बधीर, कुब्ज, आणि दरिद्री असा पाधवितो. आणि त्यामुळें जेथें तो जाईल तेथें त्याचा धिक्कार असतो. ३ शरदृतूमध्यें नवरात्रीय शारदोत्सव प्रसंगीं घट (कुंभ) स्थापना करून नित्य पूजाअर्चनवंदनादिकेंकरून भजत असतात; त्याळा उद्देशून हें रूपक आहे. आकाशिंचा कुंभ ह्मणजे गगनसदृश परमात्मा. ४ प्राणवायु. ५ मी ईश्वर आहें अशी जी स्फूर्ति हेंच गंध. ५ मूळचें निजरूप. ६ तीन गुण, सत्त्व, रज, तम. ७ प्रत्याहार दृष्टीनें उलट (अंतर्मुख करून) करून ह्मणजे शून्यामध्यें लीन करून. ८ सद्रूप ब्रह्म (कूटस्थ ब्रह्म).

हाते[1] होडे[2] असूनि काय करणे प्रीती लघु[3] केतकी
मोठा वृक्ष असूनि काय बव तो काजासि ये ? केतकां
तैसें मायिक जाणुनी उमजला जो नाथ[4]संकेत कीं ।
सोहीरा ह्मणतो हिरा निपजला विश्वस्फटीकांत कीं ७९

हेंची कारण म्यां ह्मणें तुज मना! जा आपुल्या ऊगमीं[5]
गंगा जैशि मिळे रुळे अनुदिनीं सिंधूचिया संगमीं
मातें भासत तूं बहू उमजसी[6] कुंठीत जैं नागमीं[7]
सोहीरामत ध्यावि चित्कर्मी[8]ळिं तूं हे तृप्ति सारंगमी[9] ८०

जैसा त्या जळिं हा विकास कमळां देखोनियां कीरणी[10]
आकारींच[11] असोनि चित्ति[12] मनिं[13] तो कूटस्थ[14] चूडामणी[15]

---

१ सोनकेवडे. यास सावंतवाडी प्रांतीं "हाता" म्हणतात. कित्येक ठिकाणीं "हा ते" हा पाठ आहे पण तो चुकीचा असावा. २ मोठा, उंच (होड हा शब्द गोवें-प्रांतीं फार चालतो.) ३ सोनकेवड्याचा जातीचा एक वृक्ष कोंकणांत आहे; त्याला केवडे ही सोनकेवड्यासारखेच येतात; पण सोनकेवड्याचा सुवर्णवर्ण आणि सुगंध त्या केवड्यास नसतो. वाडीप्रांतीं सोनकेवड्यास 'सोनकेगद' आणि दुसऱ्यास 'खारीकेगद' ह्मणतात. ह्मणूनच येथें लघुकेतकी असें ह्मटलेलें आहे. सोन-केगदींच्या ऐवजीं कामास येईल काय? (सोनकेवड्याच्या रसांत कात टाकला असतां तो लवचीक होऊन त्याच्या गोळ्या बांधता येतात, तशा लघुकेवड्याच्या रसांत होतील काय? हा भाव.) ४ एकंदर विश्व मायिक आहे असें जाणून जो (नाथसंकेत)=नाथपरंपरेचीखूण. ५ उत्पत्तिस्थान; पुराणपुरुषाच्या ठायीं ६ उमज पावशील, अनुभव-पावशील. ७ वेदांनींही जेथें कुंठित व्हावें अशा त्या ठिकाणीं. ८ ज्ञानस्वरूप कमल (हृदयकमळ). ९ भ्रमराच्या तृप्तिसारखी (सारंगमाच्या रीतीची.) १० सहस्ररश्मि (किरणी=किरण ज्याच्यापासून उद्भवतात असा] सूर्य. ११ विश्वाकाराच्या ठायीं (स्थूलदेहांत असून). १२ अव्यक्तचित्ताच्या ठायीं. १३ मनामध्यें. १४ स्थिरचैतन्यरूप हृदयस्थ आत्मा. १५ सद्बुद्धि हीच आहे चूडा=ज्योति; केश कलाप ज्याची असा, मणि=श्रेष्ठ रत्न.

ज्ञानाचा अधिकार पावुनि दिसे सद्बुद्धि चूडामणी
सोहीरामत जाण मुक्तपणिं तो जीवंत विद्वन्मणीं ८१

योगें आकळुनी कि प्राणपवना ब्रह्मांडिं जीं न्यावया
आत्मारामसमुद्रपर्वणित जो उत्सुक कीं न्हावया
आपें आपण तद्रुपीं विलयता सद्दर्शना ध्यावया
सोहीरामत हेंचि कारण मुळीं वैराग्य बिंबावया ८२

पिंडामाजिहि सर्व जाणिव कळा साक्षीचं लक्षीतसे
व्यत्यारेक मुखेंहि भासत मनीं दृश्यासि भंजीतसे

---

१ *याची शुद्धसत्त्वबुद्धि ही सर्व ज्योतींमध्यें अग्नि ह्मणजे श्रेष्ठ आहे. २ या लक्षणांनीं युक्त असा जो पुरुष असेल तो जिवंत असतांनाच जीवन्मुक्त (विदेहस्थितींत) आहे असें समजावें; आणि तोच सर्व विद्वानांमध्यें मुकुटमणि होय. ३ योगमार्गानें प्राणवायूचें आकलन करून (ब्रह्मांडीं) योगशास्त्रोक्त सहस्रदलचक्रांतर्गत ब्रह्मरंध्रांत नेण्याविषयीं जो उत्सुक असतो. ४ कारण आत्माराम हाच एक चैतन्यसागर त्यांत स्नान करण्याच्या संबंधानें *नरदेह ही पर्वणि आहे असें जाणून त्या पर्वणीकाळीं त्या चैतन्यसागरामध्यें स्नान करायाला उत्सुक असतो. पंतांनीं ह्मटलें आहे [नरपर्व पर्व दुर्लभ जाणुनि द्यावी कशी न येथ बुडी.] ५ त्या चैतन्यसागरांत (तद्रूपी आपेंआप) विलयता [लीनता] प्राप्त्यर्थ (सद्दर्शन ध्यावयास उद्युक्त असतो. ६ सोहिरोबा ह्मणतात आपल्यास मुळीं वैराग्य बिंबावयास हींच सर्व कारणें घडलीं होतीं. ७ जीवदशेंत. ८ ज्ञानकला, सज्ञानपण ९ परंज्योति द्रष्टा पाहणारा [परंज्योतिरूप] ज्ञानस्वरूप आत्माच. १० पाहतो, जाणतो आणि निश्चयात्मक ब्रह्मान्वयेंकरून, मनीं [मनोमय प्रपंचामध्यें] लटक्याच प्रपंचरूपानें, भासत [जीवरूपानें] भासला जातो. व दृश्यासि [दृश्यास=प्रत्यक्ष दिसणाऱ्या नामरूपात्मक जगास] व्यतिरेकसंबंधीं ज्ञानाच्या [साधनानें] मुखानें (द्वारानें) भक्षणही करतो, ह्मणजे त्याचें निरसनही करितो. अमलानंद योगी शतश्लोकीमध्यें ह्मणतात [तत्त्वें भूत तनूसि कारण स्वयें आत्मा परंज्योति तो । त्याची जे अपरोक्षता तनुप्रमाणें जाणुनी सूज्ञ तो । दृश्यत्त्वें निरसूनि शुद्ध व्यतिरेकें ब्रह्मशाश्वस्त्वयें । लक्षी त्यासि प्रपंचभास लटिका ब्रह्मान्वयें निश्चयें ॥ ९१ ॥

जाणूनी निजनेणिवीं रमति जे[1] विज्ञानदक्षी तसे
सोहीरामंत[2] एकदेशि नव्हती सर्वत्र पक्षी तसे ८३

परब्रह्म[3]रूपोंचि हे लोक सारे । जगद्रूप आहे तरी तो कसा रे
न ठावें तरी सद्गुरूसी पुसा रे । ह्मणे सोहिरा त्याविणें वैरि सारे ८४

विवेकें पहातां तदीं देहें नाहीं । जया दृश्यद्रष्टत्वि संदेह नाहीं
जिवन्मुक्त आहेचि संसार सारा । वदे सोहिरा देख तूं ब्रह्मसारा ८५

धरीतोसि ही वावुगी आस कीं गा । भुलीचे भुरारेचि[6] हे आसके गा
असोनी घरीं अन्न ऊपास कां ? गा । ह्मणे सोहिरा देव ऊपासकां गा ८६

याप्रमाणें जाणून जे (निजनेणिवीं=निज=सत्यांश ज्ञानमूळकारण+नेणीव=असत्यांश अज्ञानकार्य यांमध्यें) ज्ञानाज्ञानामध्यें रममाण होतात ते (त्यांस कारणाचें ज्ञान झालें ह्मणजे कार्याचेंहि ज्ञान होतें व त्यामुळें) कार्य असत्य त्यांस मिथ्या असें जाणून रममाण होतात. अमलानंद ह्मणतात (हाटीं बाळ भुले स्वगेह विसरे अज्ञान प्राणी तसा । तो हा विस्मृतिनें प्रपंचस्मरणीं शाश्वज्ञनाचा ठसा । त्या हाटीं धन मेळवी गृहस्मृतीनें कीं जसा प्रौढ तो । प्रापंची विचरे परी मनिं तसा आत्मा स्फुरे सूज्ञ तो ॥ २५ ॥ (लक्षी विज्ञान दृष्टीं तव सकल जगद्ब्यात आत्मा स्वयें तो ॥ १ ॥ शतश्लोकी).

१ याप्रमाणें विज्ञानदक्षी ह्मणजे प्रपंचज्ञाननिष्णात (विज्ञान=बुद्धि+दक्षी=बुद्धियोगामध्यें निष्णात. २ सोहिरोबा ह्मणतात. असे जे ते एकदेशी ह्मणजे एकठिकाणींच (पिंडामधील जीवदशेंत) राहणारे पक्षी जीवगृध्र नव्हत तर ते सर्वत्र अंतर्बाह्य पिंडब्रह्मांडांत संचार करणारे हंस पक्षी होत. ३ हे ब्रह्मादि सर्व लोक जर परब्रह्म रूपानें आहेत तर तें ब्रह्म असंग असतां, तो परमात्मा (परब्रह्म) जगद्रूप कसा ? ह्मणजे निरुपाधि परब्रह्म व उपाधियुक्त जगद्रूप हे दोन परस्पर विरुद्ध धर्म कसे ? असें जर पुसाल ! तर तें सद्गुरुपाशीं विचारा तें सद्गुरुवांचून प्रत्यक्ष अनुभवास येणारें नव्हे. ४ देहत्रय. ५ आशा. ६ सांवरी इत्यादि वृक्षांच्या कापसाचे पर मोठ्या वाऱ्याच्या झपाट्यांत भुरभुरदिशीं उडून जातात तद्वत हे देह. ७ यच्चयावत् (आसके, एकंदर) हा शब्द वाडी प्रांतीं प्रचारांत आहे. ८ उपासना करणारांनांच.

जनीं येउनी लागतो ब्रह्मलागा[1] । हरीभक्त सज्ज्ञान वाटे मला गा
जयासी समाधीविणें आसवेना[2] । ह्मणे सोहिरा दृश्य जो आसवेना ८७

मी कोण देहीं जरि यों[4] कळेना । निश्चीत हा देव तया कळेना
साधू जया संगतिला मिळेना । त्या सोहिरावाक्य गती मिळेना ८८

[5]असंगेंचि राहा नको हाट[6] कां? हो । प्रपंचीक मेळा नको हाट[7] कां हो
निजानंद[8]सूखींच कीं मग्न व्हा हो । ह्मणे सोहिरा संसृतीं[9] सूटका हो ८९

जगद्बुद्[10]बुदाचें पहा एक वारी[11] । तयाचेनि संगेंचि भंगेल वारी[12]
मिळूनीहि तेथेंच[13] तूं एक कीं गा । ह्मणे सोहिरा त्याग ती आसे[14] कीं गा ९०

पंथें[15] हा सुगम रे सुचवीला । लाग तूं सुरस या सु-चवीला
ऐशियें[16] गुरुदया तुज आहे । सोहिरा ह्मणत विद्रे[17]द पाहें ९१

---

१ परब्रह्म ही काय वस्तु आहे व ती कोठें आहे या शोधास. २ चैन पडत नाहीं, सुख होत नाहीं, राहवत नाहीं [आस किंवा आसवैना; असा अपभ्रष्ट शब्द वाडी प्रांतीं फार प्रचारांत आहे] ३ आशाबद्ध होत नाहीं, लुब्ध होत नाहीं. ४ या स्थूलदेहांत मी मी असे शब्द निघतात ते कोण उच्चारितो किंवा [illegible] कोण हें ज्याला कळत नाहीं, त्याला देव कोण हें निश्चयात्मक कळणार [illegible] व ज्याला सत्संगतीहि नाहीं, त्याला उत्तम गति मिळणार नाहीं हें [illegible] (ब्रह्म वाक्यो जनार्दनः) ब्रह्मवाक्य आहे असें सोहिरोबा ह्मणतात. ५ संगरहीत आत्मस्वरूपानेंच रहा. ६ हा मायामय नाशवंत विश्वबाजार. (जुनें नवें धारण करावयाचें; अशा प्रकारचा घटोत्कचाचा बाजार) कशाला पाहिजे. ७ पैसा. नाणें. ८ आत्मानंदापासून होणारें निरतिशय सुख. ९ जन्ममरण-रूप संसारांतून. १० अखिल जग हाच एक पाण्याचा बुडबुडा तो ज्या पाण्यांत उद्भवतो. ११ तें अपार (एकच चैतन्योदक) वारि ह्मणज उदक. १२ जन्म-मरणरूप येरझार. १३ त्या चैतन्योदकामध्येंच. १४ आशेचा त्याग कर. १५ पवित्र मार्ग, सहज रीतीनें मुक्कामास जाऊन पोंचण्याजोगा. १६ अशा प्रकारच्या मार्गानें गेलास तर तुजवर सद्गुरुकृपा आहेच आहे असें जाण. १७ आणि सद्गुरुकृपा झाल्यावर, मग (विद्रद) विदग्ध (ज्ञानाग्निदग्धकर्माणं या भगवद्गीता वाक्यानुरूप;) सर्व कर्में ज्ञानरूप अग्नीनें दग्ध ह्मणजे निर्मळ झालीं आहेत असा होत्साता मीपणापासून मुक्त हो आणि निर्दोष असें स्वस्वरूप पहा.

३ स्फुट अभंग.

(१)

स्थूल कोणीं हें केलें । तेथें मन माझें गेलें ॥ १ ॥ चळत्याची हे [illegible]वडी । चाळवित्याची आवडी ॥ २ ॥ नाशिवंत नाठवतें । अविनाश आठवतें ॥ ३ ॥ मचलें कोणासी पडलें । आदि अंतीं लय जडलें ॥ ४ ॥ [illegible] आली तत्त्वभिंती । जगच्चित्रें उठती किती ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे [illegible] ऐसें । अंतःकरणाचि झालें तैसें ॥ ६ ॥

(२)

ऐशी अव्यक्त हे भिंती । विश्वचित्राकारें मिरवती ॥ १ ॥ अहं ब्रह्मास्मि [illegible] चुना । काढुनि लेपें योजिलीं नाना ॥ २ ॥ पंच भुतांचा हा रंग । [illegible] प्रकृति हें अष्टांग ॥ ३ ॥ कल्पना हे चितारिणी । करी नामासा- [illegible] रेखणी ॥ ४ ॥ लेप उपटती जाती क्षय । परि भिंती हे अक्षय ॥ ५ ॥ [illegible] नाहीं आदि अंत । हाचि योग्यांचा सिद्धांत ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे [illegible]पाचा पसेर । मोडिल्यां भिंतीचा पडे विसर ॥ ७ ॥

(३)

ऐशी राऊत राहाटी । बैसे मनपवनाचे पाठीं ॥ १ ॥ घेउनि विवेक [illegible]काठी । लागे भेदाचिये पाठी ॥ २ ॥ आंगीं वैराग्य चिलखत सूये । [illegible] नेदी द्वैताचा घाये ॥ ३ ॥ शांतिचें हें ठेवुनि जीन । वरि घातलें आसन ॥ ४ ॥ धरी शम दम लगाम । अन्वयव्यतिरेकें सुगम ॥ ५ ॥ [illegible]चा हा चाबुक । धरी षट्चक्रांचा रोंक ॥ ६ ॥ सोहिरा आधारी- [illegible] मारी(मारी?) । निघे ब्रह्मरंध्राभीतरी ॥ ७ ॥

---

१ लेपरंगादिकांचा पसारा,=आच्छादन (मोडलें ह्मणजे चित्रांचा लय होतो व केवळ भिंत राहते. तिचा विसर पडतो म्ह० चित्ररूपानें जी भासत असे, तो भास नाहींसा होतो. २ घोडेस्वारांच्या सेनेचा राऊत, मुख्य सेनापति; पक्षीं प्रजापति आत्मा.

(४)

स्थूळ नव्हे आमुचा देश । केला परेपरता वास ॥ १ ॥ येथ नाहींच कांहींच काम । ओळखिलें निजधाम ॥ २ ॥ निरालंब घरा । रिघालों दशव्या द्वारा ॥ ३ ॥ अभ्यासाचे संगें । आलों सुषुम्नेच्या मार्गें ॥ ४ ॥ इडा पिंगळा टाकिली । निजसमाधी लागली ॥ ५ ॥ अनेकत्व ना अवलोकीं । दृष्टि मिळाली हो एकीं ॥ ६ ॥ उघडिलें ककारमुख[1] सोहिरा ह्मणे आम्ही अॅलेख ॥ ७ ॥

(५)

मुद्रा लागली खेचरी[2] । परतुनि नये चराचरीं ॥ १ ॥ स्वानुभववनीं । स्वसुख सहज निरंजनीं ॥२॥ टाकुनि सकळ लक्ष । आजि हे अलक्ष ॥३॥ मनु बुद्धिसि ना गोचर । ऐशी अगम्य अगोचर ॥ ४ ॥ अहंकार हा समूळ । जाउनि सांपडलें मूळ ॥ ५ ॥ सर्वांचा आरंभ । विकासलें निरालंब ॥ ६ ॥ महाशून्यीं[3] करोनि वास । ह्मणे सोहिरा उदास ॥ ७ ॥

(६)

सद्गुरुकृपेचें हें देणें । समाधान केलें येणें ॥ १ ॥ पावविलें ऐसें खुणें । नाहीं येणें जाणें ॥ २ ॥ सुखें सुखांताचि लोळणें । प्रेम नयेचि बोलणें ॥ ३ ॥ निकां[4] तुटला भेदाभेद । जाहला सहज आनंद ॥ ४ ॥ विकासलें निरंजन । उन्मेळिलें[5] हे लोचन ॥ ५ ॥ मना नाहीं हो संचार । ऐसें अगम्य अगोचर ॥ ६ ॥ नामरूप नाहीं ज्याला[6] । ऐसा गैबिचि

---

१ काकीमुख (ब्रह्मद्वार). सिद्धांत सं. उत्तरार्धासोबतच्या चक्रकारिकेंतील द्विदलचक्र पहा. २ या मुद्रेचें लक्षण (सिद्धांत सं० उ० पृ० १६ टी० १ पहा.) ३ सर्व शून्याला गिळून राहणारें महाशून्य म्ह० निर्गुण ब्रह्मनिर्वाण. ४ उत्तम प्रकारें, खरेपणानें. ५ मुळासकट उलटें होणें (लोचन=दृष्टीचें पाहाणें उलटें म्हणजे अंतर्मुख होणें) ६ नामरूपाविरहित, महाकारण देहांतर्गत प्रत्यगात्मस्वरूप हिरण्यगर्भ (ज्याला म्हणजे त्याचा परमात्म्याचे ठिकाणीं लय केला.)

हा प्याला ॥ ७ ॥ मज बैसविलें स्वस्त(स्थ?) । जेथें उदो[१] नाहीं अस्त ॥८॥ पडे मेघाविण पाऊस ! चांदणेंविण प्रकाश ॥ ९ ॥ हें परमामृत पारणें[२] । मज झालें सोहिरा ह्मणे ॥ १० ॥

(७)

संकट निरसीं गा जगदीशा । हेचि मज तुझी आशा ॥ १ ॥ हरिं या मनाच्या कल्मषा । दावीं मज स्वयंप्रकाशा ॥ २ ॥ सर्वही तुझा तूंचि ईशा । परि व्याकुळ हे जीवदशा ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे विशेषा । मी या पुनरपि न ये देशा ॥ ४ ॥

(८)

तरि धन्य ते संसारीं । इंद्रियें बळविति जे माघारीं ॥ १ ॥ वृत्ति नेती त्रिकुटावरी । मिळोनि जाती निराकारीं ॥ २ ॥ मी हा कोण ऐसें पाहती । तटस्थ होती नेत्रपातीं ॥ ३ ॥ जे जिवंता[३]ची मेले । मरोनि पुढती जिवे झाले ॥ ४ ॥ उदो नाहीं अस्त । तेथ झाले समाधिस्थ ॥५॥ तयां कैसे हो गणावे । देव मानव कीं ह्मणावे ॥ ६ ॥ डोळां आलिया कवीळ[४] । चर्म दृष्टि दिसते स्थूळ ॥ ७ ॥ त्याचि ध्यावी पैं कळाचि । काया जाणावी मृगजळाचि ॥ ८ ॥ अवयव आनंदाचे । जे चैतन्याचे ॥ ९ ॥ सोहिरा ह्मणे मीं हो पाहीं । जयां मीपण नाहीं ॥ १० ॥

(९)

सर्वी सर्वत्र तूं पाहें । येथें कोणाचें काय आहे ? ॥ १ ॥ पंचभूतांचें ह देह । तूं कां वाहसी संदेह ॥ २ ॥ प्रपंचभूमिचें हें चित्र । हें तव

---

१ ज्याच्या ठिकाणीं उदयअस्तरूप धर्म नाहींत असा. २ परमामृताचें यथेष्ट प्राशन. ३ जीवन्मुक्त झाले. जिवंत असतां मेले म्हणण्याचा अर्थ हाच कीं " सद्रूप अद्वैत ब्रम्ह आणि असद्रूप द्वैत ह्या दोहींचे भ्रमें करून जें ऐक्यज्ञान त्याचा जो अंतकाल तो समजावयाचा. तो अंतकाल म्हटला म्हणजे द्वैत व अद्वैत या दोहींम-धील भेदबुद्धि होय. ४ कावीळ या रोगानें डोळ्यांस सर्व पदार्थ पिंवळे दिसतात.

तुझेंचि कीं सूत्र ॥ ३ ॥ दृश्य दिसतां गोड वाटे । जेथुनि आलें तेथ आटे ॥ ४ ॥ जाणें आकाशींच्या वोहेरीं । चैतन्यसिंधुच्या लहरी ॥ ५ ॥ ऐसें ज्ञान जेथुनि झालें । देखणें त्यांत सामावलें ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे जगीं आलों । बोल बोलूनि बोलासि प्यालों ॥ ७ ॥

(१०)

कांहीं बोलावेंसें नाहीं । रूप डोळ्यांवीण पाहीं ॥ १ ॥ वाचेवीण बोलणें । जेथ पायाविण चालणें ॥ २ ॥ कानेवीण घेतो सांद । जिव्हेवीण चाखे स्वाद ॥ ३ ॥ त्वचेवीण घेतो स्पर्श । भोगी चित्तावीण हर्ष ॥ ४ ॥ नासिकावीण वास । पडे मेघाविण पाऊस ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे इये खुणे । एक अनुभविया जाणे ॥ ६ ॥

(११)

तेव्हां झाली तुझी दया । निखल निश्चयें सद्गुरुराया ॥ १ ॥ झाली नाहींच दिसेल काया । मग सहजेंचि तुटली माया ॥ २ ॥ वृत्ति स्थिरावली शून्या-। माजी, प्रकाश चैतन्या ॥ ३ ॥ मनमीठपणाची मुद्रा । विराली तुजशीं चित्समुद्रा ॥ ४ ॥ जगद्[३]बुद्‌बुदीं तोय एक । जरि जागलों [illegible]क ॥ ५ ॥ आरंभरंभस्तंभा । गैब विकास निरालंबा ॥ ६ ॥ निजसुखाची पडली वोल । गोड लागति उदास बोल ॥ ७ ॥ सोहिरा ह्मणे विसरे घडेलें । आंगीं अद्वय अम्मल चढलें ॥ ८ ॥

(१२)

न धरावा दुजा भाव । जवळी असोनियां यदुराव ॥ १ ॥ प्रेमें पुजीं निज सखा । निजीं घेईं निज सुखा ॥ २ ॥ गृहीं असोनि कामधेनु ।

---

१ खोलींत पक्षीं पोंकळीत. २ हाक मारलेली ऐकतो. ३ जगत्+बुदबुदीं=जग हा एक पाण्याचा बोंबाडा, असे अनेक बोंबाडे ज्या पाण्यांत उत्पन्न होतात असें एक (तोय)=चैतन्योदक. ४ मागें जें कांहीं कर्म घडलें तें सर्व विसरे (विसरला).

कों बा घ्यावा याचक मानु ॥ ३ ॥ नित्या वनीं चारी गाय । तेथ दुजा पाड काय ॥ ४ ॥ धणी माझा आपाडाचा । ठाके विषय पाडाचा ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे नसोनि असे । दिसे तें हें भ्रम पिसें ॥ ६ ॥

(१३)

आतां केशव गीति गाऊं । आह्मी निजसुखासि पावूं ॥ १ ॥ केशवाहुनि नाहीं थोर । हेंचि भावूं निरंतर ॥ २ ॥ केशव आठवितां मनीं । मन बैसे समाधानीं ॥ ३ ॥ केशव निरसी हा संसार । देई संसारांतील सार ॥ ४ ॥ केशव भावोनि स्वामि माझा । भेद मोडूं माझा तुझा ॥ ५ ॥ केशव माझा मायबाप । लया न्हेतो पुण्यपाप ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे स्वरुपीं पाहूं । केशवचि होउनि राहूं ॥ ७ ॥

(१४)

हरि नको मजला सोडूं । दुजे पांगीलागी पाडूं ॥ १ ॥ निजभक्तांचा हेळाडूं । देउनि लावीं आपुलें वेडूं ॥ २ ॥ तुझें नित्य स्मरण गोडूं । काय ह्मणोनिया सोडूं ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे निज हें गोढूं । निरसुनि निजीं निजसुख जोडूं ॥ ४ ॥

(१५)

ब्रह्मरूप ते ब्राह्मण । हेंचि जाणावें प्रमाण ॥ १ ॥ ज्याचें घेतां चर तीर्थ । सकळ पातकें होती व्यर्थ ॥ २ ॥ ज्यांचिया आशिर्वादें । मन

---

१ असाधारण, विलक्षण सामर्थ्यानें युक्त. २ राहाणें. ३ पाड=ओसाड असे जे विषय त्यांपासून मागें वळविणारा. ४ तो अव्यक्त (अस्पष्ट) असून आहे. ५ जें दिसतें विश्व ते केवळ भ्रमाचें वेड. ६ ओशाळगत राहणें, परस्वाधीन राहणें. ७ अपेक्षा करणारा. ८ मी व माझें माझें ९ नाहींसें करूं. १० जो आत्म्याहून अन्यत्र पाहतो त्याचा त्याग ब्राम्हणवर्ण करील. म्हणजे तो ब्राम्हण होणार नाहीं. (ब्रम्हतंपरादाद्योऽन्यत्रात्मनो ब्रम्हवेद× × बृहदारण्यको० नि० अ० ब्रा० ४ मं० ६) पुत्रैषणा सा वित्तैषणा या वित्तैषणा सा लोकैषणोभे ह्येते एषणे एव भवतस्तस्मादब्राम्हणः, पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेद्बाल्यं च पाण्डित्यं

बैसे निजानंदें ॥ ३ ॥ तयांहूनि आन थोर । सृष्टिं नाहीं निरंतर ॥ ४ ॥ सोहिरा वंदी त्यांच्या चरणां । चुकवि आपुलिया भ्रमणा ॥ ५ ॥

(१६)

शुद्ध भावार्थाचें घर । परब्रह्म निरंतर ॥ १ ॥ तनुमन आणि ध्यान ॥ रिघालें हें निरंजन ॥ २ ॥ पृथ्वी आणि व्योम । यांचा न धरी जो संभ्रम ॥ ३ ॥ नामरूप जया नावडे । तया सांपडे सुखवाडें ॥ ४ ॥ देवा नुरे देवपण । सोहिरा ह्मणे तो आपण ॥ ५ ॥

(१७)

ऐसे जाणावे भक्त । तेचि योगी तेचि मुक्त ॥ १ ॥ पराकमळें पर पराग । तेथ गुंतति जैसे भृंग³ ॥ २ ॥ अनाहत नोंगसर चांगें । तेथ जैसे कां भुजंग ॥ ३ ॥ निरंजन हेंचि गुळ । तेथ मुंगीच केवळ ॥ ४ ॥ समाधिघन निजज्योति । तेथ पायाळेंचि ह्मणविती ॥ सोहिरा ह्मणे सत्रावींचें जीवन । तेथ निःसीम जैसे मीन ॥ ॥

च निर्विद्याऽथ मुनिरमौनं च मौनं च निर्विद्याऽथ ब्राह्मणः केन स्याद्येन स्यात्तेनेदृश एवातोऽन्यदार्तं ततोह कहोलः कौषितकेय उपरराम ॥ बृहदा०ब्रा०५वें.

भावार्थः—[याज्ञवल्क्यः–जो क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा व मृत्यु यांपासून अलिप्त असतो, अशा आत्म्यास जे जाणतात ते ब्राह्मण होत.] आणि पुत्रविषयीं, लोकप्राप्तिविषयीं ज्यांच्या चित्तांत कधींहि इच्छा उत्पन्न होत नाहीं, असारी पाण्डित्याचा निःशेष केल्यावर तो मुनि होतो. मग अमौन आणि मौन यांचा निःशेष केल्यावर तो ब्राह्मण होतो. एकदा मनुष्य कोणत्याही उपायानें ब्राह्मण झाला मग तो तसाच असला पाहिजे. ह्याहून जें कांहीं अन्य आहे, तें सर्व नाशवंत होय.

१ परम सुख, उपयोगीं. २ प्राण्याचें मूळ जें हृदयकमळ. ३ त्यांमध्यें भ्रमररूपानें असणारा सोहंरूपी आत्मा. ४ नागसुरः–सर्प ज्या वाद्याच्या नादानें गुंग होऊन, वाद्य वाजतें त्या ठिकाणीं आपोआप प्राप्त होतो, त्या वाद्याचें नांव. ५ चांगला, सुंदर. ६ जो पुरुष जन्मकाळीं पायांकडून जन्मास येतो त्यास पायाळ ह्मणतात असा मनुष्याच्या डोळ्यांत एकाप्रकारचें सिद्धांजन घातलें असतां त्यास भूमिगत ठेवा (पुरून ठेवलेलें द्रव्य) दृष्टीस पडतो असा समज आहे ७ सत्रावी कळा ज्ञानशक्ति.

(१८)

आह्मा न कळे ध्यान मुद्रा । पावलों चित्सुखसमुद्रा ॥ १ ॥ मन बुद्धि मोडुनि ठेलें । आघवें तन्मयचि झालें ॥ २ ॥ बोलावया नकळे युक्ति । आंगीं बाणली विरक्ति ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे टांकिला मेरू । झाला परेपार उतारू ॥ ४ ॥

(१९)

आनंदें नाचे हा श्रीरंग । वाजवी अनाहात सारंग ॥ १ ॥ मोठा होताहे गजर । नादें दुमदुमिलें अंबर ॥ २ ॥ बारा सोळा त्या गोपिका । माजी तूर्या हे राधिका ॥ ३ ॥ देख काया हे कदंब । यमुना सत्रावी स्वयंभ ॥ ४ ॥ इंद्रियें गोधनें चारिताहे । विवेक रक्षक उभा आहे ॥ ५ ॥ पेंदा सुदामा संवगडा । भक्ति ज्ञान वैराग्य बांकुडा ॥ ६ ॥ ब्रह्मरंध्रीं गिरिवर-धारी । सोहिरा प्रतीति तयावरी ॥ ७ ॥

(२०)

तो मज आवडतो परम । भक्तकाजकल्पद्रुम ॥ १ ॥ ज्याची सत्ता अगोचर । एवढें चाले हें शरीर ॥ २ ॥ असे तंव संसारीं झुलवी । परि मज त्यामाजी न भुळवी ॥ ३ ॥ अनेक लाघव मांडी । परि मज भ्र[illegible] तुनी काढी ॥ ४ ॥ वैराग्यवनवसंत । अक्षय देव सदा संत ॥ ५ ॥ अनेक रूपीं एक । अनंत ब्रह्मांड नायक ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे केली दया । आतां न विसरों तया ॥ ७ ॥

(२१)

तुझा तूंचि कीं दातारा । वेषी अनेक अवतारा ॥ १ ॥ तूंचि कल्पने कर्तारा । तूंचि त्रियेच्या भर्तारा ॥ २ ॥ तूंचि चंद्रमा कीं तारा । तूंचि तिमीर कांतारा ॥ ३ ॥ तूंचि जीव या उद्धारा । शिव भवसिंधु

१ सत्=आत्मा+असत्=माया एतद्रूप.

उतारा ॥ ४ ॥ तूंचि बाळही झातारा । तूंचि गोकुळासि थारा ॥ ५ ॥ सोहिरा ह्मणे तूंचि सारा । सारा परता [पाहता ?] त्यांतिल सारा ॥ ६ ॥

(२२)

निरंजन सेजे । सुलीन कलावंती । भोगिती सतती । योगिराज ॥ १ ॥ काम क्रोध बंधु । आशा तृष्णा बहिणी । त्यागिल्या कामिनी । बारा सोळा ॥ २ ॥ अविद्या हे माता । अहंकार पिता । टांकिली ममता । कन्या कीं हे ॥ ३ ॥ निष्ठुर होउनी । मिनले परद्वारा । मन बुद्धि संसारा । मोहरें नेघे ॥ ४ ॥ होउनी सचोंड । सेविती रतिचाड ॥ इंद्रियां कवाड । देउनियां ॥ ५ ॥ असतांचि उघडीं । इंद्रियें झाकिलीं ॥ वृत्ति संचकली । तया ठायीं ॥ ६ ॥ रात्री कीं हा दिवस । भोगितां हा नेणें ॥ विरळा कीं या खुणें । बुजती कोणी ॥ ७ ॥ न गणिति जीव शिव । दोन्हि भेदा-

---

१ परमपुरुषाशीं अतिशयेंकरून लीन झालेल्या मूलप्रकृती (उन्मनी) वर हें रूपक केलेलें आहे. हिला कलावंती असें ह्मणण्याचा उद्देश हाच कीं पूर्वी सांगितलेल्या आत्म्याच्या सोळा कळांस हिचा आधार असून ही सत्रावी कळा (ज्ञानशक्ति) आहे. २ आई, बाप, कामक्रोधादि बंधू यां सर्वांविषयीं निष्ठुर ...रद्वार=परस्त्री गमन करायाला (मीनलें) उद्युक्त झालें. (पक्षीं) परा ...कृतियुक्तद्वार (ब्रह्मद्वार) तेथें लीन झालें. (" तुझी भोग पररमणी " ...द पद्य). दुसरें ही बुद्धिरूपाही असल्यामुळें ज्या ज्या रूपाची कल्पना बुद्धी ...रील त्या त्या रूपास प्रकाशविणारा साक्षि (आत्मा पुरुष) आहे. तुकोबांनीं एका पदांत ह्मटलें आहे [असो ऐशी ती आदिशक्ति । तिची इच्छा या घरिली चित्तीं । तिशी कुणबीण ह्मणती । पद्य दूरवर ॥ ११ ॥ काव्यसं० ग्रं० मा० पदसंग्रह भाग १ पृ० ७७१.] ३ मार्ग, अभिमुखता, उद्भव, अंकुर. ४ अतिलुब्ध. ५ उपरति प्राप्त्यर्थ. ६ दरवाजा बंद करून, इंद्रियांला बाहेर टाकून, किंवा इंद्रियाला कोंडून (त्यांच्या गति बंद करून. ७ इंद्रियें उघडीं असतानांच तीं झांकलीं असें ह्मणण्याचा हेतु हाच कीं [यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन । कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥ भ० गी० अ० ३ ॥ भावार्थः जो मनापासून इंद्रियें नीट आवरून, कर्मेंद्रियांच्या साधनानें कर्में आचरितो, पण त्यांच्या ठायीं आसक्ति ह्मणचे अत्यंत आवड धरीत नाहीं, तो श्रेष्ठ.]

भेदें ॥ निजानंदछंदें । रंजलें कीं ॥ ८ ॥ सोहिरा म्हणे आम्हा । तेंचि कीं व्यसन ॥ वासनावसन । न धरे अंगीं ॥ ९ ॥

(२३)

देवाविणें काम । दुजें नसे धाम । तरि हा आत्माराम । भेटों सके ॥ १ ॥ देवचि चालतां । देवचि बोलतां । देवचि निजतां । समाधीशीं ॥ २ ॥ देवचि हेळतां । देवचि खेळतां । देवचि मेळतां । आपेंआप ॥३॥ सोहिरा ह्मणे दूजें । कांहिच नसावें । होउनि असावें । देवरूप ॥ ४ ॥

(२४)

देव भावीं नित्य । स्वरुपीं अनित्य । भक्तिचें हें सत्य । थोर आहे ॥ १ ॥ भक्तिचिया भावा । भेटें स्वयंमेवा । आत्मअनुभवा । पाविजेतो ॥ २ ॥ देवाहूनि थोर । नाहीं निरंतर । ऐसें हें अंतर । निर्वाळिजे ॥३॥ भक्तित्रिये चाडी । गुंतला आवडी । अविद्येचि बेडी । तोडिजे
सोहिरा ह्मणे मग । भक्त तोचि देव । यदर्थी संदेह । नाहीं नाहीं ॥ ५ ॥

(२५)

ऐसें हें कौतुक । देख अलोलिक । वैकुंठनायक । भेटला तो । भेटिवीण मज । निजीं नये नीज । सर्वे यदुराज । देखल्यावीण । आनंदें भावीन । होईन समाधान । सर्वेचि निदान । गोड करी ॥ ३ । ऐसा हा श्रीहरि । वदावा वैखरीं । बोधाचे सागरीं । बुडवील ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे माझा । भावीं जीवलग । निवृत्ति निर्वाणंग । भोगिन तें ॥५॥

---

१ भावना कर. भाव धर. २ अंतःकरण निर्मळ कर. ३ अपूर्व, चमत्कारिक. ४ समाधिमध्यें किंवा उन्मनि मध्यें. ५ स्वरूपसंधानरूप जो संकल्प ती निवृत्ति होय. ६ मोक्षस्वरूप अंग=(दृश्य पदार्थमात्र नाशवंत, द्रष्टा साक्षि आत्मा तो नित्य.)

(२६)

हरिभेटीसाठीं साधन आटाआटि । तो मज शेवटीं । भांतुंडला ॥ १ ॥ ज्याच्या रूपालागीं । श्रमताती योगी । तो मज पूर्णांगीं । वोडवलौं ॥ २ ॥ ऐसा हा निर्गुण । धरोनी सगुण । एकीएक खूण । जाणियेली ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे तो हा । न्हे विश्रांतिगेहा । ज्याणें निःसंदेहा । मेळविलें ॥ ४ ॥

(२७)

जयाचें तें स्वरूप । वेदांसी अमूप । तेथें कोण माप । करूं सकें ॥ १ ॥ जयाचे पवाडे । बोलों जातां तोंडें । ब्रह्मादिक वेडे झाले जेथ ॥ २ ॥ ऐसा आत्माराम । भावोनि आराम । जेथ सर्व काम हारपलें ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे ज्याचा । परिकरें साचा । आपुले मूळींचा । ठाव दावी ॥ ४ ॥

(२८)

आनंदें आनंद । जोडे निजपद । खंडी भेदाभेद । अंतरींचा ॥ १ ॥ ज्याला नित्यध्यानीं । जाणिला निदानीं । सवें या साधनीं । काज काय ? [illegible] काजांवीण ज्याणें । पावविलें खुणें । तेथ वाखाणणें । काय मग [illegible] सोहिरा ह्मणे निज- । बोध हा सहज । तेथ सर्व काज । हारपलें ॥ ४ ॥

(२९)

जेथ पूर्ण ज्योति । भाविली सततीं । भवभ्रमभ्रांति दूर झाली ॥ १ ॥ आनंदाचे जळीं । देतां बुचकळी । कल्पनेची मळी । झाडियेली ॥ २ ॥

---

१ सांपडला, प्राप्त झाला. २ पुर्णांग=अ, उ, म, ँ अर्धमात्रा ॐकार; त्यामध्यें [ओमिति ब्रह्म ॥ ओमितीद ९ सर्वम् ॥ तैत्तिरीयोपनिषत् व० अनु० ८] ३ प्राप्त झाला. ४ अनुग्रह, सुंदरपणा (तेजोमय स्वरूपाचा साक्षात्कार). ५ कार्याविगळें (जगताहून पृथक्) करून. ६ आत्मबोध. ७ आनंदमय ईशस्वरूप जळात.

जेथ पूर्णपण । आंतुंडे[1] प्रमाण । चैतन्य उगाणे[2] । झालें जेथ ॥ ३ ॥
सोहिरा ह्मणे निजीं । निजेला सहजीं । स्वरूपांचे[3] शेजीं पहुडला ॥ ४ ॥

(३०)

आनंदाचे जळें । भरियले डोळे । चैतन्य सोहाळे । भोगियेले ॥ १ ॥
ज्यासि शांतिपथ । आंतुडे सनाथ । सत्रें आदिनाथ[4] । भेटला तो ॥ २ ॥
सोहिरा ह्मणे माझा । सखा जिवलग । जेणें हें सर्वांग । वसविलें ॥ ३ ॥

(३१)

देवावीण येथ । दुजा नाहीं नाथ । त्याविणें सनाथ । कोण करी ॥ १ ॥
देवावीण आतां । मज नाहीं दाता । नीज हें तत्त्वता । कोण दावी ॥ २ ॥
देव माझा बाप । देवचि स्वरूप । देव दिव्यरूप । रूपातीत ॥ ३ ॥
देवचि हें सार । देवचि संसार । देव निरंतर । वेगळाची ॥ ४ ॥
सोहिरा ह्मणे एकीं । एकचि होऊनि । सर्वे समाधानीं । राहावें गा ॥ ५ ॥

(३२)

भावीन सहजा । निजयोगिराजा । मनाचिया काजा । दूर करीं ॥ १ ॥
मुळींचा गोंसांवी । घराचार भावी । पाहतां नागवी । सदांचा जो ॥ २ ॥
वेढिला लेंकुरीं । बाळब्रह्मचारी[11] । कैसा तो अंतरीं । जाणावा गा ! ...
सोहिरा ह्मणे [12]वांझीं । निपजला पुंत्र[13] । चोज हें विच्त्रि । पाहावें गा ...

---

१ सांपडलें जातें (प्रत्यक्ष प्रमाण सांपडतें) २ झाडा, अनुभव. ३ सो... स्वरूपाची शेज किंवा अनंत शेषरूप शय्येवर. ४ शुद्ध शांति मार्ग=[जें स्थूल सूक्ष्म आणि कारण या देहत्रयांस जाणतें तें ज्ञान ह्मणजे महाकारण देह. जशीं तीं तीन्ही शरीरें जड (दृश्य) तसेंच हें चौथेंही जड. पण या जाणणेंपणा वेगळें जें स्वस्वरूप केवळ शुद्ध शांत असतें, तत्स्वरूप मार्ग.] ५ ज्याला आदिनाथ परंपरेचा आधार आहे असा सनातन. ६ नाथपरंपरेचा मूळपुरुष (शिव). ७ जगद्रूपी संसाररहित असणारा पुरुष (सच्चिदानंद आत्मा) गो इंद्रियें किंवा मन यांचा स्वामी. ८ जगद्रूपी गृहसंसार. ९ नग्न, नंगा फकीर. १० मुलेंबाळें (ब्रह्मादिदेव हींच बाळकें). ११ बाळपणापासून नैष्ठिक ब्रह्मचर्यानें असणारा. १२ मायारूप अतींद्रिय परमात्मशक्तीच्या ठायीं हिला वांझ ह्मणण्याचें कारण, ही जगद्रूप कार्यापासन आणि आश्रयरूप ब्रह्मापासन विलक्षण आहे. १३ पुत्र ह्मणजे आनंदमय ईश.

(३३)

तुझें तूंचि केलें । पाप पुण्य ठेलें । तेथ माझें गेलें । काय पां तें ॥ १ ॥
करोनि अकर्ता । धरोनि न धर्ता । तूंचि एक हर्ता । सुखदुःख ॥ २ ॥
निजरूपीं लया । लावीं यदुराया । सर्वेचि हे माया । दूर करीं ॥ ३ ॥
चित्त हें केवळ । तुजशीं प्रेमळ । दुजेयाचा आळ । आणूं नको ॥ ४ ॥
सोहिरा ह्मणे बापा । अनुभव सोपा । करीं नीजकृपा । आपुली ही ॥ ५ ॥

(३४)

निःस्पृह झाला । संसार सूटला । परब्रह्मीं भेटला । आपेंआप ॥ १ ॥
न गणी देह हें । न गणी इंद्रियें । जाहला जितेंद्रियें । निरालंबी ॥ २ ॥
न गणी हे जन । न गणी बीजन । भोगी निरंजन । अखंडित ॥ ३ ॥
न गणी हे पृथ्वी । न गणी हें व्योम । पावला आराम । भ्रमरगुंफे ॥ ४ ॥
सोहिरा ह्मणे कर्म । करोनि निष्कर्म[1] । अवचटेंचि[2] वर्म । हाता आलें ॥ ५ ॥

(३५)

डोळ्यांतील[3] डोळा । देखिला निराळा । भोगिला सोहाळा सत्रावीचा[4] ॥ १ ॥
न होतां उत्पन्न । देखिलें हें जग । बोळगे राजयोग । नित्य ऐसा ॥ २ ॥
[illegible] नुरे जन । बुद्धि आणि मन । जाहला निरंजन । रूप कीं हें ॥ ३ ॥
[illegible] ह्मणे नुरे । मग हें मीपण । सर्वत्र आपण । तोचि झाला ॥ ४ ॥

---

१ निष्कर्म बुद्धीनें राहणें याप्रकारचें वर्म. २ (अवचटेंचि=एकाएकीं अकस्मात्) कर्म करीत असतांही. ३ मस्तकाच्या कानशिलांवर दोन गोल्हाटें, ' त्यांमध्यें श्रीहाटस्थान आहे. त्या श्रीहाटांत तृतीय नेत्र आहे. किंवा डोळ्यांत असणारे पांच देह पैकीं पंचम देहांतर्गत 'राइप्रमाण' देह; तोच औटप्रमाण स्थूलदेह. [१ स्थूल देह=नेत्राचें पांढरें बुबुळ तें. २ सूक्ष्मदेह=काळें बुबुळ तें. ३ कारणदेह=पिंगट काळें बुबुळ तें. महाकारण देह=काळी बाहुली नेत्रांत मसुरीप्रमाणें असते ती (याप्रमाणें—गोरक्षादिकांचें मत.) अन्य=सूक्ष्मदेह=डोळ्यांतील शुभ्रवर्ण अंगुष्ठप्रमाण. २ कारण देह=सफेताच्या आंत काळावर्ण तो अंगुलप्रमाण. ३ तूर्या व तेंच दशमद्वार=काळ्यामध्यें जो निळाभाग. ४ महाकारणदेह मसुरीप्रमाण. ५ राईप्रमाण. तोच साडेतीन हात स्थूल देह. ४ श्रीहाटस्थानची ज्ञानशक्ति (सत्रावी कला, अमृतसंजीवनी).

(३६)

गर्जतां नवघन । मयूरचि नाचे । येरां काय त्याचें प्रयोजन ॥ १ ॥ वाजतां नागसरी । नागचि तो डोले । आणि दिवडे[1] चाले । आपुल्या काजा ॥ २ ॥ पंचमें[2] आलाप । ऐकत्या सोहळे । बहिऱ्या काय कळे । त्याचें प्रेम ॥ ३ ॥ सोहिरा ह्मणे होतां ब्रह्म । साधु समाधान । उपसर्ग अज्ञानें[3] । तया नाहीं ॥ ४ ॥

(३७)

हंसाचा चारा । न इच्छिती वायस । आणि मेल्या मांस । भक्षितील त्यांचें ॥ १ ॥ नागसरिंचें[4] सूख । दिवडा केविं कळावें । उंदीरचि गिळावे । त्याणें पैं गा ॥ २ ॥ अग्निमाजी सती । एकलीच जळे । आणि पाहा-वया मिळे । सकळ जन ॥ ३ ॥ तैसा कोणी न झोंबे । साधूच्या आनंदा आणिक करावया निंदा । कितेक मिळती ॥ ४ ॥ सोहिरा ह्मणे यांत । आमुचें काय गेलें । तुमचेंचि[5] गेलें । पावाल तुह्मीं ॥ ५ ॥

---

१ दिवड नावाची एक निर्विष सापाची जात आहे. या जातीचा साप घरामध्यें फिरत असतो. तो उंदीर गिळित असतो. २ कोकिळेचा पंचम (आलाप) सूर. ३ अज्ञान संबंधीं दुःखांचा संसर्ग. ४ नाग सर्पास मोहित करणारें वाद्यविशेष. त्यांत होणाऱ्या नादाचें सुख. ५ पूर्वोक्त दिवड जातीच्या सापाला त्या नागसुर स्वर्नीतलें सुख काय कळणार आहे ? त्यानें उंदीरच गिळीत राहावें.

४ आरत्या—संग्रह.

(१)

निरंजननिवासी देहातीत देवा । घडते इंद्रियद्वारें तुझीच कीं सेवा । मजमाजी सांपडला अनादिठेवा । सेविला काय सांगों मुक्यानें मेवा ॥ जयदेव जयदेव जय लालनलीला । एकीं अनेक जग हें बुद्बुदसलीला ॥ १ ॥ ध्रु० ॥ रूपाविण ऊभा ! अलभ्य लाभा ! । घडलें मन हें बुडलें विश्वाभ्रनभा । महदानंदसमुद्रीं भरियेलें कुंभा । मन हें तद्रुप झालें सकळादि रंभा ॥ जयदेव जयदेव० ॥ २ ॥ दीपीं दीप मेळे जैसा कां उजळे । वाचा बोलों ! हालों विसरले डोळे ! । नेणों कैंचा ऐसा मजमाजी मेळे. । सोहिरादास म्हणे अभिमान गळे ॥ जयदेव जयदेव० ॥ ३ ॥

---

१ जुनाट, मूळचा आत्मरूप ठेवा. २ मुक्यानें मेवा खाल्ला असतां, त्याचा ...ठेला स्वाद शब्दांनीं त्याला व्यक्त करतां येत नाहीं. तद्वत् येथें नादरूप ...वस्वरूप मुका अर्थात् निःशब्द (मौन=ज्या ठिकाणीं वाणी अथवा ...नाची सुद्धां प्रवृत्ति होत नाहीं, ह्मणजे ज्याला वाणी व मन सुद्धां जाणूं शकत ...ाहीं, असा आत्मा आहे ह्मणून त्याला मौन ह्मणतात.) एतद्रूप मुक्याच्या स्वरूपानें. ३ मेवा=प्रपंचरूप वृक्षाचें मोक्षफल. ४ ब्रह्मांडें व त्यांतील चतुर्दश भुवनें व त्या त्या भुवनांतील प्राण्यांनीं खावयाचीं अन्नें व त्या त्या लोकांस योग्य अशीं शरीरें देऊन त्यांचें लालनपोषण करणें इत्यादि प्रकारची ज्याची सहज लीला आहे असा. ५ अनेक जगद्रूप बुडबुडे ज्यापासून उत्पन्न होतात असें चैतन्योदक ६ विश्वरूपी आभ्राकाशाचा ज्यांत अंतर्भाव आहे, असें नभ ह्मणजे महदाकाश ७ परमानंद समुद्रामध्यें=चैतन्यसागरामध्यें. ८ स्थूलदेहघट (पाण्यानें भरून पाण्यांतच ठेवला असतां तो आंतर्बाह्य पूर्णपणें पाण्यानेंच व्यापून असतो. तद्वत्) ९ सकळांस आदिकारण अशी रंभा=(प्रकृतिरूप) कर्दळी, तद्रूप मन झालें (उन्मनिरूप झालें) हा भाव.

(२)

चिन्मयसुखसार[1] निरामय[2] सये ! । जेथें गेल्या दिठि[3] हे परतोनि नये ॥ निर्गुण निरंजनीं मन हें विलय । होउनि सहज आंगीं मुरलें न [चि[4] ?] न्मय ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय पूर्णज्योति । नाद बिंदु कळा ज्याची विभूति ॥ ध्रु० ॥ आदिअंत नाहीं ज्या स्वरूपासी । नामरूप पाहतां मिथ्याचि त्यासी । निर्विकल्प समाधीचे उल्हासी । रंजुनि ठेलों निरालंब गगनासी । जयदेव जयदेव० ॥ २ ॥ जाणणें जाणतां ज्यानें[5] जाणीव गेली । मजमाजी निजतां नीज उन्मनि लागली । बोलों जातां वाचा तटस्थ ठेली । सोहिरा म्हणे चैतन्यसत्ता बाणली ॥ जयदेव जयदेव० ॥३॥

(३)

मनमोहनगहना ! चित्सुख चिद्घना । जगदखिलपालना लीलाललना ॥ भावातीत देवा अभिनवभावना । आरती ओंवाळूं तुज निरंजना ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय सच्चिदानंदा । विद्यारविंदा[6] देवा ! पूर्णप्रबोधा ॥ ध्रृ० ॥ अनादि उदयो झाला पौर्णिमा इंदु । देखुनि उल्हासला महानंदसिंधु ॥ भक्तजनचकोरा अनुपम्य स्वादु । पूर्णतेसी आलें अविनाश द्वंद्वु ॥ जयदेव जयदेव० ॥ २ ॥ मायामय रजनी सरुनि [...] झाला । दृश्यरूप खद्योत निस्तेज झाला ॥ वैराग्याच्या वना लवलव सू[...] विवेकभ्रमराआंगीं आनंद दाटला ॥[8] जयदेव जयदेव० ॥ ३ ॥ त[...] [चि ?] न्मय कोकिळेच्या कलरव[7] उर्जरीं । अंबरिं उठला नाद अना-

---

१ आत्मसुख [अविद्येची व विद्येची निवृत्ति होऊन जीवात्मा स्वात्मसुखसंपन्न होतो. मायाविशिष्ट शिव सोपाधिक असल्यामुळें, त्यास साहजिक लघुत्व येतें. त्या उपाधीचा नाश होऊन जीवाचें त्याच्याशीं तादात्म्य झाल्यानें तो आत्मसुखनिमग्न होतो.] २ दुःखरहित, निर्विघ्न उपाधिरहित. ३ दृष्टि. ४ ज्ञानमय. ५ ज्या ज्ञानानें (जाणण्यानें) ६ विद्या=शुद्धसत्व माया हेंच अरविंद=कमल, त्या कमलास विकसित करणारा पूर्णप्रबोधरूप चैतन्यसूर्य (चैतन्य आत्मा). ७ कोकिल पक्ष्याचा मंजूळ ध्वनि. ८ उत्कर्षे, प्रकट होणें, प्रभाव प्रकृति, अर्धनारी.

हत गजरीं ॥ सोहिरादास ह्मणे मेरूच्या शिखरीं । वरिये (न्यांली ?) लीहे मार अरूप सुंदरी ॥ जयदेव जयदेव० ॥ ४ ॥

(४)

अकूल अगोत्र स्वयंभ स्वतंत्र । भक्तजनांसी मित्र परम पवित्र ॥ याहुनि कांहीं दुजा नलगे मंत्र । इंद्रियें चाळवितो तो निखिल चिन्मात्र ॥ १ ॥ जयदेव जयदेव आनंदघना । अनेक तूझ्या लीला विश्व हें नाना ॥ धृ० ॥ अंतःकरण निरंतर निज निरंजनीं । मन हें जाउनि आजी लागली उन्मनि । झालें सुख तें देखों नयेची नयनीं । वाचा झाली मुकी या महाशून्यीं ॥ जयदेव जयदेव० ॥ २ ॥ चित्सूर्याचा झाला परम प्रकाश । चित्कलिकेमाजी सहज उठला उल्हास ॥ समूळची दृश्याचा मावळला भास । पाहूं जातां आपणा मीपणा नाश ॥ जयदेव जयदेव० ॥ ३ ॥ अनादि हा देव जाणा अभंग । निजरंगीं रंगला आत्मा श्रीरंग ॥ आनंदसिंधूचे उठती तरंग । सोहिरा ह्मणे सहज निवृत्तिमार्ग ॥ जयदेव जयदेव० ॥ ४ ॥

(५)

सहज केली हे आरती । चिन्मयाच्या वाती ॥ आनंदस्नेहेंशीं उज- [illegible] चिन्मय निजज्योति ॥ ध्रु० ॥ देवचि नाहीं कीं उरला । ओंवा- [illegible]चि मुरला ॥ भेदाभेद सहज हा हरला । परेपरता कीं सरला ॥ सहज केली० ॥ १ ॥ गातां गातां हा नाठव । कांहीं उरला नाहीं ठाव ॥ सोहिरा ह्मणे मी कोठें जाऊं । पाहतां माझा मीच देवू ॥ सहज केली ॥२॥

(६)

आरती उजळली, शुद्धसत्त्वाचिये ताटीं । मनपवनाची वाती, केली गगनाचिये पोटीं ॥ प्रेमाचें हें तैल आंत, भरियेलें उपौटीं । प्रकाश हा

---

१ शुद्धसत्त्व माया, विद्या, हेंच ताट त्यामध्यें आरती प्रज्वलित केली. २ उप्पट अथवा उपाट ह्मणजे कडेपर्यंत भांडें भरणें याअर्थी सांवतवाडी प्रांतीं वापरतात; भरपुर.

प्रकाशितां, चंद्रसूर्यां पडली मिठी ॥ आरती उजळली० ॥ १ ॥ देखुनि, ऐसें निरंजन, वारि ओंवाळिले जन । उर्ध्व लक्ष लागतां कीं हे, उन्मळिले लोचन ॥ कवणाचें हें कवण नोहे, ऐसें केलें कीं येणें । दोरात्रीण नवद्वारें, बद्ध केलीं कीं जेणें ॥ तया ठायालागीं आजी, सिद्ध साधूंचें जाणें । वासना हे बुडे ऐसें, ज्ञानगंगेचें न्हाणें ॥ आरती उजळली० ॥ २ ॥ तयालागिं दोनी पंथ, विवेक सुषुम्नेची वाट । गुणत्रय टांकुनि वेगीं, त्रिकूट श्रीहाट गोल्हाट ॥ साम्यावस्था ककाँरमुख, सर्वसाक्षिं औटपीठ ॥ आरती उजळली० ॥ ३ ॥ उन्मनी ते भ्रमर-गुंफा, निराकार निर्गूण । तये भूमिवरी विश्व चित्राकार हें जाण ॥ आले-गेलियाचें नका धरूं भूषण दूषण । सोहिरा ह्मणे मीपण जाय, निजवर्मे तें आपण ॥ आरती उजळली० ॥ ४ ॥

(७)

मुनिजनमानसहंसा सज्जन गा ! रामा । योगियांसी करिसी नित्य आरामा । यालागीं जपताती निशिदिनिं निजप्रेमा । स्वसुख देऊन माझ्या हरिं या भवभ्रमा ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय जी अनंता । आरती ओवाळूं तुज कृपावंता ॥ ध्रु० ॥ ज्ञानेंद्रियें तार्टीं कर्मेंद्रिय [illegible] पंचप्राण प्रज्वलुनी करूं एक ज्योति । सोऽहं शब्दें दिसी अति [illegible] ती । शिवशक्ती समयोगें सहज विलसती ॥ जयदेव जयदेव० ॥ २ ॥ दृश्य द्रष्टा जेथींचे हरोनी गेले । मजमाजीं स्वस्वरूपीं दर्शन झालें ॥ देहबुद्धि जाउनि मन हें मावळलें । सोहिरा ह्मणे जन्ममृत्यु आकळले ॥ जयदेव जयदेव० ॥ ३ ॥

---

१ मुळा सकट उफराटें होणें (अंतर्मुख होणें) २ शम (राजयोग) दम (हठयोग). ३ ब्रह्मद्वार. याबद्दल (सिद्धांतसंहिता उत्तरार्धासोबतची चक्र-कारिका पहा. इतर सांकेतिक शब्दांबद्दल अन्यत्र बऱ्याच ठिकाणीं खुलासा केलेला आहे; तो जिज्ञासूंनीं पहावा.)

(८)

व्यक्त अव्यक्ता जय मूर्त अमूर्ता । शरण येतों तुजला निजमूळकांता ॥ सद्रूप होउनि मजला न्हेई एकांता । माझें मज हें निजगुज दावीं तत्त्वता ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय जी गुरुनाथा । आपें आपणियांत करिं कां सनाथा ॥ ध्रु० ॥ व्यान उदान समान प्राण आणि अपान । श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा आणि घ्राण ॥ शब्द स्पर्श रूप आणि रस गंध जाण । अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार लीन ॥ जयदेव जयदेव० ॥ ॥ २ ॥ वाचा पाणि पाद शिश्न आणि गूद । आधारकमळींचा[1] कवळीं मूळबंधं[2] ॥ ओढियाणा[3] आणि जालंधरें[4] घे विशुद्धें[5] त्रिकूट श्रीहाट गोल्हाट औटपीठ पद ॥ जयदेव जयदेव० ॥ ३ ॥ भ्रमरगुंफेमाजी सहजचि भेद । होतां योगीराजा तुटती भ्रम भेदाभेद ॥ सत्रावीचें अमृत घेतां सुखस्वाद । सोहिरा ह्मणे अद्वयबोधें सहज आनंद ॥ जयदेव जयदेव० ॥ ४ ॥

(९)

तैंनसे जोग कमाया, मनँसे गयि माया । उन्नें ऑप छपोंया,

---

[1] योगशास्त्रोक्त चार पांकळ्यांनीं युक्त असें कमळ, मुलाधार चक्र. २ मूलबंध=(त्राहाटक त्रिबंध, कुंडलिनी शक्ति) ३ स्वाधिष्ठान चक्रांवरील द्वितीय बंध. ४ अनुहात चक्रांवरील बंध. ५ कंठस्थानचें षोडशदल चक्र. ६ स्थूलदेहाच्या आधारानें (मूलबंधाच्या योगानें) योग (जोग) प्राप्त करून घेतला, त्यानें किंवा (हे ! सद्गुरू ! गोरखनाथा तुझ्यापासून योग प्राप्त करून घेतला). ७ मनापासून माया निवृत्त झाली. ८ मायेच्या निवृत्तीमुळें, मनोलय झाल्याच्या योगानें. ९ आप=आपलेपणा, मी कर्ता, मी भोक्ता या प्रकारचा अहंकार. अहंवृत्ति. किंवा आप=उदकाचें कार्य जे प्राणचेष्टारूप कर्म. दुसरेही गुह्यार्थ आहेत:-आपतत्त्वाच्या सत्त्वांशापासून. १० छपाया=नाहींसा केली (पूर्वोक्त अहंवृत्ति छपविली ह्मणजे मीपणाचा प्रत्यय आल्यावांचून बाहेरचें जग आह्माला कदापी समजणार नाहीं, ह्मणून इदंवृत्तीमध्यें बीज अहंवृत्तीमध्यें आहे. त्याअर्थीं अहंवृत्तीचाच लय झाल्यावर बाहेरच्या जगाविषयीं शून्यप्रतीति येते.)

मग१न सबाह्यों ॥ जय जय जी ऑलेख गुरु गोरखनाथा । हरदमसें मिलाऊं मेरा प्राण दाता ॥ ध्रु० ॥ देखो प्यारा सबसें न्यारा, दृष्ट नहीं लच्छीं ।

---

१ मगन=मग्न, निमग्न (या प्रगाणें द्रष्टा जो आत्मा त्याशीं निमग्न केलें. (अन्य-पाठ "मगन सो भैया" असा आहे. पण तो चुकीचा आहे असें वाटतें. त्याचें रहस्य हेंच कीं "सो=असा जो तो. = भैया=बंधु=असा जो योग तो बंधु पाठिराखा होय.) निमग्न=जयजयजी ऑलेख गुरु गोरखनाथा' या ध्रुवपदानें स्थूल देहांतर्गत सोळा कळांनीं युक्त जो पुरुष (पक्षीं गुरु गोरखनाथ गो=इंद्रियें त्यांचा रक्षक=विवेक गुराखी). २ सबाह्या =सब=सर्वत्र=बाह्यां बाह्यतः=अंतर्बाह्य व्यापून असणाऱ्या कूटस्थाशीं (मगन=) तन्मय केलें. ३ हरदम=हर=प्रत्येक क्षण=दम श्वासोच्छ्वास. "प्राणायामाच्याद्वारें प्राप्त होणारें अमृतत्त्व देऊन ज्यानें प्राणदान दिलें ह्मणजे अमर केलें, असा प्राणदाता (सद्गुरु गोरखनाथ. मिलाऊं=) प्राप्त करून घेऊं. बाह्याभ्यन्तर विषयाक्षेपी चतुर्थः ॥ पातजल योगशा० साधन पादः २ सूत्र ५१ ॥ प्राणवायूची बाहेरील ह्मणजे श्वास सोडण्याची सीमा नाकापासून बारा बोटांपर्यंत आहे, तो त्याचा बाह्य विषय झाला व त्याची आंतील प्रश्वासांची सीमा हृदय, नाभीचक्र इत्यादि, तो त्याचा अभ्यंतर विषय आहे [दम], ह्या दोन विषयांकडे लक्ष ठेवून वायूचें स्तंभन करणें ह्मणजे त्याची गती बंद करणें हा चवथा [केवलकुंभक] प्राणायाम होय. या प्राणायामाच्या योगानें योगी चिरायु [अमर] होतात. 'आभ्यंतर चक्रांचा साक्षात्कार प्रा [केवलकुंभक] धारणेमध्यें येतो, ह्मणून या प्राणायामांत या पिंडब्रह्मा अंतर्लीला दृष्टीस पडूं शकते, त्याच्यापूर्वी हा देह पंचभौतिक आहे, त्यांत त्या त्या भूतांचें स्वरूप प्रत्यक्ष होतें, आणि पृथ्वी इत्यादिकांची धारणा करून, पृथ्वी, जल, तेज, वायु व आकाश यांपासून प्राप्त होणाऱ्या मृत्यूचा जय होतो. [विशेष माहिती, पातंजल योगशास्त्र अभिप्राय पु० पाद २ पृ. ७१ ते ८० येथें पहा]. किंवा हरदम ह्मणजे प्रतिक्षणीं होणाऱ्या श्वासोच्छ्वासयुक्त सर्वांतर्यामी प्राणवायु-रूप आत्म्याच्या योगानें [माझा प्राणदाता सद्गुरु मिलाऊं] प्राप्त करून घेऊं. ४ सर्वांत आत्मा प्रीय आहे त्यालाच सर्वत्र पहा. तो अव्यक्त असल्यामुळें [लक्षी=] प्रत्यक्ष दिसणाऱ्या नामरूपात्मक विश्वामध्यें निराळा दृच्छ नहीं= दृष्टोत्पत्तीस येत नाहीं ह्मणून सर्व जग आत्म्याहून निराळें पाहूं नकोस ! हा भाव.

आगम निगम गम्या ते, उर्ध्वजलकी मच्छी ॥ शून्यमंदिरका राम [आराम ?] बात तो अच्छि । ध्यान मिलाकर बैठा उनकी गति अच्छी । साधक सिद्ध साधो अवगाहनके पछी ॥ जय जय जी आॅल्लेख ० ॥ १ ॥

---

१ आगम=शास्त्र, निगम= वेद या दोन वत्सांची माता. २ ऊर्ध्व जलकी मच्छी ऊर्ध्व=ब्रह्मांडकटाह, महदाकाश=जलकी=जलांतील:=प्रकृतिरूप जलाचा महासागर [चैतन्यसागर] त्यामधील=मच्छी=मत्स्य=मत्स्यरूप धारण करणारा श्रीविष्णु [पक्षीं सोहिरोबांचे परमगुरू मत्स्येंद्रनाथ.] या अवतारापासूनच प्राणिसृष्टीच्या प्रथमावस्थेच्या काळास सुरुवात झाली ह्मणून भूगर्भशास्त्रवेत्ते ज्याला मत्स्ययुग ह्मणतात. [योगनी आनीबेझांटबाई यांचा 'अवतार' ह्या विषयावरील चार व्याख्यानें; यांचें मराठी भाषांतर "विष्णूचे अवतार" रा. गजानन भास्कर वैद्य बी. ए. एफ. टी. एस्. यांनीं केलें आहे त्यांतील व्याख्यान तिसरें पृ. ६६ ६७पहा.म. [सिद्धांत संहिता उत्तरार्ध पृ. २९,३०,३१ पहा.] ३ शून्यमंदिरका राम अंतःकरणाची वृत्ति अतर्मुख होऊन तिजमध्यें आत्मस्वरूपाच्या आनंदाचें प्रतिबिंब पडतें व तीच वृत्ति पुण्यभोग संपला ह्मणजे निद्रारूपानें लय पावते. या वृत्तीसच आनंदमय कोश म्हणतात.=राम=या वृत्तींत ज्याचें प्रतिबिंब पडतें असा बिंबभूत आत्मा (राम) आराम=आनंदभोग भोक्ता प्राज्ञ. ४ बात तो अच्छी=बात= वाचा, वाक्य, गोष्ट (तो=तंव; ती) अच्छी=उत्तम, चांगली, मधूर.=म्हणजे पश्यंति वाचेच्या योगानें "सामवेद" गाणारी वाचा; किंवा "तत्त्वमसि महा वाक्य" श्रत करणारी वाचा. (याबद्दल 'सिद्धांतसंहिता पूर्वार्ध पान १६० [illegible] येथें कोष्टकांत खुलासा केला आहे तो पहावा). ५ योगाचें सप्तमांग जें [illegible] मिळवून (बैठा=बसला) स्थिर झाला (उनकी=) त्याची (अच्छी [illegible]=उत्तम गति, उर्ध्वगमन (ब्रह्मांडांत उडण्याची गति) करण्याची गति जीवन्मुक्तस्थिति होय. ध्यानसमयीं हृदयगुंफेंत जो सोहंरूपी आत्मा आहे त्याशीं पंचप्राण व कुंडलिनी हीं ऐक्यानें मिळून जातात. त्यासमयीं श्वासाची गति बंद पडून झोंपी गेल्याप्रमाणें तो योगी दिसतो. [विशेष स्पष्टीकरण, पातंजल योगशास्त्राचा अभिप्राय, विभूतिपादः ३ पृ. १०४ ते ११५ येथें पहा.] ६ साधक=योगादि धारणा करणारा. सिद्ध=ब्रह्मवेत्ता. ज्ञानी. ७ अवगाहनके पछी=अनाहत चक्र हें मनःस्थान आहे. हें जीवईश्वर उपलब्धीचें विशेष स्थान आहे, म्हणून या आध्यात्मिक तीर्थावर देवतांचा साक्षात्कार घेण्यास योगी प्रवृत्त होतात. अशा त्या तीर्थावर [मानससरोवरावर) अवगाहनके=स्नान करणारे. [पछी=पक्षी=मुक्त, हंस (परमहंस) होत.

दुनियां ज्याहांसे होगी, अनादिका जोगी । मूंबिन बाजत उनकी, अनाहत छिंगी ॥ कब हूं नंगन मंगन, कब हूं बितरांगी । त [चि ?] न्मर्यकी कंथा अंतरसें रंगी ॥ जयजयजी ऑ० ॥ २ ॥ देखो[१०] जैसो

---

१ दुनि० ज्या० हों=ज्याच्यापासून प्रारंभीं जग उत्पन्न झालें. २ अनादिका जोगी=अनादि कालाचा, स्वयंभू, जुनाट योगी पक्षीं, जलधारण करणारा अनंत शयन नारायण नामक भगवंताचा आद्य अवतार. [पक्षीं सोहिरोबांचा परात्पर गुरू ' जलधरनाथ ' अथवा जालंधरनाथ (योगशास्त्रोक्त, अनाहतचक्रामधील ' जालंधरबंध ' पहा.) सि० सं० उत्त० या सोबत चक्रकारिका आहे. ३ मूंबिन बाजत=त्याला मुख नसतांना तो (अनाहत शिंगी) वाजवितो. किंवा मुखावांचून त्याची अनाहतशिंगी वाजते. कारण हा पुरुष नामरूप (मुख) रहीत निरवयव आहे. [तया आडनांव पुरुष । एरवीं स्त्री ना नपूंसक । किंबहुना एक । निश्चयो नाहीं ॥ ९८२ ॥ तो अचक्षु अश्रवण । अहस्त अचरण । रूप ना वर्ण । नाम आथी ॥ ८३ ॥ ज्ञानेश्वरी अ० १३]. ४ उनकी अनाहत शिंगी=त्याची अनाहत नांवाची शिंगी (वाद्य विशेष)=नादरूपा पराशक्ति (दुसरें; हिचें स्थान मूर्ध्नि आहे म्हणून ही वर मूबिन बाजत असें म्हटलें आहे.) अमलानंद योगी शतश्लोकीमध्यें ह्मणतात [ते व्युत्थान समाधि शुद्ध तुरिया बिंदुद्वयें साम्यता । सर्वज्ञादि अनंत शक्तिमय जे षड्वीध ऐश्वर्यता । तेथें कारण नादरूप तनु ते अंगुष्ठपर्वावधता । भासे कुंडलिरूप कीं द्वितिय ते दंडाकृती सूक्ष्मता ॥ ४३ ॥] ५ कब हूं नगन=केव्हां केव्हां नग्न पक्षीं प्रकृतिपटरूप आच्छदनाविरहित पुराणपुरुष भगवान वासुदेवरूपानें (बालरूपानें) अर्थात प्रतिबंधरहित नग्नरूप. ६ कब हूं मगन=श्रीकृष्णरूपानें (बाल्यावस्थे व प्रौढावस्थेंत मन) गोपींशीं लीलामग्न झालेला. ७ कब हूं बितरागी विषयवैराग्य धारण केलेला, वैराग्यशील, परशुराम, श्रीराम, बुद्ध एतद्रूप. ८ तन्मयकी=बुद्धिरूप विज्ञानमयाची किंवा चिन्मयकी=चैतन्यप्रतिबिंबित ज्ञानस्वरूपाची कंथा=[पंचीकृत, विश्वरूप, गुंतागुत=अनेक ठिगळें लावून बनविलेली] गोधडी. ९ अतरसें रंगी=हृदयाचेठायीं प्राणांनीं परिवेष्टित असा विज्ञामय पुरुष असतो तो (अंतरसे)=हृदयाच्या योगानें हृदयाशीं एकरूप असतो. कारण त्याचा हृदयाशीं ह्मणजे बुद्धीशीं अत्यंत निकट संबंध असतो. ज्याप्रमाणें प्रकाश (रंगी=रंगला जातो) लाल, हिरवा वगैरे रंगाचें प्रकाशन करीत असतां तो खुद्द लाल हिरवा वगैरे होतो, त्याप्रमाणें पुरुष बुद्धीचें प्रकाशन करीत असतां सर्व देहाचें प्रकाशन करित असतो. आणि ह्या बुद्धीच्या योगानें सर्व वस्तुरूप होतो. १० घटाच्या बाहेर आणि घटाच्या आंत (मठमें) पोकळींत (अवकाशांत) जेथें पहावें तेथें जसें एक महदाकाश व्यापून असतें.

तैसो घट मठमें अंबर । व्यापक सबसें तबसें अवधूत दिगंबर । चंद सुरज गयेथे महाछुनके अंदर । " देता लेता कहता, कोही तब नहिं; योगी हर ॥ जयजयजी ऑल्लेख० ॥ ३ ॥ भ्रमरगुंफा मठमें, गुरुजी

१ तसें व्याप्य (पृथ्व्यादि वाटोळ्या आकाराच्या घटाच्या अंतर्बाह्य) जें अखिल विश्व (तबसें=तेव्हांपासून, तें व्यक्त झाल्यापासून) त्याला, अवधूत आणि दिगंबर (दिक्=दिशा=अंबर=आकाश=दिशा व आकाश यांत ओतप्रोत अंतर्बाह्य व्यापून असणारा) असा व्यापक पुरुष (सबसें=सर्वांपेक्षां किंवा सर्वांपूर्वीं) आंतून बाहेरून व्यापून उरला आहे. सोहिरोबांनीं येथें गुप्त रहस्यार्थान्वयें असें दर्शविलें आहे कीं " गुरु, परमगुरू, परात्पर गुरू; " अशीं सच्चिदानंद ब्रह्माचीं तीन रूपें त्यांचें या चरणांत (अवधूत दिगंबर=पक्षीं दिगंबर दत्त अवधूत (दत्तावतार) स्वरूपाचें दिग्दर्शन करून ऐक्य दर्शविलें आहे. व " सत्यंज्ञानमनंतं ब्रह्म; " (सत्यरूप, ज्ञानरूप आणि अनंत असें) या श्रुतीनें जें ब्रह्माचें लक्षण सांगितलें; त्याची सार्थकता दर्शविली आहे. [परमात्मा म्हटला म्हणजे एकच आहे. व त्रैमूर्तींतील तीन रूपांचीं म्हणून जीं तीन नांवें आपण घेतों तीं त्या एकाच परमात्म्यानें तीन कार्यें करावयाचीं म्हणून त्यास कार्यपरत्वें ठेवलेलीं तीन नांवें आहेत. " विष्णूचे अवतार, प्रकाशक वैद्य ब्रदर्स, व्याख्यानें दुसरें पृ० २७ पहा]. २ पूर्वोक्त दिगंबर पुरुषाच्या व्यापकतेपूर्वी चंद्र आणि सूर्य हे महाशून्याच्या डोहांत [अंदर=] गडद [गुप्त. अव्यक्त] झालेले असे होते. [महाशून्य= शून्यरूप आकाशाची कल्पना, निबिडघन अज्ञानप्रकृतिरूप २० नाहींसी होते. म्हणून त्यास महाशून्य म्हणतात. परब्रह्म सर्व शून्याचा [illegible]आहे. म्हणजे शून्यरूप आकाशाचाही जेथें अंत आहे.] ३ चंद्रसूर्य हे जसे महाशून्यांच्या आंत अव्यक्त होते. तसेच, इंद्र, अग्नि, ब्रह्मदेव हेही त्याच्या आंत अव्यक्त होते असें या चरणांत संकेतानें दर्शविलें आहे. " देता लेता= " देणेघेणे इत्यादि क्रिया करणारें हस्तेंद्रिय पक्षीं विराट पुरुषाच्या हस्तांमधील दैवत्य इंद्रदेव " कहता " शब्दब्रह्म बोलणारा ब्रह्मदेव किंवा वाचाधिदैवत्य अग्नि हे [कोही=कोणीही] तब=त्या वेळीं [दिगंबर पुरुषाच्या व्यापकतेपूर्वी] नसून महाशून्यांतच गडद झालेले होते. तेव्हां एकटा महायोगी [हर] शिव काय तो होता. " याचा संबंध पुढील चरणाशीं आहे." ४ पूर्वोक्त चरणांतील केवळत्वानें उरलेला जो शिव तोच परमेष्ठी गुरू आदिनाथ असें म्हणून या चरणांत दर्शवितात कीं, तो गुरुजी " भ्रमरगुंफा मठामध्यें " अकेला) एकटा उरलेला आहे.

अकेला । आवती जाती अम्मल नहिं पीनेवाला ॥ सोहिरा देखो लाल साहेबका चेला । अब तो पीता गुरुजी गैबका प्याला ॥ जयजय जी ऑलेख० ॥ ४ ॥

(१०)

सज्जनें कूं दिल हर तनु मन प्रियकर जो । सबै रंगादिक दिखलावे जो [यो ?] गी अखिया जो ॥ और दिल मुख नामीं ज्या दंडन करिता जो । मे [ते ?] रा साहेबैं सबश्रुत सब सब मौजा करिता जो ॥ १ ॥

---

१ असा जो तो "आवती=येणारी ३ जाती=जाणारी=आवती=कार्यरूपानें परिश्रम न पावलेली ईश्वराची उपाधि माया. जाती=(नाश पावणारी) कार्यरूपानें परिणाम पावलेली जीवाची अविकृति, यांचे अम्मल=या मायांच्या (शक्तींच्या) संयोगानें होणारें जे विपरित ज्ञान तें (मायामोहमयी प्रमाद मदिरा) मद्यपानानें येणाऱ्या शक्तीसारखें होष. तर अशा प्रकारचा अमली पदार्थ तो पिणारा नव्हे, हा भाव. २ सोहिरोबा ह्मणतात [देखो] पहा ! हा [सोहिरा] त्या साहेब गुरूचा लाल=प्यारा, परम प्रीय असा गुरु त्याचा शिष्य होऊन एकाकी बोधरूप ब्रह्मभावानें रंजन होईना ह्मणून गुरुशिष्याचें निमित्त करून, म्हणजे गुरू व शिष्यरूपानें आपणच नटून, सद्गुरू आपणच त्याजकडे पाहतात; व आपणच त्याला बोध करितात. म्हणजे परंपरेनें सच्चिदानंदरूप आत्मभावानें असणाऱ्या शिष्याकडे कृपादृष्टीनें पाहतात." [एकपण नव्हे सुसास । म्हणूनि गुरु करूनि मिस । पाहणेंचि आपली वास । पाहताचि असे ॥ १३ ॥ अमृतानुभ ३ अब=आतां गुरुजी गैब=हिरण्यगर्भस्वरूप प्याला पीतो. कर्माच्या योगानं मृत्यूला उल्लंघून उपासनेनें अमृततत्त्व पावतो, तो ब्रह्मलोकस्थ हिरण्यगर्भाच्या स्वरूपं मिळून त्याच्याबरोबर [कल्पाच्या अंतीं] परब्रह्मस्वरूपास पावतो. ४ साधुजनांचें (तनु=जडदेह) देह आणि मन हरण करणारा (देहात्मभाव व मनाचा लय करणारा); सज्जनांस (दिल)=अंतःकरणपूर्वक प्रिय असणारा जो (परमात्मा) असा जो. ५ तो सर्व लाल, पांढरा, काळा, इत्यादि प्रकृतीपासून उत्पन्न होणारे रंग उत्पन्न करून (अखियां)=डोळ्यांस दाखवितो. ६ त्याचेकडे ज्यांचें अंतःकरण वेधून गेलें असून, ज्यांचें मुख त्याच्या नामस्मरणाच्याठायीं रत असतें असे जे भक्तजन, त्यांचे जे अरी (शत्रू) त्यांचें जो दंडन (शासन) करणारा. ७ सर्व श्रवणादि चेष्टा करणारा असा जो तो माझा साहेब (धणी) आहे.

जयजय निराकार निर्गुन अवधूता । दिल्ज्योति सुरप्रान आरति जन-नाथा ॥ ध्रु० ॥ तुम तरफें जो जन है इनकूं निजसूरत । दिखलावे जी दाता बसकर उस चित्त ॥ रहता सबके दिलमें लडकेके मात । देखतें सब में [सें ?] डारें [द्वारें ?] बिबेक कर हात ॥ जय जय० ॥ २ ॥ तुम पगमें जी ध्यान करके तनुमन । निभताहै जनहि शून्य जाणत मंदजन ॥ आंगेपीछे देखो सबका निर्गुन ॥ सोहिरा करिजो आपनें तेरा तनुमन ॥ जय जय० ॥ ३ ॥

---

१ दिल=हृदय=ज्योति=हृदयांतर्गत प्राणांनीं परिवेष्टित अशी विज्ञानमय पुरुषात्मक ज्योति+स्वरूप=देव प्राण=पंचप्राण, एतद्रूप आरती, हे जननाथा ! पंच-जनांचा नाथ (किंवा विश्वाचा) जो धणी निर्गुणनिराकार अवधूत, त्याला ओंवाळू इ० भाव. २ हे अवधूता तुझ्या (तर्फें=सांनिध्यानें) जो जन (भक्तजन) आहे त्याच्या चित्तांत (बसकर)=बसून किंवा वसणूक करून त्याला आपलें वास्तविक (स्वरूप) दाखवितोस. ३ इतरही सर्वांच्या अंत:करणांत (लडकेके=तान्ह्या मुलाची ५ मात=माता, आई) आईप्रमाणें तूं प्रेमपुर:सर वास्तव्य करतोस आणि द्रष्ट्याच्या (साक्षीच्या) रूपानें सर्व बाह्यवस्तुही अवलोकन करतोस, परंतु त्या वस्तूंचे ग्रहण करतेवेळीं (बिबेक कर)=विवेक करून (त्यांवर हात डार=हात घालतोस) स्वीकृत करतोस हा भाव. ४ जी हे सद्गुरु अवधूता ! तुझ्या पायांचें ध्यान केलें असतां, तनु=जडदेह, मन ही दोन्ही आणि (जानही)=जीवत्वही (निभता है=भवनदीतून निभावून जातें) पार=पार होऊन जातें, इतकेंच नव्हे, तर ज्या शून्याचा अंत लागणें कठीण; अशाचाही अंत (मंदजन=ज्ञानबुद्धीचा) जड मूढही (जानत) जाणूं शकेल ! ५ सर्वांच्या आधीं व अंतीं असणारा (अवधूत) निर्गुण आत्मा पहा. ६ यांत सोहिरोबानें आपलें स्वत:चें देह आणि मन (आपलें नव्हेचसें करून) तेरा=त्याचेंच अर्पण केलें म्हणजे त्यालाच वाहिलें तन्मय केलें हा भाव.

५ सेली.

(१)

जागते जोगी गैब गगनेंमें, ऑलखें निरंजनें देख गाढाँ साहेब ठाड सबमें (सें ?) उनकूं नहीं रूप रेख ॥ जुगति जुगतसें पवन चढावे दिलपर देना मेखें। कहत सोहिरा अपना प्यारा बहुत भेखेंमें एक ॥ १ ॥

---

१ ह्या पद्यांत मूळ हस्तलिखींत वहींत "सेली" असें नांव दिलेलें आहे. सेली नांवाचें पद्य, छंदोबद्ध काव्यांत किंवा गाथाछंदामध्यें असलेल्या कवितेंत आढळून येत नाहीं, ह्मणून हें नांव देण्यांत कर्वाचा भावार्थ काय असावा हें बरोबर कळ. नाहीं; तथापि आमचें अनुमान असें आहे कीं, बांदें (एदिलाबाद) या गांवीं पूर्वी मुसलमानी रियासत नांदत होती; त्यामुळें तेथें असणारी मुसलमानी ह्मणजे अपभ्रष्ट हिंदुस्थानी भाषा, सोहिरोबांचे वेळीं बरीच प्रचारांत होती; आणि त्या भाषेचें ज्ञान सोहिरोबांस अवगत होतें; ह्मणून तशा भाषेंत या पद्यांचा एक "हार" गुंफलेला असावा. मोहरमच्या किंवा अन्य सणाच्या वेळीं, मुसलमान लोक लहान मुलाच्या गळ्यांत एक कलाबतूचा सुंदर 'हार' घालीत असतात. त्याचें नांव "सेली" असें असतें. त्या अर्थीं हें नांव वापरलेलें असावें. साधकशिष्य बालकाच्या गळ्यांत गुरुपित्यानें घातलेला हा "हार" आहे. हें एक [illegible] असावें किंवा, जोगी नाथपंथी गुसाई लोकांचीं चिन्हें "सेली, सिंगी, [illegible] कंथा" अशीं आहेत; त्यांपैकीं सेली ह्या चिन्हास अनुलक्षून योजलेला असावा एक. कांहीं असो, परंतु सज्जनांनीं (कविता असो कशीतरि तात्पर्यावरिच सज्जनीं दृष्टि) रहस्यावरच ठेऊन त्यामधील रस घ्यावा ही प्रार्थना आहे. २ जाग्रतीनें राहतो. ३ योगी गैबनाथ (गोरखनाथ=परमेश्वररूप गुरु) ४ निर्विकार आकाशामध्यें (ब्रह्मरंध्रांत) ५ अलक्ष्य भुवनांत (ऑलेख ही नाथपंथाची सांकेतीक खुण आहे) ६ अंजनरहीत (मायारहीत एकांत) स्वयमेव ज्ञानस्वरूप. ७ अगाधशक्तीयुक्त. ८ उभा आहे. ९ सर्व विश्वांत किंवा "सें" असें घेतलें, तर सर्वांहून उंच आकाशाबाहेरही पोंचलेला. १० योगरूप युक्तियुक्तीनें. ११ प्राणवायू. १२ मनावर. १३ मेख मारणें (मनाचा लय करणें याअर्थीं) खुंटा मारणें, बांधून ठेवणें. १४ गुसाई, संन्याशी, इत्यादि जे अनेक मार्गीनीं जाणाऱ्या लोकांचे अनेक प्रकारचे वेष आहेत, त्यांत एक राजयोग मात्र मला प्यारा आहे.

(२)

उलट किया मैं पलेख अलखसें लगनें लगी हरबखतें । मगें [द ?] नमस्त मैं गगनमहालमें गैबें हमारा बखत । नारी पुरुख नहीं रूपरेख वो देख निरंजन तख्त । कहत सोहिरा त्रिकुट पलंगपर [आलंगपर ?] मलंग फकीर मैं फंख्त ॥ १ ॥

(३)

बासकुं खोदत श्रृंगें [मृग ?] दिवाना उनका दिलदस्तूर । बेटिचोदकूं मालुम नहिं ते [मे ?] रे बेंबीमें कस्तूर । निर्गुनें निरंजन आपमें है आदमी साधनपर चातुर । कहत सोहिरा कामकुं खोदत नहिं बे कामातूर ॥ १ ॥

---

१ पलख=निमिषोन्मेषरूप काल, मी ' अलखसें '=अलक्ष मुद्रेच्या योगानें उलट केला (प्रत्याहार केला.) २ लगन=लग्न (विवाह=प्रकृति पुरुषाचें ऐक्य) ३ सदासर्वकाळ. ४ त्या सुखामध्यें निमग्न झालेला, नादांत असलेला. ५ महदाकाशस्वरूप महालांत. ६ हिरण्यगर्भ सूत्रात्मा हाच (बखत=काल गगनमहालांत निमग्न होऊन राहण्याचा काल; अवधी) कालावधी (अनंत) ७ स्त्री नव्हे पुरुष नव्हे. ८ रूप नाहीं आकार नाहीं असें निरंजन तख्त=सिंहासन पहा. ९ त्रिकूट औटप्रमाण स्थूलदेह हाच पलंग त्या पलंगावर पहुडलेला. १० सर्वसंगपरित्याग केलेला. ११ फक्त, एकटा, एकाकी. १२ कस्तुरिका मृगाच्या नाभींत (बेंबींत) कस्तुरी असते तिचा सुगंध श्वासोच्छ्वासाबरोबर त्यास येऊं लागतो, तेव्हां त्या सुगंधाचा शोध काढण्यासाठीं पायांच्या खुरांनीं भूमि खोदखोदून तो रानोरान फिरत असतो, त्यावर हें रूपक आहे. तो दिवाना (वेडा) मृगपशु असें करितो हा त्याच्या (दिल)=मनाचा (दस्तूर=रीत, रिवाज) धर्म होय. १३ तद्वत मनुष्यानेंही जाणलें पाहिजे कीं, निर्गुण निरंजनरूप अखंड ब्रह्मसुखाचा जो सांठा तो आपल्या देहामध्येंच आहे; पण नर साधन-(योगसाधनतत्पर)-संपन्नता प्राप्त्यर्थ चतुर असला पाहिजे. १४ जर कोणी म्हणेल कीं, ' साधनतत्परता ती काय ? तर सांगतात, अरे ! कामातुर होत्साता, कामतृप्त्यर्थ (खोदणें=खटाटोप करणें) खटपट करीत नाहींस काय ? त्या वेळीं साहजिक आपल्याच स्वेच्छेनें आपल्याच बुद्धीनें कर्म करतासना ? त्या कर्मीत तुला प्रवृत्त कोण करतो बरें ? तसाच जो तुझा अनादि अक्षयसुखाचा ठेवा तो तुजमध्येंच आहे तो शोधून काढ. जसा कामासाठीं खोदतोस तसा रामासाठीं खोद हा भाव.

(४)

सब दुनियां देख्या मैं तो वन [तन ?] बिन मृगजलपूर । फेजर दुपारसें शाम नहीं हो गैब सुरत [ज ?] भरपूर । तन्हांतन्हांकी ज्याहांकी नौबद बाजत अनुहात सूर । कहत सोहिरा उलट पलखसें बाहांसो मैं महसू (शू ?) र ॥ १ ॥

(५)

दूधके बीचमें झीका रहना ओ ता साची बात । सगुनमें निर्गुन तैसों रहते उनकूं न लगत हात । गुंढमेंसें तो (छ ?) कर आवती कछु तो करामत लगती । कहत सोहिरा जोगजुगुतबिन कैंव मिले अंद(त ?)र-ज्योति ॥ १ ॥

(६)

आपनी सूरत फेर फेर पलखसें देख तुम जोगी । बाजत बांजा लगन गगन अनाहत तुमारी छिं [शिं ?] गी । नवद्वारकूं छोडछोडकर दशवे

---

१ प्रातःकाळ. २ तेथला. ३ प्रविष्ट झालेला; माहितगार. ४ दुधामध्येंच तूप असतें ही गोष्ट खरी आहे. ५ तद्वतच सगुणामध्यें निर्गुणपरब्रह्म राहतें, पण त्याला हातांची जरूर लागत नाहीं. याचें रहस्य असें कीं, " प्रथमतः दूध, त्या दुधाचें दहीं, तें दहीं रवीनें हातांच्या साह्यानें चाळून त्यांतून काढलेलें लोणी, व त्या लोण्याचें बनविलेलें घृत; याप्रमाणें चारही प्रकारच्या कर्मास हातांची (इंद्रियांच्या साह्याची) जरूर आहे. परंतु एकवेळ घृत बनल्यावर तें नाशरहित पूर्ण स्थितींत चिरकाळ राहतें. व हस्तादिकांच्या योगानें त्याला पुनः चाळन करण्याचें कारण राहत नाहीं. त्याप्रमाणेंच देहामध्यें जें शुद्धसत्त्व दूध आहे त्यापासून बनविलेलें (तीन गुणांनीं बनलेलें) कारणरूप दहीं त्या त्यांतून विज्ञानमय सूक्ष्मदेहरूप कृतीच्या चलनानें (कर्म अकर्म ह्या दोन हस्तांच्या साधनानें) काढलेलें महाकारणरूप लोणी व त्या लोण्यापासून बनलेलें निर्गुण ॐकाररूप घृत तें पूर्णपणानें राहतें. व मग त्याला कर्म अकर्म ह्या दोन हस्तांची जरूर नाहीं. ६ मुळामध्यें साखर (शुद्धसत्त्व गोडपणा) अव्यक्तपणानें असतेच. पण ती वेगळी करावयाची आहे तर कांहीं कृति करावी लागते. ७ त्याप्रमाणें देहाच्या आंत जी अंतर्ज्योति आहे ती योगयुक्तीवांचून कशी प्राप्त होईल हा भाव. ८ आपलें स्वस्वरूप (सोहंरूप). ९ पुनःपुनः (उलट्या दृष्टीनें).

द्वारकू जावो । तनके पास तो सबका रहना मनपवनो[1] ऊर्ध्व ले [ले ?] जावो । भगत[2] लक्कूं लेता नहीं ओही करार रखना बंद । तेरे अखियांकूं करे चकियां उनकी समाधपुनवा चंद । ग्यान ध्यानकर[3] मगन बैठे तब उनका पीना दुध । जोग जुगतसें[4] चढते जाव तो गिरिउपर है गौवा । कहत सोहिरा जिन्नें भरिये नादबिंदकी[5] पेटी । अंदर[6] हैसो बाहेर दिखना चिंता[7] रखना झूटी ॥ १ ॥

(७)

फत्तरफूल[8] तो सहज फुले उन बनमों जैसो बसंत । विषयो भोग लगावे सब इंद्रिय तनसे मनसे न्यारा[9] संत । खुजेरंत[10] करनेवाले चेले मौनेमें[11] बैठे महंत । कहत सोहिरा उनको[12] पाया लगता नहीं बे अंत ॥ १ ॥

---

१ मन आणि प्राणवायु यांना उर्ध्व म्हणजे ब्रह्मांडांत (ब्रह्मरंध्रांत) घेऊन जा. २ भक्त म्हणविणारे लक्षावधि जन आहेत, पण सर्वांलाच तेथ जाण्याची मुभा नाहीं(लेता नहीं) भक्त म्हणविणाऱ्या सर्वांनांच तेथें न्यावें असें म्हणशील, तर तो (करार=नियम,) कायदा बंद ठेव. कारण जरी तुझा तेथें प्रवेश झाला तरी अधिकारावांचून तुला तें तेज सहन होणार नाहीं (तेरे अखियाकूं करे चकियां) तुझ्या डोळ्यांला तें तेज दिपवून सोडील. कारण त्याची समाधि पूर्णचंद्रानें युक्त अर्थात् ज्ञानसूर्यांच्या दीप्तिप्रभावानें युक्त आहे. ३ ज्ञान आणि ध्यान यानें युक्त होऊन मग्न (आत्म्याशीं निमग्न) व्हावें तेव्हांच तेथलें शुद्धसत्व दूध प्यावें. ४ योगाच्या युक्तीनें चढत चढत जा (तो=मग) त्रिकूटगिरीवर (गौवा=गाय) अमृतसंजीवनी कामधेनू आहे. ५ नाद आणि बिंदु आंत भरलेलीं आहेत अशी देहरूप पेटी ज्यानें भरली आहे. ६ त्या पेटींत जें नाद आणि बिंदु यांनीं युक्त अंतररूप (हृदयांतर्गत.) आहे तेंच बाहेरही आहे असें पहा. ७ मग (आत्मवत् सर्वभूतानि) आंत बाहेर एकच व्यापक तत्त्व आहे असें पाहिल्यावर मिथ्या चिंता एका बाजूला गुंडाळून ठेव. नाहींशीच कर हा भाव. ८ फत्तरफूल अथवा दगडफूल म्हणून एक पुष्पाकृति वनस्पति नुसत्या खडकावर उगवते, तिचा औषधांत फार उपयोग होतो. जसा वसंतकाळ आला म्हणजे आपोआप सहजभावानें केवळ दगडावरही ही वनस्पति उगवते. तसा. ९ साधुसंत किंवा सद्रूप आत्मा ‘ देह, इंद्रियें, मन; ह्या सर्वांहून वसंताप्रमाणें निराळा (अलग) राहून त्यांस आपापले विषय भोगण्यास लावतो १० करामत कर्म करणारे चेले (पक्षी प्राज्ञादि जीव) ११ निःशब्द=नादरूप प्रणवरूपानें बसलेले (महंत=महान प्राज्ञ) आहेत. १२ म्हणून तात्पर्य काय कीं त्या परमात्म्याचा पाया (आदि) किंवा अंतही लागत नाहींत.

(८)

तखतें [तख्त ?] बढा निरंजन बाबू बखत [बख्त ?] बढा अवि-नाश । कोही बखत [बख्त ?] पडेंगा तैमपर मैं तो फक्त फकीर उदास । माया जतिके दतरमें जितना तितना पोहोंचत नाश । कहत सोहिरा सबतो मृगजल हकनक क्या करों आस ॥ १ ॥

(९)

खं साहेब गैब निरंजन दिलमें रहता राम । उलटपलट सब पोथी कीये नहीं मूमें तेरा नाम । ऐसा होके पेटके खातर दुनियांकूं करे सलाम कहत सोहिरा मुरुख आदमी अब कायकूं लीये थे जनम् ॥ १ ॥

---

१ निरंजन हें मोठें सिंहासन (अधिष्ठान, किंवा पाळणा). २ तनपर= कालग्रस्त स्थूलदेहावर कांहीं प्रसंग (नाश, मृत्यु) खास (निःसंशय) येणार आहे असें जाणून फक्त=केवळ फकीर होत्साता सर्वसंगपरित्याग केलेला असा मी ह्या स्थूलदेहाविषयीं उदास आहें, मायेच्या (जतिके=अटकाव, प्रतिबंध करणाऱ्या) दतरामध्यें जितकें कांहीं (नामरूपात्मक जगत) आहे तेवढें सर्व नाश पावणारें आहे, व हें सर्व केवळ मृगजलवत् आहे असें समजत असतां (हकनक=व्यर्थ) याचा (स्थूल जगाचो) आशा कशाला करूं. ३ ख=ॐकाररूप आकाश [ॐ ३ खं ब्रम्ह खंपुराणं वायुरं खमिति ह-स्माह × × × ॥ बृहदारण्यकोपनिषत् अ० ५ बा० १ मं० १ भावार्थः— ॐ आकाश आहे. पुराण आकाश (अगोचर) आहे; आणि वायुसंबंधीं आकाश गोचर आहे.] पुराण आकाश म्हणजे परब्रह्म होय, आणि वायुमूलक जें आकाश तें अपरब्रम्ह होय. आकाशवाचक ॐकाराची असाच अर्थ समजावयाचा. येथें खं साहेब=कूटस्थ परमात्मा=. ४ गैब=चैतन्यआत्मा किंवा हिरण्यगर्भ. ५ अज्ञानादिकांचा लेप नाहीं असें निर्जन वन. ६ सर्व वेदशास्त्र पुराणें उलथीं पालथीं करून पंडित बनला; पण अंतःकरणांत कोरडा राहून, मुखांत त्या (रामाचें) प्रभूचें प्रेमपुरस्सर नाम कधींच येत नाहीं.

परिशिष्टें.

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
१	१	१ स्वामींनीं सरंजाम केला—सरंजाम, किल्ला, दुर्ग, कारखानें हीं नावें प्रारंभीं ‘ शिवछत्रपति ’ यांच्या राज्यव्यवस्थेमध्यें चालू झालीं; आणि तीच पद्धत बहुतेक मराठेशाहींत चालू होती. सावंतवाडी प्रांतांतही सबनीस, पोतनीस, फडणवीस, चिटणीस, इत्यादि निरनिराळीं अधिकारपरत्वें नावें चालू होतीं. वि. शा. वि. मा. पु. १० यांत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें या सदरा खालीं ‘ शिवछत्रपति शककर्ते यांनीं राज्यमर्यादा स्थापन केलें ’ त्याविषयीं लिहिलें आहे तें असें कीं “ श्री शिवाजी महाराजांनीं मनोरथ धरिला तसें श्रीनें राज्य, प्रांत स्थळें देश दुर्ग असे, करून दिले. यवनाचें प्राबल्य होऊन धर्मोच्छेद झाला तो स्थापावा असा संकल्प केला, त्या अन्वयें श्री कृपा होऊन यवनाचा पराभव व्हावा, असें घडूं लागलें—प... ऊपरी धर्मे करून चालावें ह्मणून शिवाजी महाराज बंदोबस्त करिते झाले. महाल बारा व कारखाने अठरा केले [त्याचीं नावें मुळांत पहावीं] येणेंप्रमाणें महाल कारखाने केले. त्यास दरोगे अधिकारी कारकून हवालदार वगैरे त्या त्या कामीं शहाणीं माणसें उपयोगी पाहून ठेऊन बंदोबस्त करून दिला. किल्लेकोट यांच्या इमारती बांधून सुभे करून दिले. खासबारदार हेटकरी पटेकरी एकेक हवालदार नाईक पाईक करून नेमून दिले जागो जागीं चौकसी हवालदार यांनीं करावी. त्याजवर सर नोबतांनीं घस्तीची व लोकांची रात्रीची चौकसी करावी. किल्लाकोट पाहून माणसांची भरती नेमणुकी त्यांस अडिश्री व नगदी वगैरे बेगमी ठेवावी. दहा माणसांचा दाहिजा, त्यांत एक नाईक, नऊ शिपाई, त्यांत बंदुकी, आड हत्यारी सांग बरची, माणूस मर्द, चांगले इतबारी पाहून ठेवले. मोठमोठीं संकटें पडलीं असतां किल्लेकोट जंजिरे सावध तर मोठमोठे शत्रूचा हिशेब धरावयास नको ह्मणून बंदोबस्त केला. आतां मुलुख व प्रांत यांचा बंदोबस्त—जे प्रांताचे सुभेदार नेमला त्यास जमादार, चिटणीस, फडणीस, दप्तरदार, हुजूरचे दरखदार असावेसे केले. सारांश (चालू बखरींत लिहिलेली संस्था) ही शिवछत्रपतीच्या राज्यव्यवस्थेशीं किती जुळती आहे पहा. तसेंच बारा महाल यांचा योगशास्त्रांतील अनाहतचक्र

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.

(द्वादशदल) यांतील रहस्याशीं मेळ आहे, आणि अठरा कारखानें ही संख्या महाभारत ग्रंथांतील प्रत्येक अठरा संख्येशीं जुळती आहेत. शिवछत्रपतींनें आपली राज्यरूप इमारत " आत्मज्ञान " ह्या पायावर रचलेली होती [आत्मज्ञानं विना पार्थ सर्वं कर्म निरर्थकम्] छत्रपतींस अवतारिक पुरुष समजतात. त्यांचे वेळीं दादोजी कोंडदेव, रामदासस्वामी, देहूस तुकारामबोवा, वडगावीं जयरामस्वामी, वारणातिरीं बाळस्वामी, ब्रह्मनाळास रघुनाथस्वामी; निगडींत रंगनाथस्वामी, व त्यांचे बंधु आत्यास्वामी, आनंदमूर्ति, भागानगरास केशवस्वामी, पाटगांवांस मौनीबावा, त्र्यंबक नारायणाश्रमबोवा, संगमेश्वरीं अचलपुरी गोसावी, धामणगावीं बोधलेबोवा, पोलादपुरीं परमानंदबुवा, चिंचवडास मोरयादेव धरणीधर, पैठणास निंबराज, अनंतसिद्ध, चांभारगोंद्यास शेख महंमद, अशी बरीच मंडळी उदयास आली. ह्या मंडळीच्या उपदेशानें महाराष्ट्रमंडळांतील केवळ रानटी मावळे लोकांच्या हृदयाकाशांत सुद्धां आत्मज्ञानानें प्रवेश केला होता आणि त्यामुळें त्यांच्यामध्यें स्वधर्म, स्वामिभक्ति, स्वराज्यनिष्ठा इत्यादि गोष्टि आविर्भूत झाल्या होत्या; आणि ह्याच मंडळीच्या पराक्रमानें " महाराष्ट्रदेश " या सुंदर नांवानें शोभणाऱ्या इमारतीची उभारणी होऊन नाममात्रानेंच कां होईना पण चिरकाळ राहिली. श्री शिवछत्रपतीस शिवाचा अवतार असें समजतात. त्या नियमाअन्वयें (चालू बखरींतील " सच्चिदानंदरूप शिव " आणि चिदाभासयुक्त जीव) शिवाजी हा शिव आणि औरंगजेब किंवा संभाजी हा जीव असें रूपक बसवून, दोघांच्या मधील अंतर ह्मणजे एकामध्यें निरहंकृति, शुद्ध ज्ञान, (दैवी स्वभाव) आणि दुसऱ्यांत अहंकार, दुर्बुद्धि, अज्ञान इत्यादि आसुरस्वभाव ज्याप्रमाणें स्वभाववैचित्र्य व त्याचा परिणाम हा (या कायादुर्ग किल्यांतील जीवशिवात्मक तत्त्वाशीं) बरोबर जुळता असल्यामुळें रूपक करून येथें दर्शविला आहे.

२ गुणत्रयकारण महत्तत्त्व०—गुणत्रय म्हणजे सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण जिच्यामध्यें सारख्याप्रमाणानें आहेत अशी विश्वाचें आद्य कारण [मूल प्रकृति] शक्ति आणि महत्तत्त्व म्हणजे

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.

ह्याच शक्तीमध्यें प्रतिबिंबित अशी, जिच्यांत शुद्धसत्त्व गुण अधिक असून इतर दोन गुणांनीं तो गढूळ झालेला असतो तिला माया (विद्या) महत्तत्त्व म्हणतात.

चिदानंदमयंब्रह्मप्रतीबिंबसमान्विता ।
तमारजःसत्त्वगुणा प्रकृतिर्द्विविधा च सा ॥ १६ ॥'
सत्त्वशुद्धविशुद्धिभ्यां मायाऽविद्ये च ते मते ।
मायाबिंबा वशीकृत्य तां स्यात्सर्वज्ञईश्वरः ॥ १६ ॥

" पंचदशी, तत्वविवेक '

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृति संभवाः ।
निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ १ ॥
सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवति याः ।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ २ ॥

[भगवद्गीता, सुबोधचंद्रिकाटीका.']

सत्त्व रज तम हे गुण म्हणजे दोर आहेत, हे प्रकृतींतून उत्पन्न होतात. हे महाबाहो, देही हा सर्व विकारांपासून जरी मुक्त आहे, तरि तो देहाचा संगती असल्यामुळें, त्या देहीला देखील ते बळकट बांधून ठेवतात. कौंतेया, सर्व गर्भांमध्यें जे देह उत्पन्न होतात त्या सर्वांचें उत्पत्तिस्थान महत् ब्रह्म, त्याजमध्यें बीज ठेवणारा पिता मी. श्रीमद्भागवत, तृतीय स्कं०

कालवृत्त्या तु मायायां गुणमय्यामधोक्षजः ।
पुरुषेणात्मभूतेन वीर्यमाधत्त वीर्यवान् ॥ १ ॥
ततोऽभवन्महत्तत्त्वमव्यक्तात्कालचोदितात् ।
विज्ञानात्मात्मदेहस्थं विश्वं व्यंजंस्तमोनुदः ॥ २ ॥
सोऽप्यशंगुणकालात्मा भगवद्दृष्टि गोचरः ।
आत्मानं व्यकरोदात्मा विश्वस्यास्य सिसृक्षया ॥ ३ ॥
महत्तत्त्वाद्विकुर्वाणादहतत्वं व्यजायत ।
कार्यकारणकर्त्रात्मा भूतेंद्रियमनोमयः ॥ ४ ॥

पद्य	पृष्ठ ८	पद्यांचा अर्थ.

इति तासां स्वशक्तीनां सतीनामसमेत्यसः ।
प्रसुप्तलोके तंत्राणां निशाम्य गतिमीश्वरः ॥ ५ ॥
यत्सानुबंधेऽसति देहगेहे ममाहमित्यूढदुराग्रहाणाम् ।
पूंसां सुदूरं वसतोऽपि पुर्यां भजेम तत्ते भगवन्पदाब्जम् ६

भावार्थः—कालशक्तीच्या योगानें गुणक्षोभ झालेल्या त्या मायेच्या ठिकाणीं, ज्ञानशक्तियुक्त त्या अधोक्षज परमात्म्यानें आपल्या अंशभूतपुरुषाकडून चिदाभासरूप वीर्य स्थापन केलें. नंतर कालानें प्रेरित अशा मायेपासून महत्तत्त्व उत्पन्न झालें. तें स्वतः अनुभवज्ञानस्वरुपी असून आपल्या शरिरांत असणाऱ्या जगतास प्रकट करणारें व अज्ञाचा नाश करणारें होतें. त्या महत्तत्त्वावर सर्वाध्यक्ष भगवंताचा दृष्टिपात होतांच तें चिदाभास [निमित्तकारण] व काल [रूपांतराचें कारण] यांच्या स्वाधीन होऊन त्यानें विश्वसृष्टि बनविण्याच्या इच्छेनें आपणच आपल्या स्वरूपाचें रूपांतर केलें. तेव्हां रूपांतरास पावणाऱ्या त्या महत्तत्त्वापासून अहंकार तत्त्व उत्पन्न झालें. तो अहंकार, अधिभूत, अध्यात्म, आणि अधिदेव असा तीन प्रकारचा होऊन आकाशादि पंचमहाभूतें, दहा इंद्रियें, दहा देवता व मन यांस आश्रय झाला. नंतर षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वरानें त्या सर्व तत्त्वांमध्यें प्रवेश करून, त्यांजकडून विराट देह उत्पन्न करविला. त्यांत अधिदैव, अध्यात्म, आणि अधिभूत यांची योजना केली. [ऋषी म्हणतात-हे भगवन्-देहरूप नगरीमध्यें वास करणारा जो तूं त्या तुझे चरणकमल इंद्रियांसहित, अति तुच्छ अशा देहाच्या ठिकाणीं व त्याला अनुसरून असणारीं जीं गृहादिक त्यांचे ठिकाणीं ' मी मी माझें माझें ' असा दुराग्रह धारण करणाऱ्या जीवांना अत्यंत दूर (प्राप्त होण्यास दुर्लभ) आहे त्या तुझ्या चरणकमळाची आम्हीं सेवा करितों.] या विराटपुरुषरूप शहराविषयीं ज्ञानोबांचें सुंदर पद आहे. तें असें:—

[काय नवल केलें कर्त्यानें । चालतें शहर ॥ ध्रु० ॥ काय साडे तीन हातांचे फेरे । चौदा बुरुज न्यारे न्यारे । बावन्न झळकती कंगोरे । तुटती तारे ॥ १ ॥ कचेरी बैसली महाकारणीं । आत्मा-

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.

राम बैसले येउनी । उन्मनि महालांत बैसली राणी । दिसे परिवार ॥ २ ॥ साठ तीनशें सखिया तिसी । बाहत्तर कोटि राबती दासी । रिद्धि सिद्धि पायांपाशीं । उभ्या समोर ॥ ३ ॥ चंद्र सूर्य पवन पाणी । ब्रह्मा विष्णु शंकर धणी । ज्ञानदेव म्हणे त्रिभुवनीं । दिसे शहर ॥ ४ ॥] महत्तत्त्व निसबतीनें असा शब्द आहे आहे. त्यास निसबतीनें त्याच्या अनुभवानें (ज्ञानशक्तियुक्त) हुकमानें. म्हणूनच या तत्त्वास प्रधानतत्त्व असेंही म्हटलें आहे.

३ **कारखाना इमारत**—हा शब्द पंचीकरणाच्या योगानें बनविलेला विराट स्थूलदेह, यास अनुलक्षून लिहिलेला आहे. सूक्ष्मापासून स्थूल होण्याचा जो प्रकार त्यास वेदांतांत पंचीकरण अशी संज्ञा आहे. जीवांनां सुखदुःखभोग व्हावा म्हणून भोग्य म्हणजे विषय व भोगायतन म्हणजे शरिरें हीं परमेश्वरानें पंचीकरणांच्या योगानें उत्पन्न केलीं. तो प्रकार असाः—सूक्ष्म किंवा शुद्ध भूतांपैकीं प्रत्येक भूतांत, इतर चार भूतांचें कांहीं नियमित अंश घालून तयार केलेलें मिश्रण, हें खालीं दिलेल्या कोष्टकानें स्पष्ट समजेल.

(सूक्ष्मभूतें) (स्थूलभूतें)

१/२ आकाश	१/८ वायु	१/८ तेज	१/८ जल	१/८ पृथ्वी	आकाश
१/२ वायु	१/८ आकाश	१/८ तेज	१/८ जल	१/८ पृथ्वी	वायु
१/२ तेज	१/८ आकाश	१/८ वायु	१/८ जल	१/८ पृथ्वी	तेज
१/२ जल	१/८ आकाश	१/८ वायु	१/८ तेज	१/८ पृथ्वी	जल

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.

½ पृथ्वी	⅛ आकाश	⅛ वायु	⅛ तेज	⅛ जल	पृथ्वी

अशा प्रकारच्या पंचीकृत भूतांपासून ब्रह्मांडें, त्यांतील चतुर्दश भुवनें त्या त्या भुवनांतील प्राण्यांनीं खाण्याचीं अन्नें व त्याच्या लोकांस योग्य अशीं शरिरें ईश्वराच्या आज्ञेनें निर्माण झालीं. अशा प्रकारच्या सृष्टयादि उत्पत्तीच्या घडामोडीचें कर्म सतत चालविण्याचा जो एक अवाढव्य कारखाना (विराट स्थूल देह) त्यासच येथें कारखाना इमारत असें म्हटलें आहे. सोहिरोबांनीं अन्य पदांतही म्हटलें आहे कीं [करम कारखाना हमारा । नसीब जामदार खाना.] [अ-सगुणपुर] म्हणजे वर सांगितलेला विराट् पुरुष स्थूल देह (वरील ज्ञानोबाच्या पदांतील शहर] त्याच्या मध्य भागीं म्हणजे हृदयाकाशांत, वर सांगितलेली तीन गुणांची साम्यावस्था (मूल प्रकृति) हीच बुनाद (पाया, इमारतीखालीं आच्छादित असलेला अव्यक्त) आणि सूक्ष्म अथवा लिंगदेह हा तट. प्रत्येक किल्यास तट असतोच; त्या प्रमाणें लिंगदेह [म्हणजे पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें पंच-प्राण, मन आणि बुद्धि मिळून सत्रा द्रव्यांचा एक लिंगदेह होतो] हा तट. मिळून कलम एक हा या किल्याचा एक भाग झाला.

श्री मद्भागवत तृतीय स्कंद अ० ६ श्लो० २ ते ११

कालसंज्ञां तदा देवीं बिभ्रच्छक्तिमुरुक्रमः ।
त्रयोविंशति तत्त्वानां गणं युगपदाविशत् ॥ २ ॥
सोऽनुप्रविष्टो भगवांश्चेष्टारूपेण तं गणम् ।
भिन्नं संयोजयामास सुप्तं कर्म प्रबोधयन् ॥ ३ ॥
प्रबुद्धकर्मा दैवेन त्रयोविंशतिको गणः ।
प्रेरितोऽजनयत्स्वाभिर्मात्राभिरधिपूरुषम् ॥ ४ ॥
परेण विशता स्वस्मिन्मात्रया विश्वसृग्गणः ।
चुक्षोभान्योऽन्यमासाद्य यस्मिँल्लोकाश्चराचराः ॥ ५ ॥

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.

हिरण्मयः स पुरुषः सहस्रपरिवत्सरान् ।
आंडकोश उवासाप्सु सर्वसत्वोपबृंहितः ॥ ६ ॥
स वै विश्वसृजां गर्भो देवकर्मात्मशक्तिमान् ।
विभभाजात्मनात्मानमेकधा दशधा त्रिधा ॥ ७ ॥
एष ह्यशेषसत्त्वानामात्मांशः परमात्मनः ।
आद्योऽवतारो यत्रासौ भूतग्रामो विभाव्यते ॥ ८ ॥
साध्यात्मः साधिदैवश्च साधिभूत इति त्रिधा ।
विराट्प्राणो दशविध एकधा हृदयेन च ॥ ९ ॥
स्मरन्विश्वसृजामीशो विज्ञापितमधोक्षजः ।
विराजमतपत्स्वेन तेजसैषा विवृत्तये ॥ १० ॥
अथ तस्याभितप्तस्य कति चायतनानि ह ।
निरभिद्यंत देवानां तानि मे गदतः शृणु ॥ ११ ॥

भावार्थः—अद्भुत पराक्रम युक्त अशा त्या भगवंतानें त्या वेळीं कालनामक शक्तीचा स्वीकार करून तेवीस तत्त्वांच्या समुदयामध्यें अंतर्यामित्वेंकरून एकदम प्रवेश केला. आणि त्या भगवंतानें पूर्वी लीन असलेल्या क्रियाशक्तीला प्रकट करून तद्द्वारें एकमेकांस सुटून असलेल्या त्या तत्वांच्या समुदायाला एके ठिकाणीं जुळविलें. तेव्हां परमेश्वरानें प्रेरित असल्यामुळें ज्यांची क्रियाशक्ति जागृत झाली आहे, अशा त्या तेवीस तत्वांच्या समुदायानें आपापल्या अंशें-करून विराटदेह उत्पन्न केला. तो असाः—विश्वसृष्टि करणाऱ्या तत्त्वांचा गणच, आपल्या ठिकाणीं प्रविष्ट झालेल्या परमेश्वराच्या योगानें परस्पराशीं संयुक्त होऊन आपल्या कांहीं अंशानें ज्याच्या ठिकाणीं चराचर लोक राहिले आहेत अशा पुरुषरूपानें परिणाम पावला. तो सुवर्णमय विराट् पुरुष, सर्व जीवांसहवर्तमान ब्रह्मांडाच्या मध्यभागीं उदकामध्यें देवमानानें हजार वर्षेपर्यंत राहिला होता. तो विराट् पुरुष, विश्व उत्पन्न करणाऱ्या तत्वांचा गर्भरूप असून ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति आणि भोक्तृत्वशक्ति, यांनीं युक्त होता, त्यानें

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
		आपणच आपल्या ज्ञानशक्तीच्या योगानें एक (हृदय) क्रियाशक्तीच्या योगानें दहा (प्राण) आणि भोक्तृत्व शक्तीच्या योगानें तीन (अध्यात्म, अधिदैव आणि अधिभूत) असे विभाग करून घेतले. कारण हा विराट्रूपी पुरुष, सर्व जीवांचा आत्मा असून परमात्म्याचा नारायण नामक आद्य अवतार होय. ज्याच्या स्वरुपाच्या ठिकाणीं हा चराचर प्राण्यांचा समुदाय सुरक्षितपणें वास करीत आहे. पूर्वीं सांगितलेले विभाग असे कीं तो विराट् पुरुष दहा इंद्रियांसहित मन १ सर्व इंद्रियांच्या देवता २ सर्व इंद्रियांचे शब्दादि विषय ३ या तीन प्रकारचा, १ प्राण, २ अपान, ३ व्यान, ४ उदान, ५ समान, ६ नाग, ७ कूर्म, ८ कृकल, ९ देवदत्त, १० धनंजय या भेदांनीं दहा प्रकारचा आणि हृदयरूपानें एक प्रकारचा आहे. तो अधोक्षज प्रभु विश्वोत्पादक देवांच्या प्रार्थनेचें स्मरण करून त्यांची अनेक प्रकारें वृत्ति चालविण्यासाठीं आपल्या ज्ञानशक्तीनें विराट् पुरुषाचें पुढें असें करीन असें मनांत आणूं लागला. नंतर चिंतन केलेल्या त्या विराट् देहाला देवांस उपयुक्त अशीं कित्येक स्थानें उत्पन्न झालीं [दहा बुरुंज दरवाजे नव] वर दाखल केलेला दुसरा भाग=स्थूल देहाचीं नऊ द्वारें (छिद्रें) हे नव बुरुज आणि दहावें द्वार ब्रह्मरंध्र, तालुस्थान [दहावा चौका सदर] खास कचेरीची जागा मिळून एक कलम भाग २ **सर्वकर्माणि मनसा सन्यस्यास्ते सुखं वशी ।** **नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥** भगवद्गी० अ० ६ सु. चं. टी. ज्याचें चित्त स्वाधीन आहे, तो देही मनाच्या साधनानें सर्व कर्मांचा संन्यास करून या देहरूप नगरामध्यें कांहीं न करतां न करवितां सुखानें वास करितो. [**भ्रुकुटि अग्निचक्र बंगला**] भोवयांच्या स्थानीं ' हक्ष ' या दोन पांकळ्यानीं (नेत्रद्वय) युक्त भृकुटिस्थानचें योगशास्त्रोक्त चक्र; याला योगशास्त्रांत काकीमुख, अग्निकळा इत्यादि नांवें आहेत. हा एक भाग. मिळून तीन झाले

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.

आतां चौथा [अंतःकरण कोठी] हृदय. प्रत्येक किल्यांत अंतर्गत कोठीची जागा असते, तद्वत् येथें अंतःकरण ही कोठी [उ—अंतःकरण कोठी भा० ४] हें एकच अंतःकरण पांच प्रकारांनीं विभागलें जातें तें असें, अहंकार, बुद्धि, चित्त, मन, अंतःकरण.

४ नेमणुका शहर कोट—आतां शहरकोटच्या नेमणुका [इंद्रियांचीं अधिष्ठान दैवतें] पहिल्यानें [ख:—वाक् बुरुंज] म्हणजे दरवाजा (१) मुख. बोलणें, खाणें पिणें इत्यादि व्यापार ज्या द्वारें केले जातात तें (वैखरी वाचेचा उच्चार करणारें) मुख एकच. परंतु अंतर्गत देहाच्या आंत असणारीं तीन स्वरुपें आहेत, ती अंतर्दृष्टि पुरुषांनाच कळतात.

एवं वा अरेऽस्य महतो भूतस्य निश्वसितमेतत् ।
यदृग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वांगिरसः ॥

शत० कां० १४।५ ब्रा० ४ कं. १०॥

याज्ञवल्क्य म्हणतो, हे मैत्रेयी त्या आकाशापेक्षांही मोठ्या परमेश्वरापासून श्वासोच्छ्वासाप्रमाणें सहज ऋग्वेदादि चार वेद उत्पन्न झाले. ज्याप्रमाणें श्वास शरिरांतून पुनः आंत जातो, तद्वत् परमेश्वरापासून सृष्टिच्या आरंभीं हे वेद सहज उत्पन्न होऊन प्रळयकाळीं त्याच्यांत लीन होतात. अग्नि वैश्वानर चार प्रकारें म्हणजे नांवांनीं दर्शविला जातो. “ अग्नि, वायु, आदित्य, अंगिरस, ”


आदिसृष्टिमारभ्याद्यपर्यंतं ब्रह्मादिभिः ।
सर्वाः सत्यविद्याः श्रूयन्तेऽनया सा श्रुतिः ॥

“सृष्टीच्या आरंभापासून आजपर्यंत जिच्या साह्यानें सर्व सत्य विद्या ब्रह्मादिकांनीं ऐकिल्या ती श्रुति (वेद) होय. ” अग्नि, वायु, आदित्य, अंगिरस, हे सुद्धां वेद प्रकट करण्यास कारणीभूत झाले इतकेंच; बाकी वेदांतील शब्दार्थसंबंध परमेश्वर निर्मित आहे यास्तव सोहिरोबांनीं द्व्यर्थी वक्तव्य एक असें म्हटलें आहे.

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
		श्रुतिः—चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः । गुहा त्रीणि निहिता नेंगयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥ अर्थः—शब्द ब्रह्माचीं मोजलेलीं स्वरुपें चार आहेत. अंतर्दृष्टि पुरुषांना तीं चारी स्वरुपें अवगत असतात, इतरांना नसतात. कारण त्यापैकीं तीन रुपें देहाच्या आंत ठेवलेलीं असल्यामुळें आपलें रुप प्रकाशित करीत नाहींत म्हणून वाणीचा चौथा भाग (वैखरी रूप) काय तो मनुष्य बोलतात. तो देखील बोलून मात्र दाखवितात एवढेंच, त्यांना त्याचें तत्त्वज्ञान नसतें.]
		तस्याग्निरास्यं निर्भिन्नं लोकपालोऽविशत्पदम् । वाचा स्वां वशेन वक्तव्यं ययाऽसौ प्रतिपद्यते ॥ श्री० द्रा० तृ० स्कं० अ० श्लो० १२
		भावार्थः—त्या विराट् देहाला प्रथम मुख हें स्थान उत्पन्न झालें. तथें आग्नेयी दिशेचा अधिपति अग्निवाणीरूप शक्तीनें सहवर्तमान प्रविष्ट झाला, ज्या वाणीरूप शक्तीच्या योगानें हा पुरुष शब्दाचें उच्चारण करितो.

सोहिरोबानाथकृत पद्यसंग्रह [illegible] २ याची परिशिष्टे.

जंजीरा किल्ला अथवा कायादुर्ग.



१ जंजीरा ह्मणजे कायादुर्ग, (स्थूलदेह स्वरूप अति बंदोबस्तीचा किल्ला) हें पूर्वी सांगितलेंच आहे. तथापि केवळ अश प्रकारच्या सर्वच किल्यांस पूर्वीच्या मराठशाहीत जंजीरा हें नांव दिलेलें नाहीं; तर ज्या किल्याच्या चाऱ्ही बाजूस समुद्र व मध्यंतरीं किल्ला (उदाहरणार्थ–मालवणचा किल्ला) असतो, तशा किल्यास " जजीरा " ह्मणत असत. याच रहस्यार्थान्वयें, या कायादुर्ग किल्यासभोंवार भवसागर असून मध्यंतरीं हा किल्ला आहे. [आत्मज्ञानं तु वेदाश्च पिंडो भूर्भवसागरः ॥ सिद्धांतसंहिता उ० अ० ११ श्लो० २] मराठेशाहींत किल्यावर कोणत्या प्रकारची व्यवस्था होती याविषयींची सविस्तर माहिती समजल्याशिवाय वरील देहदुर्गाचें रहस्य कळणार नाहीं. याकरितां जिज्ञासूंनीं विविध ज्ञानविस्तार मा. पु ९ व १० यांत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें या सदराखालीं आलेलें, शिवछत्रपति यांचें चरित्र, लक्षपूर्वक वाचून पाहून मग या बखरीचा रहस्यार्थान्वयें विचार करावा. ह्मणजे खरें तत्त्व कळून येईल. बाकी पारमार्थिक रहस्यानें दर्शविलेल्या संख्या वगैरे याबद्दल अन्यत्र खुलासा केला आहे.

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.

[पाणी बुरुंज असामी १६]=त्वंपद पिंड—कार्य=स्थूल देहाच्या उभय हस्तांमध्यें [पाणी बुरुंज २ दोन हस्त. “ क्रीयत्व=कर्म; अकर्म] विश्वेदेव [इंद्र] दोन—व तत्पद ब्रह्मांड कारण=विराटदेह आणि सूक्ष्म अथवा लिंग देहांतील चतुर्दश भुवनें त्यांतील प्रत्येकीं ऐकेक याप्रमाणें व त्याचे व्यक्त नांव “ इंद्र ” असें आहे. [तैजस=इंद्र १४ चवदा] एकूण सोळा. [संमत—श्रीमद्भागवत स्कं० ३ अ० ६ श्लो० २१].

[चरण बुरुंज “ असामी तीन ३ ”] चरण बुरुंज=पाय दोन [जाणें-येणें] असामी तीन असें म्हटलें याचें कारण, भगवान विष्णु हा त्रिपाद होत्साता आपल्या एका अंशामध्यें म्हणजे पादामध्यें सर्व विश्व व्यापून राहिला आहे. [सं० श्री० द्भा० स्कं० ३ अ० ६].

[उपस्थ बुरुंज दरवाजा एक “असामी ६]=उपस्थ बुरुंज=जननें- द्रियस्थान (दरवाजा एक) नामदार (अधिकारी) प्रजापति [शिस्नेंद्रिय] असामी [एकच]. किल्ला मजकूर मन्मथ [असामी पांच] असें म्हटलें आहे याचें कारण “ मन्मथ म्हणजे काम हा पंच- शर [पंचविषय =शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हेच पांच बाण] आहेत. हें प्रसिद्धच आहे.

[पंचशरानें विश्व मोहिलें ठाबुक सकळांला ॥ रामजोशी ताल्या]

[पायुबुरुंज दरवाजा एक १] पायु बुरुंज म्ह० स्थूलदेहाचें गुद- द्वार. दरवाजा एक म्ह० नवद्वारांपैकीं एक; मल विसर्जन करण्याचें द्वार. असामी एक म्ह० [एक व्यक्ति] निर्ऋति नामक “ विश्व- देवता ” [मल विसर्जन करणारा एक वायु]. [सं० श्री० द्भा० अ० ६ श्लो० २०].

याप्रमाणें येथवर कर्मेंद्रियांचें [वाचा, पाणी, पाद, शिश्न, गुद] विवरण केलें. पुढें ज्ञानेंद्रियें [श्रोतृ, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण], यांचें दिग्दर्शन केलेलें आहे. हीं ज्ञानेंद्रियें सूक्ष्म अथवा शुद्ध भूता- पासून बनलेलीं असून तीं त्यांच्या शब्दादि विषयांसह दाखल केल्या- मुळें पुढें “ नेमणुका अंतरकोट ” असें म्हटलें आहे. अंतरकोट

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
		म्ह० सूक्ष्म अथवा लिंगदेह=या कोटांत " प्राणमय, मनोमय आणि विज्ञानमय अशा तीन कोशांचा समावेश होतो.
		[कर्णबुरुंज दरवाजे २ असामी १२] दरवाजे दोन=कर्णेंद्रियांचीं छिद्रें दोन; व दिग्देवता दहा, एकूण [असामी] बारा. [पूर्व दिशा इंद्र; आग्नेयी दिशा, अग्नि; दक्षिण दिशा, यम; नैर्ऋत्य दिशा नैर्ऋति; पश्चिम दिशा, वरूण; वायव्य दिशा, वायु; उत्तर दिशा, कुबेर; इशान्य दिशा, ईश्वर; उर्ध्व दिशा, ब्रह्मदेव; अधो दिशा, अनंत; एकूण दहा दिग्देवता.
		[त्वक् बुरुज 'असामी ६'] त्वक=त्वचा [शरिरास आच्छादून असणारी चामडी] तिच्या योगानें स्पर्शविषयाचें ज्ञान होतें, म्हणून तें स्पर्शेंद्रिय एक, व पांच प्रकारचे वायु [प्राण, व्यान, अपान, उदान, समान;] एकूण साहा.
		[चक्षुबुरुंज दरवाजे दोन, असामी १४] चक्षुबु० द० दोन= दोन नेत्र आणि त्यांना दृष्टि देणारे, द्वादश [१२] आदित्य मिळून चवदा.
		[रसनाबुरुंज असामी (वाडीप्रांतीं एका व्यक्तिस " असामी " असें म्हणण्याचा प्रघात फार आहे) दहा०] असामी दहा असें म्हटलें त्याचें रहस्य असें. [रसिकतव्य=वेगवेगळ्या रसांचे ज्ञान जाणणें] असामी सहा म्हणजे, सहा प्रकारचे रस आणि ज्याच्यामुळें त्या रसांचें ज्ञान होतें त्या रसज्ञ देवता [वरूण देव] चार. मोहिते असें म्हणण्याचें कारण; प्रिय रस पाहिला, किंवा त्याची स्मृति झाली म्हणजे तो सेवन करण्याचा जो मोह उत्पन्न होतो तो त्यांच्याचमुळें होतो. मिळून दहा.
		[घ्राणबुरुंज दरवाजे दोन०] म्हणजे नाकाची दोन छिद्रें आणि अधिष्ठान दैवत्य अश्विनौदेव; मिळून तीन [गंधत्व गंधविषय सेवन करण्याचा व्यापार] या इंद्रियाचा " गंध ग्रहण करणें " हा एक धर्म खरा पण तें सुगंध आणि दुर्गंध असा दोनप्रकारचा निवाडा करतें.
		[कारकून असामी पांच०] असें म्हटलें आहे. ते प्राण, व्यान, अपान, उदान आणि समान हे पांच प्राण होत. [मुजुमदार मनाजी-

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
		पंत, मंतव्य नोबती. (नौबती ? १६) मनास मुजुमदार असें म्हटलें आहे. याचें कारण मन हें सर्व इंद्रियांचा राजा आहे. शिवछत्रपतीच्या राज्यव्यवस्थेंत पांचहजारी (पांच हजार स्वारांवरचा मुख्य) सरदार ज्यास लवाजमा नौबत निशाण हत्तीवगैरे सरंजाम असे त्यास मुजुमदार असें ह्मणत. याच रहस्यानें येथें मनास मुजुमदार ह्मटलें. मन हें दहा इंद्रियांचा राजा आहे; हें हृदयकमलांत वास करतें यासच अंतःकरण ह्मणतात. कारण इंद्रियांच्या साह्यावांचून बाह्यविषयांवर याला स्वतंत्रपणें जातां येत नाहीं. इंद्रियें विषयांवर गेलीं असतां हें मन गुणदोषांचा विचार करितें. सत्व रज तम असे मनाचे तीन गुण आहेत त्याच्या योगानें हें वारंवार विकार पावतें.
		मंतव्य असें ह्मटलें आहे त्याचा अर्थ मनन करण्याजोगा जो अर्थ विषय तो. जेथें मन अध्यात्म असतें तेव्हां, मंतव्य हें अधिभूत होतें; व चंद्रमा हें अधिदैवत होतें. [मन अध्यात्मनिश्चित । मंतव्य अधिभूत । चंद्रमा अधिदैवत जाणावें पै ॥ ९१ ॥ विवेक सिंधु, पू. प्र. ५]
		[नौबती १६ असें ह्मटलें] नौबत (नगारा इत्यादि वाद्य विशेषें निशाण हत्ती वगैरे लवाजिमा ज्या सदरापाशीं सतत असावयाचा; असे सोळा सरदार (नौबती) त्यावरचा मुख्य ह्मणजे पूर्वोक्त मनाजीपंत मुजुमदार. ही सोळा संख्या ह्मणजे मन हा चंद्रमा होय असें वर सांगितलेंच आहे. त्या अर्थीं त्या चंद्राच्या कळा सोळा हे सर्व विश्रुतच आहे. दुसरें योगशास्त्रोक्त कंठस्थानचें चक्र याला मनश्चक्र (विशुद्धचक्र असें ह्मटलें आहे. हें जीव व ईश्वर यांच्या उपलब्धीचें विशेष स्थान आहे. [सिद्धांतसंहिता उत्तरार्धा सोबतची चक्रकारिका पहा.) याच्या पांकोळ्या सोळाच आहेत. योग्याचा प्राणवायु जेव्हां अपान, नाद, व बिंदु यांच्या सुद्धां मध्यचक्रांत (कंठस्थानीं येतो तेव्हां कंठामध्यें असणाऱ्या विष्णुग्रंथीचा भेद होऊन कंठाकाशांतील प्रत्येक पाकोळीकेंत अनेक नादांनीं मिश्रित झालेला असा भेरी नगाऱ्या प्रमाणें शरिरांत शब्द ऐकूं येऊं लागतो. यासाठीं सोळा नौबतीवरचा मुजुमदार असें ह्मटलें आहे.

पद्य	पृष्ठ	पद्यांचा अर्थ.
		[कारखाननीस बुद्धिपंत, बोधव्य नोबती १२] बुद्धिपंत ह्मणजे बुद्धिच्या ठायीं राहून, बुद्धीला अदृश्य, बुद्धि हेंच त्याचें शरीर, असें असून जो बुद्धीचें नियमन करितो असा श्रुतीचा डांगोरा आहे. व विज्ञानमयादि कोशांमध्यें आणि पृथ्व्यादिक जड पदार्थांमध्यें आंत राहून नियमन करितो ह्मणून त्याला अंतर्यामी असें ह्मणतात असा जो पुरुष तो (बुद्धिपंत) होय. याला कारखाननीस असें ह्मणण्याचें कारण हा सर्व प्रकारचें विज्ञान (कलाकौशल्य) उत्पन्न कर्ता आहे. बोधव्य=बुद्धीनें जाणण्यास योग्य. बुद्धीनें जाणावयाचें तें. नौबती बारा असें म्हटलें आहे. त्याचें कारण योगशास्त्रामध्यें हृदय स्थानच अनाहत चक्र सांगितलें आहे हे नादोत्पत्तीचें स्थान आहे—याच्या पांकोळिका बाराच आहेत (सिद्धांतसंहिता उत्तरार्धासोबत चक्रकारिका आहे ती पहा.) दुसरें हे हृदयाकाश द्वादश आदित्यात्मक असल्यामुळें व योग्यास येथेंही नादानुभव असल्यामुळें नौबती बारा असें ह्मटलें आहे.

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ-अधिक टीपा-पद्य १ लें.
८	३	‘ मूळतत्त्वी ’ असें आहे तेथें ‘ मुक्तत्वी ’ असा अन्य पाठ आहे. मुक्तत्वीं=जीवन्मुक्त स्थिति प्राप्त करून घेण्याविषयीं. मूळतत्त्वीं=अहंब्रह्मास्मि स्फूर्तिरूप तत्त्वांत.
८	४	अनाहत नौबत=हृदयस्थानीं (कारण देहांत) होणारे नाद हीच नौबत (पक्षीं भेरी इत्यादि वाद्य विशेष) इशारा.
”	”	सद्बुद्धि दिवटिया=सद्बुद्धीचा प्रकाशक, शिवस्वरूप कूटस्थ मुजरेस=सलामीस, भेट घेण्यास (दर्शन घेण्यास) अर्थात् (समाधींत) नित्य भेट घेणें [धैर्य भालदार यानें; ‘ या शब्दापुढें ’ “ जाऊन ” असें पाहिजे.]
”	५	ताकीद=हुकूम (तावडतोबी). निवृत्तिपंथें=पवित्र सुषुम्ना मार्गानें. दशवें द्वार=दहावें द्वार ब्रह्मरंध्र-त्या ठिकाणीं.
”	६	सदरेस=मुख्य अधिपति राहण्याच्या जागेस सदर असें ह्मणत असत. पक्षीं स्वयंप्रकाश जगत्कर्ता पुरुषाच्या वास्तव्य स्थानीं.
”	७	सद्बुद्धि दिवटी=दिवटी ह्मणजे मशाल (पोत). पूर्वीं मराठेशाहींत रात्रीच्या प्रसंगीं मोहीम करावयाची किंवा घस्त काढावयाच्या प्रसंगीं प्रकाशासाठीं ह्या दिवटीचा उपयोग करीत असत. ही दिवटी कपड्यांची वळलेली असून तेलानें वारंवार भिजवून पेटवीत असतात. लग्नकार्याच्या प्रसंगीं व देवस्थानांकडे उत्साह प्रसंगीं अद्याप ह्या दिवटीचा उपयोग, कोंकणांत व गांवेंप्रांतीं करीत असतात. दिवटी पेटविणाऱ्या मनुष्यापाशीं एक पितळीचें भांडें असतें त्यास ‘ बुधली ’ असें ह्मणतात.
८	८	अनंग हा शब्द अनघ असावा असें वाटतें. अनघ=निष्पाप नौबत (प्रणव नादरूप नौबत). या नादापासून अविद्यासंबंधीं रजतमादिदोषांचा नाश होऊन देहांत सतत शुद्ध सात्विक भाव वृद्धिंगत होतो, व चित्त स्वरूपाकार होऊन राहतें. अनंग, असें धरून चाललें तर शरीरधर्म रहीत ह्मणजे ‘ स्थूल व सूक्ष्म या दोन देहांविरहित करणारी ’ प्रणवनादरूप नौबत असा अर्थ घेतला पाहिजे.

पृष्ट	पंक्ति	पद्यांचा अर्थ–अधिक टीपा–पद्य १ लें.
८	१०	अवेद्य=वेदप्रतिपाद्य तें वेद्य आणि तद्व्यतिरिक्त तें अवेद्य (नास्तिकमत) भगवद्गीता अध्याय १६ श्लो० ७।८ अवश्य पहा.
,,	११	अफाट=अनिवार (स्वैरिणी, छिनाल, बदमाष, भ्रष्ट) भ. गी. अ. १६ श्लो. ९ पहा.
,,	,,	संकल्प विकल्प=हे मनाचे धर्म होत. हे वास्तविक नपूंसक ह्मणजे पंढ होत; कारण इंद्रियाच्या साह्यावांचून यांना स्वतंत्रपणें कार्य करितां येत नाहीं. हे विकार विक्षेपरूप क्रियाशक्तीपासून उद्भवणारे असून (राजसत्तेच्या सन्नीध राहणारे) राणीवशांतले सेवक ह्मणून आवरण्यास कठीण जातात. (प्राचीन काळीं, विशेषेंकरून मुसलमानी रियासती मध्यें, 'राणिवशांत (जनानखान्यांत) क्लीब (नपूंसक पंढ पुरुष) सेवकांचा सक्त पहारा ठेवण्याची वहिवाट होती. अर्थात् ते सेवक राजपत्नीच्याठायीं, विषय सेवन करण्याच्यासंबंधानें, राजास मित्र होत होते; आणि अन्य पुरुषास ते शत्रूप्रमाणें होत होते. अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकिर्दींत नूर काफूर ह्या नावांचा एक पंढ पुढें मोठा सरदार बनला ही गोष्ट सर्व विश्रुतच आहे. त्याप्रमाणें चिदात्मा (राजा हिरण्यगर्भ) पुरुष त्याची प्रकृति (परा) तिच्या साहचर्यानें असणारे जे विषय ते पुरुष राजास मात्र मित्र आहेत व इतरांस शत्रू आहेत. परंतु हल्लीं त्यांस मनाजीपंत मुजुमदार यानें दृश्य लांच देऊन वश करून घेतले आहेत. असें तात्पर्य.
८	१४	पारखिया=पारख्या=फितूर, कावऱ्याबावऱ्या (वहिर्मी मनुष्य चंचळ ह्मणजे पारख्या दृष्टीनें पाहत असतो.)
,,	१६	सुलाख=युक्तीनें चोरवाट (बोगदा) करून किल्यांत प्रवेश करणें.
,,	,,	कारणसंधीस=जेव्हां बुद्धि रज तम दोषांनीं बद्ध होते, तेव्हां हृदयामध्यें चित् आणि जड यांचा ग्रंथी जो अहंभाव तो उत्पन्न होत असतो (भ. गी. अ. १८ श्लो. ३१।३२ पहा.) हा असा अहंभाव उत्पन्न झाला आहे असें पाहून. दस्त केला=सर केला, काबीज केला (आपल्या ताब्यांत घेतला.)

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ–अधिक टीपा–पद्य १ लें.
८	१७	मोह मोकळदार=कित्येक प्रसंगीं किल्याचीं कित्येक द्वारें दिवसास मोकळीं ठेवावीं लागत असत. त्यावेळीं तेथें सक्त पाहारा करीत असणारा जो पाहरेकरी त्यास "मोकळदार" असें ह्मणत असत. पक्षीं.–जाग्रतीमध्यें (द्वार=नेत्रेंद्रियद्वार) नेत्रेंद्रियद्वारामध्यें राहून विश्वांतील नामरूपात्मक वस्तु नेत्रांनीं पाहून त्यांविषयीं मोह उत्पन्न करणारा पाहारेकरी महामोह.
"	१८	कोऽहं आरोळी=प्राणी गर्भवास दुःखांतून बाहेर पडल्याबरोबर कोऽहं कोऽहं असा आक्रोष करूं लागतो. मोह दूर झाला नाहीं तोंवर प्रतिजन्मीं कोऽहं करीत राहिलेंच पाहिजे. (वरील दों मासीं अति शोच्यता । तंव गर्भासि उठली प्रसतव्यथा । मग तो पावे मूर्च्छावस्था । बाहेर पडे ॥ २२ ॥ व्यथेचेनि अतिभरें । जातिस्मरणत्व विसरे । कोऽहं कोऽहं दीर्घ स्वरें । रोदन करी ॥ २३ ॥ विवेकसिंधु, मुकुंदराज.)
"	१९	कुबुद्धि चूड=सद्बुद्धि दिवटीबद्दल पूर्वीं सांगितलेंच आहे; परंतु ही दिवटी वापरण्याचें सामर्थ्य सर्वांसच असतें असें नाहीं, कारण ह्या दिवटीस कपड्यांचा वळींव पोत, विपूल तेल, दिवटी धारण करणारा सेवक (मशालजी) तेल वापरण्यासाठीं बुधली नांवाचें पितळेचें भांडें, इत्यादि लवाजमा बाळगण्याचें सामर्थ्य असावें, तेव्हांच ही वापरतां येईल. पण हल्लींचे बंडखोर म्लेंच्छ यांनीं हें ऐश्वर्य वापरायाला कोठून आणावें? ह्मणून उजेडाकरितां त्यांना ही (कुबुद्धि) चूडच पाजळली पाहिजे. ह्या चुडी कोंकणांत वापरतात; कारण ह्यांवर गोरगरीब सर्व लोकांचा निर्वाह होत असतो. ह्या बहुतेक माडाच्या झाडाच्या चुडतांच्या, पोयांच्या, किंवा पिसुंद्र्यांच्या उंसाच्या चोयांच्या किंवा कित्येक झाडांच्या सालपटांच्याही बनवितात.
८	२०	लोकांस=स्थूल देहाचीं इंद्रियें. हेच लोक होत.
"	"	ताकीद=जरब किंवा फिसरत (कोणचेंही कृत्य करण्याविषयीं हुकूम करून तसें करण्याविषयीं भाग पाडणें).

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ—अधिक टीपा—पद्य १ लें.
,,	,,	विषयीं प्रवर्तवितो=शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या विषयांचें सेवन करण्याविषयीं प्रवृत्त करवितो.
८	२१	नित्य स्वारी करितात=रोज रोज, रतियुद्धार्थ प्रवृत्त होतात असा भाव. (शब्दस्पर्शादि पांचही विषय एकट्या स्त्रीच्या ठायीं वास करितात. अशी जी ती (कोणा वश करी ना स्त्री नरा! रक्तांत लोचना.) अशा स्त्रियांच्या नेत्रकटाक्षपातानें विव्हळ करून (हा कामीदखान) नित्यरतियुद्धास प्रवर्तवितो.)
९	३	इंद्रोजीना. जमे. कुक्रि. सं. होऊन=असें ह्मणण्याचें रहस्य हेंच कीं; इंद्र हा मोठा विषयलंपट पुरुष ह्मणून याची प्रसिद्धी आहे हा पाणी ह्मणजे हस्त (हात) ह्या चौकीवरचा जमेदार (या टीपालेखांतील मागें पृष्ठ ११ वरील चित्र पहा) त्याअर्थीं हातांनीं होणारीं अनेक कृत्यें आहेत पण तेथें स्त्रीविषय ग्रहणाच्यासंबंधानें कटाक्ष आहे असें दिसतें. ह्मणून हा (हस्तेंद्र) इंद्रोजी नाईक रतिसंगविषयकआपला उद्योग करीत आहे. याच कारणामुळें येथें ‘कुक्रियत्वीं संदाट’ असें
,,	,,	ह्मटलें आहे.
,,	५	उपस्थ चौकीतर प्रजापत०=प्रजापति (शिश्नेंद्रिय) तेथील आधिष्ठान दैवत प्रजापति हा पुरुष काममय आहे (बृ. उ. अ. ४ ब्रा. ४ मं. ५।६ पहा) ह्मणून वास्तविक हा म्लेंच्छ असून “प्रजापतसिंग” नामक हिंदूचें रूप घेऊन आपण म्लेंच्छ आहे हें न जाणवितां (एकीं=एकाच उपस्थेंद्रियानें युक्त अशा) वेगवेगळ्या नामरूपानें युक्त विविध स्त्रिया भोगून मग्न झाला आहे. असा भाव.
,,	११	विषय अडिश्री नागे०=पंचविषय हे नागे=नाचणे (नागली). हें राळ्याप्रमाणें असणारें धान्य वाडीप्रांतीं राजे लोकांचे खासगी नोकर (हुजरे) इत्यादि लोकांस भोजनआहाराप्रीत्यर्थ हुजूर धान्य कोठींतून रोजच्यारोज नांवनिशीवार देण्याची पूर्वी वहिवाट होती; त्यास अडिश्री असें ह्मणत. अद्याप हा शब्द तेथ प्रचारांत आहे. हबसाण इत्यादि कित्येक संस्थानांत हल्लींपर्यंत अशीच व्यवस्था होती असें समजतें. नागे हें धान्य वाडीप्रांतीं विशेष उत्पन्न होत

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ–अधिक टीपा–पद्य १ लें.
		असतें. जें धान्य शेतांत पिकेल तेंच सरकारफाळ्याकरितां सरकारांत घेण्याची रीत पूर्वीं वाडीप्रांतीं आणि मराठे शाहींत इतरत्रही चालू होती. अडिश्री वांटून घालण्याचें काम सबनीस ह्या मुख्य कारभाऱ्यानें पाहावयाचें; तेव्हां तें धान्य . हा अधिकारी चोरून हामदपटशा करून खात असे; असें उदाहरणार्थ रूपक कल्पून तत्वार्थाशीं मेळ घातला आहे. व्यानवायूला सबनीस ह्मणण्याचें कारण (व्यानः सर्व शरीरगः) हें होय. नागे ह्मणण्याचेंही तत्वरहस्य वेगळें आहे. पण विस्तारभयास्तव येथें घेतलें नाहीं. तें चाणाक्ष वाचकांवर सोंपवितो.
९	११	अहंकारपंत चौकनीस०="अहंकारपंत चौकसनीस" असा अन्यपाठ आहे. मराठेशाहींत राजदरबारांत अवश्य असणारे नोकर भालदार चोपदार शिपाई प्यादे इत्यादि यांचेवर देखरेख ठेऊन, त्यांचा पगार देण्याचें वगैरे काम चौकसनिसाकडे असे. असावयाचे तेवढे सर्व लोक कामावर आले नसले तरी सुद्धां दिवस खाडे न करितां त्यांची हजिरी लावून, त्यांच्या पगाराची रकम भरपूर खर्ची घालून किफायत उरलेली (राज असें पडलें आहे तेथें "रोज" असें पाहिजे. व रोज याचे पूर्वी "शिल्लक" असा शब्द पाहिजे.) शिल्लक रोज गुदस्त सेवितो. (हिशोबाच्या रोजकीर्दीस, पूर्वदिवसास खर्च वजा होऊन जी शिल्लक उरते, ती 'शिल्लक रोज गुदस्त' असें ह्मणून दुसऱ्या दिवशीं उतरीत असतात. (पक्षीं 'रोज गुदेंद्रिय सेवन करितो) लोक उणे अ०=ह्मणजे मनाजीपंत मुजुमदाराच्या ताब्यांत किल्ला आल्यापासून घस्तदार विवेक, सद्बुद्धि दिवटा, भालदार निजधैर्य, चोपदार वैराग्य इत्यादि कित्येक स्वराजनिष्ठ लोक कामावर हजर होत नव्हते तरी त्यांची भर हजिरी मांडून 'रोज गुदस्त सेवितो. तात्विक रहस्य वेगळें आहे' पण विस्तारभयास्तव देतां येत नाहीं.
९	१४	सेवक०=जिवाजीपंत (जीव) हा स्वामीचा (सच्चिदानंद चैतन्य आत्म्याचा) पुरातन एक निष्ठ सेवक असें असतां त्या मनाजीपंत मुजुमदारास हा उमज पडत नाहीं असा भाव.

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ–अधिक टीपा–पद्य १ लें.
९	१५	आण स्वामिसमर्थ०=मज जीवाचे स्वामि तुह्मी समर्थ आहां असे प्रत्यक्ष दाखले असतां, हा मनाजीपंत मुजुमदार मजकडून (सादर) मला स्वत:चा सेवक समजून उलट मजकडून आपला बहुमान करून घेत होत्साता (सेवितो) गुलामा प्रमाणें सेवा करून घेतो.
,,	१६	परंतु सेवकाची वस्तु अ०××०=वास्तविक हा मनाजीपंत मुजुमदार ह्मटला ह्मणजे सेवकाची वस्तु सेवकाची जात असें असून यानें माझ्या हांके बरोबर " हां जी साहेब " असें ह्मणावयाचें; परंतु आतां अहंभावामुळें त्याच्यानें तसें ह्मणवत नाहीं, ह्मणजे तो उलट आपल्यासच मुख्य यजमान समजतो. वाडीप्रांतीं व बहुतेक सर्व मराठेशाहींत धन्यानें हांक मारली, किंवा कांहीं आज्ञा केली असतां सेवकानें " हांजी साहेब किंवा हां जी महाराज " असें ह्मणण्याचा प्रघात आहे. हठयोग दम=शब्दादि विषयांपासून श्रोत्रादि इंद्रियें आवरणें. राजयोग शम=मन दुष्ट वासनेपासून फिरविणें.
,,	,,	पायुबुरुंज=योगशास्त्रोक्त मूलबंध (यासंबंधानें सिद्धांत सं० उ० पृ० २० सोबतची चक्र कारिका पहा.)
९	२०	मणिपूर=योगशास्त्रोक्त दशदल (नाभिस्थान) तेथून पटाला=पाठलाग, मारा करून.
९	२१	दस्त करोन=पाडाव करून, जर्जर करून, हतवीर्य करून दशदळचर= प्रत्येक किल्यांत परकी शत्रूच्या लोकांचा प्रवेश होऊं नये ह्मणून किल्याच्या अगदीं बाहेरच्या तटाच्या आंत खोल खंदक पाडलेला असतो त्यास चर ह्मणतात. दशदल (मणिपूरचक्र) हाच चर तो टांकून द्वादशदळ=योगशास्त्रोक्त (हृदयस्थानचें) अनुहातचक्र निरोधाचे=शत्रूचा कोंडमारा करण्यासाठीं कुमकेस येणारे रजपूत पक्षीं प्राण, अपान व्यान उदान आणि समान हे वायु सामानासह येतील (दारुगोळा इत्यादि युद्ध सामुग्रीचें सामान) यासंबंधानें सोहिरोबांचें " परबत-पर किल्ला तुम उपर करो हल्ला " हें पद पहावें.
,,	२३	कुडलिनी दारूबर्ले=शरिरांत कुंडलीनी नांवाची औट (साडेतीन) वेढे घालून असलेली शक्ति (सि० सं० उ० पृ० २० सोबतच्या चक्र-

पृष्ठ	पद्य	पद्यांचा अर्थ, अर्थाक टीपा. पद्य १ लें.
		कारिकेंतील मूलाधार चक्र पहा.) हृत्पुरीं=हृदयस्थानीं (पुर्यष्टकीं) अथवा मनश्चक्रामध्यें.
९	२४	जालंधरो बर्लांस=योगशास्त्रोक्त विशुद्ध चक्र (षोडशदल) व अनुहात चक्र (द्वादशदल) यांच्या दरम्यान असणारा बंध त्याठिकाणीं असणारें (बाराच्या दारूचें पिंप) त्यांस [तत्वरहस्य वेगळें आहे तें जिज्ञासूंनीं शोधून काढावें. सुषुम्नाकपाट=ललाटोर्ध्व भाग, ब्रह्मद्वार चक्र (१३) मैत्रायण ब्रा० उ० प्र० ६ मं० ३० मध्यें सांगितलें आहे कीं "हृदयाच्या ठायीं जो (आत्मा) दीपवत् स्थित आहे त्याचे अनंत किरण (नाड्या) आहेत. त्यापैकीं एक (सुषुम्ना) सूर्यमंडल भेदून वरती गेलेली आहे. तिच्यावाटे ब्रह्मलोकाचें अतिक्रमण करून (योगी) परम लोकाला जातात. [शतं चैका च हृदयस्य नाड्य स्तासां मूर्धानमभिनिःसृतैका । तयोर्ध्वमायन्नमृतत्त्वमेति विष्वङ्ङ० न्या उत्क्रमणे भवन्ति ॥ १६ ॥ कठोपनि अ० व० ६ भावार्थः— हृदयापासून निघालेल्या एकशेंएक नाड्या आहेत. त्यांपैकीं एक (सुषुम्ना) मस्तकाच्या वरच्या भागीं गेली आहे. तिच्या योगानें उत्क्रमणसमयीं ऊर्ध्व गमन केल्यानें अमरत्व प्राप्त होतें.]
१०	१	विशुद्ध चक्र=योगशास्त्रोक्त षोडशदल×बाले किल्ला=बलवान चक्र (१० वें पातञ्ज० योग शास्त्राचा अभिप्राय या पुस्तकांतील चित्र ४ थें पहा). प्रत्येक किल्याच्या दर्शनीय भागीं (पुण्याच्या पर्वतीवरच्या ऊंच टेंकाडाप्रमाणें) एक स्वतंत्र उंच असा भाग असतो, त्यास बालेकिल्ला किंवा बाजी किल्ला असें ह्मणत असत. याचेवर किल्ला सर केल्यानंतर आपलें निशाण लावीत असत. रेडी येथील किल्यावरही असा स्वतंत्र उंच भाग होता त्यासही बाले किल्ला ह्मणत. तो हल्लीं इंग्रज सरकारनें पाडला.
”	”	वोढियानमोर्चा=वोडियानबंध. योगशास्त्रांत तीन बंध आहेत. १ मूलबंध २ उड्डियान अथवा ओढियान बंध ३ जालंधरबंध यापैकीं वोढियान बंध हा दुसरा होय. सि० सं० उ० पृ० २० सोबतची चक्रकारिका पहा. (मोर्चा ह्मणजे किल्ला सर करून फत्ते झाल्यावर

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ–अधिक टीपा–पद्य १ लें.
		लावलेलें निशाण हें निशाण पाहून आपल्या सर्व लोकांनीं किल्यांत निर्धास्तपणें यावें असा त्यांस इशारा असे.
१०	२।३	सदर दशवा चौका=किल्यांत मुख्य किल्लेदार राहण्याची जागा असे, त्याच्या दर्शनीय बाजूनें असलेला चौक (चौपाटी), रेडी किल्यांत असा चौक होता व खुद्द सावंतवाडीस राजवाड्यांत असे चौक आहेत. (खुद्द वांदें येथाल कोटांत पूर्वीं असा चौक होता.) त्यांस कोट किंवा सदर असें ह्मणत. दशवा चौका=दहावा चौक दहावें बलवान चक्र (आज्ञाचक्र) त्याच्या भृकुटि बंगलेवर=भृकुटी स्थानच (मूर्ध्नी) हें क्षं चक्र.
"	३	ककार खिडकी=याला काकीमुख असेंही ह्मणतात (ब्रह्मद्वार, अथवा सुषुम्नाकपाट) छांदोग्य उ० अ० ८ खं० ६ पहा. ककारखिडकी अथवा काकीमुख हें योग्यांनीं दिलेलें सांकेतिक नाम आहे. (सि० सं० उ० पृ० २० सोबतची चक्रकारिका पहा.)
"	४	सुमन शामवर्ण आरोळी=किल्ला सर होऊन फत्ते झाल्यावर सर्व लढवय्ये एकत्र मिळतात, तेव्हां आनंदातिशयें करून निर्भर होऊन "हर हर महादेव की जय " ह्मणून आरोळ्या देत असत. पक्षीं सुमन ह्मणजे (द्वादशदलयुक्त पुष्प) सन्मनयुक्त आरोळ्या देतील हा भाव. (अनुहात चक्रांत होणारे नाद ह्याच आरोळ्या होत.) अनाहत चक्राचें
१०	४	हृदयस्थान असून देवता श्रीशिव शामवर्ण आहे. (सि. सं. उ. पृ. २० चक्रकारिका पहा.)
"	"	चिन्मय खास बारदार=खास हुजरातींचे (राजमान्य) सरदार, पक्षीं पूर्वीं पृ. १५ कलम ४ येथें सांगितलेले (१ बाजे लोक=चार वेद. २ घस्तदार विवेक ३ दिवटा सदबुद्धि ४ भालदार निजधैर्य. ५ चोपदार वैराग्य हे) चिन्मय ह्मणजे स्वतः अद्वैत चैतन्यमयच असलेले.
"	"	गलीम=बंडखोर म्लेंच्छ (असूर) शत्रू. तन्मय=शरण होऊन लीन होणें. हीच ढाल ती स्वीकारतील, कारण पुनः बंडखोरांचा वार लागूं नये हा भाव.
१०	६	सोहं फत्तेचे आ०=फत्ते (जय) झाल्यावर तोफांचे आवाज करण्याची रीत होती. त्याप्रमाणें सोऽहं (मी ईश्वर आहें) स्वरूप

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ–अधीक टीपा–पद्य १ लें.
		प्राप्ति (फत्ते) होऊन योग विजयी झाल्यावर (अ; ऊ, म यांपासून होणारे) मेघादि नाद करतील हा भाव.
१०	८	अवगली होती=कोणी विवाहित स्त्री, विषयलंपटतेमुळें कामवश होऊन आपल्या नवऱ्यास सोडून, एकाद्या परधर्मी (म्लेंच्छादिकांशीं) पुरुषाशीं राजरोसपणानें, शरीरसंबंध ठेवण्यास उद्युक्त झालेली असली व जनांची पर्वा बाळगीनाशी झाली ह्मणजे त्या स्त्रीला " अवगली " (बहकली, अनिवार झाली) असें वाडीप्रांतीं ह्मणतात. येथें अवगली होती ह्मणजे बुद्धि सकाम चंचल होऊन स्वैरिणी झाली होती.
,,	९	गिंवसणें=पकडणें, आच्छादन करणें (फटफजिती करणें). पूर्वी अशा स्त्रीचें नाक कापून शिक्षा करण्याची चाल होती.
,,	१०	विभांडून=पराभव करून, फोडून, पृथक् करून.
,,	११	त्रिकुटीं तीन वाटा०=योगशास्त्रोक्त बलवानचक्र (ब्रह्मांडस्थूल-देहास "त्रिकुट" संज्ञा आहे) तीन वाटा=इडा, पिंगला, सुषुम्ना. अशा तीन वाटा.
,,	१२	मुत्सदत्व=मुख्य कारभारीपणा, अधिकार,
,,	,,	श्रीहाट=हें ज्ञानशक्तीचें राहण्याचें स्थान आहे. या स्थानास अध्यात्मिक तीर्थ असेंही ह्मणतात. व या तीर्थावर योगी देवतांचा साक्षात्कार होण्यासाठीं मज्जन करण्यास प्रवृत्त होतात.
१०	१३	घटक्रिया=कोणेक पुरुषाची विवाहित पत्नि बदमाष निघाल्यामुळें तिला टाकावयाची असते, तेव्हां हिंदुधर्मशास्त्ररित्या, तिच्याशीं केलेला पाणिग्रहणविधि तोडून टाकण्याकरितां, तिचा पति जो संस्कार करितो त्यास घटक्रिया असें ह्मणतात. तो प्रकार असा:–बायकोच्या नांवाचें एक पिठाचें बाहुलें (घट, स्थूलदेह) बनवून त्यास चितेवर ठेऊन प्रेतविधिप्रमाणें सर्व संस्कार करितात, व अशौच्यही धरितात.
,,	,,	गोल्हाटीं=ब्रह्मांडकारणदेह. या गोल्हाटस्थानींच प्रायःश्चित होम करावयाचा. कारण होमास अग्नि पाहिजे, तो ज्ञानाग्नी तेथें प्रज्वलीत

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ--अधीक टीपा--पत्र १ लें.
		असतो. त्याअर्थी येथें होम करून सर्व कर्मे दग्ध करून टाकणें योग्य होय.
१०	१४	वेदांतद्विजाचे साक्षीनें०=येथें वेदांतद्विजाचे साक्षीनेंच कर्म करणें उचित होय. कर्मठ द्विजाचें कर्म, देह वाणी आणि बुद्धि यांत कायतें आहे, पण ज्ञानस्वरूप साक्षीकडे त्या कर्माचा कांहीं संबंध नाहीं. त्या साक्षीच्या ठिकाणीं वेदांचाही अंत होतो, ह्मणजे वेद "नेति नेति" ह्मणून मौन होतो. अर्थात् तो वेदांतद्विजच येथें उचित होय. (बृहदा० उ० अ० ३ ब्रा० ९ मं० २६ पहा.)
,,	१५	उपनिषत्भाग उच्चारोन०=ज्याअर्थी वेदांतद्विजाचे साक्षीनें हा होमविधी व्हावयाचा आहे, त्याअर्थी उपनिषत्भाग उच्चारूनच हा विधि व्हावयाचा. (उपनीयेममात्मानं ब्रह्मापास्तद्वयं पुनः । निहन्त्य विद्यांतज्जंच तस्मादुपनिषन्मता ॥ १ ॥ भावार्थः--ह्या जिवात्म्याला, जेथें द्वैत नाहीं अशा ब्रह्मरूपीं नेते आणि त्याच्या विद्येचा व तज्जन्य संसाराचा अत्यंत उच्छेद करिते, ह्मणून ब्रह्मविद्येला उपनिषत् असें ह्मणतात.)
,,	,,	पंचगव्य सत्रावीचें०=प्रायश्चितविधीस गोमुत्रप्राशन करणें जरूर आहे. त्या गोमुत्रास पंचगव्य असें ह्मणतात. येथें त्रिपदा गायत्री (त्रिपदा वेदमाताच प्रणवो पितरस्तथा) ह्मणजे वेदमाता (सत्रावी, अमृतसंजीवनी) इचें पंचगव्य घ्यावयाचें.
१०	१९	भाकता असें आहे, तें चुकीचें आहे; तेथें "भावना" असें पाहिजे.
११	३	शेखीं=शेवटीं, निदानीं, कारणाच्या ठायीं.
,,	४	नामजाद=सकल सत्ताधीश प्रकृति, महामाया.
,,	५	बुजली=समजली, ज्ञाती झाली.
		या पद्यांतील सारांश हाच कीं पंचभूतोत्पादित दृश्य जड साकार विकारी असे देहघट सगुणमायेनें तयार केल्यावर त्यांत अदृश्य लिंग-देह (तदंगभूत तत्त्वांसहीत) स्थापन करण्याचें कर्म निर्गुण मायेनें

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ–अधीक टीपा–पद्य १ लें.
११	५	केलें. या बिंबद्वारें प्रवेश करणें व जीवात्मा स्थित करणें इतकें ईश्वराचें कर्तव्य आहे; असा माया व ईश्वराचा संयोग होऊन देहीं जीव तयार होतो. जीवास राहाण्यास स्थान पाहिजे ह्मणून, शरीर, व शरिराची क्रिया चालविणारा कोणि तरी पाहिजे ह्मणून जीव, असा उभयतांचा संयोग आहे. संयोग आहे त्या अर्थी वियोगही होतो; व झालाच पाहिजे. वियोग हेंच मरण आहे. वियोगरूपी मरणाचें प्रस्थान उत्पत्ति कालींच ठेवलेलें आहे. उत्पत्ति आणि लयाच्या मधला काल कायतो स्थितीचा, व तेवढाच कायतो जीवाला सुखदुःश भोगण्याचा वेळ आहे. स्थितिकालांत देहाचें सोंग जगत् नाटकांत नाचवून देहप्रेत टाकून जीव चालता होतो. असें ईश्वरी नाटक कल्परंभापासून कल्पक्षयापर्यंत चालवयाचें आहे. ब्रह्माधिष्ठानावर पंचभूतात्मक मायावैचित्र्यें इंद्रधनुवत् देहादि आकारी घट वगैरे उमटतात, व कांहं काल राहून नष्ट होतात. जीव, जगत् ईश्वर, यांचा परब्रह्माशीं संपर्क नाहीं. दृश्यांत अदृश्य, मूर्तांत अमूर्त अशा संयोगानें सगुणांत निर्गुण आहे, इतकं जाणलें तर पुरें आहे. रेतबिंदूचा पुरुष होतो; हें मायावी जगत् गारूड आहे त्याला भूलूं नये; हेंच मायेचें निरसन करणें आहे. माया हीच द्वैतकारक आहे. तिचें निरसन झालें ह्मणजे अद्वैत परब्रह्माचा बोध होतो. परमेश्वरानें मायासमवेत ईश्वरालों सृष्टिकर्तृत्वास पुढें केलें, व आपण अत्यंत गुप्त व अलिप्त राहिला. ईश्वरानें ब्रह्मदेव, विष्णु आणि महेश ह्या त्रिवर्गांना पुढें नामधारी करून, आपण गुप्त व अलिप्तच राहिला. प्रकृतिमायेनें तिघांच्या तीन स्त्रियांचीं रूपें धारण करूण आपलें गुप्तत्व कायमच राखिलें. त्रिवर्ग देवांनींही, सृष्टिक्रमार्थ प्रजापति निर्माण करून, इंद्रास देवांचा राजा करून व इतर कामावरही अन्यदेवता योजून त्यांच्याकडेसच कार्यकर्तृत्वें सोंपवून त्यांना नामाधिकारी करून आपण अलिप्तच राहिले; तसेंच नामाधिकारी रोग पुढें करून मृत्यू अलिप्तच राहिला. हीच पद्धत चालू बखरींत सांगितल्याप्रमाणें जगव्यवहारांतही अशीच उतरली आहे.

पृष्ठ	पंक्ति	पद्यांचा अर्थ—अधीक टीपा—पद्य १ लें.
११	,,	राजा स्वत: अलिप्त राहून सेवक अधिकारी यांच्याद्वारें आपलीं कर्मं कर्तृत्वें करवितो. सेवक मात्र जगांत प्रसिद्धीस येतात. राजा त्या कर्तृत्वांत मुळींच दिसून येत नाहीं. हुकूम चालविणारे सत्ताधीश एकीकडे गुप्त व अलिप्त राहतात, आणि त्यांच्या कर्तृत्वाचा प्रभाव आणि प्रताप व प्रकाश मात्र सर्वत्र पसरतो. तो पसरण्यास केवळ वृथा नामधारी हुकूम अमलांत आणणारे मात्र जगांत दिसून येतात. कशाही युक्तीनें व गुप्त मसलतीनें कांहीं कर्म कोणीही केलें, तरी धूर्त व ज्ञानी तें कर्म कोणाचें व कसें हें जाणतात.
		जेथें देहगति नाहीं तेथें ज्ञानगति आहे; मात्र तैल व कुशाग्र अशी बुद्धि पाहिजे. ज्याचे आपण अंश आहों त्याचेच ज्ञानादि गुण, लक्षणें व धर्म हे अंशानें आपणांत आहेत. आणि ह्मणूनच त्याला व आपण आपल्याला जाणूं शकतो. अद्वैताचें द्वैत होऊन त्या द्वैतांतच आपण निमग्न झालों, ते पुनरपि अद्वैतवासी झालों ह्मणजे तीच मुक्ति होय.

सोहिरोबानाथकृत पद्यसंग्रह भाग ३ यांचें शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
		१ बखर.	
३	२	(टीप) गुग होऊन	गुंग होऊन
४	२२	(टीप) तशीच	तशीच
,,	२६	(टीप) आद्यंतातील	आद्यंतातीत
५	१४	१ किल्ला मजबूत	१ किल्ला मजकूर
,,	१८	(अन्यपाठ) छापलें आहे पहा	छापलें आहे तें पहा.
६	२२	१ नाम दाज नैऋत्यजी	१ नामजाद निर्ऋत्यजी
,,	१८	स्पर्शत्व	(पाठभेदः–) स्पर्शतव्य
६	२१	द्दष्टित्व	(पाठभेद) द्रष्टत्व
८	२	नैर्ऋत्यादि	निर्ऋत्यादि
,,	३	मूळतत्त्वीं	(अन्यपाठः–) मुक्तत्त्वीं
,,	५	भालदार यानें सर्व	भालदार यानें जावें व सर्व०
,,	८	अनंग	(अन्यपाठः–) अनघ
,,	११	अफाट	अफांट (अन्यपाठः) अभांड
९	१२	राज गुदस्त	रोज गुदस्त
१०	१९	रिपु भाकता	रिपुभावना
,,	२१	बुरुंजां न कढतां	बुरुंजां न कळतां
		२ स्फूट पद्यें.	
११	१०	३ स्फूट पद्यें (अनुक्रमांक ३ हा चुकीचा आहे.)	२ स्फूट पद्यें
१२	१	टाकुनि	टांकुनि
,,	७	बिंदु आनदु	बिंदु आनंदु
,,	१२	दैवति	दैविशि
१३	५	येवढेचि	येवढें
१४	५	योग्यक्षेमालागीं	योगक्षेमालागीं.
,,	६	येताचिना	येताचिना
१४	८	आदिं नसे अंतींहि०	आदिं नसे देह अंतीहि०
१६	७	(पद्य २१) अवधूत दिगंबर	अवधूत दिव्य दिगंबर

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
”	१६	रूप रेख	रूप न रेख
२०	१५	(पद्य ३५) वसे जें तें कळेचि	वसे जें न कळेचि
		३ स्फूट श्लोक.	
२१	१	२ स्फूट श्लोक (अनुक्रमांक २ हा चुकून पडला आहे.)	३ स्फूट श्लोक
२२	७	युक्ति घडे	मुक्ति घडे
२४	१६	समजलें	समजणें
२६	१	सर्वेंद्रियालासणें	सर्वेंद्रियां लासणें
”	४	प्रासी मानस दासी	मासी मानस दासी
”	१०	हे वाजे	हे वाचे
”	१८	(टीप २) त्याचा त्याग०	त्याचा वाचा त्याग०
२७	११	हा जीव का जोखुन	हा जीव कीं जोखुन
२८	१४	(टीप १) सभास आहे	साभास आहे
२९	७	भव भंजन	भवा भंजन (भवाचें भंजन असा अर्थ घ्यावयाचा.)
३०	२	तू कासि हो	तूकासि हो
३१	१७	पुरुषाचें मुख्य आहे	पुरुषाचें मुख आहे
३२	८	भोगी तिच	भोगीतिच
”	”	तें मुक्त	ते मुक्त
”	११	आपिसी	ओपिसी
३३	७	संसार बांधी मळा	संसार बांधी गळां
३५	७	काहींवरा	कां ? हींवरा
३६	२	संसार ओटी	संसार ओढी
३७	१	पाथिका	पायिका
”	२	आपणा नायका	आपणा नायिका
”	३	ज्ञानप्रदा नायका	ज्ञानप्रदा नायिका
३७	१२	(टीप ५) तेवीं दोघीं	तेवीं दोर्घी
३९	२	गा तया	गातयां
”	३	सांगा तया	सांगातयां

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
३९	४	जा तयां	जातयां
३९	१२	जळें सिनिप जे	जळेंशीं निपजे
,,	१६	आत्मासि	आत्यासि
,,	१८	देहा संग	देहासंग (देह+असग=देहासंग)
४०	४	मिळतांना	मिळतां ना
,,	७	दासांशी	दासांसी
४०	१५	(टांप १) निरतर]	निरंतर
,,	२३	(टीप ४) ज्ञानाग्नि संपक	ज्ञानाग्निसंपर्क
४१	२२	जेथें तेथेंचि	जेथें तेथचि
४३	१२	सोहिरा लछ (१) लावि०	सोहीरा लय लावि०
४५	८	कोणी न धि:कारी०	कोणीहि धि:कारी०
४५	२३	(टीप १) पर्घावितो	बडवितो
४६	१	हांते होड	होतें होड
४७	३	ब्रह्मांडिं ली	ब्रह्मांडिं जो
,,	८	भंजीतसे	भक्षीतसे
४९	३	कळना	कळेना
,,	५	नको हाट कांही	नको हा टका हो
,,	८	तूं एक कीं गा	तूं ऐस कीं गा !
,,	१९	(टीप ६) जुनें नवें०	जुनें टांकून नवें

४ स्फट अभंग.

५०	१	३ स्फूट अभंग (अनुक्रमांक ३ हा चूकून पडला आहे.)	४ स्फूट अभंग
,,	१३	(अभंग ३) माल काठी	भालकाठी
५१	३	(अभंग ४) मागें	मार्गें
,,	८	(अभंग ५) टाकुनि	टांकुनि
५२	१८	(अभंग ९) पंचभूतांचें हे देह	पंचभूतांचें हें देह
५४	१	नित्यावनी	नित्यवनीं
५८	१०	(अभंग २४) तोडिजे	तोडिजे वे

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध व अपूर्ण.	शुद्ध व पूर्ण.
		५ आरत्या संग्रह.	
६३	१	४ आरत्या संग्रह (अनुक्रमांक ४ हा चुकीचा आहे)	५ आरत्या संग्रह
६४	२	(आरती २) न (चि ?)	त (चि ?) न्मय
६५	२	(आं० ३) मार	नार
६८	५	निभता हे जनही	निभता है जानही
		६ सेली.	
७४	१	५ सेली (अनुक्रमांक ५ चुकून पडला आहे	६ सेली
,,	१	ठाड	ठाडा
७५	२६	(टीप १४) करतासना ?	करतोस ना ?
७६	५	(सेली ५) झीका रहना	धीका रहना
७८	२	(सेली ८) तमपर	तनपर
		परिशिष्टें.	
१	१७	हेटेकरी	इटेकरी
१५	१८	मन हा चंद्रमा होय. याठिकाणीं चुक झाली आहे. बाजूस लिहिल्याप्रमाणें पाहिजे. सांख्य शास्त्राच्या नियमाप्रमाणें या बखरींतील प्रत्येक संख्या गणितानें बांधलेली आहे, तीं जिज्ञासूनीं मुळाशीं ताडून पहावी.	परमात्म्याच्या मनापासून चंद्र झाला. त्या चंद्राच्या (तेजोमय अमृतमय पुरुष अथवा संवत्सररूप प्रजापतीच्या) पंधरा कला (ह्मणजे अर्थात् दिवस आणि रात्री) आणि सोळावी कळा ध्रुव होय. (बृ. उ. अ. १ ब्रा. ५ मं. १४ पहा) या संवत्सररूप प्रजापतीचें वित्त ह्या पंचदशकला होत, आणि त्याचा आत्मा ही सोळावी कळा होय. (बृ. उ. अ. १ ब्रा. ५ मं. १६ पहा)
१६	९	हृदय स्थानच	हृदयस्थानचें